
# निश्चयाचा महामेरू

## अर्थात शिवरायांचे जाणतेपण



महेश श्री. गुप्ते

या पुस्तकाच्या लेखक व प्रकाशक मा. महेश गुप्ते यांनी या पुस्तकाच्या ई वितरणाची विनामूल्य परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण त्यांना **7738852531** या क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान हे मुक्तपीठ आहे व सर्व प्रकारच्या लेखनाला प्रसिद्धी देते. या पुस्तकातील मजकूर, माहिती व मते यांच्याशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

# निश्चयाचा महामेरू

## अर्थात शिवरायांचे जाणतेपण

महेश गुप्ते

## निश्चयाचा महामेरू




**लेखक : महेश श्री. गुप्ते**
१, अविनाश सोसायटी,
शिवम सोसायटीच्या मागे
गुरुकुलजवळ, पांचपाखाडी,
ठाणे (प.) ४००६०२
मो. : ७७३८८ ५२५३१



प्रकाशक :
© **श्री. समीर महेश गुप्ते**
ई ४०४, वसंत फियोना
वसंत लॉनजवळ,
ठाणे ४०० ६०२

विशेष सहाय्य :
**विनोद पितळे**

मुखपृष्ठ, मांडणी सजावट
**मनीष वाघ**

मुद्रक :
**सिद्धी फ्रेन्डस् पब्लिकेशन, ठाणे**

प्रथम आवृत्ती :
**१९ फेब्रुवारी २०२४**

मूल्य :
**रु. ३५०/-**




क्षत्रिय कुलावंतंस
छत्रपति शिवाजी महाराज
यांना गेली साडेतीनशे वर्षे
आपल्या हृदयात आदराने
साठवून ठेवणाऱ्या
महाराष्ट्रातील व
महाराष्ट्राबाहेरील
समस्त शिवभक्तांस...

# मनोगत

६ जून १६७४ रोजी रायगडावर महाराष्ट्राचे हृदयसम्राट शिवाजी महाराज यांना राज्याभिषेक करण्यात आला. महाराज क्षत्रिय कुलावंतांस छत्रपती शिवाजी महाराज झाले. हा जो थोरला समारंभ पार पडला त्याला आज ३५० वर्षे होत आहेत. त्याप्रसंगी एखादे शिवचरित्र आपल्या हातून लिहिले जावे असे वाटणे अगदी स्वाभाविक होते. परंतु प्रश्न असा होता की आजवर इतकी शिवचरित्रे लिहिली गेली आहेत तर त्यात आणखी एका शिवचरित्राची गरज आहे का? कारण खरोखर महाराजांवर बरेच लिखाण त्यांच्या मृत्यूपासून अखंड चालू आहे.

अनेक परकीय आणि एतद्देशिय इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास आणि शिवचरित्र लिहून महाराजांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. कास्मे-द-ग्वांदे या पोर्तुगीजाने १६९५ मध्ये पहिले शिवचरित्र लिहिले. हा महाराजांच्या पहिला चरित्रकार त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या पंधरा वर्षांनी महाराजांचे चरित्र लिहून गेला. हा महाराजांचा समकालीन होता. त्याचे लिखाण अधिक विश्वासार्ह असण्याची शक्यता होती. परंतु त्याचे लेखन वरवर स्वरूप आहे. त्यानंतर कृष्णाजी अनंत सभासद हाही महाराजांचा समकालीन इतिहासकार, ज्याने १६९४ ते १६९७ या काळात 'सभासद बखर' लिहिली.

वास्तविक घटनांची घडल्याबरोबर नोंद करणे, पुराव्यांचा अभ्यास करणे, इतिहास लिहून ठेवणे हा मराठ्यांचा पिंडच नव्हे. मराठ्यांनी इतिहास घडविला, पण लिहून ठेवला नाही. त्यामुळे आजही मराठ्यांचा इतिहास लिहिताना मोगल, इंग्रज, पोर्तुगीज आणि डच यांच्या पत्रव्यवहारांकडे आधारासाठी अवलंबून राहावे लागते. हाताच्या बोटांवर मोजता येण्याइतक्या मराठ्यांनी इतिहास लिहिला आहे. परंतु तो बखर स्वरूपाचा असून इतिहास घडून गेल्यावर १००-१३० वर्षांनंतर लिहिला असल्याने त्यावर विसंबून राहता येत नाही.

एकोणीसाव्या शतकापासून मराठ्यांच्या इतिहास संशोधकांची, इतिहासकारांची आणि इतिहास संकलकांची एक अखंड मालिकाच तयार झाली. एतद्देशियांना इतिहास लेखनाचे महत्त्व पटत होते. त्यातही परकीय इतिहासकार ग्रँट डफ, रॉबर्ट ऑर्म, स्कॉट वेअरिंग, थिवेना, कॅरे हे अग्रेसर होते. अर्थात त्यांनी लिहिलेला इतिहास हा जेत्यांनी लिहिलेला असल्याने तारतम्यानेच स्वीकारावा लागतो. परंतु त्या काळात भारतीयांना मराठ्यांच्या जाज्वल्य इतिहासाचे आकर्षण वाटू लागले. सुरेंद्रनाथ सेन,

यदुनाथ सरकार, डॉ.बाळकृष्ण यांसारखे अमराठी आणि न्या. रानडे, मिरजेचे वासुदेवशास्त्री खरे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गो. स. सरदेसाई, वा. सी. बेंद्रे यासारखे मराठी असे अनेक इतिहासकार होऊन गेले. ही मालिका आजपर्यंत अखंड चालू आहे.

मध्यंतरी औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी १९३१ साली कै. चिंतामणराव वैद्य यांच्याकडून 'शिवाजी द फाऊंडर ऑफ मराठा स्वराज्य' हा ग्रंथ लिहून घेतला. त्यानंतर दि. वि. काळे सेतूमाधवराव पगडी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले. कै. ब. मो. पुरंदरे तर शिवभक्तच होते. त्यांनी व्याख्यानातून शिवचरित्र प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.

या व्यतिरिक्त हजारो प्रसिद्ध-अप्रसिद्ध लेखकांनी लहान मोठी शिवचरित्रे लिहिली आहेतच. यावरून एकच गोष्ट सिद्ध होते की इतिहासलेखन ही एक प्रदीर्घ लेखन प्रक्रिया आहे. रोज नवनवी साधने उपलब्ध होत असतात. जुन्या संशोधनाबाबत नव्याने नवीन चिकित्सा होत असतात. एखाद्या पूर्वीच्या पुराव्याचे अर्थ बदलत असतात. त्यामुळे शिवचरित्र भविष्यातही हजारो वर्षे लिहिले जाणार आहे. शिवचरित्र हे एक चिरतरुण काव्य आहे. हा विचार मनात पक्का झाला आणि आणखी एका शिवचरित्राची भर पडणार हे नक्की झाले. ६ जून २०२३ रोजी लिहायला सुरुवात करून गणेश चतुर्थी दि. १९ सप्टेंबर २०२३ रोजी 'निश्चयाचा महामेरू' हे शिवचरित्र लिहून पूर्ण झाले.

या शिवचरित्रात त्यातील आश्चर्यकारक आणि चमत्कार वाटावे अशा प्रसंगाच्या वर्णनाचा मोह टाळून शिवाजी महाराजांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. बहुतेक वेळा लेखक या आश्चर्यकारक घटनांनी इतका प्रभावित होतो की 'आग्र्याहून सुटका', 'पावनखिंड' यांसारखी स्वतंत्र पुस्तके लिहिण्याचा मोह त्याला आवरता येत नाही. त्यातून या घटना अजरामर होतात, पण शिवाजी महाराजांचे अलौकिक गुण समाजापुढे येणे खंडीत होते. त्यामुळे याचे भान ठेवून या शिवचरित्रात शिवाजी हा 'जाणता राजा' कसा होता हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

शिवप्रेमी वाचक या 'निश्चयाचा महामेरू'चे स्वागत करतील अशी आशा करतो.

**- महेश श्री. गुप्ते**

**गणेश चतुर्थी १९ सप्टेंबर २०२३**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| शिवपूर्व काळ | ११ |
| श्री शिवचरित्र | १५ |
| छत्रपतींचा परिवार | १०५ |
| शिवकालीन न्यायव्यवस्था | १०९ |
| शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ | १११ |
| शिवकालीन लष्करी व्यवस्था | ११५ |
| शिवकालीन महसूली व्यवस्था | १२३ |
| शिवरायांचे आरमारी सामर्थ्य | १२७ |
| शिवकालीन अर्थव्यवस्था | १३१ |
| शिवरायांचे गडकिल्ले | १३५ |
| शिवरायांचे शिलेदार | १३९ |
| महाराज आणि परकीय सत्ता | १९५ |
| शिवरायांचा राज्याभिषेक | २०१ |

| | |
|---|---|
| महाराजांची कर्नाटक मोहीम | २१५ |
| महाराजांचे पर्यावरण धोरण | २३५ |
| महाराजांची सावधानता | २३७ |
| महाराजांचे धार्मिक धोरण | २४२ |
| मातृभक्त शिवराय | २४५ |
| महाराजांची सर्वधर्मसहिष्णुता | २५० |
| शिवकालीन शेतीव्यवस्था आणि पर्यावरण | २५४ |
| शिवरायांची युद्धनिती आणि आरमार | २५८ |
| शिवरायांची थोरवी | २६४ |



# शिवपूर्व काळ

महाराष्ट्राचा भौगोलिक विचार केला तर महाराष्ट्राचा मध्यभाग हा डोंगराळ सह्याद्रीने व्यापलेला आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेस असणारी समुद्र किनारपट्टी कोकण म्हणून ओळखली जाते. पूर्वेस विस्तीर्ण पठार आहे. या सर्व प्रदेशावर सातवाहनापूर्वी सम्राट अशोकाचे साम्राज्य होते. त्याचे पुरावे म्हणजे सोपारा येथील अशोकस्तंभ आणि सापडलेला शीलालेख, तसेच भुईगाव येथील शीलालेख सांगता येतात. सम्राट अशोकाच्या कारकिर्दीत या भागात बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार होत होता. त्यानंतर याच भागावर सातवाहन राज्यकर्त्यांचे राज्य आले.

सातवाहनानंतर कचचुरी, वाकाटक आणि चालुक्य घराणी काही वर्षे राज्य करीत होती. सन १७५० नंतर राष्ट्रकुटांची सत्ता आली. राष्ट्रकुटांतर्फे शीलाहारांची आणि मग अपराजित यांचे राज्य होते. राष्ट्रकुटाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रावर भरभराटीचा काळ होता. सोमेश्वर हा उत्तर कोकणाचा शेवटचा शीलाहार राजा होता. तेव्हा दक्षिणेकडे विस्तीर्ण पठारावर कल्याणीच्या चालुक्याची व त्यानंतर देवगिरीच्या यादवांची सत्ता होती.

शिवजन्माच्या आधी साडेतीनशे वर्षे महाराष्ट्रात सुख होते, सुबत्ता होती. महाराष्ट्रात सोन्याचा धूर निघत होता. ही संतांची भूमी होती. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताई, नामदेव असे अनेक संत या भूमीत होते. उभा महाराष्ट्र तृप्त होता. भक्तिरसात न्हावून निघत होता. देवगिरीला यादवांचे राज्य होते. राज्य हिंदू होते. आणि ते राजे महाराष्ट्राचे रक्षण करण्यास सक्षम होते. पण दूर दिल्लीला सुलतान घराणी होती. खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी अशी घराणी दिल्लीहून अनिर्बंध कारभार करीत होती.

१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी केली. रामदेवराव यादव हा देवगिरीच्या किल्ल्यावर होता. त्याचा मुलगा हा शंकरदेव हा सैन्य

घेवून राजधानी देवगिरीपासून दूर गेला होता. रामदेवराव घाबरला नाही. तो अपुऱ्या फौजेनिशी अल्लाउद्दिनशी लढला. शौर्याने लढूनसुद्धा रामदेवरावचा पराभव झाला. त्याने खिलजीशी तह करून त्याला प्रचंड संपत्ती दिली. खिलजी दिल्लीला परत जाणार होता, तोच शंकरदेव ससैन्य परत आला. त्याच्याजवळ देवगिरीची प्रचंड फौज होती. अल्लाउद्दिनला पराभव स्वच्छ दिसू लागला. त्याने जिहाद म्हणजे धर्मयुद्ध पुकारले. या युद्धात जिहाद पुकारल्याने शंकरदेवचा पराभव झाला. शंकरदेवने पुन्हा तह केला. तहात खिलजीला करोडोची संपत्ती, सोने, जवाहिरे, मोत्ये द्यावी लागली. संपत्तीचा लोभी खिलजी दिल्लीला परत गेला. जाताना त्याने देवगिरीवर अमाप खंडणी लादली.

पुढे १३०७ मध्ये रामदेवरावने खिलजीला खंडणी देण्याचे नाकारले. पुन्हा युद्ध झाले. रामदेवरावचा पराभव झाला. रामदेवरावला दिल्लीला नेण्यात आले.

१३०९ मध्ये शंकरदेवने खिलजीची सत्ता झुगारली. पुन्हा युद्ध झाले. शंकरदेवचा पराभव झाला. १३९८ मध्ये हरपालदेवने तेच केले, त्यामुळे त्याचाही पराभव झाला. प्रचंड लूट केली गेली. १३२० मध्ये खिलजीची सत्ता गेली. दिल्लीला तुघलक घराणे सत्तेवर आले. त्यांची सत्ता १३४७ पर्यंत महाराष्ट्रावर होती. १३४७ पासून महाराष्ट्रात बहामनी सत्ता आली. या सत्तेने महाराष्ट्र व्यापला होता. पण १४८४ पासून बहामनी राज्याची उतरती कळा सुरू झाली. बहामनी साम्राज्याचे पाच तुकडे पडले. एलीचपूरची इमादशाही (१४८४), बीदरची बरीदशाही (१४९२), अहमदनगरची निझामशाही (१४८९), विजापूरची आदिलशाही (१४८९), पाचवी शाही गोवळकोंड्याची कुतूबशाही... असे बहामनीचे पाच तुकडे पडले.

या पाच शाह्यांपैकी कुतूबशाही महाराष्ट्राबाहेर होती. परंतु या चार शाह्या आणि खानदेशातील फारूखशाही अशा पाच शाह्यांनी पूर्ण महाराष्ट्र व्यापला होता. शिवाय दिल्लीला मोगल होतेच. या सर्व सत्ताधीशांचे अनेक राज्यकर्ते झाले. परंतु ते सारे विलासी, कपटी आणि महाराष्ट्रीय रयतेवर अन्याय करणारे होते. स्वतःच्या विलासासाठी महाराष्ट्राची आर्थिक लूट करीत होतेच, पण आई-बहिणींची अब्रूही लुटली जात होती.

मग अशा दुर्दशा झालेल्या महाराष्ट्रात मराठे नव्हते का? असा प्रश्न पडेल. तर अनेक मराठी घराणी सरदार, वतनदार, मनसबदार, जमीनदार होते. पण ही सारी मंडळी सभोवतालच्या मुस्लीम सत्तांच्या कच्छपी लागली होती. सत्तेपुढे अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची त्यांची शक्तीच नष्ट झाली होती. त्यांना

इच्छाही होत नव्हती. बादशहाने केलेला अपमान त्यांना अपमानच वाटत नव्हता. हीच माणसे बादशहासाठी लढत होती, मरत होती. आपली वतने पिढ्यान्‌पिढ्या सुरक्षित रहावी यासाठी आपापसात भांडत होती. पिढ्यान्‌पिढ्याचे वैर करत होती, पण बादशहापुढे नतमस्तक होत होती. त्यांना होरपळणाऱ्या रयतेची कणव येत नव्हती.

मराठा सरदारांच्या आपापसातील भांडणाची अनेक उदाहरणे आहेत. त्यातील एक प्रसंग पाहू.

एकदा निझामशहाचा दरबार संपवून सर्व सरदार आपापल्या मुक्कामी जाण्यासाठी निघत होते. सर्वच सरदारांना घरी जाण्याची घाई असल्याने राजवाड्याबाहेर बरीच गर्दी झाली होती. प्रत्येक सरदारांचे नोकर आपापल्या मालकाला गर्दीत शोधून घरी घेवून जात होते. काही सरदार पुढे निघून गेलेही होते. सिंदखेडचे लखुजी जाधवराव हे असेच पुढे गेले होते. तेवढ्यात एक बातमी आली की खंडागळे सरदारांचा हत्ती बिथरला असून सैरावैरा पळतो आहे. त्याच्या सोंडेच्या प्रहाराने आणि पायदळी तुडवल्याने अनेक लोक जखमी होत आहेत. त्या हत्तीचा माहूत हत्तीला आवरण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. परंतु चवताळलेला हत्ती माहूताला दाद देत नव्हता. हत्तीच्या या माऱ्यात लखुजी जाधवरावांचे काही सैनिक प्राणास मुकले होते. झाल्याप्रकाराने जिजाबाईंचे बंधू दत्ताजी जाधवराव चिडले आणि खंडागळेंच्या हत्तीवर चालून गेले. जाधवरावांचे नुकसान बरेच झाल्याने त्यांची चीड योग्य होती.

दत्ताजी जाधवराव हत्तीवर चालून जात आहेत हे पाहून शहाजीराजांचे चुलत बंधू संभाजी भोसले आणि खेळोजीराजे हत्तीच्या रक्षणासाठी धावले. भोसले बंधू दत्ताजीला ओरडून सांगत होते की 'हत्तीला मारू नका.' पण दत्ताजी जाधवराव ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्याने हत्तीची सोंडच कापली आणि दत्ताजी संभाजी भोसलेवर तुटून पडला. दोघात अटीतटीची झुंज झाली. दोन्ही पक्षाचे लोक एकमेकांना भिडले. राजवाड्याबाहेर रणकंदन माजले. या गर्दीत संभाजी भोसलेच्या हातून दत्ताजी जाधवराव मारला गेला. ही बातमी पुढे मुक्कामावर गेलेल्या लखुजी जाधवरावाला कळताच ते माघारी फिरले. लखुजी पुत्रशोकाने पेटून उठले होते. त्यांनी प्रथम जावई शहाजीराजांच्या खांद्यावर वार केला. शहाजीराजे जमिनीवर कोसळताच लखुजीरावांनी आपण मोर्चा संभाजीकडे वळवला. एका घावात लखुजीरावांनी संभाजी भोसले यास ठार करून पुत्र दत्ताजीच्या मृत्यूचा सूड घेतला.

एका शुल्लक कारणासाठी निझामशाहीच्या दारात जाधवरावांचा मुलगा दत्ताजी आणि शहाजीराजांचा चुलत भाऊ संभाजी मरून पडले होते. पुढे हे भोसले-जाधवराव घराण्यांतले वैर अनेक वर्षे चालले. जिजाबाईंचे माहेर सुटले.

त्यानंतर १६२४ च्या ३१ ऑक्टोबरला भातवडीची लढाई झाली. आदिलशाही आणि मोगल फौजा एक होवून निझामशाहीवर चालून आल्या होत्या. अहमदनगरजवळ भातवडी येथे हे युद्ध झाले. या युद्धात निझामशाहीच्या रक्षणार्थ शहाजीराजे, त्यांचे भाऊ शरीफजीराजे, विठोजीराजांचे सर्व पुत्र, नाईक- निंबाळकर, विठोजी काटे, हंबीरराव चव्हाण, पिंगळे असे अनेक मराठा सरदार लढत होते.

भातवडीची लढाई तीन मुस्लीम सत्ताधीशांत झाली, पण लढत होते मराठे आणि मरतही होते मराठेच. या युद्धात शहाजीराजांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले होते. युद्धाचा खर्च वसूल करण्यासाठी मराठी मुलूखावर पट्टी बसवण्यात आली. मराठ्यांवर केवढा हा अन्याय होता. मराठ्यांनी लढायचे, मराठ्यांनी मरायचे, लढाईचा खर्च मराठ्यांनीच द्यायचा. न दिल्यास विनाचौकशी तुरुंगवास, न्याय मिळविण्याचीही सोय नव्हती. मुलूख मराठ्यांचा, हाल मराठ्यांचे.

हिंदूंची देवळे पाडून त्या ठिकाणी मशिदी बांधणे चालू होते. नाशिक येथील नारायण मंदिर पाडून तेथे मशिद उभी राहिली. २ जून १६२९ रोजी मोगलांनी पिंपळगाव पिसे हे गाव लुटले. बायका मुलींची अब्रू घेतली. हे सारे सर्रास चालू होते. पण हिंदूंच्यात एकी नव्हती. कोणाला चीड येत नव्हती. लढाया होत होत्या मराठी मुलखात. शेतकऱ्यांची उभी पिके घोड्यांच्या टापांखाली चिरडली जात होती. लुटली जात होती. संपूर्ण बहुजन समाज मरगळला होता.

महाराष्ट्रावर अशी सुलतानी संकटे येतच होती. त्याचबरोबर अस्मानी संकटही होतेच. महाराष्ट्रात १३९६ ते १४०८ अशी बारा वर्षे दुष्काळ होता. हा आजवरचा सर्वात मोठा दुष्काळ. सर्वत्र धान्याची वानवा होती. शेते ओसाड पडली होती. माणसे घरदार मोडून परागंदा होत होती. जी होती, त्यांच्यावर आपलीच गुरेढोरे मारून खाण्याची वेळ आली होती. एक-दोन वर्षे दुष्काळ तर महाराष्ट्रावर नेहमीच असे. शिवजन्माआधी १६२९-३० मध्ये दोन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळ होता.

सुलतानी आाणि अस्मानी संकटात पिचलेला महाराष्ट्र, त्यात वारंवार होणाऱ्या लढाया आणि सत्तांतरे, सैनिकांकडून होणारी रयतेची लूट, कुठेच आशेचा किरण दिसत नव्हता. असा महाराष्ट्र शिवजन्मापूर्वी होता.

# श्री शिवचरित्र

छत्रपती शिवरायांचे भोसले घराणे हे राजस्थानातील उदेपूरच्या सिसोदे घराण्यातील आहे हे शिवराज्याभिषेकप्रसंगी सिद्ध करण्यात आले असले तरी भोसले घराण्याची अधिकृत वंशवेल सापडत नाही. घृष्णेश्वराच्या देवळातील शिलालेखावरून व साहित्य मकरंद या संस्कृत साहित्यात येणाऱ्या उल्लेखावरून शहाजीराजांच्या खापरपणजोबांपर्यंत माहिती मिळते. ही माहिती अधिकृत मानता येते. शहाजींचे खापरपणजोबा खेलोजी, पणजोबा परसोजी, आजोबा, बाबाजी आणि वडील मालोजी इतकी भोसले वंशावळ पुराव्यांनी सिद्ध होते.

बाळाजी आवजी चिटणीसांनी राज्याभिषेक समयी महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी राजस्थानात माणसे पाठवून जी भोसले वंशावळ सिद्ध केली आहे ती अभ्यासकांसाठी पुस्तकाच्या शेवटी दिली आहे. या वंशावळीतील भोसाजीवरून कुळाला भोसले हे आडनांव पडले असे सांगितले जाते. वाडीकर-सावंत आणि मुधोळचे घोरपडे हेही याच सिसोदे घराण्यातील मानले जातात.

परसोजीचा मुलगा बाबाजी भोसले यास वेरुळची व दौंडजवळ भीमेच्या काठी पाटीलकी होती असा उल्लेख सापडतो. बाबाजी हा निझामशाहीचा मनसबदार होता, परंतु त्याच्या पराक्रमाविषयी अथवा मनसब किती होती याविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. बाबाजीस दोन मुलगे होते, मोठा विठोजी आणि धाकटा मालोजी. मालोजी किंवा विठोजी यांचे जन्मस्थान उपलब्ध नाही. मालोजीच्या पत्नीचे नाव उमाबाई होते. ती फलटणच्या निंबाळकर घराण्यातील वणंगपाळ याची बहीण होती. मालोजी-उमाबाईंना काही काळ अपत्य न झाल्याने त्यांनी अहमदनगरच्या शहाशरीफ या मुस्लीम संताला नवस केला. त्यानंतर १८ मार्च १५९९ शहाजीचा जन्म झाला. लगेच १६०१ मध्ये शरीफजीचा जन्म झाला. ज्या संतांच्या आशीर्वादाने ही दोन मुले झाली त्यांच्या

नावावरून ही शहाजी आणि शरीफजी अशी नावे ठेवली होती.

विठोजीच्या पत्नीचे नाव आऊ होते. विठोजीस एकूण आठ पुत्र झाले. खेळोजी, म्हालोजी, संभाजी, कक्काजी, परसोजी, मंबाजी, नागोजी, आणि त्रिंबकजी असे ते आठ पुत्र होते. विठोजीने व त्याच्या परिवाराने मुंगी गावची पाटीलकी सांभाळली.

मालोजी बाबाजी भोसले याविषयी इतिहासात फारशी माहिती नसली तरी त्याला गुप्तधनाचा साठा सापडला होता व त्या धनातून त्याने भोसल्यांचे कुलदैवत शिखर शिंगणापूर येथे तलाव बांधून पाण्याची सोय केली. तसेच वेरुळ येथे घृष्णेश्वर मंदिराजवळ एक मोठी विहीर बांधली. ही दोन पुण्यकर्मे करून त्याने औरंगाबाद येथे मालपुरा, विठूपुरा, परसपुरा व खेलपुरा असे चार पुरे वसविले, हे चार पुरे ज्यांच्या नावाने वसविले ते त्यांचे पूर्वज होते.

मालोजी आणि विठोजी हे दोघे निझामशाहीसाठी लढाया करीत असत. असेच एकदा लढाईवर गेले असता इंदापूरच्या लढाईत मालोजी मृत्यू पावला.

मालोजीचा मृत्यू झाला तेव्हा शहाजी सात वर्षांचा होता (पाच वर्षांचा नव्हे). इंदापूरच्या लढाईत मालोजीने रणदुल्लाखान या मुसलमान सरदाराचे प्राण वाचवले आणि आत्मबलिदान दिले. यामुळे या रणदुल्लाखानाने मालोजीचे उपकार स्मरून पुढील आयुष्यात शहाजीवर पुत्रवत प्रेम केले. मालोजीच्या निधनानंतर शहाजी आणि शरीफजी यांचा सांभाळ उमाबाई आणि विठोजी काका यांनी केला. योग्यवेळी शहाजीचा विवाह निझामशाहीतील सरदार लखुजी जाधवराव-सिंदखेडकर यांच्या मुलीशी जिजाऊशी करण्यात आला. तसेच शरीफजी याचा विवाह शिवनेरी किल्ल्याचे किल्लेदार विश्वासराव यांच्या बहिणीशी दुर्गाबाईंशी लावण्यात आला. शहाजी-जिजाबाई विवाहाबाबत बखरीत सांगितलेला रंगपंचमीचा उत्सव आणि त्यात घडलेला प्रसंग यास पुरावा काहीही नाही.

येथपर्यंतचा इतिहास पाहता एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते, ती म्हणजे परसोजी भोसले, बाबाजी भोसले, विठोजी, मालोजी यांच्यासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या कारकिर्दीत हे कुटुंब राजकारणात फारसे चमकले तरी नसावे अथवा त्यांच्याविषयी अधिक अभ्यास आणि संशोधन होण्याची गरज असावी. मालोजीपासून भोसले घराण्याचा उत्कर्ष झाला असे दिसते.

शहाजीराजांनी स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केलेला दिसतो. परंतु सभोवताली आदिलशाही, निझामशाही, कुतूबशाही, फारुखशाही

आणि मोगल याप्रमाणे मुस्लीम सत्ता असल्यामुळे मराठ्यांच्या शौर्याला म्हणावी तशी किंमत नव्हती. मराठ्यांनी या सुलतानांसाठी लढायचे आणि मरायचे आणि मराठ्यांच्या जिवावर या सुलतानांनी ऐश करावी असे सर्वत्र दृश्य होते. वारंवार मराठ्यांचा अपमान, अवहेलना होत होती. शहाजीराजेही याचे बळी होते.

शहाजींच्या पूर्वायुष्यातील काळ हा धकाधकीचा, धावपळीचा आणि आयुष्यावर व कुटुंबावर दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनांचा आहे.

जाधवराव आणि भोसले यांचे वैर कसे सुरू झाले, त्याची कहाणी मागील प्रकरणात वर्णन केली आहेच. त्या घटनेनंतर जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले गेले. अर्थात शहाजीराजांनी जिजाऊंवर या घटनेचा राग काढला नाही. दरम्यान लखुजीराव निझामशाही सोडून मोगलास जावून मिळाले.

शहाजींच्या आयुष्यातील दुसरी घटना म्हणजे भातवडीची लढाई. १६२२-२४ च्या दरम्यान आदिलशाही आणि निझामशाही यांच्यात वितुष्ट आले होते. आदिलशहाने निझामाला धडा शिकवण्यासाठी मोगलांची मदत घेतली. अकबर, जहांगीर यांना दक्षिण जिंकण्यात स्वारस्य होते. आता शहाजहान हा बादशहा होता. त्याने या संधीचा फायदा घेतला. मोगलांनी सीमेवरची निझामशाही संपवली की त्यांचा मोर्चा आदिलशाहीकडे वळेल हे साधे राजकारण आदिलशहाला समजले नाही. निझामशाहीतील वजीर मलिकांच्या हाताखाली शहाजी, शरीफजी व इतर सरदार मोगलांशी लढत होते. ही भातवडीची लढाई १६२४ मध्ये झाली. या लढाईत निझामशहाचा जय झाला. शहाजी-शरीफजीने अतुलनीय पराक्रम केला. शहाजीचा भाऊ शरीफजी या युद्धात मारला गेला. धूर्त मलिक अंबरने निझामशहास शहाजीच्या पराक्रमाविषयी काहीच सांगितले नाही. पण आदिलशाहीने शहाजीचा पराक्रम पाहून त्याला आपल्याकडे बोलावले. शहाजी आदिलशाहीत गेला.

शहाजीची आदिलशाहीची नोकरी जेमतेम तीन वर्षेच टिकली. १६२७ मध्ये आदिलशहा इब्राहिमशहा मरण पावला, त्याचा मुलगा महंमदशहा गादीवर आला. पण हा हिंदूंचा द्वेष करणारा असल्याने शहाजीने आदिलशाही सोडून निझामशाहीची नोकरी धरली. निझामशाहीत आल्या-आल्या शहाजीला मोगलांशी लढावे लागले. ही लढाई शहाजहानच्या विरोधात लढली गेली.

त्यानंतर शहाजीच्या आयुष्यात एक महाभयंकर घटना घडली. २५ जुलै १६२९ रोजी दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशी लखुजी जाधवराव सहकुटुंब राहत होते, त्या दिवशी निझामशहाकडून लखुजीस व त्यांच्या मुलास गडावर

बोलावण्यात आले. लखुजी जाधवराव, त्यांचे बंधू जगदेवराव व पुत्र अचलोजी, बहादूरजी, रघुजी हे तिघे लखुजीरावांचे पुत्र आणि नातू यशवंतराव हे गडावर निझामाच्या भेटीस गेले. दरबार संपताच जाधवराव कुटुंबावर अचानक हल्ला करण्यात आला. त्या हल्ल्यात लखुजीराव, त्यांचे पुत्र अचलोजी रघुजी व नातू यशवंतराव हे चौघे मारले गेले. जिजाऊंची आई म्हाळसाबाई, काका जगदेवराव व बंधू बहादूरजीच फक्त वाचले. जिजाबाईंचे माहेरच संपले.

मे १६२९ मध्ये शहाजीराजे काही काळ घरी आले होते. एरवी त्यांची सदैव धावपळ चालू होती. ऑक्टोबर १६२९ मध्ये शहाजींची धावपळ चालू असताना जिजाऊ सोबत होत्या. परंतु जिजाबाई गर्भवती होत्या. जिजाबाईंना आजवर एकूण पाच अपत्ये झाली होती. त्यातील सर्वात मोठा १६२० ला जन्मलेला संभाजी एकटाच जगला. बाकीची चार अपत्ये बालपणीच काळाने हिरावून नेली होती. शहाजींचे बंधू संभाजी हे खंडागळे हत्ती प्रकरणात मृत्यू पावले होते, त्यांच्या नावावरून जिजाऊंच्या या पुत्राचे नाव संभाजी ठेवण्यात आले होते. आता पुन्हा जिजाबाई गर्भवती होत्या. त्यांना धावपळ आणि घोडदौड सोसत नव्हती. म्हणून शहाजीराजांनी जिजाबाईंना शिवनेरी गडावर व्याह्यांकडे ठेवण्याचे ठरविले. शिवनेरी गडाचे किल्लेदार विश्वासराव हे शहाजींचे व्याही लागत होते. शहाजींचे बंधू शरीफजी यांची पत्नी दुर्गाबाई ह्या शिवनेरीच्या विश्वासरावांच्या भगिनी होत्या. त्या नात्याने शहाजीने जिजाबाईंना शिवनेरीवर ठेवले. विश्वासरावांनीही जिजाबाईंची जबाबदारी बहीण समजून स्वीकारली. आपले नाव सार्थ केले.

याच विश्वासरावांची कन्या जयंतीबाई हिला पुढे शहाजी व जिजाबाई यांनी सून करून घेतली. आपण वडील मुलगा संभाजी यांचे जयंतीबाईंशी लग्न लावून दिले.

जिजाबाईंच्या मनात माहेरची झालेली दु:खद परिस्थिती आणि भोवतालचे स्वाभिमानशून्य मराठे पाहून वारंवार स्वराज्याचे, सुराज्याचे विचार येत होते. शहाजीराजांचे त्यासाठी प्रयत्न चालू होते. पण त्यांना यश येत नव्हते. कोणीतरी दैवीशक्ती जन्माला आली तरच जिजाबाईंचे स्वराज्याचे, सुराज्याचे स्वप्न साकार होवू शकणार होते. जिजाबाई गडावरच्या शिवाई देवीला मागणे मागत होत्या. मनोमन आराधना करीत होत्या. 'आई शिवाई माझ्या पोटी असा पुत्र दे, जो माझे स्वप्न पूर्ण करील. प्रजेला सुखी करेल.'

शिवनेरीवरच्या शिवाई देवीने जिजाऊंची हाक ऐकली. फाल्गुन वैद्य तृतीया शके १५५१, शुक्रवार दिनांक १९ फेब्रुवारी १६३० रोजी सायंकाळी

सूर्यास्ताचेवेळी जिजाबाईस पुत्र झाला. गडावर आनंदीआनंद झाला. शिवाई देवीला साखर ठेवण्यात आली. शहाजीराजे मोगलांविरुद्ध लढण्यासाठी रानोमाळ घोडा उधळीत होते. त्यांना ही आनंदवार्ता कळविण्यात आली. वेरुळला वतनावर जिजाबाईंच्या सासूबाई उमाबाई साहेब होत्या. त्यांना पाचारण करण्यात आले. बाराव्या दिवशी नवजात बालकाचे नाव 'शिवाजी' ठेवण्यात आले. ज्या शिवाई देवीच्या आशीर्वादाने पुत्र जन्मला, त्या देवीच्या नावावरून शिवाजी हे नाव ठेवण्यात आले. नामकरण विधीस शहाजीराजे हजर नव्हते.

जिजाबाई शिवनेरीवर गर्भवती असता त्यांचे वडील लखुजीराव शिवनेरी गडावर आले होते. त्यांनी मुलीची भेट घेतली आणि 'मोहरांचा कसा देवीला अर्पण केला व नवस बोलिला' असे काही बखरीत उल्लेख आहेत, ते खरे नाही. कारण लखुजीरावांचा खून शिवजन्माआधी २५ जुलै १६२९ रोजी झाला होता.

शिवजन्मानंतर १६३०च्या जून-जुलैमध्ये शहाजीराजे पुत्र दर्शनार्थ शिवनेरीस आले. शहाजीराजांचा काही दिवस मुक्काम शिवनेरीवर होता. परंतु या काळात निझामशाहीमध्ये कट कारस्थानांना ऊत आला होता. मलिक अंबरच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र फत्तेखान वजिरी बळकावून बसला होता. त्याच्या कारकिर्दीला कंटाळून शहाजी मोगलांकडे गेले. परंतु निझामशाही वजीर फत्तेखानही आतून मोगलांना सामिल होता. १८ जून १६३३ ला या फत्तेखानाने दौलताबादचा बुलंद किल्ला मोगलांना देवून टाकला. अल्पवयीन निझाम हुसेनशहा याला मोगलांनी ग्वाल्हेरच्या किल्ल्यात ठेवले आणि निझामशाही संपवून टाकली. फत्तेखान मोगली मनसबदार बनला.

शहाजीराजांना फत्तेखानाच्या राजकारणाचा वीट आला होता, त्यांनी निझामशाहीचे पुनरुत्थान करण्याचे ठरविले. त्यांनी निझाम घराण्यातील एक लहान मुलगा मुर्तुझा याला घेवून निझामशाहीचा जीर्णोद्धार करण्याचा बेत केला. बेत धाडसी होता, पण साधला तर स्वतंत्र सत्ता हाती येणार होती. स्वतः निझामशाहीचा सर्वेसर्वा होवून स्वतंत्र होण्याचा शहाजीचा विचार होता. शहाजीने पेमगिरी किल्ल्यावर मुर्तुझाला गादीवर बसविले.

आदिलशाही आणि मोगल फौजा पाठलागावर होत्याच. ते पेमगिरीवर येत असताना शहाजीने निझामशाहीची राजधानी माहुली गडावर नेली. परंतु विजापूरकर आणि मोगल यांना निझामशाही संपवायचीच होती. त्यांनी लगेच माहुली गडाला वेढा दिला. आदिलशाही सरदार रणदुल्लाखान या वेढ्यात होता. तो शहाजीस पुत्रासमान वागवीत होता. तो जिजाबाईंना बहू म्हणत होता.

रणदुल्लाखानास समजले की शहाजी आता पुरता अडकला आहे. त्याने आतून शहाजीस समजावून तहास राजी केले. या तहाप्रमाणे शहाजीने मुर्तुझास मोगलांच्या हवाली केले. तहातील अटीप्रमाणे आदिलशाहीने शहाजीस नोकरीत घेतले, परंतु शहाजीने पुन्हा उठाव करू नये म्हणून शहाजीस दूर कर्नाटकात बंगळूर येथे पाठविले. फेब्रुवारी १६३६ मध्ये शहाजीराजे सहकुटुंब बंगळूरला स्थायिक झाले.

त्यावेळी कर्नाटकात एकसंधी राज्यसत्ता नव्हती. नुकतेच १५६५ मध्ये मुसलमानांनी एकत्र येवून विजयनगरचे बलाढ्य हिंदू साम्राज्य जिंकले होते. विजयनगरचा शेवटचा वंशज वेलोरला होता. परंतु त्या साम्राज्याचे सरदार आणि प्रांताधिकारी आपापल्या ठिकाणी स्वतंत्रपणे वागत होते. बंगळूर, बिदनूर, इक्केरी बसवापट्टण येथील हे छोटे-छोटे राजे आपापसात भांडत होते. आपल्याकडे ज्याप्रमाणे देशमुख, देसाई होते त्याप्रमाणे हे पाळेगार होते. १६३७ नंतर दोन वर्षांत आदिलशहाने शहाजीराजांच्या मदतीने कर्नाटकातील हा भाग जिंकून घेतला. आदिलशहाने शहाजीस या सर्व पाळेगारांना संपविण्याची आज्ञा केली होती. परंतु शहाजीने राजकारण करून त्यांना नष्ट न करता नमवून मांडलिक करून घेतले होते. त्यामुळे कर्नाटकात शहाजीचा दबदबा निर्माण झाला होता.

कर्नाटकात शहाजीने आदिलशाहीसाठी जिंकलेल्या प्रदेशावर आदिलशाहीने शहाजीस नेमले. शहाजीला बारा हजारी मनसब होती. त्यासाठी ही कर्नाटकातील जहांगीर देण्यात आली. शहाजी बंगळूरमध्ये स्वतंत्रपणे राज्य करू लागला. तो आपला स्वतंत्र दरबार भरवीत असे. स्वतंत्रपणे निर्णय घेत असे. आजूबाजूचे पाळेगार शहाजीस मानू लागले होते. त्यांना कळून चुकले होते की आपण मांडलिक जरी विजापूरचे असलो तरी आपल्याला शहाजीच सांभाळून घेवू शकतो. शहाजीचा कर्नाटकात असा प्रेमाचा दबदबा निर्माण झाला होता. शहाजीच्या दरबारात कित्येक गुणी कलावंत, कवी, भाट, चारण आश्रयाला होते.

जिजाबाई अत्यंत मानी आणि स्वतंत्र बाण्याची स्त्री होत्या. त्यांनी आपल्या माहेरची शाही लहरीमुळे झालेली दैना आपल्या डोळ्यांनी पाहिली होती. मराठे सरदार जहागिरदार या मुस्लीम राजवटीत किती लाचारीने जीवन जगत होत्या. अपमान अवहेलना सहन करीत होत्या. हे जिजाबाईंनी पाहिले होते. त्यामुळे जिजाबाईंना शहाजीचे हे शाह्या बदलणे आणि एका शहाचे सोडून दुसऱ्या शहाचे वर्चस्व मान्य करणे अजिबात पसंत नव्हते. हे सर्वच शहा सारखे होते.

हिंदू द्वेष्टी होते. या साऱ्या प्रकारांनी जिजाबाई मनातून अत्यंत व्यथित होत असे. ती शहाजीजवळ स्वतंत्र होण्यासाठी आग्रह धरीत असे. शहाजीने आजवर तसे स्वतंत्र होण्याचे प्रयत्नही केले होते. परंतु सर्वबाजूने मुस्लीम राजवटींनी घेरल्यामुळे ते शक्य होत नव्हते. आता शहाजी कर्नाटकात स्वतंत्रपणे राज्य करताना पाहून जिजाबाईंना थोडे का होईना, समाधान वाटत होते. परंतु शेवटी तीही आदिलशाहीची ताबेदारीच होती. जिजाबाईंनी मनोमन एक विचार पक्का केला की आपण बाल शिवाजीला या ताबेदारीच्या वातावरणापासून दूर ठेवायचे आणि त्याच्यावर स्वतंत्र राज्याचे संस्कार करून स्वराज्य निर्मिती करवून घ्यायची. जिजाबाईंनी हा विचार शहाजीराजांपुढे मांडला. त्यांनाही तो भावला. हा विचार पक्का होताच १६३६ मध्ये बाल शिवाजीस व जिजाबाईंना पुण्यात जहागिरीवर नेण्यात आले.

पूर्वी विजापूरच्या आदिलशहाच्या हुकूमावरून मुरार जगदेव याने शहाजीची जहागिरी असणाऱ्या पुण्याची नासधूस केली होती. पुणे जाळून बेचिराख करून टाकले होते. पुण्यात पहार ठोकली होती. त्यामुळे पुण्याचे शेतकरी, व्यापारी, नागरिक पुणे सोडून परागंदा झाले होते. वाडेहुडे ओस पडले होते. जमीन कसायला शेतकरी नव्हते. अशा ओसाड जहागिरीवर जिजाबाई बाल शिवाजीला घेवून आल्या. शहाजीने जिजाबाई व शिवबाबरोबर दादोजी कोंडदेव मलठणकर या अत्यंत हुशार, कर्तबगार व्यक्तीला पाठविले होते. दादोजी अत्यंत शिस्तीचे करारी होते तसेच ते हरहुन्नरी होते. त्यांनी पुण्याचे वैभव पुण्यास परत आणले. पुण्यावरून बालशिवाजीच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला आणि पुणे पुन्हा वसवले.

पुण्यात राजा आणि राजमाता आल्या, पण त्यांना राहायला वाडा नव्हता. जे होते ते पुणे पूर्वीच मुरार जगदेवाने जाळले होते. दादोजींनी पुणे कसबा येथे राहण्यासाठी लालमहाल बांधला, हत्ती आणले. घोड्यांची पागा तयार केली. राजवाडा सजला पण बाकीचे पुणे वसवायचे होते. दादोजींनी जेव्हा लालमहाल बांधायला घेतला तेव्हा कसबा पेठेत श्री गणेशमूर्ती सापडली. जिजाबाईंच्या हुकूमाने तेथेच श्री गणेशाची स्थापना केली. त्यानंतर दादोजींनी शेतकऱ्यांना, गावकऱ्यांना, व्यापाऱ्यांना परत बोलावले. त्यांना संरक्षणाची हमी दिली. शेतकऱ्यांना नांगर दिले, जनावरे दिली, पेरणीसाठी बियाणे वाटले. व्यापाऱ्यांना सवलती दिल्या. पुण्यात ओसाड पडल्यामुळे लांडग्यांचा वावर होता. दादोजींनी लांडग्यांची-कोल्ह्यांची शेपूट घेवून येणाऱ्याला बक्षिस देण्यास सुरुवात केली. बक्षिसाच्या आशेने लोकांनी पुण्यातील हे प्राणी नष्ट केले.

सुरक्षिततेच्या दृष्टीने राजाला राहण्यासाठी एकच वाडा असणे योग्य नव्हते. दादोजींनी खेडेबाडे येथे दुसरा महाल बांधला. शिवापूर वसविले. जवळच आमराई तयार केली. राजगडाच्या पायथ्याशी शिवापट्टण हे गांव वसविले. राजे नेहमी करता लाल महालातच राहणार असल्याने तेथे फडासाठी निवडक माणसे नेमून फड तयार केला. हळूहळू पुणे गजबजू लागले. पुण्याला गतवैभव प्राप्त झाले. पुण्याला राजधानीचे स्वरूप आले. हे सारे दादोजींच्या अथक परिश्रमाने आणि स्वामीनिष्ठेने साध्य झाले होते.

ह्या सर्व गडबडीत दोन वर्षे सहज निघून गेली. बालशिवाजीचे वय लग्नाचे झाले होते. त्याकाळी मुलाचे लग्न त्याच्या आठव्या-नवव्या वर्षी होत असे. जिजाबाईंना मुलाच्या विवाहाची काळजी होती. दादोजींनी फलटणच्या नाईक-निंबाळकर या खानदानी राज घराण्यातील मुलगी सईबाई ही वधू म्हणून निश्चित केली. शहाजीराजांच्या मातोश्री उमाबाईसाहेब या निंबाळकर घराण्यातीलच होत्या. त्यामुळे सोयरिक जुळण्यास काहीच अडचण आली नाही. शहाजीराजे लग्नासाठी पुण्यास येणार होते. परंतु काही अडचणींमुळे त्यांना येणे शक्य झाले नाही. तरी जिजाबाईंनी शिवाजी राजांचा विवाह उत्तम रितीने पार पाडला. सईबाई निंबाळकर या जिजाबाईंच्या सूनबाई झाल्या. लग्नाची तारीख होती १६ मे १६४०.

दादोजींनी आणि जिजाबाईंनी बालशिवाजीवर योग्य संस्कार करण्याचे ठरविले. जिजाबाईंनी राजांना रामायण महाभारतातील गोष्टी सांगितल्या. त्याचप्रमाणे त्या आपल्या वागण्या बोलण्यातूनही शिवबाबर संस्कार करीत होत्या. त्यांनी चिंचवड, आळंदी, तुळजापूर यांसारख्या देवस्थानाला देणग्या दिल्यामुळे शिवबा धार्मिक होत होता. जिजाबाई इतरांचे कौतुक आणि सन्मान करीत. ते पाहून शिवबाही इतरांचा सन्मान करू लागला, चुकीचे वागणाऱ्याला जिजाबाई  न्याय करून शिक्षा देत असत. ते पाहून शिवबा आपोआप शिकत होता.

दादोजींनी शिवबाच्या शिक्षणाची सोय केली होतीच. घोड्यावर बसणे, तलवार चालवणे, दांडपट्टा चालवणे वगैरेंसारखे लष्करी शिक्षण शिवबाला दिले जात होते. 'ज्या प्रदेशावर राज्य करायचे तो प्रदेश जाणून घेतला पाहिजे,' असे दादोजी म्हणत. दादोजींनी शिवबाला बारा मावळ फिरवले. दादोजी महसूल वसुलीसाठी, कामांसाठी जेथे जेथे जात, तेथे तेथे ते शिवबास नेत असत. कारण शिवबाला प्रत्यक्ष परिस्थितीची जाण व्हावी. आपल्या जहागिरीत रयतेची परिस्थिती, रयतेचे प्रश्न, अडचणी शिवबाने प्रत्यक्ष पाहाव्या म्हणजे शिवबाला

राज्य करणे सोपे आणि सोईचे होईल हा त्यामागे उद्देश होता. आजवर मोगली राज्यात प्रजा राजाकडे अडचणी घेवून जात असे. बादशहा मर्जी असेल तर दखल घेत असे. बहुधा अन्याय केला जात असे. आता शिवबा स्वत: रयतेकडे त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी जात होता. राजाने प्रजेकडे जाणे हे प्रजेसाठीही नवीन होते. प्रजाही शिवबाचा आदर करीत असे. प्रजेला राजाबद्दल विश्वास वाटत होता, तसेच शिवबाचा दराराही वाटत होता. शिवबाची तल्लख बुद्धी आणि जिज्ञासा यामुळे क्षणाक्षणाला शिवबाचे शिक्षण होत होते.

पंतांनी पुणे सुपे प्रांताच्या जमिनीची प्रत्यक्ष काठीने मोजणी करून जमिनीचा पोत पाहून प्रतवारी केली. शेतकऱ्यांना शेतीची अवजारे, तगाई, खाण्यासाठी खावटी दिली. शेतीतून येणारे उत्पन्न हे राज्याचे खरे उत्पन्न असते. त्यामुळे शेतीला महत्त्व देवून उत्पन्न वाढवले पाहिजे. हे सारे शिवबा लहानपणीच शिकत होता. दादोजींनी केलेला न्यायनिवाडा शिवबाने जवळून पाहिला. दादोजींच्या शिस्तीचे महत्त्व शिवबाला पटत होते. न्याय-अन्याय याची शिवबाला जाण येत होती.

शिवबाला लिहायला वाचायला शिकवण्याचीही व्यवस्था केली होती. जदुनाथ सरकार आणि ग्रँट डफ म्हणतात त्याचप्रमाणे शिवाजी निरक्षर नव्हता हे आता सिद्ध झाले आहे. पूर्वीच्या काळी चिटणीस किंवा फडावरचा लेखनिक याकडून पत्रे लिहून घेतली जात असत. परंतु पत्राच्या शेवटी स्वहस्ताक्षरात काही लिहिण्याची प्रथा होती. याप्रमाणे महाराजांचे हस्ताक्षर आता सापडले आहे.

जिजाबाईंचे शिवबावर नितांत प्रेम होते. परंतु ही आईची माया आंधळी माया नव्हती. डोळस होती. जिजाबाईंनी शिवबाची काळजी घेतली, पण नको इतके जपले नाही. शिवबाला मुक्त संचार करू दिल्यामुळे त्याची प्रकृती काटक आणि कणखर झाली. मावळात दऱ्याखोऱ्यातून, डोंगरमाथ्यावरून जावून रयतेची भेट घेतल्यामुळे शिवबाची शारीरिक वाढही चांगली होत होती.

दादोजी कोंडदेव यांची पुण्याच्या जहागिरीवर नेमणूक शहाजीराजांनी केली होती. दादोजी शहाजीराजांचे सेवक होते. त्यामुळे पुण्यात घडणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या घटनांबाबत ते पत्रे पाठवून शहाजीराजांना अवगत करीत असत. तसेच बंगळूरात शहाजीराजांनाही जिजाबाई व बाल शिवाजीविषयी चिंता वाटत होती. १६४० च्या सुरुवातीस शहाजीराजांनी दादोजींजवळ शिवबास भेटण्याची इच्छा व्यक्त केली आणि दादोजींना जिजाबाई व शिवबा यांना घेवून बंगळूरास येण्यास सांगितले. पंतांनी बंगळूरास जाण्याची तयारी सुरू केली.

उंट, घोडे, मेणे, खजिना, स्वार, नोकर व तंबूचे सामान इत्यादी प्रवासासाठी आवश्यक साहित्य पंतांनी तयार केले. सोबत हिशेबाचे कागद आणि शिल्लक खजिनाही घेण्यास पंत विसरले नाहीत. प्रवासात शिवबास अनेक गोष्टी पाहता आल्या आणि त्याचे ज्ञानही वाढत गेले.

शिवबाच्या लग्नानंतर आता प्रथमच सर्व भोसले कुटुंब एकत्र येत होते. बंगळूरला शहाजीराजे त्यांच्या द्वितीय पत्नी तुकाबाईसाहेब, त्यांचा पुत्र व्यंकोजी, जिजाबाई त्यांचा वडील पुत्र संभाजी, आणि शिवबा सर्व काही काळ प्रेमाने एकत्र राहिले. सारेच जण बाल शिवबाचे लाड करीत होते. शहाजीराजे पुण्यात शिवबाच्या लग्नाला हजर न राहू शकल्याने बंगळूरात शिवबाचे दुसरे लग्न करण्याचे ठरले. तुकाबाई साहेबांच्या भावाची सुस्वरूप मुलगी सोयरा वधू ठरली. शहाजीराजांनी या लग्नात आपल्या वैभवाला शोभेल असा डामडौल केला. विजापूर दरबारचे अनेक सरदार दरकदार यांना निमंत्रणे केली होती. शिवबाला हे मुस्लीम लोकांत वावरणे कठीण जात होते.

खरं तर बाल शिवाजी या बंगळूरच्या ऐश्वर्यसंपन्न वाड्यात मनापासून राहिलाच नाही. ती श्रीमंती, तो ऐशोराम, नाचगाणी आणि सभोवती लाचार दरबारी पाहून शिवबाला उबग येत असे. त्याला आठवण येई ती पुण्याच्या मावळ्यांची, गरीब रयतेची.

या दोन वर्षांत वडिलांच्या सान्निध्यात शिवबा काही शिकत होता. शहाजीराजांची दिनचर्या, नेतृत्वशक्ती, सर्वांविषयीचा आदर पाहून त्याचे योग्य निरीक्षण शिवबा करीत होता. प्रासंगिक वाड्यात होणाऱ्या कथा कीर्तनातून शिवबास रामायण-महाभारत कळत होते. शिवबास लष्करी शिक्षण देण्यासाठी शहाजीराजांनी खास व्यवस्था केली होती. शहाजी राजांच्याही पुत्राकडून काही अपेक्षा होत्या. शिवबाने आदिलशाहीपासून दूर पुण्यात स्वतंत्र राज्य स्थापन करून जे आपण करू शकलो नाही ते आपल्या पुत्राने करावे असे शहाजीला वाटत असावे म्हणून शिवबास लष्करी शिक्षण देण्याची सोय शहाजीराजांनी केली होती. त्यानंतर १६४२ च्या अखेरीस शहाजीराजांनी शिवबा, जिजाबाई आणि दादोजी यांना पुण्यास परत पाठविण्याचे ठरवले. दादोजींनी केलेल्या कामावर शहाजीराजे प्रसन्न झाले होते, त्यांनी दादोजींना ७०० होन वार्षिक वाढवून बढती दिली.

शहाजीने दादोजीस बंगळूर सोडण्यापूर्वी काही कानमंत्र देवून मार्गदर्शनही केले असावे. मावळात सर्व देशमुख वतनदारास शिवबाच्या मागे उभे करण्यास सांगितले असावे असे दिसते. पुण्यास रवानगी करताना शहाजीराजांनी पुत्राची

जी व्यवस्था लावून दिली आहे त्यावरून शिवाजीने स्वतंत्र राजाप्रमाणे राहावे अशी शहाजीची इच्छा असावी. शहाजीने शिवबाबरोबर काय काय दिले याची सभासद बखरीत व शिवभारतात सविस्तर यादी दिली आहे. शिवबाबरोबर शामराज निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुझुमदार, माणकोजी दहातोंडे, सेनापती सोनोपंत डबीर, बाळाजी हरी मजालसी, रघुनाथ बल्हाळ सबनीस असे खास मुत्सद्दी दिले होते. त्याचप्रमाणे उत्तम खजिना, हत्ती, घोडे, पायदळ, पिढीजात विश्वासू अमात्य, बिरुदे, ध्वज आणि इतर अनेक दुय्यम दर्जाचे अधिकारी सोबत दिले होते. शिवाजीला पुढील काळात राज्य करताना काही अडचणी येऊ नयेत हा त्यामागे उद्देश होता. तसेच शहाजी हे आदिलशाही सरदार असल्याने त्याला शिवाजीला आदिलशाही विरोधात मदत करता येणार नव्हती, त्यामुळे पूर्ण विचार करून शहाजीने ही मदत केलेली दिसते. एक प्रकारे हा शहाजीने पुत्रास दिलेला आशीर्वादच दिसतो.

१६४२ च्या पावसाळ्यानंतर राजे दादोजी आणि मातोश्री जिजाबाईंसह पुण्यात आले. लाल महालातील कारकुनी फडाला आता राजस्वरूप आले होते. कारण आता फडात पेशवे, मुझुमदार, सबनीस, डबीर असे प्रधानमंत्री हजर होते. निरनिराळे अधिकारी होते. राजे स्वत: आणि जिजाबाई जातीने फडाकडे लक्ष देवून असत. जहागिरीतील वतनदारांची ये-जा वाढली होती. वाड्यावर दादोजी-जिजाबाई न्यायदान करीत असत.

राजे मावळ्यांसोबत बारा मावळ फिरत होते. मुलूखाची ओळख करून घेत होते. माणसे जोडत होते. राजांना एक गोष्ट पक्की माहीत होती की आपल्याला जे स्वतंत्र राज्य निर्माण करायचे आहे ते आदिलशाही मुलूखात राहून आणि आदिलशाही मुलूख कुरतडूनच करावे लागणार आहे. त्यासाठी प्रथम जहागिरीतील जे गड-किल्ले आहेत ते ताब्यात घ्यायला पाहिजेत. कारण जहागीर देताना फक्त त्या प्रदेशात वसूलीचे अधिकार दिले जातात. जहागिरीच्या प्रदेशात असणाऱ्या गड किल्ल्यावर आदिलशाही सत्ता असते. त्या गडावरची शिबंदी आदिलशाही असते. अशा गडावरच गडकरी, किल्लेदार हा आदिलशाही सेवक असतो. त्यामुळे प्रथम हे गडकिल्ले ताब्यात घ्यायला हवेत. शिवाय आपण जर आपल्याच जहागिरीतील गडकिल्ले ताब्यात घेतले तर ते गडकरी बेसावध होते म्हणून घेतले असं सांगता येईल. जिंकलेल्या गडांवर आपली शिबंदी आपले गडकरी ठेवता येतील अशा किरकोळ गोष्टीची आदिलशाही दखलही घेणार नाही. उलट आपण आदिलशाहीच्या भल्यासाठीच हे करतो आहोत असे भासवता येईल.

बाल शिवाजी, दादोजी व जिजाबाई समवेत पुण्यात आला, तेव्हा बारा मावळातील देशमुख, मिरासदार, वतनदार आपापसात भांडत होते. पण आदिलशाहीशी इमान राखून होते. आदिलशाही दरबारशी अत्यंत लाचारीने वागत होते. वतनाचा वारसा आपल्याला मिळावा यासाठी हक्काच्या नावाखाली स्वजनांचे खून पाडत होते. मानसन्मानाच्या भ्रामक कल्पना उराशी बाळगून होते. एकमेकांच्या लग्नाचे वऱ्हाड कापण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. दादोजींना आणि शिवबाला हे थांबवणे आवश्यक होते. आपापसात लढण्यात खर्ची पडणारी ही शक्ती शत्रूशी लढण्यासाठी कामी यायला हवी होती. त्यासाठी बारा मावळाचे हे देशमुख एकत्र येऊन शिवबाला साहाय्यभूत होतील हे पहावे लागणार होते.

मावळच्या या देशमुखात दोन देशमुख ज्येष्ठ होते. त्यांना सारेच मानीत होते. अडीअडचणीला त्यांचाच आधार घेत होते. त्यांच्या शब्दाला किंमत होती. त्यातले एक होते कान्होजी जेधे. हे कारीचे देशमुख शहाजी राजांकडे बंगळूरला होते. ते शहाजीराजांचे अत्यंत विश्वासू होते. तर दुसरे होते बाजी पासलकर हे वयाची साठी उलटलेले ज्येष्ठ होते. कान्होजी जेधे तर आपलेच आहेत, पण बाजी पासलकरांना आपल्याकडे वळवून घेतले पाहिजे हे दादोजींनी ओळखले होते.

बाजी शूर होते तसे गुणग्राहक होते. गुणी आणि कामाचा माणूस, मग तो कोणत्याही जातीपातीचा असेना बाजींना हवा असे. त्यांच्या पदरी खरसुला नावाचा एक शूर शिंपी होता, तसा महारही होता. बाजींची मुलगी सावित्री ही कारीच्या कान्होजी जेधे यांची पत्नी होती. म्हणजे बाजी पासलकर हे कान्होजी जेध्यांचे सासरे होते. इतके बाजी ज्येष्ठ होते.

जिजाबाईंनी बाजी पासलकरांना वाड्यावर बोलावून घेतले. जिजाबाईंनी बाजींचा योग्य सन्मान केला. बाळराजेही बाजींच्या पाया पडून भेटले. बाजींशी सविस्तर बोलणी झाल्यावर बाजी स्वराज्याच्या कामात जोडले गेले. बंगळूरहून शहाजीराजांनीही कान्होजी जेधेंना वतनावर पाठविले. त्यामुळे मावळातील दोन ज्येष्ठ आणि वजनदार असामी शिवबाच्या उद्योगात सामील झाले. या दोन देशमुखांवर इतर देशमुखांना आपल्याकडे वळवण्याची जबाबदारी टाकण्यात आली. चार दोन खट देशमुख सोडले तर इतर सर्व देशमुख शिवाजीची सत्ता मानू लागले.

त्याच वेळी एक प्रसंग घडला. जिजाबाईंच्या खाजगी खर्चासाठी लावून दिलेल्या रांझे गावच्या पाटलाने गावातल्याच पोरीची अब्रू लुटली. मोगलाईत

असे प्रकार सर्रास घडत असत. वतनदार आणि गावचे अधिकारी यांना आपली प्रजा आपली गुलाम वाटत असे. रयतेच्या अब्रूला किंमत नव्हती. परंतु आता परिस्थिती बदलत होती. शिवबाचे राज्य येत होते. शिवबाला हे रुचले नाही. त्याने रांझेकर पाटलांना धरून आणले. पाटील उर्मटपणे उत्तरे देवू लागताच राजांनी पाटील बावाजी भिकाजी गुजर याची पाटीलकी जप्त केली, तसेच त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी त्याचा चौरंग केला. चौरंग करणे म्हणजे हातपाय तोडणे. बावाजी गुजराचे हातपाय तोडल्याची वार्ता सर्वत्र पसरल्यावर रयत राजांना दुवा देवू लागली. स्वराज्यात स्त्रीच्या अब्रूला किंमत आहे हे सिद्ध झाले. राजांनी रांझ्याच्या पाटलाला शिक्षा केली, पण त्याची चरितार्थाची सोय करणे आवश्यक होते. पुरंदर किल्ल्यावर बावाजीचा एक नातलग सोनजी बजाजी गुजर हा राहत होता. त्याने बावाजी गुजरास सांभाळण्याची तयारी दाखवली. त्यावर राजांनी सोनजी गुजराकडून दोनशे होन नजराणा घेवून रांझे गावची पाटीलकी सोनजी गुजराचे नावे करून दिली. शिवबाचे या प्रसंगी वय होते अवघे बारा वर्षे. या बारा वर्षांच्या शिवबाची न्यायबुद्धी पाहून चकीत व्हायला होते.

पुण्याजवळ थोर तालुक्यात रायरेश्वर नावाचे शंकराचे एक प्राचीन मंदिर आहे. २६ मे १६४२ ला शिवाजीराजे आपल्या मित्रांसोबत शंकराच्या दर्शनाला गेले. त्यावेळी रोहिड खोऱ्याचा एक अधिकारी दादाजी नरसप्रभू गुप्ते हाही सोबत होता. रायरेश्वरासमोर सर्वांनी स्वराज्याची शपथ घेतली. स्वराज्य निर्माण होईपर्यंत स्वस्थ बसणे नाही अशी शपथ शिवबाने बाराव्या वर्षी घेतली.

तोवर शिवरायांनी हजार बाराशे तरुण मावळे गोळा केले होते. त्यांना शस्त्रे देण्यासाठी काही लोहार कामाला लावून त्यांच्याकडून धारदार तलवारी तयार करवून घेतल्या होत्या. यापैकी कोणालाच लढाईचा अनुभव नव्हता. स्वराज्याची सुरुवात चांगली व्हावी, स्वराज्याचे तोरण बांधले जावे यासाठी तोरणा किल्ला हल्ला करण्यासाठी निवडण्यात आला. पुण्यापासून बत्तीस मैलांवर कानद खोऱ्यात ४६०६ फूट उंच तोरणा गड आहे. या किल्ल्याला झुंजारमाची आणि बुधलामाची अशा मोक्याच्या माच्या आहेत. बुधला माचीवर एक बुधल्याच्या आकाराचा एक दगड आहे. या प्रचंड दगडामुळे या माचीला बुधलामाची हे नाव पडले आहे. गडाला कोकण दरवाजा आणि पुणे दरवाजा असे दोन दरवाजे आहेत. तोरणा गडाची उंची खूप असल्याने आदिलशाहीने त्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते. गड पूर्ण बेसावध होता. गडावर आणि गडाखाली तोरणा वृक्ष असल्याने गडाचे नाव तोरणा पडले होते. गडावर

आदिलशाही शिबंदी आणि दारुगोळा दोन्ही कमी होते. शिवरायांनी आपल्या सवंगड्यांच्या मदतीने अलगद गडाचा ताबा घेतला. १६४६ ला तोरणा गडावर स्वराज्याचे पहिले भगवे निशाण फडकले. राजांनी बेसावध गड प्रथम शिबंदीने भरला. गडाकडे आदिलशाहीचे फारच दुर्लक्ष झाले होते. तटबंदी ढासळत होती. तटाला झाडे उगवली होती. राजांनी गडाची दुरुस्ती करायला काढली. तटावर उगवलेली झाडे काढली. हे दुरुस्तीचे काम चालू असता गडाच्या तटबंदीत विपूल धन, सुवर्ण मुद्रा सापडल्या. स्वराज्याला भवानी मातेचा आशीर्वाद लाभला.

तोरणा गड जिंकल्यामुळे फायदे झाले. स्वराज्याची सुरुवात चांगली झाली. पहिली विजयश्री खेचून स्वराज्यात आणली. मावळ्यांना हुरूप आला. त्यांच्यात विश्वास निर्माण झाला. शिवाय गडावर धन दिल्यामुळे आर्थिक चणचण भासत होती ती कमी झाली. आदिलशाही किती जागृत आहे याचा अंदाज घेता आला. पण आता थांबून चालणार नव्हते. एवितेवी आदिलशाहीला डिवचले होतेच, तर आणखी काही गड घेता आले तर पहायला हवे होते. शिवरायांचे लक्ष तोरण्यापासून आठ मैलांवर असलेल्या मुरुबदेव या गडावर गेले. त्यांनी तोही घेतला. तोरण्यावर सापडलेल्या धनांपैकी काही धन वापरून राजांनी मुरुंबदेव गडाची डागडुजी केली. १७ फेब्रुवारी रोजी शिवाजीने मुरुंबदेवाचे नाव 'राजगड' ठेवले. त्यानंतर न थांबता राजांनी कुवारगड घेतला. गडाभोवतीचा प्रदेश जेधे, ढमाले, बाजी पासलकर यांसारख्या स्वराज्यास मिळालेल्या देशमुखांचा होता, तो आपोआपच स्वराज्यात आला.

दादोजी कोंडदेव वयाची सत्तरी गाठल्यामुळे अनुभवी होते. त्यांना पूर्ण माहीत होते की शिवबाला आज ना उद्या आदिलशाहीशी टक्कर द्यावी लागेल. आदिलशाहीपुढे शिवबा टिकणे कठीण आहे. आदिलशाहीची शक्ती अफाट आहे. शिवबा करीत असलेल्या या उद्योगांमुळे शहाजीराजे आणि दादोजी दोघेही संकटात येणार होते. त्यामुळे दादोजींना एक अनामिक भीती वाटत होती. पण त्याचबरोबर दादोजी हेही जाणून होते की हे पण कोणीतरी करणे आवश्यक आहे. शहाजी राजांनी स्वतंत्र होण्यासाठी धडपड केली पण यश आले नाही, आता शिवबाला तरी भवानी मातेने यश द्यावे असे दादोजींना वाटे. त्यांनी शिवबा करीत असलेले स्वराज्याचे उद्योग बंगळूरला शहाजी राजांना कळविले होते. स्वत: जिजाबाईसमोरच शिवबा हे सारे करीत होता, तरी या दोघांनीही शिवबाला आवर घातला नाही. याचा अर्थ या दोघांची या सर्व प्रकाराला संमती असावी.

दादोजींच्या मनावर या विचाराने दडपण येत होते. त्यातच त्यांचे वयही झाले होते. त्यामुळे दादोजींची प्रकृती बिघडली. त्यांना मृत्यूची चाहूल लागली. त्यांनी शिवरायांना जहागिरीच्या हिशेबाबाबत अवगत केले आणि ७ मार्च १६४७ रोजी दादोजींनी या जगाचा निरोप घेतला. दादोजींच्या जाण्याने शिवरायांना व जिजाबाईंना अतीव दुःख झाले. दादोजी शिस्तप्रिय होते, करारी होते, न्यायप्रिय होते तसे प्रेमळही होते. त्यांचा दरारा होता. त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे कारभार करून शहाजीची जहागिरी सांभाळली होती. आदिलशाहीने पुण्याची राखरांगोळी केली होती, पण दादोजींनी आपल्या कर्तृत्वाने अल्पकाळात पुणे पुन्हा वसविले होते. एकदा स्वतःच्या हातून काही चूक झाल्याने दादोजी आपला हात तोडायला निघाले होते. शिवबाने त्यांना अडवले म्हणून वाचले. पण तरीही पुढे आयुष्यभर त्यांनी सदऱ्याची बाही कापून आखूड वापरली, असे होते दादोजी.

राजे थांबायला तयार नव्हते आणि ते योग्यही नव्हते. राजांनी दादोजींच्या मृत्यूनंतर कोंढाणा किल्ला ताब्यात घेतला. आदिलशाही दरबारात दादोजी कोंढाण्याचे सुभेदार होते. त्यांच्यावर संकट येवू नये म्हणून राजांनी दादोजींच्या निधनानंतर कोंढाणा ताब्यात घेतला. राजांनी मावळात सत्ता स्थापन करण्यास सुरुवात करताच जे देशमुख राजांना मानीत नव्हते त्यांनी राजांची तक्रार शिरवळच्या मियां रहीम महंमद या अमीनाजवळ केली. ही तक्रार करण्यात खोपडे हा सर्वात पुढे होता. हा अमीन शिरवळला आदिलशाही ठाणेदार होता. बारा मावळच्या वसुलींची जबाबदारी त्याच्यावर होती. त्याने हे वृत्त टाकोटाक विजापूरला कळविले. शिवाजीचा बंदोबस्त करण्याची दरबारला विनंती केली.

आदिलशाही दरबारास ही बाब अत्यंत शुल्लक वाटली. हा शिवाजीचा पोरखेळ वाटला. वीतभर जहागिरीत शिवाजी काय साम्राज्य उभे करणार आहे का असा विचार करून दरबारने ही बाब हसण्यावारी नेली. शिवाजीला कधीही चिरडून टाकता येणार होते. दरबारचे लक्ष आधी कर्नाटकाकडे होते. कर्नाटकात शहाजीराजांची नेमणूक तेथील सरदार, जहागिरदार आणि पाळेगार यांना जिंकून त्यांचा प्रदेश आदिलशाही मुलूखाला जोडण्यासाठी होती. परंतु शहाजीराजांना धोरणानुसार त्यांनी या संस्थानिकांना पूर्णपणे नष्ट न करता त्यांना जिंकून मांडलिक बनविण्याचे होते. शहाजीराजे या जहागिरदारांकडून खंडणी घेत, परंतु आतून त्यांना मदत करून टिकवून ठेवीत.

शहाजीच्या या धोरणामुळे शहाजीस कर्नाटकात संस्थानिक मानीत होते. यामुळे आदिलशाहीपुढे मोठा पेच निर्माण झाला होता. इकडे महाराष्ट्रात

शिवाजीचा बंदोबस्त केल्यास तिकडे शहाजी उठाव करू शकतो. त्यास स्थानिक सत्ताधिशांचा आणि कुतूबशाहीचा पाठिंबा मिळाल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे इकडे आड आणि तिकडे विहीर अशी आदिलशाहीची परिस्थिती झाली होती. कर्नाटकातून शहाजीच्या विरुद्ध असलेला अफझलखान दरबारला सारखे कळवित होता की शहाजीचा बंदोबस्त करा, अन्यथा कर्नाटक हातून जाईल.

यावर उपाय म्हणून आदिलशाही दरबारने भोसले घराणेच नको म्हणून पूर्ण मोहीम काढली. ही वार्ता कर्नाटकात शहाजीराजांना समजली. कर्नाटकात जसे शहाजीराजांच्या विरोधात घोरपडे, अफझलखान आणि मुस्तफाखान होते, तसे शहाजी राजांचे हितचिंतकही होतेच. त्यांनी शहाजीस त्यांच्या विरोधात विजापुरात चालू असलेल्या कारस्थानांची माहिती दिली. शहाजीराजे बेसावध नव्हते. त्यांनी आदिलशाही सोडून कुतूबशाहीत जाण्याचा विचार केला. त्याप्रमाणे कुतूबशाहीशी पत्र व्यवहारही सुरू केला होता. त्याला यश आले असते तर ते आदिलशाहीला जड गेलं असते म्हणून आदिलशहाने शहाजीस गुपचूप पकडून कैद करण्याचे ठरविले. शहाजी तेव्हा जिंजीला होता.

बेसावध क्षणी छापा टाकून शहाजीस पकडण्याची जबाबदारी अफझलखान, मुस्तफाखान आणि मुधोळचे बाजी घोरपडे या तिघांवर टाकण्यात आली. शहाजीस पकडून कैद करून बंदोबस्ताने विजापुरास पाठवावे अशी आज्ञा आदिलशहाने या तिघांना दिली होती. अफझलखान प्रथमपासूनच भोसल्यांचा द्वेष्टा होता. त्याला आसुरी आनंद झाला. २५ जुलै १६४८ ची रात्र होती. शहाजी महाराज आपल्या शयनगृहात निद्रिस्त होते. त्यांच्या छावणीवर अचानक छापा घातला गेला. त्याही परिस्थितीत महाराजांनी प्रतिकार केला. परंतु तो व्यर्थ गेला. महाराज दुष्टांच्या हाती पकडले गेले, कैदेत पडले. त्या रात्री श्रावणी पौर्णिमा होती.

अफझलखानाने शहाजीराजांची शक्य तेवढी अप्रतिष्ठा करून त्यांना विजापूर दरबारात हजर केले. शहाजीराजे जिंजीला कैदेत पडले तेव्हा त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा बंगळूर जहागिरीचा कारभार पाहत होता. त्याला व महाराष्ट्रात शिवरायांस आपल्या वडिलांच्या कैदेची वार्ता समजताच अत्यंत दु:ख झाले. दोघांनाही अफझलखान आणि मुस्तफाखानाने केलेल्या भ्याड हल्ल्याची चीड आली. जिजाबाईंच्या तर कुंकूवावरच घाला होता. त्यांचे सौभाग्यच संकटात सापडले होते. शिवबा करीत असलेल्या स्वराज्याच्या उद्योगामुळे चिडून जाऊन आदिलशाहीने शहाजीस कैद केले होते हे सत्य

जिजाबाईंनी जाणले होते. तरी त्यांनी शिवरायास कुठल्याही प्रकारे बोल लावला नाही.

शहाजीराजांना कैद झाल्यावर आता आदिलशहाला शिवराय आणि संभाजी राजे या दोघांचा कायमचा बंदोबस्त करणे सहजशक्य होणार होते. शहाजीराजे बंड करण्याची शक्यता नव्हती. त्याने या दोन्ही शहाजी पुत्रांना संपवून त्यांचा प्रदेश ताब्यात घेण्याचे ठरविले. त्याने शिवाजी राजांवर फत्तेखान या विजापुरी सरदाराला पाठविले. त्याच्याबरोबर बाळाजी हैबतराव, बजाजी निंबाळकर, मुसेखान, मताजी घाटगे असे शूर सरदार दिले. फत्तेखानाने चार हजार फौजेची छावणी खळद-बेलसर येथे टाकली. बाळाजी हैबतराव शिरवळच्या आसपास राहिला. आदिलशाही दरबार आपल्यावर चढाई करणार याची शिवरायांना कल्पना होतीच. त्यांनी ही लढाई पुरंदरवरून करण्याचे ठरविले. ही स्वराज्याची पहिली लढाई होती. शिवरायांना ती जिंकणे अत्यंत गरजेचे होते. या लढाईवर सर्व भवितव्य होते. ही लढाई जिंकली की स्वराज्याच्या मावळ्यांना हुरूप येणार होता. त्यांना प्रत्यक्ष लढाईचा अनुभव येणार होता. शिवरायांची फौज तेव्हा अवघी हजार-बाराशे होती.

पुरंदर हा मजबूत गड होता. तेथून खळद, बेलसर, शिरवळ जवळ पडत होते. पुरंदर या लढाईसाठी अगदी योग्य होता, पण एक अडचण होती. पुरंदर हा निळकंठराव या आदिलशाही किल्लेदाराच्या ताब्यात होता. त्यामुळे पुरंदरवरून लढाई करणे फायद्याचे असले तरी शक्य नव्हते. शिवरायांनी किल्लेदार निळकंठरावांनाच गळ घातली. निळकंठराव आणि शहाजी राजे यांचे आदिलशाही दरबारात प्रेमाचे संबंध होते. शहाजीसारख्या शूर वीर सरदारास झालेली कैद निळकंठरावास आवडली नव्हती. त्यांनी शिवरायांस लढाई करण्यासाठी पुरंदर किल्ला दिला. स्वराज्याच्या मावळ्यांना किल्ल्यात घेतले.

बाळाजी हैबतराव, मुसेखान, निंबाळकर आणि मताजी घाटगे दोन हजार फौज घेवून शिरवळच्या सुभान मंगल या गढीवर मुक्कामाला होते. शिवराय आपल्या हजार मावळ्यांसह पुरंदरवर होते. मराठ्यांनी विचार केला की फत्तेखानानी किंवा शिरवळच्या हैबतरावांनी पुरंदरवर हल्ला करण्याची वाट न पाहता आपणच हल्ला करून त्यांना पळवून लावावे. त्याप्रमाणे संभाजी कावजी या बलाढ्य मावळ्याच्या नेतृत्वाखाली एक तुकडी शिरवळला गेली. सोबत भीमा वाघ, गोदाजी जगताप, संभाजी काटे, भिवजी चोर आणि इंगळे हे वीर मावळे होते. या सर्वांनी रात्रीच्या वेळी पुरंदर उतरून पहाटेस शिरवळची

मातीची गढी गाठली. गढीची तटबंदी खणून काढली. तटबंदीला भलेमोठे खिंडार पाडले. त्यातून काही मावळ्यांनी गढीत प्रवेश केला. तोवर काही फौज गढीवर चढून किल्ल्यात प्रवेश करून हल्ल्यासाठी तयार राहिली. वेळ पहाटेची असल्याने गढीवर सगळे साखर झोपेत होते. मावळ्यांनी एकदम हल्ला केल्याने आदिलशाही फौजेची पिछेहाट झाली. या स्वराज्याच्या पहिल्या लढाईत हैबतराव हा संभाजी कावजीशी लढताना मारला गेला. आदिलशाही फौजेची पळापळ झाली. मावळ्यांना या लढाईत बरीच लूट मिळाली. ही लूट आणि विजयश्री घेवून संभाजी कावजीचे मावळे पुरंदरवर परतत होते.

या विजयाने मावळ्यांचा उत्साह वाढला होता. त्यांनी हातोहात खळद बेलसरच्या फत्तेखानावर हल्ला करण्याचे निश्चित केले. गनिमी काव्याने हल्ला करण्याचे ठरले.

त्यानंतर फत्तेखानाच्या बेलसरच्या छावणीवर रात्रीच्या वेळेस अचानक हल्ला करण्यात आला. फत्तेखानाची फौज बेसावध होती. असा काही हल्ला केला जाईल याची फत्तेखानाला कल्पनाच नव्हती. अचानक झालेल्या हल्ल्याने फौज गडबडली. एकच कापाकापी सुरू झाली. शिवरायांनी या लढाईसाठी निशाण घेतलेली तुकडी दिली होती. रात्रीच्या अंधारात निशाणाची तुकडी वाट चुकून फत्तेखानाच्या फौजेत शिरली. अर्थात आजूबाजूला फत्तेखानाची फौज पाहून तुकडी मागे फिरली. या घाईगर्दीत निशाण खाली पडणार होते. निशाण खाली पडून चालत नाही. निशाण खाली पडले तर ते त्या तुकडीसाठी कमीपणाचे मानले जाते. निशाण खाली पडणार इतक्यात एका वीराने भरधाव येऊन वरचेवर निशाण झेलून घेतले. मराठ्यांची इज्जत बचावली. मराठ्यांची इज्जत बचावणारा हा वीर म्हणजे बाजी जेधे होता. कान्होजी जेधे यांचा पुत्र तर बाजी पासलकरांचा नातू होता. बाजी पासलकरांची कन्या सावित्रीबाई जेधे यांचा हा पुत्र होता. त्याचे हे शौर्य धैर्य पाहून राजांनी त्याला पुढे सर्जेराव असा किताब दिला.

फत्तेखानावर आणि शिरवळकर झालेल्या या दुहेरी हल्ल्यामुळे फत्तेखान संतापला. तो पुरंदरवर चालून आला. त्याची फौज पुरंदर चढू लागली. गडावर शांतता होती. फत्तेखानाची फौज अर्ध्यापर्यंत गड चढताच एकदम तटावरून बाणांचा वर्षाव सुरू झाला. नेम धरून एक एक सैनिक टिपला जाऊ लागला. वरून मोठमोठे धोंडे लोटून देण्यात आले. हे धोंडे गडगडत खाली येताना त्याखाली खानाचे सैनिक मरत होते. कित्येक गंभीर जखमी होत होते. खान त्याही परिस्थितीत सैन्याला धीर देवून चढण्यासाठी प्रवृत्त करीत होता. इतक्यात

पुरंदरचा मुख्य दरवाजा सताड उघडला गेला. त्यातून वारूळातून मुंग्या बाहेर पडाव्या तसे मावळे किल्ल्याबाहेर आले. मावळ्यांनी गड चढणाऱ्या दमलेल्या सैनिकांवर एकच हल्ला केला. प्रचंड कापाकापी झाली. फत्तेखान, मुसेखान पराक्रमाची शर्थ करीत होते. सैनिकांना धीर देत होते. इतक्यात गोदाजी जगतापाने फेकलेला भाला मुसेखानाला वर्मी लागला. मुसेखान पडला आणि एकच पळापळ झाली. पळण्याची जणू शर्यतच लागली. खासा फत्तेखानही पळू लागला.

या लढाईत बाजी पासलकर वयाच्या ६५ व्या वर्षी आपल्या नातवाबरोबर तरुणाला लाजवील अशी तलवार चालवित होते. बाजींनी समोर पाहिले तो फत्तेखान सासवडच्या दिशेने पळत होता. बाजींच्या डोक्यात सणक आली. स्वराज्यावर चालून आलेल्या फत्तेखानाला शिव्या घालत ते खानाच्या पाठलगावर निघाले. त्यांच्याबरोबर त्यांचे पंचवीस स्वार होते. खान आपल्या पन्नास स्वारांसह पुढे पळत होता. बाजींनी असा खानाचा पाठलाग सासवडपर्यंत केला. वास्तविक हा फत्तेखानाचा डाव होता. बाजींना त्यांच्या मूळ शिबंदीपासून दूर नेवून त्याला बाजींवर हल्ला करायचा होता.  सासवडच्या थोडे आधी फत्तेखान पळता पळता एकदम मागे फिरला आणि त्याने मागून येणाऱ्या बाजी पासलकरांवर कडाडून हल्ला केला. खानाची फौज जास्त होती. बाजी पराक्रमाची शर्थ करीत होते. त्यांची तलवार भिंगरीसारखी गरगर फिरत होती. बाजींचे वीर एकएक करून पडत होते. इतक्यात घात झाला. स्वराज्याच्या या पहिल्या युद्धात पासष्ट वर्षांच्या तरुणाबांड तरुणाची आहुती पडली. बाजी पडताच फत्तेखान जीव घेवून पळत सुटला. इकडे कावजी मल्हारला बाजी फत्तेखानाच्या पाठलागावर गेल्याचे कळताच तो तीरासारखा बाजींच्या मदतीला धावला. कावजी मल्हार साससवडजवळ येताच त्याला बाजींची यशवंती घोडी मालकाचे शव पाठीवर घेवून मंद पावलांनी माघारी येताना दिसली.

शिवरायांनी महाराष्ट्रात हा जसा फत्तेखानाचा पराभव केला, तसाच दारुण पराभव कर्नाटकात संभाजीराजांनी फर्रादखानाचा केला. भोसल्यांना पूर्ण बुडवायला निघालेल्या आदिलशहाला शिवाजी आणि संभाजी काय चीज आहे ते कळून चुकले. हे प्रकरण वाटते तितके सोपे नाही हे शहाने जाणले. शहाजीराजे अजून आदिलशाही कैदेतच होते. जिजाबाईंच्या दोन पुत्रांची सुटका झाली असली तरी तिचे कुंकू अजून संकटात होते. तिला तीच चिंता लागून राहिली होती. शिवाजी राजांनाही वडिलांच्या कैदेची खंत होतीच. यासाठी काय करता येईल याचा राजे विचार करीत होते.

शिवाजी आणि संभाजी या दोन्ही शहाजी पुत्रांवर पाठविलेले फत्तेखान आणि फर्रादखान दोघेही पराभव जाणून विजापुरास परतले होते. विजापूर दरबारच्या दृष्टीने ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट होती. आदिलशाहीला त्यांचेच दोन छोटे जहागीरदार चिरडता येवू नये ही खेदाची गोष्ट होती. आता या दोन मुलांना कसे आवरावे या विचारात बादशहा होता. इकडे शहाजीराजांच्या चिंतेने जिजाबाई आणि राजे दोघेही व्याकूळ होते.

शिवाजीराजांनी मग नामी राजकारण करण्याचे ठरविले. त्यावेळी दिल्लीला बादशहा शहाजहान राज्य करीत होता. त्याच्या मुलगा मुराद हा औरंगाबादला दक्षिणेचा सुभेदार होता. शिवाजीराजांनी या मुरादमार्फत शहाजहान बादशहाशी बोलणी सुरू केली. शिवाजी राजांनी शहाजहान बादशहास कळविले की 'माझे वडील शहाजीराजे आणि मी आपल्या सेवेत येवू इच्छित आहोत, परंतु माझे वडील यावेळी आदिलशाही कैदेत आहेत.'

शहाजहान बादशहा दक्षिणेची आदिलशाही कुतूबशाही जिंकण्यासाठी आतूर होता. तसा तो शहाजीराजांचे शौर्य आणि दक्षिणेकडील राजकारणाची जाण दोन्ही जाणून होता. शहाजी पिता-पुत्र जर आपल्याला मिळाले तर दक्षिण जिंकण्याचे आपले स्वप्न सहज पूर्ण होईल, असे शहाजहानला वाटले.

शिवाजीने दिल्लीच्या बादशहाशी पत्रव्यवहार सुरू केला असून तो मोगलांकडे जाणार असल्याची वार्ता समजताच आदिलशाहीचे धाबे दणाणले. दिल्लीच्या बादशहाला जर शहाजी, शिवाजी आणि संभाजी हे तीन भोसले मिळाले तर आपली धडगत नाही हे आदिलशहाने जाणले. हे संकट येण्याआधीच शहाजीस आणि त्याच्या पुत्रास रोखण्याची शहाला गरज वाटू लागली. अर्थात शहाजीस तसेच विनाअट सोडल्यास दरबारची बेअब्रू होत होती, म्हणून आदिलशहाने शहाजीस कळविले की बंगळूर शहर आणि कंदर्पी किल्ला संभाजीने आणि कोंढाणा हा किल्ला शिवाजीने विजापूर दरबारला दिल्यास दरबार शहाजीची सन्मानपूर्वक सुटका करू शकते.

शहाजीने मग आपल्या दोन्ही पुत्रास तसे कळवून दोन्ही किल्ले आणि बंगळूर शहराची सोडचिठ्ठी आदिलशाहीला पाठविण्यास सांगितले. हे किल्ले मिळाल्यावर आदिलशहाने शहाजीस दरबारात बोलावून त्यांचा मोठा सत्कार केला. सन्मानाने शहाजीस महाराजा हा किताब व कित्येक मौल्यवान भेटी देवून त्यांना सन्मानपूर्वक पुन्हा बंगळूरला पाठविण्यात आले. ती तारीख होती १६ मे १६४९. असे म्हणतात की कोंढाणा खाली करून देताना शिवराय नाखूश होते. मोठ्या कष्टाने मिळविलेला कोंढाणा सुखासुखी सोडण्यास राजे तयार

नव्हते. जिजाऊंनी राजांना समजाविले की स्वराज्यासाठी दोनशे किल्ले जिंकावे लागणार असतील तर आता दोनेक किल्ले गमवावे लागतील. पण महाराज साहेब सुखरूप सुटले हे काही कमी झाले नाही.

२५ जुलै १६४८ रोजी अफझलखानाने बेसावध असलेल्या शहाजी राजास जिंजीला कैद केले. त्यावेळी शहाजी राजांचे विश्वासू कान्होजी जेधे आणि दादोजी कृष्ण लोहोकरे हे दोघेही कैद झाले. कान्होजी जेधे हे कारी गावचे वतनदार होते. ते शहाजीराजांशी इमान राखून होते. ते बाजी पासलकर यांचे जावई होते. मावळात वजनदार आसामी होते. आपल्यामुळे या दोघांना कैदेत पडावे लागले याबद्दल शहाजीराजास खेद वाटू लागला. १६ मे १६४९ ला शहाजीराजांची सुटका झाली त्याच वेळी कान्होजी जेधे आणि दादोजी कृष्ण लोहोकरे यांचीही आदिलशाहीने सुटका केली. शहाजीराजांनी या दोघांना सुटका होताच पुण्याला शिवरायांच्या सेवेत पाठवून दिले. त्यावेळी शहाजी राजांनी या दोघांना आज्ञा केली की, 'येकादी मोगलाई कडील फौज व आदिलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावं त्यासी लढाई करावी.'

शहाजीराजांची कैदेतून सुटका झाल्यावर शिवाजीराजांनी सहा वर्षे आदिलशाहीविरुद्ध काहीही न करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. कारण याकाळात शिवरायांनी स्वराज्यासाठी काहीही हालचाली केल्याची नोंद इतिहासात सापडत नाही. अर्थात या सहा वर्षांत शिवरायांनी आपल्या जहागिरीची व्यवस्था लावण्यात घालविली असावी. नव्याने घेतलेल्या किल्ल्यांची आणि प्रदेशाची व्यवस्था लावणे तितकेच महत्त्वाचे होते. तसेच या शांततेच्या काळात आदिलशाहीही शांत होती. शिवाजी राजांनी काही आदिलशाही गड पूर्वी ताब्यात घेतले आहेत हेच आदिलशाही विसरून गेली.

याच काळात भोसले कुटुंबात एक आनंदाची वार्ता होती. शिवपत्नी सईबाई राणीसाहेब यांना तीन कन्या होत्या. (सखूबाई, राणूबाई, अंबिकाबाई). तोवर शिवरायांना पुत्र नव्हता. आता १६५४ मध्ये सईबाई राणी साहेब गर्भवती होत्या. त्यांना राजगडावरची हवा मानवत नव्हती. त्यामुळे सईबाईंना पुरंदरवर योग्य ती काळजी घेवून ठेवण्यात आले होते. तेथेच १४ मे १६५७ रोजी सईबाईराणी प्रसन्न होवून पुत्र झाला. स्वराज्याला वारस मिळाला. सर्वत्र आनंदीआनंद झाला.

१६५५ नंतर शिवाजी राजांच्या लक्षात आले की कोकण प्रांतावर सत्ता असणे गरजेचे आहे. विजापूर दरबारची कोकणात असलेली सत्ता आपल्या ताब्यात घेणे तसे सोपे आहे. सह्याद्रीमुळे महाराष्ट्राचे देश आणि कोकण असे

दोन भाग झाले आहेत. आदिलशाही फौज मैदानी लढायात तरबेज असली तरी घाट उतरून कोकणात उतरण्यास फौज नाराज असते. सध्या देशावरून कोकणात उतरणारे बहुतेक घाट हे जावळीच्या चंद्ररावाच्या ताब्यात आहेत. जावळी स्वराज्यात आली तर कोकण वेगळे पडेल आणि मग गोवा-कारवारपर्यंत कोकणावर मराठ्यांची सत्ता बसू शकते.

जावळीचा प्रदेश हा साताऱ्याच्या वायव्येस आहे. नेहमीच होणाऱ्या अतिवृष्टीमुळे या प्रदेशात घनदाट झाडी आहे. ठिकठिकाणी काटेरी वेलींमुळे जावळीपर्यंत पोहोचणेही कठीण आहे. जावळी दुर्गम झाली आहे. वाटेत हिंस्र पशूंचा वावर आहे.

या अशा जावळीत चंद्रराव मोऱ्यांचे घराणे स्वतंत्रपणे नांदत होते. चंद्रराव हा मोऱ्यांचा किताब होता. जावळीचे मोरे स्वत:ला चंद्रगुप्त मौर्याचे वंशज समजत असत. जावळीवर आदिलशाही सत्ता असली तरी ती नावालाच होती. चंद्रराव मोरे आदिलशाही दरबारापासून स्वतंत्र वागत होता. जावळीवर पिढ्यान्‌पिढ्या मोऱ्यांची सत्ता असल्याने जावळीत संपत्तीही भरपूर होती. चंद्रराव मस्तीत अधिराज्य गाजवित होता.

जावळीचा आधीचा चंद्रराव दौलतराव निपुत्रिक मृत्यू पावल्यावर जावळीत सत्तेवरून घराण्यात वाद निर्माण झाले. यातून मार्ग काढण्यासाठी दौलतरावाच्या पत्नीने शिवथर घळीच्या वरच्या मोऱ्यांच्या वस्तीतील एका प्रौढ मोऱ्यास दत्तक घेतले. याचे नाव यशवंतराव मोरे होते. जावळीच्या या चंद्ररावाला दत्तक घेताना आणि जावळीवर स्थानापन्न होताना स्वत: शिवाजी राजांनी मदत केली होती. त्यावेळी महाराजांची अपेक्षा होती की हा चंद्रराव आपल्याशी सलोख्याने वागेल.

यशवंतरावाला चंद्रराव म्हणून जावळीच्या गादीवर बसवूनही शिवरायांचा हेतू मात्र साध्य झाला नाही. तो हळूहळू शिवरायांशी फटकून वागू लागला. पुढे तो शिवरायांच्याविरुद्ध कृत्ये करू लागला. पैशासाठी आजूबाजूच्या रयतेवर अन्याय करू लागला. रयतेतील स्त्रियांशी बदकर्म करू लागला. आजूबाजूच्या देशमुखी वतनात घालमेली करू लागला. थोडक्यात चंद्रराव बेफाम आणि उर्मटपणे वागू लागला. शिवरायांची सत्ता मानेनासा झाला.

जावळीचे महत्त्व शिवाजी राजांच्या दृष्टीने फार होते. जावळी ताब्यात घ्यावी असा शिवरायांचा मानस होता. परंतु मोरे हा खानदानी मराठा होता, त्याला सामोपचाराने आपल्याकडे वळवता आले तर पाहावे या विचाराने राजांनी चंद्ररावाशी पत्रव्यवहार केला. परंतु चंद्ररावाने याचा उलटा अर्थ घेतला. शिवाजी आपल्याला घाबरतो आहे असा विचार करून तो उर्मटपणे वागू लागला.

१५ जाने. १६५६ रोजी महाराजांनी अचानक जावळीवर छापा मारला. घनघोर लढाई होवून जावळी स्वराज्यात सामील करण्यात राजे यशस्वी झाले. या लढाईत एक वीर योद्धा दोन्ही हातात दोन तलवारी घेवून युद्ध करीत होता. महाराजांनी त्याला कौल दिला. तो वीर होता मुरारबाजी देशपांडे. मुरारबाजींना महाराजांनी स्वराज्याच्या कामी घेतले. लढाईत अपयश येताच चंद्रराव कुटुंबासह रायरीवर पळून गेला. महाराजांनी जावळीची व्यवस्था लावून रायगडाला वेढा दिला. चंद्रराव गडावर कोंडला गेला. शेवटी चार महिन्यानंतर चंद्रराव यशवंतराव महाराजांना शरण आला. शिलीमकर देशमुखाच्या मध्यस्थीने करार झाला. राजांनी चंद्ररावास सन्मानाने वागवले. परंतु यशवंतराव पुन्हा उर्मटपणे वागू लागला. महाराजांनी त्याचा शेवट केला. त्याची दोन मुले बाजी आणि कृष्णाजी राजांच्या ताब्यात होती. त्यांनी कैदेतून विजापूर दरबारशी संधान बांधले. फितुरी केली. शेवटी राजांनी त्यांना देहदंडाची शिक्षा केली.

जावळी ताब्यात आल्याने स्वराज्याला अनेक फायदे झाले. स्वराज्याच्या सीमा थेट कोकणाला भिडल्या. लष्करी दृष्टीने महत्त्वाच्या हालचाली करण्यासाठी दाट जंगलाचा प्रदेश स्वराज्यात आला. पोर्तुगिज आणि इंग्रज यांच्याशी थेट संबंध येऊ लागला. कारण सीमा कोकणापर्यंत गेल्या होत्या. परंतु याहीपेक्षा तीन महत्त्वाच्या गोष्टींचा लाभ स्वराज्याला पर्यायाने महाराजांना झाला. एक म्हणजे रायगडसारखा दुर्गम किल्ला राजधानीसाठी मिळाला. तसेच पारघाट आणि रडतोंडी घाट यांसारखे कोकणात उतरणारे घाट मिळाल्याने कोकणात उतरणे सोपे झालेच, त्याचबरोबर जकातीचे उत्पन्न वाढले. तिसरा आणि महत्त्वाचा फायदा म्हणजे मुरारबाजी देशपांडे सारखा वीर स्वराज्यात आल्याने स्वराज्याचे बळ वाढले.

१६५६ मध्ये राजांच्या घरात एक दुःखद घटना घडली. शिवाजी राजांचे ज्येष्ठ बंधू संभाजीराजे जे शहाजी राजांबरोबर बंगळूरला होते, त्यांचा कनकगिरीच्या लढाईत मृत्यू झाला. अफझलखानाने मागून मदत पाठवितो असे सांगून संभाजीराजास ऐनवेळी मदत केली नाही त्यामुळे संभाजी राजांचा मृत्यू झाला. अफझलखान शहाजीचा आणि समस्त भोसले घराण्याचा द्वेष करीत असे. संभाजीराजांची पत्नी जयंतीबाई ही शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव यांची कन्या होत्या. त्यांना उमाजीराजे नावाचा पुत्र होता. पुत्रशोक नशिबी आल्याने जिजाबाईंना अतीव दुःख झाले.

याचवेळी शिवरायांनी कृष्णाजी बांदल यांच्याकडून रोहिडा किल्ला घेतला. कृष्णाजी बांदल हा हिरडस मावळचा देशमुख होता. तो त्याच्या प्रदेशातील

प्रजेवर अन्याय जुलूम करीत असे. त्याच्याविषयी अनेक तक्रारी महाराजांकडे आल्या होत्या. बांदलांचा कारभारी बाजीप्रभू देशपांडे आणि फुलाजी देशपांडे असे दोन बंधू होते. बाजीप्रभूंचा हिरडस मावळातील सिंध या गावी मोठा वाडा होता. बाजींच्या घराण्यात शौर्य आणि सचोटी दोन्ही होते. बाजींना बावन्न गावाचे आदिलशाही वतन होते. बाजी धारकरी होते. धारकरी म्हणजे ज्याला तलवार, भाला, दांडपट्टा आणि बोथारी यांचा वापर करून युद्ध करता येते असा वीर.

महाराजांनी लढाई करून रोहिडा घेतला. या लढाईत कृष्णाजी बांदल मारला गेला. कृष्णाजीची पत्नी दीपाबाई आपला पुत्र बाजी कृष्ण याला घेवून महाराजांना भेटली आणि तेव्हांपासून हिरडस मावळचे बांदल देशमुख स्वराज्यात आले. त्यांच्याबरोबर बाजी प्रभू आणि फुलाजी प्रभू सिंधकर देशपांडे हेही स्वराज्यात आले. महाराजांना बाजींची किर्ती ठावूक होती. महाराजांनी बाजी प्रभूंना आपले म्हटले. त्यांची बांदलाकडची सर्व वतने चालू ठेवली. रोहिडा गडाबरोबर तितकाच बुलंद बाजी स्वराज्यात आल्याचा महाराजांना आनंद होता. महाराजांनी बाजींच्या देखरेखीखाली रोहिडा किल्ल्याची दुरुस्ती करून घेतली. गड भांडता केला.

जावळी आणि रोहिड्याच्या यशानंतर महाराजांनी एक प्रश्न धसास लावला. शहाजीची जहागिरी ही पुणे, सुपे, इंद्रापूर चाकण अशी होती. परंतु त्यातील सुपे प्रांत हा महाराजांच्या ताब्यात नव्हता. सुप्यावर संभाजी मोहिते मनमानी कारभार करीत होता. हा संभाजी मोहिते म्हणजे शहाजीराजांची द्वितीय पत्नी तुकाबाई राणीसाहेब यांचा सख्खा भाऊ होता. तो शिवाजी महाराजांचा सावत्र मामा असून महाराजांची सत्ता मानीत नव्हता. तो सुप्याचा कारभार गैरपद्धतीने करीत असे. त्याचेबाबत अनेक तक्रारी प्रजेने शहाजीराजांकडे केल्या होत्या. शहाजीराजे संभाजीस पत्रे पाठवून कारभार सुधारण्यास सांगत असत. परंतु नात्याचा गैरफायदा घेवून संभाजी मोहिते बेफाम वागत होता.

ऑक्टोबर १६५६ च्या अखेरीस शिवाजी राजे सुप्याच्या गढीत सावत्र मामाला भेटायला गेले. शिमग्याचे पोस्त मागायला शिवाजी संभाजी मामाकडे गेला, असे सभासद म्हणतो ते खरे नव्हे. ऑक्टोबर अखेरीस दिवाळी सण असतो, शिमगा नव्हे. बहुधा दिवाळी सणाच्या निमित्ताने राजे भेटीस गेले असावे. महाराजांनी सुप्यावर छापा टाकून गढी ताब्यात घेतली आणि संभाजी मोहित्यास कैदेत टाकले. महाराजांनी संभाजी मामांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु मामांना गुर्मी होती. शेवटी महाराजांनी मामांना बंगळूरला शहाजीराजांकडे पाठवून दिले.

एक गोष्ट निश्चित आहे की शिवाजी महाराजांनी जो स्वराज्य विस्तार केला तो पूर्णपणे आदिलशाही मुलूख जिंकूनच केलेला दिसतो. कारण निझामशाही १६३६ च्या तहाने नष्ट झाली होती आणि कुतूबशाही प्रदेश हा महाराजांच्या जहागिरीला लागून नसल्याने महाराजांचा सर्व भरवसा आदिलशाही मुलूखावरच होता. त्यात १६४६ पासून विजापूरचा आदिलशहा आजारी होता. विजापूर दरबारात प्रत्येकजण सत्तेसाठी कटकारस्थाने करण्यात मशगुल होता. शिवाजीराजांनी याच त्यांच्या दुर्लक्षांचा फायदा घेऊन स्वराज्यविस्तार केलेला दिसतो. ४ नोव्हेंबर १६५६ रोजी विजापुरात आदिलशहाचा मृत्यू झाला. आदिलशाही सत्ता आपल्या हातात राहावी यासाठी बडी बेगमसाहेबा हिने अली नावाच्या अठरा वर्षांच्या मुलास गादीवर बसवून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. ही बेगमसाहेबा अत्यंत कारस्थानी बाई होती आणि अली बादशहाला काहीच अधिकार नव्हते. या बडी बेगमला मदत करणारा कल्याणचा सुभेदार मुल्ला अहंमद हा १६४६ पासून विजापुरात होता. त्याच्या अनुपस्थितीत कल्याण-भिवंडीकडे आदिलशाहीचे दुर्लक्ष झाले होते.

महाराजांनी याच परिस्थितीचा फायदा घेऊन विजापूरकडे जाणारा कल्याणचा खजिना वाटेत लुटला. आणि प्रत्यक्ष कल्याण-भिवंडी प्रांत जिंकून स्वराज्यास जोडला. ती तारीख होती २४ ऑक्टोबर १६५७ आणि कल्याण-भिवंडी जिंकणारे होते आबाजी सोनदेव.

कल्याण-भिवंडी लुटली तेव्हा महाराजांना शस्त्रे-तोफा बऱ्याच मिळाल्या. धनाढ्य व्यापाऱ्याकडून धनदौलतही मिळाली. शिवाय कल्याणहून विजापूरकडे जाणारा खजिना लुटल्याने बरीच संपदा मिळाली. त्यानंतर महाराजांनी पनवेली जवळचा प्रबळगड घेतला. ८ जानेवारीला माहुली गड घेतला. राजमाची आणि लोहगड हे दोन गड घेतले. यामुळे पुणे ते कल्याण-भिवंडी सर्व सलग प्रदेश स्वराज्यात आला.

कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावरून खाडी पाहताच महाराजांना आरमारासाठी बोटी बांधण्यासाठी ती जागा योग्य वाटली. त्यासाठी लागणारे सागाचे लाकूड जवळच्या जंगलात आणि ठाण्याजवळ मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. महाराजांनी कल्याण बंदरात नाविक तळ आणि गोदी उभी केली. हीच महाराजांच्या आरमार बांधणीची सुरुवात होती. फक्त त्यात अडचण अशी होती की कल्याणच्या खाडीतून तयार बोटी अरबी समुद्राकडे नेताना त्यांना वसईमार्गे जावे लागणार होते. वसई आणि आजूबाजूचा प्रदेश पोर्तुगिजांच्या ताब्यात होता. त्यामुळे या वसईच्या पोर्तुगिजांवर दाब बसविण्यासाठी महाराजांनी

आजूबाजूचे सर्व किल्ले ताब्यात घेऊन त्यावर शिबंदी ठेवण्याचे धोरण आखले. सुधागड, कर्नाळा, सागरगड, राजमाची, लोहगड, तुंग, तिकोना, कोराई, प्रबळगड, तळे, घोसाळे, माहुली हे गड घेऊन राजांनी पोर्तुगिजांना पूर्णपणे घेरले होते. शिवाजीला पोर्तुगिज घाबरू लागले होते. पूर्ण उत्तर कोकण महाराजांच्या ताब्यात आले होते.

जानेवारी १६५८ मध्ये आग्र्याला शहाजहान बादशहा आजारी पडला. शहाजहानला दारा, शुजा, औरंगजेब आणि मुराद असे चार पुत्र होते. हे चारी पुत्र वयाच्या पन्नाशीला आले होते. शहाजहान बादशहाच्या मरणाची वाट पाहण्यात त्यांचे आयुष्य सरत होते. शहाजहान आजारी पडताच हे चारही भाऊ दिल्लीच्या वाटेला लागले होते. कारण मोगलांच्या प्रथेप्रमाणे यांच्यापैकी ज्या कोणाला दिल्लीचा तख्तावर बसायचे आहे त्याला प्रथम इतर तीन भावांना मारून टाकावे लागणार होते. त्यामुळे घाईघाईत औरंगजेब औरंगाबाद सोडून उत्तरेत जाण्यास निघाला. जाताना औरंगजेबाने आदिलशहाला शिवाजीवर आणि त्याच्या आदिलशाहीला घातक हालचालींवर लक्ष ठेवण्यास सांगितले होते.

विजापूर दरबारातील परस्परांतील कलहाचा फायदा घेऊन शिवाजीने आदिलशाही मुलूख घेतल्यामुळे असेल वा औरंगजेबाने उत्तरेत जाता जाता शिवाजीवर खास लक्ष ठेवण्यास सांगितल्यामुळे असेल पण आदिलशाहीचे महाराजांच्या हालचालीवर पूर्ण लक्ष होते. परंतु दरबारातील कलहामुळे कोणी पहिल्या श्रेणीचा आदिलशाही सरदार शिवाजीच्या बंदोबस्तावर जाण्यास तयार होत नव्हता.

आदिलशाही कारभार पाहणारी बडी बेगम साहेबा कर्तृत्ववान होती, तशी कारस्थानीही होती. तिने दरबार भरवून भर दरबारात 'शिवाजीचे पारिपत्य करण्यास कोण तयार आहे?' अशी विचारणा केली. तेव्हा अफझलखान हा धिप्पाड अफगाण सरदार पुढे आला आणि आपल्या ताकदीच्या फुशारक्या मारत त्याने 'शिवाजीला जिंदा या मुर्दा पकडण्याची' जबाबदारी घेतली. त्याने दरबारातील पैजेचा विडा उचलून तशी कसमच खाल्ली.

अफझलखानाने शिवाजीला पकडण्याची जबाबदारी घेतल्यावर बडी बेगमला अत्यंत आनंद झाला. कारण आता तिला शिवाजीची चिंता करण्याचे कारण नव्हते. अफझलपुढे शिवाजी टिकणे शक्य नव्हते. तिने अफझलखानाला १२ हजार अरबांचे घोडदळ, कडव्या पठाणांचे पायदळ, शेकडो तोफा, प्रचंड खजिना सोबत देवून सप्टेंबर १६५९ मध्ये विजापूरहून रवाना केले. शिवाय

खानाने मावळातील देशमुखांना पत्रे पाठवून सरकार कामात रुजू होण्यासाठी दमच दिला. यशाची पूर्ण खात्री असलेला खान मोठ्या दिमाखात निघाला.

खानाला शिवाजीशी मोकळ्या मैदानात लढायचे होते. शिवाजीने आपले डोंगरी किल्ले सोडून खाली मैदानात यावे म्हणून खानाचे प्रयत्न चालू होते. खान हा पूर्वी वाई प्रांताचा वतनदार असल्याने त्याला सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशाची पूर्ण माहिती होती. प्रत्येक किल्ला हे शिवाजी नामक उंदराचे बीळ आहे हे खान जाणून होता. म्हणून चिडून जावून शिवाजीने मोकळ्या मैदानात यावे म्हणून खानाने वाकडी वाट करून तुळजापूर गाठले. तुळजापूरची भवानी देवी ही शिवाजीची कुलस्वामिनी आहे हे जाणून खानाने तुळजापूर लुटून देवीची विटंबना केली. खान तुळजापूरहून पंढरपूर, माणकेश्वर, करकंब, फलटणचा शंभू महादेव अशा हिंदू देवदेवतांना भ्रष्ट करत करत रहिमतपूरला आला.

महाराजांना अफझलखान चालून येतो आहे याची वार्ता हेरांकडून मिळाली होती. खान हिंदू देवदेवतांची विटंबना करतो आहे या मागचा खानाचा हेतू महाराजांनी जाणला होता. महाराजांच्या गनिमी काव्याचे एक तत्त्व आहे. शत्रूला जेव्हा आणि जिथे युद्ध व्हावे असे वाटत असते, तेथे ते कधीच होवू द्यायचे नसते. खानाला महाराजांनी मोकळ्या मैदानात लढायला यायला हवे होते. महाराज त्याला तयार नव्हते. महाराजांनी त्यासाठी प्रतापगड ठरविला होता.

१४ मे १६५७ रोजी पुरंदरवर सईबाई राणीसाहेब प्रसूत होवून महाराजांना पुत्र झाला होता. मुलाचे नाव संभाजी ठेवण्यात आले होते. जिजाबाईंचा थोरला मुलगा संभाजी हा १६५६ मध्ये कनकगिरीच्या लढाईत मारला गेला होता, त्याची आठवण म्हणून सईबाईंच्या या पुत्राचे नाव संभाजी ठेवण्यात आले होते. परंतु बाळंतपणानंतर सईबाईची प्रकृती ठीक राहत नव्हती. म्हणून संभाजीला दूध पाजण्यासाठी कापूरहोळ गावच्या गाडे कुटुंबातील एक स्त्री धाराऊ म्हणून नेमण्यात आली होती. आता दोन वर्षानंतरही सईबाईंची तब्बेत दिवसेंदिवस बिघडत होती. महाराजांना दोन्हीकडे लक्ष द्यावे लागत होते.

त्याही परिस्थितीत ११ जुलै १६५९ रोजी महाराज प्रतापगडावर गेले. महाराजांचे अर्धे लक्ष सईबाईंच्या ढासळणाऱ्या प्रकृतीकडे असणे साहजिकच होते. महाराज प्रतापगडावर येऊन मुक्कामाला राहिले. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर हा गडावर महाराजांच्या भेटीसाठी आला होता. त्याने महाराजांस अफझलखानाकडील सर्व वृत्तांत सांगून महाराजांनी लवकरात लवकर खानसाहेबांच्या भेटीस वाईत यावे असे सांगितले. महाराजांनी आपण खानाच्या शारीरिक बळाला आणि लष्करी सामर्थ्याला घाबरलो आहोत, असा बेमालूम

बहाणा केला. कृष्णाजी भास्करचा सत्कार करून त्यास मौल्यवान भेटी दिल्या.

अफझलखान धनाचा अत्यंत लोभी होता हे महाराजांना पूर्वी बजाजी निंबाळकर प्रकरणात समजले होते. शिवाजीने किल्ल्याबाहेर यावे यासाठी खानाने फलटणच्या बजाजी निंबाळकरास कैद केले होते. हे बजाजी म्हणजे सईबाई राणी साहेबांचे सख्खे बंधू. ते राजांचे मेव्हणे होते. त्यांना सोडविण्यासाठी तरी शिवाजी बाहेर पडेल अशी आशा खानाला होती. परंतु महाराजांनी खानाला साठ हजार दोन लाख देऊन बजाजीची सुटका करून घेतली होती. यावरून खान भ्रष्ट असून पैशासाठी काहीही करू शकतो हे महाराजांनी जाणले होते. आता कृष्णाजी भास्करला मौल्यवान भेटी देऊन महाराजांनी खानाला वश करण्याचा प्रयत्न केला.

कृष्णाजी भास्करास मौल्यवान भेटी देऊन निरोप देताना महाराजांनी त्यांना सांगितले की, 'मी खान साहेबांचा अपराधी आहे. त्यासाठी माझा वकील गोपीनाथपंत बोकील हा पत्र घेऊन खानास भेटेल तेव्हा त्यांची भेट घालून द्यावी.' कृष्णाजींनी ते मान्य केले. महाराजांनी आपला वकील म्हणून गोपीनाथपंत बोकील यांची खास निवड केली. याला कारण गोपीनाथपंत अत्यंत बेरकी व मुत्सद्दी होते. दुसऱ्याला आपल्या मनाप्रमाणे वागायला लावणे हा त्यांच्या डाव्या हाताचा मळ होता. राजांनी पंतांजवळ अफझलखानासाठी एक पत्र आणि भरपूर मौल्यवान भेटी व मोत्याचा कंठा दिला. महाराजांनी पत्रात खानास लिहिले होते की, 'मी बादशहाचा अनंत अपराधी असून मला पश्चाताप होत आहे. मी माझे गडकोट व मुलूख सर्व काही परत करण्यास तयार आहे. मला खानास येऊन भेटण्यास धीर होत नाही. खान मला काकाप्रमाणे आहेत, तेव्हा खानसाहेबांनीच प्रतापगडी येऊन मी केलेल्या गुन्ह्याची क्षमा करावी अणि मला घेऊन विजापूरला जावे.' अत्यंत नम्रपणे राजांनी हे पत्र लिहिले होते.

गोपीनाथपंतांनी पण प्रत्यक्ष भेटीत खानाला पटवून दिले की महाराज वाईत येऊन खान साहेबांची भेट घेणे अशक्य आहे. आमचे राजे खूप घाबरले आहेत. तेव्हा जर खान साहेबांनीच मन मोठे करून राजांची भेट घ्यावी. राजांच्या मनातील भीती घालवून त्यांना विजापूरला बादशहाच्या दर्शनाला घेऊन जावे. याप्रमाणे गोपीनाथपंतांनी खानाच्या दोनचार भेटी घेतल्या. तसेच कृष्णाजी भास्कर हा खानाचा वकीलही प्रतापगडावर येत होता. बोलणी चालू होती. प्रत्येक वेळी खानास मौल्यवान भेटी दिल्या जात होत्या. लोभी आणि भ्रष्ट खान त्यात अडकत होता. अखेर खानाने प्रतापगडावर येऊन राजांस भेटण्याचे मान्य केले.

खानाने प्रतापगडावर येण्याचे मान्य केल्याने ही गोष्ट महाराजांच्या मनाप्रमाणे

झाली. पुढील बोलणी करण्यासाठी कृष्णाजी भास्कर वारंवार गडावर येऊ लागले. तसेच गोपीनाथपंतही खानाच्या भेटीस जात होते. खान-शिवाजी भेटीचा दिवस १० नोव्हेंबर १६५९ ठरला. भेटीच्या अटी ठरत होत्या. त्यासाठी काही काळ लागणार होता. इतक्यात राजगडावरून वार्ता आली की, सईबाई राणीसाहेबांची प्रकृती आणखी बिघडली होती. महाराजांना पत्नीच्या अंतकाळी जवळ असणे आवश्यक होते. महाराज राजगडावर परत गेले. लवकरच राणी साहेबांचे निधन झाले. राजांनी त्यांचे दिवस केले आणि राजे पुन्हा प्रतापगडावर गेले.

भेटीच्या अटी आणि तपशील ठरला. त्यात 'खानाने आपले सैन्य आहे तेथेच ठेवावे, भेटीच्या वेळी खानाने सोबत फक्त दहा निवडक रक्षक आणावेत, परंतु त्यांना मुख्य शामियान्यापासून बाणाच्या अंतरावर ठेवावे आणि खानाने सशस्त्र घेऊन शामियान्यात थांबावे. तसेच महाराजांनीही दहा रक्षक आणून त्यांना बाणाच्या अंतरावर ठेवावे. राजे सशस्त्र येऊन खानाची भेट घेतील. भेटीत तहाची बोलणी होतील.' याप्रमाणे तपशील दोन्ही पक्षांना मान्य झाला.

राजांनी कान्होजी जेधे, नेताजी पालकर, बांदल, हैबतराव, तानाजी मालुसरे, ढमाले, बाजी सर्जेराव, मोरोपंत अशा वीरांना एकत्र बोलावून त्यांच्यावर स्वतंत्र जबाबदाऱ्या टाकल्या. खानाची छावणी गडाखाली प्रचंड पसरली होती. गडावर खानाची भेट झाली की तोफा उडवल्या जाणार होत्या. त्या तोफांचे आवाज ऐकले की प्रत्येकाने खानाच्या छावणीवर तुटून पडायचे ठरले. कोणी कुठे लपून बसायचे आणि कोणत्या बाजूने खानाच्या छावणीवर हल्ला करायचा हेही ठरले होते.

महाराजांनी थोडी निरवानिरवही केली. त्यांनी सर्व मुत्सद्यांना, वीरांना स्पष्ट कल्पना दिली की, 'भेटीत माझ्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यासही तुम्ही सैन्यावर तुटून पडा. खानाचा एकही सैनिक सुखरूप परत जाता कामा नये. त्यानंतर छोट्या संभाजीला राज्यावर बसवून सर्वांनी माँ साहेबांच्या आज्ञेत वर्तावे. घाबरू नका, निराश होऊ नका. माझ्यापेक्षा स्वराज्य मोठे आहे हे ध्यानात घ्या.'

राजांनी नियमाप्रमाणे आपल्या सोबत शामियान्याजवळ नेण्याचे दहा वीर निवडले. तसे प्रत्येकालाच राजांच्या सोबत जायचे होते, परंतु ते शक्य नव्हते. राजांनी जे दहाजण निवडले ते सारे वीर धारकरी होतेच, शिवाय ते अत्यंत प्रसंगावधानी होते. हरहुन्नरी होते. संभाजी कावजी, इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, इब्राहिम मुर्बळ, काटके, संभाजी करवटे

आणि जिवा महाला असे दहा वीर महाराजांनी निवडले होते. संभाजी कावजी प्रचंड देहयष्टी आणि शक्ती असलेला वीर होता. हत्तीशी झुंज देवू शकेल असा संभाजी होता. जिवा महाला खाली बसून नऊ हातावरची वस्तू मारण्यात तरबेज होता. प्रत्येकाच्यात काही ना काही हुन्नर होती.

प्रतापगडाच्या अर्ध्या उंचीवर एक सपाट पट्टी आहे. तेथे भेटीसाठी शामियाना उभारण्यात आला होता. शामियान्याला जरीचे कापड लावले होते. मोत्याच्या माळा लावून शामियाना ऐश्वर्यसंपन्न बनविण्यात आला होता. शामियाना पाहताच लोभी खानाचे डोळे दिपले पाहिजेत असा त्यामागे महाराजांचा विचार होता.

अखेर भेटीचा दिवस १० नोव्हेंबर १६५९ उजाडला. ठरलेल्या वेळी खान शामियान्यात आला. ते वैभव पाहून खान आश्चर्यचकित झाला. एका साध्या जमिनदाराच्या पोराकडे इतकी संपत्ती आली कशी या विचारात खान पडला. ठरल्याप्रमाणे महाराज गडावरून निघाले. महाराजांनी अंगात लोखंडी चिलखत घातले होते. डोक्यावर शिरस्त्राण घालून त्यावर नेहमीचे पागोटे. अस्तनीत बिचवा आणि डाव्या हाताच्या बोटात वाघनखे असा अत्यंत सावधपणे पोशाख केला होता. खानाच्या मनात पाप आहे हे महाराज जाणून होते.

ठरल्याप्रमाणे राजे शामियान्यात आले. समोर अजस्त्र खान उभा होता. महाराज खानापुढे अगदीच खुजे वाटत होते. इतक्यात अफझलखान म्हणाला, 'शिवाजी शिवाजी म्हणतात तो हाच काय?' त्यावर महाराजही म्हणाले, 'खान खान म्हणतात ते हेच काय?' आणि खानाने राजांना आलिंगन देण्यासाठी दोन्ही हात पसरून पुढे केले. राजे खानाच्या मिठीत गेले. खानाच्या मनात राजांचा घात करण्याचा विचार पक्का होता. त्याने राजांची मान आपल्या डाव्या काखेत दाबली आणि उजव्या हाताने खंजीर राजांच्या पाठीत खुपसण्याचा प्रयत्न केला. राजांनी स्वरक्षणार्थ चिलखत घातले असल्याने खानाचा प्रयत्न फसला. राजांना काहीच इजा झाली नाही. राजे सावध होतेच. त्यांच्या हातात वाघनखे होती. कमरेला बिचवा होता. राजांनी क्षणाचाही विचार न करता. विलंब न लावता कमरेचा बिचवा काढून खानाच्या पोटात खुपसला. लगेच वाघनखे वापरून खानाची आंतडी बाहेर काढली. खान दोन्ही हातांनी पोट दाबून धरत 'दगा दगा' असे ओरडत शामियान्याबाहेर जाऊ लागला. खानाचा ओरडा ऐकून जवळच उभा असलेल्या खानाचा वकील कृष्णाजी भास्कर याने राजांवर तलवारीने वार केला. राजांनी तो तलवारीने झेलला. कृष्णाजीने पुन्हा वार केला, मग मात्र महाराजांनी कृष्णाजीस ठार केलं. हा प्रकार पाहताच खानाचा अंगरक्षक सय्यद बंडा राजांच्या अंगावर धावला. तो राजांवर वार

करणार इतक्यात जिवा महालाने खाली बसून सय्यद बंडाचा तलवारीचा हात वरच्यावर कापून टाकला. आपला हात कोणी छाटला हेच सय्यद बंडाला समजू शकले नाही. तशा जखमी अवस्थेत खान पोटातली आतडी सांभाळत बाहेर येऊन पालखीत बसला. भोयांनी पालखी उचलून पळायला सुरुवात करताच संभाजी कावजी धावून आला, त्याने भोयांचे पाय छाटले आणि पालखीत अस्ताव्यस्त पडलेल्या अफझलखानाचे मुंडके कापून घेऊन गेला.

इतक्यात ठरल्याप्रमाणे गडावरून तोफांचे आवाज झाले. तो मराठी फौजेला इशारा होता. गडाखाली इतस्ततः पसरलेल्या खानाच्या फौजेला वाटले की दोन्ही नेत्यांची भेट झाल्यामुळे वाजविलेल्या या मुबारक तोफा आहेत. ते सारे आनंदात बेसावध होते. गाफील खानाच्या सैन्यावर मराठ्यांनी चौफेर हल्ला चढविला. एकच कापाकापी झाली. खानाचे हजारो सैनिक मारले गेले. काही पळून जात होते. खानाचा मुलगा फाजलखान आणि खानाचे कुटुंबीय छावणीत होते. त्यांना खंडोजी खोपडे याने आडमार्गाने कऱ्हाडला पोहोचविले. त्याबद्दल फाझलखानाने खंडोजीला काय दिले माहीत नाही, परंतु महाराजांनी पुढे त्याला मोठे बक्षिस दिले. त्याचा एक हात आणि एक पाय मुळापासून कापून काढला.

खानाच्या भेटीनंतर महाराजांना शेकडो हत्ती, हजारो घोडे, उंट आणि बऱ्याच तोफा व अगणित शस्त्रे मिळाली. स्वराज्य जसे संकटमुक्त झाले तसेच बलवानही झाले. महाराजांनी खानाचे मुंडके राजगडावर जिजाबाईंना दाखविण्यासाठी पाठविले. त्या चिंतीत होत्या. एकुलत्या एका पुत्राच्या काळजीने व्याकूळ झाल्या होत्या. जिजाऊंनी खानाच्या मुंडक्याला गडाच्या दरवाजात कोनाड्यात कायमची जागा दिली. खानाची कबर आजही प्रतापगडाखाली भेटीच्या जागी दिसते.

अफझलखानाचे मोठमोठे सरदार या हल्ल्यात मारले गेले. कित्येक कैद झाले. त्यात खानाचे दोन मुलगेही मराठ्यांनी कैद केले होते. राजांनी सर्वच युद्ध कैद्यांना सन्मानाने मुक्त केले. स्वतःचे मरण समोर पाहणारे हे कैदी अनपेक्षित मुक्त झाल्याने आनंदी झाले, त्यांना शिवरायांची दिलदारी दिसली.

पळून गेलेला खानाचा मुलगा फाजलखान आणि कैदेतून मुक्त झालेले कैदी विजापूरला गेले. त्यांनी अफझलखानाची शिवाजीने केलेली अवस्था दरबारला सांगितली. दरबारला हा मोठा धक्का होता. खान नक्की यशस्वी होणार याची त्यांना खात्री होती. १० नोव्हेंबरला प्रतापगडावर खान-शिवाजी यांची भेट होत असता शिरवळचे खानाने पूर्वी घेतलेले ठाणे मराठ्यांनी जिंकले. अफझलखानाच्या वधाचा धक्का विजापूरला बसलाच होता, तेव्हा त्यावर एका पाठोपाठ एक धक्के देण्याचे महाराजांनी ठरविले. भेटीच्या दुसऱ्याच

दिवशी ११ नोव्हेंबरला महाराजांनी आपल्या फौजेचे तीन भाग केले. नेतोजीला त्यातील एक भाग फौज देऊन विजापूरजवळ दहशत निर्माण करण्यास पाठवून दिले. नेतोजीला आज्ञा होती की फक्त दहशत निर्माण होईल एवढेच करायचे आहे. आदिलशाही सैन्याशी कुठेही लढायचे नाही. फौजेचा दुसरा भाग दारोजींना देऊन दाभोळ आणि आजूबाजूचा प्रदेश जिंकण्यास सांगण्यात आले आणि तिसरा भाग घेऊन महाराज स्वतः निघाले. वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा प्रदेश जिंकत महाराजांची फौज दौडत होती. मार्गात येणारे गडकिल्ले जिंकत महाराज कोल्हापूरच्या दिशेने चालले होते. आदिलशाहीचे एक दोन किल्ले आणि त्याखालचा प्रदेश महाराज घेत होते. आदिलशाहीला धक्क्यावर धक्के बसत होते.

अफझलखान भेटीनंतर १४ व्या दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबरला महाराजांनी कोल्हापूर घेतले आणि आपला मोर्चा कोल्हापूरच्या वायव्येला असलेल्या पन्हाळ्याकडे वळविला. लगोलग २८ नोव्हेंबरला पन्हाळा ताब्यात घेतला. साधारण पद्धत अशी असते की अफझलखान वधासारखा एखादा जिवावरचा प्रसंग निवारून त्यात यश मिळाले की काही काळ त्या यशाच्या आनंदात घालविला जातो. फौजेलाही हौसमौज व मनोरंजन करण्याची मुभा दिली जाते. परंतु महाराजांचे धोरण एकदम विरुद्ध होते. शत्रू एका धक्क्यातून सावरण्याआधीच त्याला दुसरा धक्का द्यायचा. धक्क्याची एक मालिकाच शत्रूपुढे उभी करायची. याच धोरणाने महाराजांनी अफझलखान वधानंतर अजिबात वेळ न दवडता वाई ते पन्हाळा हा प्रदेश घेतला. त्यात सुपे, तांबे, पाली, नेरले, कामेरी, विसापूर, सावे, कोळे हा संपूर्ण प्रदेश आणि त्यातील गड किल्ले स्वराज्यात आले.

त्याच काळात नेतोजीवर विजापूरभोवती फिरून दहशत निर्माण करण्याची कामगिरी दिली होती. ती त्याने चोख पार पाडली. नेतोजी पालकर गदग, तिकोटे, हुकेरी, गोकाक व लक्ष्मेश्वर या कर्नाटकी मुलूखात धुडगूस घालत होता. मधूनच तो विजापूरच्या अगदी जवळ फौजेसह घिरट्या घालत होता. नेतोजीने लक्ष्मेश्वर लुटले पण कुठेच मोठी लढाई दिली नाही. त्यामुळे आदिलशाही दरबार मनातून फार घाबरला होता. नेतोजीच्या मनात काय आहे याचा त्यांना थांग लागत नव्हता. इकडे स्वतः शिवाजी पन्हाळ्यासारखा सीमेवरचा महत्त्वाचा किल्ला घेऊन बसला होता. शिवाजीला आवरण्यासाठी काय करावे या विचारात आदिलशाही होती.

अफझलखानाचा मुलगा फाजलखान बापाच्या वधामुळे शिवाजीचा सूड

घेण्यासाठी उत्सूक होता. त्यात कोल्हापूर-पन्हाळा हा रुस्तुमेजमान या आदिलशाही सरदाराच्या जहागिरीचा प्रदेश शिवाजीने घेतल्याने तो चिडला होता. दोघेही बडी बेगम साहेबांना भेटले व त्यांनी शिवाजीच्या पारिपत्यावर जाण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. बेगमने ताबडतोब त्यांची शिवाजीवर रवानगी केली. त्यांना हत्ती, घोडे, उंट, खजिना सोबत देऊन मदतीस सादतखान, फत्तेखान, सर्जेराव घाटगे आणि बाजी घोरपडे हे विजापुरी सरदार दिले. कोल्हापूरजवळ दोन्ही सैन्याची गाठ पडली. नेतोजी पालकर हा फाझलखानावर तुटून पडला. राजे रुस्तुमेजमानला भिडले. कारण हा रुस्तुमेजमान हा मालोजीराजांनी ज्याचा पूर्वी जीव वाचवला त्या रणदुल्लाखानाचा पुत्र होता. हा रणदुल्लाखान शहाजीस पुत्रवत आणि जिजाऊला बहू मानीत होता. त्यामुळे रुस्तुमेजमान आणि महाराज यांचे संबंध चांगले होते. आता महाराजांनी रुस्तुमेजमानच्या जहागिरीवर हल्ला केल्याने तो लढायला तयार झाला होता. या लढाईत महाराजांचा विजय झाला आणि विजापुरी फौज वाट फुटेल तेथे पळून गेली.

दारोजींना महाराजांनी कोकणात दाभोळ बंदर आणि आजूबाजूचा प्रदेश घेण्यासाठी रवाना केले होते. त्यांनी हा कोकणातील प्रदेश जिंकून ४ फेब्रुवारी १६६० रोजी दाभोळ बंदर स्वराज्याला जोडले. मराठ्यांना विजयामागून विजय मिळत होते आणि आदिलशाही रोज कणाकणाने कमी होत होती. रोज एका नव्या पराभवाच्या बातम्या बडी बेगमच्या कानावर येत होत्या.

त्यातच नेतोजीने कृष्णेच्या काठावरती अनेक महत्त्वाची ठाणी जिंकून घेतली. शिवाजी आणि प्रति शिवाजी नेतोजी यांना आवरावे कसे हा दरबार पुढे प्रश्न होता. नेतोजी मिरजेच्या किल्ल्याशी झुंजत होता. किल्ला भुईकोट असला तरी रुंद तटबंदी अभेद्य होती. राजांनी मिरजेचा वेढा आपल्याकडे घेतला.

शिवाजीच्या आणि नेतोजी सतत चाललेल्या आक्रमकपणाला पायबंद घालण्यासाठी बडी बेगम साहेबाने सिद्धी जौहरला कर्नुलहून बोलावून घेतले. सिद्धी जोहरला कर्नुलचा वाघ समजले जात होते. हा प्रचंड बळाचा आदिलशाही सरदार होता. हा बुद्धिमानही होता. आदिलशाहीचे आणि जौहर यांचे फार पटत नव्हते. परंतु आता दरबारच अडचणीत आल्यामुळे त्यांना जौहरची आठवण झाली. सिद्धी जौहरला शिवाजीचा पक्का आणि कायमचा बंदोबस्त करण्याची आज्ञा देण्यात आली. त्याच्या मदतीस सिद्दी मसूद बाजी घोरपडे, फाझलखान आणि रुस्तुमेजमान हे अनुभवी पराभूत सरदार देण्यात आले. त्याच्याजवळ स्वत:ची आणि इतर सरदारांची मिळून सुमारे ३५ ते ४० हजार

फौज तयार झाली. एवढी मोठी फौज घेऊन तो निघाला.

राजांना इतक्या मोठ्या फौजेबरोबर युद्ध नको होते. सततच्या लढायामुळे मराठी फौजही थकली होती. फौजेला थोडी विश्रांतीही हवी होती. म्हणून राजांनी मिरजेचा वेढा उठविला आणि पन्हाळ्यावर मुक्काम केला. पन्हाळा तसा बळकट किल्ला स्वराज्याच्या सीमेवर होता. महाराजांना स्वराज्यात लढाया नको असत. कारण स्वराज्यात लढाया झाल्या तर गरीब रयतेचे हाल होतात. पिकांचे नुकसान होते. हे महाराजांनी पाहिले होते. म्हणून महाराजांनी सीमेवरचा पन्हाळा मुक्कामासाठी आणि लढाईसाठी निवडला.

सिद्धी जोहरने पन्हाळ्याला वेढा दिला. राजे गडावर होते. गड भक्कम होता. सिद्दी गडावर वेढ्यातून तोफांचा मारा करीत असे. पण पन्हाळा माऱ्याच्या बाहेर होता. गडावरून मात्र वेढ्यावर तोफाचा मारा होत असे. महाराजांना वाटले होते की जौहर गडावर चढून हल्ला करण्याचा प्रयत्न करेल आणि मग पूर्वी आपण पुरंदर लढविला तसा पन्हाळा झुंजवता येईल. परंतु जोहरने गडाला वेढा देऊन महाराजांना कोंडून टाकले होते. वेढा इतका कडक होता की बाहेरून कोणी गडावर येवू शकत नव्हता, तर गडावरून कोणीही बाहेर जावू शकत नव्हता.

जौहरला वर्षानुवर्षे वेढा घालून बसायचे नव्हते. त्यांनी पाहिले की लांब पल्ल्याच्या तोफा आणल्याशिवाय गडापर्यंत मारा करता येणार नाही. त्याने लगेच इंग्रजांकडे लांब पल्ल्याच्या तोफांची मागणी केली. इंग्रजांच्या राजापूरच्या वखारीवर मुख्य अधिकारी हेन्री रिव्हिंग्टन हा होता. हा हेन्री पक्का लबाड होता. त्याने सूज्ञ विचार केला की आता शिवाजी पुरता फसला आहे. सिद्दी काही शिवाजीला सोडणे शक्य नाही. शिवाजी जर आता संपणारच आहे, तर आपण सिद्दी जौहरला मदत करून आदिलशहाकडून फायदे का मिळवू नये? आणि त्या लबाड हेन्रीने सिद्दीला लांब पल्ल्याच्या तोफा देण्याचे मान्य केले. इतकेच करून हेन्री थांबला नाही. तो लांब पल्ल्याची तोफ, तिच्यासाठी लागणारा दारुगोळा आाणि तोफेला बत्ती देणारे कसबी कारागिर घेऊन तो राजापूरहून २ एप्रिल १६६० ला स्वत: निघाला आणि १० एप्रिल ला त्याने इंग्रजी निशाण लावून पन्हाळ्यावर तोफांचा मारा सुरू केला. महाराज पन्हाळ्यावरून इंग्रजांचे हे कृत्य पाहत होते.

इंग्रजांनी मोठ्या दिमाखात आपला युनियन जॅक फडकवून पन्हाळ्यावर तोफांचा मारा केला खरा, परंतु त्याचा काहीही फायदा झाला नाही. गडापर्यंत तोफांचा मारा पोहोचतन नव्हता. जौहरने मग वेढा आणखी कडक केला.

महाराजांनी सिद्दी जोहरशी तहाचे बोलणे लावून पाहिले, पण त्याला जौहरने प्रतिसाद दिला नाही. नेतोजी अधूनमधून वेढा फोडण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्यात त्याला यश येत नव्हते.

सिद्दीचा वेढा एखाद्या तटबंदीप्रमाणे अभेद्य होता. गडावर पाच सहा हजार मराठे बाजीप्रभू देशपांडे आणि त्याची बांदलांची तुकडी अडकून पडली होती. राजगडावर जिजाबाई काळजीत होत्या. एकूण सहा अपत्यांपैकी उरलेल्या एका पुत्राच्या रक्षणासाठी आई भवानीला नवस बोलत होत्या. जुलै १६५९ मध्ये महाराजांनी राजगड सोडून प्रतापगड गाठला होता. तेव्हापासून आता वर्ष होत आले, मायलेकरांची भेट नव्हती. त्या स्वत: पुत्राच्या सुटकेसाठी पन्हाळ्यावर जाण्याचा विचार करीत होत्या.

आदिलशहाने शिवाजीला पुरता संपविण्याचा चंग बांधला होता. त्याने मोगल बादशहा औरंगजेबाला विनंती केली की त्याने स्वराज्यावर कोणीतरी जबरदस्त सरदार पाठवावा आणि त्याचे वितभर स्वराज्य संपवून टाकण्यास मदत करावी. औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान यास सव्वा लाख फौज देऊन महाराष्ट्रात पाठविले. शाहिस्तेखान पुण्यात महाराजांच्याच लाल महालात तळ देऊन होता. त्याने पंचवीस हजार फौज पाठवून चाकणच्या संग्रामदुर्ग गढीला वेढा दिला होता.

महाराज पन्हाळ्यावर प्रचंड काळजीत होते आणि एका रात्रीत चमत्कार झाला. गडाच्या मुख्य दरवाज्यावर मध्यरात्री एक मुसलमान फकीर आला. सूर्यास्ताला गडाचे दरवाजे बंद झाले होते. पहारेकऱ्यांनी फकीराला हकलून देण्याचा प्रयत्न केला. परंतु फकीर 'मला महाराजांना भेटायचे आहे,' इतकेच सांगत होता. शेवटी सकाळी सूर्योदयाला दरवाजा उघडण्यात आला. बाजी प्रभूंना बोलावण्यात आले आणि बाजींनी फकीराला ओळखले. तो होता महाराजांच्या हेर खात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक.

बहिर्जीला पाहताच महाराजांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंद दिसू लागला. जौहरच्या ज्या वेढ्यातून मुंगीही ये-जा करू शकत नाही त्या वेढ्यातून बहिर्जी आलाच कसा? त्यावर बहिर्जी मुजरा करून म्हणाला, 'महाराज गेले दोन दिवस मी गडाभोवती फिरत होतो. जौहरचा वेढा लई कडक आहे. सिद्दी जौहर आणि त्याचा जावई सिद्दी मसूद कवा बी वेढ्यातून फिरत्यात. एखादा शिपाई गाफील दिसला तर जागीच ठार करत्यात त्याला. आजवर म्या असा कडक वेढा बघितला नाही. मी वेढ्याभोवती फिरत होतो. गडाच्या पूर्वेला एक दरी आहे. दरी कसली एक मोठा खड्डाच त्यो. तिठे दोन मेटी जरा पातळ

आहेत. दरीतून कोणी वेढा पार करणार न्हाई असा जौहरचा विचार असन म्हणून तिठे दोनच मेटी आहेत. दोन मेटीत दीडशे कदमांचे अंतर आहे.'

बहिर्जी असे बरेच काही बोलला. पण महाराजांच्या डोक्यात त्याच्या दोन वाक्यांनी घर केले, 'दोन मेटी पातळ आहेत आणि त्यात दीडशे कदमांचे अंतर आहे.' महाराजांच्या दृष्टीने तेवढे पुरेसे होते.

महाराजांच्या पन्हाळ्यावरून सुटकेचा अन्य मार्ग दिसत नव्हता. महाराजांनी मग एक धाडसी बेत आखला. रात्रीच्या अंधारात पन्हाळ्यावरून पलायन करणे आणि विशाळगडावर जाणे. महाराजांनी बाजीप्रभू देशपांडे आणि किल्लेदार काटकर यांच्याशी चर्चा केली. बाजींनी महाराजांना खेळण्यावर पोहोचविण्याची जबाबदारी घेतली. त्यासाठी बांदलांचे सहाशे वीर सोबत घेण्याचे ठरले.

पन्हाळा ते विशाळगड हे अंतर ४२ मैलांचे आहे. मध्ये फक्त सहा मैल मसाईचे पठार आहे. बाकी ३६ मैलाचा मार्ग हा खडकाळ आहे. चिखलाचा आहे. हा सर्व प्रवास करून विशाळगडाकडे पोहोचले तर विशाळगडाला जसवंतराव दळवी आणि सूर्यराव सुर्वे हे वेढा घालून बसलेले होते. त्यांचा वेढा फोडून विशाळगडावर जाणे भाग होते. मार्ग कठीण होता. पण अन्य काही मार्ग पण नव्हता. महाराजांचे आयुष्य हे अशा अनेक संकटांनी भरलेले होते. पण त्यातून बाहेर पडण्यासाठी महाराजांची एक पंचसूत्री होती. योग्य कल्पना, नियोजन, पूर्ण गुप्तता, व्यवस्थित अंमलबजावणी आणि हमखास यश. या पंचसूत्रीप्रमाणे महाराजांच्या डोक्यात योग्य कल्पना होती.

महाराजांनी सिद्दीकडे बिनशर्त शरणागती पत्करत असल्याचे पत्र पाठविले. जौहरला आनंद झाला. त्याला महाराजांची बिनशर्त शरणागती हवी होती. महाराज १३ जुलै १६६० रोजी पांढरे निशाण घेऊन सिद्दीच्या छावणीत हजर होणार होते. तशी बातमी बहिर्जीकडून वेढ्यात पसरविण्यात आली. हेतू हा की वेढा आणि छावणी जास्तीत जास्त गाफील राहावी.

महाराजांनी मग गडाखाली राहणाऱ्या शिवा काशीद या न्हाव्याला वाड्यावर बोलावून घेतले. हा शिवा अगदी महाराजांच्या सारखा दिसत होता. असे गडावर सारे बोलत असत. ते महाराजांनी ऐकले होते. महाराजांना त्याची पाहून खात्री करून घ्यायची होती. शिवा न्हावी महाराजांसमोर उभा राहिल्यावर त्यांना महाराजांनी 'आपण कसे पन्हाळ्यावर अडकून पडलो आहोत आणि त्यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे येथून गुप्तपणे पलायन करणे. परंतु त्यात अडचण अशी आहे की त्यासाठी माझ्यासारख्या दिसणाऱ्या एका व्यक्तीची गरज आहे. शिवा मला तुझी गरज लागणार आहे. कदाचित यात तुला बलिदानही द्यावे लागणार

आहे. तुला आमचे कपडे घालायचे आहेत. तुला शिवाजीराजे व्हायचे आहे. माझ्यासारखे बोलायचे आहे. माझ्यासारखे वागायचे आहे. तुझ्याबरोबर काही मावळे असतील. ते तुझी पालखी वाहून नेतील. आम्ही खेळण्याकडे जावू, तेव्हा तुला उलट्या दिशेला जायचे आहे. बोल आहेस तयार याला?' आणि शिवा काशीद स्वराज्यासाठी बलिदान करण्यास आनंदाने तयार झाला.

१२ जुलै १६६० आषाढ पौर्णिमेची रात्र, विजांचे थैमान चालू होते. पाऊस त्यादिवशी जरा जास्तच पडत होता. पावसाचा झाडाच्या पानांवर पडताना होणारा आवाज सर्व वातावरण अगदी प्रसंगाला अनुरूप होते. पौर्णिमा असून चंद्र ढगामागे लपून मराठ्यांची मजा पाहत होता. अशा वातावरणात दोन पालख्या सहाशे बांदलांसह गडावरून खाली उतरत होत्या. कोणाच्याही हातात मशाली नव्हत्या. निबीड अंधारातून सर्वांनी वेढ्यातील ती पातळ मेटी ओलांडून, ती छोटी दरी ओलांडून मुख्य रस्त्यावर येताच दोन्ही पालख्या वेगळ्या केल्या. महाराजांची पालखी सहाशे बांदलांसह विशाळगडाच्या मार्गाला लागली, तर शिवा काशीदची पालखी उलट्या दिशेने निघाली.

काही वेळानंतर सिद्दी जौहरच्या छावणीत त्याचा एक हेर आला, त्याने घाबरत सिद्दीस बातमी दिली की, 'हुजूर हुजूर शिवाजी भाग गया.' सिद्दीला कळून चुकले की शिवाजीने शरण येतो म्हणून सांगून आपल्याला बेवकूफ बनविले. सिद्दी प्रचंड चिडला. त्याच्या डोळ्यासमोर चिडलेली बेगमसाहेबा दिसू लागली. त्याला दरबारात तोंड दाखवायला जागाच उरली नव्हती. त्याला आपले भवितव्य दिसू लागले. त्याने सर्व राग आपल्या जावयावर काढला. त्याने सिद्दी मसूदला दोन हजार फौज देऊन शिवाजीच्या मार्गावर पाठविले आणि तो आपल्या भवितव्याचा विचार करीत बसला. सिद्दी जौहर हा आदिलशाहीच्या दृष्टीने बंडखोर सरदार होता. त्याच्याविषयी दरबारचे मत कलुषित होतेच, आता त्याला शिवाजीला पकडण्यात यश आले असते तर दरबारात त्याची पत वाढणार होती. परंतु झाले उलटेच. त्याच्याविषयी दरबारचे मत आणखी खराब होणार होते.

प्रचंड पाऊस पडत होता. विजा चमकत होत्या. रस्ता खडकाळ आणि चिखलाचा होता तरी आपल्या सासऱ्याची अब्रू जावू नये यासाठी बिचारा सिद्दी मसूद रात्रीच्या अंधारात चिखल तुडवित विशाळगडाकडे निघाला होता. तास दोन तास पाठलाग केल्यानंतर त्याला दूर अंधारात एक पालखी जाताना दिसली. सिद्दी मसूदने पालखीला गराडा घातला. पालखीत पाहिले तर शिवाजी बसलेला. मसूदने तशीच पालखी मागे वळवून सिद्दी जौहरच्या छावणीत आणली.

महाराजांची विचारपूस चालली होती. तोच एका हेराने बातमी आणली की हा पकडलेला शिवाजी खरा नाही. खरा शिवाजी पळतोच आहे. सिद्दी जौहरला जेव्हा या खोट्या शिवाजीविषयी समजले तेव्हा तो अधिकच चिडला. त्याने पुन्हा जावई सिद्दी मसूदची खरडपट्टी काढली. बिचारा मसूद परत पाठलागावर निघाला. पुन्हा तोच पाऊस, तोच रात्रीचा अंधार, तोच खडकांचा आणि चिखलांचा रस्ता.

महाराजांची पालखी सहशे बांदल मावळे आळीपाळीने वाहून नेत होते. आता फक्त सुमारे दहा मैलाचे अंतर कापायचे होते की खेळण्याच्या पायथ्याशी पालखी पोहोचणार होती. समोर गजापूरची खिंड होती. खिंड पार केली की विशाळगड नजरेच्या टप्प्यात येणार होता. तोच मागून आवाजाची चाहूल लागली. सिद्दी मसूद आणि त्याचे दोन हजार स्वार येत होते. बाजी प्रभूंवर हा बाका प्रसंग होता. महाराजांना विशाळगडावर सुखरूप पोहोचविण्याची जबाबदारी बाजींनी घेतली होती. बाजींनी क्षणाचाही विचार न करता आपल्या जवळच्या सहाशे बांदलांपैकी तीनशे बांदल घेऊन खिंड लढवायचे ठरविले. निम्मी फौज घेऊन महाराजांची पालखी विशाळगडाकडे प्रस्थान करणार होती. महाराजांना ही बार्जीची कल्पना अजिबात मान्य नव्हती. बाजींना असे संकटात टाकून आपण पुढे निघून जाणे महाराजांनी मान्य केले नाही. महाराजांजवळ आणि बाजींजवळ विचार करण्यास अत्यंत कमी वेळ होता. क्षणाक्षणाला पाठलागावर आलेला सिद्दी मसूद गजापूर खिंडीजवळ येत होता. शेवटी बाजींनी आपल्या वयाच्या अधिकाराने महाराजांना जवळजवळ दटावलेच. पण महाराजांचा इलाज चालला नाही. तीनशे मावळे घेऊन महाराज पुढे निघाले आणि तीनशे बांदल मावळे घेऊन बाजी खिंड लढवण्यासाठी तयार झाले. खिंडीच्या तोंडावर बाजींच्या तीनशे मावळ्यांवर मसूदचे दोन हजार स्वार तुटून पडले. एकच कापाकापी झाली. बाजींनी आणि मावळ्यांनी पराक्रमाची पराकाष्ठा केली. सारेच वीर शरीरावर जखमा वागवित लढत होते. १३ जुलैच्या पहाटेपासून बाजी आणि मावळे खिंड लढवित होते. अजून महाराज गडावर पोहोचले नव्हते. बाजींचा धिप्पाड देह जखमांनी भरला होता. जखमातून वाहणारे रक्त सुकले होते तरी बाजी लढत होते. इतक्यात विशाळगडावरून तोफांचे आवाज ऐकू येऊ लागले. राजे विशाळगडी सुखरूप पोहोचले होते. बाजी आपल्या शब्दातून मुक्त झाले होते. समाधानाने बाजी मरायला तयार झाले. आणि गजापूरच्या खिंडीत बाजी पडले. गजापूरची खिंड पावन झाली.

मसूदने राजांचा पाठलाग चालूच ठेवला होता. आता पाठलागाचा काही

फायदा नव्हता. मसूदला हवा असलेला शिवाजी खेळणागडावर पोहोचला होता. गडाला वेढा घालून बसलेले सूर्यराव सुर्वे, दळवी आणि सिद्दी मसूद तिघेही माघारी फिरले.

विजापूरचा बादशहा अली आदिलशाह आता प्रौढ झाला होता. तो विजापूरचा कारभार स्वत: पाहत होता. बडी बेगमसाहेबा मक्केच्या यात्रेला निघून गेली होती. या अली आदिलशहाला जेव्हा सिद्दी जौहरच्या तावडीतून शिवाजी निसटला आणि विशाळगडावर सुखरूप पोहोचला हे कळले, तेव्हा त्याला सिद्दीने शिवाजीशी संगनमत केल्याचा संशय झाला. तेव्हा संतापलेला अली बादशहा सिद्दीच्या पारिपत्यासाठी स्वत:च निघाला. सिद्दीचा तळ अजूनही पन्हाळ्यातच होता. अली बादशहा पन्हाळ्यास येण्यास निघाला, हे समजताच सिद्दी जौहर घाबरला. आता आपली खैर नाही हे त्याला समजले, त्याने पन्हाळ्याच्या किल्लेदार त्र्यंबक भास्कर याच्याशी बोलणे लावले. महाराजांनीही किल्लेदारास गड खाली करून सिद्दीच्या ताब्यात देण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणे सिद्दीने पन्हाळा ताब्यात घेऊन आदिलशाहीस दिला आणि आपण परस्पर कर्नुलला निघून गेला. ती तारीख होती २२ सप्टेंबर १६६०. पुढे जौहरने विष खावून आत्महत्या केली.

विशाळगडाला पडलेला सुर्वे, जसवंत दळवी यांचा वेढा उठताच महाराज प्रथम पुरंदरकडे गेले. तेथून पुण्यात तळ ठोकून बसलेल्या शाहिस्तेखानला पाहून त्याच्या समाचारासाठी महाराज राजगडावर गेले. परंतु शाहिस्तेखानाकडे पूर्ण दुर्लक्ष करून महाराज तळ कोकणात गेले. त्यांनी दाभोळ घेतले. पालवणचे दळवी आणि शृंगारपूरचे सुर्वे यांच्या जहागिरीवर हल्ला करून त्यांना पिटाळून लावले. या दोघांनी सिद्दीच्या नादाने विशाळगडाला वेढा घातला होता. तेव्हा आता त्यांचा पुरा बंदोबस्त करण्यात आला. या कोकण स्वारीमुळे संपूर्ण तळकोकण महाराजांच्या ताब्यात आला. दाभोळ बंदर पूर्वी महाराजांच्या ताब्यात होते. परंतु १६६० पूर्वी कधीतरी ते आदिलशाहीने जिंकून घेतले होते. महाराजांनी दाभोळ बंदर घेतले, तेव्हा बंदरात अफझलखानाचा मुलगा फाझलखान याची तीन जहाजे होती. महाराज ती जहाजे ताब्यात घेणार त्यापूर्वी ती राजापूर बंदरात नेण्यात आली. जहाजांना राजापूरच्या इंग्रजांचे संरक्षण मिळाले. महाराजांनी आपला मोर्चा राजापूरकडे वळवला, त्यांना राजापूरच्या इंग्रजांचा हिशेब चुकता करायचा होताच. इंग्रज अधिकारी रिव्हिंग्टन जहाजे घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्नात असता मराठ्यांनी ती तीन जहाजे आणि हेन्री रिव्हिंग्टनला यांना पकडण्यात यश प्राप्त केले. रिव्हिंग्टनला महाराजांनी कैदेत ठेवले.

औरंगजेबाचा मामा शाहिस्तेखान पुण्यात महाराजांच्याच लाल महालात राहत होता. त्याच्यापाशी एक लाख फौज होती. त्या फौजेचा दाब एवढ्याशा पुण्यावर पडत होता. खानाने पंचवीस हजार फौजेचा चाकणच्या संग्रामगडाला वेढा घातला. संग्राम गडावर एक हजार मराठी फौज होती, पण किल्लेदार बुलंद होता. फिरंगोजी नरसाळा हा संग्रामगडावर किल्लेदार आहे तोवर किल्ला शत्रू हाती जाणार नाही, याची महाराजांना खात्री होती.

फिरंगोजी नरसाळांनी मातीचा संग्रामदुर्ग जिद्दीने पंचावन्न दिवस लढवला. शेवटी मोगलांनी आपल्या छावणीपासून गडाच्या तटापर्यंत जमिनीखालून भुयार खणून सुरुंग लावले. त्यामुळे मातीच्या तटाला खिंडार पडले. पण मराठ्यांच्या जिद्दीला खिंडार पडले नाही. गड झुंजतच होता. अखेर १५ ऑगस्ट १६६४ रोजी चाकणचा संग्रामदुर्ग पडला. एका मातीच्या भुईकोट गढीला जिंकायला पंचवीस हजार मोगली फौजेला पंचावन्न दिवस लागल्याने शाहिस्तेखानाची इज्जत जात होती ती अखेर वाचली. खानाने हा आपला मोठा पराक्रम दिल्लीला औरंगजेबाला कळविला. खानाचे अफाट शौर्य दिल्ली दरबारात रुजू झाले.

चाकणच्या पाठोपाठ खानाने परिंडा किल्ला घेतला आणि आपला मोर्चा कोकणाकडे वळविला. शाहिस्तेखानाने कोकणची मोहीम आखत होता तेव्हा करतलबखान सोबतीला होता. शिवाय वऱ्हाडातील माहुरच्या उदाराम देशमुखाची शूर पत्नी रायबाघन यांची त्याला मदत मिळत होती. रायबाघन हा तिचा किताब होता. औरंगजेबानेच तिला तिचे शौर्य पाहून दिला होता. करतलबखान पुण्याहून निघून तळेगाव, वडेगाव मार्गे उंबर खिंडीतून खाली कोकणात उतरणार हे नक्की झाले. महाराजांच्या हेरांनी खानाचा मार्ग हेरून महाराजांना कळविला. नेतोजीसह राजे स्वतः तुंगारण्याच्या अरण्यात लपून बसले. करतलबखान घाटातील जंगलात पुरता रुतेपर्यंत राजांनी पूर्ण शांतता राखली. खान पूर्ण अडकल्यावर महाराजांनी चहूबाजूंनी हल्ला चढविला. शत्रू कोठून आला हेच खानाला समजले नाही. जंगलातून बाण सुटत होते. जीव घेत होते. पण दिसत नव्हते. अशी खानाची आणि रायबाघनची अवस्था झाली होती. त्यांना मराठ्यांचा प्रतिकारही करता येत नव्हता. खानाच्या सैन्याची दाणादाण उडाली. पळून जायलाही वाट नव्हती. शेवटी रायबाघनने तहासाठी याचना केली. सर्व शस्त्रे, दारुगोळा आणि खजिना ताब्यात घेवून महाराजांनी खानाला धर्मवाट दिली. हातचे सर्व आणि इज्जत घालवून वाचलेल्या फौजेसह खान पुण्याला आला.

महाराज करतलबखानाचा पराभव करून कुडाळ प्रांतात गेले, तेथे

कुडाळकर सावंतांशी महाराजांनी मैत्रीचा तह केला. तेथे राजांना एक फिरंग आवडली. फिरंग म्हणजे तलवार. ती त्यांनी सावंतांना ३०० होन देवून खरेदी केली. महाराजांनी त्या तलवारीचे नाव 'भवानी' ठेवले. हीच ती सुप्रसिद्ध भवानी तलवार. या मोहिमेत राजांना आणखी एक रत्न सापडले ते म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस. महाराजांनी त्यांचे हस्ताक्षर आणि हुशारी पाहून त्यांना स्वराज्याच्या सेवेत घेतले.

शाहिस्तेखानास महाराजांविरुद्ध म्हणावे तसे यश मिळाले नव्हते. चाकणच्या गढीने आणि तुंगारलीच्या घाटाने त्याला इतके शहाणपण शिकविले होते की शिवाजीच्या डोंगरी किल्ल्याच्या वाटे जावून चालणार नाही. खान पुण्यात तळ देवून होता. त्याच्या प्रचंड फौजेमुळे पुण्यातील आणि आसपासच्या रयतेचे हाल होत होते. ते महाराजांना पाहवत नव्हते. खानाशी लष्करी सामना करणेही सोपे नव्हते. खानाची फौज एक लाखाच्या वर होती. त्यात राजस्थान मेवाडमधील राजे होतेच, पण घाटगे, गाडे, पवार, भोसले, खंडागळे व जाधवराव असे मराठा सरदारही होते. यातील भोसले म्हणजे राजांचे चुलत घराणे, तर जाधवराव म्हणजे राजांचे आजोळ, जिजाबाईंचे माहेर होते. तेव्हा काही तरी युक्ती करून शाहिस्तेखानास पळवून लावायला हवे होते.

नेतोजी पालकरांस राजांनी मोगली मुलुखात धुमाकूळ घालण्यासाठी पाठवून दिले होते. त्याप्रमाणे नेतोजी पुणे प्रांतात शिरून मोगलांची लूट करीत होता. पुण्याकडे येणारी रसद पुण्याबाहेर मारली जात होती. नेतोजीने खानदेश वऱ्हाड प्रांतातही धुमाकूळ घालून मोगलांना जेरीस आणले होते. पण या असल्या प्रयत्नांनी खान पुणे सोडून जाणार नव्हता. त्यासाठी खानाच्या छावणीवर छापा टाकून त्याला ठार करणे आवश्यक होते. तसे घडले असते तर खानाची छावणी पुणे सोडून गेली असती. राजांनी मग एक धाडसी बेत आखला. पुण्यात खानाच्या प्रचंड सैन्याच्या गराड्यात घुसून खानावरच हल्ला करायचा त्याला मारूनच टाकायचे. महाराजांची कल्पना म्हणजे पूर्ण नियोजन असे आणि नियोजन म्हणजे अर्धे यशच असे. राजांनी ३०० निवडक स्वार सोबत घेण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे लाल महालात शिरण्यासाठी लाल महालाची रचना माहीत असलेले बालपणीचे सोबती बाबाजी, चिमणाजी, मोरोपंत, सर्जेराव असे निवडले. कोणी कसे आणि कोठून पुण्यात शिरायचे याचे तपशील ठरले.

तीनशे मावळ्यांना पुण्यात शिरायचे होते. पुण्याचा बंदोबस्त चोख होता. सतत फिरते आणि बदलते मोगली पहारे होते. महाराजांनी काही मावळ्यांना लग्नाचे वऱ्हाडाच्या वेशात पुण्यात घुसवले. काही मावळे मुसलमानी वेशात

शाहिस्तेखानाचे सरदार असल्याचा बहाणा करून पुण्यात प्रवेशते झाले. सारे मावळे ६ एप्रिल १६६३ रोजी पुण्यात जमा झाले. लाल महालाच्या खिडक्या आधीच मावळ्यांकडून ढिल्या करून ठेवण्यात आल्या होत्या. ६ एप्रिल हा मुसलमानांचा रोजाचा सहावा दिवस होता. दिवसभर निर्जळी उपवास करून सूर्यास्तानंतर पोटभर मांसाहारी आणि पक्वान्ने खावून सारे रात्री सुस्तावलेले असतात, म्हणून महाराजांनी तो दिवस छाप्यासाठी निवडला होता.

रात्री निवडक सोबती घेवून स्वत: राजे लाल महालात शिरले. खाली भटारखाना जागा होता. भटारखान्यातील नोकर आवराआवर करीत होते. त्यांना जागच्याजागी गारद करण्यात आले. राजांनी लाल महालातील खानाच्या जनानखान्यात प्रवेश केला. एकच गोंधळ होवून कापाकापी सुरू झाली. खानाचा मोठा मुलगा, जावई आणि खानाच्या कुटुंबातील बारा स्त्रिया यांची कत्तल झाली. रात्रीमुळे महालात अंधार असल्यामुळे मराठ्यांकडून नकळत स्त्रियांची हत्या झाली होती. नाहीतर मराठे छापा टाकताना वा लूट करताना स्त्रियांना सन्मानाने वागवित असत. पण आज नाईलाज होता.

महाराजांनी शाहिस्तेखानावर वार केला. इतक्यात खानाने तो वार चुकवत खोलीतून सज्जात उडी मारली. या गडबडीत खानाचा जीव तर वाचला, पण त्याच्या उजव्या हाताची तीन बोटे मात्र छाटली गेली. राजांना वाटले की खान मारला गेला. राजे जसे आले तसे बाहेर पडले. मराठे पळताना 'चोर चोर पकडो... गनीम पकडो...' असे ओरडत असल्याने खानाच्या फौजेला आपले कोण आणि शत्रू कोण हे कळत नव्हते. खानाची फौज पाठलागावर निघाली. स्वार शहरापासून बरेच दूर गेल्यावर त्यांना काही मराठे हातात मशाली घेवून पळताना दिसले. खानाच्या फौजेने पाठलाग करून जवळ जावून पाहिले तर बैलांच्या शिंगांना पलोते लावून त्यांना सोडले होते. ते सैरभैर पळत होते. महाराजांच्या नियोजनाप्रमाणे महाराज सिंहगडावर पोहोचले होते. महाराजांच्या मागावर मोगली फौज आलीच तर त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी सिंहगडावर मावळे तयार होते. खानाच्या फौजेने महाराजांचा पाठलाग करून ते सिंहगडापर्यंत आले पण वरून होणाऱ्या माऱ्यापुढे त्यांचे काही चालले नाही. या प्रकरणात खान मेला असे महाराज समजत होते, पण दुसऱ्या दिवशी खान मेला नाही हे महाराजांना कळले.

या आकस्मिक छाप्याने खान पुरता भयभीत झाला. एक लाख फौजेच्या मध्यभागी मुख्य छावणीवर शिवाजी छापा टाकू शकतो यावर त्याचा विश्वासच बसेना. त्याला आता पुण्यात राहणे धोक्याचे वाटू लागले. खानाच्या कुटुंबातील

१४ माणसे मृत्यूमुखी पडली होती. शाहिस्तेखानाला हा फार मोठा धक्का होता. त्यात त्याची उजव्या हाताची तीन बोटे तो गमावून बसला होता. आता आग्र्याला गेल्यावर औरंगजेबाला कुर्नीसात कसा करायचा हाही त्याच्यापुढे प्रश्न होता. खानाची पुरती बेअब्रु झाली होती. खानाने पुण्याचा तळ हलविण्याची आज्ञा दिली. पुढे काही दिवसात खान पुणे सोडून औरंगाबादला गेला.

शाहिस्तेखानाची पुण्यात झालेली बेअब्रु औरंगजेबाला कळली. शिवाजीच्या बाबतीत खानाने अधिक सावध राहायला हवे होते असे त्याला वाटले. त्याने झाल्या प्रसंगाचा दोष खानाच्या माथी मारला. खानावर भाच्याची इतराजी झाली. औरंगजेबाने मामाची बदली बंगालचा सुभेदार म्हणून केली आणि खानास कळवून टाकले की त्यांनी परस्पर बंगालमध्ये निघून जावे. त्यांनी दिल्लीला भेटीस येण्याचे कारण नाही. औरंगजेबाच्या या निरोपाचा अर्थ स्वच्छ होता की आपण मला आपले पराभूत काळे तोंड दाखवू नये.

अर्थात या छाप्यामुळे स्वराज्याभोवतीचा फास मात्र सुटला. राजांचे संपूर्ण जीवनच असा चमत्कार वाटावा अशा साहसाने भरलेले होते.

औरंगजेबाने शाहिस्तेखानाची तडकाफडकी बदली केल्यावर त्याचे जागी आपला मुलगा मुअज्जम यांस दक्षिणेच्या सुभेदारीवर पाठविले. त्यामुळे मुअज्जम औरंगाबादला येण्यासाठी आणि शाहिस्तेखानाकडून सर्व ताबा घेण्यासाठी काही काळ जाणार होता. या काळाचा फायदा घेण्यासाठी महाराजांनी आणखी एक साहसी बेत आखला. शाहिस्तेखानाने पुण्याची वाट लावली होती. रयतेचे हाल आणि आर्थिक नुकसान केले होते. त्याची भरपाई मोगली मुलुखातूनच करून घेण्याचे महाराजांनी ठरविले होते. त्यासाठी महाराजांनी निवडली सुरत.

सुरत हे त्याकाळी अत्यंत भरभराटीस आलेले व्यापारी बंदर होते. सुरत बंदरातून समुद्रमार्गे जगभर व्यापार चाले. सर्व देशाचे व्यापारी सुरतेत येत असत. सुरत-पुणे हे अंतर तीनशे मैलाचे होते. अर्थात हा सर्व प्रदेश मोगलांच्या अधिपत्याखाली येत होता. त्यामुळेच बहुधा सुरतेची संरक्षण व्यवस्था ढासळलेली होती. इतका मोगली प्रदेश तुडवून कोणी शत्रू सुरतेपर्यंत पोहोचणे शक्य नव्हते. सुरतेत लक्ष्मीचा वास असून सुरत बिनधास्त होती आणि म्हणून महाराजांनी सुरतेची निवड केली.

महाराज राजगडाहून ६ डिसेंबर १६६३ निघाले. मार्गात त्र्यंबकेश्वरला श्री महादेवाचे दर्शन घेतले. तेथून महाराजांनी अफवा पसरविली की मराठे औरंगाबादेवर स्वारी करण्यासाठी जात आहेत. महाराज मोहिमेच्या वेळी गुप्तता

पाळीत असत. त्यामुळे कुठे जायचे ते फौजेलाही ठावूक नसे. त्र्यंबकेश्वरहून महाराज कोळवण-रामनगरमार्गे रात्रीचा प्रवास करून ५ जाने. १६६४ रोजी सुरतेजवळ गणदेवी गावाला पोहोचले. बहिर्जी नाईकांनी दोन महिने आधी सुरतेत तळ ठोकून सुरतेची पूर्ण माहिती महाराजांना दिली होती. त्यात श्रीमंत व्यापाऱ्यांची त्यांच्या संपत्तीसह माहिती होतीच, पण त्यात दानधर्मी कोण आहेत याचीही माहिती होती. सुरतेतील इंग्रज बखार, पोर्तुगिज बखार, डच वखार व त्यांच्या व्यापारासंबंधी तपशील होता. बहिर्जी म्हणजे महाराजांचा तिसरा डोळाच होता.

महाराज गणदेवीला पोहोचल्यावर सुरतेत बातमी आली की शिवाजी सुरतेजवळ आला आहे. गावात या बातमीने घबराट पसरली. लोक सैरावैरा पळू लागले. धनिकांनी जवळचा पैसा ओतून किल्लेदाराला लाच दिली. किल्लेदारांनी अशा धनिकांना किल्ल्यात संरक्षण दिले. सुरतेत भुईकोट किल्ला होता. त्याचा किल्लेदार होता इनायतखान. तो अजिबात घाबरला नव्हता. त्याला शिवाजी आल्याची बातमी खरी वाटत नव्हती. पुण्यापासून इतक्या दूर मोगली मुलुखात शिवाजी येईलच कसा आणि त्याने तसा प्रयत्न केल्यास तो सुरतेपर्यंत सुखरूप कसा येवू शकेल? असा सूज्ञ विचार करून इनायत खान सुरतेच्या भित्र्या नागरिकांना हसत होता. शेवटी लोकांच्या समाधानासाठी त्याने आपला जासूद गणदेवीपर्यंत पाठविला. महाराजांनी त्या जासुदास गिरफ्तार केले. मग मात्र इनायत खानाला शिवाजी आल्याचे पटले आणि तो स्वत:च किल्ल्यात जावून बसला.

इनायतखान स्वत: किल्ल्यात लपून बसला आणि सुरत शहराची जनता वाऱ्यावर सोडली. वास्तविक शहराचे रक्षण करणे ही त्याचीच जबाबदारी होती. त्यासाठी एक हजार फौजेचा खर्च तो घेत होता. प्रत्यक्षात तीनशे फौज ठेवून सातशे फौजेचा खर्च इनायत खानाच्या खिशात जात होता. सुरतेतील गोरगरीब रयत जिवाच्या भीतीने पळापळ करीत होती. प्रतिकारासाठी कोणीच येत नव्हते. फक्त इंग्रज वखारवाल्यांनी शहरातून फिरून आपण प्रतिकारासाठी सज्ज असल्याचे दाखविले. डच वखारवाले शिवाजी आलाच तर तयार असावे म्हणून वखारीचे दरवाजे लावून तयारीत होते.

६ जानेवारीला मराठे सुरतेच्या बुऱ्हाणपूर वेशीजवळ आले. तेथे महाराजांसाठी एक तंबू तयार करून महाराजांनी इनायतखानाकडे माणूस पाठवून खंडणीची मागणी केली. त्यात सुरतेतील तीन धनाढ्य व्यापाऱ्यांची नावे होती. इनायतखानाला थोडीजरी अक्कल असती तरी त्याने सुरतेतील धनाढ्य

व्यापाऱ्यांकडून पैसे गोळा करून एक भली मोठी खंडणी महाराजांकडे पाठवून दिली असती व महाराजांशी सलोखा केला असता. परंतु त्याला ते सुचलेही नाही आणि त्याच्या सल्लागारांनी सुचविलेही नाही.

महाराजांनी मराठी फौजेला आज्ञा केली की शहरात जावून चार दोन ठिकाणी लूट करावी व काही ठिकाणी घरांना आगी लावाव्यात. त्यामागे हेतू हा होता की त्याने तरी इनायतखानाला सुरत वाचविण्याची अक्कल सुचते का ते पाहावे. सुरतेला जाळून रयतेला उगाच त्रास देण्याचा महाराजांचा विचार कधीच नव्हता. शक्यतो लबाड श्रीमंत व्यापाऱ्यांना वेठीस धरून त्यांच्याकडून आणि इनायतखानाकडून जबर खंडणी वसूल करून शाहिस्तेखानाने केलेल्या पुण्याच्या नासाडीची भरपाई करून घ्यावी असा महाराजांचा विचार होता.

परंतु त्या मूर्ख इनायतखानाने महाराजांवर मारेकरी घालण्याचा प्रयत्न केला. खानाने आपला वकील म्हणून पाठविलेली व्यक्ती मारेकरी होती. त्या व्यक्तीने महाराजांवर वार केला. परंतु महाराजांच्या अंगरक्षकाच्या सावधतेने महाराजांना काही इजा झाली नाही. परंतु या प्रकाराने मराठे इनायतखानावर चिडले. त्यांनी पूर्ण सुरत लुटली. इतके झाले तरी महाराजांची फौजेला आज्ञा होती की, 'स्त्रिया, मुले, गरीब रयत, धार्मिक स्थळे, साधूसंत आणि दानशूर व्यक्ती यांना लुटीत त्रास होता कामा नये.'

या लुटीत डच वखारीच्या मागे ॲबेसिनियाचा वकील सापडला. त्याने औरंगजेबास देण्यासाठी मौल्यवान नजराणा आणला होता. तो त्याने महाराजांना अर्पण केला. महाराजांनी त्याची सन्मानाने सुटका केली. लुटीत सुरतेतील मोठमोठे खानदानी वाडे खणून काढण्यात आले. लपवून ठेवलेली संपत्ती बाहेर पडत होती. शोधून शोधून व्यापाऱ्यांना धनासाठी धरण्यात येत होते. जिवाच्या भीतीने श्रीमंत व्यापारी धनाच्या पेट्या महाराजांच्या पायाशी ठेवत होते.

या लुटीत महाराजांना २८ वजनी शेर मोती, जडजवाहीर, माणिक, हिरे, पाचू यांसारखे मौल्यवान रत्ने मिळाली. सोन्याचे दागिने, निरनिराळ्या देशीची सोन्या-चांदीची नाणी मिळाली. इंग्रज आणि डच वखारवाल्यांनी असे म्हणतात की या लुटीत महाराजांना एक कोट रुपये रोख आणि अगणित जडजवाहीर मिळाले. ६ जानेवारी ते १० जानेवारी अशी लूट करून १० जानेवारी १६६४ रोजी महाराजांनी सुरत सोडली. लूट घेवून राजे राजगडावर आले. दरम्यान त्यांना एक दु:खद वार्ता समजली. २३ जाने. १६६४ रोजी कर्नाटकात हौदिगिरे येथील जंगलात शिकारीस शहाजी राजे गेले असता त्यांचा घोडा खड्ड्यात पडला आणि त्यात शहाजीराजांचा अंत झाला. महाराजांचे पितृछत्र हरपले

आणि मातृछत्र हरपण्याच्या तयारीत होते. जिजाबाई सती जाण्यासाठी निघाल्या होत्या. मंत्र्यांनी आणि मुत्सद्यांनी जिजाबाईंना महाराज येईपर्यंत थांबविले होते. महाराज ५ फेब्रुवारीला गडावर आले. त्यांनी माँसाहेबांना अनेक विनवण्या करून सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु जिजाऊंचा निश्चय झाला होता. अखेर महाराजांनी मातोश्रीस सांगून टाकले की 'आपण पाहण्यासाठी राहणार नसाल तर मी हा स्वराज्याच्या खटाटोप येथेच थांबवितो. आम्हास त्याची गरज नाही. आम्हास चरितार्थासाठी महाराज साहेबांची जहांगीर पुरेल.'

ही गोष्ट बरोबर लागू पडली. स्वराज्य व्हावे ही माँ साहेबांची अत्यंतिक इच्छा होती. जिजाऊंनी सती जाण्याचा विचार सोडला आणि सौभाग्य अलंकार कायमसाठी काढून ठेवले.

शहाजीराजांच्या फार आठवणी महाराजांपाशी नव्हत्या. १६४२ सालापर्यंतच त्यांचा सहवास लाभला होता. वयाच्या १० व्या, १२ व्या वर्षी महाराज साहेबांबरोबर विजापूर दरबारात गेल्याच्या काही ठळक आठवणी शिवरायांजवळ होत्या. थोरले बंधू संभाजीराजे यांच्याही काही ठळक आठवणी शिवरायांजवळ होत्या. परंतु गेली वीस वर्षे आबासाहेबांचा सहवास लाभला नव्हता. अधूनमधून बंगळूरला पत्रव्यवहार होत असे. बंगळूरहून आबासाहेबांचे एखादे पत्र आले की मस्तकी लावून ते वाचण्याचा महाराजांचा शिरस्ता होता.

नुकतेच १६६२ साली शहाजीराजे महाराष्ट्रात शिवरायांना भेटायला, त्यांचे कर्तृत्व डोळे भरून पहायला आले होते. शिवरायांच्या आक्रमक वृत्तीने बेजार झालेल्या आदिलशाहीने शहाजीराजांना पुत्राला समज देण्याच्या कामावर नेमणूक केली होती. दरबारने शहाजीराजांस आज्ञा केली होती की त्यांनी महाराष्ट्रात त्यांच्या जहागिरीवर जावून शिवाजीची समजूत काढावी व त्यास आदिलशाहीशी सलोखा करण्यास भाग पाडावे. शहाजी राजांचीही फार दिवसांची इच्छा हाती की पुण्यास येवून शिवबाची, जिजाऊंची भेट घ्यावी. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी जयंतीबाई आणि पुत्र उमाजीराजेही शिवरायांजवळ होते, त्यांचीही भेट घ्यावी. शहाजीराजांनी दरबारची आज्ञा मिळताच तातडीने निघून महाराष्ट्रात येण्याचे केले. कुटुंबाची भेट होवून बारा वर्षे होवून गेली असल्याने धर्माप्रमाणे जेजुरीला परातीतील तुपात पाहून कुटुंबाची भेट झाली.

त्यावेळची महाराज साहेबांची एक आठवण महाराजांच्या मनात अगदी ताजी होती. १६४६ मध्ये महाराजांनी चंद्रराव मोऱ्याकडून रायगड किल्ला जिंकून घेतला होता. त्या वेळेपासून महाराजांच्या मनात रायगडाला स्वराज्याची

राजधानी करण्याचा विचार होता. सभासद बखरीत स्पष्ट उल्लेख आहे. 'राजा खासा जावून पाहता गड बहुत सचोट चौतर्फा गडाचे कडे तासल्याप्रमाणे दीड गाव उंच, पर्जन्यकाळी कड्यावर गवत नाही आणि धोंडा तासीव एकत्र आहे' असे वर्णन करून महाराज म्हणाले, 'तख्तास जागा गड हाच करावा.'

शहाजी महाराज १६६२ मध्ये राजगडावर आल्यावर शिवरायांनी त्यांना ही तख्तासाठी निवडलेली जागा दाखविली होती. शहाजी महाराजांसही ती भावली. त्यांनी चौकसपणे रायगड पाहून आबाजी सोनदेव आणि हिरोजी इंदूलकर यांचे तोंड भरून कौतुक केले होते. यांनी दोघांनी रायगडावर तीनशे इमारती बांधल्या होत्या. रायगडाला १४३५ पायऱ्या बांधल्या होत्या. राजभवन, राज्यसभा, राण्यांचे महाल, ४४ व्यापाऱ्यांसाठी बाजारात जागा होत्या. अष्टप्रधानांची कार्यालये, टांकसाळ, धान्याची कोठारे, तलाव, दोन दीपस्तंभ, गजशाळा, दारुचे कोठार, टकमक टोक यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे शिबंदीच्या जागा, पाण्याचे हौद आणि महाराजांच्या देवदर्शनासाठी जगदिश्वराचे मंदिरही होते. या सर्व तीनशे इमारतींचे बांधकाम करताना वास्तूविशारद म्हणून अर्जोजी गर्जोजी म्हस्के आणि हिरोजी इंदळकर यांनी काम पाहिले.

हिरोजी इंदळकरबद्दल असे सांगतात की रायगडावर काम चालू असता पैशाची अडचण निर्माण झाली होती. महाराज कुडाळच्या स्वारीवर होते. तेव्हा बांधकाम थांबवावे लागू नये म्हणून या हिरोजीने गडाखालची गावची जमीन व घर विकून कामात खंड पडू दिला नाही. पुढे महाराजांनी गडाचे काम पाहून हिरोजीचे कौतुक केले आणि विचारले की 'बोल हिरोजी तुला या कामासाठी काय बक्षिस देवू?' तर हिरोजीने जगदिश्वराच्या मंदिराच्या पायरीवर स्वतःचे नाव कोरण्यासाठी परवानगी मागितली. ती पण आपले नाव भविष्यात अजरामर व्हावे म्हणून नव्हे तर महाराज देवळात जातील तेव्हा त्यांच्या पायाची धूळ आपल्या नावावर पडावी यासाठी होती. आजही तुम्ही कोणी रायगडावर गेलात तर जगदीश्वराच्या मंदिराच्या पायरीवर कोरलेले दिसेल.

'सेवेसी तत्पर हिरोजी इंदलकर'

शहाजीराजांशी महाराजांनी राजधानी रायगडावर करण्याबाबत प्रदीर्घ चर्चा झाली. त्यात महाड जवळचा रायगड हा राजधानीसाठी उत्तम गड आहे असे ठरले. शहाजी राजांच्या सूचनेप्रमाणे तटबंदीची आणि इमारतींची कामे पूर्ण झाल्यावर १६६६ पासून रायगड ही स्वराज्याची अधिकृत राजधानी गणली जावू लागली. स्वराज्याचा पूर्ण कारभार राजगडावरून न होता रायगडावरून होवू लागला.

जंजिरा हा जलदुर्ग मुंबईपासून सुमारे १०० मैल अंतरावर मुरुड या गावाजवळ आहे. दंडाराजपुरी गावापासून अर्धा मैल समुद्रात मजबूत तटबंदी असलेला जंजिरा मेहरुब जलदुर्ग आहे. हा पूर्वी निझामशाहीच्या ताब्यात होता. परंतु १६३६ मध्ये मोगल आणि आदिलशाहीने निझामशाही बुडविल्यावर जो निझामशाही मुलूख दोघांनी वाटून घेतला, त्यात हा जंजिरा आदिलशाहीकडे आला. जंजिऱ्याचा सुभेदार १६५५ मध्ये वारल्यावर त्याचा मुलगा फत्तेखान जंजिऱ्याचा किल्लेदार झाला. जंजिरा स्वराज्यात यावा यासाठी मराठ्यांनी आटोकाट प्रयत्न केले. जंजिरा ताब्यात आल्याशिवाय पूर्ण कोकणपट्टी ताब्यात आली असे म्हणता येत नव्हते. महाराजांनी जंजिरा घेण्यासाठी १६५७ जुलैमध्ये निळोपंत रघुनाथ यांना आरमार देवून पाठविले होते. निळोपंतांनी फत्तेखानास जेरीस आणले, पण जिंकता आले नाही. जंजिऱ्याचा सिद्दी पुन्हा कोकणात उपद्रव देवू लागताच १५५९ मध्ये महाराजांनी व्यंकोजी दत्तो प्रभुणीकर यास जंजिऱ्यावर पाठविले. त्याच्या मदतीस दर्यासारंग दौलतखान आणि पेशवे मोरोपंत यांनाही पाठविले. या तिघांनी दंडाराजपुरी आणि भोवतालचा प्रदेश जिंकून घेतला. फक्त जंजिरा घेता आला नाही. कारण त्याचवेळी नोव्हेंबर १६५९ मध्ये अफझलखान चालून आला होता. त्यामुळे त्यावेळी आदिलशाहीशी लढण्यात व्यग्र असलेल्या महाराजांना जंजिऱ्याकडे लक्ष देणे जमले नाही. परंतु तो सल महाराजांच्या मनात सदैव होता.

नोव्हेंबर १६६३ पासून मोगल सरदार जसवंतसिंग सिंहगडाला वेढा देवून बसला होता. सिंहगड बुलंद गड असल्याने आणि तेथे आवश्यक शिबंदी असल्याने महाराजांना सिंहगडाची काळजी नव्हती. त्याच काळात महाराजांनी सुरत लुटून संपत्ती स्वराज्यात आणली. त्याच काळात शहाजी राजांचा मृत्यू झाला. परंतु जसवंतसिंग सिंहगडाला वेढा घालून बसला होता. शेवटी १६६४ चा पावसाळा जवळ आला तसा एप्रिलमध्ये जसवंतसिंगाने सिंहगडावर हल्ला केला. किल्ल्यावरून जबरदस्त प्रतिकार करण्यात आला. प्रतिकार इतका जबरदस्त होता की जसवंतसिंग वेढा उठवून निघून गेला. महाराजांनी मोगलांच्या मुलुखात शिरून सुरत लुटून आणली आणि सिंहगडावर जसवंतसिंगाचा पराभव केला. यामुळे महाराजांची पत वाढली. पण औरंगजेब सारे पाहत होता. त्याच्या मनात शिवाजीचा कायमचा बंदोबस्त करण्याचे घाटत होते. तो योग्य वेळेची वाट पहात होता.

महाराजांनी १६५९ मध्ये सावंतवाडीच्या सावंतांशी मैत्रीचा तह केला होता. परंतु विजापूरकरांच्या सांगण्यावरून सावंत महाराजांना विरोध करू

लागले होते. त्यांना पुन्हा समज देणे आवश्यक होते. त्यात ऑक्टोबर १६६४ मध्ये आदिलशाहीने महाराजांच्या विरोधात उचल खाल्ली होती. आदिलशाहीने इसलाखखान, वजीर खवास खान आणि मुधोळचे बाजी घोरपडे या तिघांना कोकणात महाराजांच्या विरोधात पाठवले. पण बाजी घोरपडे मुधोळातच होते. ते अजून खवास खानास येवून मिळाले नव्हते. महाराजांनी या तिघांना फोडण्याचे ठरविले. महाराजांनी शीघ्र गतीने मुधोळ गाठले. महाराजांना बाजींचा जुना हिशेब चुकवायचा होताच. बाजीने कर्नाटकात जिंजी येथे शहाजीराजांना शयनगृहात शिरून कैद केले होते. महाराज स्वत: बाजीला भिडले. त्यांनी बाजीशी घनघोर युद्ध करून बाजीला कंठस्नान घातले. मुधोळ शहर पूर्ण लुटले. बाजीचा बदला घेवून राजे नेतोजीसह खवासखान आणि इसलाखखान यांच्यावर चालून गेले. या दोन्ही विजापुरी सरदारांना धूळ चारून चंद्रगडावर पळवून लावले.

त्यानंतर राजांनी कुडाळहून मालवण गाठले. मालवणच्या किनाऱ्यापासून समुद्रात एक मैलावर एक खुरटे बेट दिसले. राजांना ते बेट आवडले. या बेटावर जलदुर्ग बांधावा असे महाराजांच्या मनात आले. कारण जंजिऱ्याचा सिद्दी माजला होता. त्याची सागरावर अनिर्बंध सत्ता होती. मुंबईचे इंग्रजही त्याला मदत करीत असत. महाराजांना आपले आरमारी सामर्थ्य वाढवायचे होतेच. त्यांनी २५ नोव्हेंबर १६६४ रोजी स्वहस्ते जलदुर्गाचा पाया घातला. या जलदुर्गाच्या बांधणीसाठी पैसा कमी पडणार नाही याची व्यवस्था केली आणि जलदुर्ग ऐसपैस आणि सुरेख बांधण्याची आज्ञा दिली.

मोरोपंतांनी खास देखरेखीखाली या सिंधू दुर्गाचे काम करवून घेतले. किल्ल्याला दोन मैल तटबंदी बांधली. तटाची उंची ३० फूट आणि रुंदी १२ फूट घेण्यात आली. शंभर कसबी कारागिर दिवसरात्र खपत होते. हा जलदुर्ग म्हणजे महाराजांचे स्वप्न होते. या किल्ल्यात महाराजांच्या हाताचा ठसा पाषाणावर कोरलेला आजही पाहता येतो.

शिवाजी महाराजांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महाराजांनी बसनूरवर काढलेली स्वारी. या स्वारीसाठी महाराज आपल्या आरमारातून गेल्याची नोंद आहे. मोहिमेसाठी जलमार्गाचा आणि आपल्या आरमाराचा उपयोग करणारा शिवाजी हा पहिलाच राजा असावा. आरमारी लढायात राजे महाराजे स्वत: भाग घेताना दिसत नाहीत. मालवणहून महाराज जलमार्गाने ८ फेब्रु. १६६५ रोजी बसनूरच्या मोहिमेवर निघाले. बसनूर लुटून महाराज गोकर्ण-अंकोला येथे गेले. तेथून आरमार माघारी पाठवून महाराज रस्त्याने कारवापर्यंत गेले.

कारवार लुटण्याचा महाराजांचा विचार होता. कारवार अत्यंत संपन्न होते. परंतु कारवारला विजापुरी सरदार शेरखान होता. शिवाजी कारवारला आल्याचे पाहताच त्याला कारवारचे भवितव्य दिसू लागले. कारवारची सुरत होण्यास वेळ लागणार नाही. अशावेळी जी चूक सुरतेत इनायतखानाने केली ती आपण करायची नाही असे ठरवून शेरखानाने त्या भागातील सर्व व्यापाऱ्यांना आणि श्रीमंतांना बोलावून घेतले. त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली आणि त्यांच्याकडून नजराणे आणि रोख रकमा गोळा करून महाराजांची भेट घेतली. महाराजांना ते नजराणे व खंडणी देवून त्यांच्याशी सलोखा केला. राजांनी शेरखानाचे कौतुक केले. ते समयी महाराज म्हणाले, 'शेरखानाने आमची शिकार घालविली.'

या बार्सिलोर ऊर्फ बसनूरची प्रचंड लूट करून महाराजांनी कडवाल सिद्धेश्वर, मिर्जान, अंकोला ,कोद्रे हुमासुद अशी अनेक ठिकाणे घेवून गोकर्ण महाबळेश्वरला देवदर्शन घेतले व विपूल दानधर्म केला. महाराजांना कारवार प्रांतात अजून काही लुटी करायच्या होत्या. कारवार प्रांतात महाराजांची चांगलीच दहशत निर्माण झाली होती. इंग्रज व्यापारी आपल्या पत्रात असे लिहितात की 'इकडील लोकांत अशी बोलवा आहे की शिवाजीचा देह वायुरूप असून त्यास पंख आहेत. कारण ते कोणत्यावेळी कुठे प्रकट होतील याचा नेम नाही.' अशा अफवा महाराजांबद्दल उठत होत्या. महाराजांचा कारवारमध्ये अधिक राहण्याचा विचार होता. इतक्यात बातमी आली की औरंगजेबाच्या आज्ञेने जयसिंग दक्षिणेत उतरत आहे. त्यामुळे महाराजांनी ताबडतोबीने महाराष्ट्रात परतणे पसंत केले.

औरंगजेबाने शिवाजीस काबूत ठेवण्याचा थोडाथोडका प्रयत्न केला नव्हता. शाहिस्तेखान, करतलबखान, सुरतेचा इनायतखान, जसवंतसिंग, रायबाघन यांसारख्या नामवंत सरदारांना पराभूत करणारा शिवाजी औरंगजेबाच्या नजरेत खुपत होता. शिवाजीने सुरत लुटली, अहमदनगर लुटले. जुन्नर-जालना लुटले. परंतु मोगली सरदार काहीच करू शकत नव्हते. आदिलशाहीला कुरतडून त्याने आपले राज्य वाढवले होते. आदिलशाही शिवाजीपुढे हतबल झाली होती. आता शिवाजीच्या बंदोबस्तासाठी औरंगजेबाकडे दोनच पर्याय होते. एक म्हणजे स्वत: दक्षिणेत उतरणे किंवा मिर्झाराजे जयसिंहास दक्षिणेत पाठवणे.

जयपूर नरेश मिर्झाराजे जयसिंह हा कडवा रजपूत घराण्यातील वीर होता. मिर्झाराजे अत्यंत अनुभवी, पराक्रमी, मुत्सद्दी, बुद्धिमान सेनानी होते. त्यांचे

इमान औरंगजेबापाशी होते. औरंगजेबाला दिल्लीच्या तख्तावर बसविण्यात मिर्झाराजांचा सिंहाचा वाटा होता. मिर्झाराजे नसते तर दारा हिंदुस्थानचा शहेनशहा झाला असता. मिर्झाराजांनी आजवर औरंगजेबासाठी अनेक लढाया केल्या, पण एकदाही पराभव झाला नाही. मिर्झाराजे वयाच्या आठव्या वर्षांपासून मोगलांचे मनसबदार होते. त्यांनी जहांगिर, शहाजहान आणि औरंगजेब अशा तीन शहेनशहांची कारकीर्द जवळून पाहिली होती. दूरदृष्टी आणि विवेक हे मिर्झाराजांचे विशेष गुण होते. मिर्झाराजे मोगलांचे क्रमांक एकचे सेनापती होते. त्यांना दरबारात शहाजादाइतका सन्मान होता.

अशा मिर्झाराजांना औरंगजेबाने शिवाजीवर पाठविण्यासाठी निवडले खरे पण त्यात एक अडचण होती. मिर्झाराजे हिंदू होते. ते कदाचित शिवाजीला मिळण्याची भीती औरंगजेबाला वाटत होती. वास्तविक मिर्झाराजे मोगलांशी इमानी आणि प्रामाणिक होते. परंतु औरंगजेबाचा स्वभाव अत्यंत संशयी होता. तो स्वत: कपटी-कारस्थानी असल्याने त्याचा जगात कोणावरही विश्वास नव्हता. राजकारणात काही प्रमाणात संशयीपणा आवश्यक असतो. परंतु औरंगजेब इतका जास्त संशयी होता की त्याचा कोणावरही विश्वास बसत नसे आणि त्याच्यावर कोणाचाही विश्वास बसत नसे.

मिर्झाराजांच्या बरोबर इतर सरदार देताना औरंगजेबाने मखलाशी केली. त्याने मिर्झाराजांबरोबर राजा सुजानसिंह, पुरनमल बुंदेला, राजा रामसिंह आणि मिर्झाराजांचा पुत्र किरणसिंह असे हिंदू सरदार दिले. तसेच दाऊदखान कुरेशी, इहतशामखान, याहिय्या आणि दिलेरखान यांसारखे कडवे मुसलमान सरदार दिले. त्यामागे औरंगजेबाचा हेतू हा होता की मिर्झाराजांना मनमानी करता येवू नये. त्यांच्यावर मुसलमान सरदारांचा दबाव रहावा, दिलेरखानावर तर औरंगजेबाने मिर्झाराजांवर खास लक्ष ठेवण्याची गुप्त कामगिरी सांगितली होती. थोडक्यात दिलेरखान हा मिर्झाराजांचा पायगुंता होता. अर्थात मिर्झाराजांसारख्या मुत्सद्दी अनुभवी सरदारास त्याची पूर्ण कल्पना होती.

मिर्झाराजांनी फौजेसह ९ जाने. १६६५ रोजी नर्मदा ओलांडली. ते औरंगाबाद येथे आले. काही दिवस मुक्काम करून १४ फेब्रुवारीला औरंगाबाद सोडून पुण्याकडे निघाले. मिर्झाराजांना यशाची खात्री होती. पण ऐनवेळी आदिलशाही आणि कुतुबशाही यांनी शिवाजीला मदत केली तर शिवाजीला जिंकणे कठीण जाईल. त्यासाठी त्यांनी या आजूबाजूच्या सर्व सत्ताधिशांना चुचकारण्याचे धोरण आरंभले होते. आजवर शिवाजीने ज्यांना ज्यांना त्रास दिला आहे अशा सरदारांना शिवाजी विरुद्ध एकत्र आणण्यास मिर्झाराजांनी

सुरुवात केली. अशी पूर्वतयारी करून मिर्झाराजे ३ मार्च १६६५ रोजी पुण्यात आले.

मिर्झाराजे थोर मुत्सद्दी असले तरी धार्मिक मनोवृत्तीचे होते. या युद्धासाठी आपल्या मागे दैवी शक्तीचे पाठबळ असावे यासाठी त्यांनी शतचंडी यज्ञ केला. सुमारे ४०० ब्राह्मण अनुष्ठानाला बसविले. शेकडो देव-देवतांना नवस केले. शिवाजीच्या शत्रूंची आघाडी उघडली. इतकी जय्यत तयारी मिर्झाराजांनी एका हिंदू जमिनदाराला जिंकण्यासाठी केली होती, हे पाहता त्यात महाराजांचेच मोठेपण दिसल्याशिवाय राहत नाही.

मिर्झाराजे बुऱ्हाणपूरला होते तेव्हा जानेवारी महिन्यात पौष अमावास्येला सूर्यग्रहण होते. 'ग्रहण काळात विपूल दानधर्म करावा,' असे हिंदू धर्मशास्त्र सांगते. महाराजांनी वेदमूर्ती गोपाळ भट यांना विचारले की, 'सुवर्णदानाची कमाल मर्यादा धर्मात काय सांगितली आहे ती मला सांगा.' त्यावर गोपाळ भटांनी 'आईच्या वजनाइतके सुवर्ण म्हणजे दानासाठी कमीच मर्यादा आहे,' असे सांगितले. त्यावर महाराजांनी माँ साहेब जिजाऊंची सुवर्णतुला करून ते सुवर्ण दान देण्याचे ठरविले. त्यासाठी महाबळेश्वर हे निसर्गरम्य ठिकाण निश्चित केले.

महाराजांनी राजकुटुंबासह आणि सोनोपंत डबीरांसह महाबळेश्वर मंदिरात प्रवेश केला. तेथे रुप्यांचा तराजू ठेवण्यात आला होता. महाराजांनी स्वतःच्या हातांनी माँ साहेबांस तराजूच्या पारड्यात बसवले व दुसऱ्या पारड्यात सुवर्णमुद्रा टाकण्यात आल्या. त्यानंतर राजांच्या पत्नींनी आपल्या अंगावरचे दागिने उतरवून पारड्यात टाकले. शेवटी जिजाबाईंच्या नातसून येसूबाई साहेब यांनी आपले दागिने पारड्यात टाकले आणि जिजाबाईंचे पारडे बरोबरीत वर गेले.

त्यानंतर राजांनी सोनोपंत डबीरांना आग्रहाने तुलेच्या पारड्यात बसविले. सोनोपंत स्वराज्यासाठी चंदनासारखे झिजले होते. सोनोपंत महाराजांचे वकील होते. त्यांच्या बुद्धीवर महाराजांचा विश्वास होता. सोनोपंतांची सुवर्णतुला करण्यात आले. सोन्यासारख्या मौल्यवान सोनोपंतांच्या आयुष्याचे सोने झाले.

या दोन सुवर्णतुला करून कमाल सुवर्णदान करून महाराजांनी स्वराज्यासाठी दैवीशक्ती उभी केली आणि मिर्झाराजांवर जणू मातच केली.

पुण्याला येता मिर्झाराजे आणि दिलेरखान यांच्यात मतभेद निर्माण झाले. दिलेरखानाच्या मते शिवाजीची सर्व शक्ती त्याच्या डोंगरी किल्ल्यात आहे. त्याच्या प्रत्येक किल्ल्यावर शिबंदी आहे. प्रत्येक किल्ला हे त्याचे बीळ आहे. हे डोंगरी किल्ले घेतले की शिवाजीची शक्ती नष्ट होवून तो शरण येईल. तर

मिर्झाराजे जाणून होते की शिवाजीचे डोंगरी गड घेणे वाटते तितके सोपे नाही. तसेच घेतलेले गड राखणेही सोपे नाही. आपण शिवाजीचे एक एक गड घेत बसलो तर पैशाची नासाडी होईल आणि कालोपव्यय होईल. या धोरणाने शिवाजीस जिंकण्यास शेकडो वर्षे लागतील. त्यापेक्षा शिवाजीचे त्याच्या रयतेवर नितांत प्रेम आहे. त्याचे राज्य हे रयतेचे राज्य आहे असे तो मानतो. तेव्हा त्याच्या रयतेला हैराण केले, रयतेचे हाल केले तर शिवाजी शरण येईल.

दिलेरखान आपला हट्ट सोडायला तयार नव्हता. शेवटी मिर्झाराजांनी दिलेरखानाला डोंगरी किल्ले घेण्याची अनुमती दिली. पहिला गड पुरंदर घेण्याचे दिलेरखानाने ठरविले. मिर्झाराजांनी आपल्या धोरणाप्रमाणे फौजेस बारा मावळात आणि कऱ्हे पठारावर हल्ले करण्यास सांगितले. त्यांच्या फौजेने कऱ्हे पठार उजाड करून टाकले. रयतेचे हाल करायचे हा एकच हेतू होता. शेतावरची उभी पिके जाळण्यात आली. जनावरे लुटून नेली. आई-बहिणींच्या अब्रूचा भरवसा राहिला नाही. शिवाजीच्या रयतेचे हाल करून शिवाजीस जेरीस आणण्याचे मिर्झाराजांचे धोरण होते.

दिलेरखानाने पुरंदर आणि शेजारचा वज्रगड यांना वेढा दिला होता. पुरंदर तसा मजबूत गड होता. त्यावर किल्लेदारही गडाच्या तोलामोलाचा होता. मुरारबाजी देशपांडे हा शूर किल्लेदार पुरंदरवर होता. मुरारबाजी पूर्वी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांकडे होता. महाराजांनी जावळीवर हल्ला केला तेव्हा मुरारबाजी दोन हातात दोन तलवारी घेवून मोऱ्यांच्या बाजूने लढत होता. राजांनी मुरारबाजीस कौल दिला आणि बाजी स्वराज्यात आले. तेव्हापासून बाजी पुरंदरवर किल्लेदार होते. त्यामुळे राजांना पुरंदराची काळजी नव्हती. परंतु पुरंदरची एक गोम होती. पुरंदरच्या शेजारी असलेला वज्रगड पडला तर पुरंदर जिंकणे शत्रूला सहज शक्य होत असे. वज्रगड हा पुरंदरच्या अर्ध्या उंचीपर्यंत होता. त्यामुळे वज्रगडावरून पुरंदरवर तोफांचा मारा करता येत असे. इतके कमी अंतर या दोन गडात होते. तसेच वज्रगड आकाराने लहान असल्याने त्यावर संरक्षणासाठी भरपूर फौज ठेवता येत नसे. मोजकीच शिबंदी वज्रगडावर असे.

दिलेरखानने पुरंदरला आणि शेजारच्या वज्रगडाला बळकट वेढा घातला होता. तरी पुरंदरहून मावळे खाली उतरत. रात्रीच्या वेळी दिलेरखानाच्या फौजेवर छापा टाकून अंधारात यथेच्छ कापाकापी करीत. दिलेरखानाची फौज सावध होवून तयार झाली की मराठे आले तसे गडावर निघून जात. एकदा महाराजांनी गडावर खूपशी कुमक पाठविली. ती गडावर पोहोचली. दिलेरखानला ही बातमी कळताच त्याला नवल वाटले. पण ही कुमक पाहोचलीच कशी? याची त्याला

शंका आली. त्याला आपलेच सरदार शिवाजीला फितूर झाल्याची शंका आली. कारण दाऊदखान कुरेशी हा पुरंदरच्या पिछाडीला मोर्चे लावून होता आणि तेथून पुरंदरवर जाण्यासाठी केदार दरवाजा आहे. याच केदार दरवाज्यातून ही कुमक पोहोचली होती. त्यामुळे दिलेरला दाऊदच फितूर झाल्याची खात्री झाली. त्या दोघात वाद विकोपाला गेला.

पुरंदर घेणे ही दिलेरखानाची नैतिक जबाबदारी होती. त्याला त्याचे कर्तृत्व सिद्ध करून मिर्झाराजांना दाखवावे लागणार होते. त्याची पुरंदरसाठी धडपड चालली होती. गडाभोवती रजपूत, मोगल, पठाण, बुंदोले सैनिकाचा बळकट वेढा होता. खालून गडावर मारा होत होता. मराठे सैनिकही प्रखर प्रतिकार करीत होते. तोफा, बंदुका आणि मोठमोठे धोंडे यांच्या सहाय्याने गडावरून मारा केला जात होता. दिलेरखानाकडे तीन जबरदस्त तोफा होत्या. अबदुल्लाखान, माहेली आणि फत्ते लष्कर या तीन प्रचंड तोफा असून त्यांचा मारा गडापर्यंत पोहोचत नव्हता. या तीन तोफा वज्रगडावर चढविण्याचा आटोकाट प्रयत्न मोगल करीत होते. पण वरून होणाऱ्या अचूक माऱ्यापुढे दिलेरला यश येत नव्हते. शेवटी रात्रीच्या अंधारात मनुष्यबळावर दिलेरला तोफा वज्रगडावर चढविण्यात यश आले. वज्रगड तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यात आला आणि दिलेरला हायसे वाटले. त्याने वज्रगडावर अखंड मारा सुरू केला. वज्रगडाला खिंडार पडले. वज्रगड तरीही लढत होता. मराठ्यांची हानी होत होती. पुरंदरवरून मुरारबाजी वज्रगड हातचा जाताना पाहत होता आणि १४ एप्रिल १६६५ ला वज्रगड पडला.

वज्रगड पडला तसा दिलेरखानाच्या जिवात जीव आला. कारण वज्रगडावरून तोफा-बंदुकांनी पुरंदरच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करता येत होता. आता त्याला पुरंदर दोन दिवसात घेता येणार होता. त्याही परिस्थितीत मराठे गडावरून खाली उतरून मोगली वेढ्यावर गुप्त हल्ले करीत होते. दिलेरला इतके प्रयत्न करूनही पुरंदरची माची सर करता येत नव्हती. शेवटचा प्रयत्न म्हणून त्याने डोंगरावर दमदमे बांधून त्यावर तोफा चढवून मारा सुरू केला. हा प्रकार यशस्वी होत असतानाच मराठ्यांनी मोगलांची एक तोफ हल्ला करून निकामी केली. या चकमकीत मोगल सरदार भूपतसिंह मारला गेला. दिलेरने सुरुंग लावून सफेद बुरुज उडवून देण्याचा प्रयत्न केला. त्यात मराठ्यांच्या दारुगोळ्याचा स्फोट होवून त्यात शेकडो मराठे मृत्यूमुखी पडले. तरी उरलेले मराठे प्रतिकार करीतच होते. पण पुरंदरची माची मोगलांच्या ताब्यात गेली आणि मराठ्यांना काळा बुरुजही सोडावा लागला.

पुरंदरवर ताबा मिळवण्यासाठी दिलेरखान आसुसला होता. दोन महिने पुरंदरला वेढा घालून प्रचंड दारुगोळा खर्च करूनही गड पूर्ण ताब्यात येत नव्हता. प्रथम शिवाजीचे किल्ले ताब्यात घेण्याची कल्पना दिलेरखानाची होती. एक किल्ला सर करण्यास दोन महिने पुरत नव्हते. अशाने शिवाजीचे सगळे गड घेण्यास किती काळ लागणार होता. मिर्झाराजांचे म्हणणे योग्य होते, असे आता दिलेरला पटत होते.

त्यात शिवाजीचा मुलूख उद्ध्वस्त करून त्याच्या प्रजेचे हाल करण्यात मिर्झाराजे यशस्वी होत होते. मिर्झा राजांनी शिवाजीच्या मुलुखात लुटालूट करण्यासाठी दाऊदखानास सोडले होते. दाऊदखान आपल्या ४०० फौजेसह रोहिड खोरे, हिरडस मावळ आणि वेलखंड खोरे येथे धुमाकूळ घालीत होता. अचलसिंह आणि रामसिंह यांनी गुंजण मावळ, पौड खोरे, खेड शिवापूरपर्यंत विध्वंस केला होता. लोहगड, तुंग, तिकोना आणि विसापूर या गडांच्या भोवतीचा प्रदेश मोगली फौजांनी जाळून टाकला होता. उभी पिके बेचिराख करून गुरेढोरे चोरून नेली होती.

२८ मे १६६५ चा दिवस उगवला आणि पुरंदरवर अघटित घडले. पुरंदरचा प्रमुख दरवाजा सताड उघडला गेला आणि त्यातून सातशे वीर घेवून मुरारबाजी बहिर माचीवर आले. त्यांनी दिलेरच्या ५००० फौजेवर कडाडून हल्ला केला. मुरारबाजी पुन्हा दोन हातात दोन तलवारी घेवून दिलेरखानाशी लढत होते. दिलेरखानाला बाजींकडे पाहून आश्चर्य वाटले. त्यांनी मुरारबाजींना कौल दिला. मुरारबाजींना मनसबदारी देण्याचे आमिष दाखवले. पण मुरारबाजींनी बेईमानी करण्याचे साफ नाकारले. इतक्यात घात झाला आणि बाणाच्या माराने मुरारबाजी पडले.

मुरारबाजी पडले तरी गड पडला नाही. मराठे माघार घ्यायला तयार नव्हते. महाराजांना मुरारबाजी पडल्याचे समजले. त्यांना तीव्र दु:ख झाले. मुरारबाजी म्हणजे साधीसुधी असामी नव्हती. पुरंदरच्या तटबंदीपेक्षा बळकट छातीचे मुरारबाजी म्हणजे महाराजांचा जीव होता. मुरारबाजी गेल्याने पुरंदर लढवत ठेवणे फायद्याचे नव्हते. लष्करीदृष्ट्या ते योग्यही नव्हते. फार थोडी शिबंदी गडावर होती, तिला वाचवणे गरजेचे होते. त्याचप्रमाणे मिर्झाराजांच्या लुटालुटीमुळे आणि जाळपोळीमुळे बारा मावळचा सुपीक प्रदेश ओसाड पडला होता, रयत गाव सोडून जात होती. त्यामुळे महाराज चिंताक्रांत होते. महाराजांनी सूज्ञपणे जयसिंहाशी तह करण्याचा विचार केला. महाराजांनी मुत्सद्यांशी सल्लामसलत करून आपला वकील मिर्झाराजांकडे पाठवला. थोडा फार मुलूख

आणि खंडणी देवून मिर्झाराजांशी तह करण्याचा महाराजांचा विचार होता. परंतु मिर्झाराजे पक्के मुत्सद्दी होते. त्यांनी महाराजांना स्पष्ट कळविले की बिनशर्त शरणागती पत्करली तरच तहाची बोलणी संभवतात. अन्यथा पुरंदर ताब्यात येतोच आहे. आपली मोहीम चालूच राहणार आहे. महाराजांपुढे बिनशर्त शरणागतीशिवाय मार्गच उरला नव्हता. रयत आणि फौज दोन्ही वाचवणे गरजेचे होते. महाराजांनी शरण जाण्याचे ठरवले.

मिर्झाराजांनी आणि दिलेरखानाने महाराजांस चांगलेच पकडीत पकडले होते. दिलेरला जेव्हा कळले की मिर्झाराजे आणि शिवाजी यांचा तह होण्याची शक्यता आहे तेव्हा त्याने पुरंदर घेण्यासाठी जोर लावला. कारण त्याला तह होण्यापूर्वी पुरंदर जिंकून श्रेय घ्यायचे होते. पुरंदर जिंकण्याआधी मिर्झाराजांनी तह केला तर त्याची आजवरची सर्व मेहनत फुकट जाणार होती. ११ जून १६६५ रोजी महाराजांनी मिर्झाराजांच्या छावणीत जावून त्यांची भेट घेतली. महाराजांनी मिर्झाराजांना विनंती केली की त्यांनी पुरंदरवरचा हल्ला त्वरीत थांबवावा, मी पुरंदरची सोडचिठ्ठी देतो. परंतु मिर्झाराजे मानायला तयार नव्हते. त्यांना पुरंदरबरोबर अन्य किल्लेही हवे होते. त्यासाठी वाटाघाटी चालू होत्या.

शेवटी १३ जून १६६५ रोजी पुरंदरच्या पायथ्याशी हा पुरंदरचा तह शिवाजी महाराज आणि औरंगजेबाच्या तर्फे मिर्झाराजे जयसिंह यांच्यात झाला. या तहात खालीलप्रमाणे पाच कलमे होती.

१) शिवाजीने आपल्या ताब्यातील पुरंदर, रुद्रमाळ (वज्रगड), माणगड, अंकोला, सोनगड, कोंढाणा, लोहगड, खंडागळा, रोहिडा, नरदुर्ग, माहुली, तुंग, तिकोना, साकरगड, मरकगड, स्वरूपगड, माणिकगड, मोरबखत, बक्षगड, पळसरवाल, बंडारदुर्ग, खपगड, इसागड असे तेवीस किल्ले व त्याखालचा साधारणतः सोळा लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मोगलांना द्यावा.

२) शिवाजीने फक्त बारा किल्ले आणि चार लक्ष उत्पन्नाचा प्रदेश आपल्याकडे ठेवावा.

३) शिवाजीने दक्षिणेच्या मोगली सुभेदाराच्या आज्ञेत वर्तावे.

४) शिवाजीचा मुलगा संभाजी यास मोगलांकडून पाच हजार स्वारांची मनसब देण्यात येईल. संभाजीराजे सज्ञान होईपर्यंत नेतोजी पालकर याने जहागिरीचा कारभार सांभाळावा.

५) शिवाजी यापुढे जो आदिलशाही मुलूख घेईल त्यास मोगलांची मान्यता असेल, परंतु त्यासाठी शिवाजीने औरंगजेबास दरवर्षी ३ लक्ष रुपये याप्रमाणे ४० लक्ष रुपये खंडणी हप्त्याने द्यावी.

या तहाने महाराजांचे स्वराज्य एक चतुर्थांश इतकेच राहिले. या संकुचित राज्यात स्वराज्याच्या फौजेचा खर्चही भागणार नव्हता. संभाजीराजांना मनसब मिळाल्याने ते आता मोगली चाकर झाले होते. या तहाचा फायदा इतकाच झाला की महाराजांना स्वत:ला मोगलांच्या चाकरीत जावे लागले नाही. महाराजांनी धूर्तपणे स्वत:ची सुटका करून घेतलेली दिसते.

पुरंदरच्या तहाकडे मोगलांच्या दृष्टीने पाहिल्यास त्यास मिर्झाराजांच्या चातुर्याचा, मुत्सद्दीपणाचा, औरंगजेबाशी त्यांच्या असलेल्या स्वामीनिष्ठेचा भाग दिसतो. आजवर शिवाजी महाराजांनी शत्रूला नमवले होते. अफझलखानासारख्या बलाढ्य सेनानीचा वध केला होता. शाहिस्तेखानाची बोटे कापून त्यास परत पाठवले होते. महाराजांपुढे आजवर एकही शत्रू उभा राहू शकला नव्हता. परंतु मिर्झाराजांनी शिवाजी महाराजांना शरण येण्यास भाग पाडले होते. वरवर पाहता पुरंदरच्या तहाचा असाच अर्थ लावला जातो. या तहाने स्वराज्य एका दमात फक्त पावपट उरले. स्वराज्याचे बळ कमी झाले.

वास्तविक पाहता हा तह म्हणजे महाराजांच्या मुत्सद्दीपणाचा कळस होय. मिर्झाराजांची स्वारी हे स्वराज्यावर आलेले मोठे संकट होते. मिर्झाराजांसारखा अनुभवी रजपूत मुत्सद्दी प्रचंड फौज, अगणित संपत्ती आणि सर्वाधिकार घेवून इवल्याशा स्वराज्यावर चालून येतो. ज्यांना अपयश माहीत नाही असा ज्यांचा लौकिक ते मिर्झाराजे समोर आलेले. त्यात दिलेरखान, दाऊदखान यांसारखे कडवे पठाण त्यांच्या सोबतीला असतानाही, महाराजांनी जे धैर्य दाखवले त्याला तोड नाही. स्वत:च्या कर्तृत्वावर असलेला महाराजांचा दुर्दम्य विश्वास आणि ध्येयावरची निष्ठा यामुळेच हे शक्य झाले.

महाराजांनी तहात २३ गड आणि त्या खालचा १२ लाखांचा प्रदेश मोगलांना दिला. पण हे गड आणि प्रदेश म्हणजे काही रोख रक्कम नव्हे की जी मोगल उत्तरेत घेवून जातील. हे गड आणि प्रदेश इथेच राहणार आहेत, ते कधीही पुन्हा घेता येतील हा राजांना विश्वास होता. स्वराज्यासाठी भविष्यात २३० गड घ्यावे लागणार असतील तर त्यात हे तेवीस गड अधिक एवढाच त्याचा अर्थ होता. चाळीस लक्षाची जी खंडणी मान्य केली ती हप्त्याने असल्याने पूर्ण देण्याची गरज नव्हती. मिर्झाराजे उत्तरेत परतले की तह मोडता येणार होता. या तेवीस गडाच्या रक्षणासाठी आणि प्रदेशाच्या रक्षणासाठी मिर्झाराजांची कमीत कमी पंचवीस हजार फौज अडकून पडणार होती. त्याचबरोबर या तेवीस गडावर असलेली मराठी फौज मोकळी होणार होती. संभाजीराजांना मनसब

मिळाल्यामुळे स्वराज्याची पाच हजार फौज मोगली खर्चाने पोसली जाणार होती. स्वराज्य एक चतुर्थांश राहिल्यामुळे फौजेचा खर्च परवडण्यासारखा नव्हता. त्यामुळे संभाजीराजांच्या नव्या जहागिरीवर फौजेचा खर्च निघणार होता. संभाजीराजांना ८ वर्षे वयात मनसबदारीचा अनुभव मिळणार होता. त्यांना नव्या मोगली प्रदेशाची ओळख होणार होती. आणि सर्वात मोठा फायदा हा झाला की स्वत: महाराजांना मोगलांच्या चाकरीत जावे लागले नाही. मोठ्या हुशारीने महाराजांनी मोगली चाकरीतून आपली सुटका करून घेतली. त्यामुळेच पुढील पाच वर्षात मोगलांशी झालेला हा तह मोडला आणि महाराजांनी गेलेले गड किल्ले आणि प्रदेश परत मिळविल्याचे दिसते.

पुरंदरच्या तहात महाराजांनी जी मुत्सद्देगिरी दाखवली त्याला तोड नव्हती. अत्यंत चाणाक्षपणे त्यांनी मिर्झाराजांचे स्वराज्यावरचे संकट निवारण केलेले दिसते. या तहाने महाराजांना फारसे गमवावे लागले नाही. फक्त काही काळ आदिलशाहीविरुद्ध मोहिमेत मिर्झाराजांना कुमक करावी लागली.

शिवाजीला नमविल्यानंतर मिर्झाराजांनी आदिलशाहीकडे आपला मोर्चा वळवला. दक्षिणेकडील शिवाजी आणि आदिलशाही, कुतूबशाही बुडवणे त्यांचे लक्ष्य होतेच. आदिलशाहीवर चालून जाताना मिर्झाराजांनी मराठ्यांची मदत घेण्याचे ठरविले. मराठ्यांचा सेनापती नेतोजी पालकर आपल्या फौजेसह मोगलांस मदत करीत होता. डिसेंबर २४ ला मोगल आणि मराठे यांनी विजापूरवर चढाई केली. या लढाईत मोगलांकडून स्वत: शिवाजी महाराज, नेतोजी आणि मोगली फौज लढत होती तर विजापूरकडून शिवाजीचा भाऊ एकोजीराजे आणि आदिलशाही फौज होती. विजापुरी फौजेपुढे मोगली फौज तग धरू शकली नाही. मोगलांचा पराभव झाला. दिलेरखानाने या पराभवाचे खापर शिवाजीवर फोडले. 'शिवाजी प्रती-शिवाजी नेतोजी आणि मराठे मनापासून आदिलशाहीविरुद्ध लढलेच नाहीत. शिवाजी आतून आदिलशाहीला सामील आहे,' असा दिलेरखानाने आरोप केला. वास्तविक परिस्थिती तशी नव्हती. अर्थात मिर्झाराजांना दिलेरचे म्हणणे पटले नाही. परंतु त्यांना दिलेरकडे पूर्ण दुर्लक्ष करणेही शक्य झाले नाही. त्यात दिलेरखान महाराजांच्या जिवावर उठला होता. तो मिर्झाराजांना सांगत होता की त्यांनी शिवाजीला कायमचे संपवून टाकावे.

मिर्झाराजे स्वच्छ मनाचे मुत्सद्दी होते. त्यांना शिवाजीच्या जीविताची काळजी वाटू लागली. त्यांनी शिवाजी महाराजांना पन्हाळा घेण्याची स्वतंत्र मोहीम सांगितली. १६ जाने. १६६६ रोजी रात्री महाराज फौज घेवून पन्हाळ्याजवळ

पोहोचले. नेतोजी पालकर फौजेसह येऊन मिळणार होता. परंतु तो वेळेवर आला नाही. पहाटे महाराजांनी आपल्या फौजेसह पन्हाळ्यावर हल्ला केला. पण तो हल्ला फसला. पन्हाळ्यावर पहारा जागता होता. या लढाईत महाराजांना १००० मराठे गमवावे लागले. महाराज पन्हाळ्यावर पराभूत झाले. महाराज नेतोजीवर खूप संतापले. त्यांनी नेतोजीस खडसावून विचारले 'समयासी का पावला नाहीत?' आणि महाराजांनी नेतोजीस बडतर्फ केले. नेतोजी पालकर महाराजांना सोडून आदिलशाहीकडे गेला. त्याचवेळी कुतूबशाहीने ५०००० फौज आदिलशाहीच्या मदतीस पाठविली होती.

आदिलशाही, कुतूबशाही आणि नेतोजी पालकर एकत्र आल्याने मोगलांना भय वाटणे सहाजिकच होते. हे तिघे एकत्र येण्यामागे काहीतरी जबरदस्त राजकारण आहे, असा दिलेरखानाला संशय आला. शिवाजीला पन्हाळ्यावर झालेले अपयश आणि नेतोजीचे आदिलशाहीच्या आश्रयास जाणे यात एकसूत्रता आहे. आणि मिर्झाराजे दुर्लक्ष करीत आहेत, असा दिलेरला संशय होता.

प्राप्त परिस्थितीत मिर्झाराजांनी शिवाजीला आग्र्याला औरंगजेबाच्या दर्शनास पाठविण्याची कल्पना काढली. त्यांनीच औरंगजेबाला पत्रे पाठवून शिवाजीचे आग्र्यास येणे किती गरजेचे आहे हे पटविण्याचा प्रयत्न केला. त्याने बादशहास स्पष्ट सांगितले ही वेळ शिवाजीस मानसन्मान देवून खूश ठेवण्याची आहे. दक्षिणेत आदिलशाही, कुतूबशाही आणि नेतोजी एक झाले आहेत. शिवाजीही त्यांना जावून मिळाला तर निभाव लागणे कठीण आहे. तेव्हा शिवाजीस उत्तरेस बोलावून घ्यावे. २२ जानेवारी १६६६ रोजी शहाजहान बादशहा आग्र्याच्या किल्ल्यात पैगंबरवासी झाला. राज्याचा सर्व कारभार जरी औरंगजेब पाहात असला तरी कैदेत असलेला शहाजहान बादशहा जिवंत असेपर्यंत औरंगजेब बादशहा होवू शकत नव्हता. आता शहाजहानच्या मृत्यूमुळे औरंगजेबाचा मार्ग मोकळा झाला होता. त्यात १२ मे १६६६ रोजी औरंगजेबाचा वाढदिवस होता. त्यादिवशी आग्र्यात राज्यारोहण करण्याचे औरंगजेबाने ठरविले होते. शिवाजीस या कार्यक्रमासाठी पाठवून द्यावे असे औरंगजेबाने मिर्झाराजांस कळवले. त्याचबरोबर शिवाजीच्या वाटखर्चासाठी एक लक्ष रुपये दक्षिणेच्या खजिन्यातून देण्यासही सांगितले.

आता शिवाजीला आग्र्याला जाण्यासाठी तयार करण्याची फार मोठी जबाबदारी मिर्झाराजांवर होती. त्यांनी शिवाजीचे मन वळविण्याचा प्रयत्न सुरू केला. जयसिंहाने शिवाजीस अनेक प्रलोभने दाखवली. भविष्यासाठी कित्येक फायदे समोर ठेवले. ही भेट झाली तर शिवाजीस द्रव्यलाभ, मानसन्मान, मोठी

मनसबदारी आणि नशिबाने साथ दिली तर दक्षिणेची सुभेदारीही मिळू शकते असे उत्कर्ष पावणारे भविष्य उभे केले गेले. त्याशिवाय ताबडतोबीचा फायदा म्हणजे दिलेरखानाच्या कारस्थानातून सुटका. तसेच औरंगजेबाची शिवाजीवर मर्जी बसली तर दिलेरखान काही करू शकणार नव्हता. महाराजांनीही एक संधी साधायचे ठरविले. परंतु महाराज पूर्ण सावध होते. त्यांचा औरंगजेबावर विश्वास नव्हता. त्यांनी आपल्या जिवाची हमी मिर्झाराजे आणि त्यांचा छावणीतील पुत्र किरणसिंह यांचेकडून घेतली. तसेच या हमीबद्दल आग्र्यात रामसिंह या मिर्झाराजांच्या दुसऱ्या पुत्रास कळविले. रजपूत हे शब्दाचे पक्के असतात. तसेच मिर्झाराजांना राजस्थानात आणि मेवाडात सर्व रजपूत राजे मानीत असत. त्यामुळे मिर्झाराजांनी दिलेला शब्द औरंगजेब मोडू शकत नव्हता. दिल्लीचे तख्त बुडविण्याची या रजपूतांची ताकद होती.

महाराजांनी आग्र्याला जाताना औरंगजेबाच्या शब्दावर विश्वास ठेवला नव्हता, तर मिर्झाराजांच्या शब्दावर आणि जिवाच्या हमीवर विश्वास ठेवला होता. महाराज नेहमी सावध असत. इकडे स्वराज्याची व्यवस्था लावताना मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस आणि निळो सोनदेव या तिघांवर जबाबदारी टाकून त्यांनी मातोश्री जिजाबाईंच्या सल्ल्याप्रमाणे वागावे असे सांगितले. सर्व सरदारांस व कारकुनास मातोश्रींना आणि स्वराज्यास जपण्यास सांगितले. त्यांनी गडकोट जतन करावे, संपादलेल्या राज्यात जमल्यास भर घालावी. आग्र्याहून आमची बातमी काढत राहावी अशा अनेक आज्ञा दिल्या.

औरंगजेबाचा ५८ वा वाढदिवस आणि राज्यारोहण समारंभ १२ मे १६६६ रोजी होता. त्याच्या आधी महाराजांना आग्र्याला पोहोचणे भाग होते. आग्र्याचे नाव तेव्हा 'मुस्तकिरुल खिलाफत अकबराबाद' असे लांबलचक होते. आग्र्याला जाण्यासाठी महाराज सोमवार दिनांक ५ मार्च रोजी निघाले. महाराजांनी सोबत त्रिंबकपंत डबीर, तिराजी रावजी, हिरोजी फर्जंद, माणकोजी हरी, बाजी जेधे, दावलजी घाटगे, दत्ताजी त्रंबक, कवी परमानंद, निळकंठराव पारसनीस, येसाजी कंक, राघो मित्र मुदगलभट आर्वीकर, नारायण रामचंद्र आणि बहिर्जी नाईक व जिवा महाला असे अनेक हरहुन्नरी व वीर धारकरी घेतले होते. रघुनाथपंत कोरडे हे वकील असल्याने पुढे गेले होते. सभासद बखरीत बाळाजी आवजी चिटणीस आणि नरहर बल्हाळ ही दोन नावे आणखी मिळतात. काही बखरीत प्रतापराव गुजर सोबत नेल्याचे उल्लेख आहेत.

महाराजांनी सोबत जी फौज नेली तिचे आकडे ३०० ते २००० पर्यंत सापडतात. त्यात अडीचशे पायदळ होते. हत्ती, उंट, बैल, पाणके, वंजारी, पखाली,

बाजारबुणगे असे अनेकजण होते. अर्थात महाराजांनी सोबत घेतलेले वंजारी, पाणके हे सर्व निवडक धारकरी वीर होते. ही माणसे साधी नव्हती. बहिर्जीने आपली माणसे मार्गात पेरली होतीच. महाराजांनी सोबत हिरोजी फर्जंद यास घेतले होते. त्यातही महाराजांचा खास हेतू होता. हिरोजी हे शहाजीराजांचे दासीपुत्र असल्याने ते महाराजांसारखे दिसत असत. वेळ पडली तर आपल्यासारखे दिसणारे कोणीतरी सोबत असावे हा महाराजांचा हेतू होता. यावरून महाराज किती सावध होते हे लक्षात येईल.

महाराजांनी सोबत ९ वर्षांचे युवराज संभाजीराजे यांना घेतले होते. युवराजांना नव्या मुलुखाची ओळख व्हावी हा त्यामागे हेतू होता. मार्गात ज्या ज्या ठिकाणी महाराज मुक्काम करणार होते. त्या त्या ठिकाणच्या सुभेदारास औरंगजेबाच्या आज्ञा होत्या की शिवाजीला शहाजाद्याप्रमाणे वागवावे, त्यात कसूर करू नये. अशा आज्ञा असतानाही औरंगाबादचा अधिकारी सफकिशन खान हा राजांना सामोरा आला नाही. तो आपल्या गुर्मीत शहरात बसून राहिला. त्याला वाटले की शिवाजी येवून मला भेटेल. पण राजांनी ही भेट रद्द केली आणि ते पुढील मुक्कामी गेले. मग सफशिकन खानाची  धावाधाव झाली. औरंगजेबाला हे कळले असते तर त्याची खैर नव्हती. त्याने स्वत: येऊन महाराजांची भेट घेतली. त्यांना नजराणे दिले. बहुमान व पोशाख दिला.

११ मे १६६६ रोजी दुपारी महाराज आग्र्याला पोहोचले. आग्र्याच्या आधी तीन कोसांवर महाराज थांबले. त्यांचे स्वागत करण्याची जबाबदारी मिर्झाराजांचा पुत्र रामसिंह याच्यावर होती. परंतु रामसिंह औरंगजेबाच्या आज्ञेने दुसऱ्या कामगिरीत व्यस्त होता. त्याने महाराजांच्या स्वागतासाठी आपला कारकून मुन्शी गिरधरलाल यांस पाठवले. यात रामसिंहाची काहीच चूक नव्हती. असलीच तर परिस्थितीजन्य चूक होती. परंतु एका स्वतंत्र राजाच्या स्वागतास साधा कारकून येणे यात महाराजांचा नकळत अपमान होत होता.

महाराजांचा आग्र्यात आलेला लवाजमा पाहण्यासाठी आलेले अनेक नागरिक दुतर्फा उभे राहून महाराजांचे दर्शन घेत होते. या मिरवणुकीचे स्वत: गिरधरलाल मुन्शी याने आणि परकालदास याने सुंदर रितीने वर्णन केले आहे. परकालदास म्हणतात, ‘महाराजांचा लवाजमा लहानच पण वैभवशाली आहे. समोरच निशाणाचा हत्ती आहे. त्यावर ध्वज फडकत असतो. नंतर कोतवाल घोडा त्याला सोन्या रुप्याचा साज चढविला आहे. त्यानंतर दक्षिणी पायदळ मोठ्या थाटात चालात असते. पथकाच्या मागे हौदा अंबारी घातलेल्या दोन हत्तिणी आहेत. एक सुखपाल (पालखीचा प्रकार) लवाजम्यात आहे. त्याचे

दांडे चांदीने मढवलेले आहेत. शिवाजीची पालखी सगळी चांदीने मढवलेली आहे. पण पालखीचे पाय आणि खुंट्या सोन्याने मढवलेल्या आहेत.'

महाराज महाराष्ट्रातून निघण्यापूर्वी मिर्झाराजांनी महाराजांना शाही रितीरिवाजासंबंधी अवगत केले होते. महाराजांचे स्वागत आग्र्यात कसे केले जाईल याबद्दल सांगताना मिर्झाराजे म्हणाले होते की 'आग्र्यापासून एक मजलीवर असताना बादशहाचा खास प्रतिनिधी वस्त्रे अलंकार घेवून स्वागताला येईल. तेथे बादशहातर्फे मुक्कामाची चांगली व्यवस्था केली जाईल. कार्यक्रमाच्या दिवशी पाहुण्याला मोठ्या रस्त्याने मिरवत बादशहाच्या भेटीसाठी आणले जाईल व बादशहाची भेट करून दिली जाईल.' पण मिर्झाराजांनी तपशीलवार दिलेल्यापैकी काहीच घडले नाही. राजांच्या मुक्कामाची व्यवस्था मुलुकचंदाची सराई (धर्मशाळा) येथे करण्यात आली. राजांना त्यांच्या अपमानाची जाणीव झाली.

दुसऱ्या दिवशी १२ मे ची तारीख होती. औरंगजेबाचा ५० वा वाढदिवस होता. त्यानिमित्ताने मोठा दरबार भरणार होता. या कार्यक्रमासाठी महाराजांना किल्ल्यावर आणण्याची जबाबदारी रामसिंह आणि मुखलिसखान यांच्यावर सोपविली होती. परंतु त्याच दिवशी रामसिंहाला शाही महालावर पहारे करण्याचे काम लागल्याने तो महाराजांना आणण्यास जावू शकला नाही. त्याने पुन्हा गिरधरलाल मुन्शी याला पाठवून महाराजांना दरबारात आणण्यास सांगितले. रामसिंह किंवा त्या तोडीचा कोणी सरदार येवू न शकल्याने पुन्हा महाराजांचा अपमान झाला. औरंगजेब आणि त्याचे प्रशासन बुद्धीपुरस्सर असे वागत असावे. परंतु महाराजांनी ज्या कार्यक्रमासाठी इतक्या लांब आलो ते ध्यानी घेऊन अपमान गिळून ते गिरधरलाल बरोबर कार्यक्रमास जाण्यासाठी निघाले. त्याचवेळी रामसिंह कामातून मोकळा झाला व तो महाराजांना भेटण्यासाठी निघाला. परंतु त्यांची चुकामूक झाली. महाराज एका रस्त्याने गिरधरलाल बरोबर जात होते आणि रामसिंह अन्य मार्गाने राजांना नेण्यासाठी येत होता. अखेर निरोपानिरोपी होऊन दोन्ही व्यक्ती एकमेकांस भेटल्या. दोघेही एकमेकांना प्रथमच पाहात होते. त्यांची ओळख करून देण्यात आली. त्यात काही काळ गेला. त्यानंतर रामसिंह महाराजांना घेऊन आग्र्यातील लाल किल्ल्यात पोहोचला. तेव्हा दिवाण-ए-आम मधील मुख्य कार्यक्रम संपला होता आणि औरंगजेब निवडक महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी घेण्यासाठी घुसळखान्यात दाखल झाला होता. घुसळखाना म्हणजे बादशहाचे मंत्रालय.

रामसिंहाने शिवाजी महाराज आणि युवराज संभाजीराजे यांना औरंगजेबाच्या

भेटीसाठी घुसळखान्यात नेले. दरबारी रितीप्रमाणे महाराजांना आणि युवराजांना बादशहापुढे नेण्यात आले. दोघांनी वेगवेगळे नजराणे बादशहास अर्पण केले, तसेच मराठी पद्धतीने मुजरे केले. परंतु औरंगजेबाने त्यांच्या अस्तित्वाची दखलही घेतली नाही. राजांना कनिष्ठ दर्जाच्या मनसबदारांच्या बरोबर उभे करण्यात आले. वास्तविक महाराज स्वतंत्र राजे होते. मोगली मनसबदार नव्हते. हाही महाराजांचा अपमानच होता. एकापाठोपाठ एक अपमान सहन करणाऱ्या महाराजांचा राग अनावर झाला. रागाने महाराज सोबतच्या रामसिंहास म्हणाले, 'असा अपमान करण्यासाठी बादशहाने आम्हाला इतक्या दूर बोलावले आहे काय? ज्या दरबारात आम्हाला पाठ दाखविणाऱ्या जसवंतसिंहाचा सन्मान होतो आणि आमचा अपमान होतो त्या दरबारात आम्हाला क्षणभरही थांबता येणार नाही.' महाराजांचे डोळे रागाने लाल झाले होते. त्यातून जणू अंगार फुलत होते.

नेहमी शांतता पाळली जाणाऱ्या दरबारात महाराजांचा आवाज चढला होता. औरंगजेबाने रामसिंहाला महाराजांची समजूत घालण्यास सांगितले. पण महाराज तेथे क्षणभरही थांबले नाहीत. सरळ दरबाराकडे पाठ फिरवून तडक घुसळखान्याच्या बाहेर पडले. रामसिंह महाराजांच्या मागे मागे धावत होता आणि महाराज तरातरा मुक्कामाकडे जात होते. बिचारा रामसिंह राजांना मनवित होता. त्यांना पुन्हा दरबारात नेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत होता. पण महाराज त्याचे काहीएक ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हते.

बादशहा औरंगजेबावर शिवाजीला जिवे मारण्यासाठी कौटुंबिक दबाव होता. वजीर जाफरखान हा औरंगजेबाच्या मावशीचा नवरा होता. जाफरखानाची पत्नी ही शाहिस्तेखानाची बहीण होती. शाहिस्तेखानाची बोटे शिवाजीने कापल्यामुळे ती अत्यंत घाबरली होती. तिने असे ऐकले होते की शिवाजी अदृश्य होतो. तो भिंतीतून आरपार जावू शकतो. शिवाजीला चेटूक करता येते. त्यामुळे तिने जाफरखानास सांगितले होते की शिवाजीशी संबंध ठेवू नका. शक्यतो त्याला ताबडतोब मारून टाका. या अशा दबावाला बळी पडून औरंगजेबानेही आपल्या शयनगृहावर पहारा वाढवला होता.

औरंगजेबाने तात्काळ महाराजांच्या निवासस्थानावर फुलादखानाच्या पाच हजार फौजेचा पहारा ठेवला. महाराजांच्या जिवाची हमी मिर्झाराजांनी घेतली असल्याने त्यांच्या जिवास औरंगजेबाकडून अपाय होवू नये यासाठी रामसिंहाने आपले शंभर कडवे रजपूत महाराजांच्या निवासस्थानाभोवती दिवसरात्र जागते ठेवले होते. त्याच्याबाहेर फुलादखानाच्या फौजेचा पहारा होता. औरंगजेबाच्या

मनात शिवाजीला मारण्याचा विचार होता. परंतु रजपूतांच्या भीतीने तो सध्या काही करीत नव्हता. शिवाजीला अपाय केला तर सारे रजपूत मिर्झाराजांच्या शब्दासाठी बंड करून उठतील ही औरंगजेबास भीती होती.

आता आपण औरंगजेबाच्या तावडीत पुरते फसलो आहोत, यातून आपली सुखासुखी सुटका होणे शक्य नाही, हे महाराजांनी पूर्ण जाणले होते. पण महाराज परिस्थितीपुढे हार मानणारे नव्हता. त्यांचा त्यांच्या बुद्धीवर आणि कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता. महाराजांनी बादशहास कळविले की माझी सुखरूप सुटका झाली तर मी आदिलशाही आणि कुतूबशाही जिंकून देतो. पुन्हा काही दिवसांनी राजांनी औरंगजेबास कळविले की तुम्ही मला सोडलेत तर स्वराज्यात गेल्यावर माझे सर्व गड आणि एक कोट रुपये रोख देतो. त्यावर औरंगजेब केवळ हसला आणि म्हणाला, शिवाजी त्याच्या गडाच्या सोडचिठ्ठ्या येथूनही देवू शकतो. त्यासाठी दक्षिणेत जाण्याची आवश्यकता काय आहे? अर्थात या असल्या युक्त्यांना औरंगजेब बधणार नाही हे महाराज जाणून होते. महाराजांनी औरंगजेबाला आणि औरंगजेबाने महाराजांना पुरते ओळखले होते. महाराज फक्त बादशहाला आणि त्याच्या मुत्सद्यांना गाफील ठेवत होते. औरंगजेब समजत होता की शिवाजी सुटकेसाठी बेचैन आहे. औरंगजेबाला हे माहीत नव्हते की शिवाजी सुटकेसाठी विनवण्या करणारा नाही, तो त्याचा पुरुषार्थ नाही. शिवाजीची सुटका करून घेण्यास शिवाजी सक्षम आहे.

आग्र्यात महाराजांचे तीन शत्रू होते. महाराज कैदेत पुरते अडकलेले पाहून हे तिघेही शत्रू सतत औरंगजेबाला शिवाजीचा खातमा करण्यासाठी दबाव टाकत होते. ते तीन शत्रू म्हणजे जसवंतसिंह, ज्याने सिंहगडाखाली महाराजांकडून सडकून मार खाल्ला होता. दुसरा वजीर जाफरखान, ज्याच्या मेव्हण्याची तीन बोटे कापून टाकली होती. त्यामुळे तो आाणि त्याची पत्नी दोघेही महाराजांच्या विरुद्ध होते. आणि तिसरा शत्रू म्हणजे औरंगजेबाची बहीण जहाँआरा बेगम ही होती. तिला सुरतेचे जकातीचे उत्पन्न खाजगी खर्चासाठी मिळत होते. महाराजांनी जाने. १६६४ मध्ये सुरत लुटल्यामुळे तिचे उत्पन्न घटले होते. त्यामुळे तीपण महाराजांवर चिडली होती. या तिघांचा औरंगजेबावर महाराजांना मारण्यासाठी दबाव होता.

औरंगजेबापुढे शिवाजीसाठी तीन पर्याय होते. एक शिवाजीला तात्काळ ठार करणे. दोन त्यास कैदेत टाकून त्याचे हालहाल करणे म्हणजे कालांतराने तो मरेल आणि तिसरा त्यास न मारता दूर एखाद्या किल्ल्यावर कायमचे ठेवणे. पण शिवाजीला पुन्हा स्वराज्यात जावू द्यायचे नाही हे औरंगजेबाचे ठरले होते.

त्याने दरबारी अधिकाऱ्यांबरोबर सल्लामसलत करून फौलादखानाच्या ताब्यात महाराजांना दिले. त्याचवेळी आग्र्यात रदअंदाजखानाची हवेली तयार होत होती. ती हवेली पूर्ण होताच फुलादखानाने महाराजास रदअंदाजखानाच्या हवेलीत नेवून ठार करावे असे ठरले होते. हा कट जेव्हा मिर्झाराजांचा पुत्र रामसिंह यास कळला, तेव्हा त्याने मिरबक्षी अमीन खान याची भेट घेवून त्यास स्पष्ट सांगितले की मिर्झाराजांनी शिवाजी महाराजांच्या जीविताची हमी घेतली आहे. त्यांनी शिवाजीस तसे वचनच दिले आहे. तेव्हा शिवाजीस मारण्यात आले तर सारे रजपूत राजे मिर्झाराजांच्या शब्दासाठी बंड करून उठतील. तेव्हा काहीही करून आता शिवाजीस वाचवा.

रामसिंहाची ही गोळी बरोबर लागू पडली. औरंगजेबाने शिवाजी पळून जाणार नाही यासाठी रामसिंहाकडून जामिनकी लिहून घेतली. त्यामुळे महाराजांच्या सुटकेत रामसिंहाची मान अडकली. महाराज रामसिंहास बंधूप्रमाणे मानीत होते. औरंगजेबाने शिवाजीस हिंदुस्थानाबाहेर काबूल कंदाहारला पाठविण्याचे ठरवले. त्याला कारण म्हणजे औरंगजेबाने शिवाजीस भेटीसाठी बोलावून दगा दिला अशी आग्र्याच्या बाजारात बोलवा होती. तसेच शिवाजी अदृश्य होवू शकतो, तो भिंतीतून पार जावू शकतो, तो उडूपण शकतो अशा अनेक अफवा बाजारात, प्रजेत होत्या. अर्थात त्या पसरविण्यात महाराजांचे फिरते हेर होते हे औरंगजेबास कळलेच नाही. शिवाजीस ठार करता येत नाही हे पाहिल्यावर औरंगजेबाने दक्षिणेत मिर्झाराजांना कळविले की त्यांनी शिवाजी आग्र्यात आहे तोवर त्याच्या राज्यावर हल्ला करून त्यास संपवून टाकावे. अर्थात त्यावर मिर्झाराजांनी बादशहास स्पष्ट कळविले की तिकडे शिवाजीच्या केसालाही धक्का लागला तर आदिलशाही कुतूबशाही आणि मराठे एक होवून आपल्याला मिळालेले यशही संपून जाईल. शिवाजीची ताकद कमी लेखून चालणार नाही. मराठे सुडाने पेटले तर तेच उत्तरेत चालून येतील. त्यामुळे औरंगजेबाचा हाही बेत फसला.

महाराजांच्या निवासस्थानाला फौलादखानाने पाच हजार फौजेचा गराडा घातला. दोन तोफा सज्ज ठेवल्या आणि महाराजांना पूर्णपणे जखडून टाकले. बादशहा शिवाजीच्या बाबतीत निर्धास्त झाला. आता फौलादखानाच्या तावडीतून शिवाजी सुटणार नव्हता. त्याचवेळी कैदेत पडल्यामुळे महाराजांचा सुटकेचा मार्ग मोकळा होत होता. महाराजांच्या मनात एक अभिनव कल्पना साकार होत होती. औरंगजेबाच्या मगरमिठीतून पलायन.

महाराजांनी आग्र्याला येताना तीनशे पायदळ आणि स्वार आणले होते.

सोबत तितकेच नोकर, चाकर, बाजार बुणगे, पाणके, पखालीवाले, माहूत असे लोक होते. एखाद्या स्वतंत्र राजाला शोभेल असा सारा सरंजाम सोबत होता. महाराजांना एकटेच पळून जायचे नव्हते. त्यांना सर्व सरंजामानिशी निसटायचे होते. त्यांनी प्रथम फौलादखानामार्फत औरंगजेबाकडे अर्ज करून या शेकडो मावळ्यांना दक्षिणेस परत जाण्यासाठी परवाने मागितले. औरंगजेब अत्यंत खूश झाला. शिवाजीची माणसे परत गेली तर ते त्याच्या फायद्याचेच होते. शिवाजीजवळ जितकी कमी माणसे असतील तेवढी त्याला हवी होती. त्याने २५ जुलै १६६६ रोजी हे परवाने शिवाजीस पाठवून दिले. ते परवाने दाखवून पुढील पंधरा दिवसात हे सगळे स्वार शिपाई नरवर घाटी उतरून गेले.

त्यानंतर महाराजांनी रामसिंहास त्याने जामिनकीतून स्वतःची सुटका करून घेण्यास सांगितले. रामसिंह हा सरळ मनाचा रजपूत राजा होता. त्याने शिवाजीराजास एकटे सोडण्यास साफ नकार दिला. महाराजांनी रामसिंहास आपली सुटकेची योजना समजावून सांगता येत नव्हती. रामसिंह रोज महाराजांच्या भेटीस त्यांच्या निवासस्थानी येत होता. त्या दोघात बंधूभाव होता. महाराज वारंवार रामसिंहास जामिनकी रद्द करवून घेण्यास सांगत होते. अखेर महाराजांचा आग्रह पाहून रामसिंहाने औरंगजेबास सांगून आपली जामिनकी रद्द करून घेतली. औरंगजेबानेही आनंदाने ती रद्द केली. आता शिवाजीचे काहीही केल्यास रामसिंह आडवा येणार नव्हता. अर्थात रामसिंहाने जामिनकी रद्द केली तरी महाराजांभोवतीचे रजपूतांचे संरक्षण तसेच ठेवले. संरक्षण काढले नाही. रामसिंहाची जामिनकी रद्द झाल्याने महाराजांची एक एक अडचण दूर होत होती.

महाराजांनी राजगडाहून निघताना बराच खजिना सोबत नेला होता. त्या पैशातून महाराज आग्र्यातील अमीर उमराव, सरकारी अधिकारी यांना अनेक भेटी पाठवित होते. त्यामुळे या लाभार्थींचे महाराजांविषयी मत चांगले होत होते. महाराजांची अचानक तब्बेत बिघडली. दवा आणि दुवा दोन्हींचा लाभ घेण्यासाठी महाराजांनी शहरातील नामवंत हकीमाचे औषध चालू केले आणि गोरगरिबांना मिठाईचे वाटप सुरू केले. कावडीप्रमाणे मोठमोठ्या पेटाऱ्यातून ही मिठाई पाठविली जात होती. वजीर, अमीर उमराव यांनाही या मिठाईचा लाभ होत होता. अर्थात फौलादखानाच्या पहाऱ्यातून बाहेर पडताना योग्य ती तपासणी होत होती. मिठाईचे पेटारे उघडून पाहिले जात होते.

९ वर्षांचे संभाजीराजे हे पुरंदरच्या तहाप्रमाणे मोगली मनसबदार असल्याने त्यांना कैद नव्हती. ते पूर्णपणे मुक्त होते. त्यांना दरबारात हजेरी लावावी लागत

होती. रामसिंहकाकांच्या बरोबर ते दरबारला जात असत. कधी कधी आग्र्यात फिरायलाही रामसिंह संभाजीराजांना नेत असे. कधी कधी संभाजीराजे खेळण्यासाठी राजवाड्यातही जात असे. संभाजीराजांवर कसलेही बंधन नव्हते.

दिवसेंदिवस महाराजांचे दुखणे वाढतच होते. कधी मस्तकशूल तर कधी उदरशूल असे ज्वराची भावना कमीअधिक रोजच असे. मस्तकशूल सुरू झाला की राजे रात्रभर विव्हळत असत. रात्र रात्र राजांना झोप नाही असे सकाळी त्यांचे सेवक सांगत. राजांच्या शयनकक्षात कोणालाही जाणे शक्य नव्हते. राजांच्या सुखनिद्रेत व्यत्यय येवू नये ही त्यामागे भावना असे. फक्त रामसिंह वर्दी देवून भेटून जात असे. महाराजांच्या प्रकृतीची त्याला काळजी वाटत असे. आग्र्यातील राजवैद्य आणि निष्णात हकीम आपापल्या परीने महाराजांवर उपचार करीत होते. पथ्य पाळले जात होते. पण म्हणावा तसा आराम पडत नव्हता. दररोज एकदा स्वत: फौलादखान राजांच्या तब्बेतीची विचारपूस करून जात असे. त्यालाही कळून चुकले होते की शिवाजी आता फार काळ राहत नाही. त्याला राजांची दया येत असे. तो राजांसाठी अल्लाकडे दुवा मागत असे.

महाराज आता पूर्णपणे निराश झाले होते. त्यांना भेटायला रामसिंह वा फौलादखान आले की महाराजांच्या बोलण्यातून हे नैराश्य प्रकर्षाने जाणवले. राजांच्या बरोबर सद्‌गुरु कवींद्र परमानंद नेवासकर होते. ते राजांबरोबर तासन्‌तास बोलत बसत असत. तेवढाच महाराजांना विरंगुळा वाटत असे. २२ जुलै १६६६ रोजी त्याही परिस्थितीत महाराजांनी कवींद्र परमानंदाचा सत्कार करण्याचे ठरविले. निवासस्थानाच्या अंगणातच महाराजांनी परमानंद यांची पाद्यपूजा केली. त्यांना आपल्या जवळचा हत्ती आणि हत्तीण हौधासह दान केले. दोन उत्तम जातीवंत घोडे व वस्त्रालंकार दिले. मौल्यवान कापड आणि उरलेले चाळीस स्वार परमानंदांना देवून टाकले. राजे आता पूर्ण निरीच्छ झाले होते. त्यांना आता राज वैभवाची गरज वाटत नव्हती. महाराज आपल्या सेवकांना सांगत 'आता पुढच्या प्रवासात हे वैभव नेता येणार नाही' आणि राजांचे शब्द ऐकून सेवकांच्या डोळ्यात पाणी येत असे.

रामसिंहाच्या भेटीत महाराजांनी त्यांचे खूप आभार मानले. पूर्वी राजांना रोख रकमेची गरज पडली असता रामसिंहांनी महाराजांना ६६००० रुपये रोख दिले होते. त्याची फेड महाराजांनी राजगडावर हुंडी देवून केली होती. त्याचा मुद्दाम उल्लेख महाराजांनी केला. त्याबद्दल रामसिंहाचे आभार मानले. फौलादखानाच्या भेटीत महाराज त्याला म्हणाले होते, 'खानसाहेब आता फार

दिवस आपल्याला आमच्यावर पहारा ठेवावा लागणार नाही.' महाराजांच्या या वाक्याने फौलादखानासही वाईट वाटले. एका स्वतंत्र दख्खनी राजाची ही अवस्था त्यालाही पाहवत नव्हती.

सद्‌गुरु कवींद्र परमानंद महाराजांनी दानात दिलेले हत्ती, घोडे व इतर वस्तू घेवून आग्र्याच्या जवळच असलेल्या फत्तेपूर शिक्री या शहरात पोहोचले. तेथे त्यांचा मुक्काम होता. इकडे महाराजांचे दुखणे खूपच वाढले होते. मिठाईचे पेटाऱ्यावर अमीर, उमराव, गोरगरीब, साधू संत, फकीर यांना पाठवले जात होते. पण गुण येत नव्हता. तशात १७ ऑगस्ट हा दिवस उगवला. आज महाराजांची प्रकृती एकदमच बिघडली होती. त्यांना रात्रभर झोप नव्हती. त्यांच्या शयनगृहाभोवती आवाज केला जात नव्हता.

१७ ऑगस्ट १६६६ हा शुक्रवारचा दिवस होता. शुक्रवार नमाजाचा दिवस असल्याने मुगल राज्यात सार्वत्रिक सुटी होती. आग्रा त्याला अपवाद नव्हता. महाराजांनी पलायनासाठी हा खास दिवस निवडला होता. दुपारी मिठाईचे पेटारे भरले जावू लागले. महाराजांच्या निवासस्थानाला हा रोजचाच प्रकार होता. सकाळी निरनिराळ्या मिठाया केल्या जात असत आणि दुपारी पेटारे भरले जात असत. त्यामुळे पहारेकऱ्यांना त्यात काही विशेष नव्हते. आज महाराजांचा मस्तकशूल जास्तच वाढला होता. डेऱ्यात पूर्ण शांतता होती. हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर दोघेच राजांच्या सेवेत होते.

हा दिवस होता श्रावण वद्य द्वादशी शके १५८८ शुक्रवार तारीख १७ ऑगस्ट १६६६ आणि त्या दिवशी जगातील एक आश्चर्य घडत होते. त्याला प्रसंगाला साक्षी होता आग्र्याचा किल्ला. साक्षी होता शहाजहान बादशहाचा ताजमहाल. हा ताजमहाल हे जगातले एक आश्चर्य मानले जाते. याच आश्चर्याच्या साक्षीने महाराष्ट्रातील एका 'जमिनदाराच्या मुलाने' एक आश्चर्य घडविले. औरंगजेबासारख्या कारस्थानी, कपटी बादशहाच्या हातावर तुरी देवून महाराज सहीसलामत सुटत होते.

सायंकाळी चार पाचच्या सुमाराला मिठाईचे पेटारे भरले होते. पहाऱ्यातून बाहेर पडताना योग्य ती तपासणी झाली आणि पेटारे गावाबाहेर गेले. राजांच्या महालात महाराजांसारखे दिसणारे शहाजीराजांचे दासीपुत्र हिरोजी फर्जंद महाराजांच्या शयनगृहात निद्रिस्त होते. सुवर्णकडे घातलेला त्यांचा हात अंथरुणाबाहेर स्पष्ट दिसत होता. मदारी मेहतर हिरोजींचे पाय चेपत होता. हे महालातील दृश्य तसे नेहमीचेच होते. फक्त नेहमी हिरोजींच्या जागी खुद्द महाराज असत. आज हिरोजी होते. एवढाच फरक. महाराज कैदेतून

निसटल्यावर त्यांना गावाबाहेर ठरल्या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुरेसा अवधी दिल्यावर हिरोजी पलंगावरून उठले. त्या जागी गाद्या उशा लावून महाराज झोपल्याचा आभास करण्यात आला आणि हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर महाराजांसाठी दवा आणण्याच्या बहाण्याने पहाऱ्यातून राजरोसपणे बाहेर पडले. जाताना पहाऱ्यावर 'महाराजांना रात्रभर झोप नव्हती. आता कुठे डोळा लागला आहे. आम्ही पटकन दवा घेवून येतो. तोवर महाराजांकडे कोणास सोडू नये,' असे सांगण्यास हिरोजी विसरले नाहीत.

महाराज आणि युवराज संभाजीराजे पेटाऱ्यातून निसटल्यावर ते थेट आग्र्याबाहेर सहा मैलावर एका कुंभाराच्या घरी गेले. तेथे निराजी रावजी व इतर लोक घोडे घेवून महाराजांची वाट पहात होते. सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणे घडत होत्या. महाराजांनी दक्षिणेत राजगडावर न जाता आधी मथुरेकडे प्रयाण केले. पुढच्या प्रवासात आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून महाराजांनी वेशांतर केले. दाढी आणि जिरेटोप काढून टाकला. त्याजागी पगडी घातली. या बदलामुळे राजांना कोणी ओळखू शकत नव्हते.

इकडे महाराजांच्या शयनगृहात पलंगावर गाद्या लावल्या होत्या. महाराजांचा जिरेटोप बाजूला ठेवला होता. रामसिंहचा सहकारी बलराम पुरोहित महाराज झोपलेले पाहून न भेटताच परत गेला. त्याला पहारेकऱ्यांनी महाराज झोपले असल्याचे व हिरोजी आणि मदारी दवा आणण्यासाठी गेल्याचे सांगितले. त्यानंतर नेहमीप्रमाणे फौलादखानही राजांची विचारपूस करण्यासाठी येवून गेला. दवा आणण्यासाठी गेलेले दोन मराठे रात्र व्हायला आली तरी परत न आल्याने आणि महाराजांच्या खोलीतून कसलाच आवाज येत नसल्याने पहारेकऱ्यास शंका येवू लागली. त्यांना वाटले शिवाजी मेला की काय आणि म्हणून पहारेकऱ्यांनी ही गोष्ट फौलादखानाच्या कानावर घातली. अर्थात फौलादखान या बातमीवर विश्वास ठेवायला तयार नव्हता. परंतु प्रत्यक्ष येऊन पाहिल्यावर फौलादखानास धक्काच बसला. शिवाजी कैदेतून पळून गेला होता, तोही एकटा नव्हे तर आपल्या एकूण एक माणसांसह. त्याने प्रथम ही बातमी रामसिंहाच्या कानावर घातली. कारण औरंगजेबापुढे जावून शिवाजी माझ्या कैदेतून पळाला हे सांगण्याचे धैर्य फौलादखानापाशी नव्हते. त्यात शिवाजीला रामसिंहाचे खास संरक्षण होते. महाराजांच्या निवासस्थानाभोवती रामसिंहाचे ४०-५० कडवे रजपूत दिवसरात्र जागता पहारा देत होते. त्यांच्याबाहेर फौलादखानाची पाच हजार फौज महाराज पळून जावू नयेत म्हणून पहारा करीत होती. खरे तर शिवाजीची जबाबदारी रामसिंहाची अजिबात नव्हती. शिवाजीच्या

जिवाला औरंगजेबाकडून अपाय होवू नये म्हणून रामसिंहाने आपली माणसे ठेवली होती. त्याच्या वडिलांनी महाराजांच्या जीविताची हमी घेतली होती.

अखेर फौलादखान आणि रामसिंह दोघांनी जावून औरंगजेबास शिवाजी पळाल्याची दु:खद बातमी दिली. औरंगजेबाला दु:ख तर झालेच पण त्याचबरोबर प्रचंड आश्चर्य वाटले. दोन दोन पहाऱ्यातून शिवाजी आपल्या लवाजम्यानिशी कसा पळाला याचे आश्चर्य सर्वांनाच वाटत होते. त्यात आग्र्याच्या बाजारात चर्चा होती की शिवाजीला चेटूक येते. तो क्षणात अदृश्य होवू शकतो. तो बोलताबोलता जमिनीत गायब होतो. त्याला भिंतीतून आरपार जाता येते. तो अनेक प्राण्याची-पक्ष्यांची रूपे घेऊ शकतो. या अफवा औरंगजेबाच्या कानावर आल्या होत्या. त्या आता त्याला खऱ्या वाटू लागल्या होत्या.

औरंगजेबाने भराभर अनेक हुकूम सोडले. त्याने चारही दिशांना तपास करण्यासाठी फौज आणि हेर पाठविले. त्यांना आज्ञा दिल्या की शिवाजी वेशंतर करून जात असेल तरी सावध राहून त्यास पकडावे. तो संन्यासी, जोगी, बैरागी, फकीर, साधूसंत अशा कोणत्याही रूपाने जात असेल त्यास पकडावे. बादशहा इतकेच करून थांबला नाही तर शिवाजी ज्याप्रमाणे मामू शाहिस्तेखानाच्या शयनगृहात घुसला त्याप्रमाणे तो शाही शयनगृहातही घुसू शकतो. या कल्पनेने त्याने आपल्या भोवतीचे संरक्षण वाढवले. रात्री त्यांच्या पलंगाभोवती चार पहारेकरी जागता पहारा देऊ लागले. आग्र्याच्या बाजारात, पेठेत, चौकाचौकात, शाही परिवारात, दरबारी आणि त्यांच्या परिवारात शिवाजी कसा पळाला याचीच चर्चा आणि तर्क चालू होते. औरंगजेबाने शिवाजीच्या पलायनास जसे फौलादखानास जबाबदार धरले तसेच ते रामसिंहास जबाबदार धरले. वास्तविक ती रामसिंहाची जबाबदारी नव्हती. त्याने दिलेल्या जामिनातून त्याने सुटका करून घेतली होती. परंतु यात रामसिंहाची एक खूप मोठी चूक होती ती म्हणजे तो काफर होता, तो हिंदू होता.

औरंगजेबाच्या दृष्टीने शिवाजीच्या पलायलाला रामसिंहच जबाबदार होता. कारण त्याचा पहारा निवास स्थानाभोवती पहिला होता आणि दुसरे कारण म्हणजे रामसिंह काफर असल्याने त्यानेच शिवाजीस पळून जाण्यास मदत केली असण्याची शक्यता होती. पलायनाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १८ ऑगस्ट रोजी शिवाजीला फिदाईखानाच्या हवेलीत पाठवण्याचे नक्की झाले होते. तेथे शिवाजीचा अंत करण्यात येणार होता. ही कल्पना अत्यंत गुप्त ठेवण्यात आली होती. शाही परिवारातही फार कोणाला त्याबाबत माहिती नव्हती. असे असून शिवाजी त्याच्या अगदी बरोबर, आदल्या दिवशी कसा

पळून जातो हे कोडे होते. ही गुप्त वार्ता शिवाजीला कोणी सांगितली असेल तर ती काफर रामसिंहानेच, हे नक्की ठरले. तसे पाहिले तर रामसिंहाला ही गुप्त वार्ता कळण्याची सुतराम शक्यता नव्हती. औरंगजेबाने रामसिंहाची मनसब काढून घेतली. त्याला दरबार मना झाला.

महाराजांनी संभाजीराजांना मथुरेत ठेवण्याचे ठरविले होते. एकतर बाळराजे जेमतेम नऊ वर्षांचे असल्याने त्यांना परतीचा, धावपळीचा आणि धकाधकीचा प्रवास झेपण्यासारखा नव्हता. मार्गात अन्न, पाणी आणि हवामान बदलणार असल्याने संभाजीच्या प्रकृतीस ते घातक होते. शिवाय शिवाजीचा शोध घेताना नऊ वर्षांच्या मुलासह जाणाऱ्या व्यक्तींचा शोध घेतला जाणार होता. त्यामुळे संभाजीसह परतल्यास महाराजांच्या जिवालासुद्धा धोका होता. म्हणून बहुत विचारांनी संभाजीस मथुरेत ठेवण्याचे निश्चित केले होते.

मथुरेत महाराजांचे गुरू मकरंद भट आणि गोवर्धन भट राहत होते. तसेच स्वराज्याच्या पेशव्यांचे म्हणजे मोरोपंत पिंगळे यांच्या बहिणीचे यजमान व त्यांचे बंधू मथुरेत होते. मोरोपंतांचे मेव्हणे कृष्णाजी त्रिमल मथुरे आणि त्यांचे बंधू काशीपंत आणि विसाजीपंत मथुरेत स्थायिक होते. मथुरेत त्यांचा मोठा वाडा होता. महाराजांनी पलायनापूर्वीच कवी परमानंद यांच्यामार्फत या सर्वांशी संधान बांधले होते. मथुरे बंधूंनी संभाजीस आसरा देण्याचे मान्य केले होते. मथुरे बंधूंनी सर्वप्रथम संभाजीस बटूचा वेश दिला. त्याचे मुंडण करून घेरा व शेंडी राखण्यात आली. तसेच संभाजी हा आमचा भाचा आहे असे मथुरेत सांगण्यात आले. त्यामुळे कोणास शंका आली नाही.

औरंगजेबाने शिवाजीचा कसून शोध घेतला. या पलायनाने त्याची काबूल कंदाहारपर्यंत सर्व हिंदुस्थानात अब्रू गेली होती. त्याने फौलादखानास शिवाजी कसा पळाला ते शोधून काढण्यास सांगितले. बरीच चौकशी केल्यावर फौलादखान या निर्णयाप्रत आला की शिवाजी आणि त्याचा बेटा संभाजी मिठाईच्या पेटाऱ्यात बसून निघून गेले. दोन वेगवेगळ्या पेटाऱ्यात हे दोघे बसले आणि त्यावर मिठाई रचण्यात आली असल्याने तपासात कळून आले नाही. बाकी पेटारे काळजीपूर्वक तपासले जात होते. हीच माहिती खानाने औरंगजेबास सांगितली. तीच माहिती पुढे औरंगजेबाच्या डायरीत म्हणजे अखबारात नोंदली गेली. तीच पुढे बखरकारांनी मान्य केली. आपल्याकडच्या बखरीतही महाराज आणि संभाजीराजे मिठाईच्या पेटाऱ्यात बसून पहाऱ्यातून निसटले हेच मान्य झाले आहे. परंतु विचारांच्या कसोटीवर हे पटत नाही. राजे जेव्हा एखादे धाडसी पाऊल उचलीत तेव्हा त्यांचे नियोजन अचूक असे. नियोजन म्हणजे यशच

असे. त्यामुळे मिठाईच्या पेटाऱ्यातून पुत्रासह बसून बाहेर पडणे त्याच्यासारख्या प्रगल्भ विचार करणाऱ्याच्या हातून होणे शक्य नाही. कारण पेटारे तपासण्याचे पूर्णपणे बंद झाले नव्हते. अधूनमधून पेटारे तपासले जात होते. त्यामुळे पेटाऱ्यातून जाण्यात धोका होता. तसेच ऐनवेळी दोघांपैकी कोणाला शिंक अथवा खोकला येण्याची व बेत फसण्याची शक्यता होती. असा हा कट फसला असता तर सर्वनाश अटळ होता.

त्यामुळे महाराज असा धोका पत्करणे शक्य वाटत नाही. शिवाय संभाजीराजांस पेटाऱ्यातून जाण्याची गरजच नव्हती. संभाजीराजांवर कसलेही बंधन नव्हते. ते मोगली पंचहजारी मनसबदार असल्याने मुक्त होते. ते नित्यनेमाने दरबारात हजेरी लावत होते. रामसिंहाबरोबर आग्रादर्शन करण्यास गेल्याचेही उल्लेख आहेत. शहाजादा अकबराशी संभाजीराजांचे मैत्रीचे संबंध होते. त्यामुळे संभाजीराजे उघडपणे पहारे पार करू शकत होते. उलट संभाजीस पहारेकऱ्याकडून मुजरे झाडत असत. त्यामुळे संभाजीराजे आधीच राजरोसपणे पहारे पार करून इच्छितस्थळी जाऊन बसले असावेत आणि महाराज बहुधा बेमालूम वेशांतर करून  पेटारा वाहून नेणाऱ्या सेवकाच्या वेशात पेटाऱ्याला रितसर खांदा देवून निसटले असावेत. यात धोका नव्हता. कारण पेटारे तपासले जाण्याची शक्यता होती. परंतु शिपाई तपासले जात नव्हते. अर्थात ऐतिहासिक कागदपत्राच्या आधारे राजे व संभाजीराजे पेटाऱ्यातून पळाले हेच सिद्ध होत आहे. तेच आपल्यालाही मान्य करावे लागेल.

ते काहीही असले तरी महाराजांचे औरंगजेबाच्या मगर मिठीतून सुटणे हा एक जागतिक चमत्कारच म्हणावा लागेल. फौलादखानासारख्या क्रूर सरदारांच्या पाच हजार स्वार आणि दोन तोफांच्या पहाऱ्यातून सुखरूप सुटणे हे एखाद्या युगपुरुषाचेच काम आहे. कंसाच्या कैदेतून श्रीकृष्णाची झालेली सुटका आणि महाराजांची आग्र्याहून सुटका दोन्हीत फरक नाही. शिवाजी महाराजांच्या सुखरूप सुटण्यावर स्वराज्याचे पूर्ण भवितव्य अवलंबून होते. महाराज सुखरूप सुटू शकले नसते तर महाराष्ट्राचा पुढील इतिहासच बदलून गेला असता. ही सुटका म्हणजे औरंगजेबाच्या कूटनितीवर मराठ्यांचा विजय होता. महाराजांनी आपल्या बुद्धीने औरंगजेबावर केलेली मात होती. या पलायनाने औरंगजेबाला पुढील राजकारणात प्रचंड मनस्ताप झालेला दिसतो.

महाराजांबरोबर आग्र्यात असताना त्याचा हेर प्रमुख बहिर्जी नाईकही होते. या बहिर्जीची करामत वाखाणण्याजोगी आहे. औरंगजेबाच्या महालापर्यंत बहिर्जींची माणसे पेरली गेली होती. मोगली महालात घडणाऱ्या प्रत्येक

लहानमोठ्या गोष्टींचा सुगावा महाराजांना बहिर्जीमार्फत लागत होता. शिवाजीला १८ ऑगस्ट रोजी फिदाईखानाच्या हवेलीत हलविण्यात येणार होते व तेथेच शिवाजीला ठार करण्यात येणार होते हा कट अत्यंत गुप्त होता. शाही परिवारात फारच थोड्या लोकांना तो ठावूक होता. परंतु बहिर्जीने तो गुप्त कट महाराजांना कळविला आणि त्यामुळेच बरोबर एक दिवस आधी महाराजांनी आग्र्याहून पलायन करून तो बेत उधळून लावला. बहुधा औरंगजेबाची मावशी, जाफरखानाची बायको आणि शाहिस्तेखानाची बायको यांच्याकडून या कटाची माहिती बहिर्जीस समजली असावी. बहिर्जीने आग्र्याच्या बाजारात शिवाजीला चेटूक येते, तो भिंतीतून आरपार जातो आणि हवे तेव्हा अदृश्य होतो अशा अनेक अफवा पेरून घबराहट निर्माण केली होती. याच बहिर्जीने महाराजांच्या परतीचा मार्ग निश्चित केला होता. मोगली साम्राज्य टाळून महाराजांना सुखरूप महाराष्ट्रात आणण्यासाठी मार्ग निष्कलंक असणे गरजेचे होते ते काम बहिर्जीने चोख बजावले होते. महाराजांचे हे पलायन अत्यंत गुप्त असल्यामुळे त्यांच्या परतीच्या मार्गाविषयी पुरावे सापडणे शक्य नव्हते.

महाराजांच्या परतीचा ज्ञात मार्ग म्हणजे आग्र्याहून १७ ऑगस्टला रात्री निघाल्यावर मथुरेला कृष्णाजी पंतांच्या घरी संभाजी राजांची सोय लावून मार्गी लागलेले राजे २६ ऑगस्टला नरवर येथे आल्याची नोंद आहे. आग्रा ते मथुरा ५४ कि.मी. असून आग्रा ते नरवर हे अंतर १९२ कि.मी. आहे. हा सर्व प्रवास करून महाराजांनी हिरापूर येथे नर्मदा ओलांडली. त्यानंतर गौंडवनमार्गे एलिचपूरला त्यांनी वऱ्हाडात प्रवेश केला असावा. एलिचपूर (अचलपूर) माहूरमार्गे राजे आपल्या आजोळी सिंदखेडला आलेले दिसतात. सिंदखेडवरून श्रीगोंदा, पुणे आणि राजगड असा महाराजांचा एकूण प्रवास झालेला दिसतो तोच सर्वमान्य आहे. हा प्रवास महाराजांनी वेशांतर करून २५ दिवसात केला आणि १२ सप्टेंबरला महाराज राजगडला जिजाऊंच्या दर्शनास आले, अशी नोंद सापडते. मार्गात संभाजीराजांचे निधन झाल्याची खोटी बातमी मुद्दाम पसरविण्यात आली. त्यामुळे औरंगजेबाने संभाजीराजांचा तपास करणे थांबविले. संभाजीराजांचा परतीचा मार्ग निर्धोक होवू शकला.

महाराज १२ सप्टेंबर १६६६ रोजी साधूंच्या वेशात राजगडावर मातोश्री जिजाऊ साहेबांच्या पुढे उभे राहिले. तो क्षण इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा असणार. मृत्यूच्या दाढेतून सुखरूप आलेल्या पुत्रास पाहून वृद्ध मातेस काय वाटले असेल याची आपण कल्पनाच करू शकतो. आपला इतिहास अबोल आहे हेच खरे.

महाराजांनी सर्वप्रथम फक्त जिजाऊंना संभाजी राजांच्या मृत्यूची वार्ता खोटी असून संभाजीराजे मथुरेत सुखरूप असल्याचे सांगितले. हा फक्त राजकारणाचा भाग असून तसे करणे संभाजीराजांच्या रक्षणासाठी किती आवश्यक होते हे जिजाऊंना पटवून दिले. त्याचप्रमाणे पिलाजीराव शिर्के जे येसूबाईचे पिता होते त्यांनाही विश्वासात घेऊन सांगितले. पिलाजीराव संभाजीराजांचे श्वसूर होते. त्यांच्या घरी श्रृंगारपूरला अनर्थ घडू नये. यासाठी महाराजांनी त्यांना विश्वासात घेतले होते. बाकी स्वराज्यात सर्वत्र खोटी बातमीच खरी म्हणून पसरविण्यात आली.

महाराजांचे आग्र्याहून पलायन हे विश्वाला आश्चर्य करायला लावणारे आहे. कारण महाराजांनी आग्र्याला जाताना अनेक मुत्सद्दी, वीर धारकरी, स्वतंत्र फौज, हत्ती, घोडे, उंट, खजिना, कापडचोपड असा बराच लवाजमा सोबत नेला होता. त्याचप्रमाणे स्वराज्याचा युवराज संभाजीही सोबत होता. या पलायनात महाराज एकटेच पळून आले नाहीत तर हा पूर्ण लवाजमाही त्यांनी स्वराज्यात परत आणला. महाराजांचे दोन वकील त्र्यंबकपंत डबीर आणि रघुनाथपंत कोरडे हे औरंगजेबाच्या तपासात सापडले. औरंगजेबाने त्या दोन्ही वृद्धांचे खूप शारीरिक हाल केले. त्यांना राखेचे तोबरेही देवून पाहिले. परंतु या दोघांनी महाराज कसे पळाले हे औरंगजेबास कळू दिले नाही. अखेर महाराजांनी औरंगजेबाशी तह करून या दोघांना सोडवून स्वराज्यात परत आणले.

त्याचप्रमाणे नोव्हेंबर १६६६ मध्ये सर्व स्थिरस्थावर झाल्यावर कृष्णाजीपंत आणि त्यांच्या बंधूंनी युवराज संभाजीराजांस राजगडावर आणून पोहोचविले. महाराजांनी मथुरे परिवाराचे उपकार स्मरून त्यांना एक लाख रुपये रोख व मानसन्मान, जडजवाहीर देवून गौरविले. त्याच्या कृपेने संभाजीराजे सुखरूप परत आले. या संपूर्ण आग्रा प्रकरणात स्वराज्याची एकही व्यक्ती मागे राहिली नाही. हत्ती, घोडे, उंट, किंमती कापड सारे काही महाराष्ट्रात परत आले. फक्त किरकोळ जवाहीर जे राजांनी आग्र्यात असताना सावकाराकडे राजगडावर पाठविण्यासाठी दिले होते, ते तेवढे सावकाराकडे राहिले. इतक्यात महाराज कैदेतून पळाल्याची बातमी आली. सर्वत्र मोगलांची शोधाशोध चालू होती. तेव्हा घाबरून जावून त्या सावकाराने ते जवाहीर औरंगजेबाकडे जमा केले. अर्थात औरंगजेबाने पुढे ते जवाहीर विकून आग्र्यातील फकिरांवर खैरात वाटली. त्या खैरातीचेही पुण्य महाराजांनाच मिळाले असणार, याबाबत शंका नाही. औरंगजेबाला या सर्व प्रकरणात मन:स्ताप आणि नाचक्की याशिवाय फार काही लाभले नाही. काबुल कंदाहारपर्यंत त्याची अपकिर्ती झाली.

आग्रा प्रकरणात सर्व सुखरूप सुटल्यावर महाराजांनी सर्व संबंधितांचा सत्कार करून त्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रमाणात बक्षिसे वाटली. हिरोजी फर्जंद यांनी जिवावर उदार होवून राजांची सुटका केली. त्याक्षणी हिरोजी साक्षात मृत्यूच्या दारात उभे होते. जरा जरी घोटाळा झाला असता तरी सर्वांच्याच जिवाशी खेळ होता. त्याबद्दल महाराजांनी हिरोजीस पागेचा सरदार केले. पालखी आणि अबदागिरीचा मान दिला. मदारी मेहतरांनी राजसिंहासन सांभाळण्याची जबाबदारी मागून घेतली, ती त्यास देण्यास आली.

शिवाजी महाराजांना आपल्याला पाठविण्यात मिर्झाराजांचा प्रामाणिक हेतू शिवाजीला औरंगजेबाच्या दरबारात मानाचे स्थान मिळावे, त्याला दक्षिणेची सुभेदारी मिळून त्याच्यावर बादशहाची कृपा व्हावी हाच होता. बादशहाच्या कपटी स्वभावाची मिर्झाराजांस कल्पना आली नसावी. मिर्झाराजांचे औरंगजेबाबद्दलचे सर्व अंदाज चुकत गेले. तसे मिर्झाराजांचे इमान बादशहापाशीच रुजू होते. ते मराठ्यांना फितूर होण्याचा संबंधच नव्हता. परंतु औरंगजेबाचे मिर्झाराजांबद्दलचे मत कलुषित झाले होते. त्याने आपला मुलगा मुअज्जम यांस दक्षिण सुभ्यावर पाठवून मिर्झाराजांस उत्तरेत परत बोलावले. परंतु मिर्झाराजे उत्तरेत पोहोचण्याआधीच बुऱ्हाणपूर मुक्कामी त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला. मिर्झाराजांच्या विश्वासू मुन्शीकडून औरंगजेबानेच हा विषप्रयोग केला होता. कपटी आणि संशयी औरंगजेबास मिर्झाराजांच्या प्रामाणिकपणाची आणि इमानदारीची किंमत कळलीच नाही.

शिवाजी आपल्या तावडीतून पळून गेला हे पाहून संतापलेल्या औरंगजेबाने नेतोजी पालकरास पकडण्याचा हुकूम दिला. नेतोजीचा या संपूर्ण प्रकारात काहीही संबंध नव्हता. नेतोजी बिचारा आधीच आदिलशाहीला मिळाला होता आणि पुढे मिर्झाराजांच्या सांगण्यावरून नेतोजी मोगलांकडे आला होता. नेतोजी पालकराचा गुन्हा असला तर एवढाच होता की तो शिवाजीचा रिश्तेदार होता आणि प्रती-शिवाजी म्हणून ओळखला जात होता. नेतोजीला पकडून बंदोबस्ताने उत्तरेत पाठवण्यात आले. तेथे औरंगजेबाने त्याचे हाल हाल करून त्यास मुसलमान केले. नेतोजी पालकर या जातीवंत मराठ्याचा महंमद कुलीखान झाला. त्याचा आग्र्यात निकाह लावण्यात आला व त्यास काबूलला स्वारीवर पाठविण्यात आले. औरंगजेबाने शिवाजीचा असा सूड घेतला.

पुरंदरच्या तहामुळे स्वराज्याचे तेवीस किल्ले आणि बारा लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रदेश मोगलांकडे गेला होता. त्यामुळे स्वराज्य संकुचित झाले होते. स्वराज्याचे उत्पन्न घटले होते. फौजेचा भार सहन करण्यास असमर्थ होते. त्यात मिर्झाराजे

उत्तरेत निघून गेले असले तरी मोगली फौजा स्वराज्यात वावरत होत्या. त्यामुळे महाराजांना राज्याची घडी ठीक करण्यासाठी काही काळ शांतता हवी होती.

महाराजांनी सर्व मुत्सद्यांशी चर्चा करून औरंगजेबाशी तह करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्यांनी औरंगजेबास पत्र पाठवून आग्र्याहून पळून आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. तसेच पुरंदरचा तह पाळण्याबद्दल हमी दिली. संभाजीराजांची पंचहजारी मनसबदारी करण्याची इच्छा प्रदर्शित केली. जवळजवळ राजांनी औरंगजेबाशी शरणागती पत्करली. औरंगजेबालाही तेच पाहिजे होते कारण इराणचा शहा अब्बास युद्धाची तयारी करीत होता. औरंगजेबाला एकावेळी दोन दोन शत्रू नको होते.

आता दक्षिण सुभ्यावर मुअज्जम होता. हा ऐषारामी होता. त्याला मराठ्यांविरुद्ध झगडा नको होता. महाराजांचे बादशहाला लिहिलेले पत्र येताच त्याने ते आग्र्यास पाठवून दिले. सरहद्दीवर शहा अब्बासने सुरू केलेल्या जमवाजमवीचा धसका घेतलेल्या औरंगजेबाने शिवाजीची विनंती मान्य केली आणि शिवाजीस 'राजा' हा किताब दिला. तशा आशयाचे ६ मार्च १६६८ चे पत्र बादशहाने महाराजांस पाठवून दिले. हे पत्र म्हणजे बादशहाने स्वराज्यास दिलेली मान्यताच मानावी लागेल.

औरंगजेबाने महाराजांना दिलेल्या 'राजा' या किताबाने शिवाजी राजांचा वरवर फायदा झाला नाही, कारण महाराष्ट्रात शिवाजीला 'शिवाजी महाराज' असे पूर्वीपासूनच संबोधित होते. परंतु आजवर औरंगजेब जो महाराजांना 'जमिनदार शिवा' म्हणून उल्लेखित होता त्याला आणि मोगलांच्या सर्व मांडलिकांना आता 'शिवाजी राजा' असे सन्मानाने म्हणावे लागणार होते. त्याचप्रमाणे औरंगजेब बादशहाने 'राजा' हा किताब देऊन स्वराज्याला एक प्रकारे मान्यताच दिली होती. त्यामुळे मोगलांचे प्रांताप्रांताचे सुभेदार, जंजिऱ्याचा सिद्दी, रामनगरचा राजा, आदिलशाही, कुतूबशाही या सर्वांनाच आता यामुळे शिवाजी राजेंना सन्मानाने वागवावे लागणार होते. महाराजांना स्वतंत्र राजाचा दर्जा मिळाला. त्यामुळेच विजापूरच्या आदिलशाहीने महाराजांना ३ लाख खंडणी देण्याचे मान्य केले. तसेच कुतूबशहाने पाच लाखाची खंडणी मान्य केली. यातून दक्षिणेकडील तीन मोठ्या सत्ता एकत्र आल्या हाही एक फायदा झाला.

औरंगजेबाने पुरंदरचा तह मान्य केल्याने महाराजांना हवी असलेली शांतता मिळाली. त्याचा महाराजांनी उत्तम उपयोग करून घेतलेला दिसतो. राज्य व्यवस्थेकडे मध्यंतरी थोडे दुर्लक्ष झालेले होते. राज्य कारभाराची घडी नीट बसविण्यासाठी काही बदल करणे आवश्यक होते. राजांनी काही क्रांतीकारक

निर्णय घेतले. अनोजी दत्तो यांच्या विचाराने जमिनीची प्रतवारी पाहून शेतसारा ठरविला. हा सारा रोख अथवा धान्याच्या रूपाने भरण्याची सोय शेतकऱ्यांना दिली. तसेच वतनदार साऱ्यासाठी अथवा आपल्या वतनाच्या वसुलीसाठी शेतकऱ्यांस पिळून काढीत असत, ती पद्धत बंद करून सारा वसुली सरकारी अधिकाऱ्याकडून होऊ लागली. वतनदारांचे अवाजवी अधिकार काढून घेतले. नवीन वतने देण्याचे पूर्ण बंद करून टाकले. जहागिरदार, देशमुख हे पदरी फौज ठेवून, पागा ठेवून, वाडेहुडे बांधून बलवान होतात. आपापसात भांडत बसतात. त्यात गरीब रयत भरडली जाते हे राजांना ठाऊक होते. त्यासाठी वतनदारांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतकऱ्यांना दुष्काळात कर्जे, तगाई देण्याची सोय करण्यात आली. ही कर्जे पुढे ५-६ वर्षांत सालीना हप्त्याने वसूल करण्याची सोय झाली. जे लोक भूमिहीन होते त्यांना ओसाड जमीन देण्यात आली. त्यामुळे गावोगावची ओसाड जमीन पुन्हा लागवडीखाली आली. राज्याचे उत्पन्न वाढले. गावखेड्यात न्यायव्यवस्था आखून देण्यात आली. अशा अनेक निर्णयामुळे रयत सुखी व आनंदी झाली. राजांना दुवा देवू लागली.

पुरंदरच्या तहाप्रमाणे संभाजी राजांना पाच हजाराची मनसब मिळाली होती. ही जहागिरी वऱ्हाडप्रांती होती. मिर्झाराजांना परत बोलावताना त्यांच्या जागी दक्षिण सुभेदार म्हणून मुअज्जमची नेमणूक होती. मुअज्जमवर लक्ष ठेवण्यासाठी दिलेरखानही औरंगबादेस होता. परंतु या दोघांचे पटत नव्हते. दिलेरखान आपल्याविरुद्ध चहाड्या करतो असा मुअज्जमला दाट संशय होता आणि ते खरेही होते. प्रतापराव गुजर आणि निराजीपंत हे दोघे संभाजीराजांच्या या जहागिरीची व्यवस्था पाहात होते. सर्व काही ठीक होते. परंतु औरंगजेबाच्या मनातून शिवाजीचे शल्य गेले नव्हते. त्याने मुअज्जमला कळविले की त्याने प्रतापराव गुजर आणि निराजीपंत या दोघांना पकडून उत्तरेत पाठवून द्यावे. तसेच शिवाजीस आग्र्याला जाण्यासाठी जे एक लक्ष रुपये शाही खजिन्यातून देण्यात आले आहेत ते त्याने संभाजीच्या जहागिरीतून वसूल करून घ्यावे. या दोन्ही आज्ञा निघाल्याचे मुअज्जमला आधीच समजल्याने मोठा अनर्थ टळला. मुअज्जमची आणि मराठ्यांची मैत्री होती. त्याने प्रतापरावास कळवून टाकले. त्यामुळे प्रतापराव आणि निराजीपंत दोघेही औरंगाबाद सोडून वऱ्हाडमार्गे परत आले. येताना त्यांनी एवितेवी तह मोडलेलाच आहे तर रित्या हाती न परतता वऱ्हाड लुटले. अकोला, अचलपूर, मलकापूर, बाळापूर यांसारखी समृद्ध शहरे लुटली. प्रचंड लूट घेऊन ते वऱ्हाडातून परतले.

औरंगजेबाशी झालेला हा तह जेमतेम १६६९ पर्यंत कसाबसा टिकला.

महाराजांनाही स्वराज्याचे पुरंदरच्या तहात गेलेले किल्ले आणि प्रदेश परत घ्यायचा होताच. पुरंदरच्या एका तहाने स्वराज्य एक चतुर्थांश राहिले होते. त्यावर राज्याचा आणि फौजेचा खर्च निभावणे कठीण होते. राजांनी प्रथम गोव्यावर छापा टाकला. पण गोव्याचा गव्हर्नर सावध होता. राजांचा पराभव झाला. मराठ्यांची खूप हानी झाली. मे १६६९ मध्ये राजांनी जंजिरा मोहीम काढली. जंजिरा चहूबाजूंनी पाण्याने वेढलेला किल्ला, राजांच्या आरमाराने जंजिऱ्यास वेढा दिला. किल्ल्यातील लोकांची उपासमार होऊ लागली. किल्ला पडणार अशी लक्षणे दिसू लागली. किल्लेदार जंजिरा खाली करून देण्यास राजी झाला. परंतु किल्ल्यात सिद्दी खैरत, सिद्दी संबूळ आणि सिद्दी कासिम असे तीन इतर सिद्दी होते. त्यांना ही फत्तेखानाची शरणागती पसंत पडली नाही. त्या तिघांनी फत्तेखानासच कैद केले आणि किल्ला लढवला. जंजिरा स्वराज्यात येता येता राहिला. महाराजांना खूप वाईट वाटले.

औरंगजेबाच्या डोक्यात धर्मवेडाने थैमान घालायला जाने. १६७० पासून सुरुवात केली. त्याची भावना होती की 'हिंदूधर्म समूळ नष्ट केल्याशिवाय इस्लामला चांगले दिवस येणार नाहीत आणि इस्लामच्या उद्धारासाठीच आपला जन्म आहे. ते आपले कर्तव्य आहे.' त्यात सत्ता हाती होती. डोक्यात वेड आणि हातात सत्ता भराभर आज्ञा सुटल्या. इस्लाम धर्मगुरुंना मौलवींना हाताशी धरून फतवे निघाले. हिंदूंना नोकऱ्या मिळणे बंद झाले. कलाकारांवर वाईट दिवस आले. राज्यात गाणे बजावणे बंद झाले. हिंदूंनी धार्मिक विधी करण्यावर बंधन आले. काशी विश्वेश्वर आणि मथुरा वृंदावन यांसारख्या तीर्थ क्षेत्रावर हल्ले होऊ लागले. मठ, पाठशाळा, धर्मशाळा, आश्रम आणि अन्नछत्र चालविण्यास कायद्याने बंदी केली. औरंगजेबाच्या मोंगलाईत ७० टक्के रयत हिंदू होती. परंतु सारे मुकाट्याने हे सहन करीत होते. राजांच्या कानावर या बातम्या येत होत्या. राजांना प्रजेच्या नाकर्तेपणाची चीड येत होती. मोगलाईत अनेक हिंदू सरदार होते. पण एकहीजण याबाबत विरोध करीत नव्हता. औरंगजेबाला या त्याच्या धर्मवेडाबाबत पश्चाताप करायला लावायचा महाराजांनी निश्चय केला.

महाराजांनी फौजांना तयार राहायला सांगितले. आक्रमणासाठी राजांनी औसा, कऱ्हाड आणि गंगाभडी हा मोगलाई प्रदेश निवडला. मोगली फौजेला प्रतिकार करण्यासाठी सवड होवू नये इतका जोरदार हल्ला मराठे चढवित होते. महाराजांनी तानाजी मालुसरेला कोंढाणा घेण्यासाठी पाठविले. कोंढाण्याच्या लढाईत किल्लेदार उदयभान याच्याशी लढताना तानाजीला

वीरमरण आले. तरी सूर्याजीने परतीचे दोर कापून ४ फेब्रुवारी १६७० ला कोंढाणा काबीज केला. राजांना कोंढाण्याच्या यशापेक्षा तानाजीच्या मृत्यूचे दु:ख फार होते. तानाजी हा राजांचा बालपणीचा सखा होता. जिजाऊ तानाजीवर पुत्रवत प्रेम करीत असे. याच सुमारास राजाच्या कुटुंबात एक आनंददायक बातमी घडली. राजांची द्वितीय पत्नी सोयराबाई राणीसाहेब प्रसूत होऊन पुत्ररत्न झाले. ती तारीख होती २४ फेब्रुवारी १६७०. बाळाचे नाव राजाराम ठेवण्यात आले.

राजांनी पुरंदर घेतला. निळोपंतांनी रझिऊद्दीन खानास कैद केले आणि ८ मार्चला पुरंदर स्वराज्यात आणला. महाराजांनी आपला मोर्चा माहुली गडाकडे वळवला. माहुली गडावर मोगली किल्लेदार मनोहरदास कौर होता. तो मोठा शूर होता. तो सदैव सावध असे. मराठी फौजांनी गडाला वेढा दिला. परंतु त्यांना गड घेता आला नाही. मनोहरदासाच्या प्रतिकाराने मराठ्यांना माघार घ्यावी लागली. या लढाईत एक हजार मराठे कामी आले. महाराजांनी पराभव पत्करून मोर्चा कल्याण-भिवंडीकडे वळवला. कल्याण-भिवंडी स्वराज्यात आली. मोगली ठाणेदार उझबेगखान मारला गेला. लोधीखान जखमी झाला. ही लढाई १५ मार्चला झाली.

कल्याण-भिवंडी घेतल्यावर मराठ्यांनी नगर-परिंडा भागात ५१ गावे लुटले. १३ मे ला पुण्याजवळ लोहगड घेतला. माहुलीचा गड घेताना महाराजांना पराभव पत्करावा लागला असला तरी त्यांचे माहुलीसाठी प्रयत्न चालू होतेच. शेवटी गडकरी मराठ्यांच्या रोजच्या हल्ल्यांना कंटाळला त्याने माहुलीगड मराठ्यांना देऊन टाकला. जून १६ ला माहुली ताब्यात आला आणि लगेच सहाव्या दिवशी कर्नाळा स्वराज्यात आला. त्यानंतर दोन दिवसांनी मराठ्यांनी रोहिडा किल्ला घेतला. शिवाजी राजांनी जणू तांडव नृत्य आरंभले होते. आठवड्यात तीन तीन किल्ले स्वराज्यात परत येत होते. पुरंदरच्या तहात गेलेले सर्व गड किल्ले घेण्याचा मराठ्यांनी सपाटा लावला. मिर्झाराजांना तेवीस गड देताना मराठी फौजेला दु:ख झाले होते. त्यामुळे आता पराक्रमाची पराकाष्ठा करून गड परत घेतले जात होते. मोगलांना प्रतिकार करण्यास अवधीही मिळत नव्हता. औरंगाबादेत असलेल्या दक्षिण सुभेदार मुअज्जमकडे रोज नव्यानव्या पराभवाच्या बातम्या येत होत्या. परंतु त्याला मोगली साम्राज्य वाचविण्यात रस नव्हता. त्याचे आणि दिलेरखानाचे भांडण ऐन भरात होते. याच भांडणकाळाचा सदुपयोग करून महाराजांनी गेलेला मुलूख आणि किल्ले परत मिळवले.

महाराजांनी पुन्हा सुरत शहर लुटण्याचा बेत केला. बहिर्जी नाईकाने सुरतेची पूर्ण माहिती काढून महाराजांना दिली होती. १६६४ मधील सुरतेचा सुभेदार

इनायतखानावर औरंगजेबाची इतराजी होवून तो गेला होता. त्याच्या जागी गियासुद्दीन आला होता. सुरतेची पूर्वीची पडलेली तटबंदी आता पुन्हा बांधण्यात आली होती. त्यामुळे सुरत शहराभोवती आता तटबंदी होती. सुरतेच्या रक्षणासाठी आता फौजही १०० वरून ३०० करण्यात आली होती. सुरतेचे जकातीचे उत्पन्न औरंगजेबाची बहीण जहाँआरा बेगम हिच्या खाजगी खर्चासाठी लावून दिले असल्याने तिने सुरतेच्या संरक्षणासाठी इतके प्रयत्न केले होते.

सुरतेवर हल्ला करण्यासाठी महाराजांनी आपली १५००० फौज कल्याणला जमा केली. तेथून नाशिकमार्गे ते सुरतेजवळ आले. या वेळेस ही बातमी सुरतेच्या इंग्रजांना लागली होती. त्यांनी ती खबर सुरतेचा सुभेदार गियासुद्दीनला सांगितले. परंतु त्याचा त्यावर अजिबात विश्वास बसला नाही. त्याला कारण की जानेवारी १६६४ मध्ये महाराजांनी प्रथम सुरत लुटली तेव्हा सुरतेच्या व्यापाऱ्यांनी मराठ्यांचा इतका धसका घेतला होता की अधूनमधून शिवाजी आल्याची अफवा सुरतेत उठत होती. अर्थात प्रत्येक वेळी थोडी धावपळ झाल्यावर ती अफवा असल्याचे सिद्ध होत असे. तसेच आताही अफवाच पसरविण्यात आली असावी असे गियासुद्दीनला वाटले. कारण शिवाजीचा मोगलांशी तह झाला असल्याचे त्याला ठाऊक होते. परंतु बादशहाने हा तह मोडल्याचे त्याच्या कानावर नव्हते. तेव्हा शिवाजी इतक्या दूर मोगली प्रदेशावर येणार नाही या भ्रमात गियासुद्दीन होता. २ ऑक्टोबर १६७० रोजी राजेंची १५००० फौज सुरतेवर पोहोचली तेव्हा गियासुद्दीनचे डोळे उघडले. पण तेव्हा खूप उशीर झाला होता.

आता मात्र गियासुद्दीन घाबरला. तो स्वत: जिवाच्या भीतीने सुरतेच्या किल्ल्यात दडून बसला. त्याने आपली ३०० फौज आणि सुरतेची रयत वाऱ्यावर सोडली. इंग्रज वखारवाल्यांनी आपला माल स्वालीच्या गोदीत जहाजावर आधीच सुखरूप नेवून ठेवला होता. मराठ्यांच्या फौजेने ३ ऑक्टोबरला सकाळपासून शहरावर हल्ला केला. इंग्रज, फ्रेंच आणि डच या परकियांच्या वखारी सोडून बाकीच्या शहरावर मराठ्यांनी लुटीचे शस्त्र उगारले. शहराचा ताबा मराठ्यांकडे आला होता. मराठ्यांनी सुरतेतील मोठमोठे वाडे खणून काढून लुटले. सोने, जड जवाहीर आणि रोकड मुबलक मिळाले. असे म्हणतात की नवल साहू आणि हरी साहू या दोन व्यापारी बंधूंकडे १३ लाखाची संपत्ती मराठ्यांना मिळाली. काझगरचा राजा नेमका या लुटीत सापडला. त्याच्याकडे औरंगजेबास देण्यासाठी आणलेला सोन्याचा पलंग आणि सोन्याची अंबारी होती, ती सर्व संपत्ती राजांना लुटीत मिळाली. या वेळच्या सुरत लुटीत मराठ्यांना दोन कोटीची संपत्ती मिळाली असा अंदाज आहे. काही इतिहास संशोधकांच्या मते ही लूट

६६ हजार रुपयांची होती. पण हा आकडा खूपच कमी वाटतो. कारण एकट्या साहू बंधूंकडेच तेरा लक्ष रुपये रोख मिळाले. तसेच काझगरच्या राजाकडून सोन्याचा पलंग व अंबारी मिळाली. याचे पुरावे आहेत.

५ ऑक्टोबरला लूट अर्धवट सोडून महाराज घाईघाईने परतीच्या वाटेला लागले. कारण काय घडले ते कळले नाही. परंतु घाईघाईने सर्व लूट घेऊन राजे बागलाण मार्गे नाशिकवरून राजगडावर परतत होते, इतक्यात राजांनी पुन्हा सुरत लुटल्याचे औरंगजेबास कळले. त्याने दाऊदखान कुरेशी आणि इसलाखखान या दोन सरदारांना शिवाजीवर पाठवले. या दोघांनी राजांना वणी दिंडोरी येथे गाठले. दोन्ही पक्षात जोरदार युद्ध झाले. अनेक मराठे मारले गेले. मोगलांची तर ३०० ची फौज या युद्धात गारद झाली. अर्थात विजय राजांचा झाला.

त्याचवेळी मोरोपंत पिंगळे हे जुन्नरजवळ होते. त्यांनी शिवनेरी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी ठरला. ज्या किल्ल्यावर शिवरायांचा जन्म झाला तो शिवनेरी गड स्वराज्यात कधीच नव्हता. जेव्हा जेव्हा मराठ्यांनी शिवनेरी घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा अपयश आले. मोरोपंतांनी लगेच आपला मोर्चा त्र्यंबकेश्वरकडे वळविला. ब्रह्मगिरीगड ताब्यात घेऊन ते साल्हेर मुल्हेरकडे गेले. हे दोन्ही गड प्रचंड होते. ते घेणे सोपे नव्हते. परंतु मोरोपंत केवळ पेशवे नव्हते तर ते उत्तम लढवय्ये होते. त्यांनी आपल्या युद्ध कौशल्याने हे दोन्ही गड स्वराज्यात आणले.

महाराज स्वत: बुऱ्हाणपूर लुटण्यासाठी गेले होते. बुऱ्हाणपूर म्हणजे मोगलांचे दक्षिणेचे द्वार होते. बुऱ्हाणपूर श्रीमंत शहर होते. परंतु काहीतरी असे घडले असावे की महाराजांनी बुऱ्हाणपूर न लुटता आजूबाजूची अनेक गावे लुटली आणि परत येताना वऱ्हाडातून आले. वऱ्हाडात त्यावेळी कारंजा नावाचे एक संपन्न शहर होते. तेथील व्यापारी इतके श्रीमंत होते की ते घर बांधताना भिंतीत कस्तुरी मिसळीत असत अशी वदंता होती. कारंजे म्हणजे वऱ्हाडचा खजिनाच. या शहरात लाड नावाची अनेक कुटुंबे राहत होती. त्यामुळे या शहराला ‘लाडाचे कारंजे’ असे म्हणत असत. राजांनी बुऱ्हाणपूरहून परतताना लाडाचे कारंजे लुटले. मोठमोठे वाडे खणून सोने, नाणे, हिरे, मोती काढण्यात आले. सुरतेप्रमाणे आगी लावण्यात आल्या नाहीत. फक्त लूट घेऊन ती ३००० बैलांच्या पाठीवर टाकून महाराज परत आले. अशा लुटीतून स्वराज्य वाढत होते. संपन्न होत होते.

महाराजांनी दुसऱ्या वेळेस सुरत लुटली तरी मुअज्जम शिवाजीविषयी काहीच

करीत नाही यामुळे औरंगजेबाचा त्याच्यावर संशय होता की शहाजादा आतून शिवाजीस सामील असावा. मुअज्जम औरंगजेबाला फौज कमी पडते म्हणून अर्ज करीत होता. दिल्लीहून आणखी फौज पाठवावी अशी वारंवार विनंती करीत होता. त्यामागे शहाजादा याचा इरादा असा होता की आपला पक्ष होईल तितका सबळ करून ठेवला. त्याच कारणासाठी मुअज्जम शिवाजी महाराजांशी शत्रूत्व धरीत नव्हता. औरंगजेबाच्या मागे आपल्या भावाभावात भांडणे होतील तेव्हा शिवाजीची शक्ती आपल्यामागे असावी यासाठी हा प्रयत्न होता.

याच सुमारास बुंदेलखंडातून एक वीस वर्षांचा तरुण महाराजांना भेटायला आला. बुंदेलखंडाचे राजे चंपकराय बुंदेले यांचे राज्य औरंगजेबाने बुडविले होते. चंपकरायचा मुलगा छत्रसाल हा दिलेरखानाच्या फौजेत होता. महाराजांनी कसे शून्यातून स्वराज्य उभे केले ते त्याने पाहिले होते. त्याला शिवाजी महाराजांविषयी आकर्षण वाटू लागले. अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानावर धाडसी हल्ला आणि आग्र्याहून सुटका या प्रसंगाचे छत्रसालाला कौतुक वाटे. त्याच्या मनात शिवाजीला भेटण्याची इच्छा झाली. एकदा तो फौजेबरोबर दक्षिणेत उतरला असता राजांना भेटला. राजांनी छत्रसाल राजाला मानाने वागवले. त्याचा सत्कार केला. महाराजांच्या दर्शनाने छत्रसाल भारावून गेला. त्याने महाराजांकडे नोकरीस राहण्याची इच्छा प्रदर्शित केली. महाराजांनी त्याला सल्ला दिला की त्याने बुंदेलखंडात परत जावून गेलेले राज्य पुन्हा मिळवावे. स्वतंत्रपणे शासन करावे. नोकरी करू नये. तसेच औरंगजेबाची भीती बाळगू नये. काही अडचण आल्यास मराठे मदत करतील. परंतु स्वतंत्र राहावे. छत्रसालाला महाराजांचा सल्ला भावला. तो पुन्हा बुंदेलखंडात गेला. त्याने गेलेले राज्य पुन्हा उभे केले.

स्वराज्य आता चांगलेच मोठे झाले होते. पुरंदरच्या तहात गमावलेले गड आणि प्रदेश पुन्हा स्वराज्यात आला होता. सुरत, कारंजे, जुन्नर यांसारखी शहरे लुटल्यामुळे स्वराज्याचा खजिना होन मोहरांनी भरला होता. राजांना जाणवले की आता फार दिवस राजधानी राजगडावर ठेवणे योग्य नाही. राजगडावर रायगडाप्रमाणे सुरक्षितता नाही, शिवाय रायगडाचे कामही पूर्ण झाले होते. सरकारी कचेऱ्या, अष्टप्रधानांचे वाडे, राणीवसा सारे काही मनाप्रमाणे बांधून झाले होते. शहाजीराजांचीही तशी इच्छा होती. त्यामुळे चांगला दिवस पाहून महाराजांनी सहकुटुंब आपला मुक्काम रायगडावर नेला. यापुढे रायगड ही स्वराज्याची राजधानी ओळखली जाणार होती. राजमाता जिजाबाई यांचे आता वय झाले होते. त्यांना रायगडावरची सर्द हवा पुढे मानवणार नाही. या

विचाराने महाराजांनी गडाखाली पाचाडगावी त्यांच्यासाठी मोठा प्रशस्त वाडा बांधला होता. जिजाबाई पाचाडच्या वाड्यात राहू लागल्या. त्यांच्या सेवेसाठी पुतळाबाई राणीसाहेब ही पाचाडला वाड्यात राहू लागल्या.

१६७० च्या डिसेंबरात महाराजांनी खानदेश आणि वऱ्हाडाची लूट केली. बहादूरपुरा लुटले, वऱ्हाडातले कारंजा शहर लुटले. तेथून ३०० बैलांवर लादून लूट आणली. त्यावेळी मोरोपंतांनी साल्हेर गडाला वेढा घातला. मोगली किल्लेदार फत्तेह उल्लाखान पहिल्याच हल्ल्यात मारला गेला. साल्हेर फत्तेह उल्लाखानच्या मेव्हण्याच्या हाती गेला. मराठ्यांनी मेव्हण्याशी बोलणे लावले. त्याला आपले भवितव्य दिसू लागले. त्याने पैसे घेऊन साल्हेर मोरोपंतांचे हवाली केला. ती तारीख होती ५ जाने. १६७१ तेव्हापासून साल्हेर मराठ्यांच्या ताब्यात होता. बागलाणातील साल्हेरचा किल्ला हा महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला आहे. या किल्ल्याबद्दल जयराम आपल्या पर्णालपर्वत ग्रहणाख्यान या ग्रंथात म्हणतो 'सह्याद्रीचे मस्तक जो साल्हेर बागलांच्या ताब्यातील पूर्वी पृथ्वीवर अतिविख्यात किल्ला' तसेच चिटणीसी बखरीत 'साल्हेर गड शिवरायांच्या रणांगणातील युद्धविजयाचा स्मारक स्तंभ आहे,' असे गौरवाने म्हटले आहे.

असा हा साल्हेरगड ५ जाने. १६७१ पासून महाराजांच्या ताब्यात होता. त्यावर मराठ्यांचे लष्करी ठाणे होते. औरंगजेबाला धडा शिकवण्यासाठी महाराजांनी जे तांडवनृत्य आरंभले होते, आठवड्याला तीन तीन किल्ले स्वराज्यात सामील होत होते हे पाहून औरंगजेबाला दक्षिणेकडील चिंता वाटू लागली होती. त्यावर उपाय म्हणून औरंगजेबाने बहादूरखान कोकलताश यांस गुजरातेतून महाराष्ट्रात पाठवले. हा बहादूरखान औरंगजेबाचा दूधभाऊ होता. औरंगजेबाने महातबखानाकडे सर्वाधिकार देऊन त्याला मराठ्यांना बागलाणातून हुसकून देण्यास सांगितले. परंतु महाबतखान आणि दाऊदखान यांच्यात श्रेयवादावरून भांडण सुरू होते. महाबतखान मराठ्यांचा बंदोबस्त न करता पारनेरास बसून चैन, विलास करीत होता. पारनेरमध्ये अतिवृष्टीमुळे फौजेचे हाल होत होते. महाबतखानाच्या छावणीत रोगराईने थैमान घातले होते. फौज आणि गुरे जनावरे मृत्यूमुखी पडत होती. परंतु खानाचे तिकडे लक्ष नव्हते. तो फक्त विलासात दंग होता. औरंगजेबाला हे त्याचे प्रताप कळताच औरंगजेबाने महाबतखानास दिल्लीस परत बोलावले.

ऑक्टोबर १६७१ मध्ये बहादूरखान आणि दिलेरखान यांनी साल्हेरला वेढा घातला. त्या दोघांना साल्हेर घेण्यात यश आले असते तर औरंगजेब त्यांच्यावर बेहद खूश झाला असता. अगणित मोगली फौज आणि जबरदस्त खजिना

जवळ असल्याने साल्हेर घेणे सहज शक्य होईल असे या दोघांना वाटत होते. साल्हेरवर मराठ्यांचे लष्करी ठाणे असल्याने मराठ्यांच्या दृष्टीने किल्ल्याला अधिक महत्त्व होते. दिलेरखान, राव अमरसिंह, चंदावत, इसलाखखान असे चाळीस-पन्नास सरदार घेऊन साल्हेरवर येतो आहे हे महाराजांना कळताच त्यांनी सरनौबत प्रतापराव गुजर आणि मोरोपंत पेशवे यांना त्वरीत साल्हेरच्या मदतीस पाठवले. महाराजांनी प्रतापरावास आज्ञा केली.

'तुम्ही लष्कर घेऊन सिताफीने साल्हेरीस जावून खान मारून चालविणे आणि कोकणातून मोरोपंत पेशवे येतील. तुम्ही वरघाटी येणे असे दुतर्फा चालून जाऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणे.'

महाराजांची अशी आज्ञा होताच प्रतापराव फौज घेऊन साल्हेरीस गेले. कोकणातून मोरोपंतही आले. दोघे येऊन पाहतात तो मोगलांच्या साठ हजार फौजेने गडाला वेढा घातला होता. दिलेरखान साल्हेरीस वेढा टाकून स्वतः जवळचाच रवळागड घेण्यासाठी गेला होता. तो गड तसा आकाराने छोटा असल्याने आपण तो सहज घेऊ असा दिलेरला विश्वास होता. परंतु त्याला रवळागडावर यश आले नाही. मराठ्यांनी त्याला पळवून लावले. आता रित्या हस्ते साल्हेरीस जाण्याने आपले हसे होईल असे दिलेरखानाला वाटले. तो रवळागडाचा नाद सोडून कणेरगडाकडे गेला. कणेरगड घेण्याचा त्याचाच विचार होता.

कणेरगडावर किल्लेदार रामाजी पांगेरा होता. त्याच्या तलवारीचे पाणी दिलेरखानाने अनुभवले नसले तरी अफझलखान वधाच्यावेळी आदिलशाहीची कत्तल करतानाचे त्याचे शौर्य त्याने ऐकले होते. त्यामुळे खान सावध होता. खानाने एकदम आपली फौज कणेरगडावर घातली. खानाची फौज दहा हजार होती तर रामजीकडे जेमतेम एक हजार मावळे होते. परंतु रामजी पांगेरा घाबरला नाही. त्याने आपल्या फौजेला सांगितले की जे मरायला तयार असतील अशा मर्दांनीच माझ्याबरोबर यावे. आणि काय आश्चर्य सातशे मावळे रामजीबरोबर मरायला तयार झाले. या सातशे वीरांना घेऊन रामजीने दिलेरच्या पठाणांवर निकराचा हल्ला केला. रामजीच्या आणि त्याच्या सातशे मावळ्यांना डोईवरच्या फेटयाचेही भान नव्हते. बोडके वीर मराठे निकराने लढत होते. एखाद्या जंगलात वणवा भडकावा आणि त्यात उंच वृक्ष उन्मळून पडावे तसे खानाचे पठाण मराठ्याच्या तलवारी पुढे उन्मळून पडत होते. सातशे मावळ्यांनी बाराशेच्यावर पठाण कापून काढले. खानाला पुरंदरच्या युद्धात लढणाऱ्या मुरारबाजींची आठवण झाली. मराठ्यांनी दिलेरखानाला कणेरगडावरून पळवून लावले.

महाराजांना रायगडावर रवळागडाची आणि कणेरगडाची हकिकत समजत होती. त्यांना मावळ्यांच्या पराक्रमाचे कौतुक वाटत होते. पण राजांना साल्हेरची काळजी वाटत होती. मोगली फौज साठ हजार होती. त्या मानाने मराठे खूपच कमी होते. महाराजांनी सरनौबत प्रतापरावांच्या मदतीस मोरोपंतांच्या जोडीला खास एक वीर पाठवण्याचे ठरविले. हा वीर म्हणजे सूर्यराव काकडे. सूर्यराव म्हणजे शौर्य, सूर्यराव म्हणजे जिद्द, सूर्यराव म्हणजे हिंमत आणि सूर्यराव म्हणजे हमखास यश. महाराजांनी सूर्यरावास साल्हेरीस जाण्याची आज्ञा केली. सूर्यराव काकडे, आनंदराव मकाजी, शिदोजी निंबाळकर, गोदाजी जगताप यांना सोबत घेऊन साल्हेरीच्या बचावासाठी गेले आणि महाराज साल्हेरीबाबत निर्धास्त झाले. त्यांना साल्हेरीची काळजी उरली नाही.

साल्हेरवर मोगलांचा वेढा चालू होताच. बाहेरून सरनौबत प्रतापराव, पेशवे मोरोपंत आणि झुंजार सूर्यराव काकडे असे तिघे आपले घोडदळ आणि पायदळ घेऊन हल्ला करीत होते. या हल्ल्यात सर्व मावळी फौज एकदम वेढ्यात घुसली. 'हरहर महादेव'च्या गर्जना उठल्या आणि एकच कापाकापी सुरु झाली. गडाखालची झुंबड गडावरून मावळे पाहत होते. गडाखाली रणकल्लोळ उडाला होता. मोगली फौजेत पठाण, रजपूत, रोहिले तर होतेच, पण हत्ती, उंटही भरपूर होते. गडाखाली चाललेल्या युद्धामुळे इतका धुरळा उडत होता की सहा मैलपर्यंत माणूस माणसाला ओळखू शकत नव्हता. रक्ताचे पूर वाहून रणांगणावर चिखल तयार झाला होता. दोन्ही पक्षाचे दहा हजार माणूस कामी आले. घोडे उंट इतके मेले की मोजणेच शक्य नव्हते. मोगलांचे ६००० घोडे मराठ्यांनी धरून नेले. शंभर दीडशे हत्ती, सहा हजार उंट मराठ्यांना मिळाले. त्यावरून युद्धसामग्री, संपत्ती, तंबू आणि बिछाईत असे सामान मराठ्यांनी वाहून नेले. मोगलांचे बावीस मोठमोठे सरदार मराठ्यांनी पकडले. इसलाखखान मियानाचा पाडाव झाला.

'सूर्यराव पंचहजारी मोठा लष्करी धारकरी याणे युद्ध थोर केले' असा बखरीत उल्लेख आहे. 'सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारती जैसा कर्ण योद्धा याच प्रतिक्षेचा असा शूर पडला. जंबुरियाचा गोळा लागून सूर्यराव पडला' असे सूर्यराव पडल्याचे वर्णन आहे.

महाराजांनी प्रतापराव, मोरोपंत आदींना नावाजलेच, पण बालपणीच्या मित्राच्या सूर्यराव काकडेच्या मृत्यूने महाराजांनी अतीव दु:ख झाले. महाराजांनी सूर्यरावाच्या मृत्यूचा शोक करताना उद्‌गार काढले की 'माझा सूर्यराव सूर्यमंडळ भेदून गेला.'

सूर्यराव म्हणजे हमखास यश हे सत्य पुन्हा एकदा खरे ठरले. साल्हेर मराठ्यांनी राखला.

विजापूरचा आदिलशहा अली हा २४ नोव्हेंबर १६७२ रोजी पैगंबरवासी झाला. त्याच्या गादीवर सिकंदर आदिलशहा आला. त्याचा वजीर खवासखान हा महाराजांशी वैर बाळगून होता. तो मराठ्यांशी द्वेषाने वागे. त्या खवासखानास मराठी झटका देण्याच्या इराद्याने राजांनी सीमेवरचा पन्हाळा हा जबरदस्त किल्ला घेण्याचे ठरविले. महाराजांनी सूरनीस अनोजी दत्तो यांना या मोहिमेचे मुख्य नेमले आणि हमखास यश मिळावे यासाठी कोंडाजी फर्जंदास त्याच्या मदतीस दिले. कोंडाजी म्हणजे मूर्तिमंत धाडस. कोंडाजीला भय भीती हे शब्दच ठाऊक नव्हते. कोंडाजीने पन्हाळ्याचा पूर्ण अभ्यास केला. पन्हाळ्यावर पहारे कधी बदलतात, कुठे जास्त कमी पहारे असतात. पन्हाळ्यावर फौज किती आहे अशी सर्व माहिती कोंडाजीने मिळवली. आणि एक धाडसी बेत आखला. त्या बाबत असे ठरले की अनोजींनी आपले स्वार घेऊन पन्हाळ्याच्या झाडीत लपून बसावे. कोंडाजी साठ निवडक मावळ्यांना घेऊन रात्रीच्या वेळी दोर लावून गडावर चढेल व अचानक गडावर हल्ला करेल. कोंडाजीने गडाचा मुख्य दरवाजा आतून उघडला की अनोजींच्या फौजेने आत शिरून गड काबीज करावा.

६ मार्च १६७३ च्या रात्री कोंडाजीने आपल्या साठ साथीदारांसह गडात प्रवेश केला. गुपचूप गडावरचे पहारे कापून मुख्य दरवाजाकडे जाण्यात काय मजा? म्हणून कोंडाजीने कर्णे वाजवून गडाला पूर्ण जागे केले. गड जागा होऊन लढायला येताच त्यांच्यावर कोंडाजीच्या साठ भुतांनी जबरदस्त हल्ला केला. आदिलशाही फौज कापत कापत कोंडाजीने मुख्य दरवाजा उघडला. त्यानंतर अनोजीची फौज आली आणि गडावर मराठी निशाण लागले. अवघ्या साठ मावळ्यांनी तीन तासात निद्रिस्त गडाला जागे करून पन्हाळा घेतला. कोंडाजीच्या धाडसाला उपमा द्यायची तर कोंडाजीच्या धाडसाचीच द्यावी लागेल आणि याच पन्हाळ्यावर नेतोजी वेळेवर न आल्यामुळे प्रत्यक्ष महाराजांना अपयश स्वीकारावे लागले होते. हजार मावळे गमवावे लागले होते हे विशेष.

महाराजांनी मूळ जहागिरी जी शहाजीराजांना मिळाली होती ती फक्त पुणे, सुपे, इंदापूर, चाकण या भागात होती. त्या वीतभर जहागिरीतून महाराजांनी जे अखंड स्वराज्य निर्माण केले ते खास करून आदिलशाहीचा मुलूख कुरतडूनच केले. मूळ जहागिरीही आदिलशाही मुलुखातच होती. त्याचा परिणाम असा होत असे की प्रत्येक आदिलशहा मराठ्यांना शत्रू मानून त्यांचा

नाश करण्यासाठी प्रयत्न करीत असे. आदिलशाहीचा मराठ्यांवर कायम राग असे. आता फेब्रुवारी १६७२ पासून सिकंदर आदिलशहा आणि त्याचा वजीर खवासखान या दोघांच्याही डोळ्यात शिवाजी खुपत होता. शिवाजीचा काहीतरी कायमचा बंदोबस्त करायचा या विचारात सिकंदर आदिलशहा आणि वजीर खवासखान असता महाराजांच्या कोंडाजीने पन्हाळा काबीज केल्याने दोघेही खवळले. वजीर खवासखानाने बहलोलखानास शिवाजीवर नामजाद केले.

खवासखानाने बहलोलखानास मदतीसाठी आदिलशाही सरदार दिले. बहलोलखानाने परळीचा गड घेऊन तो सातारा भागात आला. राजांना बहलोलखान येत असल्याची बातमी मिळाली. त्यांनी सेनापती प्रतापराव गुजर यांना आज्ञा केली की खानास संपविणे. प्रतापराव १५००० फौज घेऊन निघाले. खान उमराणीजवळ होता. सैन्याचा जिथे तळ पडतो तिथे दाणा, गवत यांचा साठा असणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे सैन्याला आणि जनावरांना पिण्यासाठी पाणी असावे लागते. उमराणीजवळ असा पाण्याचा साठा होता. प्रतापरावांनी प्रथम हा पाणवठा आपल्या ताब्यात घेतला. त्याच्याभोवती मराठ्यांचे पहारे बसले. त्यामुळे खानाच्या सैन्याचे आणि जनावरांचे पाण्यावाचून हाल होऊ लागले. खान प्रतापरावांना शरण आला. गयावया व आर्जवे करू लागला. त्याने प्रतापरावांकडे धर्मवाट मागितली. प्रतापरावांना त्याची दया आली. प्रतापरावांनी हाती आलेल्या बहलोलखानास सोडून दिले. राजे त्यावेळी पन्हाळ्यावर होते. त्यांना हे वृत्त कळताच ते प्रचंड चिडले. राजांनी प्रतापरावास पत्र लिहून विचारणा केली की बहलोलखान तावडीत सापडला असता त्यास काय निमत्ये सोडून दिले? महाराजांनी प्रतापरावांची निर्भत्सना केली आणि खानाचा पराभव केल्याशिवाय आम्हास तोंड दाखवू नये असा खरमरीत निरोप पाठवला.

प्रतापरावांना आपली चूक कळून आली. महाराज आपल्यावर खूप रागावले आहेत ही गोष्ट प्रतापरावांना मनाला लागली. आता आपल्याला महाराजांचे दर्शन कधीच होणार नाही ही कल्पनाच प्रतापरावांना सहन होत नव्हती. अत्यंत उद्विग्न परिस्थितीत प्रतापराव धारवाड, हुबळी या बाजूला लूट करीत फिरत होते. १६ एप्रिल १६७३ त्यांनी हुबळीची इंग्रजांची वखार लुटण्याची नोंद मिळते. इंग्रज वखारीस खणून लुटण्यात आली. तेथून तो कडवाड प्रांती फिरू लागला.

असेच काही महिने गेले आणि बहलोलखान पुन्हा तयारी करून मराठ्यांविरुद्ध हालचाली करू लागला. त्याने कोल्हापूरला तळ दिला आणि तेथून पन्हाळा, कोकणातील राजापूर येथील मराठ्यांना त्रास देऊ लागला.

प्रतापरावास बातमी लागली की बहलोलखान बेळगावहून कोल्हापूरकडे येत आहे. तेव्हा उमराणीच्या आपल्या चुकीची दुरुस्ती करण्याची हीच वेळ आहे हे प्रतापरावाने जाणले. बहलोलखान कोल्हापूरपासून ६५ कि.मी. नेसरीच्या खिंडीतून येत होता. प्रतापरावाने नेसरीच्या खिंडीत खानास गाठले. पण समोर खान पाहून उताविळपणाने प्रतापराव आणि त्यांचे सहा सरदार असे सात वीर शत्रूवर तुटून पडले. प्रतापरावांचा हा अविचार होता. पण महाराजांचा पूर्वीचा निरोप प्रतापरावांना इतका लागला होता की त्यांनी हा अविचार केला. परिणामी २४ फेब्रुवारी १६७४ रोजी प्रतापराव आणि त्यांचे सहा सरदार असे सात जणांनी नेसरीच्या खिंडीत आत्मयज्ञ केला.

नेसरीच्या खिंडीत सात वेडे वीर सात हजार फौजेच्या छावणीवर तुटून पडत होते. बहलोलच्या फौजेला कापीत कापीत पुढे पुढे सरकणारे हे वीर म्हणजे आकाशातून कडाडणाऱ्या सात विजाच भासत होत्या. सातही वीरांच्या अंगावर अगणित जखमा होत्या, तरी त्यांच्या तलवारी शत्रूवर चालत होत्या. खानाच्या फौजेने या सात वीरांना चहुबाजूंनी घेरले आणि क्षणार्धात सात वीर नेसरीची खिंड केसरी करून धारातीर्थी पडले. तो दिवस होता २४ फेब्रुवारी १६७४ म्हणजे शिवपुत्र राजारामराजे यांचा चौथा वाढदिवस.

आनंदराव मकाजी हे प्रतापरावांच्या फौजेत दुय्यम अधिकारी होते. त्यांना प्रतापरावांच्या आत्मबलिदाना विषयी समजताच त्यांनी प्रतापरावांची फौज घेऊन खानावर हल्ला केला. प्रतापरावांची फौजही शौर्याने लढली आणि बहलोलखानाचा दारुण पराभव झाला. खान पळून गेला.

राजांना या दोन्ही वार्ता रायगडावर समजताच त्यांना अतिव दुःख झाले. आपल्या पत्रातील शब्द प्रतापरावांनी मनाला लावून घेतले आणि हे वेडे साहस केले. त्यांच्या अकाली मृत्यूला आपणच जबाबदार आहोत याचे शल्य महाराजांनी आयुष्यभर वागवले.

रायगडावर तेव्हा राज्याभिषेकाची तयारी चालू होती. काशीचे विद्वान साक्षात वेदनारायण गागाभट्ट यांचा मुक्काम रायगडावर होता. राज्याभिषेक करून घेणे ही गागाभट्टांची कल्पना असल्याने ते या तयारीवर जातीने लक्ष ठेवून होते. इतक्या गडबडीत असूनसुद्धा महाराज मोरोपंतांना घेऊन खटाव जवळील बोसरे या प्रतापरावांच्या गावी त्यांच्या कुटुंबाच्या सांत्वनासाठी गेले. महाराजांनी प्रतापरावांच्या कुटुंबाचे सांत्वन केले. महाराज म्हणाले 'आमच्या शब्दाखातर प्रतापराव आपल्याला सोडून गेले, आम्ही त्याबद्दल दिलगीर आहोत. प्रतापराव आपल्या सगळ्यांनाच चटका लावून गेले' असे म्हणून महाराजांनी प्रतापरावाच्या

अडीच वर्षांच्या मुलीला मांडीवर घेतले. ते पाहून प्रतापरावांच्या आप्तातून कोणीतरी स्त्री म्हणाली, 'पोर पोरकी झाली महाराज.' त्यावर क्षणाचाही विलंब न करता महाराज म्हणाले होते, 'जिला आम्ही उचलून घेतले ती पोर पोरकी झाली तर उद्या आमच्या छत्रपतीपदावर कोण विश्वास ठेवेल?'

महाराजांनी प्रतापरावांच्या कुटुंबाला दिलेला शब्द पुढे खरा केला. १५ मार्च १६८० रोजी प्रतापरावांच्या जानकीला राजारामाची पत्नी करून भोसले कुळात आणली.

राज्याभिषेकासारख्या महत्त्वाच्या प्रसंगात व्यस्त असताना वेडे साहस करणाऱ्या प्रतापरावांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी त्यांच्या घरी जाऊन त्यांची कन्या पोरकी होऊ नये म्हणून आपली सून करून घेणारा राजा श्रेष्ठ म्हणावा की त्या राजाच्या एका शब्दासाठी आत्मबलिदान करणारे ते सात वीर धन्य मानावे!

महाराज आता अगणित अमाप वैभवाचे स्वामी झाले होते. पुरंदरच्या तहात गेलेले स्वराज्य पुन्हा मिळाले होते, वाढले होते. त्यांची आग्र्याहून झालेली सुटका हे एक अद्‌भुत नाट्य होते. उत्तरेत अजून त्या पलायनाचा प्रभाव लोकात होता. उत्तर प्रदेश राजस्थानात भाट चारण यांना हा एक नवीन विषय मिळाला होता. त्यात औरंगजेब त्याच प्रदेशात हिंदूंविरुद्ध हैदोस घालत होता. त्याच्या शिवाजीचे श्रेष्ठत्व सिद्ध होत होते. शिवाजीच्या कर्तृत्वाने लोक भारावले होते. असाच एक भारावलेला तरुण कवी भूषण १ जून १६७३ रोजी रायगडावर 'शिवभूषण' लिहून गेला. त्याने शिवाजीविषयी लिहिले 'पातशाह बावनो दिली के पातशाह जिती, पातशाह हिंदुपती पातशाह सेवाने' याचा अर्थ 'बावन्न पातशाह्या जिंकणाऱ्या दिल्लीच्या पातशाहा औरंगजेबास हिंदुपती पातशाहाने जिंकले.'

शिवाजी महाराज आता स्वराज्यापुरते वा महाराष्ट्रापुरते राहिले नव्हते. आपल्या अलौकिक आणि असामान्य कर्तृत्वाने त्यांनी उभ्या भारताला मोहिनी घातली होती. महाराजांकडून भारतीयांच्या अनंत अपेक्षा होत्या. त्यांच्याविषयी समर्थ रामदास म्हणतात.

'निश्चयाचा महामेरु, बहुत जनांसी अधारु।
अखंडास्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी।।
यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत।
पुण्यवंत आणि जयवंत जाणता राजा।।'

शिवाजी महाराजांसारख्या युगपुरुषाचे यथार्थ वर्णन समर्थांसारख्या अधिकारी

राष्ट्रसंतांच्या शब्दात पाहून महाराजांचे श्रेष्ठत्व अधिकच प्रकर्षाने जाणवते. याच श्रेष्ठत्वाने भारावलेला कवी भूषण महाराजांबद्दल लिहितो.

'कुंद कहा पथवृंद कहा,
अरुचंद्र कहा सरजा जस आगे।
भूषण भान कृपाण कहा,
वखुमान प्रताप महितल पागे।।
राम कहा द्विजराम कहा,
बलराम कहा, रण मे अनुरागे।
बाज कहा, मृगराज कहा,
अति साहस मे सिवराजसे आगे।।'

अर्थ - कुंदकळ्या, दूध तसेच चंद्र यांची शुभ्रता, शीतलता शिवाजीपुढे काय असेल, भूषण म्हणतो सूर्य आणि अग्नीचे तेजही शिवाजीपुढे काहीच नाही. राम, परशुराम आणि बलराम यांनी केलेला पराक्रमही शिवाजीच्या पराक्रमापुढे कमी पडतो. त्याचप्रमाणे ससाणा आणि वनराज सिंह यांचे साहस शिवाजीपुढे काय असणार?

अशा शिवरायांना विधीवत राज्याभिषेक झालेला नव्हता. तो तसा होणे ही काळाची गरज होती. तमाम हिंदूंच्या हक्कांसाठी, रक्षणासाठी हिंदूंचे स्वतःचे पातशाह होणे आवश्यक होते. हिंदूंना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या निवारणार्थ हक्काचे व्यासपीठ हवे होते.

# छत्रपतींचा परिवार

एखादी व्यक्ती जेव्हा घडत असते तेव्हा आजूबाजूची सामाजिक परिस्थिती, त्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती, त्या ठिकाणची भौगोलिक स्थिती यांसारख्या अनेक घटकांचा तो परिणाम असतो. असाच व्यक्तीला घडविणाऱ्या घटकांपैकी एक म्हणजे त्या व्यक्तीचे कुटूंब, परिवार, सगेसोयरे वगैरे. या सर्वांचा त्या व्यक्तीच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असतो. माता-पिता आप्त हे आपल्यावर नकळत संस्कार करीत असतात. आईवडील व आप्त असलेल्या मुलांच्या वाढीत आणि आईवडील-आप्त नसलेल्या मुलांच्या वाढीत कमालीचा फरक पडत असतो. अर्थात सामान्य माणसाच्या जीवनात हे संस्कार फक्त त्या व्यक्तीच्या जीवनावर परिणाम करीत असतात. परंतु तीच व्यक्ती जेव्हा राज्यकर्ती असते तेव्हा हे संस्कार त्याच्या वैयक्तिक जीवनाबरोबरच राज्यावर, रयतेवर आणि पुढे इतिहासावर परिणाम करतात. म्हणून व्यक्ती लहान सामान्य असो वा युगकर्ती त्याच्या कुटुंबाचा विचार होणे आवश्यक असते.

शिवरायांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ आईसाहेब या विदर्भातील सिंदखेडराजा येथील सरदार लखुजी जाधवराव यांच्या कन्या. लखुजी जाधवरावांनी स्वपराक्रमावर बारा हजारांची मनसब आणि सरदारी मिळविली होती. शिवरायांचे पिता शहाजी महाराज हे वेरुळच्या भोसले कुटुंबातील वीर पुरुष होते. या घराण्यात बाबाजी भोसले, मालोजी भोसले, विठोजी, शरीफजी आणि शहाजी हे सारेच शौर्य गाजवून होते. त्यामुळे आईवडिलांकडून शौर्याचा वारसा शिवरायांना लाभला होता.

शहाजीराजांना दोन पत्नी होत्या. थोरली पत्नी वीरमाता जिजाऊसाहेब तर धाकटी पत्नी तुकाबाईसाहेब. या व्यतिरिक्त शहाजी राजांना अंगवस्त्र आणि दासीही होत्या. तुकाबाईराणी साहेबांना व्यंकोजी ऊर्फ एकोजीराजे नावाचा एक पुत्र होता. शहाजीराजांच्या मृत्यूपश्चात बंगळूरची जहागिरी या

एकोजीराजांकडे गेली. तर थोरल्या पत्नी जिजाबाई यांना एकूण सहा अपत्ये झाली. त्यापैकी चार अपत्ये नियतीने बालपणीच नेली. या सहा अपत्यांपैकी दोन अपत्ये म्हणजे थोरले संभाजीराजे आणि धाकटे शिवराय, हेच वाढले व मोठे झाले. त्यापैकी संभाजीराजे हे वडिलांसमवेत बंगळूर येथे होते तर धाकटे शिवाजीराजे जिजाऊंबरोबर पुणे जहागिरीवर आले. जिजाऊचे थोरले पुत्र संभाजीराजे यांचा कनकगिरीच्या लढाईत १६५४ मध्ये मृत्यूमुखी पडले. कै. शेजवळकर यांच्या मते संभाजीराजे १६६३ पर्यंत हयात होते, पण ते खरे नाही.

शिवरायांचे सख्खे बंधू संभाजीराजे यांचा विवाह शिवनेरी किल्ल्याचे किल्लेदार विश्वासराव यांच्या मुलीशी, जयंतीबाईसाहेब यांच्याशी झाला होता. त्यांना उमाजीराजे नावाचा एक पुत्र होता. थोरल्या संभाजीराजांच्या कनकगिरांच्या लढाईत मृत्यू झाल्यानंतर या जयंतीबाईसाहेब चिरंजीव उमाजीराजे यांना घेऊन शिवरायांच्या आश्रयाला आल्या होत्या. उमाजीराजे जाणते झाल्यानंतर मातोश्री थोरल्या वहिनीसाहेब यांच्या आग्रहाखातर शिवरायांनी उमाजीराजे यांना स्वतंत्र मोहिमेवर पाठविले होते. परंतु दुर्दैवाने या पहिल्याच मोहिमेत उमाजीराजांचा मृत्यू झाला. जयंतीबाई शिवरायांकडे राहत होत्या. १६७० पर्यंत त्यांचा उल्लेख आढळतो. त्यानंतर जयंतीबाईंनी मुलगा दत्तक घेतला होता. त्यांना शिवरायांनी काही गावे चोळी बांगडीसाठी दिली होती. तेथेच त्या वाडा बांधून राहत होत्या, असे म्हणतात. परंतु त्यास ऐतिहासिक पुरावा नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विवाहांविषयी अनेक मते आहेत. तसेच शिवरायांना अंगवस्त्रे असली तरी त्याने काहीच बिघडत नाही. त्याकाळी अंगवस्त्रे असणे हे मोठेपणाचे लक्षण मानले जात होते. स्वतः शहाजीराजांना अंगवस्त्रे होती. शिवपुत्र धर्मवीर संभाजी महाराज आणि त्यांचे पुत्र पुण्यश्लोक छत्रपती शाहू महाराज यांनाही अंगवस्त्रे होती.

शिवरायांना एकूण सहा ते आठ पत्नी होत्या असे उत्तरकालीन ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होते. त्यांच्या पहिल्या पत्नी सई बाईसाहेब यांच्याशी महाराजांचा विवाह १० व्या वर्षी जिजाऊ आईसाहेबांनी लावला होता. त्या फलटणच्या निंबाळकर घराण्यातून होत्या. हा विवाह १६४१ मध्ये झाला.

महाराजांची दुसरी पत्नी सगुणाबाई या शिर्के कुटुंबातून आल्या होत्या. हे लग्न १६४१ मध्ये झाले होते. काही ज्ञात पुराव्यावरून महाराजांच्या पहिल्या लग्नाला शहाजीराजे हजर राहू शकले नव्हते म्हणून त्यांनी महाराजांचे दुसरे लग्न १६४२ मध्ये सोयराबाई यांच्याबरोबर केले होते असे उल्लेख आहेत. परंतु महाराजांच्या पत्नीबाबत पुराव्यात एकवाक्यता नाही. महाराजांची तिसरी

पत्नी ही सोयराबाई मोहिते घराण्यातून आली होती. हा विवाह बंगळूर येथे १६४२ मध्ये शहाजीराजे यांच्या देखरेखीखाली झाला.

महाराजांची चौथी पत्नी सकवारबाई गायकवाड. हे लग्न १० जाने. १६५७ रोजी झाले होते.

महाराजांची पाचवी पत्नी काशीबाई ह्या जाधव घराण्यातून होत्या. यांच्याशी विवाह ८ एप्रिल १६५७ रोजी झाला होता. यांचा मुक्काम अधिकतर पाचाडच्या वाड्यात असे. यांना अपत्य झाले नाही. याचा मृत्यू राज्याभिषेकापूर्वी १६ मार्च १६७४ रोजी पाचाडच्या वाड्यात झाला.

महाराजांची सहावी पत्नी पुतळाबाई या पालकर घराण्यातून होत्या. यांचे लग्न १५ एप्रिल १६५९ रोजी झाले. यांना अपत्य झाले नाही. या महाराजांना दैवत मानीत असत. महाराजांच्या मृत्यूसमयी या पाचाडच्या वाड्यात होत्या. महाराजांचा मृत्यू झाल्याची यांना खबर लागू दिली नव्हती. त्यामुळे संभाजीराजे पन्हाळ्यावरून रायगडी आल्यावर २७ जून १६८० रोजी या सती गेल्या. महाराजांचे जोडे छातीशी कवटाळून त्या चितेवर चढल्याची नोंद आहे.

याशिवाय सातवी पत्नी लक्ष्मीबाई विचारे आणि आठवी पत्नी इंगळे घराण्यातून आल्या होत्या, अशी बखरीत नोंद आहे.

अशा एकूण अष्ट नायिका महाराजांच्या संसारात होत्या. या शिवाय दोन अंगवस्त्रे होती, असे काही बखरीत उल्लेख आहेत. परंतु महाराजांची एकूण विचारसरणी, कार्यकाळ आणि मोहिमा, वेळ, आयुष्य वगैरे पाहता ही शक्यता वाटत नाही.

शिवाजी महाराजांना व त्यांच्या आठ पत्नींना एकूण आठ अपत्ये झाली. त्यात पुतळाबाई राणीसाहेब, काशीबाई राणीसाहेब, गुणवंताबाई राणीसाहेब आणि लक्ष्मीबाई राणीसाहेब यांना अपत्यप्राप्ती झाली नाही. तर सईबाई राणीसाहेब यांना सखुबाई ऊर्फ सकवारबाई, राणूबाई आणि अंबिकाबाई अशा तीन कन्या व संभाजीराजे हे १४ मे १६५७ ला पुरंदरवर जन्मलेले पुत्र अशी चार अपत्ये होती. त्यापैकी सखुबाई यांचा विवाह फलटणचे राजे बजाजी निंबाळकर यांचे पुत्र महादजी यांच्याबरोबर झाला होता. बजाजी निंबाळकर यांना बाटवण्यात आले होते. महाराजांनी त्यांना शुद्धी करून पुन्हा हिंदूधर्मात घेतले होते. परंतु तरी समाजाने या शुद्धीकरणास मनापासून संमत केले नव्हते. त्यामुळे महादजीचे लग्न जमत नव्हते. त्यावर उपाय म्हणून महाराजांनी महादजीला आपली कन्या सखूबाई दिली होती. सईबाईची दुसरी कन्या राणूबाई यांचे लग्न वाईचे अचलोजी जाधवराव यांच्याशी झाले होते. तर तिसरी कन्या

अंबिकाबाई हिचे लग्न ताराळ्याचे हरजीराजे महाडिक यांच्याशी आले होते. हरजीराजांना कर्नाटकातील जिंजीचे राज्य व्यवस्था पाहण्यास सांगितले होते.

महाराजांच्या दुसऱ्या राणीसाहेब सोयराबाई यांना एक पुत्र राजारामराजे जन्म २४ फेब्रुवारी १६७० आणि एक कन्या दीपाबाई अशी दोन अपत्ये होती. या दीपाबाईचे लग्न विसाजीराव पालकर यांचेबरोबर लावण्यात आले होते. तसेच महाराजांच्या पत्नी सगुणाबाई यांना एक कन्या राजकुंवरबाई होत्या. राजकुंवरबाईंचे लग्न संभाजी महाराज यांची पत्नी येसूबाई राणीसाहेब यांचा भाऊ गणोजीराजे पिवाजीरार्जे शिर्के यांच्याबरोबर झाला होता. सकवारबाई राणीसाहेब यांची मुलगी कमळाबाई ही जानोजी पालकर यांस दिली होती.

शिवरायांच्या दोन मुलांपैकी धर्मवीर संभाजीराजे यांचा विवाह पिलाजीराव शिर्के यांची कन्या येसूबाई हिजबरोबर झाला होता. तसेच संभाजीराजांचे दुसरे लग्न दुर्गाबाईशी झाले होते. सोयराबाईंचे पुत्र राजाराम महाराज यांचे प्रथम लग्न सेनापती प्रतापराव गुजर यांची कन्या जानकी हिजबरोबर झाले होते. हे लग्न शिवाजी महाराजांनी स्वत: ठरविले होते. परंतु या लग्नाला संभाजीराजे यांना बोलावले नसल्याने ते सहकुटुंब पन्हाळ्यावर होते. पुढे रायगडावर आल्यावर संभाजीराजांनी राजाराम महाराजांचे दुसरे लग्न सेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या ताराबाई हिच्याबरोबर लावून दिले होते. या राजाराम महाराजांना राजसबाई ही आणखी पत्नी होती. तसेच अंगवस्त्रेही होती.

छत्रपती संभाजीराजांना भवानीबाई ही कन्या आणि शिवाजीराजे ऊर्फ शाहूराजे हे पुत्र होते. तर राजाराम महाराजांना ताराबाईपासून झालेल्या पुत्राचे नाव शिवाजीराजे तर राजसबाईंना संभाजीराजे हे पुत्र होते. तसेच राजाराम महाराजांना कर्ण नावाचा दासीपुत्रही होता.

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वत:ला एकूण सात भाऊ होते. त्यापैकी थोरले सख्खे बंधू संभाजीराजे आणि तुकाबाईसाहेब या सावत्र आईचे पुत्र व्यंकोजी ऊर्फ एकोजीराजे यांचे उल्लेख पूर्वी आले आहेतच. परंतु शहाजीराजांना अंगवस्त्रे असल्याने त्यांचे पुत्र हे शिवाजीराजांचे बंधूच होते. कोयाजीराजे, संताजी राजे, प्रतापजीराजे आणि भिवजीराजे हे चार शहाजीराजांचे अनौरस पुत्र होते. त्याचबरोबर हिरोजी फर्जंद हे शहाजीराजांचे दासीपुत्र होते. असा भरभक्कम गोतावळा महाराज बाळगून होते.

# शिवकालीन न्यायव्यवस्था

राज्य करणाऱ्या राज्यकर्त्याचे कर्तव्य असते की त्याच्या प्रजेवर होणाऱ्या अन्यायाचे निरसन करून त्यास न्याय मिळवून देणे. राजा न्यायी असेल तर त्याचे राज्य टिकते. कारण प्रजेवर होणारे अन्याय प्रजेच्या नाराजीचे कारण होतात व त्यातून पुढे राज्य सत्तेविरुद्ध प्रजा बंड करून उठू शकते. छत्रपती शिवाजी महाराज हे न्यायी राजा होते. त्यांची प्रजेवर माया होती. प्रजेवर मुस्लीम राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या अन्यायातून सोडविण्यासाठी त्यांनी स्वराज्य निर्माण केले होते. त्यामुळे शिवकालीन न्यायव्यवस्था निर्दोष होती.

न्यायासाठी ज्या तक्रारी अथवा कज्जे येतात त्यांचे सामान्यत: दोन प्रकार होतात. एक राजकीय स्वरूपांचे आणि दुसरे समाजातील रुढींवर आधारीत. राजकीय स्वरूपाचे कज्जे सोडविण्यासाठी कायद्याचा आधार घेतला जातो, तर समाजातील रुढींवर आधारीत दाव्यासाठी जनरित अथवा जनरुढी काय सांगते त्याचा विचार करावा लागतो. महाराजांनी राज्याभिषेकसमयी या दोन्ही प्रकारच्या न्यायदानासाठी न्यायाधीश आणि पंडितराव असे दोन स्वतंत्र मंत्री आपल्या अष्टप्रधानात नेमले होते. राजकीय स्वरूपाचे निवाडे न्यायाधीश निराजी रावजी हे करीत असत. तसेच धर्माविषयी अथवा आचारा संबंधीचे निवाडे हे दानाध्यक्ष पंडितराव रघुनाथ पंडितराव हे करीत असत. दोन्ही प्रकाराच्या निवाडा पत्रांवर मंत्री 'संमत' म्हणून मुद्रा उठवित असत.

न्याय प्रक्रियेत गोतसभा ही परंपरागत चालत आलेली सभा शिवकाळात देखील होती. तसेच धर्मविषयक किचकट निवाड्यासाठी धर्मसभा आणि जातीतील निवाड्यासाठी जातीसभाही शिवकाळात होत्या. धार्मिक बाबींचा न्याय करण्यासाठी तीर्थक्षेत्रीच्या ब्राह्मवृंदांची ब्राह्मसभा असे. नाशिक, पैठण, काशी अशा तीर्थक्षेत्री जे विद्वान ब्राह्मण असत त्यांच्या सभेपुढे धार्मिक निवाडे केले जात. त्यात शिक्षा म्हणून ब्राह्मण सांगतील ते प्राय:श्चित घ्यावे लागे. धर्मसभेच्या प्रमुखास धर्माधिकारी संबोधले जाई. अर्थात मंत्री पंडितराव हा सर्वश्रेष्ठ असे. त्यांना धार्मिक मार्गदर्शन

करण्यासाठी ही ब्राह्मसभा असे. समाजात जाती जातीत रुढी रिवाजाबाबत भिन्नता असते. त्यामुळे प्रत्येक जातीत व्यवहार करताना त्या जातीच्या रुढी परंपरांचे पालन करावेच लागते. कोणाकडून अशा रुढी परंपरेचे पालन झाले नाही तर त्यास जातीबाह्य अथवा जातीबहिष्कृत ठरविले जाते. त्यास जाती व्यवहारात सहभाग घेता येत नाही. असे निवाडे निपटण्यासाठी त्या जातीतील प्रमुख तज्ज्ञांच्या सभा असत. या सभेमार्फत निवाडा होऊन जातीबाह्य व्यक्तीस पुन्हा जातीत प्रवेश दिला जात असे.

वरीलप्रमाणे प्रक्रियेतून निवाडापत्रे दिलेल्या ब्राह्मसभेच्या आणि जातीसभेच्या निवाड्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे काम सरकारचे असे.

सर्व प्रकारच्या न्यायव्यवस्थेत निवाडा करण्याची पद्धत ठरवून दिलेली असे. तक्रारदाराने केलेली तक्रार किंवा वादीने लावलेला दावा सरकारात नोंद केला जात असे. त्यानंतर गावातील देवळाच्या सान्निध्यात गोतसभा बोलावली जाई. त्या गावचा पाटील, देशमुख यांना सभेचे अध्यक्षस्थान दिले जात असे. वकील नेमण्याची पद्धत रुढ नव्हती. वादी आणि प्रतिवादी आपले म्हणणे स्वत:च मांडत असत. अर्थात दोन्ही पक्षातील वादी व प्रतिवादींना विचारण्याचे प्रश्न ठरविणारे तज्ज्ञ तेथे हजर असत. आरोपीला पश्चिमवादी संबोधले जाई तो स्वत:हून हजर न झाल्यास त्याला तलब करून (अॅरेस्ट करून) आणले जाई. सर्वप्रथम वादी-प्रतिवादी दोघांकडून ते निर्णयास राजी आहेत, असे पत्र लिहून घेतले जाई. त्यामुळे गोतसभेचा निर्णय दोघांनाही बंधनकारक असे. निवाड्याच्या या प्रक्रियेत पुरावा, भोगवटा (ताबा) आणि साक्षीदारांच्या साक्षी ग्राह्य मानल्या जात असत. प्रत्येक निवाड्यात कागदोपत्री पुरावे असतीलच असे नसते. तेव्हा वादात असलेल्या वस्तूचा किंवा जमिनीचा ताबा कोणाकडे आणि कधीपासून आहे याचा विचार होई. त्यानंतर साक्षीदाराच्या स्वाक्षींची नोंद केली जात असे. आणि या तीनपैकी काहीही नसेल तर आरोपीस दिव्य करण्यास सांगितले जाई. त्यानंतर मजहर म्हणजे निकालपत्र दिले जात असे. आरोपीचा गुन्हा राजकीय स्वरूपाचा असेल तर त्याला कैद किंवा दंड शिक्षा म्हणून दिली जाई. गुन्हा धार्मिक वा जातीय असेल तर प्राय:श्चित्त वा जातीला जेवण देण्याची शिक्षा दिली जात असे.

इतकी कडक न्यायव्यवस्था असल्यामुळे समाजात गुन्ह्याचे प्रमाण कमी असे. बहुतेक वाद हे जमिनीसंबंधी, वतनासंबंधी असत.

# शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ

१६३६मध्ये पुण्याची जहागिरीची व्यवस्था मुतालिक म्हणून दादोजी कोंडदेव मलठणकर यांच्यावर सोपविण्यात आली. त्याप्रमाणे दादोजी तयार झाले. परंतु दादोजींचे म्हणणे पडले की जहागिरीवर घरचे कोणीतरी असावे. म्हणून बालशिवाजीला पुण्याला ठेवण्याचे ठरले. परंतु त्यांचे वय पाहता मायेचे कोणी संगती असावे म्हणून जिजाबाईंनाही पुण्यात पाठविण्यात आले. पुण्यात जहागिरीचा बंदोबस्त, व्यवस्था नीट लावल्यावर १६४१ च्या सुमारास दादोजी बालशिवाजी आणि जिजाबाई यांना घेऊन बंगळूरला गेले होते. तेथे त्यांचा मुक्काम साधारण वर्षभर होता. पुन्हा १६४२ मध्ये तिघांनाही पुण्यात परतणे भाग होते.

यावेळी मात्र शहाजीराजे आणि जिजाबाई राणीसाहेब यांच्यात काही निश्चित बोलणी होऊन जहागिरीची पुढील व्यवस्था ठरलेली दिसते. या जहागिरीतून स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची कल्पना तेव्हा निश्चित झाली असावी. कारण शिवाजीराजांनी एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणे राहावे यासाठी अनेक आवश्यक गोष्टी शहाजीराजांनी त्यांच्या सोबत दिल्या होत्या. या गोष्टींची माहिती सभासद विस्तृतपणे देताना दिसतो.

पेशवे म्हणून शामराव निळकंठ, बाळकृष्णपंत मुझुमदार, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्लाळ सबनीस, सरनोबत (सेनापती) माणकोजी दहातोंडे या खास विश्वासातील व्यक्ती शहाजीराजांनी शिवाजी राजांसोबत दिल्या होत्या. त्यासोबतच हत्ती, घोडे, पायदळ, बिरुदे, ध्वज, मुद्रा, विपूल द्रव्य अशा अनेक गोष्टीही सोबत दिल्या होत्या. उत्तम शिक्षक आणि विश्वासातले असामीही दिले होते.

वरील यादी पाहता असे दिसून येते की एखाद्या स्वतंत्र राजाला लागणाऱ्या या गोष्टी आहेत. त्यात पंतप्रधान, अमात्य, सरनोबत, मुझुमदार असे महत्त्वाचे

मंत्री दिले होते. पुढे ७ मार्च १६४७ रोजी दादोजींचे निधन झाल्यावर जहागिरीची धुरा शिवाजी राजांवर आणि जिजाबाईंवर आली. राज्याची व्यवस्था लावतांना महाराजांना शहाजीराजांनी दिलेल्या मंत्र्यांचा खूप उपयोग झाला. त्यामुळे अष्टप्रधान ही संकल्पना महाराजांनी नक्की केली असावी. पुढे पुणे, सुपे, चाकण, इंदापूरच्या या जहागिरीचा विस्तार होऊन त्यातून स्वराज्य निर्माण झाले. ६ जून १६७४ रोजी महाराजांनी रायगडावर स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. त्या प्रसंगी अष्टप्रधान नेमण्यात आले.

शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शु. १३ शनिवारी काशीचे प्रकांड पंडित वेदमूर्ती गागाभट्ट यांचेकडून शिवाजी राजे यांचा राज्याभिषेक रायगडावर संपन्न झाला. महाराज सिंहासनाधिश्वर झाले. छत्रपती झाले. महाराजांनी राज्य व्यवहारकोश तयार करवून घेतला. व्यवहारात असलेल्या फारसी शब्दांना प्रतिशब्द तयार केले. अष्टप्रधान पूर्वीपासून होते ते ठेवून काही नव्याने नेमले. त्या अष्टप्रधानाच्या कार्यकक्षा, हक्क, कर्तव्ये, त्यांचे मानधन यांची निश्चिती केली. जेणेकरून त्यांच्यात आपापसात मतभेद होऊ नयेत. अष्टप्रधान राज्याभिषेक प्रसंगी खालीलप्रमाणे होते.

१) पेशवा (मुख्य प्रधान) : पूर्वी शहाजी महाराजांनी नेमून पुण्यात पाठवलेले शामराज निळकंठ पेशवे होते, ते १६६२ पर्यंत पेशवे होते. १६६२ मध्ये नरहरी आनंदराव यांना पेशवा केले होते. त्यानंतर मोरोपंत त्रिमळ पिंगळे यांना पेशवा पदावर नेमण्यात आले. राज्याभिषेक प्रसंगी हेच मोरोपंत पिंगळे पेशवा पदावर होते. त्यांची नेमून दिलेली कामे म्हणजे राज्यासाठी सर्व कारभार जोखमीने पार पाडणे, प्रत्येक राजपत्रावर पेशव्याची मोहोर उठवणे, प्रसंगी युद्धे करणे, नवीन मुलूख स्वराज्यात येईल त्याची व्यवस्था लावणे, सर्व इतर मंत्र्यांच्या सहकाराने महाराजांच्या आज्ञेत राहणे. त्यांना या कामाबद्दल सालीना १५००० होन तैनात ठरवून दिली होती.

२) अमात्य (मुझुमदार) : पूर्वी शहाजीराजांनी दिलेले हनुमंते हे मुझुमदार होते. राज्याभिषेक प्रसंगी नारो निळकंठ आणि नंतर रामचंद्र निळकंठ हे अमात्य होते. राज्याचा जमाखर्च सादर करणे आणि फडणीस आणि दप्तरदार यांच्या कामात मार्गदर्शन करणे तसेच फडणीसांनी आणि चिटणीसांनी काढलेल्या पत्रांवर शिक्का उठवणे व राजाज्ञा पाळणे या कामाबद्दल अमात्यांना सालीना तैनात १२००० होन ठरविली होती.

३) सचिव (सूरनीस) : पूर्वी निळो सोनदेव यास सूरनिशी दिली होती. प्रत्येक राजपत्र यांच्या हाताखालून गेले पाहिजे असा नियम होता. राज्याभिषेक प्रसंगी

अण्णाजी ऊर्फ अनोजी दत्तो प्रभुणीकर यांची नेमणूक झाली होती. यांना वेळप्रसंगी युद्धातही भाग घ्यावा लागत असे. प्रत्येक राजपत्र नजरे खालून घालून अवगत करून त्यावर 'संमत' असे लिहून शिक्का करावा लागे.

४) वाकनीस : दत्ताजी त्रिंबक हे राज्याभिषेकसमयी वाकनीस मंत्री होते. महाराजांची रोजची दिनचर्या लिहून ठेवणे, राजांना आलेली आमंत्रणे वा पाठवायची आमंत्रणे वाकनीस पाहात असे. महाराजांच्या भोजनाची व्यवस्था पाहावी लागे. तसेच युद्धप्रसंगी रणांगणावर जावे लागे. राजपत्रांवर 'संमत' असे लिहून शिक्का करावा लागे.

५) सेनापती (सरनोबत) : सुरुवातीच्या काळात तुकोजी चौर हा सरनोबत होता. १६५७ नंतर माणकोजी दहातोंडे सरनोबत झाला. पुढे माणकोजीचे निधन झाल्यावर नेतोजी पालकर यांस सरनोबत केले. पुढे मिर्झाराजे जयसिंह यांच्या स्वारीच्या वेळेस नेतोजी आदिलशाहीत गेल्याने त्याचे जागी कुडतोजी गुजर यांस सरनोबत करून प्रतापराव किताब दिला. नेसरीच्या युद्धात प्रतापराव पडल्यावर महाराजांचे मेहुणे हंबीरराव मोहिते सेनापती झाले.

६) सुमंत (डबीर) : पूर्वी सोनोपंत डबीर होते. डबीर म्हणजे परराष्ट्रव्यवहार मंत्री. परराज्यांचे वकील येतील त्यांचा यथायोग्य सत्कार करणे हे सुमंताचे मुख्य काम असे. रामचंद्र त्रिंबक हे राज्याभिषेकप्रसंगी सुमंत होते.

७) न्यायाधीश : राज्यातील प्रमुख न्यायनिवाडे न्यायाधीशाकडे वर्ग केले जात. लहानसहान निवाडे हे गावपातळीवर सोडविले जात. परंतु महत्त्वाचे मजकूर न्यायाधीशाकडे सुनावणीसाठी सादर केले जात. असे निवाडे अभ्यासून महाराजांना अवगत करून न्याय करावा लागे. तसेच निवाडापत्रांवर 'संमत' असे लिहून शिक्का करावा लागे. निराजी रावजी हे न्यायाधीश होते.

८) पंडितराव (दानाध्यक्ष) : धार्मिक वाद किंवा कज्जे असतील तर त्यावर विचार करून न्यायदान पंडितराव करीत असे. दानपत्रे, प्रायश्चित पत्रे, निवाडापत्रे (धार्मिक) यांवर पंडितराव संमत चिन्ह उठवून शिक्का करीत असे. १६६५ मध्ये सोनोपंत डबीर यांचा मेहुणा कोरडे विद्वान होते, त्यास पंडितराव किताब दिला होता. राज्याभिषेकप्रसंगी रघुनाथ पंडितराव हे दानाध्यक्ष होते.

अशा प्रकारे काही पूर्वीचे, काही नवीन असे अष्टप्रधान महाराजांनी राज्याभिषेकसमयी नेमले होते. त्यांची कार्ये ठरवून दिली होती.

त्यांच्या सालीना तैनाती ठरवून दिल्या होत्या. त्यात पेशवा आणि अमात्य यांना अनुक्रमे १५००० आणि १२००० होन सालीना तैनात होती. उर्वरित सचिव, वाकनीस, सरनोबत, सुमंत, न्यायाधीश आणि पंडितराव हे सहा प्रधान समान

पातळीवर मानून त्यांना प्रत्येकी दहा हजार होन सालीना तैनात होती. या तैनाती रोख स्वरूपात दिल्या जात. पूर्वीची तैनातीच्या ऐवजी मोकासा देण्याची प्रथा महाराजांनी बंद केली होती.

महाराजांचा दरबार भरे तेव्हा हे सर्व अष्टप्रधान हजर असत. त्यातील पेशवा, अमात्य, सचिव आणि वाकनीस हे चार प्रधान महाराजांच्या उजवीकडे उभे असत, तर सेनापती, डबीर, न्यायाधीश आणि दानाध्यक्ष हे डावीकडे असत.

या प्रत्येक प्रधानांना कामात मदत करण्यासाठी दरकदार दिलेले होते. प्रत्येकी

१) दिवाण

२) मुझुमदार

३) फडणीस

४) दप्तरदार

५) कारखानीस

६) चिटणीस

७) जामदार

८) पोतनीस दिले होते.

# शिवकालीन लष्करी व्यवस्था

लष्कर आठ महिने नोकरी आणि चार महिने पावसाळ्याचे शेतीवर या अटीवर काम असे. पावसाळ्यात लष्कर देशी गावाला जात असे. शिवकाळात घरटी एकतरी व्यक्ती लष्करात चाकरीस असे. कारण शेती करणे आणि लष्करात चाकरी करणे हे दोनच व्यवसाय होते. शेती हा सर्वसामान्य रयतेचा व्यवसाय होता. तसेच राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. त्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष केलेले महाराजांना चालत नसे. पावसाळ्यापूर्वी लष्कर जेव्हा गावी जाण्यास निघे तेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली जात असे. पुढील चार महिने घरी राहून शिपायाने कास्तकारी करावी आणि दसऱ्यापूर्वी छावणीत परत यावे असा नियम होता. दसऱ्याला सीमोल्लंघन झाले की मोहिमांवर जावो लागे. त्यावेळी प्रत्येक व्यक्तीचे चीज वस्तूंचे जाबते केले जात. त्यानंतर पावसाळ्यापर्यंतचे आठ महिने शत्रूच्या मुलुखात मोहिमा काढून फौजेने पोट भरायचे असे. या काळात खंडण्या आणि लुटी आणून स्वराज्य संपन्न केले जाई. अर्थात या लुटी व खंडण्या सरकारजमा कराव्या लागत. वैयक्तिक स्वरूपाची लूट चालत नसे.

लष्करात स्त्रियांना पूर्ण मज्जाव असे. कोणालाही मग तो कितीही मोठा अधिकारी असला तरी, लष्करात पत्नीला नेता येत नसे. तसेच बटीक किंवा कलावंतीण ठेवण्यास सक्त मनाई असे. लष्करात स्त्रीला नेल्यास त्या शिपायाची गर्दन मारण्याची शिक्षा असे. तसेच मोहिमेवर असताना शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही शिवू नये, अशी महाराजांची फौजेला सक्त ताकीद असे. मोहिमेत असताना स्त्रिया, मुले व गायी यांच्यावर अत्याचार करू नये असा दंडक होता. लुटीत शत्रूचा धर्मग्रंथ सापडल्यास त्याचा योग्य सन्मान ठेवून शत्रूस परत करावा लागे.

फौज परत स्वराज्यात आली की फौजेची झाडाझडती घेतली जाई. पूर्वीच्या जाबत्याप्रमाणे चीजवस्तू सापडल्यास ठीक. पण, काही जास्तीचे सापडल्यास शासन होई व चीजवस्तू सरकारजमा केली जाई. ठरलेल्या वेतना व्यतिरिक्त द्रव्य ठेवता येत नसे. प्रत्येक लष्करी व्यक्तीचे वेतन वा तनखा हा रोख स्वरूपात व अगदी वेळच्यावेळी मिळत असे. महाराजांनी फौजेचा पगार कधीही थकविला नाही.

फौज ठेवण्यासाठी सरदाराला मुलूख तोडून दिला जात नसे. मोगलाईत पंचहजारी-सप्तहजारी सरदारांना तेवढी फौज ठेवण्यासाठी खर्चापोटी जहागिरी वा वतन दिले जात असे. जहागिरदाराने आपल्या जहागिरीच्या उत्पन्नातून फौज ठेवणे अपेक्षित होते. मोहिमेच्या वेळी जहागिरदारांनी ठेवलेली फौज मदतीस येत असे. महाराजांना ही पद्धत बिलकूल पसंत नव्हती. महाराज वतने देण्याच्या विरुद्ध होते. महाराजांचे व्याही पिलाजीराव शिर्के यांचे दाभोळचे वतनही महाराजांनी सरकारजमा केले होते. पिलाजीराव दाभोळच्या वतनासाठी आग्रही होते, पण महाराजांनी ते त्यांना कधीच परत केले नाही. महाराजांना ठाऊक होते की हे वतनदार रयतेला नडतात. त्यांना सांगितलेली फौज कधीच तयार ठेवत नाहीत. त्यापेक्षा कमी फौज ठेवतात व खर्च वाचवतात. पुढे त्यांना काही बोलण्याची सोय नसते. फौज घेऊन शत्रूला मिळतात. राहत्या वाड्याभोवती कोट बांधतात. आपापसात भांडतात. पिढ्यान्‌पिढ्याचे वैर करतात. मोहिमत जिंकलेला मुलूख आपल्याच ताब्यात ठेवतात. एकूणच वतने देणे हे स्वराज्याच्या हिताचे नसते. मोहिमेवर असताना लढाईत जे शिपाई मृत्यूमुखी पडतील त्यांच्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडले जात नसे. त्या कुटुंबाला त्या शिपायाच्या वेतनाप्रमाणे दरमहा वेतन दिले जाई. निराधार विधवा पत्नी असेल तर मुलांचे संगोपन रायगडावर केले जाई. ही मुले मोठी झाल्यावर त्यांना लष्करात सामावून घेतले जाई किंवा अनुकंपा तत्त्वावर इतरत्र नोकऱ्या दिल्या जात. जे जखमी होत त्यांना जखमांच्या तीव्रतेनुसार मदत केली जाई. शिलेदाराचा हात पाय गमावल्यास त्यास अन्य काम सांगून वेतन दिले जाई. कुणालाही आधाराविना सोडले जात नसे. आपल्यामागे आपल्या कुटुंबाची आबाळ होणार नाही याची खात्री असल्यामुळे शिपाई प्राणपणाने लढत असत. स्वराज्यासाठी बलिदान करीत असत.

सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर खेळणारे महाराजांचे सैनिक काटक आणि सडपातळ चपळ असत. त्यांच्या गरजाही अत्यंत कमी असत. त्यामुळे

लष्करी हालचाली त्वरीत होऊ शकत असत. घोडदळ असो वा पायदळ, कमीतकमी सामान सोबत ठेवले जाई. एक दोन शस्त्रे, चटणी-भाकरी आणि खांद्यावर घोंगडी एवढेच सामान मोहिमेवर निघताना सोबत घेतले जाई. घोडदळातील स्वारासोबत घोड्याच्या पाठीवर घोड्यासाठी हरभऱ्याचा तोबरा असे. सामान कमी असल्याने गनिमी काव्याने लढाया करताना छापे टाकणे सहजशक्य होई. शत्रूच्या गोटावर हल्ला करणे, थोडी फार कापाकापी करून शत्रू लढायला तयार होण्यापूर्वी पळून जाणे शक्य होत असे. या उलट मोगली मोहिमेत हत्ती, घोडे, उंट, तंबू यांसारखे जडभारी सामान असे. त्यामुळे त्यांची हालचाल मंद होत असे.

सह्याद्रीच्या आश्रयाने असलेल्या महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती आणि पर्जन्यमान गनिमी काव्यास अनुकूल असेच होते. सर्वच मुस्लीम राजवटींना मोकळ्या मैदानात सर्व सरंजामासह युद्ध करण्याची सवय होती. समोरासमोर युद्ध करणे यात त्यांना स्वारस्य होते, तर गनिमी कावा हा स्वराज्यातील युद्धाचा पाया होता. गनिमी युद्धाचे तंत्रच हे होते की स्वत:चे फारसे नुकसान वा हानी होऊ न देता शत्रूचे जास्तीतजास्त नुकसान करणे, शत्रूची रसद मारणे तसेच शत्रूच्या तळावर-पाणवठ्यावर ताबा मिळवणे किंवा तलावात विष टाकून शत्रूला पाण्यावाचून तडफडत ठेवणे आणि शत्रू गाफील असताना त्याच्या छावणीवर अचानक हल्ला करणे व शत्रू प्रतिकारास तयार झाला की अंधाराचा फायदा घेऊन पळून जाणे, त्याचप्रमाणे आपल्या फौजेच्या लहान लहान तुकड्या करून त्यातील एका तुकडीने शत्रू छावणीवर हल्ला करणे म्हणजे शत्रू पाठलाग करण्याचा प्रयत्न करील. शत्रूला त्याच्या मूळ छावणीपासून दूर नेऊन आपण पलायन करायचे व इकडे उरलेल्या तुकड्यांनी शत्रूवर चहूबाजूने हल्ला करायचा हे गनिमी काव्याचे मुख्य तंत्र असे. यात जय-पराजय असे काही मानले जात नसे. शत्रूचे नुकसान करणे व आपली फौज सुरक्षित ठेवणे म्हणजेच जय, असे मानले जाई. लढाया नेहमी स्वराज्यात न करता शत्रू मुलूखात करणे म्हणजे शत्रू मुलूखाची नासाडी व तेथील प्रजेचे हाल होत असे. महाराजांनी बहुतेक लढाया स्वराज्याबाहेर घेतल्या आहेत. मोहिमांत जे शिपाई शौर्य दाखवतील, पराक्रम गाजवतील त्यांना मोहिमेतील विजयानंतर नावाजले जाई. त्यांचे खास कौतुक करून त्यांना रोख बक्षिसे, शेला, पागोटे, सोन्याचे कडे किंवा किताब महाराज स्वत: देत असत. त्यामुळे लष्करात पराक्रम दाखवण्याची चुरस लागे.

महाराजांचे लष्कराचे म्हणजे पायदळ, घोडदळ आणि आरमार याकडे

चौफेर लक्ष असे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे राज्याभिषेकाच्या तोंडावर २४ फेब्रुवारी १६७४ रोजी नेसरीच्या युद्धात सरनोबत प्रतापराव गुजर आणि त्यांचे सहा सरदार पडले. त्यानंतर चिपळूणच्या छावणीत काही गडबड झाल्याचे महाराजांच्या कानावर आले. महाराज राज्याभिषेकाच्या कामात प्रचंड व्यस्त होते. परंतु त्याही गडबडीत स्वत: महाराज सर्व कामे बाजूला ठेवून चिपळूणच्या छावणीस भेट देण्यास गेले. तेथे त्यांनी फौजेचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर मार्ग काढण्यासाठी आनंदराव मकाजी यांना आज्ञा केली.

महाराज लष्करी छावणीबाबत किती सखोल विचार करीत. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे चिपळूणजवळ दलवटणे येथील छावणी अधिकाऱ्यास १३ मे १६७१ रोजी लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. पत्र मोठे असले तरी त्यातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे -

‘चिपळूणी सैन्याचा मुक्काम होता. याकरता दाभोळच्या सुभ्यात पावसाळा करणे, पागेस सामा, दाणा व वरकड केला होता. तो कित्येक खर्च होऊन गेला. त्याकरता कारकुनाकडून व गडोगडी गल्ला असेल तो देऊन जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुमी मनास वाटेल ऐसा दाणा, रतीब, गवत मागाल, असेल तोवरी धुंद करून चाराल, नाहीसे झाले म्हणजे मग काही पडत्या पावसाळ्यात मिळणार नाही. उपास पडतील व मुलूखास तसबीस देवू लागंल. कुणबी घर धरून जीवधात्र घेऊन राहिले आहेत, तेही जाऊ लागतील. कितेक उपाशी मराया लागतील, ऐसा तळतळाट होईल. हे तुम्ही बरे जाणून सिपाई हो अगर पावलोक हो, बहुत यादी धरोन वर्तणूक करणे. कोणी पागेस अगर मुलुखात गावोगाव राहिले असाल त्यानी रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाही. साहेबी खजिन्यातून वाटणीया पदरी घातलिया आहे. ती ज्याला जे पाहिजे विकत आणावे. कोणावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाही व पागरे सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजेने दाणा रतीब कारकून देत जातील तेणेप्रमाणे घेत जावे की उपास न पडता राजेबरोज खायला सापडेल आणि होत घोडी तबाना होत ऐसे करणे. धुंदी करून खासदार कोठीत कोठारात शिरून लूटाया गरज नाही. घर धरून राहिले असतील व राहतील. कोणी आगट्ये करतील कोणी भलते जागा चुली रंधनाला करतील. कोणी तमाखूला अग्नी घेतील. गवत पडले आहे... असे मनात न आणता म्हणजे अविसाच दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळून जातील हे तो अवघीयास कळते. या कारणे बरी ताकीद करून खासे

असाल ते हमेसा फिरून जावून रंधनेकरिता आगत्या जाळीता अगर रात्री दिवा घरात अशेल अविस्ताच उंदीर वात नेईल. ते गोस्टीन हो. आगीचा दगा न हो. खण गवत वाचेल ते करणे. म्हणजे पावसाळा घोडी वाचतील. जितके खासे खासे जुमलेदार हवालदार कारकून आहे तितके हा रोखा तपशीले ऐकणे आणि हुशार राहणे येणे प्रमाणे वर्तणूक करता ज्यापासून अंतर पडेल त्याचा गुन्हा होईल. बदनामी ज्यावर येईल. त्यास मराठ्यांची तो इज्जत वाचणार नाही. मग रोगजार कैसा.'

हा या पत्राचा काही भाग आहे. किती विस्तृत पत्र महाराजांनी लेखनिकास सांगितले आहे याची कल्पना येते.

लष्कराचे दोन भाग केले होते. पायदळ आणि घोडदळ असे ते प्रमुख भाग होत. आरमाराचा विचार विस्ताराने इतरत्र केला आहे. कारण आरमारात बोटी बांधणे, लढावू जहाजे बांधणे आणि त्यायोगे समुद्रावर राज्य करणे, व्यापार करणे आणि मासेमारी करणे ही कार्ये होत असत. आरमारात लढावू जहाजे त्यावरील माविक फौज आणि तोफा यांचा विचार प्रामुख्याने होतो. तसेच आरमारासाठी जलदुर्गांची आवश्यकता असते. म्हणून आरमाराचा विचार इतरत्र स्वतंत्र केला आहे.

पायदळ : पायदळात काटक आणि चपळ लोकांची गरज असते. सह्याद्रीच्या आश्रयाने आणि मावळात अशी वस्ती असल्याने पायदळाची भरती करताना कोकणी, मावळे यांना प्राधान्य दिले जात असे. नोकरीच्या सुरुवातीला फक्त धान्यात मोबदला दिला जाई. लष्करात पायदळात भरती होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीजवळ स्वत:ची तलवार, ढाल, बंदूक ही शस्त्रे असावी लागत. फक्त बंदुकीचा दारुगोळा सरकारातून दिला जाई.

पायदळाच्या रचनेत दहा शिपायांचा दाहीजा होई. दाहीजाच्या मुख्यास नाईक म्हणत. अशा पाच नाईकांवर एक हवालदार असे. हवालदाराच्या हाताखाली पन्नास शिपाई असे. तर दोन हवालदारांवर एक जुमलेदार नेमला जाई. अशा दहा जुमलेदारावर एक हजारी असे. अशा पाच हजारीवर पंचहजारी आणि सात हजारीवर सप्तहजारी सरदार असत. आणि या सर्वांवर सरनोबत असे. सरनोबत म्हणजे सेनापती. शिपायाची हुशारी शौर्य पाहून त्यास एक ते तीन होन दरमहा मिळत. जुमलेदारास शंभर होन सालीना तर हजारीला पाचशे होन सालीना तनखा रोख मिळत असे. पंचहजारी वा सप्तहजारी हे सरदार-दर्जाचे असल्याने त्यास २५०० होन सालीना तनखा व पालखी, अबदागिर यांचा मान असे. ज्याला पालखीचा मान सरकारातून

दिला जाई, तोच पालखीचा वापर करू शकत असे.

पायदळात तलवार, कट्यार व बंदूक ही हत्यारे प्रामुख्याने असत. त्यात तलवार कट्यार वापरण्यासाठी शत्रूस भिडावे लागे, तर बंदुकीचा बार दुरून करता येत असे. त्यामुळे कोणत्या शस्त्राचा वापर करायचा हे शिपाई प्रसंग पाहून ठरवीत असे.

पायदळाचाच एक भाग तोफखाना असे. डोंगराळ भागात जेथे रस्ते नसतात अशा ठिकाणी जडभारी तोफा वाहून नेणे शक्य नसते तेथे हलक्या तोफांचा वापर केला जातो. महाराज लष्करात हत्तीचा वापर फक्त जडभारी तोफा नेण्यासाठीच करीत असत. त्याचप्रमाणे मोठ्या युद्धात निशाण फिरवण्यासाठी व किल्ल्याच्या दरवाज्यांवर धडक देण्यासाठी क्वचित प्रसंगी हत्ती वापरले जात. वैभवाचे प्रदर्शन करण्यासाठी हत्तींचा वापर केला जात नसे.

पायदळात आठ महिने काम आणि चार महिने शेती व्यवसाय हे तत्त्व असे. त्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष होऊन राज्याचे उत्पन्न घटत असे.

पायदळाचा एक भाग म्हणजे हुजुरांच्या संरक्षणासाठी खास तयार केलेली बिनीची फौज वा हुजूर फौज. यांना धारकरी दर्जा असे. त्यात बंदुकी, अडहत्यारी, बिटेकरी, धारकरी असत. त्यांची एकूण संख्या सुमारे दोन हजार इतकी असे. या फौजेत भरती करताना महाराज स्वत: जातीने परीक्षा घेत असत. महाराज नेहमी मुस्लीम राजवटींशी टक्कर देत असल्याने या हुजूर फौजेची आवश्यकता असे. या फौजेला सर्वांना सारखाच सरकारी पेहराव व साज दिला जात असे. खाश्यांच्या पालख्याबरोबर या शिपायांना शिस्तीत चालावे लागे. त्याचप्रमाणे सदैव जागृत राहून वेळप्रसंग येईल त्याप्रमाणे मुकाबला करून खाशांचे रक्षण करावे लागे.

पायदळात अनेक वीर असले तरी इतिहास त्यांच्याविषयी फारसे बोलत नाही. त्यात पायदळाचे अधिकारी, शिलेदार आणि सरदार वीरांचा समावेश होता. अनेक ऐतिहासिक कागदपत्रातून आणि बखरींतून जी काही वीरांची नावे मिळतात ती येणेप्रमाणे-

बाजी बेनमणा, गणोजी दरेकर, विठोजी लाड, इंद्रोजी दळवी, मालसावंत, नागोजी प्रल्हाद, पिलाजी गोळे, बडखले, भिकाजी दळवी, महादजी फर्जंद, तानसावंत, कृष्णाजी कलघोडे, हिरोजी भालकर, येसाजी दरेकर, रामजी मोरे, हिरोजी मराठे, चांगजी कडू, राज दळवी, सोनू महाला, रामजी विश्वास, तुकोजी लाड, डोळे, मुधोजी हूलकाणे, मुधोजी

खानविलकर, नागोजी फर्जंद, ढमाले, पारडे, चिमणाजी बापू देशपांडे, राणोजी दरेकर आणि सोमाजी बंकी.

घोडदळ : घोडदळात बारगीर आणि शिलेदार असे दोन प्रकारचे शिपाई असत. बारगीराला सरकारी पागेतील घोडा मिळे तर शिलेदाराचा घोडा हा त्याचा स्वत:च्या मालकीचा असे. त्यामुळे शिलेदाराला आपल्या घोड्याच्या देखभालीचा खर्च सरकारातून मिळे. स्वराज्यातील बहुतेक घोडे हे सरकारी मालकीचे असत. रघुनाथपंत हणमंते कर्नाटकातील एकोजीराजांना सोडून महाराजांना पन्हाळ्यावर भेटले तेव्हा महाराजांनी पंतांचे स्वागत करून त्यांचे जवळ असलेले घोडे सरकारजमा केले व त्यांचे हत्ती व उंट त्यांच्या जवळच ठेवले. यावरून महाराज नियमांना अपवाद करीत नसत, हेच सिद्ध होते.

सर्व सरकारी घोड्यांच्या पाठीवर शिक्का उठविला जाई. घोडदळात वेश ठरलेला असे तंगतुमान, पागोटे, कमरेस तलवार, ढाल, बंदूक असा पेहराव सरकारातून मिळे. फक्त वारगीराला दारुगोळा सरकारातून मिळे. घोडदळाची रचना करताना पंचवीस स्वारांवर एक हवालदार, पाच हवालदारांवर एक जुमलेदार, पाच जुमलेदारांवर एक सुभेदार आणि दहा सुभेदारांवर एक पंचहजरी असे. घोडदळाचा सरनोबत वेगळा असे. तसेच सरकारी पागेच्या मदतीसाठी पंचवीस स्वारांमागे एक पखाली आणि एक नाळबंद असे. पखाली पागेतील घोड्यांना पाणी पाजत असे तर नाळबंद घोड्याला नाल मारत असे.

बारगीराम रोख वेतन २ ते ५ होन दरमहा असे तर शिलेदारास ६ ते १२ होन दरमहा मिळे. जुमलेदारास २५० होन सालीना आणि पालखीचा मान असे. सुभेदारास ६०० होन सालीना व पालखीचा मान असे. पंचहजारी सरदारास सालीना २००० होन तनखा व पालखी अबदागीर घेण्याचा मान असे. अर्थात सर्वात वरती सरनोबत असे. महाराजांजवळ पन्नास हजार घोडदळ होते असा उल्लेख सापडतो.

घोडदळाची हत्यारे, तलवार, भाला मुख्य असत. काही स्वारांजवळ बंदूक आणि पट्टा असे. प्रसंग पाहून हत्यारांचा वापर होत असे. शिवकाळात एकूण वीस प्रकारची हत्यारे वापरली जात असली आणि मोठ्या व हलक्या तोफांचा वापर होत असला तरी घोडदळात दुरून मारण्याची हत्यारेच वापरली जात. गनिमी युद्धात शीघ्र हालचाली अपेक्षित असल्याने त्यात घोडदळाचा वापर होत असे. घोडदळ एक लाख होते.

घोडदळात अनेक वीर होऊन गेले असले तरी इतिहास त्यांच्याविषयी

काहीच माहिती देत नाही. ऐतिहासिक कागद पत्रातील व बखरीतील उल्लेख तपासून खालील वीरांची नावे पुढे येतात :

सरदार मानसिंग मोरे, रुपाजी भोसले, गोदाजी जगताप, खंडोजी जगताप, संताजी जगताप, नेताजी काटकर, दादाजी काकडे, तेलंगराव पागेसरकार, निळोजी काठे, तुकोजी निंबाळकर, निंबाजी पाटोळा, गणोजी शिर्के, कृष्णाजी पवार, धर्माजी निगडे, धनाजी शिंगडा, संभाजी हैबतराव, परसोजी भोसले, कृष्णाजी घाटगे, बनाजी बिर्जे, मालोजी मचाळे, कान्होजी दिवेकर, आप्पाजी तांबे, बाळोजी बाटकर, सावजी मोहिते, साबाजी भोसले, शिंगणापूरकर, जयसिंगराव पालकर, आनंदराव निंबाळकर असे कित्येक होते. ही यादी पूर्ण नाही.

# शिवकालीन महसूली व्यवस्था

महाराजांनी १) मुख्य प्रधान (पेशवे)

२) अमात्य (अर्थमंत्री)
३) सेनापती
४) सचिव
५) मंत्री (वाकनीस)
६) पंडितराव
७) न्यायाधीश
८) सुमंत (परराष्ट्र मंत्री)

अशा अष्टप्रधानांच्या नेमणूका केल्या होत्या. या नेमणुका करताना महाराजांनी त्यांना वतने वा जहागिरी दिली नव्हती. या मंत्र्यांना रोख वार्षिक तनखा दिला जात असे. या अष्टप्रधानांच्या स्वतंत्र मुद्रा होत्या. प्रत्येक सरकारी कागदावर पेशवे, अमात्य, सचिन, मंत्री, सुमंत यांच्या मुद्रा असाव्या असा कडक नियम होता. त्यामागे हेतू हा होता की प्रत्येक मंत्र्याच्या हातून पत्रव्यवहार करताना चुका होऊ नयेत तसेच प्रत्येक प्रधानाने घेतलेला निर्णय इतरांनाही माहीत असावा. खोटेपणा वा भ्रष्टाचार यांस यामुळे वाव राहणार नाही.

या अष्टप्रधानांनी राज्याचा कारभार पहायचा असे त्यासाठी राज्याचे १८ कारखाने आणि बारा महाल या अष्टप्रधानांच्यात वाटून दिले होते. त्याचप्रमाणे संपूर्ण स्वराज्याचे चार प्रमुख भाग करून त्यावर प्रत्येकी एक याप्रमाणे नेमणुका केल्या होत्या. या चौघांना सरसुभेदार संबोधले जाई. या चार भागांचे राज्यकारभाराच्या सोईसाठी १४ प्रांत पाडले होते. त्या प्रांताच्या मुख्यास देशाधिकारी म्हटले जात असे. या चौदा प्रांतांचे लहान लहान भाग म्हणजे महाल केले होते. त्यामुळे ही संपूर्ण रचना अशी होती की काही गावांचा परगणा, काही परगणे मिळून महाल, महालांचे प्रांत अशी होती.

अठरा कारखाने आणि १२ महाल यामध्ये राज्याचे सर्व व्यवहार येत असत. ते अठरा कारखाने येणेप्रमाणे मुदपाकखाना (स्वयंपाक खाते), शरबतखाना (औषधे), शिकारखाना (क्रिडा), दारुखाना (बारुद), पीलखाना (हत्तीशाला), फरासखाना (तंबूराहुट्या), उष्ट्रखाना (उंटशाला), दप्तरखाना, तोफखाना, शहतखाना (मत्सालय). जिरातेखाना (शस्त्रागार), जामदारखाना (द्रव्य ठेवणे), तालीमखाना खजिना (राज्याचा खजिना), जवाहीरखाना (जडजवाहीर), अंबारखाना (धान्यकोठार), नगारखाना (मुख्य दरवाज्यावर) आणि आबादारखाना (पेये).

त्याचप्रमाणे काही बाबी या महाल म्हणून त्यांची व्यवस्था असे जसे की पालखी, बांधकाम, अश्वशाळा, रात्ररक्षक, अंत:पूर, टांकसाळ, कोषागार, गोशाळा, व्यापारी सौदागर, धान्यकोठी खाजगी, रथशाला, तृप्तीघर या महालांसाठी आणि अठरा कारखान्यांसाठी स्वतंत्र अधिकारी, हिशेबनीस, कारकून व सेवक शिपाई ठेवलेले असत. त्यामुळे ही सर्व खाती आपापला कारभार स्वतंत्रपणे पहात व अहवाल अष्टप्रधानांकडे पाठविला जात असे. कारण या अठरा कारखाने आणि बारा महाल यांची अंतिम जबाबदारी अष्टप्रधानांची असे.

यातील प्रत्येक व्यक्तीचे अधिकार, कर्तव्ये, नियम आणि कायदे ठरवून दिले असत, त्याला कानूजाबता असे म्हटले जाई. राज्य व्यवहारकोश या ग्रंथात त्याची स्पष्ट नोंद आहे.

शिवकाळात प्रत्येक खेडे अथवा गाव त्याला मौजे म्हणत असत. ते संपूर्ण स्वयंपूर्ण असे. गावाचा मुख्याधिकारी पाटील असे. हा बहुधा पोलिस पाटीलही असे. कुळकर्णी हा पाटील यास हिशेबाच्या कामी मदत करीत असे. कुळकर्णीकडे गावाचा नकाशा, गावातील लागवडीखालील जमीन, कोरडवाहू, बागायती, ओसाड जमीन याबाबत पूर्ण तपशील असे. त्याप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याकडे असलेल्या जमिनीनुरूप कर किती भरावा लागेल हे तो सांगू शकत असे. कुळकर्णीप्रमाणेच चौगुला हा एक अधिकारी पाटलाच्या मदतीस असे. तो पाटलास इतर मदत करी. या कामाबद्दल या दोघांना जमीन इनाम मिळत असे. तसेच गावाकडून वार्षिक मानपान मिळत असे, त्यास वतन असे संबोधले जाई.

गावातील पडीक जमीन जास्तीत जास्त लागवडीखाली आणणे ही पाटलाची जबाबदारी असे. कारण जमीन पडीक राहिल्यास धान्योत्पादन कमी होणे आणि सरकारी कर वसुलीही कमी होते. त्यामुळे गावाचा विकास होत नाही.

लागवडीखाली असलेल्या जमिनीचा कर वसूल करून तो सरकारी खजिन्यात भरण्याची जबाबदारी पाटील आणि कुळकर्णी यांची असे. गावातील छोटी भांडणे-कब्जे ऐकून न्याय देणे हे काम पाटलांनाच करावे लागे.

महाराजांनी जहागिरदारी वतनदारीचे उच्चाटन केल्याने वतनदारांकडून रयतेवर होणारी जबरदस्ती, अन्याय बंद झाले. पूर्वी हे वतनदार सरकारकडून वसुलीचे मक्ते लावून करभरणा करीत व रयतेस नाडून त्यांच्याकडून जबरदस्तीने अधिक करवसुली करीत. यात रयत नागवली जात असे आणि सरकारात कमी करभरणा होत असे. तसेच हे गब्बर झालेले देशमुख स्वतःला राजे, सरकार म्हणवित असत. कोटाप्रमाणे वाडेहुडे बांधून पागा बाळगीत असत. राजाज्ञा पाळण्यास टाळाटाळ करीत. विरोध केला तर शत्रूला मिळत, आपापसात झगडे करीत, पिढ्यान् पिढ्याचे वैर जोपासत असत. एकमेकांच्या घरच्या वरातीवर हल्ले करण्यापर्यंत त्यांची मजल जात असे. या त्यांच्या अशा राजद्रोही वागण्याने राज्याच्या कार्याची नासाडी होत असे. आपली ही वतने वंशपरंपरा चालवित म्हणून युद्धप्रसंग आल्यास शत्रू पक्षाशी संधान बांधून ठेवीत. या काही देशमुखांचे वागणे विश्वासाचे नसे. म्हणून महाराजांना या वतनदारीची चीड होती. त्यांचा वतनदारी बंद करण्याकडे कल होता. महाराजांनी आपल्या काराकिर्दीत एकही वतन दिले नाही हे विशेष.

राज्याच्या उत्पन्नाच्या अनेक बाबी असल्या तरी जमिनीवरील शेतसारा वसुली ही महत्त्वाची बाब होती. महाराजांनी जे स्वराज्य निर्माण केले ते स्वकर्तृत्वावर. त्यांनी आदिलशाही, निझामशाही यांना कुरतडून प्रदेश वाढवला होता. त्यावेळी राज्यात निझामशाहीचा वजीर मलिक अंबर याने घालून दिलेली सारा पद्धती व जमीन मोजणी अस्तित्वात होती. महाराजांनी जमीन मोजणीसाठी ठरविलेले माप शिवकाठी म्हणून ओळखले जात होते. या शिवकाठीची लांबी पाच हात पाच मुठी असे होते. चौदा तसूंचा एक हात होत असे. वीस काठ्या लांब आणि वीस काठ्या रुंद चौरस एक बिघा म्हणून ओळखला जाई.

अशा १२० बिघ्यांचा एक चावर होत असे. महाराज जमीन दान देताना चावरच्या मापात देत असत. संपूर्ण स्वराज्यभर सारा ठरविण्याचे श्रेय अनोजी दत्तो प्रभुणीकर यांना द्यावे लागेल. अण्णाजी ऊर्फ अनोजी दत्तोंनी रयतेला विश्वासात घेऊन सारा ठरविला होता. शेतसाऱ्याची रक्कम ठरविताना शिवकाठीने जमीन मोजून त्या जमिनीचा कस पाहिला जाई त्यास प्रतबंदी संबोधले जाई. त्यानंतर जमीन जिराईत, बागाईत, मोटेची आहे की पाटाची आहे हे पाहिले जाई म्हणजे जमिनीला पाणी कसे मिळते याचा विचार होई. तसेच

जमीन एकपिक घेणारी आहे की दुपिकी आहे याचा विचार होई. पडीक जमीन लागवडीखाली आणताना प्रथम काही वर्षे सारा माफ असे. इतका सखोल विचार करून सारा ठरविला जात असल्याने रयतेवर अन्याय होत नसे. एकूण उत्पन्नाच्या दोन पंचमांश पेक्षा जास्त कर आकारणी होत नसे हे विशेष.

मामलेदार, सरसुभेदार, कमाविस्तार अशा स्तरावरच्या सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका आणि बदल्या या स्वत: महाराज करीत असत. त्यामुळे त्यात सामान्यत: होणारा भ्रष्टाचार होत नसे. चोपदार, दिवट्या आणि अबदागिऱ्या यांच्या नेमणुका मात्र मामलेदार, सरसुभेदार करीत असत. रयतेकडून शेतसारा वसुली करताना कोणी जुलूम व जबरदस्ती केलेली सरकारात चालत नसे.

जमिनीवरील महसुलाशिवाय इतर करांचे उत्पन्न सरकारला मिळत असे. इनामी जमिनीवर इनामपट्टी तर मिरासदारी जमिनीवर मिरासपट्टी वसूल केली जात असे. काही सत्ताधिशांवर महाराजांनी खंडणी बसवली होती. अशी ही खंडणी वार्षिक मिळत असे. मोगलांच्या प्रदेशावर युद्धे करून चौथाई सरदेशमुखी यांसारखे कर वसूल केले जात. कोणी दत्तक विधान केले तर शेरणी भरावी लागे. आयात निर्यात करण्यात येणाऱ्या मालावर जकात असे. अर्थात स्वराज्यात तयार होणारा माल निर्यात करताना काही मालावर कर बहुतेक कमी लावला जाई. त्यामुळे निर्यातीस वाव मिळे. परंतु गुलामांची विक्री होऊ नये म्हणून त्यावर बंदी आणि जबर जकात लावली होती. आयातीच्या बाबतीत बाहेरून येणाऱ्या मिठावर जबर जकात बसवून कोकणी मिठाची विक्री वाढवली होती. याप्रमाणे अर्थशास्त्राचा वापर डोळसपणे केला जात असे. अशा तऱ्हेने स्वराज्याचे वार्षिक उत्पन्न साडेतीन कोटी रुपये इतके होते. म्हणजेच एक कोटी होन होते असे सभासद सांगतो.

# शिवरायांचे आरमारी सामर्थ्य

गेली चारशे वर्षे महाराष्ट्रातील मनामनात अढळ स्थान राखून असलेले छत्रपती शिवराय हे अनेक बाबतीत अनन्यसाधारण होते. आरमाराचे महत्त्व ओळखणारा राजा शिवरायांपूर्वी हजार वर्षे तरी झाला नव्हता. शिवरायांनी पक्के ओळखले होते की ज्याच्या हाती आरमारी सामर्थ्य त्याचे राज्य सुरक्षित. १६५६ च्या सुमारास स्वराज्याची सरहद्द समुद्रापर्यंत भिडली. कोकण प्रांत महाराजांच्या ताब्यात येताच महाराजांचा संबंध इंग्रज, पोर्तुगिज, डच आणि फ्रेंच या परकियांशी आला. त्याकाळी समुद्रात चाचेगिरी होत असे. चाचेगिरी म्हणजे लूटमार. तसेच व्यापारी बोटी लुटल्या जाऊ नयेत म्हणून व्यापाऱ्यांकडून खंडणी वसूल केली जात असे. जंजिऱ्याचा सिद्दी हा या मार्गाने बलवान झाला होता. तो कोणालाच आवरत नव्हता. जणू अरबी समुद्रावरचा राजाच झाला होता. त्याला फिरंगी, वेलंदेज मुंबईचे इंग्रजही घाबरत होते.

महाराजांच्या मनात सिद्दीसारखी सागरावर सत्ता मिळवायची होती. त्यांनी अनेकदा सिद्दीला जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु सिद्दी अजिंक्य राहिला. त्यामुळेच महाराजांनी स्वतःचे आरमार उभे करण्याचा निश्चय केला. शिवाजी महाराजांनी १६५७ च्या सुमारास कल्याण भिवंडी काबीज करून खाली राजापूरपर्यंतचा सलग पट्टा स्वराज्यात सामील करून घेतला. त्या वेळेपासून महाराजांचा सिद्दीशी संबंध येऊ लागला. सिद्दी महाराजांच्या मुलुखावर हल्ले करून पुन्हा जंजिऱ्यात जावून लपत असे. अशावेळी महाराजांचे एक वाक्य मोठे मार्मिक आहे. महाराज म्हणाले होते, 'घरात जैसा उंदीर तैसा हा शत्रू यास कैसे जेर करावे?'

शिवाजी महाराजांनी कल्याण आणि वसई येथे १६५७ मध्येच तारवे बांधण्याची व्यवस्था केली. या दोन जागा निवडण्यात महाराजांची दूरदृष्टीच दिसते. ठाणे आणि जवळपास त्याकाळी सागाची झाडे मुबलग होती. त्यामुळे

बोटी बांधण्यासाठी साग मिळविण्यात अडचण नव्हती. तसेच ही दोन्ही शहरे खाडीकिनारी असल्याने तयार तारवे मुख्य समुद्रात सोडणे सोपे जाणार होते. त्याचबरोबर महाराजांनी वसई येथील पोर्तुगिजांना सांगितले होते की 'माझे आरमार मी सिद्दीच्या विरुद्ध वापरणार आहे. तुम्हाला त्यापासून काहीही धोका नाही.' असे पटविल्याने सुमारे तीनशे पोर्तुगिज कसबी कारागीर बोटी बांधण्याच्या कामावर ठेवले. वसईला पोर्तुगिज वसाहत असल्याने कारागीर मिळणे सोपे गेले.

अर्थात शिवराय नेहमीच आणि प्रत्येक बाबतीत सावध असत. त्यांनी गोऱ्यांना पूर्ण ओळखले होते. महाराजांनी जाणले की पोर्तुगिज कारागीर एक ना एक दिवस आपल्याला सोडून जातील. आपल्या देशप्रेमापोटी हे आपल्या नोकऱ्याही सोडून जातील आणि मग आपला बोटी बांधण्याचा कारखाना कसबी कारागिरांअभावी बंद पाडतील. महाराजांनी या पोर्तुगिज कारागिरांच्या हाताखाली अत्यंत हुशार आणि चलाख देशी मजूर दिले होते. हे कोकणी लोक सागरावर खलाशी कामात तरबेज होते. त्यांनी वेलंदेजांकडून बोटबांधणीचे काम शिकून घेतले. शेवटी महाराजांचा होरा खरा ठरला. एक दिवस सर्व पोर्तुगिज कारागीर नोकरी सोडून निघून गेले. पुढे महाराजांनी मराठी खलाशाकडून बोटबांधणीचे काम करून घेतले. महाराजांची सावधता कामी आली.

कल्याण-वसई येथे महाराजांनी पोर्तुगिजांकडून ही बांधून घेतलेली पहिली वीस लढाऊ जहाजे समुद्रावर तरंगू लागताच शत्रूचे धाबे दणाणले. त्यानंतर महाराजांनी वरच्या चौलावर पन्नास लढाऊ जहाजे बांधायला सुरुवात केली. आता महाराजांची सत्ता ठाणे, वसई आणि मुंबई वगळता संपूर्ण कोकणावर होती. ठिकठिकाणी सागर किनाऱ्यावर असलेले किल्ले शिवाजीने ताब्यात घेतले. आता शिवाजी महाराजांना जंजिऱ्याप्रमाणे सागरी किल्ल्याची आवश्यकता भासू लागली. महाराजांचे सिद्दीबरोबर खटके उडू लागले. १६६९ पासून वारंवार महाराजांनी सिद्दीवर हल्ले चालू ठेले होते.

महाराजांना सिद्दीचा जंजिरा मिळवायचा होता, परंतु इतक्यात सिद्दीने विजापूरकरांची सत्ता सोडून तो मोगलांच्या आश्रयाला गेला. त्यामुळे सिद्दी अधिकच प्रबळ झाला. त्याला मोगलांचे पाठबळ मिळताच इंग्रज पोर्तूगिजही त्याला घाबरून मदत करू लागले. महाराजांना जंजिऱ्याच्या उरावर तसाच बलाढ्य जंजिरा हवा होता. एकदा महाराज मालवण बंदरात आले असता त्यांना समोर सागरात कुरटे बेट दिसले. शिवाजी महाराजांना त्या कुरटे बेटाचे

महत्त्व जाणवले. महाराजांनी त्या बेटावर जलदुर्ग बांधायची आज्ञा दिली. हिरोजी इंदलकर, मायनाक भंडारी रात्रंदिवस खपू लागले. हा किल्ला बांधताना शत्रूंनी अडथळा आणू नये म्हणून पायाचे काम पूर्ण होईपर्यंत महाराज जातीने मालवणला राहिले. त्यानंतर जबाबदारी गोविंद विश्वनाथ प्रभू यांच्यावर सोपविण्यात आलेले जलदुर्गाचे काम पूर्ण होण्यास तीन वर्षे लागली.

महाराजांनी जलदुर्गाचे नाव सिंधुदुर्ग ठेवले. हिरोजी इंदलकर मायनाक भंडारी यांच्याबरोबर गोविंद प्रभू यांना महाराजांनी चांगल्या कामाबद्दल नावाजले. त्यांना झगा, मंदील, चादर, मोत्याचा तुरा, सोन्याची कडी आणि तलवार दिली.

त्यानंतर महाराजांनी दापोलीजवळ हर्णे येथे सुवर्णदुर्ग बांधायला काढला आणि पुढे आरमाराचा विस्तार करताना महाराजांनी रत्नागिरी, पद्मदुर्ग, सरजाकोट, राजकोट, गहनदुर्ग, खाकेरी, अंजनवेली असे एका पाठोपाठ एक असे दुर्ग बांधले आणि मराठ्यांचे आरमार सज्ज केले.

आता महाराजांनी बचावात्मक धोरण सोडून आक्रमक धोरण स्वीकारले. महाराजांचे आरमारी सामर्थ्य पाहून सिद्दीचीही मस्ती उतरली होती. परकीय सत्ता महाराजांना हबकून राहात होत्या. महाराजांनी या सर्व सत्तांना एक जोरदार धक्का देऊन आपले सागरी सामर्थ्य दाखवून द्यायचे होते. त्यांनी बसनूरवर हल्ला करण्याचे ठरविले. ८ फेब्रुवारी १६६५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्वत: सागरी बोटीवर चढले. स्वत:च्या आरमारातून लाटांवर स्वार होऊन छापा टाकणारा शिवाजी महाराज हा भारताच्या इतिहासात पहिला राजा असेल. महाराजांना आपल्या आरमाराचा इतका विश्वास होता. १४ फेब्रुवारीला महाराज बसनूरला पोहोचले. तेथील फौज आणि जनता पूर्णपणे बेसावध होती. कोणी स्वप्नातही कल्पना केली नव्हती की शिवाजी महाराज स्वत: जलमार्गाने येऊन छापा टाकतील. महाराजांना या छाप्यात धनदौलत, जडजवाहीर, मौल्यवान कापड अशी गडगंज संपत्ती मिळालीच, त्याचबरोबर मराठ्यांच्या आरमाराचे नाव किर्ती वाढली.

सिंधुदुर्ग बांधून झाला तरी सिद्दीच्या कारवाया पूर्णपणे थाबल्या नव्हत्या. तो मराठ्यांच्या खोड्या काढून मुंबईत इंग्रजांच्या आश्रयाला येत असे. इंग्रजांना मोगलांकडून अनेक व्यापारी सवलती मिळत असल्याने त्यांना सिद्दीशी वाकडे होता येत नव्हते. महाराजांनी इंग्रजांना त्याबद्दल तंबी देऊन पाहिली. परंतु इंग्रजांचा नाईलाज होता. यावर उपाय म्हणून मुंबईपासून अवघ्या १९ कि.मी.वर असणाऱ्या खंदेरी, उंदेरी या बेटावर किल्ले बांधायचे महाराजांनी ठरविले.

महाराजांच्या आरमारातील निरनिराळ्या बोटींची संख्या चित्रगुप्ताने दिली

आहे. ती यादी इथे देण्याचे कारण निरनिराळ्या बोटींचे प्रकार आणि संख्या यांचा अंदाज येऊ शकेल. या यादीत ३० गुराबा, १५० महागिऱ्या, ५० लहान गुराबा, १०० गलबते, मोठ्या होड्या १० तर लहान होड्या १५०, ६० तारवे, ५० मचवे आणि १५ जूग इतकी संख्या दिली आहे. १५० टनापर्यंत जहाजे ८५ असल्याचे संदर्भ मिळतात. तसेच १६० जहाजे मुंबईच्या बॅकबेसमोर उभी करून मुंबईच्या इंग्रजांवर मराठ्यांनी दबाव टाकला होता, असे मुंबईच्या इंग्रजांचीच नोंद आहे.

महाराज आपल्या आरमाराचा उपयोग लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी जसा करत होते तसा तो इराण, बसरा, मोका बंदराशी व्यापार करण्यासाठीही करत होते. महाराजांच्या आरमाराचा मोठा दरारा निर्माण झाला होता. महाराजांनी आरमारासाठी कोळी, भंडारी या दोन वीरांचा भरणा केला होता. ह्या दोन जाती बलवान, काटक असून त्यांना समुद्रावर सहज विहार करता येतो हे महाराजांनी ओळखले होते. आरमाराचे सरदार, मायनाक भंडारी, इब्राहिमखान, दौलतखान, दर्यासारंग हे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठेपण कशात आहे? असे विचारणाऱ्यास हे चोख उत्तर आहे. आरमाराचे, जलदुर्गाचे महत्त्व जाणणारा शिवाजी हा पहिला राजा होता. शून्यातून आरमार निर्माण करून पश्चिम किनाऱ्यावर आपली दहशत निर्माण करणे आणि जलदुर्गाने मोठी जहाजे पाठवून व्यापार करणे हे किती कठीण काम होते. परंतु ते महाराजांनी आपल्या आभाळाएवढ्या कर्तृत्वाने सहजशक्य करून दाखविले.

■

# शिवकालीन अर्थव्यवस्था

शिवकालीन अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचे स्रोत म्हणून शेतीवरील कर, व्यापारी मालाच्या आयाती निर्यातीवरील जकात, अन्य सत्ताधिशांवर लादलेल्या खंडण्या आणि शत्रू मुलुखात केली जाणारी लूट असे चार स्रोत मुख्यत: होते. ह्या काळी शेती हेच रयतेच्या उत्पन्नाचे साधन होते. आठ महिने सैन्यात नोकरी आणि चार महिने गावाकडे शेती हेच व्यवसाय प्रामुख्याने रयत करीत होती. त्यामुळे शेतीतून येणारे उत्पन्न हेच स्वराज्याचे मुख्य उत्पन्न होते. अण्णाजी ऊर्फ अनोजी दत्तो प्रभुणीकर यांनी शिवकाळात सारा नेमून दिला होता. शेतसारा ठरविताना केवळ शेताच्या आकारमानावर सारा न ठरवता त्या जमिनीचा कस, त्यातून मिळणारे उत्पन्न तसेच जिराईत, पाटाची की बागाईत याचा प्रामुख्याने विचार होई. जमिनीचा आकार मोजण्यासाठी शिवकाठीचा वापर होत असे. शेतकऱ्याकडून उत्पन्नाच्या एक तृतीयांश सारा वसूल केला जात असे. हा सारा धान्याच्या रूपातही सरकारजमा करता येत असे. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली यावी, जमीन ओसाड राहू नये यावर सरकारचा कटाक्ष असे.

भात, नारळ, सुपारी, हळद, ऊस, कांदे, बटाटे, आले यावर कर आकारला जाई. ज्या शेताला पाटाचे पाणी मिळे त्यांना वेगळी पाणीपट्टी भरावी लागे. जनावरांवर कर असे. गुलामांच्या व्यापारावर जबरदस्त कर असे. मिठाच्या आयाती निर्यातीवर कर द्यावा लागे. मिरासपट्टी, सरामापट्टी बसवली जात असे. राज्याभिषेकाच्या प्रसंगी सिंहासनपट्टी बसवली होती. बारा बलुतेदारांना आणि अठरा अलुतेदारांना काही वसुली हक्क होते.

इंग्रज पोर्तुगिज, डच यांच्याकडून व्यापारासाठी होणाऱ्या आयात-निर्यात मालावर अडीच टक्के जकात वसूल केली जात असे. त्याचबरोबर राज्यातील बाजारपेठेत विकल्या जाणाऱ्या मालावर जकात बसत असे. आयात मालाच्या किंमती जर कमी असतील तर स्थानिक उत्पन्नाचा उठाव राहणार नाही हे

अर्थशास्त्रीय तत्त्व ओळखून अशा वेळी आयात मालावर जबर जकात आकारून रयतेच्या मालाला भाव दिला जात असे. या उलट काही निर्यातीला चालना देण्यासाठी जकातीत सूट मिळत असे. बाजारपेठेची वाढ व्हावी म्हणून व्यापारी प्रयत्न करीत असत.

राज्य अडचणीत असे तेव्हा लुटीचे प्रसंग नेहमीच येत असत. महाराज मोगली मुलुखावर अचानक छापा टाकून लूट मिळवित असत. अशी लूट करणे हे तेव्हा सर्वमान्य होते. फौजेने केलेल्या लुटीचा ऐवज सरकारात जमा करावा लागे. तसेच काही प्रदेश भाडेपट्टीने दिला जात असे, त्याची भाडेपट्टी सरकारला मिळत असे. त्या काळी सौंधेचा राजा आणि गोवळकोंडेकर यांजकडून खंडणी मिळत असे.

स्वराज्याची आर्थिक परिस्थिती खूपच चांगली होती. निरनिराळ्या बखरीतून पुढे येणारे आकडे बोलके आहेत. स्वराज्याचे एकूण १४ प्रांत पाडले होते. या चौदा प्रांतात मिळून २६८ किल्ले होते, अशी नोंद बखरीतून मिळते. यात महाराजांनी १११ किल्ले बांधले होते, असे एक बखर सांगते तर दुसरीकडे हा आकडा ८४ दिला आहे.

शिवकाळात स्वराज्यात एकूण २६ प्रकारचे होन चालत होते. त्यामुळे स्वराज्याच्या खजिन्यात एक गंबार एक लाख, मोहरा दोन लक्ष, पुतळ्या तीन लक्ष, पातशाही होन साडे तेरा लक्ष, सणगिरी होन पावणे तेरा लक्ष, अच्युतराई होन अडीच लक्ष, देवराई होन तीन लक्ष, रामचंद्रराई होन एक लक्ष, गुत्ती होन एक लक्ष, धारवाडी होन दोन लक्ष, किरकोळ १२ प्रकारचे होन तीन लक्ष, सतलाम्या एक लक्ष, इभराम्या एक लक्ष, शिवराई होन चार लक्ष, कावेरी होन १५ लक्ष, प्रलखटी होन २ लक्ष, पामनाईकी होन १ लक्ष, आदवणी तीन लक्ष, जडमाल होन पाच लक्ष, ताडपत्री होन एक लक्ष चाळीस हजार, तुनी एक लक्ष, सैल्याघटी दोन लक्ष, एलोरी ५० हजार, निशाणी होन पाच लक्ष. अशी सुवर्ण नाणी खजिन्यात असल्यामुळे आर्थिक परिस्थिती भक्कम होती. याशिवाय साडेबारा खंडी सोने स्वराज्याच्या खजिन्यात होते. ही यादी कै. कृ. अ.केळुसकर देतात. त्या यादीवरून निरनिराळे कोण कोणते होन शिवकाळात चलनात होते याचीही कल्पना यावी.

महाराजांनी राज्याभिषेक प्रसंगी सोन्याचे शिवराई होन व तांब्याच्या शिवराई पाडल्या होत्या. परंतु चांदीची नाणी पाडली नाहीत. परंतु त्या काळात नर्मदेच्या वरती रुपया अश्रफी होत्या. स्वराज्याच्या खजिन्यात रुपये पाच लक्ष, असर पट्ट्या (अश्रफ्या) दहा लक्ष, दाभोळी लारी २५ लक्ष. लारी हे केसाच्या पिनेच्या

आकाराचे चांदीचे नाणे होते. याचे वजन चार ग्रॅम असून किंमतही साडेतीन रुपये होती. बसती लारी पाच लक्ष तसेच चांदी वजनी पन्नास खंडी होती. इतर जडजवाहीर एक कोट रुपये किंमतीचे होते.

महाराजांचा स्वराज्याचा खजिना इतका तुडूंब भरलेला होता. परंतु हाही हिशेब अनेक बखरीतील नोंदी एकत्र करून मिळविला आहे. बिनचूक आकडे प्राप्त होणेही कठीण आहे. वर दिलेले आकडे हेही अपुरे असू शकतात. परंतु वाचकांना कल्पना येण्यासाठी पुरेसे आहेत.

शिवराज्याभिषेक प्रसंगी इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडन हा रायगडावर नजराणा घेऊन हजर होता. त्यावेळी त्याने महाराजांशी व्यापारी तह केला. त्यातील इतर सवलतीबाबत महाराजांनी विरोध केला नाही. परंतु इंग्रजी नाणी स्वराज्यात चालावीत, ह्या इंग्रजांच्या कलमातील धोका महाराजांनी ओळखून हे कलम अमान्य केले होते.

राज्याभिषेक प्रसंगी महाराजांनी रायगडावर टांकसाळ उघडली होती. ही टांकसाळ म्हणजे एक उंच भिंतीची ऐसपैस खोली होती. तिला खालच्या बाजूला खिडक्या नव्हत्या. फक्त हवा येण्यासाठी व भट्टीचा धूर जाण्यासाठी अगदी वरती झरोके होते. या खोलीला एकच दरवाजा होता. त्या दरवाज्याने सोडताना कामगारांची कसून तपासणी केली जात असे. पोतनीस या कामगारांना मोजून शुद्ध सोने देत असे. तसेच या सोन्यात चार टक्के चांदी आणि चार टक्के तांबे मिसळले जात असे. त्या हीन धातूमुळे सोन्याला, काठिण्य येत असे. कामगारांना दिलेले शुद्ध सोने, अधिक आठ टक्के चांदी-तांबे इतक्या वजनाची नाणी घेऊनच कामगारांना सोडले जात असे. सोडण्यापूर्वी कामगारांची कसून तपासणी होत असे. त्यानंतर पोतनीस होन जमादारखान्यात जमा करून घरी जात असे.

इतकी कडक शिस्त आणि सावधानता स्वराज्यात साडे तीनशे वर्षांपूर्वी होती हे विशेष होय. शिवकाळातील होनांच्या शुद्धतेबाबत एक सत्यकथा आहे. काही इंग्रज दलाल चौलच्या बाजारातून फिरत होते. त्यांनी तेथील व्यापाऱ्याकडे शिवराई होन पाहिले. त्या होनांची शुद्धता आणि झळाळी पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. त्याकाळी राज्याच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे त्या राज्याच्या सुवर्ण नाण्याचा कस कमी अधिक करण्याची प्रथा होती. त्यामुळे इतके शुद्ध सोन्याचे शिवराई होन पाहून त्यांना अचंबा वाटला. त्या दलालांनी ते शिवराई होन चौलच्या व्यापाऱ्यांकडून विकत घेतले आणि मुंबईच्या सराफ कट्ट्यावर विकायला आणले. दलालांना या व्यवहारात भरपूर फायद्याची अपेक्षा होती. परंतु मुंबईचे मारवाडी त्याहून लबाड होते. त्यांनी हे शुद्ध सोन्याचे होन हिणकस ठरविले.

होनांची किंमत मारवाड्यांनी कमी करताच दलाल पुरते घाबरले. त्यांनी मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्याकडे तक्रार केली. इंग्रजांनी चौलला जावून चौकशी करताच मुंबईच्या सराफांची लबाडी उघड झाली. त्या इंग्रज अधिकाऱ्याने गव्हर्नरला स्वच्छ कळविले की शिवराई होन शुद्ध २२ कॅरेटचे आहेत. हिणकस आहेत ते मुंबईचे सराफ.

महाराजांनी पाडलेल्या होन आणि तांब्याची शिवराई दोन्हीवर एका बाजूस 'श्री राजा शिव' असे दोन ओळीत असे, तर दुसऱ्या बाजूस वरती 'छत्र' आणि त्याखाली 'पति' असे देवनागरीत लिहिलेले असे. मोगली नाण्यावर कुराणातील आयता कोरल्या असत. पण स्वराज्य हे खऱ्या अर्थाने निधर्मी राज्य असल्याने हिंदू देवदेवता किंवा खुणा त्यावर नव्हत्या. त्याचप्रमाणे टांकसाळीचे नाव नसे. छापल्याची तारीखही नसे. कारण हे नाणे आकाशात चंद्र-सूर्य असेपर्यंत चालावे, असे महाराजांना सुचवायचे असे. पुढे दीडशे वर्षे ही नाणी व्यवहारात होती.

मोठ्या व्यवहारात होनांचा वापर केला जाई तर रयतेचे छोटे व्यवहार हे शिवराई, सजगणी, लारी, प्रताप, धरण, चवल अशा कमी किंमतीच्या तांब्याच्या नाण्यात होत होते. महाराजांनी वतने जहागिऱ्या देण्याचे बंद करून रोख पगारी नोकर नेमल्याने पेशवा, मंत्री यांपासून फौजेतील शिपायांपर्यंत सर्वांना पगार दिला जात असे. त्यात मोठ्या लोकांना वार्षिक होन तनखा म्हणून दिले जात. तर इतरांना दरमहा वेतन दिले जाई. त्यामुळे महाराजांनी बरेच सुवर्ण होन पाडले होते. परंतु आज फक्त चार होनच पहायला मिळतात. मुंबई, दिल्ली, आणि इंग्लंडच्या वस्तु संग्रहालयात प्रत्येकी एक होन असे तीन होन आपण पाहू शकतो. चौथा होन हा सातारच्या राजघराण्यात पूजेत आहे. या चार व्यतिरिक्त सर्व ठिकाणी सुवर्ण होनांच्या प्रतिकृती ठेवलेल्या असतात.

# शिवरायांचे गडकिल्ले

गडकिल्ल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारे एक वाक्य शिवकाळातील एक ज्येष्ठ मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या 'आज्ञापत्रा'त स्पष्ट केले आहे. ते म्हणतात 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' अर्थात त्यांना अभिप्रेत असलेले दुर्ग म्हणजे जलदुर्ग (जंजिरा), भुईकोट, डोंगरी दुर्ग आणि वनदुर्ग असावेत. कारण हे चारही प्रकारचे दुर्ग संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.

दुर्गबांधणी हे तंत्र भारतीयांना प्राचीन काळापासून ज्ञात होते तसे प्राचीन ग्रंथात उल्लेख सापडतात. राजधानीच्या किंवा महत्त्वाच्या शहराभोवती भक्कम तटबंदीही केली जात असे. बाहमनी काळात सपाट प्रदेशावर अशी तटबंदी अथवा भुईकोट किल्ले बांधले जावू लागले त्या काळात भुईकोट किल्ल्यांची साखळी निर्माण केली गेली. बहामनी काळात डोंगरी किल्ल्यांकडे दुर्लक्ष केले गेले. तसेच नवे डोंगरी किल्ले बांधलेही गेले नाहीत. शिवरायांनी नेमका याचाच फायदा घेतला त्यांनी दुर्लक्ष झालेले, पडझड झालेले गड ताब्यात घेऊन राबते केले. शिवरायांनी सुरुवातीला घेतलेले किल्ले असेच होते. तोरणा, राजगड यांसारखे पडझड झालेले किल्ले घेऊन त्यांनी डागडुजी केलेली दिसते.

कोकण आणि देश असे महाराष्ट्राचे दोन भाग सह्याद्रीमुळे झाले आहेत. त्यामुळे घाटमाथ्यावर बांधलेल्या गिरीकिल्ल्यांमुळे घाटमाथा, कोकण आणि देश यावर लक्ष ठेवणे सोयीचे होत होते. अर्थात ज्याप्रमाणे जलदुर्गांची निर्मिती करण्यासाठी सागरी किनाऱ्याची आवश्यकता असते. त्याप्रमाणे गिरीकिल्ले बांधण्यासाठी पर्वत रांगांची आवश्यकता असते. महाराष्ट्राला दैवयोगाने या दोन्ही सोई आहेत. सातशे किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा महाराष्ट्रात आहेत.

किल्ल्याच्या वरील चार प्रकारात भुईकोट किल्ले हे तसे बांधायला सोपे, कारण मुळात हे सपाट प्रदेशावर बांधले जातात. यात तटबंदी प्रचंड रुंद असते.

काही भुईकोट किल्ल्याच्या तटावरून बैलगाडी चालवू शकत असत. बहुदा हे किल्ले मातीचे असत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे चाकणचा संग्रामदुर्ग, गढी हे त्याचे छोटे रूप. तर तटबंदीचे वाडे हेही भुईकोट किल्ल्याचेच रूप आहे. मुस्लीम आक्रमण काळात संरक्षणासाठी सरदार, जहागिरदार, वतनदार असे तटबंदीचे वाडे बांधून राहत होते. परंतु हेच लोक वाडेहुडे बांधून पागा आणि फौज ठेवून शिरजोर बनू लागले. मालकाशी बेईमानी करू लागले. प्रसंगी शत्रूला मिळू लागले. त्यामुळेच महाराजांनी असे तटबंदीचे वाडे बांधू नयेत म्हणून हुकूम काढला. जुने वाडे शोधून त्यांची तटबंदी नष्ट केली. पुढे छत्रपती शाहूने देखील बाजीराव पेशव्याला शनिवारवाड्याला तटबंदी करण्यास मना करून काही काळ बांधकाम थांबविले होते. पूर्ण गावाभोवती तटबंदी प्राचीन काळापासून भारतात बांधली जात होती. अशा तटबंदीला दरवाजे असत. आज बऱ्याच जुन्या शहरांची जी वाढ झाली त्यात मूळची तटबंदी नष्ट झाली. तटाचे दरवाजे नष्ट झाले तरी आजही त्या ठिकाणच्या वस्तीला त्या नष्ट झालेल्या दरवाजाच्या नावाने ओळखले जाते.

वनकिल्ले हा किल्ल्याचा प्रकार नसून दाट अरण्याचा प्रकार आहे. जेथे निबिड अरण्याचा भाग असतो. बाहेर पडायला वाटा नसतात, अशा ठिकाणी शत्रूला गाठून त्याच्यावर गनिमी काव्याने हल्ला करणे येथे अभिप्रेत असते. जावळीचे खोरे किंवा डंबरखिंड ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत.

जलदुर्ग म्हणजे समुद्राच्या काठावर किंवा समुद्रातील बेटावर बांधलेला किल्ला. ज्या गडाच्या तीन बाजूंनी पाणी आहे, असे बरेच गड आहेत. परंतु गडाच्या चारही बाजूला पाणी असणारे म्हणजे समुद्रातील बेटावर बांधलेले गड तुलनेने कमी असतात. कारण त्यांच्या बांधणीसाठी बेट सापडणे गरजेचे असते. महाराजांनी मालवणजवळ कांसा बेटावर सिंधुदुर्ग बांधला. तसेच मुरुडचा जंजिरा किंवा अलिबागचा किल्ला ही त्याचीच उदाहरणे आहेत. यांना जलदुर्ग किंवा जंजिरा असेही म्हणतात.

गिरीदुर्ग बांधणी हे एक शास्त्र आहे. रामचंद्रपंत अमात्यांनी आपल्या आज्ञापत्रात गिरीदुर्ग बांधण्याचे वास्तुशास्त्र समजाविले आहे. गिरीदुर्गाची तटबंदी मजबूत असावी. त्यास ठिकठिकाणी बुरुज असावे. बुरुजावर ठेवलेल्या तोफा बाहेरून दिसणार नाहीत याची काळजी घ्यावी. दुर्गाला एकापेक्षा अनेक दरवाजे असावेत. दरवाजाची बांधणी काटकोनात करावी जेणेकरून दरवाज्यापर्यंत जाईपर्यंत शत्रूला कळणार नाही की इथे दरवाजा आहे. दुर्ग बांधताना त्यावर टाके खोदून भरपूर पाण्याची सोय करावी. दुर्गाच्या दूरवर कोपऱ्यात दारुचे

कोठार असावे. तटबंदीत ठिकठिकाणी माऱ्यासाठी जंग्या ठेवाव्यात. याप्रमाणे गिरीदुर्ग बांधणी करावी असे रामचंद्र पंत अमात्य सांगतात. रायगड या सर्व दृष्टीने परिपूर्ण असा किल्ला आहे.

गिरीदुर्गाजवळ तोफेच्या माऱ्यात दुसरा दुर्ग वा टेकडी नसावी. ज्याप्रमाणे पुरंदरजवळ वज्रगड आहे. वज्रगड पडला की पुरंदर पडायला वेळ लागत नाही. कारण वज्रगडावरून पुरंदरवर मारा करता येतो.

गिरीदुर्गाच्या आणि जलदुर्गाच्या साखळ्या निर्माण केल्या जात असत. शिवरायांनी मृत्यूपूर्वी काही वर्षे आधी कर्नाटक मोहीम काढली होती. त्यात महाराजांनी स्वराज्यापासून जिंजीपर्यंत गिरीदुर्गाची एक साखळी निर्माण केली होती, त्याचा फायदा १६८९ मध्ये राजाराम महाराज रायगड सोडून जिंजीत गेले तेव्हा त्यांना झाला होता. संकटकाळी निसटून जाण्यासाठी या दुर्ग साखळ्यांचा चांगला उपयोग होत असे, हे महाराजांनी ओळखले होते.

प्रत्येक दुर्गावर रक्षणासाठी ६०० ते १००० च्या आसपास दुर्गाच्या आकाराच्या मानाने शिबंदी असे. १३ जून १६६५ रोजी पुरंदरच्या तहात मिर्झाराजे जयसिंहास महाराजांनी २३ किल्ले दिले आणि शरणागती पत्करली. यात महाराजांचा डाव होता की या २३ किल्ल्यांवर मिर्झा राजांचे २३-२५ हजार शिबंदी अडकून पडेल. तेवडा स्वराज्यावर पडणारा दाब कमी होईल. कारण प्रत्येक दुर्गाच्या रक्षणासाठी १००० शिबंदी लागत असे.

प्रत्येक दुर्गावर एक किल्लेदार किंवा हवालदार असे त्याच्या हाताखाली एक किंवा दोन सरनोबत असत. तसेच सबनीस आणि कारखानीस असे अधिकारी असत. यांच्या नेमणुका करण्याबाबत महाराजांचे धोरण अत्यंत कडक असे. योग्य जामिनदार असल्याशिवाय या नेमणुका होत नसत. अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार वा गुन्हा केल्यास त्यानंतर शासन होतच असे, परंतु त्यांच्या जामिनदारालाही जबाबदार धरले जात असे. या अधिकाऱ्यांच्या ठरावीक काळानंतर बदल्या होत असत. त्यात सरनोबत मराठा जातीवंत असे. सबनीस बहुधा ब्राह्मण असे. कारखानीस हे कायस्थ प्रभूच असत. हवालदार नेमताना त्याचे कूलशील पाहून ९६ कुळीचा मराठा नेमला जात असे. गडाचा मुख्य दरवाजा सूर्योदयाला उघडणे आणि सायंकाळी सूर्यास्ताला बंद करणे ही हवालदाराची वैयक्तिक जबाबदारी असे.

महाराज वेळी-अवेळी कोणत्याही दुर्गावर अचानक भेट देऊन तेथील व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करीत असत. दोषी व्यक्तीला जागेवरच शासन केले जात असे.

महाराजांनी किती दुर्ग नव्याने बांधले आणि किती दुरुस्त केले याबाबत इतिहासात निश्चित आणि विश्वासार्ह माहिती आज नाही. सभासद महाराजांनी बांधलेल्या १११ गडांची यादी देतो. परंतु हे सगळे गड नव्याने बांधलेले नसून दुरुस्त केलेले आणि नव्याने बांधलेले असे एकूण गड आहेत. महाराजांनी सात गिरीदुर्ग आणि दोन जलदुर्ग बांधल्याचे पुरावे सापडतात ते म्हणजे प्रतापगड, मच्छिंद्रगड, वर्धनगड, यशवंतगड, पालगड, मानगड आणि महिपतगड हे गिरीदुर्ग, तर पद्मदुर्ग आणि मालवणचा सिंधुदुर्ग हे दोन जलदुर्ग महाराजांनी नव्याने बांधल्याची नोंद आहे. महाराजांनी मोडकळीस आलेले अनेक गड जिंकून घेऊन दुरुस्त करून राबते केले होते.

पुढे महाराजांनी अनेक चांगले राबते गड शिबंदी मारून जिंकून घेतले. त्यामुळे महाराजांनी एकूण तीनशेच्या जवळपास छोटे-मोठे गड होते व महाराजांनी जलदुर्ग फारसे बांधलेले नाहीत. परंतु राज्याला खरा धोका पाण्यातून आहे हे ओळखणारा तो एकमेव राजा होता. जंजिऱ्याचा सिद्दीला महाराज शेवटपर्यंत संपविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु जंजिरा अजिंक्य निघाला हे शल्य महाराज बाळगून होते. खांदेरी आणि उंदेरीसारखी काही बेटे आणि दीर्घायुष्य लाभले असते तर महाराजांनी आणखी काही जलदुर्ग बांधून राज्य सुरक्षित केले असते हे नक्की.

काही इतिहास अभ्यासकांनी ऐतिहासिक कागदपत्रात आलेल्या उल्लेखावरून शिवरायांच्या ताब्यात एकूण तीनशे आठ किल्ले होते. अर्थात त्यातील काही गड आज नामशेष झाले असतीलही, परंतु त्याला आपणच जबाबदार नाही का? गावोगाव शिवरायांचे पुतळे बांधण्यापेक्षा शिवरायांच्या पायधुळीने पावन झालेले हे गडकिल्ले जतन करायला हवे होते असे वाटते.

# शिवरायांचे शिलेदार

छत्रपती शिवराय मोठे होते, कर्तृत्ववान होते. त्यांनी स्वराज्य स्थापन केले आणि त्यामुळे गेली ४०० वर्षे जनमनात अढळ स्थानावर आहेत हे खरे असले तरी बालशिवाजीला शक्य कसे झाले हे जाणून घेतले पाहिजे. त्याचे पहिले कारण म्हणजे शिवबाला बालपणीच जिजाऊ साहेबांकडून आणि पिता शहाजीराजे यांचेकडून जगण्याचे प्रयोजन मिळाले होते. शिवबाने पुढे जाऊन कोणता उद्योग करायचा हे आधीच ठरलेले होते. त्याकाळी जहागीरदार वतनदारांची मुले विलासात रमत होती. स्वारी शिकारीत वेळ दवडत होती. बाल शिवबालाही हे सहज करता येणार होते. परंतु त्यांच्यावर जिजाऊ साहेबांनी स्वराज्य निर्मितीची मोठी जबाबदारी टाकली होती. आणि म्हणून बाल शिवाजीचे त्या दृष्टीने प्रयत्न चालू होते.

ऐन खेळायच्या वयात दादोजींनी शिवबास जहागिरीत गावोगाव फिरविले. प्रजा आपल्या अडचणी गाऱ्हाणी घेऊन राजाकडे जाते त्यात विशेष काही नाही. परंतु शिवबाच्या बाबतीत राजा प्रजेकडे गेला. त्याने प्रजेचे हालहवाल जाणून घेतले. प्रजेसाठी हे नवे होते. प्रजेला ते भावले. त्यातून राजा आणि प्रजा एकत्र आले. पुढे शिवबाने स्वराज्याच्या निर्मितीसाठी प्रजेला जेव्हा जेव्हा साद घातली, तेव्हा तेव्हा गावोगावची तरुण मंडळी, ज्येष्ठ मंडळी मिळेल ते हत्यार घेऊन धावून आली. या सर्व वयातील रयतेला महाराजांची स्वराज्य निर्मितीची कल्पना भावली आणि या स्वराज्याला आपला हातभार लागला पाहिजे असे प्रजेला वाटू लागले. महाराजही प्रजेला सांगत होते की हे राज्य प्रजेचे असणार असून ते व्हावे ही 'श्रींची इच्छा' आहे.

स्वराज्याच्या या उद्योगात महाराजांना सहकार्य करण्यासाठी जिवावर उदार झालेल्या या शिलेदारांची आपण माहिती करून घेऊ या. हे शिलेदार अगणित आहेत. परंतु ते कसे निरनिराळ्या जातीचे आणि निरनिराळ्या वयाचे आहेत

हे जाणून घेण्यासाठी काही मोजकेच शिलेदार जाणून घेऊ या.

## वीररत्न बाजी पासलकर

शिवबा लहान वयात जहागिरीतील गावोगावी फिरत होता. रयतेत मिसळून त्यांची सुखदु:खे जवळून पाहात होता. रयत शिवबाला मानत होती, पण इतकेच करून भागणार नव्हते. पुण्याभोवती बारा मावळ होते. मावळ म्हणजे नदीचे खोरे. या बारा मावळात बारा देशमुख होते. ते स्वत:ला राजाच समजत असत. त्यांच्यात आपापसात वैर होते. बांदल आणि जेधे, खोपडे आणि जेधे, चोरगे आणि शिळमकर या देशमुखांची आपापसात पिढीजात वैरे होती. ती संपवून त्यांना एकत्र आणून स्वराज्याच्या कामी शिवबाच्या मागे उभे करायला हवे होते. त्यात कान्होजी जेधे बंगळूरला शहाजीराजांकडे होते. इथे वयोवृद्ध देशमुख बाजी पासलकर होते. बाजींना जिजाबाईंनी बोलावून घेऊन त्यांच्यावर सर्व देशमुखांना एकत्र करण्याची कामगिरी दिली.

बाजी शूर होते तसे गुणग्राहक होते. बाजी जातपात मानत नसत. त्यांच्या पदरी खडनाक नावाचा महार होता. तसाच गोढ नावाचा मांग होता. खरसुला नावाचा एक शिंपी लढवय्या बाजींचा विश्वासू होता. बाजी स्वत: गुणग्राहक होते. बाजी स्वराज्यात आले तेव्हा ते साठ वर्षांचे तरुण होते. त्यांची मुलगी सावित्री ही कारीच्या कान्होजी जेध्यांची पत्नी होती म्हणजे बाजी हे कान्होजींचे सासरे होते. इतके बाजी ज्येष्ठ होते.

बाजींनी आपल्या गोड वाणीने बहुतेक देशमुखांना स्वराज्यात आणले. त्यात फक्त खोपडे, चोरगे, शिळमकर आणि बांदल हे चौघे खट निघाले. उर्वरित देशमुखांना बाजींनी महाराजांची सत्ता मानायला लावली. पण बाजी इतकेच करून थांबले नाहीत. त्यांनी वडिलकीच्या नात्याने मावळातील तरुणांना साद घातली. आजूबाजूच्या गावातून तरुण बाजींकडे आले. बाजींनी त्यांना शस्त्रे चालवायला शिकवले. हे मावळे काटक होते. सह्याद्रीच्या कडेकपारी त्यांच्या परिचयाच्या होत्या.

एका रात्री बाजी, तानाजी, सूर्याजी यांसह काही मावळे रोहिडेश्वराच्या गडावर गेले. जाताना जळणासाठी लाकडाचे भारे घेऊन गेले. भाऱ्यात तलवारी होत्या. परंतु पहारेकऱ्यांना संशय आला नाही. असे भारे गडावर नेहमीच जात. परंतु त्यादिवशी गडावर जास्तच भारे जाताना पाहून गडाच्या रखवालदारास संशय आला. मग काय, बाजींनी आणि मावळ्यांनी एकदम एलगार केला

आणि अर्ध्या तासात गड स्वराज्यात सामील झाला.

बाजींनी असाच अलगद घेतलेला दुसरा गड म्हणजे प्रचंडगड. बाजींचा खडनाक महार हा हेर बहुरूपी होता. बाजींनी त्याला कामगिरी सांगितली. खडनाक चाकू सुऱ्या, विळे, कोयते यांना धार लावणाऱ्याचे सोंग घेऊन गडावर गेला. गडावर चाळीस घरे होती. त्यांना धारवाल्याची गरज होती. खडनाक किल्ल्यात धार लावत फिरफिर फिरला. त्याने माहिती काढली. खडनाक त्या रात्री गडावरच राहिला. त्याचे काम पूर्ण झाले नव्हते. रात्री पहारेकऱ्यांशी गप्पा मारून त्याने बरीच माहिती मिळवली. प्रत्येक शनिवारी किल्लेदाराच्या संमतीने गडावर दारू पिण्याचा कार्यक्रम होतो. तेव्हा गडावर मोहाची दारू आणि बोकड, कोंबड्या गडाखालून आणल्या जातात. खडनाकला हे समजताच तो खूश झाला. त्याने त्या शनिवारी रात्री ते सर्व सामान घेऊन सोबत चार-पाच मावळे घेऊन गड गाठला. हा नेहमीचाच प्रकार असल्याने पहारेकऱ्यांस संशय आला नाही. क्षणात खडनाकने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी पहारेकऱ्यांच्या मुसक्या आवळल्या आणि किल्ल्याचा दरवाजा सताड उघडला आणि बाजींच्या बाहेर लपून बसलेल्या मावळ्यांनी तात्काळ किल्ल्यात प्रवेश करून प्रचंडगड अलगद घेऊन महाराजांच्या पायी अर्पण केला. प्रचंडगडाचे नाव बदलून महाराजांनी 'तोरणा' असे ठेवले आणि स्वराज्याचे तोरण बांधले.

पुढे २५ जुलै १६४८ रोजी अफझलखानाने बाजी घोरपडे आणि मुस्तफाखान यांच्या मदतीने शहाजीराजांना कैद केले. शहाजीराजे कैद होताच आदिलशहाने शिवाजीवर फत्तेखान, मुसेखाना, हैबतराव घाटगे आणि बजाजी निंबाळकर या चौघांना पाठविले. त्याचप्रमाणे फर्रादखानास बंगळूरास संभाजीराजांवर पाठविले.

फत्तेखान महाराजांवर चालून येण्यास निघाला. ही स्वराज्याची पहिली लढाई होती. ही लढाई पुरंदरवरून लढायची महाराजांनी ठरविले. त्यांनी निळकंठराव महादजी सरनाईक या पुरंदरच्या आदिलशाही किल्लेदारास गळ घातली. त्यांनीही मानली.

महाराजांनी फत्तेखानाच्या बेलसरच्या छावणीवर अचानक हल्ला केला. फत्तेखानाची बेसावध फौज गडबडली. परंतु रात्रीच्या अंधारात निशाणाची तुकडी फत्तेखानाच्या फौजेत घुसली. या गडबडीत मराठ्यांचे निशाण खाली पडणार होते. इतक्यात एक तरुण भरधाव येऊन निशाण वरचेवर झेलून घेतले. हा वीर बाजींचा नातू बाजी जेधे होता.

मुसेखान आणि त्यांचे सहकारी पराक्रमाची शर्थ करीत होते. इतक्यात

मुसेखानाला गोदाजी जगतापाने फेकलेला भाला वर्मी बसून तो पडला आणि फत्तेखानाच्या फौजेची पळापळ झाली. खासा फत्तेखानही पळू लागला. बाजी पासलकरांनी वयाच्या पासष्टाव्या वर्षी तरुणाला लाजवेल अशी तलवार चालवीत फत्तेखानाचा पाठलाग सुरू केला. फत्तेखान पुढे आणि बाजी मागे असा पाठलाग सासवडपर्यंत केला. सासवडला फत्तेखान माघारी फिरला आणि त्याने बाजींवर हल्ला केला. फत्तेखानाने बाजींना बाजींच्या मराठी फौजेपासून दूर नेले आणि अचानक हल्ला केला. त्याही परिस्थितीत बाजींच्या पंचवीस वीरांनी फत्तेखानाची अर्धी फौज गारद केली. परंतु घात झाला. स्वराज्याच्या पहिल्या युद्धात बाजी पासलकर हा ६५ वर्षांचा तरणाबांड योद्धा धारातीर्थी पडला.

बाजी फत्तेखानाच्या मार्गावर अवघ्या पंचवीस स्वारांसह गेले हे कावजी मल्हारला समजताच त्याने आपली फौज गोळा करून तोही बाजीच्या मदतीला सासवडकडे दौडत निघाला. इतक्यात बाजींची यशवंती घोडी धन्याचे शव पाठीवर घेऊन अश्रू ढाळत, मंद पावलांनी माघारी येताना कावजीला दिसली.

## धारकरी मुरारबाजी देशपांडे

मुरारबाजी देशपांडे म्हणजे महाराजांचा धारदार विश्वास, मुरारबाजी धारकरी होते. धारकरी म्हणजे तलवार, भाला, दांडपट्टा आणि कट्यार चालविता येणारा वीर. मुरारबाजींचे वडील बाजी मुरार हे जावळीच्या चंद्रराव मोरे यांचे लष्करी अधिकारी होते. त्यांना एकूण पाच पुत्र होते. थोरले पुत्र मुरारबाजी हे जावळीच्या चंद्ररावाकडे सैन्यात अधिकारी होते. जावळीचा प्रदेश हा निबिड अरण्याचा, त्यामुळे सहसा अजिंक्य. जावळीचे मोरे स्वत:ला चंद्रगुप्त मौर्यांचे वंशज समजत. चंद्रराव हा त्यांना किताब होता. दौलतराव मोरेंचा दत्तक पुत्र यशवंतराव हा जावळीवर चंद्रराव होता. हा चंद्रराव महाराजांच्या खोड्या काढू लागला होता. उर्मट उत्तरे देत होता, म्हणून महाराजांनी जावळीवर छापा मारला. जावळी बेसावध होती. जावळीत घनघोर प्रतिकार झाला. त्यावेळी चंद्ररावाकडून एक वीर दोन्ही हातात दोन तलवारी घेऊन लढत होता. महाराजांनी त्याला कौल दिला. त्याचे नाव विचारले. तो होता मुरारबाजी देशपांडे. महाराजांनी बाजीला आपल्याकडे घेतले. महाराजांना जावळी मिळाल्याच्या आनंदापेक्षा मुरारबाजी मिळाल्याचा आनंद मोठा होता.

महाराजांना पुरंदर किल्ल्याचे प्राणपणाने रक्षण करील असा किल्लेदार हवा होता. महाराजांनी स्वराज्याची पहिली लढाई पुरंदरवरून केली होती.

याच पुरंदरवर १४ मे १६५७ रोजी संभाजी राजांचा जन्म झाला होता. महाराजांच्या पुरंदरशी भावना गुंतल्या होत्या. आता मुरारबाजीच्या रूपाने महाराजांना हवा तसा किल्लेदार पुरंदरसाठी मिळाला होता. महाराजांनी बाजींना पुरंदरची किल्लेदारी दिली. बाजींनी महाराजांना प्राणपणाने पुरंदर रक्षिण्याचा शब्द दिला.

शिवरायांच्या वाढत्या कारवायांमुळे औरंगजेब पुरता त्रासला होता. महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांनी जे सरदार पाठविले होते ते अपयशी ठरले. आता त्यांनी मिर्झाराजे जयसिंह या निष्ठावान, शूर, मुत्सद्याला दक्षिणेत पाठविले. मिर्झाराजे कर्तबगार, इमानी, रणधुरंदर होते. फक्त ते हिंदू होते. औरंगजेबाचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास नव्हता. त्यामुळे औरंगजेबाने त्यांच्यासोबत दिलेरखान या कट्टर मुसलमान सरदारालाही पाठविले होते. मिर्झाराजे आणि दिलेरखान यांच्यात मतभेद होते. दिलेरचे म्हणणे होते की शिवाजीचे बळ त्याच्या गडकोटात आहे. आपण त्याचे गड घेतले तर तो तहास तयार होईल. परंतु मिर्झाराजे अनुभवी होते. त्यांना वाटे शिवाजीचे गड घेणे इतके सोपे नाही. त्यासाठी शेकडो वर्षे लागतील. त्यापेक्षा त्याच्या रयतेला त्रास दिला तर तो तहास तयार होईल आणि मिर्झाराजांचे खरे होते. परंतु दिलेरखानाने हट्टाने पुरंदरवर हल्ला केला. वेढा घातला. पुरंदरवर मुरारबाजी प्रतिकारास तयार होते. त्यांच्या टोळ्या रात्रीच्या अंधारात गडखाली उतरून वेढ्यात कापाकापी करीत आणि दिलेरची फौज लढायला तयार होईपर्यंत गडावर निघून जात. दिलेरच्या फौजेने गड चढून हल्ला करण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु हे चढणारे सैन्य माऱ्याच्या टप्प्यात येताच गडावरून तोफांचा मारा सुरू होई. प्रसंगी गडावरून मोठमोठे दगड गडावरून सोडले जात. त्याखाली अनेक चढणारे स्वार मरत होते. दिलेरचे शेकडो सैनिक रोज मरत होते. मुरारबाजी वरून दिलेरचे हाल पाहात होते.

पुरंदर किल्ला जिंकणे तसे अशक्य होते. याचे कारण त्याची जबरदस्त उंची आणि त्याचा रक्षणकर्ता वज्रगड. पण हा रक्षणकर्ता वज्रगड जर शत्रूच्या हाती लागला तर पुरंदरचे अजिंक्यपण संकटात येत असे. पुरंदरचा प्राणच जणू वज्रगडात होता. वज्रगड आकाराने लहान असल्याने त्यावर जास्त शिबंदी ठेवता येत नव्हती.

दिलेरखानाने संपूर्ण लक्ष वज्रगडाकडे केंद्रित केले होते. दिलेरकडे 'अबदुल्लाखान', 'हवेली' आणि 'फत्तेल' अशा तीन अजस्त्र तोफा होत्या. त्या दमदमे उभारून त्यावर चढविण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी वज्रगडावरून

हे दमदमे पाडून टाकले. शेवटी या तोफा माणसांनी ओढून वज्रगडाच्या तटापर्यंत नेण्यात आल्या. त्याला आठ दिवस लागले. पण या तीन तोफांपुढे वज्रगडाचे काही चालले नाही आणि वज्रगड पडला.

महाराजांना पुढचे भविष्य दिसू लागले. पुरंदरवर अतोनात हानी होत होती तर मिर्झाराजांच्या फौजेकडून प्रजेचे हाल होत होते. महाराजांनी मिर्झाराजांना विनंती केली की 'मी तुम्हाला पुरंदर देतो पण ही लढाई थांबवा.' पुरंदरवर मराठे प्राणपणाने लढत होते. वज्रगडावरून तोफांचा मारा होताच पुरंदरची माची मोगलांच्या ताब्यात गेली. आता माचीवरून  चारशे फूट उंचीवरच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करणे दिलेरखानाला शक्य होणार होते. दिलेरखानाने गडाखालून पाच हजार फौज आणून सुलतानढवा करण्याचा बेत आखला. या नव्या दम्याच्या पाच हजार फौजेपुढे बाले किल्ल्यातील १००० शिबंदी कशी टिकणार.

मुरारबाजीला दिलेरचा हा बेत कळला. त्यांना महाराजांना दिलेला आपला शब्द आठवला. आपण पुरंदर प्राणपणाने लढवून रक्षण करू, हा तो शब्द होता. दिलेरखान सुलताननढवा करण्याच्या तयारीत होता. इतक्यात बाले किल्ल्याचा दरवाजा उघडला. सातशे मराठे वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्या तसे बाहेर पडून माचीवर आले आणि सातशे वाघ मोगली फौजेवर तुटून पडले. मोगली फौजेला काय चालले आहे हे कळण्याआधी त्यांचे मुंडके उडत होते. सातशे मराठ्यांनी अडीच हजार मोगल कापून काढले. मुरारबाजी समोर येईल त्याला कापत दिलेरखानाच्या रोखाने येत होता. मुरारबाजींचा हा रुद्रावतार पाहून दिलेरखान चक्रावला. तो म्हणाला 'ये क्या सैतान है, अरे ठहरो हमे तुमसे बात करनी है.' दिलेरचे हे शब्द ऐकून मुरारबाजी क्षणभर थांबला. बाजी थांबलेला पाहून दिलेरखान म्हणाला, 'बाजी आप वीर है. हमे आपकी सक्त जरूर है. आप हमारे पास आवो. हम तुम्हे सरदार बनाएंगे.'

पचकन थुंकून बाजी ओरडले, 'अरे मुर्दाडा, मी महाराजांचा शिपाई आहे. तुला काय मी पोटभरू शिपाई वाटलो? तुझ्या सरदारीवर मी थुंकतो. तू सरदारीच काय, दिल्लीचे तख्त दिलेस तरी मी महाराजांना सोडून येणार नाही.' इतके बोलून मुरारबाजी तलवार चालवू लागले. त्यांचा रोख दिलेरखानावर होता. या वेड्याच्या नादी लागलो तर प्राणास मुकावे लागेल असे वाटून दिलेरखानाने मुरारबाजींवर शरसंधान केले. दिलेरखानाचा नेम अचूक होता. बाजींच्या कंठात बाण रुतला. मुरारबाजीने तो बाण खेचून काढला आणि मुरारबाजी खाली पडले तरी हातातील तलवार गरगरा फिरत होती आणि तलवारीचा हात

कोसळला. मुरारबाजी धारातीर्थी पडले.

## बाजीप्रभू देशपांडे

हिरडोशी नदीच्या भोवतीचा प्रदेश म्हणजे हिरडस मावळ. मावळ म्हणजे खोरे. या खोऱ्यात बांदल देशमुखांचे राज्य होते. हो राज्यच, हे देशमुख जरी केवळ वतनदार असले तरी ते स्वत:ला राजे समजत. अनिर्बंध सत्ता उपभोगत असत. या बांदलांच्या पदरी एक शूर घराणे होते. त्यांचे मूळचे नाव प्रधान. परंतु ते सिंध या गावी राहिल्यामुळे पुढे त्यांचे नाव सिंधकर पडले. या सिंधकरांना पुढे जेव्हा देशपांडे वतन प्राप्त झाले तेव्हांपासून सिंधकरांचे देशपांडे झाले. या शूर घराण्यात बाजींचा जन्म झाला. बाजींच्या वडिलांचे कृष्णाजींचे शौर्य आणि सचोटी हे गुण पाहून बांदलांनी त्यांना प्रधान केले. पुढे कृष्णाजींच्या निधनानंतर त्यांचे पुत्र बाजी आणि फुलाजी हे बांदलांची सेवा करू लागले.

कृष्णाजी बांदल रोहिड्यावर मनमानी करीत होता. बाजींनी त्याला खूप समजवण्याचा प्रयत्न केला. हा कृष्णाजी बांदल महाराजांच्या विरुद्ध होता. दादोजी कोंडदेवांनी रोहिड्यावर अचानक छापा टाकून कृष्णाजीस जेर केले आणि त्याचा चौरंग केला. चौरंग केला म्हणजे हातपाय तोडले. कृष्णाजीची पत्नी दीपाबाई महाराजांना भेटली. महाराजांना तिची दया आली. त्यांनी बांदलांचे वतन तिच्या पुत्राकडेच ठेवले. अशा रितीने बांदल स्वराज्यात आले. त्याचबरोबर बाजी, फुलाजीही स्वराज्यात आले.

महाराजांचा बाजींवर जीव जडला. त्यांनी बाजींकडून रोहिड्याची डागडुजी करून घेतली. त्याचप्रमाणे जासलोसगडही ओस पडला होता. तोही बाजींना सांगून भांडता करून घेतला. दोन्ही गडांकडे बांदलांचे दुर्लक्ष झाले होते. महाराजांनी दोन्ही गड नजरेखालून घातले आणि बाजींच्या कामाबद्दल त्यांना नावाजले.

पुढे १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडावर महाराज आणि अफझलखान यांची ती सुप्रसिद्ध भेट झाली. महाराजांनी अफझलखानाचा वध केला. खानाचे मुंडके मांसाहेबांच्या दर्शनासाठी राजगडावर पाठविण्यात आले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. स्वराज्यावरचे संकट दूर झाले होते. महाराज आता विजयोत्सव साजरा करतील असे वाटले होते. परंतु महाराजांच्या पुढच्या हालचाली आधीच ठरलेल्या होत्या. अफझलखानाच्या वधाच्या दुसऱ्याच दिवशी महाराजांनी फौजेचे तीन भाग केले. एक भाग घेऊन दादोजींना

दाभोळकर पाठवले. दुसरा भाग नेतोजीस देऊन विजापूरच्या आसपास दहशत निर्माण करण्यासाठी पाठविले आणि तिसरा भाग घेऊन महाराजांनी वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा मुलूख स्वराज्यात आणला. १४ व्या दिवशी २५ नोव्हें.ला महाराजांनी कोल्हापूर घेतले, तर २८ नोव्हेंबरला पन्हाळा स्वराज्यात आला.

पन्हाळा-कोल्हापूर हा मुलूख रुस्तुमेजमाच्या जहागिरीपैकी होता. त्यामुळे तो महाराजांवर चिडला. अफझलखानाचा मुलगा फाझलखान आधीच चिडलेला होता. दोघांनी महाराजांवर हल्ला केला. परंतु बांदलांच्या फौजेने म्हणजे बाजीने त्या दोघांचा पराभव करून त्यांना विजापूरला पिटाळून लावले.

आदिलशाहीची सर्वेसर्वा बडी बेगम चिंतीत झाली. आता शिवाजीवर कोणाला पाठवावे हा तिच्यापुढे प्रश्न होता. तिला कर्नूलचा वाघ सिद्दी जोहरची आठवण झाली. तिने ताबडतोब २०००० फौज प्रचंड दारुगोळा आणि खजिना देऊन जोहरला शिवाजीवर पाठविले. सोबत अनेक सरदार दिले एकूण फौज चाळीस हजार झाली होती.

महाराज तेव्हा मिरजेच्या किल्ल्याला वेढा घालून बसले होते. बहिर्जीने सिद्दी जोहरची बातमी देताच महाराज मिरजेचा वेढा उठवून पन्हाळ्यावर गेले. महाराजांना वाटले सिद्दी पन्हाळ्यावर हल्ला करेल. त्याचा हल्ला सहज परतविता येईल. परंतु महाराजांचा अंदाज चुकला. सिद्दीने आपल्या चाळीस हजार फौजेचा पन्हाळ्याला वेढा घातला. मुंगीलाही वेढ्याबाहेर जाता येऊ नये असा कडक वेढा होता. महाराजांना सोडविण्याचे बाहेरून नेतोजींकडूनही प्रयत्न झाले. परंतु ते विफळ ठरले. बाहेर मोगल सरदार शाहिस्तेखान आला होता. त्याने चाकणच्या संग्रामगडाला वेढा घातला होता. शाहिस्तेखानाची लाखभर फौज पुण्यात तळ ठोकून होती. प्रजेचे हाल होत होते. महाराज बेचैन होते आणि एके रात्री बहिर्जी नाईक गडावर आला. त्याने महाराजांना सांगितले की वेढा एकदम कडक आहे. फक्त एक दोन ठिकाणी मेटी पातळ आहेत. दोन मेटीत दीडशे पावलांचे अंतर आहे. बहिर्जीच्या या बातमीवर बाजी देशपांडे म्हणाले, 'महाराज सिद्दीला गाफील करून आपण या भेटीतून सुटून जावू. पुढे पाठलाग झाल्यास आपणास विशाळगडावर सुखरूप पोहोचविण्याची जबाबदारी आमची बांदलांची.'

राजांनाही ही कल्पना आवडली. दुसरा मार्गच नव्हता. महाराजांनी आपला वकील सिद्दीकडे पाठविला. महाराज शरण येतात म्हटल्यावर सिद्दी खूश झाला आणि वेढा बेसावध राहिला. आषाढी पौर्णिमेच्या रात्री दोन पालख्या गडाखाली उतरल्या. प्रचंड पावसात दोन्ही पालख्या वेढा पार करून वाटेला

लागल्या. एका पालखीत महाराज स्वत: होते तर दुसऱ्या पालखीत शिवा न्हावी होता. शिवा हुबेहूब महाराजांसारखा दिसत होता.

सिद्दीच्या फौजेने पाठलाग सुरू केला. महाराजांची पालखी खेळण्याकडे जात होती, तर शिवाची पालखी विरुद्ध दिशेने. जोहरच्या फौजेला हळूहळू चाललेली पालखी सापडली. तिला घेऊन छावणीवर आणण्यात आले. परंतु काही वेळातच कळले की हा शिवाजी खोटा आहे आणि खरा शिवाजी पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. झाले. जोहरने पुन्हा पाठलागावर फौज पाठविली.

पन्हाळा ते विशाळगड हे ४२ मैलाचे अंतर. त्यात दहा मैल मसाई पठार. बाकी सर्व रस्ता खडकाळ दाट झाडीचा. महाराजांची पालखी दौडत होती. खेळण्याच्या आधी दहा मैलावर गजापूरची खिंड आहे. महाराजांची पालखी खिंडीजवळ आली आणि बाजींना कळले की सिद्दीची माणसे येत आहेत. बाजींनी त्वरीत बरोबरच्या सहाशेपैकी तीनशे मावळे घेऊन खिंड लढवायचे ठरविले. उरलेले ३०० मावळे महाराजांबरोबर दिले. महाराज बाजींना सोडून जाण्यास तयार नव्हते. बाजींनी महाराजांना समजावले आणि पुढील प्रवासाला पाठविले.

इतक्यात सिद्दीची तुकडी गजापूरच्या खिंडीत आली. बाजींच्या बांदलांनी तिचा धुव्वा उडविला. बाजी दोन हातात दोन तलवारी घेऊन लढत होते. त्यांची वानरसेनाही खवळली होती. गजापूरच्या खिंडीत नुसते रणकंदन चालले होते. सिद्दीची फौज खिंड चढत होती आणि कापली जात होती. बाजींचे मावळेही कमी होत आहे. बाजींच्या आणि फुलाजींच्या अंगावर आगणित जखमा होत्या. बाजी एकाही शत्रूला खिंड पार करू देत नव्हते. एवढ्यात घात झाला. बाजींच्या धिप्पाड देहावर आणखी एक जबरदस्त घाव पडला. आणि बाजी पडले. इतक्यात महाराज खेळण्यावर पोहोचल्याची तोफ वाजली. बाजी म्हणाले, 'महाराज गडावर पोहोचले. आता मी सुखाने मरतो.'

बाजींची विशाळगडावरची समाधी आजही याची साक्ष देईल.

## बाजी कान्होजी जेधे

२५ जुलै १६४८ रोजी शहाजीराजे आपल्या महाली विश्रांती घेत असताना आदिलशहाने त्यांना कैद करविले. आदिलशहा पक्के जाणून होता की आपण शिवाजी महाराजांविरुद्ध काहीही कृती केल्यास शहाजीराजे दक्षिणेत बंड करून उठतील आणि त्यांना आवरणे कठीण होईल. म्हणून त्याने शिवाजीवर फौज

पाठवण्यापूर्वी शहाजीराजांना कपटाने कैद केले. त्यानंतर आदिलशहाने फत्तेखानास शिवाजी राजांवर आणि फर्रादखानाला बंगळूरात संभाजी राजांवर पाठविले. एकाच वेळी दोन्ही शहाजी पुत्रांना संपविण्याचा आदिलशहाचा बेत होता.

महाराजांनी फत्तेहखानाला जबरदस्त तडाखा देण्याचे ठरविले. ही स्वराज्याची पहिली लढाई होती. विजय व्हायलाच हवा होता. महाराजांजवळ फौज हजारच्या आसपास होती. त्यांना लढण्याचा अनुभव नव्हता. तर फत्तेहखानाकडे चार हजार फौज होती. त्याचा तळ बेलसरला होता. खानाला विजयाची खात्री होती.

इतक्यात खानाच्या छावणीवर चहू बाजूंनी मराठ्यांचा हल्ला झाला. खानाची बेसावध फौज गांगरून गेली. मावळे अननुभवी असून हिरीरीने लढत होते. इतक्यात खानाच्या फौजेने मराठ्यांचा झेंडा पळवून नेण्यासाठी निशाणदाराला सर्व बाजूंनी घेरले. लढाईत जरी पटका शत्रूच्या हाती लागणे कमीपणाचे मानले जात होते. मराठ्यांचा निशाण वाचविण्याचा जीवघेणा प्रयत्न चालू होता.

इतक्यात एक मावळा आषाढात वीज कडाडून पडावी तसा निशाणाच्या दिशेने दौडत आला. त्याच्या तुकडीने निशाणाला घेरलेल्या खानाच्या फौजेची जबरदस्त कत्तल सुरु केली. खानाच्या फौजेला माघार घेण्याशिवाय पर्याय नव्हता. मराठ्यांचा जरीपटका शाबूत राहिला.

ऐन वेळी वीजेसारखा धावून येणारा हा वीर होता बाजी जेधे. कान्होजी जेध्यांचा शूर पुत्र आणि बाजी पासलकरांच्या मुलीचा, सावित्रीचा सुपुत्र म्हणजे बाजी पासलकरांचा नातू.

## नरवीर तानाजी मालुसरे

आदिलशहाने अफझलखानास गुप्त हुकूम सोडला की त्याने कर्नाटकात जिंजी येथे शहाजांस कैद करून विजापुरास पाठवावे. अफझलखानाने मुस्तफाखान व बाजी घोरपडे यांच्या सहाय्याने शहाजी बेसावध असता त्यास कैद करून ठेवले. ती तारीख होती २५ जुलै १६४८.

आदिलशहाने शिवाजीवर पाठविलेल्या फत्तेखानाचा पुरंदरवर पराभव केला, तसाच संभाजी राजांनी बंगळूरला फर्रादखानाचा पराभव केला होता. दोन्ही ठिकाणी आलेले अपयश आदिलशहाला चांगलेच झोंबले. त्याने कैदेत असलेल्या शहाजीला जीवे मारण्याचा घाट घातला. शिवाजी महाराजांना ही

वार्ता समजताच त्यांनी एक हुकूमी डाव टाकला. त्यांनी मोगलांशी पत्रव्यवहार करून मी आणि माझे वडील शहाजीराजे आपली चाकरी करू इच्छित आहेत असे कळविले. या पत्राबद्दल कळताच आदिलशहा घाबरला व त्याने शहाजीराजांस सोडून दिले. परंतु शहाजीस सोडण्याबद्दल संभाजीने कंदर्पिचा किल्ला आणि बंगळूर शहर तर शिवाजीने कोंढाणा किल्ला आदिलशहास द्यावा अशी अट घातली. महाराजांना वडिलांच्या सुटकेसाठी कोंढाणा गमवावा लागला.

पुढे अनेक राजकारणे झाली. प्रतापगडावर अफझलखानाची भेट झाली. पन्हाळ्यावर महाराज सिद्दी जोहरच्या वेढ्यात अडकले. बाजी प्रभूंच्या मदतीने महाराज विशाळगडावर गेले, त्यानंतर महाराजांनी पुण्यात शाहिस्तेखानावर छापा टाकला. महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने मिर्झाराजे जयसिंह आणि दिलेरखान यांना महाराजांवर पाठवले. त्यानंतर १३ जून १६६५ रोजी पुरंदरचा तह झाला. या तहात महाराजांना मोगलांना २३ किल्ले आणि १२ लक्ष होनांचा प्रदेश द्यावा लागला व त्या बदल्यात संभाजीराजास पंचहजारी मनसब मिळाली. महाराज आणि संभाजीराजे आग्र्यास गेले. तेथे तारीख १२ मे १६६६ रोजी दरबारात महाराजांचा अपमान झाला. त्यानंतर महाराजांना आग्र्यात कैद झाली आणि १७ ऑगस्ट १६६६ रोजी महाराज औरंगजेबाच्या कैदेतून सुटले. असे अनेक नाट्यमय प्रसंग घडून आले.

त्यानंतर धर्मांध औरंगजेबाचे डोळे फिरले. त्याच्या डोक्यात धर्मवेडाने थैमान घालायला सुरुवात झाली. हिंदू धर्म समूळ नष्ट केल्याशिवाय इस्लामला चांगले दिवस येणार नाहीत असा त्याचा भ्रम होता. त्याने हिंदूंचे हाल करायला सुरुवात केली. हिंदूंवर जिझिया कर लावला. तो हिंदुंची देवळे पाडू लागला. हिंदूंवर अनेक धार्मिक निर्बंध आले. पाठशाळा, धर्मशाळा यांच्यावर बंदी आली. औरंगजेबाचे हे धर्मवेड इतके टोकाला गेले की त्याने दक्षिणेत मुअज्जमला निरोप पाठवला की आग्राभेटीच्या वेळी शिवाजीला वाटखर्चासाठी दिलेले एक लाख रुपये संभाजीराजांच्या जहागिरीतून वसूल करावे. तसेच प्रतापराव गुजर आणि निराजी रावजी यांना पकडून आग्र्याला पाठवावे. अर्थात मुअज्जम संभाजीराजांचा मित्र असल्याने त्याने प्रतापरावांना आधीच कळविले आणि हे दोघेही सुखरूप राजगडावर आले.

राजांना हे सहन होत नव्हते. त्यांनी आपल्या फौजांना तयार राहण्याच्या आज्ञा दिल्या. महाराजांनी औसा, वऱ्हाड, गंगाथडी भागात मोगली फौजेला प्रतिकार करण्यास अवधी मिळू नये इतका जोरदार हल्ला चढवला. राजांनी

पुरंदर घेतला. कल्याण-भिवंडी घेतली. माहुलीचा किल्ला सर केला. कर्नाळा स्वराज्यात आला. पुरंदरच्या तहात गेलेले गड आणि मुलूख मुक्त करण्याचे महाराजांनी ठरविले. महाराजांनी तानाजीला कोंढाणा घेण्याचा विचार बोलून दाखवला. कोंढाणा पुण्यापासून चौदा मैलावर तर राजधानी राजगडापासून अवघा सहा कोसावर कोंढाणा बसला आहे. याचे मूळचे नाव सिंहगड. परंतु जवळच्या कोंढणपूर या गावावरून हे नाव पडले आहे. या किल्ल्याचा मोगल किल्लेदार उदयभान राठोड हा होता. हा अत्यंत कडवा लढवय्या होता.

एक दिवस तानाजी गडावर महाराजांना भेटण्यासाठी आला असता महाराज म्हणाले 'तानाजी कोंढाणा घेणे आहे म्हणून मला तुझीच आठवण आली होती.' खरे तर तानाजी वेगळ्याच कारणासाठी गडावर आला होता. त्याच्या पुत्राचे रायबाचे लग्न ठरले होते. त्याची अक्षता घेऊन तो महाराजांच्या दर्शनास आला होता. पण महाराजांचे शब्द ऐकताच तो म्हणाला, 'महाराज आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे.'

महाराजांना खूप वाटत होते की, आधी रायबाचे लगीन व्हावे मग कोंढ्याच्यावर चढाई करावी. पण तानाजी ऐकायला तयार नव्हता. त्याने गनिमी काव्याने गड घेण्याचे ठरविले. तानाजीने हल्ल्यासाठी माघ वद्य नवमी, ४ फेब्रुवारी १६७० ही तारीख निवडली. त्याने प्रथम गडाचा अभ्यास केला. गडाच्या पश्चिमेस डोणगिरीचा ताशीव कडा होता. तेथे पहारा कडक नव्हता. कारण तेथून फक्त रानवाराच गडावर येऊ शकत होता. दोर लावून गड चढण्याचे ठरले. प्रथम चार मावळे हातात दोर घेऊन वर चढले. त्यांनी दोर खाली सोडले आणि त्याला धरून पाचशे मावळे गडावर चढले. कसे चढले असतील ते, रात्रीच्या अंधारात... फक्त परमेश्वरच जाणे.

गडाला चाहूल लागली. गडावर एकच कापाकापी सुरू झाली. मोगल फौजेला आपण कुठून कसे कापले जातोय हेच कळत नव्हते. इतक्यात गडावरचे १५०० कडवे वीर तयार होऊन युद्धास आले. स्वत: उदयभान तानाजींशी लढत होता. तो मारा मराठ्यांना सहन झाला नाही. उदयभानच्या घावाने तानाजींची ढाल तुटली होती. दुसरा घाव तानाजीला वर्मी लागला. त्याचवेळी तानाजीने केलेल्या घावाने उदयभान जमिनीवर कोसळला. तानाजी पडताच मराठे सैरावैरा पळू लागले. तानाजीचा भाऊ सूर्याजी हे सारे पाहत होता. त्याने झटक्यात डोणगिरी कड्यावर टाकलेले दोर कापून टाकले आणि इकडे तिकडे पळणाऱ्या मराठी सैन्याला तो म्हणाला 'इथे तुमचा बाप मरून पडलाय आणि तुम्ही पळता. जा लढा. गनिमाला भिडा. गड जिंका आणि महाराजांना तोंड दाखवा.'

सूर्याजीच्या या भाषणाने परिस्थिती बदलली. मराठ्यांनी उदयभानचे पाचशे सैनिक मारले आणि कोंढाणा सर केला.

कोंढाणा सर होताच महाराजांना कळविण्यासाठी विजयाची गंजी पेटवण्यात आली. महाराजांना गडावर समजले की तानाजीने कोंढाणा सर केला. ते सिंहगडावर आले.

कोंढाण्यावर समोरच तानाजीचे कलेवर ठेवले होते. ते पाहताच महाराजांनी हंबरडा फोडला 'ताऽऽनाऽऽजी...'

## प्रतीशिवाजी नेतोजी पालकर

'नेताजी' की 'नेतोजी' याबाबत इतिहासकारात दुमत आहे. तसेच हे पालकर म्हणजे पाल या गावचे हे नक्की असले तरी हे पालगाव कोकणातले की साताऱ्याजवळचे, याबद्दलही वाद आहे. तसेच हे पालकर कुटूंब पालहून चौक गावी स्थायिक झाले. परंतु हे चौक कोणते? कुलाबा जिल्ह्यातले की चिपळूणजवळचे? यातही इतिहासकारात एकमत नाही. आपल्याला स्वराज्याच्या सरनोबतांचे गाव ठाऊक नसावे, केवढी ही इतिहासाबद्दलची अनास्था.

महाराजांचे कार्य किर्ती आणि ध्येय याबद्दल ऐकून  नेतोजी महाराजांना येऊन मिळाले. महाराजांनी नेतोजींचे सोने केले. नेतोजींचे गुण पाहून महाराजांनी प्रथम त्यांना पुरंदरगडाचे किल्लेदार नेमले. १६५७ नंतर नेतोजी स्वराज्याचा सरनोबत झाले. त्यानंतर नेताजी सदैव महाराजांसोबत स्वराज्याच्या लढाया करत होता. १० नोव्हेंबर १६५९ ला प्रतापगडावर महाराजांनी अफझलखानाची भेट घेतली, त्या प्रसंगी नेतोजीवर गडाखालची अफझलखानाची फौज गारद करण्याची कामगिरी होती.

या भेटीत खानाचा वध करून आदिलशाहीला झटका दिल्यावर महाराजांनी फौजेचे तीन भाग केले. त्यातील एक भाग देऊन दादोजीला दाभोळवर पााठविले. एक भाग नेतोजीला देऊन त्याला विजापूरच्या आसपास दहशत निर्माण करण्यास सांगितले आणि तिसरा भाग घेऊन स्वत: महाराज कोल्हापूरला गेले. नेतोजीने विजापूरभोवती झंझावातासारखा धुडगूस घातला. नेतोजी म्हणजे वादळ होत. रायबाग आणि बाजूचा प्रदेश घेत नेतोजी विजापूरपासून दहा मैलावर आला. मार्गात नेतोजीने अनेक गावे लुटली, जाळली. आदिलशहाला वाटले आता नेतोजी विजापूरही घेतो. अर्थात

नेतोजीला फक्त दहशत निर्माण करायची आज्ञा होती.

त्यानंतर महाराज पन्हाळ्यावर सिद्दी जोहरच्या वेढ्यात सापडले. त्याही प्रसंगात नेतोजी बाहेरून वेढ्यावर हल्ले करीत होता. वेढ्याला खिंडार पाडून महाराजांची सुटका करण्याचे त्याचे आणि हिलालचे प्रयत्न चालू होते. पण यश येत नव्हते.

शाहिस्तेखान जेव्हा पुण्यात तळ ठोकून होता तेव्हा त्याने शिवरायांचे कोकण घेण्यासाठी करतलबखान आणि रायबाघन यांना उंबर खिंडीतून कोकणात पाठविले होते. तेव्हा नेतोजी तुंगारण्याच्या जंगलात लपून बसला होता आणि खानाचे सैन्य खिंडीत पूर्णपणे चढताच त्यांचे पुढचे आणि परतीचे मार्ग बंद करून सैन्याचा सफाया केला होता. करतलबखान इतका शरण आला की जवळची शस्त्रे आणि खजिना देऊन धर्मवाट लागू लागला.

पुढे महाराजांवर मिर्झाराजे जयसिंह चालून आले. पुरंदरला दिलेरखान भिडला होता. १३ जून १६६५ रोजी पुरंदरचा तह झाला. तहाच्या अटीप्रमाणे महाराजांनी आदिलशाहीविरुद्ध मोगलांना मदत करायची होती. महाराज मिर्झाराजांना मदत करीतही होते. पण यश येत नव्हते. बहुधा मोगलांसाठी लढताना मराठी फौज मनातून नाराज असावी. परिणामी महाराज आणि दिलेरखान यांचे वितुष्ट आले होते. मिर्झाराजांनी महाराजांना स्वतंत्र कामगिरी द्यायची म्हणून पन्हाळा घेण्यास पाठविले. महाराज पन्हाळ्याखाली योग्यवेळी पोहोचले. पण नेतोजी वेळेवर पोहोचला नाही. महाराजांनी पन्हाळ्यावर हल्ला केला. पण पन्हाळा जागृत होता. महाराजांचा पन्हाळ्यावर दारुण पराभव झाला. हकनाक हजार मावळे गमवावे लागले. महाराज नेतोजीवर खूप चिडले आणि महाराजांनी नेतोजीला सरनोबत पदावरून काढून हकलून दिले. नेतोजी स्वराज्य सोडून जो निघाला तो आदिलशाहीला जाऊन मिळाला. वरवर जरी हे असे दिसत असले तरी खरे हे महाराजांचे राजकारण होते. तो एक डाव होता. आदिलशाही मोगलांच्या घशात जाऊन चालणार नव्हते. आदिलशाही टिकली तर स्वराज्य टिकणार होते. म्हणून महाराजांनी नेतोजीला आदिलशाहीत पाठविले होते.

पुढे महाराज आग्र्याला गेले. तेथे औरंगजेबाच्या कैदेत अडकून पडले. त्यानंतर आजारपणाचे सोंग घेऊन महाराज मिठाईच्या पेटाऱ्यातून कैदेतून निसटले. या प्रकरणात महाराजांनी आपली माणसे, हत्ती, घोडे, उंट, जडभारी सामान काहीही मागे औरंगजेबासाठी सोडले नाही. औरंगजेबासाठी उरला होता फक्त मन:स्ताप.

या प्रकाराने औरंगजेब इतका चिडला की त्याने दक्षिणेत मिर्झाराजांना पत्र पाठवून नेतोजीला पकडून आग्र्याला पाठविण्याची आज्ञा केली. नेतोजीचा गुन्हा काय तर तो प्रती-शिवाजी होता. मिर्झाराजांनी नेतोजीला पकडून आग्र्याला पाठविले. आग्र्यात आल्यावर नेतोजीचे हाल करण्यात आले. नेतोजीला ठार मारण्याचे जवळ जवळ नक्की झाले होते. नेतोजीला फिदाईखानाच्या ताब्यात देण्यात आले. या हालअपेष्टातून सुटण्याचा एकच मार्ग नेतोजीकडे होता, तो म्हणजे धर्मांतर. सरनोबत नेतोजीसारखा भक्कम शरीराचा वीर, पण तीन दिवसांच्या हालानंतर चौथ्या दिवशी त्याने मुसलमान धर्म स्वीकारण्याचे मान्य केले.

भराभर जादूची कांडी फिरली. नेतोजी मुसलमान झाला. त्याचे नाव महंमद कुलीखान ठेवण्यात आले. त्याला पंचहजारी सरदारी मिळाली. औरंगजेबाने त्याला काबूलवर पाठविले. हा प्रदेश नेतोजीसाठी नवा होता. त्याने दोनदा पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण दोन्ही प्रयत्न फसले. त्याच्यावर औरंगजेबाची पाळत होती.

१९ जून १६७६ पूर्वी नेतोजी छावणीतून गुपचूप पळून रायगडावर महाराजांकडे आला. महाराजांनी नेतोजीला माफ केले. त्याला खूप पश्चाताप झाला होता. महाराजांनी धार्मिक क्रांती केली. १९ जून १६७६ रोजी महंमद कुलीखानचा पुन्हा नेतोजी पालकर झाला. नेतोजी हिंदू झाले पण सरनोबत झाले नाहीत.

नेतोजीचा जन्म १६२० सालचा. आता तो ५६ वर्षांचा झाला होता. त्यात मोगलांकडे झालेल्या हालअपेष्टांमुळे प्रकृती ढासळली होती. महाराजांच्या हयातीतच नेतोजी चाकरी सोडून आपल्या जहागिरीच्या तामसा गावी गेला. त्याला दोन मुलगे नरसोजी आणि कर्णसिंह व परिवार होता. वृद्धापकाळ कुटुंबासमवेत घालवून १६८१ मध्ये कधीतरी या वीराचे निधन झाले. सरनोबत नेतोजी पालकर प्रती-शिवाजी नावाचे वादळ शमले, ते कायमचे!

## रामजी पांगेरा

औरंगजेबाच्या आज्ञेने दिलेरखान बागलाणात शिरला होता. त्याच्याजवळ चाळीस हजार फौज होती. त्याने नाशिक जवळच्या साल्हेरगडाला वेढा घातला. दिलेरखानाने विचार केला की जवळच रवळागड आहे तो सहज घेऊन टाकू आणि त्याने वीस हजार फौज घेऊन रवळागड गाठला. रवळागडावर फौज

थोडी असल्याने पेशवे मोरोपंतांनी बारा हजार फौज रवळागडाच्या मदतीस पाठविली. मोरोपंतांच्या फौजेपुढे दिलेरचे काही चालले नाही. त्याचा दारुण पराभव झाला. याचा बदला घेण्यासाठी दिलेरखान कणेरगडाकडे वळला. कणेरगडावर रामजी पांगेरा होता, त्याच्याजवळ अवघे एक हजार स्वार होते. दिलेरजवळ १५-२० हजारांची फौज होती. दिलेर येतो आहे ही बातमी रामजीला हेरांकडून समजली.

वास्तविक अशावेळी अन्य कोणी असता तर गडावर बसून राहिला असता. गडावरून दिलेरवर मारा करता आला असता. परंतु रामजी वाघ होता. त्याने आपल्या एक हजार मावळ्यांपुढे पर्याय ठेवला की जे मर्द असतील त्यांनी माझ्याबरोबर मरायला तयार व्हावे. जे येणार नाहीत त्यांच्यासाठी चोळीबांगडी तयार आहे. आणि काय आश्चर्य, सातशे मर्द मरायला तयार झाले. रामजी पांगेरा हा वीर ते सातशे मावळे घेऊन गडाखाली दिलेरखानावर तुटून पडला. घनघोर युद्ध झाले. १५-२० हजार मोगल फौज त्या सातशे मराठ्यांना आणि रामजीला पाहून चळाचळा कापत होती आणि कापली जात होती. रामजी दोन हातात दोन तलवारी घेऊन लढताना पाहून दिलेरला पुरंदरवर लढणाऱ्या मुरारबाजींची आठवण आली.

या युद्धात रामजी पांगेरा धारातीर्थी पडला. महाराज रामजीच्या घरी सांत्वनासाठी गेले, तेव्हा सत्तरीकडे झुकलेला रामजीचा बाप महाराजांना म्हणाला 'महाराज, रामजी गेला त्याचे दु:ख आम्ही करू. पण तुम्ही माझ्या या दुसऱ्या मुलाला स्वराज्याच्या कामासाठी फौजेत घ्या.'

धन्य तो रामजी पांगेरा आणि धन्य त्याचा पिता.

## रघुनाथ बल्हाळ कोरडे आणि त्रिंबक सोनदेव डबीर

रघुनाथपंत कोरडे आणि त्रिंबकपंत डबीर हे महाराजांचे बालपणापासूनचे जीवलग मित्र. त्यातील त्रिंबकपंत म्हणजे दादोजी कोंडदेवांच्या वेळेपासून स्वराज्यात असलेले सोनोपंत डबीर यांचे ज्येष्ठ पुत्र. महाराज सोनोपंतांना मानीत असत. पूर्वी महाबळेश्वरला जिजाऊंची सुवर्णतुला केली गेली तेव्हा महाराजांनी या जीर्ण झालेल्या सोनोपंतांचीही सुवर्णतुला केली होती. त्रिंबकपंतांनीही वडिलांप्रमाणे शेवटपर्यंत स्वराज्याची सेवा केली.

स्वराज्याच्या सुरुवातीच्या काळात महाराजांनी अहमदनगर व जुन्नर लुटले होते. तेव्हा दक्षिणेचा सुभेदार औरंगजेब होता. तो महाराजांवर चिडला होता.

तेव्हा रघुनाथपंत हे महाराजांचे वकील म्हणून औरंगजेबाला भेटायला गेले होते. परंतु रघुनाथपंत इतके बेरकी की त्यांनी औरंगजेबास पटवून दिले की महाराजांना केल्या लुटीबद्दल पश्चाताप होत आहे. महाराज दिलगीर आहेत. परंतु लूट परत करण्याबद्दल पंतांनी चकार शब्द काढला नाही आणि औरंगजेबालाही काढू दिला नाही.

असे हे रघुनाथपंत आणि त्रिंबकपंत दोघेही महाराजांबरोबर आग्र्याला गेले होते. १७ ऑगस्ट १६६६ रोजी मिठाईच्या पेटाऱ्यात बसून महाराज व बाळ शंभूराजे आग्र्याहून निसटले. महाराज इतके चलाख होते की त्यांनी आपल्याबरोबरचे तीनशे मुत्सद्दी, वीर मावळे, हत्ती व जडभारी सामान यातील काहीही मागे औरंगजेबासाठी सोडले नाही. मागे राहिलेले मदारी मेहतर आणि हिरोजी फर्जंदही सुटून आले. परंतु हे दोघे पंत मात्र २० ऑगस्ट रोजी आग्र्यात फिरताना पकडले गेले. औरंगजेब तेव्हा शिवाजीचा चहूकडे शोध घेत होता. शिवाजी कसा पळाला हे त्याला कोडे होते. याचे उत्तर मिळविण्यासाठी औरंगजेबाने या दोन्ही पंतांचे अनन्वित छळ केले. त्यांना चाबकाने फोडून काढले. त्यांच्या जखमेवर मीठपाणी शिंपडले. त्यांना राखेचा तोबरा दिला. शेवटी औरंगजेब पंतांचे छळ करून थकला आणि त्याला कळून चुकले की या दोन म्हाताऱ्यांना खरेच माहीत नसावे की, शिवाजी कसा पळाला ते. पुढे महाराजांनी औरंगजेबाला पत्र लिहून या दोन्ही पंतांना सोडविले.

या आग्र्याच्या व्यवहारात औरंगजेबाला केवळ मन:स्तापच मिळाला.

## सरनोबत प्रतापराव गुजर

महाराष्ट्र ही नररत्नांची खाण आहे. परंतु ती ओळखायला महाराजांसारखा रत्नपारखी लागतो. महाराजांनी अशी अनेक नररत्ने प्रकाशात आणली. कुडतोजी गुजर त्यातील एक. सातारा जिल्ह्यात खटावजवळ बोसरे नावाचे गाव आहे. त्या गावात नावारूपाला आलेले कुडतोजींचे गुजर घराणे. गावातील हनुमान मंदिरात कुडतोजी गावातील तरुणांना जमवून व्यायाम, कसरती आणि शस्त्रे चालविण्याचे शिक्षण देत असे. कुडतोजीने एक तुकडी तयार केली होती. ही तुकडी घेऊन कुडतोजी महाराजांच्या सैन्यात भरती झाला. तेव्हा सरनोबत नेतोजी होते. कुडतोजी एक सामान्य अधिकारी होता.

लाल महालात शाहिस्तेखानावर हल्ला करून महाराज सिंहगडावर परत आले तेव्हा त्यांच्यामागे खानाची काही फौज पाठलाग करीत सिंहगडाजवळ

आली. वरून खानाच्या फौजेवर हल्ला होतच होता. पण खानाच्या फौजेवर मागून हल्ला कुडतोजींनी केला होता. महाराजांचे कुडतोजींच्या पराक्रमाकडे लक्ष होते. त्यापूर्वी करतलबखानाचा उंबर खिंडीत पराभव करतानाही नेतोजींच्या फौजेत कुडतोजी चमकले होते. तसेच १० जाने. १६६४ रोजी महाराजांनी सुरत बेसुरत केली तेव्हा कुडतोजी महाराजांचे पत्र घेऊन इंग्रज वखारीत खंडणीसाठी गेले होते. पण इंग्रज महाबेरकी. त्यांनी कुडतोजीला रोख रक्कम न देता कापड आणि मसाल्याचे पदार्थ देऊ केले, जे नेणे शक्य नव्हते. इंग्रजांची लबाडी ओळखून कुडतोजी वखारीवर हल्ला करण्याच्या विचारात होते.

कुडतोजीला कोणी फितुरी केलेली चालत नसे. बेईमानीला क्षमा नाही असे तो म्हणे. संभाजी कावजी हा शिवरायांचा एक शिलेदार. त्याच्या अंगात हत्तीचे बळ होते. महाराजांच्या अफझलखान भेटीच्या वेळी हा महाराजांबरोबर होता. पुढे त्याची नियत बदलली. तो फितूर झाला. कुडतोजींनी संभाजीला खूप समजावले. पण तो ऐकत नव्हता. शेवटी कुडतोजीने संभाजी कावजीस ठार मारले.

पुढे मिर्झाराजे जयसिंह स्वराज्यावर चालून आले. दिलेरखानाने पुरंदरवर हल्ला केला. मिर्झाराजे प्रजेचे हाल करीत होते. मिर्झाराजांना महाराजांची बिनशर्त शरणागती हवी होती. महाराज चिंतेत होते. कुडतोजींनी मिर्झाराजांनाच संपवायचे ठरविले. स्वतःच्या मर्जीने कुडतोजींनी मिर्झाराजांच्या छावणीत शिरून त्यांच्यावर हल्ला केला. परंतु मिर्झाराजे सावध होते. त्यामुळे कुडतोजी जिवंत पकडले गेले. अर्थात मिर्झाराजांनी ओळखले की हा हल्ला शिवाजीच्या सांगण्यावरून झालेला नाही. त्यांनी उदार वृत्तीने कुडतोजीस घोडा आणि तलवार देऊन छावणीबाहेर सोडून दिले. महाराजांना जेव्हा कुडतोजींचा हा प्रताप समजला तेव्हा त्यांनी कुडतोजींना समज दिली आणि त्यांच्या धाडसाबद्दल त्यांना प्रतापराव हा किताब दिला. ते प्रतापराव गुजर झाले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि युवराज संभाजीराजे जेव्हा आग्र्याला गेले होते तेव्हा इकडे स्वराज्याचे रक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी प्रतापरावांवर होती. स्वराज्याचे गड-कोट सुरक्षित राखण्यासाठी प्रतापरावांनी खूप मेहनत घेतली.

नाशिकजवळचा साल्हेर हा महत्त्वाचा गड मराठ्यांच्या ताब्यात होता. तो घेण्यासाठी दिलेरखान आणि बहादूरखान चालून आले. महाराजांनी प्रतापरावास आज्ञा केली 'तुम्ही लष्कर घेऊन सिताफीने वर घाटे साल्हेरीस जावून खान मारून चालविणे.'

प्रतापराव, आनंदराव, रुपाजी भोसले, मानाजी मोरे, जगताप बंधू यांना बरोबर घेऊन साल्हेरीस पोहोचले. मराठ्यांनी एका बाजूने पायदळ आणि दुसऱ्या बाजूने घोडदळ असा दुतर्फा हल्ला केला. हा हल्ला इतका जोरदार होता की मोगल फौज आणि बरोबर त्यांचे घोडे उंटही मारले गेले. हा प्रतापरावांचा सर्वात मोठा पराक्रम होता. प्रतापरावांनी आपले नाव सार्थ केले. या युद्धात मोगलांचा दारुण पराभव झाला. मराठ्यांना मोगलांचे ६००० घोडे, १२५ हत्ती, ६००० उंट आणि प्रचंड शस्त्रे मिळाली. एखाद्या युद्धात जिंकणाऱ्या पक्षास मिळालेली ही सर्वात मोठी लूट होती. यापेक्षा जास्त लूट मिळाल्याची इतिहासात नोंद नाही. प्रतापरावांनी 'गनिमास मारून गर्दीस मिळवले.'

विजापूर दरबारातील सिद्दी खवासखान वजीर हा मराठ्यांच्या विरुद्ध होता. त्याने बहलोलखानास प्रचंड फौज दारुगोळा देऊन मराठ्यांवर पाठविले. बहलोलखान निजापूरहून निघाला व उमराणी गावाजवळ तळ ठोकून फौजेची जमवाजमव करीत होता. महाराजांना हेरांनी ही बातमी सांगताच त्यांनी प्रतापराव सरनोबत यांना आज्ञा केली की 'खानास मारून फत्ते करणे.'

सरनोबत प्रतापरावांनी बहलोलखानाची ताकद वाढण्याआधीच त्यावर हल्ला करण्याचे ठरविले. प्रतापराव फौजेसह उमराणीजवळ पोहोचले. त्यांनी खानाला पूर्ण गराडा घातला. खानाला डोण नदीतून पाणीपुरवठा होत होता. प्रतापरावांनी डोण नदीवर ताबा मिळवून खानाच्या फौजेचे पाणी तोडले आणि खानावर जबरदस्त हल्ला केला. प्रतापरावांच्या एकाच झटक्याने खान नरमला. बिनशर्त शरण आला आणि धर्मवाट मागू लागला. प्रतापरावांना दया आली आणि त्यांनी धर्मवाट दिली. महाराज तेव्हा पन्हाळ्यावर होते. त्यांना प्रतापरावांनी कोंडलेल्या बहलोलखानास सोडल्याचे वृत्त कळले. खानाला मारावे अशी आज्ञा असता प्रतापरावांनी खानास का सोडले? महाराज अस्वस्थ झाले. महाराजांनी प्रतापरावास त्याचा जाब विचारला की 'सला काय निमित्ये केला?'

महाराजांच्या राज्याभिषेकाची तयारी रायगडावर चालू होती आणि सोडून दिलेला बहलोलखान पुन्हा स्वराज्यावर चालून आला. महाराजांचा राग अनावर झाला. त्यांनी प्रतापरावांना कळवून टाकले की 'बहलोलखान पुन्हा पुन्हा चालून येतो, त्यास तुम्ही सोडता. तरी खानास बुडवून फत्ते करणे. नाही तर आम्हास तोंड न दाखवणे.'

प्रतापरावांना आपली चूक कळली. महाराजांचा राग रास्त होता. आता खानास मारले नाही तर राज्याभिषेकास उपस्थित राहता येणार नाही. महाराजांचे

दर्शन होणार नाही. प्रतापरावांची नजर खानास शोधत होती. तोच बातमी आली खान नेसरीकडे सरकत होता. प्रतापराव सूडाने पेटले होते. ते देहभान विसरले होते. प्रतापरावांनी घोड्यावर उडी घेतली आणि खानाच्या दिशेने दौडू लागले. त्यांच्या मागे त्यांच्या सहा सहकाऱ्यांनी आपले घोडे फेकले. तो दिवस होता २४ फेब्रुवारी १६७४ त्या दिवशी शिवरात्र होती.

मराठ्यांच्या सरनौबत आणि सहा वीरांनी खानाच्या सैन्यावर वीज कोसळावी तसा हल्ला केला. सातही वीरांच्या शरीरावर घाव पडत होते, तरी ते समोरचे पठाण कापत होते. काही काळ हे दृष्य दिसत होते. आणि मग कायमचे शांत झाले. त्या दिवशी शिवावर सात बिल्वदले वाहिली गेली.

## आनंदराव मकाजी

आनंदराव मकाजी हे शहाजीराजांचे दासीपुत्र होते अशी काही बखरीत नोंद आहे. परंतु त्यास ठोस पुरावा मिळत नाही. आनंदराव हे सरनोबत प्रतापराव गुजर यांच्या फौजेत अधिकारी होते. प्रतापरावांनी दया येऊन धर्मवाट दिलेला बहलोलखान महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी पुन्हा स्वराज्यावर उलटला होता. प्रतापरावांनी खानास सोडले तेव्हाच महाराजांना राग आला होता. आता खान पुन्हा चालून येतो हे पाहताच महाराज प्रतापरावांवर चिडले. खानास मारल्याशिवाय तोंड दाखवू नये असे म्हणाले. महाराजांचा राग योग्य होता. प्रतापरावांना आपली चूक कळली. ते सूडाने पेटले आणि बहलोलखान नेसरीजवळ आहे हे कळताच प्रतापराव स्वतः आणि त्यांचे सहा वीर असे सातजण खानाच्या प्रचंड फौजेवर तुटून पडले. सात मराठा वीरांनी २४ फेब्रुवारी १६७४ रोजी हा आत्मयज्ञ केला. महाराजांना प्रतापरावांच्या मृत्यूने अतीव दुःख झाले.

तसेच दुःख प्रतापरावांच्या फौजेतही होते. आनंदरावांना तर बहलोलखानाचा राग आला होता. त्यांनी खानाचा पाठलाग केला. त्याचा दारुण पराभव केला. २३ मार्च रोजी आनंदराव बंकापूरला गेले. तेथे लुटालूट आणि जाळपोळ केली. संपगावची बाजारपेठ लुटली. ही त्या बहलोलखानाची जहागिरी होती. त्याच्यावर आनंदरावांनी सूड उगवला. ही लूट ३००० बैलांवर लादून स्वराज्यात पाठवून आनंदराव लूट करण्यासाठी पुढे बाळाघाटात निघून गेले. बहलोल पुरता रडकुंडीला आला होता. मराठ्यांचे बदला घेणे म्हणजे काय असते हे त्याला कळून चुकले.

राज्याभिषेकापूर्वी बहलोलास संपवून आनंदरावांनी प्रतापरावांच्या मरणाचा बदला घेतला.

## सरसेनापती हंबीरराव मोहिते

मोहिते घराणे निझामशाहीची चाकरी करीत होते. शहाजीराजांचे या मोहिते घराण्याशी संबंध चांगले होते. शहाजीराजे आदिलशाहीत गेल्यावर त्यांनीच संभाजी व धारोजी मोहित्यांना आदिलशाहीचे काम मिळवून दिले. तर धाकटे विठोजी यांना सुपे परगण्यावर अंमलदार केले होते. शहाजी राजांची पत्नी तुकाबाई या मोहिते घराण्यातील होत्या. तळबीडची पाटीलकी धारोजी मोहित्याकडे होती. धारोजी आणि त्यांचे पुत्र हंसाजी दोघेही शूर होते. हंसाजी शिवरायांच्या फौजेत दुय्यम अधिकारी होते.

२४ फेब्रु. १६७४ रोजी नेसरीच्या युद्धात स्वराज्याचे सेनापती प्रतापराव गुजर कामी आल्यामुळे त्या रिक्त जागेवर हंसाजी मोहिते स्वराज्याचे सेनापती झाले. त्यांना हंबीरराव हा किताब देण्यात आला. राज्याभिषेकाच्या ऐन तोंडावर हंबीरराव सेनापती झाले होते. त्यांची पहिली स्वतंत्र मोहीम पेडगावची ठरते. पुण्यापासून ४० मैलावर पेडगाव हे गाव आणि किल्ला आहे. औरंगजेबाचा दुधभाऊ बहादूरखान पेडगावच्या किल्ल्यावर होता. त्याने औरंगजेबासाठी एक कोटीचा खजिना आणि उत्तम जातीवंत घोडे जमा केले होते. महाराजांनी हंबीररावांना नऊ हजार फौज दिली. तिचे दोन भाग करण्यात आले. सात हजार आणि दोन हजार. जुलै १६७४ मध्ये दोन हजार फौजेने पेडगाववर हल्ला करण्याचा प्रयत्न केला इतकी छोटी फौज पाहून खान आपली गडावरची सर्व फौज घेऊन गडाखाली उतरला व त्याने हंबीररावांच्या फौजेचा पाठलाग सुरू केला. या फौजेने खानाला गडापासून दूर नेले आणि इकडे उरलेल्या सात हजाराच्या फौजेने गडावर हल्ला करून गड लुटून आगी लावल्या. छोटी फौज खानाच्या हाती लागली नाहीच, पण खान येऊन पाहतो तो सर्व काही लुटलेले होते.

त्यानंतर महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली. तेव्हा कोप्पळचा हुसेनखान मियाना प्रजेचे हाल करीत होता. नागरिकांनी महाराजांकडे तक्रार करताच महाराजांनी हंबीररावांना हुसेनखानाचा बंदोबस्त करण्याची आज्ञा केली. हंबीररावांची फौज थोडी असून त्यांनी हुसेनखानावर प्रचंड विजय मिळविला. या युद्धात नागोजी जेधे कामी आला.

राज्याभिषेक प्रसंगी महाराणी सोयराबाई महाराणी तर युवराज संभाजीराजे

युवराज झाले. त्यामुळे भावी छत्रपती संभाजीराजे होणार हे नक्की झाले. सोयराबाई यांचे पुत्र राजारामराजे हे तेव्हा चार वर्षांचे होते. पुढे सोयराबाईंच्या मनात सापत्न भाव जागृत होऊन राजारामराजे छत्रपती व्हावे या इच्छेने प्रेरित झाल्या होत्या. रायगडावर सोयराबाई, अनोजी दत्तो, सोमाजी दत्तो, राहुजी सोमनाथ, मोरोपंत आणि हिरोजी फर्जंद यांची संभाजीराजांविरोधात कारस्थाने सुरू झाली. त्यात संभाजीराजे या राजकारणाला कंटाळून दिलेरखानाकडे गेल्यामुळे त्यांचा पक्ष कमकुवत झाला.

महाराजांना घरातील या राजकारणाची झळ बसत होती. महाराणींनी संभाजीचा युवराज पदाचा हक्क डावलणे आणि संभाजीराजांनी अतिरेकीपणाने मोगलांना मिळणे त्यामुळे महाराज मन:स्ताप सहन करीत होते. हा गृहकलह कोणाला सांगताही येत नव्हता. त्याचा महाराजांच्या शरीरावर परिणाम होत असावा. लवकरच ३ एप्रिल १६८० रोजी अल्पशा आजाराने रायगडावर निधन झाले. महाराजांच्या निधन समयी युवराज संभाजीराजे सहकुटुंब पन्हाळ्यावर होते.

संभाजीराजांच्या विरुद्ध गटाने ही संधी साधली. रायगडाचे दरवाजे आणि राबता पूर्ण बंद केला. महाराजांच्या पार्थिवाला साबाजी भोसले-शिंगणापूरकर यांचे हस्ते विधीपूर्वक अग्नी देण्यात आला. महाराजांच्या निधनाची वार्ता रायगडाबाहेर जावू नये याची पूर्ण काळजी महाराणींनी आणि इतर मुत्सद्यांनी घेतली होती. त्यानंतर रायगडावर असा कट शिजला की पन्हाळ्यावर किल्लेदारांनी संभाजीराजांना कैद करावे. त्यानंतर मोरोपंत आणि अनाजीपंत यांची पाच हजार फौज घेऊन कऱ्हाडला जावे. कऱ्हाडला हंबीररावांचा तळ होता. हंबीरराव सोयराबाईंचे बंधू असल्याने ते राजारामराजे यांना राज्यावर येण्यासाठी मदत करतील असे गृहीत धरले होते. हंबीररावांना कटात सामील करून घेऊन तिघांनी पन्हाळ्यावर जाऊन संभाजीराजास कैद करून बंदोबस्ताने ठेवणे म्हणजे रायगडावर राजाराम महाराजांचा राज्याभिषेक सोहळा नि:कंटक होईल.

ठरल्याप्रमाणे अनोजीपंत आणि मोरोपंत यांनी कऱ्हाडला जाऊन हंबीरराव यांची भेट घेतली. त्यांना कटाबाबत माहिती दिली. हंबीररावांचा होकार गृहीत धरण्यात आला होता. कारण राजाराम हा हंबीररावांचा सख्खा भाचा होता तर संभाजीराजे सावत्र भाचे होते. परंतु प्रत्यक्षात झाले उलटेच. हंबीररावांनी कटात सामील होण्यास नकार दिला. संभाजीराजांचा वडीलपुत्र म्हणून राज्यावर

असलेला अधिकार मान्य केला. उलट अनोजीपंत आणि मोरोपंत यांनाच राजद्रोहाच्या गुन्ह्याखाली पन्हाळ्यावर संभाजीराजांसमोर उभे केले. संभाजीराजांनी अनोजी आणि मोरोपंत यांना कैद केले.

संभाजी राजांनी सरसेनापती हंबीरराव मामा आणि आपले सासरे पिलाजीराव शिर्के यांच्या मदतीने रायगडाचा ताबा घेतला. कटवाल्यांना कैदेत टाकले. मातोश्री महाराणी सोयराबाई व राजारामराजे यांना नजरकैदेत ठेवले आणि १६ जाने. १६८१ रोजी संभाजीराजांचा राज्याभिषेक रायगडावर संपन्न झाला.

संभाजी छत्रपती झाले. त्याप्रसंगी भेट द्यावी म्हणून हंबीररावांनी बुऱ्हाणपूरवर हल्ला करून लूट मिळविण्याचे ठरविले. बुऱ्हाणपूर ही मोठी बाजारपेठ होती. किल्लेदार काकरखान हा होता. त्याच्याकडे पाच हजार फौज होती. हंबीररावांनी बुऱ्हाणपूरवर जाताना काही माणसे सुरतेकडे सोडून अफवा पसरविली की संभाजी सुरत लुटणार आहे. थोरल्या महाराजांनी दोनदा सुरत लुटल्यामुळे सुरतेत अशा अफवा नेहमीच उठत असत. बुऱ्हाणपूरला काकरखानाला ही अफवा खरी वाटली. त्याने आपल्या जवळच्या पाच हजार फौजेपैकी चार हजार फौज सुरतेच्या रक्षणासाठी पाठविली. दुसऱ्याच दिवशी खानाला बातमी मिळाली की सुरतेची अफवा असून मराठा सेनापती हंबीरराव स्वतः बुऱ्हाणपूरजवळ आला असून तो जवळच जंगलात लपून बसला आहे. काकरखान मनातून फार घाबरून गेला होता. त्याच्यापाशी फक्त एक हजाराचीच फौज होती. त्याने मग धाडस करून हंबीररावांच्या तळावरच रात्रीचा हल्ला करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे रात्री तो फौजेसह निघाला. पण वाटेत त्याला छत्रपती संभाजीराजांनीच गाठले. महाराजांनी काकरखानाचा धुव्वा उडविला. हंबीररावांना माहीत नव्हते की संभाजी महाराजही या बुऱ्हाणपूर मोहिमेवर आपल्यामागे निघाले आहेत. राज्याभिषेकानंतर अवघ्या चौदाव्या दिवशी छत्रपती संभाजी महाराजांनी हा पराक्रम करून प्रचंड लूट मिळवली होती.

औरंगजेबाला मराठ्यांविरोधात म्हणावे तसे यश येत नव्हते. त्याचे सरदार कुचकामी ठरत होते. मराठ्यांचे जे गड मोगलांनी घेतले ते जिंकून घेतले नव्हते. फितुरी करून पैसे देऊन विकत घेतले होते. तरी कोणी मराठ्यांचे किल्ले घेतो म्हणाला की औरंगजेब खूश होऊन मदत देत असे. एकदा सर्जाखान प्रतापगड जिंकून देतो म्हणाला तर औरंगजेबाने लगेच सैन्य, पैसा आणि दारुगोळा देऊन त्याला पाठवले. सर्जाखान रहिमतपुरापर्यंत आला. तेथे त्याने कृष्णा नदी

ओलांडली. ही बातमी हंबीररावांना समजली. हंबीररावांनी ओळखले की हा सर्जाखान प्रतापगडाकडे जात आहे. प्रतापगडावर भवानी मातेचे स्थान. रक्षण झालेच पाहिजे. सर्जाखानाचा मार्ग ठरल्यात जमा होता. वाई, पसरणीमार्गे प्रतापगड असा तो मार्ग होता. खानाच्या मागे मागे पाठलाग करून काहीच फायदा नव्हता. खानाच्या आधी पसरणीचा घाट चढून खिंड गाठली तर प्रतापगड वाचणार होता. त्यासाठी एकच मार्ग आहे. कोयनेच्या काठाने महाबळेश्वरपर्यंत जायचे आणि महाबळेश्वरहून पाचगणी मागे पसरणीची खिंड गाठणे. पण या दूरच्या मार्गाने जाण्यात वेळ आणि श्रम लागणार आहेत आणि हा प्रवास खान खिंडीत पोहोचण्याआधी झाला पाहिजे.

हंबीररावांनी अखंड बारा तास घोडदौड करून या दूरच्या मार्गाने जाऊन खानाच्या आधी पसरणीची खिंड गाठली. खानाला याची कल्पनाच नव्हती. खानाची दहा हजार फौज घाट चढून खिंड पार करीत होती. पण खिंडीतच त्याचा खातमा होत होता. मागून येणाऱ्या खानाच्या फौजेला पत्ताही नव्हता की आपण मृत्यूला भेटायला चाललो आहोत. ते घाट चढत होते आणि खिंडीत मरत होते. बराच वेळ हा प्रकार चालल्यावर खानास शंका आली. आणि मग खानाच्या फौजेची घाटात पळापळ सुरू झाली. खानाची पाचशे फौज कापली गेली होती. स्वत: हंबीरराव घोड्यावर बसून ही खानाची पळापळ पाहत होते. खुद्द सर्जाखान कोयनेच्या काठाने पळत होता. हंबीररावांच्या श्रमाचे चीज झाले होते.

हंबीररावांच्या भोवती प्रेतांचा आणि जखमी शिपायांचा खच पडला होता. वातावरणात रक्ताचा उग्र दर्प होता. सर्जाखानाच्या फौजेची हत्यारे, छोट्या तोफा इतस्तत: पडल्या होत्या. इतक्यात कोणी जखमी शिपायाने एका तोफेतून गोळा हंबीररावावर फेकला. आणि काय झाले कळायच्या आधी हंबीरराव आणि त्यांचा घोडा दोघेही जागीच गतप्राण झाले. हंबीरराव पडले ही बातमी रायगडावर पोहोचताच हलकल्लोळ माजला. हंबीररावांची कन्या ताराबाई या राजाराम महाराजांच्या पत्नी होत्या. त्यांनी आकांत केला. सायंकाळी हंबीररावांचे पार्थिव तळबीडला नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हंबीरराव नावाचा एक सरसेनापती होता हे सांगणाऱ्या तीन गोष्टी मागे राहिल्या. 'श्री मांछेव महानुभाव सेनाधीश हंबीरराव' हा त्यांचा शिक्का.

प्रतापगडावरील भवानी मंदिरात आजही पुजली जाणारी त्यांची तलवार आणि आठवणी...

## कान्होजी जेधे

भोर तालुक्यातील कारी गाव हे जेधे देशमुखांचे गाव. कारी आणि आंबवडे या देशमुखीच्या गावी नाईकजी जेधे कारभार सांभाळून होते. त्यांना दोन बंधू होते. भिवजी आणि सोनजी हे नाईकजींच्या वतनावर डोळा ठेवून होते. त्याच गावात असलेल्या महाला घराण्याचे आणि नाईकजी जेधे यांचे घरोब्याचे संबंध होते. असे संबंध पिढ्यान् पिढ्या चालू होते. नाईकजींची पत्नी अनुसूया ही मांढरदेवच्या मांढरे कुटुंबातील होती.

एक दिवस नाईकजी जेधे आणि देवजी महाला जंगलातून येत असता नाईकजींचे धाकटे दोन भाऊ भिवजी आणि सोनजी यांनी त्यांना गाठले. झटापट झाली. त्यात नाईकजी आपल्या भावांकडूनच मारले गेले. त्यावेळी त्यांची पत्नी अनुसूया हिला दिवस गेले होते. तिच्यावर हा दुःखाचा डोंगर कोसळला होता. परंतु तिने धीराने बाळाला जन्म दिला. परंतु भिवजी आणि सोनदेव त्या नाईकजींच्या मुलाच्या जिवावरही उठले होते. त्यांना वतनात वाटेकरी नको होता. शेवटी नाईलाजाने अनुसूयेने बाजी पासलकर यांची भेट घेतली. त्यांना झाला प्रकार सांगितला. बाजींनी तिच्या बालकाची पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळेच मुलाचे नाव बाजींनी कान्होजी ठेवले. कान्होजींची बाजी पासलकरांनी चांगली सोय लावली. कान्होजी हुशार आणि शूर होता. बाजींच्या लक्षात कान्होजींचे गुण येत होते. बाजी पासलकरांनी आपली मुलगी सावित्री हिचा विवाह कान्होजीशी लावून त्याला आपला जावई करून घेतला. त्याचप्रमाणे शहाजी राजांची कृपा संपादून कान्होजीस त्याच्या हक्काच्या वतनावर बसविले. कान्होजींनी शहाजीराजांच्या आश्रयाने आदिलशाहीत पराक्रम गाजवायला सुरुवात केली. त्यांची कर्तबगारी आणि निष्ठा शहाजीराजांना भावत होती.

आदिलशाहीत शहाजीराजांचा उत्कर्ष सहन न होणारे सरदार होते. त्यांनी आदिलशहाच्या आज्ञेने जिंजी येथे शहाजीराजांना कैद केले. राजांबरोबर कान्होजी जेधेही पकडले गेले होते. आदिलशाहीशी सरळ दोन हात करून वडिलांची सुटका करणे शिवाजी महाराजांना अशक्य होते. शिवरायांनी युक्तीने औरंगजेबास पत्र लिहून आदिलशहावर दबाव आणला आणि या दोघांची सन्मानाने सुटका झाली. सुटका झाल्यावर शहाजीराजांनी कान्होजीस महाराष्ट्रात शिवबाच्या मदतीसाठी पाठविले. तेव्हापासून कान्होजी महाराष्ट्रात शिवरायांच्या सेवेत होते. कान्होजींसारखा मातब्बर, मुत्सद्दी आणि प्रामाणिक लढवय्या

लाभल्यावर शिवाजी महाराजांचे बळ शतपटीने वाढले.

अफझलखानाने आदिलशाही दरबारात विडा उचलून शिवाजीला पकडण्याची जबाबदारी स्वीकारली. बादशहाने अफझलला सर्व प्रकारची लष्करी मदत आणि अमाप द्रव्य देऊन त्याची महाराष्ट्रावर रवानगी केली. बादशहाने महाराष्ट्रातील वतनदारांना फर्माने पाठवून अफझलखानास लागेल ती मदत करण्याच्या आज्ञा दिल्या. तसेच एक कडक फर्मान कान्होजी जेधे यांसही आले होते.

फर्मान अत्यंत कडक होते. अफझलखानाला मदत न केल्यास सर्वनाश अटळ होता. मावळातील हे सर्वच देशमुख आदिलशाहीचे वतनदार म्हणजे चाकर होते. बादशहाची आज्ञा पाळणे त्यांचे कर्तव्य होते. सर्वच देशमुख विचारात पडले होते. पण कान्होजींनी क्षणाचाही विचार केला नाही. आपल्या पाच पोरांना घेऊन त्यांनी राजगड गाठला. महाराजांना फर्मान दाखविले.

महाराजांनी फर्मान वाचताच त्यांना समजले की या फर्मानापुढे कान्होजींची धडगत दिसत नाही. महाराजांना बादशहाची आज्ञा मोडायला सांगून त्यांच्या कुटुंबाची दुर्दशा करण्यात अर्थ नाही. त्यांनी कान्होजीस सांगितले की 'कान्होजी तुम्ही बादशहाकडे जाऊन आपले वतन वाचवा, जीव वाचवा.'

कान्होजींनी आपल्या पाचही पुत्रांना बाजी, चांदजी, मताजी, नाईकजी आणि शिवजी यांना जवळ बोलावले. महाराजांसमोर ठेवलेल्या तांब्यातील पाणी हातात घेऊन कान्होजींनी आपल्या वतनावर पाणी सोडले. कान्होजी म्हणाले की 'यापुढे माझी आणि माझ्या कुटुंबाची जबाबदारी परमेश्वरावर सोपवून वतनावर पाणी सोडले आहे. जेधे संपले तरी चालेल पण त्यांच्याकडून स्वराज्याशी बेईमानी होणार नाही.'

महाराजांनी जेधे कुटुंबाची जबाबदारी घेतली. त्यांना गडावर व्यस्त ठेवण्यात आले. पुढे १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडावर अफझलखानाची भेट झाली. त्या भेटीत खानाचा वध झाला. पूर्वी खानाला मदत करणारे दगाबाज देशमुख राजांच्या समोर होते. महाराजांनी एकाएकाला शासन करण्याचे ठरवले. त्यात खंडोजी खोपडे हा दगाबाज होता. तो कान्होजींकडे गेला. त्याला ठाऊक होते की कान्होजींचे महाराज ऐकतात. खंडोजीने दीनवाणे होऊन कान्होजीस गळ घातली. कान्होजीस दया आली. कान्होजीने खंडोजी खोपडेबाबत महाराजांकडे शब्द टाकला. महाराजांना पटत नव्हते तरी त्यांना कान्होजींचा शब्द मोडवेना. त्यांनी खंडोजीस जीवदान दिले. पण खंडोजी पुन्हा जातीवर गेला. त्याने

महाराजांकडे कान्होजींविरुद्ध कान फुंकले. भोळ्याभाबड्या कान्होजींना याची कल्पना नव्हती. महाराजांनी खंडोजीचा एक हात आणि एक पाय कलम करण्याची आज्ञा दिली. खंडोजीला त्याच्या केल्या कर्माची सजा मिळाली.

त्यानंतर कान्होजीला खंडोजीला झालेल्या शिक्षेची बातमी लागली. कान्होजी चिडले. महाराजांनी खंडोजीला अभय देऊन शिक्षा केली होती. कान्होजींनी महाराजांना जाब विचारला.

महाराजांनी कान्होजींना घडला प्रकार सांगितला. कान्होजींना समजाविले आणि कान्होजी स्वराज्याच्या सेवेत झिजले.

## सोनोपंत डबीर

१६४२ मध्ये शहाजीराजांनी बाल शिवाजी राजांना पुण्यास जहागिरीवर पाठवले. तेव्हा शिवाजीने स्वतंत्र राजाप्रमाणे व्हावे म्हणून त्यांच्याबरोबर शामराव निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुझुमदार, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्हाळ सबनीस असे निवडक मंत्रीही पाठविले होते. तेव्हापासून सोनोपंत डबीर हे महाराजांच्या सेवेत होते. डबीर म्हणजे परराष्ट्रमंत्री. परराष्ट्रातून येणाऱ्या वकिलांची भेट घेणे तसेच परराष्ट्राशी वकील या नात्याने बोलणी करणे ही कामे सोनोपंत करीत असत. सोनोपंतांनी पूर्ण हयात स्वराज्यासाठी खर्ची घातली होती.

सोनोपंत औरंगजेबाकडे वकील म्हणून गेले होते. तसेच शाहिस्तेखानाकडेही गेले होते. प्रत्येकवेळी सोनोपंत हमखास यशस्वी बोलणी करीत असत. पंतांना फारसी भाषा उत्तम येत होती. त्यांचे फारसी भाषेवर प्रभुत्व होते. त्यांचे ज्येष्ठ पुत्र त्र्यंबकपंत डबीर ही स्वराज्याची उत्तम सेवा करीत होते.

मिर्झाराजे जयसिंह महाराष्ट्रावर चालून येण्यापूर्वी ६ जाने. १६६५ रोजी अमावास्येला सूर्यग्रहण होते. ग्रहण काळात विपूल दान करावे अशी मातोश्री जिजाबाईंची इच्छा होती. त्यासाठी महाराजांनी महाबळेश्वर येथे माँसाहेबांची सुवर्णतुला करून ते दान करण्याचे ठरविले. तुलेसाठी महाबळेश्वरला जाताना महाराजांनी ज्येष्ठ मुत्सद्दी सोनोपंतांनाही बरोबर घेतले होते.

महाराजांनी विधीपूर्वक तुलेसाठी माँसाहेबांना एका पारड्यात बसविले. दुसऱ्या पारड्यात भारंभार सोने टाकण्यात आले. जिजाबाईंच्या सर्व सुनांनी आपल्या अंगावरचे दागिने उतरवून त्या पारड्यात टाकले. अशा रितीने जिजाऊंची सुवर्णतुला झाल्यावर ते सोने गोरगरीब, ब्राह्मणांना वाटले गेले.

त्यानंतर महाराजांनी स्वराज्यासाठी देह झिजवलेल्या सोनोपंतांना तुलेच्या पारड्यात बसविले. त्यानंतर सोनोपंताची सुवर्णतुळा करण्यात आला. त्यावेळी सोनोपंत महाराजांना म्हणाले महाराज माझी सुवर्णतुला कशासाठी करता आहात?

त्यावर महाराज म्हणाले 'सोनोपंत, आम्ही सोन्याची तुला सोन्याने करतो आहोत.'

## कोंडाजी फर्जंद

कोंडाजी फर्जंद हा असा एक वीर स्वराज्यासाठी आत्मबलिदान करणारा, पण इतिहासाला फारसा ज्ञात नसलेला. कोंडाजी कोणत्या गावचा, त्याचा जन्म कधी झाला याबद्दल इतिहास मुका आहे. पन्हाळा हा आदिलशाही सीमेवरचा महत्त्वाचा गड होता. तो आदिलशाहीच्या ताब्यात होता. पूर्वी मिर्झाराजा जयसिंहाशी पुरंदरचा तह १२ जून १६६५ रोजी झाल्यावर महाराजांनी मोगलांना आदिलशाही कुतूबशाही जिंकून घेण्यासाठी मदत करायची ठरले होते. शिवराय आणि दिलेरखान यांचे पटत नसल्याने महाराजांच्या जिवाला हानी होऊ नये म्हणून मिर्झाराजांनी महाराजांना पन्हाळा घेण्याची स्वतंत्र मोहीम सांगितली होती. त्याप्रमाणे महाराजांनी पन्हाळ्यावर स्वारी केली. या स्वारीत नेतोजी पालकर सरनोबत वेळेवर पोहोचले नाहीत आणि त्यामुळे महाराजांना पन्हाळ्यावर अपयश घ्यावे लागले. एक हजार मराठे वीर या लढाईत हकनाक मारले गेले. महाराज नेतोजीवर खूप चिडले आणि त्यांनी नेतोजीला स्वराज्यातून हाकलून दिले. नेतोजी आदिलशाहीत गेला. याचा अर्थ इतकी फौज असून महाराजांना स्वत:ला पन्हाळा घेता आला नव्हता.

महाराजांच्या मनात तो सल होता. पन्हाळा स्वराज्यात आणायचाच असे महाराजांनी ठरविले. त्यांच्या डोळ्यासमोर योग्य व्यक्ती होती कोंडाजी फर्जंद. महाराजांनी कोंडाजीला पन्हाळा मोहिमेबाबत विचारताच तो आनंदाने तयार झाला. कोंडाजीने महाराजांकडे फक्त तीनशे मावळे मागितले. महाराजांनी हातातले सोन्याचे कडे काढून कोंडाजीच्या हातात घातले आणि त्याचा सत्कार केला. कामगिरी फत्ते करण्याआधीच सत्कार का केला असा प्रश्न होता. त्यावर महाराज म्हणाले होते, 'तानाजी, बाजी प्रभू, मुरारबाजी यांचा आता सत्कार करता येत नाही. शिवाय कोंडाजीने मोहीम स्वीकारली म्हणजे यश मिळणारच, म्हणून आधी सत्कार केला.'

बहिर्जी नाईक निरनिराळ्या वेशांतराने गडावर जाऊन पाहणी करून यायचा. त्याने कोंडाजीस माहिती दिली की, गडाच्या कोणत्या बाजूस किती पहारे आहेत. पहारे कधी बदलतात, गडावर किती शिबंदी आहे. दारुगोळा किती आहे याबाबत पूर्ण माहिती काढून कोंडाजी ६ मार्च १६७३ फाल्गुन वैद्य त्रयोदशी या दिवशी मध्यरात्री गडाखाली आला. सोबत आनोजी दत्तो आणि तीनशे मावळे होते. कोंडाजीने निवडक साठ मावळे घेऊन गडावर हल्ला करण्याचा धाडसी बेत आखला होता. उरलेल्या शिपायांनी गडावरच्या पळून जाणाऱ्या शत्रू सैन्यावर हल्ला करावा व गडाबाहेर या पळून जाणाऱ्या शिपायांना कापून काढावे असे ठरले होते.

कोंडाजीची साठ भुते रात्रीची पुसाटीच्या बुरुजाजवळ जेथे पहारा कमी होते तेथे चढून गडात गेली. साठ भुतांनी कर्णे वाजवून प्रचंड आवाज केला. गड जागा झाला. परंतु एकूण किती मराठे आहेत हे समजत नव्हते. आवाजावरून पाचशेच्या आसपास शत्रू असावा असा किल्लेदार बाबू खानाचा कयास होता. किल्ल्यावर एकच कापाकापी झाली. रात्रीच्या अंधारात मराठे किती आहेत आणि कुठून येतात हेच समजत नव्हते. त्या आधीच सैनिक कापले जात होते. बाबूखान गडकऱ्याला स्वत: कोंडाजीने गाठले. थोड्या झटापटीतच बाबूखान पडला. आणि सूर्योदयापूर्वी पन्हाळ्यावर मराठ्यांचे निशाण लागले.

पन्हाळा ताब्यात आला, त्याच्या दुसऱ्या दिवशी चैत्री पाडवा होता. पन्हाळ्यावर गुढी उभारण्यासाठी महाराज स्वत: गेले. त्यांनी विजयी वीरांचे कौतुक केले. त्यांना बक्षिसे वाटली. पन्हाळ्यावर घडलेला हा आश्चर्यकारक प्रसंग इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी लिहावा इतका थोर आहे. पण आपला इतिहास अबोल आहे.

कोंडाजीचा असाच एक पराक्रम, ज्याची इतिहासाच्या पानावर साधी नोंदही नाही. शिवरायांच्या निधनानंतर धर्मवीर संभाजी महाराज छत्रपती झाले. थोरल्या महाराजांची जंजिरा जिंकण्याची अपुरी इच्छा पुरी करण्याचे संभाजीराजांनी ठरविले. त्यासाठी दंडाराजपुरीपासून जंजिऱ्यापर्यंत समुद्रात दगड टाकून पूल बांधण्याचा प्रयत्नही त्यांनी करून पाहिला. परंतु जंजिरा अभेद्य होता. शेवटी महाराजांनी कोंडाजीला हाताशी धरून एक बेत आखला. कूटनीतीचा वापर केल्याशिवाय जंजिरा जिंकता येणार नाही हे संभाजी महाराजांनी पुरते जाणले होते.

शंभूराजांचा हा बेत असा होता की कोंडाजींनी महाराजांवर चिडून सिद्दीरूपी सर्पाच्या वारुळात शिरायचे. मराठ्यांना व त्यांच्या कार्य पद्धतीला शिव्या द्यायच्या. सिद्दीचा विश्वास संपादन करायचा. त्यासाठी हवे ते करायचे आणि एक दिवस जंजिऱ्यातील दारुच्या कोठाराला सुरुंग लावून उडवायचे. हा बेत इतका गुप्त राखला होता की तो फक्त महाराज आणि कोंडाजी दोघांनाच ठाऊक होता. ठरल्याप्रमाणे कोंडाजी फितूर झाला. संभाजी महाराजांवर रागावून सिद्दीला मिळाला. स्वराज्यात कोंडाजीची फितूर म्हणून निर्भत्सना करण्यात आली. दोन चार दिवस संभाजी महाराजही बेचैन होते. कुणाला शंकाही आली नाही.

कोंडाजीनेही जंजिऱ्यावर सिद्दीला असा घोळात घेतला की तोही कोंडाजीच्या भूलथापांना बळी पडला. कोंडाजी संभाजी महाराजांचे नाव निघाले की आपला राग प्रकट करीत असे. त्यामुळे सिद्दीचा विश्वास बसत गेला. सिद्दीने आपली एक स्वरूपसुंदर दासी कोंडाजीला भेट दिली. तिच्याशी त्याने लग्नही केले. त्यामुळे कोंडाजी आता जंजिऱ्यावर कुठेही फिरू शकत होता.

कोंडाजीने आपले जंजिऱ्यावर येण्याचे प्रयोजन फक्त त्या दासीला म्हणजे पत्नीला सांगितले होते. अखेर ज्या दिवशी कोंडाजी दारुगोळा उडवून देणार होता, त्यादिवशी याच स्त्रीकडून ही बातमी फुटली आणि कोंडाजीचे नशीबच फुटले. सिद्दीने तात्काळ कोंडाजीचे शीर उडविले. त्याच्या बरोबर मावळ्यांना समुद्रात फेकून दिले. या कटातील फक्त एकच व्यक्ती जगली आणि संभाजी महाराजांना येऊन भेटली. त्यांच्याकडून महाराजांना सर्व वार्ता समजली. महाराजांना अतोनात दु:ख झाले. कोंडाजीच्या या बलिदानाची माहिती फक्त दोघांना होती, एक छत्रपती संभाजीमहाराज यांना आणि स्वत: कोंडाजीला. बाकी इतिहास मुका आहे.

## संभाजी कावजी कोंढाळकर

संभाजी कावजी कोंढाळकर हा असाच एक मावळा. प्रचंड शारीरिक ताकदीचा गडी. बलदंड शरीर आणि शारीरिक बळ होते. एकदा एक भला मोठा दगड खड्ड्यातून बाहेर काढायचा होता. पंधरा मजुरांना ते शक्य होत नव्हते. परंतु संभाजीने ते लिलया करून दाखवले. महाराज हा प्रकार पाहात होते. शिवछत्रपती गुणग्राहक होते. त्यांनी संभाजी कावजीला स्वराज्यात कामाला लावले.

संभाजी कावजी आणि तानाजी मालुसरे यांची खास मैत्री होती. तानाजी म्हणत असे की या संभाजीला कोणीही भोजनास बोलावित नाही, कारण तो पूर्ण बोकड एक बैठकीला उडवतो. अर्थात यातली अतिशयोक्ती टाळली तर संभाजी शक्तीमान होता हे सत्य आहे.

एकदा संभाजीच्या नेतृत्वात एक तुकडी शिरवळला सुभान मंगल घेण्यासाठी गेली होती. सोबत संभाजी काटे, भिकाजी वाघ आणि शिवाजी चोर असे खंदे वीर होते. सुभान मंगल किल्ल्याचा किल्लेदार बाळाजी हैबतराव होता. त्याला संभाजीने यमसदनास पाठवले. स्वराज्याच्या या पहिल्या लढाईत संभाजीने यश आणि प्रचंड लूट स्वराज्यात आणली.

अफझलखान वधाच्या वेळी संभाजी प्रतापगडावर होता. महाराजांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढल्यावर बलाढ्य अफझल त्याही परिस्थितीत पोट धरून पालखीत बसला आणि भोयांनी पालखी उचलली. अफझलला पळून जाताना पाहून संभाजी कावजीने त्या चार भोयांचे आठ पाय सटासट कापून टाकले, पालखी खालीच बसली. तेव्हा संभाजीने अफझलखानाचे मुंडके एका घावात धडावेगळे केले. संभाजी कावजीच्या या समयसूचकतेचे महाराजांनी कौतुक केले.

संभाजी कावजी महाराजांचा अंगरक्षक होता. त्याच्या अफाट शक्तीविषयी असे सांगतात की तो घोड्याचे चारही पाय एकत्र धरून घोडा उचलत असे. परंतु या प्रचंड शारीरिक शक्ती असलेल्या संभाजी कावजीची पुढे नियत बदलली. असे म्हणतात की त्याचा मित्र बाबाजीराव याला शिवछत्रपतींनी काही कारणाने झापले होते. त्याचा राग येऊन संभाजी शाहिस्तेखानास जाऊन मिळाला. शाहिस्तेखानाने संभाजीला मलकर येथे हवालदार नेमले होते. पुढे महाराजांनी सरनोबत प्रतापरावांना आज्ञा करून या फितूर संभाजी कावजी कोंढाळकर यास यमसदनास पाठविले. संभाजी कावजीबद्दल एवढीच माहिती आज मिळते.

## हिरोजी फर्जंद

ऐतिहासिक काळात राजे लोकांत बहू पत्नीत्वाची पद्धत होती. शिवरायांची आठ लग्ने झाली होती. त्याचप्रमाणे शहाजीराजांची दोन लग्ने झाल्याची नोंद आहे. एक पत्नी जिजाबाई आणि दुसरी तुकाबाईसाहेब अशा दोन पत्नी शहाजीराजांना होत्या. त्याशिवाय काही दासीही शहाजी राजांकडे सेवेत होत्या.

शहाजीराजांना काही खांडाराणीही होत्या. खांडाराणी म्हणजे ज्यांचे लग्न तलवारीबरोबर लागले आहे अशा स्त्रिया. या स्त्रियांची संतती अनौरस संतती मानली जात असे. अशा अनौरस संततीला औरस संततीप्रमाणे हक्क नसले तरी त्यांची चरितार्थाची सोय लावली जात असे. शहाजी राजांना तीन औरस पुत्र होते. संभाजीराजे, शिवराय आणि एकोजीराजे असे तीन होते. त्याशिवाय अनौरस पुत्र भिवजीराजे, संताजीराजे आणि प्रतापजीराजे असे तिघे होते. त्याशिवाय काही दासीपुत्रही होते. त्यापैकी आनंदराव मकाजी आणि हिरोजी फर्जंद असे दोन इतिहासाला ज्ञात आहेत. हे दोघेही शिवरायांच्या स्वराज्य सेवेत होते. हे दोघेही महाराजांच्या कुटुंबातीलच मानले जात होते. जिजाऊ हिरोजीला पुत्रवत मानीत होत्या.

औरंगजेबाच्या आमंत्रणावरून आग्र्याला जाताना महाराज अत्यंत सावध होते. महाराजांच्या जिवाला धोका होणार नाही असा मिर्झाराजांनी महाराजांना शब्द दिला होता तरी धोकेबाज औरंगजेबाचा नेम नव्हता. म्हणून महाराज सावध होते. हिरोजी शहाजी राजांचेच पुत्र असल्याने त्यांची शरीरयष्टी महाराजांप्रमाणेच होती. हिरोजींना मागून पाहणाऱ्यांना महाराजच चालले आहेत असा भास होत असे. त्यामुळे संकटकाळी हे दोघातले साम्य उपयोगी पडेल म्हणून महाराजांनी हिरोजींना सोबत घेतले होते आणि तसेच झाले.

शिवाजी महाराज औरंगजेबाच्या कपटाला बळी पडले आणि त्यानंतर महाराज आग्र्याला कैदेत पडले. त्यांच्याभोवती फुलादखानाचा पांच हजार फौजेचा वेढा पडला. १७ ऑगस्ट १६६६ रोजी महाराजांनी मोठ्या कल्पकतेने स्वतःची व इतरांची सुटका करून घेतली. सर्वप्रथम महाराजांनी आपल्या बरोबरची माणसे महाराष्ट्रात पाठवून दिली. नंतर बरोबरची चीजवस्तू महाराष्ट्रात पाठवून दिली. त्यानंतर आजारपणाचे सोंग घेऊन गोरगरिबांना मिठाई वाटून दुवा घेण्यास सुरुवात केली आणि १७ ऑगस्ट रोजी हिरोजी फर्जंद यास आपल्या पलंगावर झोपवून मदारी मेहतरास त्याचे पाय चेपण्यास सांगून स्वतः मिठाईच्या पेटाऱ्यात बसून पलायन केले. हिरोजीने महाराजांच्या हातीचे सोन्याचे कडे घालून तो हात बाहेर काढून पांघरुण घेतले असल्याने महाराजच झोपले असल्याचा भास होत होता.

हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर यांच्या धैर्याला तोड नव्हती. साक्षात मृत्यू त्यांच्याभोवती घिरट्या घालीत होता. पहारेकरी महालात आले असते तर सारे बिंग फुटून क्षणात दोघांच्याही माना धडावेगळ्या झाल्या असत्या.

त्यामुळे या दोघांच्या त्यागाला तोड नाही. महाराजांना आग्र्याबाहेर पडण्यास पुरेसा अवधी मिळताच महाराजांच्या पलंगावर उशा ठेवून हे दोघे महाराजांचे औषध आणण्याच्या निमित्ताने राजरोस बाहेर पडले. पक्षी उडाला, पण कोणालाच कळले नाही.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर रायगडावर सापत्न भावाला उधाण आले होते. संभाजीराजे युवराज असून शिवरायांच्या मागे छत्रपती होऊ नयेत म्हणून एक गट कार्यरत होता. त्या गटात महाराणी सोयराबाई, अनोजी पंत, सोमाजी दत्तो, हिरोजी प्रल्हाद निराजी, मोरोपंत पेशवे असे मुत्सद्दी होते. त्यांच्याकडून पन्हाळ्यावर संभाजी महाराजांना कैद करण्याचा डाव टाकण्यात आला होता. परंतु हंबीररावांच्या नीतीमत्तेमुळे तो उधळला गेला. पुढे संभाजीराजांना संपविण्याचे प्रयत्न वारंवार होत होते.

त्याही परिस्थितीत शंभूराजांनी १६ जाने. १६८१ रोजी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. शंभूराजे छत्रपती संभाजी महाराज झाले. तरी त्यांच्याविरुद्ध कारस्थाने होतच होती. फितुरांना राजांनी अनेकदा क्षमा केली होती.

पुढे औरंगजेबाचा पुत्र अकबर बापाच्या विरुद्ध बंड करून महाराष्ट्रात संभाजी महाराजांच्या आश्रयाला आला. महाराजांनी त्याची व्यवस्था पाली-सुधागड जवळ घोडसे गावी केली होती. अकबराला महाराष्ट्रात पाठवण्यामागे औरंगजेबाचा काही डाव आहे का याचा माग महाराज काढीत होते. त्यामुळे अकबर येऊनसुद्धा महाराजांनी त्याची भेट घेतली नव्हती. अर्थात त्याची योग्य सोय लावावी म्हणून हिरोजींना ती कामगिरी सांगितली होती. परंतु हिरोजींची नियत बदलली. त्यांनी अनोजी आणि महाराणी यांचे एक पत्र अकबराला नेऊन दिले. ज्यात स्पष्ट लिहिले होते की अकबराने संभाजीराजांना पदच्चुत करण्यासाठी मदत करावी व त्या बदल्यात स्वराज्याचा मोठा प्रदेश आम्ही अकबराला देऊन टाकू.

अकबराबरोबर राजस्थानातील दुर्गादास राठोड हा होता, त्याने अकबराला सल्ला दिला की त्याने ते पत्र संभाजीराजांना पाठवून द्यावे. त्याने ते पत्र संभाजीराजांना दाखवताच संभाजी राजांना कटाची कल्पना आली. महाराजांनी पालीच्या सुधागडाखाली धाड टाकली. फितुरांची तारांबळ उडाली. कटात सामील असलेले अनोजी दत्तो, सोमाजी दत्तो, राहुजी सोमनाथ, हिरोजी, बाळाजी आवजी आणि त्यांचे पुत्र आवजी बाळाजी हे दोघे जबरदस्तीने कटात सामील करून घेतले होते. या सर्वात बाळाजीकाका आणि हिरोजीकाका

यांना पाहताच संभाजीराजांचा राग अनावर झाला. आजपर्यंत अनेकदा फितुरांना क्षमा करुन महाराजांनी सोडले होते. आता ते शक्य नव्हते. महाराजांनी कवी कलशांना आज्ञा केली की सर्व फितुरांना घोडश्याच्या कलावंतीच्या माळावर हत्तीच्या पायी देण्यात यावे. राजद्रोहाची शिक्षा काय असते ते साऱ्या जगाला कळू द्या.

त्याच दिवशी हिरोजींचा शेवट झाला.

## फिरंगोजी नरसाळा

पुणे, सुपे, इंदापूर आणि चाकण हा भाग शहाजीराजांच्या जहागिरीचा भाग होता. परंतु जहागिरी जेव्हा दिली जात असे तेव्हा त्या प्रदेशातले गड किल्ले हे जहागिरदाराच्या ताब्यात नसत. ते मूळ राज्यकर्त्याकडे राहत. त्यामुळे चाकणचा संग्रामदुर्ग आदिलशाहीच्याच ताब्यात होता. ती गढी होती. त्या गढीवर फिरंगोजी नरसाळा आदिलशाही किल्लेदार होता. फिरंगोजी भक्कम छातीचा बेडर किल्लेदार होता. महाराजांना संग्रामदुर्ग स्वराज्यात यावा असे वाटत होते. गडाबरोबर फिरंगोजी स्वराज्यात आले तर पाहावे म्हणून महाराजांनी फिरंगोजीची त्याच्या वाड्यावर जाऊन भेट घेतली. संग्रामदुर्गात फिरंगोजींचा भव्य वाडा होता.

फिरंगोजींचे संग्रामगडावरून चाकण चौऱ्यांशीवर पूर्ण लक्ष होते. त्यांना शिवरायांनी चालविलेले स्वराज्य निर्मितीचे प्रयत्न ठाऊक होते. महाराजांनी आपल्या वाणीने फिरंगोजींवर गारुड केले. फिरंगोजी गडासकट स्वराज्यात आले. अर्थात महाराजांनी नव्याने स्वराज्यात आलेल्या संग्रामगडांवर फिरंगोजींनाच गडकरी नेमले. फक्त आदिलशाही निशाण लावले होते.

त्यानंतर महाराज पन्हाळ्यावर सिद्दी जोहरच्या वेढ्यात सापडले असता शाहिस्तेखान पुण्यात आला होता. त्याने सव्वा लाख फौज पुण्यात आणली होती. शाहिस्तेखानास प्रथम हमखास विजय हवा असल्याने त्याने पंचवीस हजार फौज चाकणची मातीची गढी घेण्यासाठी पाठविली. गडावर फक्त आठशे मावळे होते. संग्रामगड म्हणजे पूर्ण मातीची गढी होती. पण गडकऱ्यांची आणि शिपायांची जिद्द पोलादी होती. रोज काही मावळे रात्रीच्या वेळी गडावरून येऊन मोगल फौजेवर हल्ला करीत आणि प्रतिकार होण्याआधी पळून जात. असे एक नाही, दोन नाही तर पंचावन्न दिवस चालले होते. फिरंगोजी नरसाळा गड लढवित होते. शाहिस्तेखानाची इज्जत जाण्याची वेळ आली. एक साधी

मातीची गढी पंचवीस हजाराच्या फौजेला पंचावन्न दिवस जिंकता येत नव्हती. शेवटी खानाने बाहेरून तटापर्यंत एक भुयार खणून बुरुजाखाली दारुगोळा ठासून तटबंदी उडवायचे ठरविले.

फिरंगोजींना या बेताची कल्पना नव्हती. एक दिवस अचानक बुरुजाखाली स्फोट झाला. तटाला खिंडार पडले. तरी मावळे माघार घेत नव्हते. खिंडार पडून तीन दिवस झाले तरी एकही मोगल सैनिक गढीत शिरू शकत नाही. शेवटी महाराजांची आज्ञा आली की गड खाली करून द्या आणि सुखरूप परत या; तेव्हा फिरंगोजींनी गड मोंगलांच्या हाती दिला. तो पंचावन्नावा दिवस होता. त्यानंतरच्या काळात स्वराज्यात खूप घटना घडल्या. अनेक राजकारणे झाली. रायगडावरील सापत्न भावाला कंटाळून युवराज संभाजीराजे दिलेरखानाच्या छावणीत गेले. दिलेरखानाने त्यांना चांगली वागणूक दिली. शंभूराजांना पुढे करून स्वराज्यावर हल्ला करण्याचे दिलेरखानाचे धोरण होते. दिलेरखानाने संभाजीराजांना पुढे ठेवून भूपाळगडावर हल्ला केला.

दिलेरखानाला अपेक्षित तेच घडत होते. समोर स्वराज्याचा युवराज संभाजीराजे असता फिरंगोजींचे मन गडावरून तोफ उडविण्यात धजत नव्हते. फिरंगोजींचा आणि महाराजांचा घरोबा होता. फिरंगोजी पूर्वी राजगडावर येत होते. त्यांनी शंभूराजांना अंगाखांद्यावर खेळवले होते. आता त्याच शंभूराजांवर गोळा टाकताना फिरंगोजींना धीर होत नव्हता. फिरंगोजींनी भूपाळगड खाली करून संभाजी महाराजांच्या हाती दिला आणि ते रायगडावर महाराजांसमोर हजर झाले.

घडल्या प्रसंगाने महाराजांना फिरंगोजींचा राग आला. तसेच महाराज मनातून चिंता करत होते. याच प्रसंगाची पुनरावृत्ती सर्वच किल्ल्यावर होण्याची शक्यता होती. एवढ्या कष्टाने आणि मावळ्यांच्या बलिदानाने निर्माण केलेले स्वराज्य संपण्यास वेळ लागणार नाही. आता दया येऊन फिरंगोजींना सोडून दिले तर इतर किल्लेदारात वेगळाच संदेश जाणार होता आणि फिरंगोजींना शिक्षा करण्यास मन धजावत नव्हते. महाराजांच्या मनात विचार आला आज फिरंगोजींच्या जागी आपण असतो तर संभाजीराजांवर तोफ गोळा चालवू शकलो असतो का? असे अनेक विचार मनात आल्याने महाराज बेचैन होते. पण महाराजांनी कर्तव्यापुढे भावनेला कधीच मोठे मानले नव्हते. त्यांनी हृदयावर दगड ठेऊन फिरंगोजींना तोफेच्या तोंडी देण्याची आज्ञा दिली.

त्या रात्री महाराजांना झोप लागलीच नाही. त्यांच्या नजरेसमोर फिरंगोजींची अनेक रूपे येत होती. चाकणची मातीची गढी पंचावन्न दिवस लढवणाऱ्या

फिरंगोजींना भूपाळगड लढवणे शक्य नव्हते का? मग फिरंगोजी असे का वागले? आपण भूपाळगडाचे किल्लेदार असतो तर काय केले असते? असे अनेक प्रश्न महाराजांना झोप येऊ देत नव्हते. शेवटी पहाटेस महाराजांचा डोळा लागला. महाराजांना स्वप्न पडले, पुतळाबाई राणीसाहेब महाराजांच्या स्वप्नात येऊन त्यांना विचारीत होत्या, उद्या शंभूराजे स्वराज्यात परत आले तर त्यांनाही तोफेच्या तोंडी देणार ना महाराज? देणार ना महाराज? देणार ना महाराज?

## मदारी मेहतर

मदारी मेहतर हा शिवाजी महाराजांचा खाजगी सेवक. महाराजांची आज्ञा विनाविलंब पाळणे एवढेच त्याचे काम होते. महाराजांनी जातीभेद, धर्मभेद कधीच पाळला नव्हता. मदारीचीही महाराजांवर नितांत श्रद्धा होती. महाराज कुठेही मोहिमेवर निघाले की मदारी त्यांच्यासोबत असे. आणि मदारी सोबत आहे म्हटल्यावर घरच्यांनाही महाराजांची काळजी वाटत नसे.

पुरंदरच्या तहानंतर राजकारणाची सोय म्हणून महाराज आग्र्याला जायला निघाले. महाराजांनी सहाशे सेवक सोबत नेले. हे सर्व सेवक धारकरी मावळे होते. त्यात मदारीला सोबत घ्यायला महाराज विसरले नाहीत. पुढे महाराज औरंगजेबाच्या कैदेत पडले. १७ ऑगस्ट १६६६ रोजी महाराजांनी कैदेतून पलायन केले. त्यादिवशी जगाला मदारी मेहतरची खरी किंमत कळली. महाराज मिठाईच्या पेटाऱ्यातून फुलादखानाच्या पहाऱ्यातून निसटून जाणार होते. परंतु महाराजांना आग्र्याबाहेर पडण्याच पाच सहा तासांचा अवधी लागणार होता. एवढा वेळ महाराजांच्या पलंगावर कोणीतरी झोपणे आवश्यक होते. हिरोजी फर्जंद शहाजीराजांचा दासीपुत्र असल्याने तो बराचसा महाराजांच्या सारखा दिसत होता. हिरोजी महाराजांच्या पलंगावर अंगावर पांघरुण घेऊन झोपला व मदारी मेहतर हिरोजीचे पाय चेपीत होता. त्यामुळे बाहेरून येणाऱ्यांना महाराजच झोपले आहेत व मदारी पाय चेपतो असा भास होत होता. अशा स्थितीत हिरोजी आणि मदारी दोघेही सहा तास होते. या काळात साक्षात मृत्यू त्यांच्यावर घिरट्या घालीत होता. कुठल्याही क्षणी पहारेकरी आले तर सर्व बिंग फुटणार होते. आणि मग दोघांचा मृत्यू अटळ होता.

महाराजांना आग्र्याबाहेर जाण्यास पुरेसा अवधी मिळाल्यानंतर हिरोजी आणि मदारी दोघेही महाराजांचे औषध आणायला हकिमाकडे जातो असे पहारेकऱ्याला सांगून रितसर बाहेर पडले आणि योग्यवेळी सुखरूप रायगडावर

पोहोचले. पुढे १६७४ मध्ये राज्याभिषेक प्रसंगी महाराजांनी हिरोजी आणि मेहतर यांचा सत्कार केला. महाराज मदारीला म्हणाले की 'तुम्ही उभयतां आपला जीव धोक्यात घालून माझे प्राण वाचविले आहेत, काय हवे ते मागून घे.' त्यावर मदारी म्हणाला, 'महाराज मला आपल्या सिंहासनाची देखभाल करण्याचे काम द्या.'

हा स्वामीनिष्ठ युवक धर्माने मुसलमान होता हे लक्षात असू द्या.

## बहिर्जी नाईक

बहिर्जी नाईक हा शिवाजी महाराजांच्या हेरखात्याचा प्रमुख होता. त्याच्या खात्यात सुमारे एक हजारपर्यंत माणसे होती. बहिर्जी हा जातीने रामोशी होता. बहिर्जी म्हणजे मावळच्या खोऱ्यात महाराजांना सापडलेले रत्न होते. बहिर्जी वेशांतर करण्यात तरबेज होता. त्यासाठी लागणारी निरीक्षण शक्ती त्याच्याकडे भरपूर होती. पाच मिनिटे भेटलेल्या माणसाचीही तो नक्कल करीत असे. वेशांतरात बहिर्जीची चूक काढणे कठीण होते. महाराज गुणांचे चाहते होते. महाराजांनी बहिर्जीची परीक्षा घेताना त्यांना खेळणागडाची माहिती काढण्यास सांगितली होती. बहिर्जीने ऐकले होते की खेळण्यावर मलिक रेहानचा दर्गा आहे. त्यांनी मग मुसलमान फकिराचा वेश घेऊन, दर्ग्यावर चादर चढवून, नमाज अदा करून गडाची माहिती काढली व महाराजांना सांगितली. महाराज खूश झाले. महाराजांनी बहिर्जीला स्वराज्याच्या कामी लावले.

बहिर्जीकडे अनेक गुण होते. ते हजरजबाबी होते. त्यांना मराठी, हिंदी, उर्दू भाषा चांगल्या अवगत होत्या. चेहऱ्यावरचे भाव बदलण्यात ते हुशार होते. ते साधू, फकीर, संत, वासुदेव, भिकारी यांचे वेशांतर बेमालूम वठवित असत. सुरत लुटण्यापूर्वी महाराजांनी बहिर्जीला सुरतेची माहिती काढण्यास सांगितले होते. बहिर्जी सुरतेत इंग्रज वखारीच्या बाहेर घोड्याला नाळ बसवण्याचे काम करू लागला होता. कोणालाही शंका आली नाही.

बहिर्जीचे हेरही अत्यंत चलाख होते. महाराजांना प्रत्येक मोहिमेआधी माहिती लागत होती, ते काम बहिर्जीच्या खात्याकडे असे. तसेच शत्रू पक्षाच्या बातम्या मिळवाव्या लागत. शत्रूच्या गोटात अफवा पसरविण्याचे कामही हेर खाते करीत असे. महाराज आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेत सापडले तेव्हा आग्र्याच्या बाजारात अफवा होती की शिवाजी भिंतीतून जाऊ शकतो. तो अदृश्य होतो. तो हवेत उडू शकतो. या अफवा पसरल्यामुळे महाराज आग्र्यातून निसटले

तेव्हा आग्र्यातील रयत भयभीत झाली होती.

शत्रू पक्षाच्या बातम्या काढण्याच्या बहिर्जीच्या खास पद्धती होत्या. शत्रूपक्षाचा जासूस खलिता घेऊन निघाला की त्याच्यावर पाळत ठेवली जाई. हा जासूस जेव्हा जंगलातून जात असे तेव्हा चार पाच दरोडेखोर त्याला लुटीत. त्याच्याजवळचा किंमती ऐवज काढून घेतला जाई. दरोडेखोरांचा नायक जासूसाकडचा खलिता वाचण्याचा प्रयत्न करी आणि अनपढ असल्याचे भासवित असे. दुसरा दरोडेखोरही तसेच करी आणि खलिता समजत नाही असे भासवून जासूसाला परत करीत असे. खलिता परत मिळाल्याचा आनंद मानून जासूस निघून जाई. वास्तविक दोन्ही दरोडेखोरांनी खलिता वाचून त्यातील शब्दन्शब्द लक्षात ठेवलेला असे, ते मजकूर पुन्हा लिहून ठेवला जाई. हे दरोडेखोर दुसरे तिसरे कोणी नसून बहिर्जी आणि त्यांचे हेर असत.

डाक मारण्याची बहिर्जीची आणखी एक पद्धत होती. त्यातही जासूसचा पाठलाग केला जाई. तो रात्री वस्तीला ज्या मंदिरात अथवा धर्मशाळेत उतरे, तेथे त्यानंतर चार-पाच साधूही वस्तीला येत. दगडाची चूल मोडून त्यावर डाळ-तांदूळ शिजवले जात असे. नंतर सर्व साधू त्या जासूसासोबत गांजाची चिलीम ओढत बसत. जासूसालाही आग्रह करून चिलीम देत. रात्री तो जासूस झोपला की त्याच्याजवळच्या पत्राची नक्कल नकलून ते पत्र पुन्हा ठेवले जाई. सकाळी उठल्यावर पत्र जागच्या जागी पाहून जासूस पुढल्या प्रवासास निघून जाई.

बहिर्जी इतका चतूर होता की एखाद्या गडाची माहिती काढण्यासाठी तो त्या गडावर मुख्य दरवाजाने प्रवेश करी. त्या शत्रूच्या किल्लेदाराकडे भोजन करून त्याच्याचकडून गडाची माहिती काढे. सुरत लुटण्याआधी त्याने सुरतेचा किल्लेदार इनायतखान याच्याकडे मुक्काम केला होता.

कधी धारवाल्याच्या वेशात तर कधी कल्हई लावणाऱ्याच्या वेशात तो राजरोसपणे गडावर जात असे. गडावरील बायकांशी गप्पा मारून त्यांच्याकडून माहिती काढून घेई. कधी कधी किल्लेदाराच्या बायकोच्या परवानगीने गडावर दुसऱ्या दिवशी पुन्हा येत असे.

बहिर्जीच्या हेरखात्यात एक हजारपर्यंत हेर होते. हे सर्वजण अत्यंत हुशार, चलाख आणि सावध होते. त्यांच्यातील प्रत्येकाकडे असणाऱ्या काठीला घुंगरे लावलेली असत. ही काठी आपटून येणाऱ्या घुंगराच्या आवाजाची एक भाषा होती. ती फक्त हेरांनाच ज्ञात होती. त्याचप्रमाणे दूरवर निरोप देण्यासाठी वाऱ्याच्या दिशेवर चौक्या असत. या चौक्या दगडात बांधलेल्या असून त्यात

एक हेर दिवसरात्र बसलेला असे. वाऱ्यावर येणारे आवाज समजून ते निरोप पुढे पाठवणे हे त्याचे काम असे. वाऱ्याच्या दिशेचा उपयोग करून हे काम बिनबोभाट चालत असे.

रायगडावर संभाजी राजांना प्रचंड विरोध होता. त्यांच्या जिवाला धोका होता. महाराजांना कर्नाटक स्वारीवर जायचे होते तेव्हा महाराजांनी सुरक्षिततेसाठी संभाजीराजांना त्याच्या सासूरवाडीला श्रृंगारपूरला ठेवले होते. तेव्हा संभाजीराजांवर लक्ष ठेवून त्यांच्या बातम्या कर्नाटकात महाराजांना कळविण्याचे जोखमीचे काम बहिर्जी करीत होता. युवराजांचे मांसाहारी जेवण बनविणारा आचारी वाड्यावरच राहत असे. तो युवराजांबद्दल खास काही असेल तर पहाटे गाईचे दूध काढणाऱ्या गड्याला कळवित असे. कारण हा आचारी आणि दूध काढणारा दोघेही बहिर्जींचे हेर होते. दोन वर्षे हा प्रकार चालू होता. पण संभाजीराजांनाही काही कळले नाही.

परंतु आपले दुर्दैव की या थोर हरहुन्नरी पुरुषाविषयी फार थोडी माहिती इतिहासात मिळते. अर्थात त्यांचे कामच गुप्तता राखण्याचे असल्याने इतिहासात त्यांच्या कार्याची नोंद करणे म्हणजे रहस्यभेद करणे असे होते.

या शिवरायांच्या हेरखात्याच्या प्रमुख मावळ्याची समाधी सांगलीजवळ भूपाळगडावर आहे. नुकताच तिचा जिर्णोद्धारही झाला आहे.

## सूर्यराव काकडे

सूर्यराव काकडे म्हणजे महाराजांचा बालपणीपासूनचा दोस्त. स्वराज्याच्या सर्व मोहिमात सूर्यराव महाराजांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा जीवलग मित्र. सूर्यराव म्हणजे शौर्य. सूर्यराव म्हणजे हिंमत. सूर्यराव म्हणजे जिद्द आणि सूर्यराव म्हणजे हमखास यश अशी ख्याती असलेला वीर म्हणजे सूर्यराव.

अफझलखानवधाच्या वेळी सूर्यराव प्रतापगडावर हजर होता. खानाची प्रतापगडाखालची फौज गारद करण्यात सूर्यराव विजेसारखा चमकला. त्यानंतर महाराजांनी पन्हाळ्यापर्यंत काढलेल्या मोहिमेत सूर्यराव महाराजांसोबत होता. जावळीच्या मोहिमेतही सूर्यराव होता. महाराजांच्या प्रत्येक मोहिमेत सूर्यराव हजर होताच. महाराजांच्या प्रत्येक सुखदु:खात तो साक्षी होता. माँसाहेबांचा तर तो लाडका होता.

पुरंदरच्या तहात महाराजांना तेवीस किल्ले आणि बारा लक्ष होनांचा प्रदेश मोगलांना द्यावा लागला होता. औरंगजेबाशी तह झाल्यामुळे महाराज काही

काळ शांत होते. पण औरंगजेबाने हिंदूवर जिझिया कर लावून देवळे पाडण्यास सुरुवात केल्यावर १६७० पासून महाराजांनी पुन्हा आक्रमक धोरण स्वीकारले. गेलेला मुलूख परत घेण्याचा सपाटा लावला. १६७० च्या डिसेंबर महिन्यात महाराजांनी वऱ्हाड आणि खानदेशाची लूट केली. संपत्तीचे 'कारंजे' लुटले. बागलाणात साल्हेरला वेढा घातला. मोगल किल्लेदार फतेउल्लाखान मारला गेला. त्याचा मेहुणा साल्हेरवर होता. त्याला आपले भविष्य कळून चुकले. त्यांनी पैसे घेऊन साल्हेर महाराजांना देऊन टाकला. तो दिवस होता ५ जाने. १६७१.

मराठ्यांनी साल्हेरसारखा महत्त्वाचा गड घेतल्यामुळे औरंगजेब चिडला होता. त्याने आपला दुधभाऊ बहादूरखान यास बागलाणात असलेल्या महाबतखान आणि दाऊदखान यांच्या मदतीस पाठवून दिले. पण महाबतखान आणि दाऊदखान दोघे आपापसात भांडत होते. महाबतखान पारनेरला सरकारी खर्चात चैन करीत होता. बहादूरखान आणि दाऊदखान यांनी साल्हेरला वेढा दिला.

महाराजांनी सरनोबत प्रतापराव गुजर आणि मोरोपंत पेशवे यांना साल्हेरच्या मदतीस पााठविले. मोगलांनी साठ हजार फौजेचा वेढा साल्हेरला घातला होता. त्यात दिलेरखानही होता. तो रवळगडाकडे आणि कण्हेरगडाकडे गेला. परंतु दोन्ही ठिकाणी मार खावून परत आला. महाराजांना या बागलाणातील बातम्या कळत होत्या. त्यांनी साल्हेरच्या मदतीस सूर्यराव काकडे, आनंदराव मकाजी, शिदोजी निंबाळकर, गोदाजी जगताप यांना पाठविले. सूर्यराव काकडेला पाठवून महाराज निर्धास्त झाले. कारण सूर्यराव म्हणजे हमखास यश हे महाराज जाणून होते. पण घडले अत्यंत विपरीत आणि दु:खदायक. सूर्यरावांनी साल्हेर स्वराज्यात आणला, पण आपला जीव गमावला. जंबूऱ्याचा गोळा लागून सूर्यराव धारातीर्थी पडले.

बखरीत उल्लेख आहे 'सूर्यराव पंचहजारी मोठा लष्करी धारकरी याने युद्ध थोर केले.'

## कृष्णाजी त्रिमल मथुरे

१७ ऑगस्ट १६६६ रोजी औरंगजेबाच्या हातावर तुरी ठेवून महाराज औरंगजेबाच्या कैदेतून सहीसलामत सुटले. औरंगजेबासारख्या क्रूर कपटी बादशहाच्या हातून सुटणे हे जसे जगाला थक्क करणारे होते, तसेच ते

औरंगजेबाच्या अब्रूचे धिंडवडे काढणारे होते. औरंगजेबाने, फुलादखानाने आणि रामसिंहाने जिवाचे रान करून शोधाशोध सुरू केली. औरंगजेबाची अब्रू आणि फुलादखान, रामसिंह यांचे प्राण यात गुंतले होते. मोगलाईत सर्वत्र धावाधाव, शोधाशोध चालू होती. अशा परिस्थितीत लवकरात लवकर महाराष्ट्रात पोहोचणे महाराजांना आवश्यक होते. सोबत नऊ वर्षांचे युवराज संभाजीराजे असल्याने अखंड घोडदौड करणे शक्य नव्हते. शंभूबाळाला इतका दूरचा प्रवास झेपणारा नव्हता. शिवाय संभाजीसह पळणाऱ्या शिवाजीचा शोध सुरू होता. त्यातही धोका होता.

अर्थात सदैव सावध असणाऱ्या महाराजांनी याचा विचार त्याआधीच केला होता. महाराज आग्र्यातून पळाले हे कळल्यावर ते कमीत कमी दिवसात महाराष्ट्रात पोहोचण्याचा प्रयत्न करतील हा औरंगजेबाचा कयास असणार हे ओळखून महाराज महाराष्ट्राकडे न जाता मथुरेस गेले. मथुरेत महाराजांचे गुरू मकरंद भट होते, तसेच पेशवे मोरोपंत पिंगळे यांच्या बहिणीचे यजमान कृष्णाची मथुरे हे होते. मथुरेत कृष्णाजीपंत, विसाजीपंत आणि काशीपंत मथुरे यांचा वाडा होता. महाराजांनी कवी परमानंद याच्यामार्फत या मथुरे बंधूंशी बोलते केले होते. युवराज संभाजीराजांना या मथुरेबंधूंकडे ठेवण्याचा महाराजांचा इरादा होता. त्यामुळे महाराजांचा मार्ग सोपा झाला असता आणि संभाजीराजांनाही नंतर सुखरूप स्वराज्यात आणता आले असते.

यात मथुरेबंधूंना धोका होता. औरंगजेबाला जर हे कळले असते तर त्याने मथुरेंच्या घरावरून नांगर फिरवित असता. संभाजीच्या जिवाला तर धोका होताच, पण मथुऱ्यांची नावनिशाणीही राहिली नसती. पण हे मथुरेबंधू मोठे धीराचे होते. त्यांनी युवराजांची जबाबदारी घेतली. त्यांनी संभाजीराजांचे संजाब राखून मुंडण केले आणि आपला भाचा आहे असे बाहेर सर्वांना सांगितले त्यामुळे कोणालाही शंका आली नाही.

पुढे सर्व स्थिरस्थावर झाल्यावर महाराजांनी आपले हेर मथुरेस पाठवून संभाजी राजांस आणि मथुरे कुटुंबास गडावर आणले. मथुरे कुटुंबाचे बहुत सत्कार केले. त्यांना एक लाख होन रोख देण्यात आले. विपूल कपडा, दागिने देण्यात आले. मथुरे कुटुंबाने युवराजांची जबाबदारी, धोका समोर दिसत असूनही स्वीकारली म्हणून पुढचा इतिहास घडला.

## निष्ठावान बाळाजी आवजी चिटणीस

शिवशंभूंनी अनेक चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंना स्वराज्याच्या कार्यात गुंतवले होते. महाराजांना कायस्थी इमान भावले होते. बाळाजी आवजी हे त्यांपैकीच एक होते. त्यांचे आडनाव चित्रे होते. हे घराणे जंजिऱ्याच्या नवाबाकडे दिवाण पदावर होते. परंतु त्यांचा उत्कर्ष न पहावल्याने काही मुस्लिमांनी नवाबाचे कान फुंकले. नवाबाने बाळाजींचे वडील आवजी हरी चित्रे यांना समुद्रात फेकून देण्याची शिक्षा दिली. तसेच त्याची पत्नी व तीन मुले यांना मस्कतच्या बाजारात गुलाम म्हणून विकण्यासाठी राजापूरला पाठवले. परंतु या चौघांचे नशीब चांगले होते. राजापूरला बाळाजी आवजींचे मामा म्हणजे आई रखमाबाईंचे बंधू विसाजी शंकर तुंगारे हे व्यापार उदीम सांभाळून होते. त्यांनी पैसे भरून या चौघांना सोडवून आपल्या घरी ठेवले. बाळाजी आणि त्यांचे बंधू चिमणाजी व शामजी आईबरोबर मामाकडे वाढले. बाळाजी लहानपणीच राजापूरच्या इंग्रज वखाती कारकुनी करू लागला.

एकदा बाळाजीने सुवाच्च अक्षरात लाघवी भाषेत महाराजांना राजगडावर पत्र पाठवले. महाराज इतके गुणग्राहक होते की त्यांना बाळाजींचे मोडी अक्षर खूप आवडले आणि त्या प्रसंगानंतर महाराज जेव्हा राजापूरची इंग्रजी वखार लुटण्यास गेले तेव्हा महाराजांनी बाळाजीस बोलावून त्यांची भेट घेतली. महाराजांनी बाळाजीस चिटनिशी बहाल केली. बाळाजीचे कुटूंब राजगडावर राहू लागले. त्यांचे व भोसले कुटूंबाचे संबंध घनिष्ट झाले. महाराज बाळाजींपुढे अनेकदा आपल्या मनातले बोलत असत. शंभूराजेही बाळाजींना बाळाजीकाका संबोधित असत.

एकदा एक गमतीदार प्रसंग घडला. ज्याची इतिहासात नोंद आहे. बाळाजींची स्मरणशक्ती आणि महाराजांची गुणग्राहकता यावर प्रकाश टाकणारी ही घटना आहे. महाराजांना कोकणातील दळवटणे येथील अधिकाऱ्यास पत्र पाठवायचे होते. त्या अधिकाऱ्याची चूक झाली होती. महाराजांनी कडक शब्दात कानउघाडणी करणारा मसुदा बाळाजींना सांगितला. इतर अनेक पत्रे लिहायची असल्याने बाळाजींना हे पत्र लिहिता आले नव्हते. रात्री सावकाश ते लिहीणार होते. संध्याकाळी महाराजांनी बाळाजीस अन्य कामासाठी बोलावले असता त्या पत्राविषयी विचारणा करून वाचून दाखवण्यास सांगितले. प्रसंगावधान राखून बाळाजींनी कोरा कागदच वाचण्यास सुरुवात केली. अर्थात बाळाजींची स्मरणशक्ती इतकी अफाट की त्यांनी शब्दन्‌शब्द बरोबर वाचून दाखवला. महाराज खूश झाले. त्यांनी पत्र बघायला मागताच बाळाजींनी महाराजांचे काम

धरले. झाल्या प्रकाराबाबत क्षमा मागितली. महाराजांच्या सर्व प्रकार लक्षात आला. परंतु महाराज चिडले नाहीत. उलट त्यांनी बाळाजींचे कौतुक केले. धन्य ते बाळाजी आणि धन्य ते महाराज.

वेदमूर्ती गागाभट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जून १६७४ रोजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्याप्रसंगी अनेक अडचणी आल्या होत्या. इतर ब्राह्मणांचे मत पडले की राज्याभिषेक हा क्षत्रियाचाच होऊ शकतो. परंतु परशुरामांनी पृथ्वी नि:क्षत्रिय केली आहे. तेव्हा आता पृथ्वीवर क्षत्रिय नाहीत. बाळाजींनी महाराजांना क्षत्रिय सिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली आणि सिद्ध केले की महाराजांचे पूर्वज उदयपूरच्या शिसोदे घराण्यातील आहेत. महाराज क्षत्रिय ठरले, त्याचे श्रेय बाळाजींचे आहे. बाळाजींनी राजस्थानात जावून महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध केल्याने इतर ब्राह्मणांचा विरोध मावळला आणि राज्याभिषेक पार पडला. या थोरल्या प्रसंगी महाराजांनी अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. त्यावेळी बाळाजींनी मला प्रधानपद नको, त्यापेक्षा माझी चिटनिशी मला वंशपरंपरा द्यावी, असे सांगितल्यावरून महाराजांनी त्यांना चिटनिसी वंशपरंपरा दिली.

बाळाजी आवजी चिटनीस यांचा पुढील वृत्तांत मात्र धक्कादायक आहे. ३ एप्रिल १६८० रोजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. तळपता सूर्य अचानक मावळला. महाराज गेले आणि रायगड राजकारणाचा अड्डा बनला. युवराज संभाजी राजेंचा राज्यावरचा अधिकार डावलून राजाराम महाराजांना सिंहासनावर बसविण्यासाठी महाराणी सोयराबाई, अनोजी दत्तो, सोमाजी दत्तो, राहुजी सोमनाथ, हिरोजी फर्जंद आणि पेशवे मोरोपंत हे प्रयत्नशील होते. सोयराबाई राणीसाहेबांनी रायगडाचा ताबा घेतला होता. गडाचा कडेकोट बंदोबस्त होता.

संभाजी महाराजांना पन्हाळ्यावर कैद करण्यासाठी आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांना कटात सामील करून घेण्यासाठी अनोजीपंत आणि मोरोपंत कऱ्हाडला हंबीररावांना भेटले. हंबीरराव हे राजारामाचे सख्खे मामा असल्याने त्यांचा पाठिंबा गृहीत धरला होता. परंतु ऐनवेळी हंबीररावांनी संभाजीराजांना पाठिंबा देऊन अनोजी व मोरोपंत यांना कैद केले. संभाजीराजांनी हंबीररावांच्या मदतीने रायगड ताब्यात घेतला आणि १६ जाने. १६८१ रोजी संभाजीराजांना राज्याभिषेक झाला. कटवाले सर्व कैदेत पडले होते. त्यांना राज्याभिषेक प्रसंगी संभाजीराजांनी क्षमा करून स्वराज्य कार्यात गुंतवले.

इतके होऊनसुद्धा कटवाले गप्प बसले नव्हते. त्यांनी संभाजी राजांवर विषप्रयोग करण्याचाही प्रयत्न केला. तसेच औरंगजेबाचा पुत्र अकबर हा संभाजी महाराजांच्या आश्रयाला आला होता. त्याची सोय महाराजांनी पालीजवळ घोडशी या गावी लावली होती. अकबरावर देखरेख करण्यासाठी हिरोजी फर्जंद यांची नेमणूक करण्यात आली होती. कटवाल्यांनी हिरोजीमार्फत अकबराला पत्र पाठवून संभाजी महाराजांविरुद्ध मदत मागितली होती. परंतु अकबराने ते पत्र संभाजी राजांस पाठवल्याने संपूर्ण कट उघड झाला. यावेळी कटात बाळाजी आवजी आणि त्याचे पुत्र आवजी बाळाजी यांना कटवाल्यांनी जबरदस्तीने सामील करून घेतले होते. परंतु निष्ठावान बाळाजींनी या कटाची माहिती संभाजीराजांना पन्हाळ्यावर पत्र पाठवून आधीच कळविली होती. परंतु ते पत्र पन्हाळ्यावर संभाजीराजांच्या हाती पडण्यापूर्वीच संभाजीराजे पालीला कटवाल्यांना पकडण्यासाठी गेले होते. त्यामुळे राजांना बाळाजींचे निर्दोषत्व कळले नाही. महाराजांनी पालीला सर्व कटवाल्यांना हत्तीच्या पायी देण्याची शिक्षा दिली. यावेळी त्यात चिटनीस पितापुत्रही होते. अर्थात सर्व कटवाल्यांसोबत निर्दोष असलेले बाळाजी आणि त्यांचे पुत्र आवजीही हत्तीच्या पायी दिले गेले. गडावर आल्यावर संभाजी महाराजांना बाळाजीकाकांचे निर्दोषत्व कळले, पण आता काही उपयोग नव्हता.

## मोरोपंत पिंगळे

मोरोपंत पिंगळे हे महाराजांचे तिसरे पेशवे. ३ एप्रिल १६६२ पासून महाराजांच्या अखेरपर्यंत हेच पेशवे होते. अनेक लढायांत आणि कठीण, अडचणीच्या प्रसंगी शिवरायांना त्यांचा आधार होता. त्यांना एखादी कामगिरी सांगितली वा त्यांच्याकडे नुसती इच्छा प्रदर्शित केली तरी ती पूर्ण होत असे असा महाराजांचा अनुभव होता. महाबळेश्वरजवळचा भोरप्या डोंगरावर एखादा गड असावा असे वाटल्यावरून महाराजांनी मोरोपंतांना आज्ञा केली. 'मोरोपंत या डोंगराच्या मस्तकी पागोटे बांधावे,' आणि मोरोपंतांनी प्रतापगडासारखे रेशमी पागोटे बांधले. याच प्रतापगडावर आई भवानीची स्थापना करावी असे जिजाऊंनी सांगताच मोरोपंतांनी गंडकी नदीतून शिळा मागवून तुळजाभवानीची सुरेख मूर्ती घडवून घेतली. मूर्तीच्या हातात खड्ग, धनुष्यबाण, ढाल, शंख, त्रिशूळ इतके सुबक कोरले होते की ते पाहून महाराज बेहद खूश झाले.

त्याच प्रतापगडावर अफझलखानाची भेट झाली. अफझलचा वध झाला.

अफझलखानाला एकांती भेटून मारण्याची कल्पना पेशव्यांचीच होती. महाराजांनी ती यशस्वीपणे अंमलात आणली. खानाच्या वधानंतर त्याची गडाखालची फौज गारद करण्यात नेतोजी, अनोजी, येसाजी यांच्याबरोबर मोरोपंतही होते.

त्यानंतर महाराज आणि मिर्झाराजे यांच्यात पुरंदरचा तह झाला. दिलेरचे आणि महाराजांचे पटत नसल्याने राजकारणाचा भाग म्हणून मिर्झाराजांनी महाराजांना आग्र्याला पाठवायचे ठरविले. त्याप्रमाणे ५ मार्च १६६६ रोजी आग्र्याला जाण्यासाठी महाराजांनी संभाजी राजांसमवेत गड सोडला. स्वराज्याची संपूर्ण जबाबदारी पेशवे या नात्याने मोरोपंतांवर होती. त्यांनी जिजाऊंच्या सल्ल्याने कारभार पाहण्याचे ठरले होते. तेव्हापासून महाराज पुन्हा गडावर परत येईपर्यंत मोरोपंतांनी स्वराज्याचा कारभार चोख केला. या सहा महिन्याच्या काळात राजधानीत ना राजा ना युवराज होता. सर्व निर्णय मोरोपंत घेत होते व आपल्या हिंमतीवर पार पाडत होते. याच काळात रांगडा किल्ला स्वराज्यात सामील करून घेतला. मोरोपंतांचे हे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. त्यांची स्वामीनिष्ठा, स्वराज्यप्रेम आणि प्रामाणिकपणा यामुळेच हे शक्य झाले.

मोरोपंत जसे राजकारणी, मुत्सद्दी व प्रशासक होते तसेच ते शूर सेनानी होते. ते १६६९ मध्ये महाराजांनी जंजिरा मोहिम उघडली त्या मोहिमेची संपूर्ण धुरा मोरोपंतावर होती. मोरोपंतांनी जंजिऱ्याच्या जवळ दंडाराजपुरीवर जोरदार हल्ला केला. सिद्दीच्या मुलूखात धुमाकूळ घातला. सिद्दी पळून जंजिऱ्यात पळाला. मराठ्यांनी सिद्दीचे सात किल्ले जिंकून घेतले. सिद्दीची जंजिऱ्यात उपासमार होऊ लागली. सिद्दी फत्तेखान द्रव्य घेऊन जंजिरा मराठ्यांना देण्यास तयार झाला. इतक्यात त्याचे सहकारी सिद्दी कासीम, सिद्दी संबूळ आणि सिद्दी खैर्यत हे तिघे फत्तेखानावर उलटले. त्यांनी फत्तेखानासच कैद केले आणि जंजिऱ्याची सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. हाती आलेला घास निसटला.

मोरोपंतांचे कर्तृत्व इतर मुत्सद्यांनाही मान्य होते. ज्येष्ठ मुत्सद्दी निळोपंत मुझुमदार यांना महाराजांनी वतनी कारभार करण्यास सांगितले तेव्हां त्यांनी महाराजास मोरोपंतांचा अधिकार मान्य करून लिहिले की 'राजश्री मोरोपंतांस मेहेरबानीने पंचवीस फुले दिधली तरी आम्हास वीस फुले द्यावीत.'

साल्हेरच्या युद्धात मोरोपंतांनी थोर पराक्रम केल्याची नोंद आहे. साल्हेरच्या युद्धामुळे पेशवे मोरोपंत आणि सरनोबत प्रतापराव एकत्र लढले तर काय करू शकतात हे जगाला दाखवून दिले.

राज्याभिषेक प्रसंगी मोरोपंत पेशवे महाराजांच्या पूर्व दिशेला सुवर्णकलश घेऊन उभे होते. तसेच महाराजांना नजराणा देण्याचा पहिला मान पेशव्यांचा होता. मोरोपंतांनी आठ हजार होनांचा आहेर केला. मोरोपंत पेशवे म्हणून महाराजांच्या मागे मोर्चेल घेऊन उभे होते. राज्याभिषेक प्रसंगी मोरोपंतांचा सत्कार करण्यात आला. शिवकाळातील प्रत्येक पत्रावर पेशव्यांची मोहोर असलीच पाहिजे असा दंडक होता. आजही शिवकालीन ऐतिहासिक कागद पाहताना मोरोपंतांच्या खालील तीन मुद्रा दिसतात आणि मोरोपंतांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

१) श्री शिवचरणी तत्पर त्रंबकसुत मोरेश्वर

२) श्री शिवनरपति हर्षानिधान
मोरो त्रिमल मुख्य प्रधान

३) एषाश्री शिवराजेंद्र मुख्यामात्यस्य सत्यधृक
मुद्रा मोरेश्वरस्वास्तां भद्रा सद्रागदायिनी

## प्रसंगावधानी जिवा महाला

कान्होजी जेधे यांचे वडील कारी आणि आंबवडे येथील वतन उपभोगीत होते. त्यांचे दोन भाऊ सोनजी आणि भिवजी हे दोघे वतनासाठी नाईकजी जेधे यांच्या जिवावर उठले होते. त्यांनी नाईकजींचा काटा काढला. त्यानंतर सोनजी आणि भिवजी बाल कान्होजींच्या जिवावर उठले. परंतु जेधे घराण्याशी घरोब्याचे संबंध असलेले देव महाला यांनी कान्होजीस बाजी पासलकर यांच्या आश्रयाला ठेवले. त्यामुळे कान्होजींचे प्राण वाचले. पुढे कान्होजींनी आपल्या वडिलांच्या मारेकऱ्यांचा बदला घेतला आणि वतनावर ताबा मिळवला. या देव महालाच्या घराण्यातील पुरुष हे कान्होजींच्या घराण्यात सेवा करीत असत. याच महाला घराण्यात जिवाचा जन्म झाला होता.

एकदा राजगडावर एक लग्न होते. लग्नाच्या वरातीत जिवा महाला दांडपट्टा फिरवून करामती करून लोकांचे मनोरंजन करीत होता. नऊ हाताच्या लांबावर ठेवलेले नारळ जिवाने पट्टा चालवून सपासप फोडले होते. आणि पुन्हा आपली जागा घेतली होती. जिवाची ही करामत महाराजांनी पाहिली होती. त्यांनी जिवाला जवळ बोलावले, त्याचे कौतुक केले आणि महाराजांनी जिवाला विचारले की 'जिवा तुला आणखी काय येतं?' त्यावर जिवा म्हणाला होता, 'तेवढंच येतं महाराज.' हा प्रसंग सारेजण विसरले तरी महाराज विसरले नव्हते.

त्यानंतर स्वराज्यावर अफझलखान चालून आला. महाराजांनी खानाची एकांती भेट घेऊन त्याला संपवायचे ठरविले होते. त्याप्रमाणे १० नोव्हें. १६५९ रोजी प्रतापगडावर भेट होणार होती. भेटीचे तपशील ठरत होते. महाराज सदैव सावध असत. त्यांनी बहिर्जीकडून खानाकडील माहिती मिळविली होती. खानाच्या अंगरक्षकाबद्दल माहिती सांगताना बहिर्जीने सांगितले होते की खानाचा अंगरक्षक सय्यद बंडा हा आहे. तो खानाइतकाच उंच पण सडपातळ आहे. त्याची नजर घारीसारखी आहे. दांडपट्टा फिरवण्यात त्याचा हातखंडा आहे. त्याच्याइतका पट्टेबहादूर विजापुरात नाही. खानाचा फक्त सय्यद बंडावरच विश्वास आहे. महाराज या सय्यद बंडाचा काही नेम नाही. तुम्ही त्याच्यापासून जपून राहा.

बहिर्जीने आणलेल्या माहितीने महाराज खूश झाले. आता महाराजांची विचारचक्रे फिरू लागली. सय्यद बंडाशी सामना करील असा दांडपट्टानिष्णात आपल्याकडे कोण आहे? आणि महाराजांना पूर्वी पाहिलेली लग्नाची वरात आणि त्यात दांडपट्टा चालविणारा जिवा महाला आठवला. महाराजांनी ठरविले की भेटीच्या वेळी जिवाला सोबत घ्यायचे.

भेटीच्या दिवशी महाराजांनी शांतपणे अंगावर चिलखत घातले. डोक्यावर वस्तर घालून जिरेटोप चढविला. उजव्या बाजूला अंगरख्यात बिचवा लपविला. नंतर धारदार तीक्ष्ण टोके असलेले चार नखाचे वाघनख महाराजांनी पंजात लपविले. महाराज आता सज्ज झाले. खानाच्या स्वागतासाठी सिद्ध झाले होते. महाराजांनी सर्व अंगरक्षकांना सूचना दिल्या. महाराजांनी जिवा महालाला सांगितले की तू फक्त सय्यद बंडावर लक्ष ठेवून राहायचे आहे. बाकी काहीही झाले तरी लक्ष देवू नकोस.

राजे गडावरून खाली उतरले. त्यांनी पाहिले सय्यद बंडा खानाच्या जवळ आहे. लगेच महाराजांनी खानाला सांगून सय्यद बंडाला दूर केले.

अफझलखानाने 'आवो आवो सिवा' म्हणत आपले दोन्ही हात पसरले. महाराजांनी 'जगदंब, जगदंब' म्हणत खानाला मिठी मारली. अवाढव्य खानापुढे महाराज बुटके होते. खानाने राजांचे मस्तक आपल्या डाव्या बगलेत दाबून धरले. महाराज सुटका करून घेण्यासाठी धडपडू लागले. त्याचवेळी खानाने कमरेच्या आतील अंगरख्यात लपवलेली कट्यार काढून महाराजांच्या डाव्या कुशीत जोरात खुपसली. तसा महाराजांचा अंगरखा फाटला आणि आतल्या चिलखताला कट्यार घासली गेली. इतक्यात महाराजांनी विजेच्या चपळाईने

उजव्या दस्त्यातील बिचवा उपसला आणि खानाच्या पोटात खोलवर खुपसला. तो खानाच्या पोटातच वर-खाली फिरवला, तशी खानाची आतडी ओढून बाहेर काढली. खानाच्या पोटातून रक्ताचे कारंजे उडाले. कट्यार खाली पडली आणि 'दगा... दगा... हे अल्ला...अल्ला...' असे ओरडत किंचाळत त्याने महाराजांच्या डोक्यावर तलवारीने वार केला. जिरेटोपाच्या आत पोलादी बस्तर असल्याने महाराज बालंबाल बचते. अफझलखान आतडी हाताने दाबून धरून झोकांड्या खात शामियान्याबाहेर जाण्याचा प्रयत्न करू लागला. बाहेर खानाची पालखी होती.

खानाचा ओरडा ऐकून सय्यद बंडा चपळाईने शामियान्यात शिरला. समोरचे दृश्य पाहून तो थक्क झाला. खान झोकांड्या खात जातो आहे हे पाहून सय्यद बंडाला थोडी कल्पना आली. तो धावतच महाराजांवर घाव घालण्यासाठी पुढे सरसावला. त्याने आपला तलवारीचा हात महाराजांना मारण्यासाठी उंच केला. त्याच्या या हालचालीकडे जिवाचे पूर्ण लक्ष होते. जिवा सय्यद बंडापासून थोडा दूर होता, परंतु जिवाने चपळाईने सय्यद बंडाचा उगारलेला हात वरच्यावर छाटून टाकला. सय्यद बंडाचा हात आणि तलवार दूर फेकली गेली. दुसऱ्या घावात जिवाने सय्यद बंडाची गर्दन कापली. महाराजांना लहानशी जखम झाली होती. ते पूर्णपणे शुद्धीवर होते. त्यांनी जिवाचा पराक्रम पाहिला आणि म्हणाले, 'होता जिवा म्हणून वाचला शिवा.'

## शिवा काशीद

१० नोव्हेंबर १६५९ ला प्रतापगडावर महाराजांनी अफझलखानाची भेट घेतली. विजापूर दरबारात विडा उचलून महाराजांवर चालून आलेला अफझल मारला गेला. विजापूर दरबारला हा धक्का होता. या धक्क्यावर आणखी धक्के देण्यासाठी महाराज अफझल भेटीच्या दुसऱ्याच दिवशी कोल्हापूर पन्हाळ्याकडे निघाले. वाटेत मुलूख आणि गड-किल्ले घेत घेत महाराजांनी कोल्हापूर घेतले आणि २८ नोव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळा काबीज केला. आदिलशाही खडबडून जागी झाली. त्यांनी कर्नूलचा वाघ सिद्दी जौहर याला महाराजांवर नामजाद केले. सिद्दी त्याचे चाळीस हजार सैन्य घेऊन महाराष्ट्रात आला तर रयतेचे हाल होतील म्हणून महाराज स्वत: पन्हाळ्यावर गेले. सिद्दीने पन्हाळ्याला वेढा घातला. पन्हाळा हा आदिलशाही सीमेवरचा गड होता.

महाराजांना वाटले की सिद्दी पन्हाळ्यावर हल्ला करणार, पण सिद्दी उत्तम

लढवैय्या होता. तो चाळीस हजार फौजेचा अत्यंत कडक वेढा घालून पन्हाळ्याच्या पायथ्याशी थांबला. वेढा इतका कडक होता की मुंगीलाही वेढा तोडणे शक्य नव्हते. महाराजांना आशा होती की एकदा का पावसाळा सुरू झाला की वेढा सैल होईल. सिद्दी वेढा उठवेल. परंतु पावसाळ्यापूर्वी वेढ्याला छप्पर बांधण्याचे काम सिद्दीने करून घेतले. नेतोजी पालकर यांनी बाहेरून वेढ्यावर हल्ले करण्याचे प्रयत्न केले. परंतु त्यांचा पराभव झाला. सिद्दीने इंग्रजांकडून लांब पल्ल्याच्या तोफा आणि कारागीर आणले. हे सारे महाराज गडावरून पाहात होते. महाराज सिद्दीच्या वेढ्यात पुरते अडकले होते.

शिवाजी महाराजांच्या जिवाची घालमेल वाढत होती. तिकडे पुण्यात शाहिस्तेखान सव्वा लाख फौज घेऊन तळ ठोकून बसला होता. चाकणच्या संग्रामदुर्गावर फिरंगोजी एक हजार मावळ्यांना घेऊन लढत होते. चाकणची मातीची गढी खानाच्या अवाढव्य फौजेत जिंकता येत नव्हती. महाराजांचे लक्ष तेथे लागले होते. राजगडावर जिजाऊसाहेब चिंतेत होत्या.

सुटकेचा काहीच मार्ग दिसत नव्हता. एक दिवस बहिर्जी नाईक गडावर आले त्यांना पाहून महाराजांना आनंद झाला. बहिर्जींना कसे आलात असे विचारताच ते म्हणाले, 'वेढ्याला पूर्ण प्रदक्षिणा घातली. वेढा अत्यंत कडक आहे. फक्त दोन ठिकाणी मेटी पातळ आहेत. दोन मेटीत दीडशे पावलांचे अंतर आहे.' बहिर्जींच्या बातमीवर बाजीप्रभू देशपांडे म्हणाले, 'महाराज सिद्दीला गाफील करून आपण मेटीतून सुटून जावू शकतो. पुढे पाठलाग झाल्यास आपणास विशाळगडावर सुखरूप पोहोचविण्याची जबाबदारी आमची बांदलांची.'

राजांनाही ही कल्पना आवडली. दुसरा मार्गही नव्हता. महाराजांनी सिद्दीला गाफील करण्यासाठी आपला वकील सिद्दीकडे पाठवला. महाराज शरण येतात म्हटल्यावर सिद्दी खूश झाला. आषाढी पौर्णिमेच्या रात्री दोन पालख्या गडाखाली उतरणार होत्या. एका पालखीत प्रत्यक्ष महाराज आणि दुसऱ्या पालखीत महाराजांसारखी दिसणारी व्यक्ती. पण अशी कोण व्यक्ती आहे जी हुबेहूब महाराजांसारखी दिसेल? इतक्यात गडकरी म्हणाले, 'महाराज आहे एक व्यक्ती. आमचा न्हावी शिवा काशीद. पूर्ण गडावर जो तो म्हणतो की शिवा अगदी महाराजांसारखा दिसतो. तो गडाखाली नवेगावला राहतो.'

गडकऱ्यांनी माणूस पाठवून शिवाला गडावर बोलावून घेतले. महाराजांनी बोलावले आहे म्हटल्यावर शिवा घाबरला. घाईघाईने गडावर आला. शिवाला

पाहिल्यावर महाराजांनाही कळून चुकले की त्यांच्यात आणि शिवात बरेच साम्य आहे. शिवाजी आपले कपडे घातले तर तो हुबेहूब आपल्यासारखा दिसेल. पण आता प्रश्न होता शिवाला त्यासाठी कसे तयार करायचे? कारण शिवाने या बेतात सामील व्हायचे म्हणजे धोका होता. शिवा सापडला तर त्याचा मृत्यू अटळ होता.

महाराजांनी हळूहळू शिवाला आपण कसे पन्हाळ्यावर अडकून पडलोत आणि आपले यातून सुटणे स्वराज्यासाठी किती आवश्यक आहे ते समजावून सांगितले. शिवाला समजत नव्हते, महाराज हे आपल्याला का सांगत आहेत. त्याने महाराजांना विचारले, 'मग अडले कुठे महाराज?' त्यावर बाजीप्रभू म्हणाले, 'शिवा अरे दुसऱ्या पालखीत महाराजांसारखा दिसणारा कोणीतरी बसवावा लागेल ना.' तेव्हा कुठे शिवाच्या लक्षात सारा प्रकार आला. शिवा आनंदाने म्हणाला, 'महाराज मी बसतो की दुसऱ्या पालखीत. पकडला गेलो तर या न्हाव्याचे सोने होईल. माझा देह स्वराज्याच्या कामी येईल.'

ठरल्याप्रमाणे १२ जुलै १६६०, आषाढ पौर्णिमेच्या रात्री दोन पालख्या गड उतरल्या. तुफान पाऊस आणि वारा सुटला होता. पातळ मेटीतून सहाशे मावळे आणि दोन पालख्यांनी बाजी प्रभूंच्या मार्गदर्शनाखाली वेढा पार केला. त्यातील महाराजांची पालखी सहाशे मावळ्यांसह खेळण्याच्या दिशेला लागली तर दुसरी शिवाची पालखी चार पाच मावळ्यांनी विरुद्ध दिशेने नेली.

इतक्यात जौहरला बातमी लागली की शिवा गडावरून पळाला आहे. लगेच त्याने दोन हजारांची तुकडी महाराजांच्या मागावर पाठवली. पाऊस तुफान पडत होता. सगळीकडे चिखल दगडगोटे होते. महाराजांची पालखी विशालगडाकडे दौडत होती. शिवाची पालखी विरुद्ध दिशेने चालली होती. आणि मागून सिद्दीची फौज पाठलागावर. थोडा वेळ पाठलाग केल्यावर सिद्दीच्या फौजेला एक पालखी मशालीच्या उजेडाशिवाय जाताना दिसली. लगेचच पालखी ताब्यात घेतली गेली. शिवाजी सापडला याच्या आनंदात फौज पालखी घेऊन वेढ्यातील सिद्दी जौहरच्या तंबूजवळ आली. सिद्दीने शिवाला विचारले, 'क्यो शिवा, भागनेकी कोशीस कर रहे थे क्या?

शिवा म्हणाला, 'जमले तर पाहात होतो.'

इतक्यात जौहरच्या हेरांनी बातमी आणली की 'हा शिवाजी खरा शिवाजी नाही. खरा शिवाजी भाग गया है! हा शिवा न्हावी आहे याचे खरे नाव शिवा काशीद आहे.'

हे समजताच सिद्दी जौहरने आपली तलवार शिवाच्या छातीत घुसवली.

एका दिवसासाठी शिवाजी महाराज होऊन अजरामर झालेल्या शिवा काशीदची समाधी पन्हाळ गडाजवळ आजही त्या इतिहासाची साक्ष देत आहे.

## थोर मुत्सद्दी रघुनाथपंत हणमंते

रघुनाथपंत हणमंते हे शहाजीराजांच्या वेळेपासून त्यांच्या पदरी होते. रघुनाथपंत हे अनुभवी मुत्सद्दी होते. २३ जानेवारी १६६४ रोजी कर्नाटकात शहाजीराजांचा मृत्यू झाला. त्यानंतर कर्नाटकातील बंगळूरची जहागिरी एकोजी राजांकडे आली. एकोजीराजांचा स्वभाव लहरी. त्यांचे आणि रघुनाथपंतांचे पटले नाही. रघुनाथपंतांनी दिलेले सल्ले एकोजीराजांच्या पसंतीस येत नव्हते. त्यांनी रघुनाथपंतांचा अपमान केला. रघुनाथपंत एकोजीराजांना सोडून जाण्यास निघाले तर एकोजीराजे म्हणाले, 'इथे केलात तसा कारभार दुसरीकडे करू नका. खपवून घेतला जाणार नाही.'

या अपमानानंतर एकोजीराजांना सोडून रघुनाथपंत महाराष्ट्रात आले. पन्हाळ्यावर ते महाराजांना भेटले. महाराजांना रघुनाथपंतांची योग्यता माहीत होती. त्यांनी पंतांचे स्वागत केले. महाराजांनी रघुनाथपंतांचे सर्व घोडे सरकारजमा केले. त्यांचे चार हत्ती मात्र त्यांच्याजवळ ठेवले. रघुनाथपंतांना आश्चर्य वाटले. त्यांनी महाराजांना विचारताच महाराज म्हणाले, 'ज्याचे अश्व त्याची मेदिनी, हे मला आबासाहेबांनी सांगितले आहे. त्यामुळे घोडे सर्व सरकारी असतात. आमच्या राज्यात हा नियम आहे.' हणमंते राजांच्या बोलांनी भारावून गेले.

रघुनाथपंतांनी कर्नाटकाचे राजकारण आणले होते. तेव्हा कर्नाटक म्हणजे कर्नाटक, तामिळनाडू वगैरे दक्षिणेचा मुलूख होता. रघुनाथपंतांनी महाराजांस सांगितले की 'महाराज कर्नाटकात स्वारी करतील तर महाराजांना विपूल धन मिळेल. सुपीक प्रदेश ताब्यात येईल. तुंगभद्रेपासून कावेरीपर्यंत स्वराज्याचा विस्तार होईल. दक्षिणेकडील गडांच्या साखळ्या तयार करून भविष्यात अडीअडचणीला कर्नाटकात जिंजिपर्यंत जाता येईल. दक्षिणेतील पठाणांचे उच्चाटन होईल. कुतूबशाही कमकुवत झाली आहे. आज कुतूबशाही मादण्णापंत आणि आकण्णापंत या दोन मराठी भावांच्या हाती आहे. कुतूबशहा या दोन हिंदूंच्या सल्ल्याने वागत आहे. त्यामुळे कुतूबशाहीशी सलोखा व मैत्रीचे संबंध स्थापन होवू शकतात. आज ना उद्या औरंगजेब दक्षिण जिंकायला येईल तेव्हा दक्षिणेकडील सत्ताधीशांची एकजूट करून ठेवावी.'

महाराजांना रघुनाथरावांचे राजकारण भावले. त्यांनी त्याप्रमाणे कर्नाटक

स्वारीचा बेत आखला. महाराजांनी रघुनाथपंतांची योग्यता जाणली, कारण ते रत्नपारखी होते.

## हिरोजी इंदलकर

महाराजांनी चंद्रराव मोरेंची जावळी जिंकली. चंद्रराव मोरे पळून रायरीवर लपून बसला. महाराजांनी रायरीला वेढा घातला. शेवटी नाईलाजाने मोरे राजांना शरण आला. महाराजांनी चंद्ररावाचा सत्कार करून त्यास सन्मानाने वागवले आणि महाराज रायरीगड पाहण्यास गेले. महाराजांस गड खूप आवडला. त्यांना तो गड राजधानीसाठी योग्य वाटला. तेव्हा राजधानी राजगडावर होती. महाराजांनी हिरोजी इंदलकरांस रायगड बांधण्याची आज्ञा दिली.

हिरोजी इंदलकर हे महाराजांचे वास्तूविशारद होते. एकूण चार वास्तू विशारद महाराजांच्या पदरी होते. अर्जोजी यादव, गर्जोजी यादव, मस्के आणि हिरोजी.

हिरोजींनी आपले सर्व कौशल्य पणाला लावून गडाची बांधणी केली. तटबंदी, राजवाडा, नगारखाना, देवडीसदर, राजभवन, राजसभा, राण्यांचे महाल, अष्टप्रधानांची घरे, कार्यालये, टांकसाळ, धान्याची कोठारे (अंबारखाने) तलाव, दोन दीपस्तंभ, गजशाळा, अश्वशाळा, दारुचे कोठार, टकमक टोक अशा एकूण तीनशे इमारती हिरोजींनी बांधल्या किंवा दुरुस्त केल्या. गड चढण्यासाठी १४३५ पायऱ्या बांधून काढल्या. जे जे आवश्यक ते ते करून हिरोजींनी स्वराज्याची राजधानी सज्ज केली. महाराज गड पाहून हिरोजींवर बेहद खूश झाले.

जवळजवळ अठरा वर्षे रायगड बांधणीचे काम चालू होते. त्यासाठी लागलेले दगड गडावरच तलाव खणून ते दगड वापरण्यात आले. गडावर महाराजांच्या देवदर्शनासाठी मंदिर बांधण्यात आले. हे सर्व साडे तीनशे वर्षांपूर्वीच्या वास्तू विशारदाने बांधले हे लक्षात घ्या. हे बांधकाम चालू असता काही काळ पैसे कमी पडले. महाराज मोहिमेवर होते. हिरोजींनी स्वत:चे घरदार आणि शेती विकून कामात खंड पडू दिला नाही.

महाराज अगदी निरखून गड पाहत होते. त्यांनी हिरोजींना विचारले की, ‘हिरोजी तुमचा गड निरखून पाहतो आहे. चूक काढली तर चालेल ना?’ त्यावर हिरोजी म्हणाले ‘महाराज शोधूनही चूक सापडणार नाही.’ केवढा हा विश्वास. इतका विश्वास असणारी माणसे होती म्हणून स्वराज्य निर्माण झाले.

महाराज इंदलकरांवर खूश झाले. त्यांना काही बक्षिस द्यावे म्हणून महाराज म्हणाले, 'हिरोजी तुम्हास काही बक्षिस देणे आहे. बोला काय हवे?'

राजा बक्षिस द्यायला निघाल्यावर सामान्य माणसास काय मागू काय नको असे होते. पण हिरोजी असामान्य होते त्यांनी महाराजांस सांगितले, 'महाराज मला काही नको. फक्त माझे नाव जगदिश्वराच्या पायरीवर कोरण्याची अनुमती द्यावी म्हणजे आपण ज्या ज्या वेळी जगदिश्वराच्या दर्शनासाठी याल तेव्हा आपल्या पायाची धूळ माझ्या नावावर पडेल. एवढे मला द्या.'

आजही तुम्ही रायगडावर गेलात तर जगदिश्वर मंदिराच्या पायरीवर कोरलेले दिसेल, 'सेवेसी तत्पर हिरोजी इंदलकर.'

## दर्यासारंग दौलतखान

महाराजांचा मुक्काम हरिहरेश्वरला होता. महाराज रत्नपारखी होते परंतु त्यांना पारख होती ती नररत्नांची. महाराज जेथे जथे जात असत तेथे तेथे गोरगरीब रयतेशी संवाद साधीत. त्यांची सुखदु:खे जाणून घेत. हरिहरेश्वरलाही तेच घडले. तेथील रयतेने महाराजांना सांगितले की जंजिऱ्याचा सिद्दी आणि टोपीकर यांनी आमचे जगणे मुश्किल करून टाकले आहे.

महाराजांनी पहिले तेथील मूळचे लोक कोळी जमातीचे आहेत. शूर आहेत. पाण्याची त्यांना भीती वाटत नाही. यांचाच उपयोग केला तर आपले आरमार सज्ज होईल आणि मराठ्यांचे निशाण पश्चिम सागरावर फडकेल. त्यांनी आजूबाजूच्या कोळी समाजाच्या नेत्यांबद्दल चौकशी केली तेव्हा महाराजांना दोन अनमोल रत्ने सापडली. मायनाक भंडारी आणि दौलतखान.

महाराज या दोघांना म्हणाले होते की 'तुम्ही दोघे या दर्याचे राजे आहात. आम्हाला आरमार उभे करायचे आहे. त्यात तुमचे सहकार्य हवे आहे. होणार का स्वराज्याच्या कार्यात सामील? हा जिवावरचा खेळ आहे. तुम्ही बेडर आहात. आम्हाला तुमची गरज आहे.' आणि मायनाक भंडारी आणि दौलतखान स्वराज्यात आले.

दौलतखान हा मुसलमान होता. महाराजांनी मोगलांशी वैर साधताना दौलतखानास कसे पदरी ठेवले असेल? तर साडे तीनशे वर्षांपूर्वी धर्मनिरपेक्षता ही संकल्पना फक्त आणि फक्त शिवरायांनीच यशस्वीपणे राबवली. महाराजांनी मुस्लीम राजवटीविरुद्ध युद्ध केले तेव्हाही सैन्यात मुस्लीम अधिकारी आणि सैनिक होते. मुस्लिमांचेही महाराजांवर प्रेम होते. महाराजांनी आणि त्यांच्या

मावळ्यांनी परधर्मियांवर अत्याचार केले नाहीत. स्वराज्याच्या कार्यात सहभागी होण्यासाठी कोणत्याही धर्माचे, जातीपातीचे बंधन नव्हते. शिवरायांच्या पदरी घोडदळाचे प्रमुख सिद्दी हिलाल, नौसेनाप्रमुख दौलतखान, इब्राहिमखान शस्त्रप्रमुख, वकील काझी हैदर, घोडदळप्रमुख सिद्दी वाहवा, आरमारातील अधिकारी श्यामादखान, हसनखान मियानी, दाऊदखान आणि आग्र्याला महाराजांचे प्राण वाचविणारा मदारी मेहतर असे अनेक मुसलमान अधिकारी होते. दर्यासारंग दौलतखान याने इंग्रजांना अनेकदा पराभवाची चव दाखवली. तसेच दौलतखानाच्या मार्गदर्शनाखाली मराठ्यांनी कल्याण-भिवंडी येथे गलबते बांधणी सुरू केली. हर्णे बंदराजवळ सुवर्णदुर्ग आणि वाघोटन खाडीजवळ विजयदुर्ग हे किल्ले लढण्यासाठी सज्ज केले. मालवणपासून दीड कि.मी.वर कुरटे बेटावर सिंधुदुर्ग हा बलाढ्य किल्ला बांधला. या कामात दौलतखान आणि मायनाक भंडारी यांनी रात्रंदिवस गस्त घातली म्हणून हे बांधकाम शक्य झाले.

दौलतखानाच्या आरमारात लहान मोठी गलबते, गुरावे (डोलकाठीची गलबते), पाल (दुमजली युद्धनौका), संगमिरी अशी अनेक जहाजे होती. दौलतखानाने त्यांचा मोठ्या कौशल्याने उपयोग करून घेतला.

दौलतखानाच्या अधिपत्याखाली समुद्रावर मराठ्यांची गलबते सुसाट धावत होती. प्रत्येक गलबतावर मराठ्यांचे निशाण असे त्यामुळे मुंबईपासून चौल, नागोठणे, मुरुडपर्यंत समुद्रात सर्वत्र मराठ्यांचे भगवे निशाणच दिसत होते. महाराजांनी या नव्या आरमारांची चाचणी घेण्यासाठी कारवारमधील बसनूरवर छापा मारायचे ठरविले. स्वत: महाराजही समुद्रमार्गेच बसनूरला गेले. छत्रपती हे पहिले भारतीय राज्यकर्ते होते, की ज्यांनी स्वत: समुद्रमार्गे जावून हल्ला केला. रात्रीच्या वेळी बसनूर गाढ झोपेत असता महाराज दौलतखान आणि मायनाक भंडारी यांच्यासमवेत बसनूरला पोहोचले. महाराजांनी लुटीची आज्ञा देताना सांगितले की गोरगरिबांना त्रास होता कामा नये. जे स्वत:हून खंडणी भरतील त्यांना इजा करायची नाही. दोन दिवस बसनूरची लूट चालू होती. सोने, नाणी, कापड, जडजवाहीर, धान्य आणि मसाले अशी करोडो रुपयांची लूट मिळाल्याने स्वराज्य समृद्ध होत होते.

महाराजांच्या वाढत्या आरमारी प्रभावामुळे जंजिऱ्याचा सिद्दी बेचैन झाला होता. त्याने इंग्रजांकडून मदत मिळवून पद्मदुर्गावर हल्ला करण्यासाठी आपले आरमार श्रीवर्धन जवळील खाडीत आणले. दौलतखान यावेळी सुवर्णदुर्गजवळ

समुद्रात होता. त्याला सिद्दीची ही चाल समजताच तो तातडीने श्रीवर्धनच्या खाडीत उतरला. दौलतखानाने सिद्दीवर जोरदार हल्ला केला. आकस्मात झालेल्या या हल्ल्याने सिद्दीची दाणादाण उडाली. वाचली तेवढी फौज घेऊन त्याने माघार घेतली. हा दौलतखानचा पराक्रम महाराजांना भावला की महाराजांनी दौलतखानाला 'दर्यावर्दी' हा किताब देऊन श्रीवर्धनचा सुभा जहागिरी म्हणून दिला.

इंग्रज सिद्दीला लष्करी मदत करतात हे पाहून मायनाक भंडारीने महाराजांस खांदेरी बेटावर किल्ला बांधण्याची विनंती केली. १६७२ पासून महाराजांच्या मनात या खांदेरी बेटावर किल्ला बांधण्याचे होते. आता मायनाकने सांगितल्यावर महाराजांनी मायनाक भंडारीवरच किल्ला बांधण्याची जबाबदारी दिली. तसेच दौलतखानाला खांदेरीचे रक्षण करण्याची आज्ञा केली. परंतु खांदेरी बेट मुंबईजवळ असल्याने इंग्रजांनी किल्ला बांधण्यात अडचणी निर्माण केल्या. इंग्रज अधूनमधून खांदेरीवर हल्ला करू लागले. यावेळी दौलतखानाने एक विलक्षण खेळी करण्याचे ठरविले. त्याने मोरोपंत पेशव्यांकडून इंग्रजांवर जमिनीवरून हल्ले चढविले. इंग्रज वखारीवर मोरोपंतांचा हल्ला होताच इंग्रज वठणीवर आले. त्यांनी मराठ्यांपुढे पांढरे निशाण फडकविले. हा दिवस होता १८ सप्टेंबर १६७८. दर्यावर्दी दौलतखान आणि मायनाक भंडारींनी इंग्रजांचा खांदेरीवर केलेला पराभवाचा दिवस आता आरमार दिन म्हणून साजरा केला जातो.

## वीर येसाजी कंक

येसाजी कंक म्हणजे महाराजांची सावली. मावळ मधल्या नाचणी गावचा रहिवासी. महाराजांनी नेमका हा हिरा उचलला आणि स्वराज्याच्या मुकूटात जडविला. येसाजी तसा शरीराने बुटका पण बलदंड शारीरिक ताकद असलेला गडी. दहा हत्तींचे बळ येसाजीत होते. रायरेश्वराच्या साक्षीने महाराजांनी सवंगड्यासोबत स्वराज्याची शपथ घेतली तेव्हापासून येसाजी महाराजांच्या प्रत्येक मोहिमेत हजर होता.

रोहिडेश्वराचा किल्ला घेताना तानाजीसमवेत येसाजी होता. प्रचंडगड घेण्याची जबाबदारी येसाजीने स्वीकारली होती आणि यशस्वी करून दाखवली होती. प्रचंडगड म्हणजेच तोरणा. मुरुंबदेवाच्या डोंगरावर असलेला राजगड स्वराज्यात आणताना येसाजी होताच. जावळीच्या चंद्रराव मोरेचा पराभव करताना येसाजीचा पराक्रम महाराजांनी पाहिला. येसाजीला जावळीच्या घनदाट

जंगलातील वाटा माहीत होत्या. हिरडस मावळातील रोहिडा किल्ल्यावर कृष्णाजी बांदल मस्तवाल झाला होता. त्याचा बंदोबस्त करताना तानाजीच्या खांद्याला खांदा लावून येसाजी लढला होता. जुन्नरच्या लुटीच्या वेळी येसाजी होताच शिवाय महाराजांच्या अफझलखानाच्या भेटीप्रसंगी तो कोयनाकाठी असलेल्या आदिलशाही फौजेचा धुव्वा उडवित होता. येसाजीचा पराक्रम पाहून महाराजांनी त्याला 'दसहजारी' दिली.

रघुनाथपंत हणुमंते यांच्या राजकारणाप्रमाणे कर्नाटक स्वारी दरम्यान महाराजांनी भागानगरला कुतूबशहाची भेट घेतली. कुतूबशहाचे वजीर मादण्णा आणि आकण्णा यांनी महाराजांचे जंगी स्वागत केले. महाराज गोवळकोंड्याच्या तानाशाह याच्या निवासस्थानी दादमहालात वास्तव्यास होते. दोन्ही राज्यकर्त्यांत मनमोकळ्या गप्पा होत होत्या. त्या प्रसंगी तानाशाहने महाराजांस विचारले, 'तुमच्याकडे किती हत्ती आहेत? हत्ती हे राज्याचे वैभव असते.' त्यावर महाराज मिश्किल हसून म्हणाले की 'माझ्याकडे पन्नास हजार हत्ती आहेत.' तानाशहाला महाराजांचे हे उत्तर पटले नाही. त्यानं विचारलं, 'हे कसं शक्य आहे? राजे आमचा यावर विश्वास बसत नाही.' त्यावर महाराज म्हणाले, 'माझ्याकडे पन्नास हजारांची फौज आहे आणि माझा प्रत्येक सैनिक हा एकेक हत्तीच्या तोडीचा आहे. आपला विश्वास बसत नसेल तर मी आपणांस दाखवतो. तुमची इच्छा असेल तर तुमच्या एखाद्या हत्तीशी आमच्या सैनिकाची झुंज लावा.'

आणि तो दिवस ठरला, ज्या दिवशी ही झुंज होणार होती. भागानगरच्या पटांगणात नागरिकांची गर्दी झाली होती. मैदानात मदांध हत्ती साखळदंडांनी बांधून आणण्यात आला. येसाजी उठला. त्याने महाराजांना पायाला स्पर्श करून नमस्कार केला. आणि येसाजी मैदानात उतरला. मैदानात दोघेच होते येसाजी आणि हत्ती. सर्वांनी श्वास रोखले होते. थोडा वेळ हत्तीशी येसाजीची झटापट झाली आणि एका क्षणी येसाजीने हत्तीच्या सोंडेवरच वार केला. हत्तीचे ते महाधूड जमिनीवर झुकू लागले. हत्ती डोळे फिरवू लागला. हत्ती गरगर फिरू लागला. आणि एक क्षणी तो हत्ती जमिनीवर निपचिप पडला. सर्वांनी येसाजीचा जयजयकार केला. तानाशहाने आपल्या गळ्यातला मौल्यवान हार येसाजीला देवू केला, पण येसाजीने तो नम्रपणे नाकारला, आणि म्हणाला, 'माझ्या महाराजांनी दिलेला हार माझ्या गळ्यात आहे. या कड्यांचे मोल दुसऱ्या कोणत्याच कंठ्याला येणार नाही.'

# महाराज आणि परकीय सत्ता

प्राचीन काळापासून पाश्चिमात्य राष्ट्रांचा पूर्वेकडील आशियाई देशांशी व्यापार चालू होता. अर्थात तेव्हा युरोप-आशिया जलमार्गाचा शोध लागला नव्हता. हा सर्व व्यापार काळ्या समुद्रातून कॉन्टिटिनोपलमार्गे चालत असे. कॉन्टिटिनोपल हे त्याकाळी व्यापाराचे मोठे ठिकाण होते. हे ठिकाण आपल्या ताब्यात रहावे म्हणून पाश्चिमात्य राष्ट्रांची सतत धडपड चालू असे. परंतु तुर्कांनी हे महत्त्वाचे ठिकाण १४५३ मध्ये जिंकल्यामुळे युरोपिय राष्ट्रांची मोठी निराशा झाली. हिंदुस्थानातून युरोपियन राष्ट्रांना मसाल्याच्या पदार्थांचा पुरवठा होत असे. तो बंद झाला. त्यामुळे पाश्चिमात्य देशांची पंचाईत होऊ लागली. त्यांना जलमार्ग शोधण्याची निकड निर्माण झाली. जलमार्ग शोधण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले. पोर्तुगिज खलाशी जलमार्ग वापरण्यात तरबेज आणि धाडसी होते. या प्रयत्नातून १४९२ मध्ये कोलंबस या खलाशाने अमेरिका शोधून काढली. कोलंबस शोधायला निघाला होता हिंदूस्थान, आणि त्याला सापडली अमेरिका. त्यानंतर दुसरा प्रयत्न १४९८ मध्ये यशस्वी झाला. वास्को-द-गामा हा पोर्तुगिज खलाशी जलमार्गाने हिंदुस्थानच्या कालिकत बंदरात उतरला.

वास्को-द-गामाने कालिकतच्या झामोरिन राजाशी मैत्रीचे संबंध स्थापन केले. झामोरिनला अनेक भेटी दिल्या आणि त्याच्याकडून कालिकतमध्ये वखार टाकून व्यापार करण्याची परवानगी मिळवली. पाश्चिमात्य राष्ट्रातील पोर्तुगिजांशी सोने, हिरे, रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, हस्तीदंत, नीळ अशा पदार्थांचा व्यापार सुरू झाला. त्यानंतर २० मार्च १६०२ रोजी डच इस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. त्यांनी मलबारच्या किनाऱ्यावर वखारी टाकल्या. पोर्तुगिज आणि डचांचा व्यापार चांगला चालतो आहे, हे पाहून ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने १६१४ मध्ये सुरतेस पहिली वखार टाकली. त्यानंतर १६६८ मध्ये फ्रेंचांनी सुरतेत वखार टाकली. अशा रितीने पोर्तुगिज, डच, इंग्रज आणि फ्रेंच या चार युरोपियन

राष्ट्रांनी भारतात व्यापारी कंपन्या स्थापन केल्या. सुरुवातीला केवळ व्यापारी उद्देशाने झालेल्या कंपन्या पुढे भारतात राजकारण करू लागल्या. एतद्देशियांच्या भांडणात भाग घेऊन स्वतःचा स्वार्थ साधू लागल्या. शिवाजी महाराज स्वराज्याचा उद्योग करीत असता त्यांचा संबंध प्रथम गोव्याच्या पोर्तुगिजांशी, त्यानंतर डच, इंग्रज आणि फ्रेंचांशी आला.

## पोर्तुगिजांशी संबंध

पोर्तुगिजांची पहिली वखार कालिकत बंदरात निघाली असली तरी पुढे पोर्तुगिज सरकत सरकत कोचीन, गोवा, चौल, मुंबई, साष्टी, दमण आणि वसई अशा ठिकाणी व्यापारी केंद्रे आणि वसाहती स्थापन केल्या. १५४३ मध्ये पोर्तुगिजांनी गोव्यावर ताबा मिळविला. आणि अरबी समुद्रावर मालकी हक्क सांगू लागले.

स्वराज्याची हद्द कोकण किनाऱ्याला भिडल्यावर महाराजांना आपले आरमार असावे असे वाटू लागले. स्वराज्याच्या संरक्षणासाठी सागरावर सत्ता असावी असे महाराजांनी ठरविले आणि कल्याण, भिवंडी व पनवेल हा मुलूख ताब्यात आणला.

कल्याणला महाराजांनी खाडीत बोटी बांधण्याचा कारखाना काढला. तसा मराठे पोर्तुगिज संबंध १६४८ पासून येत होते. १६५७ च्या सुमारास महाराजांनी वरच्या चौलवर ताबा मिळवला. तेव्हा खालच्या चौलवर पोर्तुगिजांची सत्ता होती. मराठे आपले आरमार उभे करीत असता पोर्तुगिजांनी त्यात अनेक अडचणी निर्माण केल्या. तरीही मराठ्यांनी आरमार तयार केलेले पाहून पोर्तुगिजांनी मराठ्यांशी सलोख्याचे संबंध अस्थापित केले. महाराजांनी पोर्तुगिजांना त्रास देऊ नये, त्या बदल्यात पोर्तुगिज मराठ्यांना तोफा दारुगोळा वगैरे साहित्य पुरवतील असा तह केला. मडगावजवळ पोर्तुगिझांनी मराठ्यांची जहाजे पकडली होती ती सोडून दिली. मराठ्यांचे पकडलेले तारवे परत केले.

महाराजांनी १६६६ मध्ये फोंडा किल्ल्यास वेढा दिला होता. तेव्हा किल्ला जर शिवाजीच्या ताब्यात गेला तर मराठ्यांपासून आपल्याला त्रास होईल म्हणून पोर्तुगिजांनी गुपचूप विजापूरकरांना दारुगोळा पुरवला. तसेच देसाई लखम सावंत आणि केशव नाईक महाराजांच्या प्रदेशात गुंडगिरी करीत असताना, पोर्तुगिजांनी मराठ्यांशी तह करून गुंडगिरी करणाऱ्या देसायांना गोव्यातून हाकलले व त्याबद्दल महाराजांनी पोर्तुगिजांना दाभोळ येथे वखार टाकण्याची

परवानगी दिली. १६७९ मध्ये मराठे मुंबईजवळ खंदेरी-उंदेरी बेटांवर किल्ला बांधत होते. तेव्हा इंग्रजांनी मराठ्यांना खूप त्रास दिला. पण तेव्हा पोर्तुगिज तटस्थ राहिले. पण महाराजांनी रामनगर जिंकल्यावर पोर्तुगिजांनी महाराजांना खंडणी देण्याचे मान्य केले होते. पण अशी खंडणी त्यांनी कधीच मराठ्यांना दिली नाही. महाराजांनी बारदेशावर स्वारी केली तेव्हा जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्या चार पाद्र्यांना पकडले होते. मराठ्यांनी त्यांची कत्तल केली. तेव्हा पोर्तुगिज व्हाईसरायने मराठ्यांची दहशत घेतली होती. महाराजांनी गोव्यात जाळपोळ चालू करताच पोर्तुगिजांनी दीड कोटी पॅगोडा देऊन महाराजांशी तह केला.

अशा रितीने पोर्तुगिज महाराजांनी संबंध ठेवताना कधी सलोख्याचे तर कधी संघर्षाचे संबंध ठेवल्याचे दिसते.

## हॉलंडचे डच

२० मार्च १६०२ ला डचांची इस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. हे डच म्हणजे हॉलंड (नेदरलंड) चे रहिवासी. हे पोर्तुगिजांपाठोपाठ भारतात आले होते. त्यांनी १६४९ मध्ये वेंगुर्ला येथे पहिली वखार टाकली. महाराजांनी १६६३ मध्ये कुडाळवर स्वारी केली तेव्हा डचांच्या व्यापारावर विपरित परिणाम झाला. शिवाजी आपल्याला लुटणार अशा भीतीने त्यांची पळापळ झाली. पण डचांनी महाराजांना नजराणा पाठवून स्वतःचे संरक्षण केले.

गोव्याच्या पोर्तुगिजांना डच इतक्या जवळ नको होते. त्यांनी शिवरायांना पंधरा हजार पॅगोडा देऊन त्या बदल्यात डचांना वेंगुर्ल्यातून हाकलून देण्यास सांगितले असल्याची नोंद सापडते. परंतु महाराजांनी दूरदृष्टी ठेवून डचांना राहू दिले. महाराजांना डचांकडून काही लाभ उठवायचे होते. डचही महाराजांविरुद्ध वागायला तयार नसत. १६६४ मध्ये महाराजांनी सुरतेवर स्वारी केली होती तेव्हा सुरतेचा किल्लेदार इनायतखान यांने महाराजांचे आरमार उद्ध्वस्त करण्यासाठी डचांची मदत मागितली होती. पण डचांनी शिवाजीविरुद्ध मदत जाण्यास नकार दिला. १६७० च्या दुसऱ्या सुरत लुटीच्या वेळी महाराजांनी डचांना अभय दिले होते.

महाराजांच्या कर्नाटक स्वारीच्या वेळी कोरोमंडल किनाऱ्यावर डचांच्या वखारी होत्या. त्यांचे शिवाजीने रक्षण करावे, यासाठी डच अधिकारी नजराणा घेऊन महाराजांना भेटला होता. महाराजांनी त्यांचा नजराणा घेऊन त्यांना

वखारीचे परवाने दिले. फ्रेंचांची पाँडेचरी येथील वखार बंद करावी यासाठी डच आग्रही होते. पण महाराजांनी त्यांची ही गोष्ट मान्य केली नव्हती. फ्रेंच आणि डच यांचे वैर होते ते महाराजांना ठाऊक होते. महाराजांना त्याचाच फायदा घ्यायचा होता.

## इंग्रज

पोर्तुगिज, डच, इंग्रज आणि फ्रेंच अर्श चार युरोपियन देशातून व्यापारी भारतात आले असले तरी सर्वात जास्त स्वार्थी आणि महत्त्वाकांक्षी इंग्रज असल्याने त्यांचे राजकारण भारताला घातक ठरले. त्यांची वसाहत यशस्वी होऊन भारताला दीडशे वर्षे पारतंत्र्यात खितपत पडावे लागले. डचांबरोबर आलेल्या इंग्रजांनी राजापूर येथे आपली पहिली वखार सुरू केली ही गोष्ट १६४९ सालाची आहे.

पुढील दहा वर्षे इंग्रजांचा व्यापार चालू होता, परंतु १६६० च्या सुरुवातीला इंग्रजांनी महत्त्वाकांक्षा आणि स्वार्थ उफाळून आल्याने स्थानिक राजकारणात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. अफझलखान वधानंतर महाराजांनी दादोजींमार्फत दाभोळ बंदरावर ताबा मिळवला होता. तेथील आदिलशाही हवालदार महमूद शरीफ हा पळून जाऊन तीन जहाजे भरून मालमत्ता घेऊन राजापूर बंदरात इंग्रजांच्या आश्रयाला गेला. मराठ्यांनी इंग्रजांकडे या जहाजातील प्रवाश्यासह जहाजे ताब्यात देण्याची मागणी केली. मराठ्यांनी जैतापूरचा इंग्रज दलाल वालजी यास कैद केले. वालजीच्या सुटकेसाठी फिलिप्स गिफर्ड हा इंग्रज रदबदली करू लागताच मराठ्यांनी दोघांनाही कैद केले. त्यांना घेऊन विशाळगडाकडे जात असता रेव्हिंग्टन या इंग्रज अधिकाऱ्याने मराठा तुकडीवर हल्ला करून गिफर्डची सुटका केली. ही रिव्हिंग्टनची पहिली चूक होती.

रिव्हिंग्टनची दुसरी चूक म्हणजे महाराज पन्हाळ्यावर सिद्दी जोहरच्या वेढ्यात सापडले असता, आता शिवाजी वाचत नाही असा विचार करून रेव्हिंग्टन याने सिद्दीला लांब पल्ल्याच्या तोफा आणि दारुगोळा पुरविला. तसेच तोफांचा मारा करणारे कारागीर पुरवले. इंग्रजांनी निशाण लावून पन्हाळ्यावर हल्ला केला. महाराजांनी गडावरून हे पाहिले होते. त्यामुळे १६६१ च्या मार्चमध्ये राजापूरच्या स्वारीत महाराजांनी राजापूरची इंग्रजी वखार साफ लुटून नेली.त्याचवेळी हेन्री रेव्हिंग्टन, गिफर्ड, रिचर्ड टेलर आणि रॅडॉल्फ टेलर या चौघांना कैद केले.

महाराजांनी या चौघांना दोन वर्षेपर्यंत कैदेत ठेवल्यानंतर १७ जाने. १६६३ रोजी सोडून दिले. राजापूरच्या स्वारीच्या वेळी झालेल्या नुकसान भरपाईसाठी इंग्रजांतर्फे कित्येक वर्षे पाठपुरावा करण्यात आला. बोलणी चालू होती. महाराजांनी इंग्रजांना अट घातली होती की त्यांनी मराठ्यांना दंडाराजपुरी जिंकण्यासाठी मदत करावी. दारुगोळा पुरवावा. पण इंग्रज सिद्दीविरुद्ध मदत करण्यास तयार नव्हते.

पुढे १६७३ मध्ये इंग्रजांची हुबळीची वखार मराठ्यांनी लुटली होती. इंग्रजांनी लुटीची नुकसान भरपाई मागताच मराठ्यांनी हात वर केले. आम्ही ही लूट केलीच नसल्याचे इंग्रजांना सांगितले.

पुढे ६ जून १६७४ ला रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पार पडला, त्यावेळी इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडन हा गडावर हजर होता. त्याने शिवाजी महाराजांस नजराणा दिला. महाराजांनीही त्यास सिंहासनाजवळ बोलावून त्याचा सत्कार केला. राज्याभिषेकानंतर १२ जून १६७४ रोजी इंग्रज व महाराज यांच्यात तह झाला. या तहातील अटीप्रमाणे राजापूरच्या लुटीबाबत नुकसान भरपाई म्हणून मराठ्यांनी दहा हजार होन हप्त्याने देण्याचे ठरले. इंग्रजांनी स्वराज्यात पाहिजे त्या ठिकाणी व्यापार करावा. इंग्रजी मालावर अडीच टक्के जकात मराठ्यांनी घ्यावी. अशा इंग्रजांच्या फायद्याच्या अटी महाराजांनी मान्य केल्या. पण इंग्रजी नाणी मराठ्यांच्या राज्यात चालावी ही अट महाराजांनी साफ धुडकावून लावली. त्यातला धोका महाराजांनी बरोबर जाणला होता.

महाराजांनी इंग्रजांकडे पन्नास तोफा, दारुगोळा व बंदुकी इत्यादी साहित्य विकत मागितले असता, मोगल बादशहा औरंगजेबाचा रोष होईल या भीतीने इंग्रजांनी मदत केली नाही. औरंगजेबाच्या भीतीने इंग्रज सिद्दीला मुंबई बंदरात आश्रय देत होते. त्यामुळे जंजिऱ्याचा सिद्दी मराठ्यांच्या खोड्या काढून मुंबईच्या आश्रयास येत असे. या दोघांवर दाब राहावा म्हणून महाराजांनी मुंबईजवळ खंदेरी बेटावर किल्ला बांधण्यास घेतला. इंग्रजांना मराठे इतक्या जवळ नको होते. त्यांनी खंदेरीवर हल्ला केला. त्यात इंग्रजांचा पराभव झाला. महाराजांच्या निधनापूर्वी काही दिवस आधी मार्च १६८० मध्ये इंग्रजांनी तह करून मान्य केले की यापुढे सिद्दीस आश्रय देणार नाही.

## फ्रेंच

भारतात आलेले चौथे युरोपियन म्हणजे फ्रान्सचे फ्रेंच. ते १६६८ मध्ये हिंदुस्थानात आले व त्यांनी राजापूर येथे आपली व्यापारी वखार सुरू केली.

त्यानंतर सुरतेला दुसरी वखार उघडली. सुरतेच्या वखारीचे दोन बारॉ आणि ब्लो असे अधिकारी होते. हे दोन्ही अधिकारी महाराजांशी सलोख्याचे संबंध ठेवून होते. पोर्तुगिज, डच आणि इंग्रज यांच्याशी महाराज सलोख्याचे संबंध ठेवीत होते, कारण महाराजांना त्यांच्याकडून तोफा, दारुगोळ मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु या तिघांनी काही कारणे सांगूनपण मराठ्यांना मदत करण्याचे टाळले होते. फक्त फ्रेंचांनी मराठ्यांना मदत केली

१६७० साली दुसऱ्या सुरत स्वारीच्या वेळेस फ्रेंचांची वखार सुरतेत होती. त्याठिकाणी बारॉ हा अधिकारी होता. महाराजांनी त्याला सुरतेच्या स्वारीची कल्पना देऊन संरक्षण दिले होते. बारॉनेही महाराजांना नजराणा पाठवून दिला होता. याच बारॉने सुरतेतील काशगरच्या राजाच्या राजवाड्यात जाण्याचा मार्ग मराठ्यांना दिला. त्यामुळे मराठ्यांना काशगरच्या राजवाड्यात भरपूर लूट मिळाली.

कर्नाटक स्वारीच्या वेळी १६७७ मध्ये महाराजांना फ्रेंच अधिकारी मारतॅ येऊन भेटला व त्याने पाँडेचरी येथे वखार उघडण्याची परवानगी आणि संरक्षण मागितले. महाराजांचे आणि सुरतेच्या बारॉ याचे संबंध चांगले असल्याने महाराजांनी त्या मैत्रीला स्मरून ही परवानगी दिली होती. फ्रेंच-मराठे संबंध नेहमीच चांगले राहिले होते. अर्थात पाँडेचरीच्या फ्रेंचांशी महाराजांचा पुढे फारसा संबंध राहिला नाही.

अशा तऱ्हेने पोर्तुगिज, डच, इंग्रज आणि फ्रेंच या चार परकियांचा उगम शिवकाळात झाला असल्याने त्यांच्याशी मराठ्यांचे बरेवाईट संबंध प्रस्थापित होणे अपेक्षित होते. तसे न झाल्याने अनेकदा त्यांचे मराठ्यांशी पत्रव्यवहारही झाले. त्यातून शिवकालातील बऱ्याच इतिहासाची उकल होते. आजही मराठ्यांच्या इतिहासासाठी आपल्याला पोर्तुगिज पत्रव्यवहार उपयोगी पडतो.

# शिवरायांचा राज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७४ पूर्वी बराच राज्यविस्तार केला होता. पुरंदरच्या तहात गमावलेला मुलूख आणि तेवीस गड १६७० पासून परत घेतले होते. स्वराज्याच्या सीमा कोकणापर्यंत भिडल्या होत्या. पश्चिम सागरावर आरमार सज्ज होते. एक लाख पायदळ आणि पन्नास हजार घोडदळ स्वराज्यात तयार होते. इतका मुलूख आणि सामर्थ्य असूनसुद्धा मोगलाई आणि आदिलशाहीच्या नजरेत शिवाजी हा जमिनदाराचा मुलगाच होता. त्यामुळे महाराष्ट्रातील अन्य राजे संस्थानिक महाराजांना योग्य किंमत देत नव्हते. महाराजांशी बरोबरीच्या नात्याने वागत होते म्हणून महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला असे म्हणणे योग्य नाही. त्याचप्रमाणे फेब्रुवारी १६७४ मध्ये काशीचे प्रकांड पंडित गागाभट्ट हे महाराजांची किर्ती ऐकून महाराष्ट्रात आले. त्यांनी सांगितल्यावरून महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला हेही तितकेसे खरे नाही.

मराठ्यांचे तख्त निर्माण करण्याची कल्पना महाराजांच्या मनात १६५६ मध्ये जावळीच्या चंद्रराव मोरे याजकडून रायरीगड घेतला तेव्हापासून असावी. कारण, असा चरपोट गड तख्तासाठी योग्य आहे हे त्यांनी बोलून दाखवलेही होते. तसेच पुढे रायगडाची बांधणी केल्यावर शहाजीराजांनीही तशी इच्छा व्यक्त केली होती. महराजांनी राज्याभिषेकाचे स्वप्न आधीपासून पाहिले असावे. रायगडाची बांधणी करताना हाच विचार महाराजांच्या डोक्यात असावा. महाराजांना हिंदूचे तख्त निर्माण करायचे होते. हिंदूंचा छत्रपती उभा करायचा होता. ज्यामुळे हिंदूंकडे नजर वाकडी करून पाहण्याची कोणाची हिंमत होऊ नये हा विचार करूनच महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला.

कै. गो. स. सरदेसाई रियासतीत लिहितात, 'मराठ्यात अत:पर स्वतंत्र तख्तशीन राजे झाले, एवढेच जाहीर करण्यासाठी हा समारंभ शिवाजीने घडवून

आणला असे नाही. तर उत्तरेतील मोगल, व दख्खनमधील आदिलशाही, कुतूबशाही वगैरे पातशहांच्या तोडीचे आपण झालो हेही त्याला उघडपणे जाहीर करावयाचे होते. हिंदूंचा धार्मिक छळ यापुढे मुसलमानांना करता यावयाचा नाही, त्यांचा त्राता, रक्षक असा एक छत्रपती आहे असे आश्वासन भयग्रस्त हिंदूंना द्यावयाचे होते, आणि त्यांना धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे ही गोष्ट या समारंभाने सिद्ध करावयाची होती.'

त्यामुळे कोणी एका गागाभट्टाने सांगितल्यावरून करून घ्यायला राज्याभिषेक म्हणजे सत्यनारायणाची पूजा नव्हती. महाराजांचा हेतू स्वच्छ होता. अर्थात राज्याभिषेक प्रसंगात गागाभट्टांचे महत्त्व यामुळे कमी होत नाही. त्यांनी महाराजांना योग्य सल्ला दिला. राज्याभिषेकातील अडचणी दूर केल्या आणि प्रसंगी ब्राह्मवृंदांचा विरोध डावलून राज्याभिषेकाचे पौरोहित्य केले. त्यामागे गागाभट्टांची कळकळ दिसते. स्थानिक ब्राह्मणांचा विरोध कमी करण्यासाठी गागाभट्टांसारख्या साक्षात वेदमूर्ती असलेले अध्वर्यूच आवश्यक होते.

गागाभट्ट हे काशीचे विद्वत की पैठणचे? गागाभट्ट आपणहून रायगडावर आले की शिवाजीने माणसे पाठवून त्यांना काशीहून बोलावून घेतले? राजांचा राज्याभिषेक करावा ही संकल्पना मुळची महाराजांची की गागाभट्टाने त्यांच्या मनात भरविली? अशा अनेक बाबतीत बखरी बखरीतही मतभेद आहेत. याबाबत कै. कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे की,

'हा राज्याभिषेक विधी सशास्त्र करावयाचा असल्यास कोणकोणत्या गोष्टींची अनुकूलता व सिद्धता पाहिजे या संबंधाने शिष्टजनांचे मत घेता, महाराजांस असे समजले की, व्रतबंध ज्याचा झाला आहे, त्यालाच राज्याभिषेक विधी शास्त्रानुसार करता येतो. महाराजांचा व्रतबंध झाला नसल्यामुळे त्यांची पंडित जनमते शूद्रात गणना होत असे. म्हणून हा हेतू सिद्धीस जाणे कठीण आहे, असे महाराष्ट्रातील पंडित म्हणू लागले. महाराज यावेळी सेहचाळीस वर्षांचे (महाराजांचा जन्म १६२७ धरून) असून त्यांचे अनेक विवाह झाले आहेत. त्यांना संततीही झाली होती. अशा वयातील पुरुषाचा व्रतबंध शास्त्रोक्त प्रकारे होणे शक्य नाही असा पंडितांचा अभिप्राय पडला. अशा प्रसंगी महाराजांच्या पदरी असलेल्या एका अत्यंत हुशार प्रामाणिक स्वामीनिष्ठ सेवकाने त्यास ह्या पेचातून सुटण्याची मसलत दिली. हा सेवक कोण म्हणाल तर बाळाजी आवजी चिटणीस हा होय.' पुढे केळुसकर म्हणतात,

'मग त्या पंडितास बोलावून आणण्याची कामगिरी बाळाजी आवजीस सांगून

केशव पंडित, भालचंद्रभट्ट पुरोहित व सोमनाथ कात्रे यास बरोबर दिले. गागाभट्टास व पैठणच्या महापंडितास आणण्यासाठी त्यांच्याबरोबर पालख्या, मेणे वगैरे इतमाम व दहा हजार रुपये खर्चासाठी म्हणून दिले.'

बाळाजी आवजी पैठणास जावून भट्टास भेटला व त्यास महाराजांचा हेतू कळवून इतर पंडितांची सभा त्याने भरविली आणि तीपुढे हा प्रश्न विचारला. ह्या सभेत पंडितांचा काही काळ वादविवाद होऊन शेवटी सर्वांची अशी एक वाक्यता झाली की जयपूर, उदेपूर वगैरे ठिकाणी रजपूत राजांस जसा राज्याभिषेक होतो तद्वत तो शिवाजी महाराजांसाठी होण्यास काही प्रत्यवाद नसावा. ह्याप्रमाणे पंडितांची अनुकूलता झाल्यावर त्यांस बाळाजी आवजीने रायगडावर आणले. एकूण असा सर्व प्रकार घडला तरी सभासद व चित्रगुप्त असे म्हणतात की गागाभट्टास कोणी बोलवावयास गेले नव्हते. तर तो आपणहून महाराजांची किर्ती ऐकून त्यांच्या भेटीस आला.

गागाभट्टाचे खरे नाव विश्वेश्वर भट्ट असे असून ते मूळचे पैठणचे रहिवासी होते. काही काळ अध्ययनासाठी ते काशीस गेले होते. महाराज गागाभट्टांना १६६३ पासून ओळखत होते. कायस्थांच्या वादात गागाभट्टांनी मध्यस्थी केली होती. गागाभट्ट रायगडावर आल्यावर महाराजांनी त्यांचा आदरसत्कार केला तेव्हा गागाभट्टांनी 'मराठा राजा छत्रपती व्हावा असे चित्तात आणिले,' म्हटल्याचे सभासद नोंद करतो.

तत्कालीन स्थानिक ब्राह्मवृंदांचा असा आक्षेप होता की भगवान परशुरामांनी २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली असल्याने आता पृथ्वीवर क्षत्रियच उरले नाहीत. आता फक्त ब्राह्मण आणि शूद्रच शिल्लक राहिले आहेत. यावर गागाभट्टांनी बाळाजी आवजी चिटणीस यांना राजस्थानात पाठवून शिवाजी हा ज्या भोसले कुळातील आहे, हे भोसले उदयपूरच्या शिसोदे या क्षत्रिय घराण्याची शाखा आहे हे सिद्ध करवून घेतले. याच शाखेतील भोसाजीवरून भोसले हे नाव पडले आहे.

त्यानंतर पूर्वी शेकडो वर्षांत दक्षिणप्रांती कोणाही राजाचा राज्याभिषेक झाला नसल्याने राज्याभिषेक विधी ज्ञात नव्हता. वेदमूर्ति गागाभट्टांनी या राज्याभिषेकासाठी श्री शिवराज्याभिषेक प्रयोग हा २३७ श्लोकांचा सटीक ग्रंथ तयार केला.

त्यानंतर शुभकाल पाहून सर्वानुमते राज्याभिषेक समारंभ करण्यासाठी ३० मे १६७४ ते १० जून १६७४ हा काळ निश्चित करण्यात आला. त्यात प्रत्यक्ष राज्याभिषेक आणि छत्रधारण हे दोन सोहळे शनिवार दि. ६ जून १६७४ ज्येष्ठ

शुद्ध त्रयोदशी शके १५९६ या दिवशी करण्याचे ठरले. अर्थात या बाबत कमालीची गुप्तता राखण्यात आली होती.

राज्याभिषेकापूर्वी महाराजांच्या एक पत्नी काशीबाई राणीसाहेब यांचे पाचाडच्या वाड्यात निधन झाले. त्यामुळे त्यांच्या दिवसांसाठी काही दिवस दुखवटा म्हणून काम थांबविण्यात आले होते. तसेच २४ फेब्रुवारी रोजी नेसरीच्या युद्धात सरनौबत प्रतापराव गुजर धारातीर्थी पडले. आकस्मात झालेला प्रतापरावांच्या जाण्याने भोसले कुटुंबावर दुःखाची छाया पसरली. त्यात प्रतापरावांच्या मृत्यूने चिपळूणच्या लष्करी छावणीत फौजेत चलबिचल झाल्याचे महाराजांना कळले. महाराज चिपळूणला जाऊन आले. अर्थात याही काळात रायगडावर राज्याभिषेकाची तयारी जोरात सुरू होतीच.

महाराज चिपळूणला असता त्यांनी परशुरामाचे दर्शन घेतले. तसेच १९ मे रोजी महाराजांनी प्रतापगडावर भवानी मातेची पूजा केली व दर्शन घेतले. तेथे महाराजांनी सव्वा मण सोन्याची छत्री देवीला अर्पण केल्याची नोंद आहे. देवदर्शन करून महाराज २१ मे रोजी रायगडावर परत आले.

महाराजांसाठी खास तयार केलेले बत्तीस मण सोन्याचे सिंहासन तयार झाले होते. सिंहासनाला पृथ्वीमोलाची रत्ने, नवरत्ने जडविण्यात आली होती. महानद्यांची पुण्योदके आणण्यात आली होती. त्यासाठी सुवर्ण कलश तयार करण्यात आले होते. गागाभट्टांनी सांगितल्यावरून सुलक्षणी अश्व, गज गडावर आणण्यात आली होती. व्याघ्रचर्मे, मृगचर्मे खास आणली होती. बरेच दिवस चालणाऱ्या या सोहळ्यासाठी महाराजांसाठी आणि राजकुटुंबासाठी वेळोवेळी परिधान करण्याची किनखामी जरीची रेशमी वस्त्रे वस्त्रागारात तयार होती. अठरा कारखाने, अष्टप्रधानांची निवासस्थाने, सरकारी फंडाच्या इमारती रंगवून शोभिवंत केल्या होत्या. सिंहासन ठेवण्याच्या जागी सोन्याने मढवलेले चार खांब उभारले होते. मिरवणुकीसाठी दोन हत्ती गडावर चढविण्यात आले होते. गडाची वाट अत्यंत निमुळती आणि बिकट असून हत्ती कसे चढवले असतील या कल्पनेने इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडेन आश्चर्यचकित झाला होता.

महाराजांचे आप्त स्वकीय, स्थानिक, प्रतिष्ठीत लोक, विद्वान ब्राह्मवृंद, मांडलिक राजे, शेजारील राज्यकर्ते, परकीय सत्ता, स्वराज्यातील मातब्बर लोक यांना राज्याभिषेकास हजर राहण्याची निमंत्रणे पाठविण्यात आली होती. निमंत्रितांपैकी जे लोक येतील त्यांची राहण्याची-भोजनाची व्यवस्था चोख ठेवण्यात आली होती. गडावर ठिकठिकाणी जेवणाची व विश्रामाची व्यवस्था म्हणून मांडव टाकण्यात आले होते. राज्याभिषेकासाठी आलेल्या ब्राह्मणांची

जेवणाची व्यवस्था स्वतंत्र करण्यात आली होती. गडावरच्या प्रमाणे गडाखाली व माचीवर जिकडेतिकडे मंडप, तंबू, राहुट्या  दिसत होत्या. कोणास काही कमी पडू नये म्हणून खास अधिकारी नेमण्यात आले होते.

वरीलप्रमाणे सर्व व्यवस्था चोख लावल्यावर ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस महाराजांचा व्रतबंध करण्यात आला. महाराज क्षत्रिय असून संस्कारांचा लोप झाल्याने व्रतबंध करणे योग्य व आवश्यक होते. या विधी प्रित्यर्थ पन्नास हजार ब्राह्मणांना मिष्टांन्नाचे भोजन देण्यात आले. तसेच महाराजांची तुला करण्यात येऊन विपूल दानधर्म करण्यात आला. हे सर्व विधी २९ मे रोजी उरकण्यात आले. महाराजांचे वजन १६० पौंड भरले असा उल्लेख आहे.

३० मे रोजी महाराजांचे हयात स्त्रियांबरोबर पुन्हा समंत्रक विवाह करण्यात आले. त्यादिवशी महाराणी सोयराबाई आणि इतर दोन राण्यांसमवेत विवाह करण्यात आला. तर पुढे ८ जूनला चवथ्या हयात बायकोशी विवाह करण्यात आला अशी नोंद आहे. महाराणी सोयराबाई पट्टराणी ठरल्या. १ जून, ३ जून, ४ जून आणि ५ जून असे चार दिवस 'श्रीशिवराज्याभिषेक प्रयोग' या ग्रंथाप्रमाणे निरनिराळे विधी करण्यात आले. यात २ जून हा दिवस कोणत्याही शुभ कार्यासाठी वर्ज्य असल्याने त्या दिवशी काहीच घडले नाही. पाच जूनला रात्रीपासून ६ जूनच्या पहाटेपर्यंत राज्याभिषेकाचा मुख्य विधी करण्यात आला. सर्व निमंत्रितांना सहा जूनच्या पहाटेपासून तयार राहण्यास सांगण्यात आले होते.

शेवटी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी हा मंगलदिन उगवला. ही त्रयोदशी ५ जूनला रात्रीपासून लागली असल्याने रात्रीच विधीस सुरुवात करण्यात आली. महाराजांनी प्रथम मंगलस्नान केले. नंतर अनुक्रमे मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान, गंगादिपुण्यतिर्थोदक स्नान, पंचामृत स्नान समंत्रक केले. देव्हाऱ्यातील देवदेवतांना, मातोश्री जिजाऊंना आणि समस्त ब्राह्मवृंदांना नमस्कार करून महाराज शुभ्रवेशात विधीसाठी तयार झाले. महाराजांनी आसन ग्रहण केल्यावर त्याच्या बाजूस महाराणी सोयराबाई आणि युवराज संभाजीराजे स्थानापन्न झाले.

महाराजांच्या आसनाच्या पूर्वेस स्वराज्याचे पेशवे मोरोपंत पिंगळे हातात तुपाने भरलेला सुवर्णकलश घेऊन उभे होते. दक्षिण दिशेला सरनौबत हंबीरराव मोहिते उभे होते. त्यांचे हाती दुधाने भरलेला रौप्यकलश होता. पश्चिमेस अमात्य रामचंद्र पंडित दह्याने भरलेला तांब्याचा कलश घेऊन उभे होते तर उत्तरेस पवित्र जलाने भरलेला मृत्तिका कुंभ घेऊन रघुनाथ पंडितराव उभे होते. आग्नेय, नैऋत्य, वायव्य आणि ईशान्य या उपदिशांना अन्य मंत्री उभे होते.

यानंतर पूर्णाहुती विधीस प्रारंभ झाला. महाराजांनी व महाराणींनी खास औंदुबर वृक्षाच्या लाकडापासून तयार केलेल्या आसनावर बसल्यावर होमहवन विधी करण्यात आला. सर्व उपस्थित ब्राह्मणांनी वेदयंत्राचा घोष केला. आचार्यांनी समंत्रक अभिसिंचन केले. त्यानंतर महाराज आणि महाराणी सिंहासनाजवळ जावून त्यावर आरोहण केले. पुत्रवती सुवासिनींनी उभयतांना ओवाळले. या प्रसंगी पेशवे, अमात्य, अष्टप्रधान यांनी नजराणे अर्पण केले. पेशव्यांचा मान अष्टप्रधानात सर्वाधिक असल्याने त्यांनी ८००० होन आहेर केला. त्यानंतर इतर अष्टप्रधानांनी ७०००, ५००० होन असे आहेर केले आणि राज्याभिषेकाचा धार्मिक विधी संपन्न झाला.

त्यानंतर सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला पहिला दरबार भरविला. उभयता सिंहासनावर बसून सर्व उपस्थितांस दर्शन दिले. याप्रसंगी इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडेन हजर होता. त्याने या भेटीचे विस्तृत वर्णन करून ठेवले आहे, ते त्याच्या शब्दात-

'राजा शिवाजी खास बनविलेल्या सिंहासनावर आरुढ झालेला होता. त्याच्याभोवती मौल्यवान पोषाख केलेले प्रधान उभे होते. युवराज व प्रधानमंत्री पेशवा सिंहासनाच्याच खाली पायरीवर बसले होते. मी मुजरा केला व दुभाषा नारायण शेणव्याने नजरेची अंगठी वर धरली. शिवाजीच्या ते लक्षात येताच त्याने आम्हाला सिंहासनाच्या पायरीजवळ बोलावले. आम्हाला पोशाख देऊन सत्कार करून रजा देण्यात आली. आम्हाला दिसले की सिंहासनाच्या दोन्ही बाजूस सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर राजचिन्हे होती. तसेच सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होती. राजवाड्याच्या दाराशी दोन हत्ती होते. गडाचा मार्ग विलक्षण बिकट असून हे हत्ती गडावर कसे आणले असतील तर्क करता येत नाही.'

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक प्रसंगी रघुनाथ पंडितांकडून राज्यव्यवहार कोश तयार करविला. फार्सी शब्दांचे उच्चाटन करून त्या जागी संस्कृत शब्द वापरण्यासाठी हा कोश होता. तसेच पंचांग सुधारणेसाठी 'करणकौस्तुभ' हा नवा 'करण ग्रंथ' तयार केला. याप्रसंगी महाराजांनी रायगडावर टांकसाळीत सुवर्ण होन आणि तांब्याची शिवराई ही नाणी पाडली. प्रत्येक राजपत्रावर राज्याभिषेकानंतर 'क्षत्रिय कुलावतंस श्री राजाशिवछत्रपती' असे लिहिले जाऊ लागले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राज्याभिषेक शक चालू करण्यात आला. महाराज शककर्ते झाले. या शकाचे नाव 'राजशक' असे ठेवण्यात आले. महाराजांची खालील मुद्राही पूर्वीपासूनच वापरात होती.

'प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।।'

हेन्री ऑक्झेंडेन हा राज्याभिषेकाला हजर असल्याने त्याने महाराजांचे वर्णन करून ठेवले आहे. 'महाराजांचा चेहरा सुंदर व पाणीदार डोळे व इतर मराठ्यांच्या मानाने गोरा वर्ण, तीक्ष्ण नजर, नाक लांब, बाकदार दाढी, टोकदार बारीक मिशा. त्यांच्या नजरेत निश्चय, कठोरपणा व जागरुकता, सावधता स्पष्ट दिसतात.'

महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला आणि हिंदूंची पातशाही निर्माण केली ही बातमी औरंगजेबास कळली तेव्हा त्यास अत्यंत दु:ख झाले. तो सारखा अल्लाला विचारू लागला की मी असे कोणते पाप केले की मला हा आजचा दिवस पहावा लागत आहे. औरंगजेब हा शिवाजी महाराजांना 'शिवा जहागिरदार' असे संबोधित असे. हाच हिंदू जमीनदार आता छत्रपती झाला याचे त्याला अतीव दु:ख झाले. आता तमाम हिंदू रयतेला आधार निर्माण झाला हे त्याचे दु:ख होते.

राजमाता जिजाबाईंनी आपल्या किलकिल्या डोळ्यांनी शिवबाचा राज्याभिषेक पाहिला. त्यांना शिवबाचे कौतुक वाटत होते. हाच सोहळा पाहण्यासाठी त्या शहाजीराजांच्या मृत्यूनंतर सती न जाता मागे राहिल्या होत्या. तो प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर दिसू लागला. सती जाण्यासाठी निघालेल्या जिजाबाईंना शिवबाने गळ्यात पडून विनविले होते की स्वराज्य निर्माण करतो ते पाहण्यासाठी तरी राहा. आणि जिजाबाई राहिल्या. 'आता राज्याभिषेक पाहिला. आता कशासाठी जगायचे. आता जायला हवे,' असे जिजाबाईंना वाटू लागले होते. त्या आजारी पडल्या. अंथरुणच धरले त्यांनी. राज्याभिषेकाचा शीण झाला असेल, असे प्रथम वाटले. पण हे दुखणे साधे नव्हते. पाचाडच्या वाड्यात दिवसेंदिवस त्यांची प्रकृती ढासळत गेली. १७ जून १६७४ रोजी जिजाबाईंनी देह ठेवला. अत्यंत तृप्त मनाने त्यांनी या जगाचा निरोप घेतला. महाराजांना आणि एकूण कुटुंबाला दु:ख होणे साहजिकच होते. त्या सर्वांचाच आधार होत्या. त्यांचा धाक होता, प्रेम होते.

इतका मोठा 'थोरला समारंभ' झाला. महाराजांनी आणि अष्टप्रधानांनी जातीने लक्ष देऊन नियंत्रितांचे मान सन्मान केले. हजारो ब्राह्मणांना लाखो रुपये दानाच्या स्वरूपात वाटण्यात आले. भरपूर बिदागीही देण्यात आली. परंतु तरीही या सोहळ्याला गालबोट लागलेच. निश्चलपुरी गोसावी नावाचा एक तंत्रविद्याप्रवीण रायगडावर राज्याभिषेक प्रसंगी नियंत्रित म्हणून हजर होता. शिवकाळात

श्रृंगारपूर संगमेश्वर भागात या तांत्रिक विद्येचा प्रसार झाला होता. वैदिक विद्येपुढे तांत्रिक विद्या ही निषिद्ध मानली जात होती. राज्याभिषेक काळात हा निश्चलपुरी काही किरकोळ कारणाने नाराज झाला होता. वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणांकडून त्या तांत्रिकाचा योग्य सन्मान झाला नाही, असे त्याचे मत पडले.

चिडलेल्या निश्चलपुरीने काही दाखले देऊन गागाभट्टांच्या चुका दाखवून दिल्या. त्यामुळे घडलेल्या अपशकुनी घटनांची मालिकाच त्याने सांगितली. राज्याभिषेकापूर्वी महाराजाची पत्नी काशीबाई यांचे निधन झाले. फेब्रुवारी अखेरीस सेनापती प्रतापराव धारातीर्थी पडले. समारंभापूर्वी उल्कापात घडला. सुवर्णतुला करताना एक लाकूड पडले. त्यामुळे गागाभट्टांच्या नाकाला इजा झाली. राज पुरोहितांच्या डोक्यावर छताचे कमळ पडले. शिवाजीने तांत्रिक शक्तींचे पूजन केले नाही. बळी दिला नाही. त्याचाच हा परिणाम असून बाराव्या दिवशी जिजाऊंचे निधन झाले. प्रतापगडावर पागा जळली. अशा घटना पुढे घडतच राहतील याची त्याने महाराजास जाणीव करून दिली.

महाराजांचा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता. परंतु कौटुंबिक दबाव आणि रयतेत चाललेली चर्चा या कारणाने नाईलाजाने महाराजांनी निश्चलपुरीच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एक दिवसाचा राज्याभिषेक करून घेतला. हा विधी पूर्णपणे तांत्रिक पद्धतीने करण्याचे मान्य केले. हा राज्याभिषेक अश्विन शुद्ध पंचमी (ललिता पंचमी) ता. २४ सप्टेंबर १६७४ रोजी करण्यात आला.

अशा रितीने दोन्ही राज्याभिषेक संपन्न झाले. एक लहानशा जहागिरीच्या जहागिरदाराचा मुलगा स्वकर्तृत्वावर अभिषिक्त छत्रपती झाला. त्यामुळे मोगल, आदिलशाही व इतर लहानमोठ्या मुस्लीम राज्यकर्त्यांच्या मनात धडकी भरल्याशिवाय राहिली नाही.

इथवर भोसले कुळाचे कौटुंबिक स्वास्थ्य चांगले होते. घरात महाराजांच्या इतक्या राण्या असल्या तरी कर्ती स्त्री म्हणून कर्तबगार जिजाऊसाहेब होत्या. स्वत: महाराजही राजकारणातील प्रत्येक गोष्ट माँसाहेबांना विचारून व त्यांच्या कानावर घालून करीत असत. सगळे कौटुंबिक निर्णय तर माँसाहेबच घेत होत्या. त्यामुळे संपूर्ण कुटुंबात एकोपा होता. परंतु राज्याभिषेकाच्या बाराव्या दिवशी जिजाऊ माँसाहेबांनी या जगाचा निरोप घेतला आणि भोसल्यांच्या कुटुंबातील वातावरण गढूळ होऊ लागले.

त्याला निमित्त झाले ते राज्याभिषेक प्रसंगी युवराजपद संभाजीराजांना देण्यावरून. राज्याभिषेक प्रसंगी महाराणी म्हणून सोयराबाई राणीसाहेब आणि युवराज म्हणून संभाजीराजे यांना अभिषेक करण्यात आले. थोरल्या राणीसाहेब

सईबाईसाहेब यांचे निधन पूर्वीच झाल्याने सोयराबाईंना हा महाराणीपदाचा मान मिळत होता. परंतु युवराज म्हणून सतरा वर्षांचे संभाजीराजे चांगले जाणते होते. थोरला पुत्र म्हणून संभाजीराजांना युवराज करायचे याचा निर्णय महाराजांनी पूर्वीच घेतला होता. त्यामुळेच महाराजांनी संभाजीराजांना राजकारणात गुंतवले होते. युवराजांना आग्र्याला जाताना बरोबर घेतले होते. पुरंदरच्या तहान्वये त्यांच्या नावे पंचहजारी मनसब घेतली होती. युवराजांनी फडावर हजर राहून फडावरचे राजकारण समजावून घ्यावे म्हणून महाराज प्रयत्नशील होते. आणि महाराजांचा हा युवराज पदाचा निर्णय योग्यच होता. संभाजीराजे महाराजांचे वडील पुत्र होते. ते महाराजांच्या सर्वात मोठ्या पत्नीचे पुत्र होते. तसेच ते वयानेही जाणते होते. युवराजपदाची जबाबदारी सांभाळण्यास सक्षम होते. सर्वच दृष्टीने त्यांचा युवराजपदावरचा हक्क न्याय्य होता. रितीला धरून होता. त्याचप्रमाणे संभाजीराजांना फौजेचा पाठिंबा होता. आणखी महत्त्वाचे म्हणजे माँसाहेबांनी युवराज म्हणून या लाडक्या नातवाला संमती दिली होती.

परंतु राज्याभिषेकापूर्वी युवराज पदासाठी संभाजीराजे नाव पुढे येताच प्रथम अनोजी दत्तो यांनी त्याला विरोध केला. नंतर हळूहळू सर्वच मंत्र्यांनी संभाजीराजांच्या युवराज पदाला विरोध दर्शविला. संभाजीराजे आणि अनोजी पंत यांचे पटत नाही हे महाराजांना कळले होते. परंतु काहीतरी किरकोळ कारण असेल अथवा काही गैरसमज असेल तर ते आपण दूर करू, या भ्रमात महाराज होते. युवराजांचे वय पाहता परिपक्वतेच्या अभावामुळे युवराजांचे हातून काही अपराध झाले असतील तर आपण अनोजींचे मतपरिवर्तन करू शकू हा महाराजांना विश्वास होता. परंतु राज्याभिषेकाच्या वेळी या वादाची तीव्रता महाराजांना जाणवली होती.

अनोजीपंत शूर, कर्तबगार, स्वामीनिष्ठ आणि हिशेबाला पक्के होते. स्वराज्यातील महसूल आणि शेतसारा पद्धती त्यांनीच तयार केली होती. काठीने जमीन मोजून, जमिनीचा कस पाहून, पाण्याची उपलब्धता आणि घेतले जाणारे पिक पाहून त्यांनी शेतसारा ठरविला होता. त्यांची ही पद्धती मलिक अंबरने घालून दिलेल्या सारा पद्धतीपेक्षा आदर्श होती. त्यामुळे अनोजी पंताचे महत्त्व राज्यकारभारात अनन्यसाधारण होते. ते चांगले योद्धे होते. मोहिमांवर जावून पराक्रम करणे त्यांना चांगले जमत असे. असा असी-मसी माणूस मिळणे कठीण असते. परंतु प्रत्येक माणसात काही दोष असतातच. त्याप्रमाणे अनोजींना वतनांचे आकर्षण होते. त्याचा कारभार भ्रष्ट होता. अर्थात या भ्रष्ट कारभाराने स्वराज्याचे नुकसान होऊ नये याची काळजी ते घेत असत. फक्त प्रश्न वतनाबद्दल

होता. राजे वतने देण्याच्या विरुद्ध होते. पूर्वीची दिलेली वतने नष्ट करण्याचे त्यांचे धोरण होते. त्याचवेळी महाराजांचे सूरनीस वतने मिळवून त्यांचा संचय करतात, हे वाईट दिसत होते.

युवराजांना अनोजींच्या कारभाराची पूर्ण कल्पना आली होती. संभाजी राजांना फडावरच्या कारभाराची ओळख व्हावी म्हणून महाराजांनीच २६ जाने. १६७१ पासून फडात लक्ष घालण्याची आज्ञा केली होती. महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून संभाजीराजांनी राज्याचे हिशेब, न्यायनिवाडे, दरबारी कामे, रितीरिवाज यांची ओळख करून घेतली होती. संभाजीराजांची बुद्धी अत्यंत तल्लख असल्याने फडावर त्यांचा दबदबा निर्माण झाला होता. सुरुवातीला संभाजीराजे मागतील ते कागद व तपशील त्यांना कारकुनांकडून मिळत असत. परंतु जसजसे युवराज खोलात शिरून एक एक प्रकरणाचा अभ्यास करू लागले तसतसे अनोजीपंत सावध होवू लागले. युवराजांना हवा तो तपशील देण्यास टाळाटाळ करू लागले.

महाराजांचा सूरनीस अनोजी पंतांवर विश्वास होता आणि तेच सूरनीस महाराजांच्या नजरेआड द्रव्य गोळा करून त्या द्रव्याच्या बळावर कुलकर्णी, खोत, मोकाशी यांसारखी वतने खरेदी करीत होते हे पाहून संभाजीराजांना अनोजी पंतांचा राग आला होता. अनोजींना या दोन प्रकारच्या भ्रष्ट कारभारात मोरो दादाजी हे गृहस्थ मदत करीत होते हेही युवराजांना कळले. अनोजींनी भ्रष्ट मार्गाने मिळविलेले द्रव्य गोव्यातील सराफांना व्याजाने देण्यात येत असे. या व्यवहारात हे मोरो दादाजी दलालाची भूमिका वठवित असत. हे सर्व व्यवहार अनोजी आपले बंधू सोमाजी दत्तो यांचेमार्फत चालवित असल्याने अनोजींचा संशय येत नसे. तसेच आपण एकटेच भ्रष्ट आहोत असे चित्र निर्माण होऊ नये म्हणून हिरोजी फर्जंद, राहुजी सोमनाथ यांनाही यात ओढण्याचा अनोजींचा प्रयत्न होता.

युवराज संभाजीराजांचे तरुण वय त्यांना अनाजींचे व्यवहार स्वस्थ बसू देत नव्हते. उतावीळ स्वभावाचे युवराज अनोजींना चारचौघात अडचणीचे प्रश्न विचारीत असत. अनोजींना अडचणीत आणून गप्प करण्यात युवराजांना आनंद मिळत असे. त्यातून अनोजींचा युवराजांबद्दलचा रोष वाढत गेला आणि हे संभाजीराजे जर सत्तेवर आले तर आपली खैर नाही हे अनोजी समजून होते. त्यामुळे अनोजींनी संभाजीराजांच्या युवराज पदाला कडाडून विरोध केला होता.

संभाजीराजांचा युवराज पदाला फक्त अनोजींनी आणि इतर मंत्र्यांनी विरोध केला होता. सोयराबाईंनी त्यात भाग घेतला नव्हता. कारण सोयराबाईंना भीती

होती की आपण विरोध केला तर आपलेच महाराणीपद धोक्यात येईल. शिवाय तेव्हा जिजाबाई हयात होत्या. त्यांचा शब्द अखेरचा मानला जाई. त्यांनी शंभूराजांचे नाव युवराज पदासाठी सुचविले होते. त्यामुळे सोयराबाईंचे काहीही चालले नाही. परंतु अनोजीपंत समजून होते की आपण एकट्याने कितीही प्रयत्न केला तरी संभाजीराजांना राजकारणापासून दूर ठेवू शकणार नाही. त्यासाठी राजकुटुंबातून आधार मिळाला तरच ते शक्य होईल. त्यांनी सोयराबाईंच्या मनात सापत्नभाव जागा केला आणि राजारामराजांना युवराज करण्याचा विचार त्यांच्या मनात पेरला. आता जिजाऊ माँसाहेबही हयात नव्हत्या. त्यामुळे महाराणी सोयराबाई अनोजीपंतांच्या पक्षात आल्या.

अनोजीपंत पक्के मुत्सद्दी होते त्यांनी सोयराबाईंना पटवून दिले की संभाजीराजांविरुद्ध लहानसहान तक्रारी महाराजांना सांगून काही फायदा होणार नाही तर त्यांच्या चारित्र्यावर डाग लागला तरच महाराज शंभूराजांना वारसदार करणार नाहीत. महाराजांना स्त्रियांच्या अब्रूची चाड आहे. स्त्रियांच्या अब्रूवर घाला घालणाऱ्यांना महाराज देहदंडाची शिक्षा देतात हे आपण पाहिले आहे तेव्हा काहीतरी कट कारस्थान करून तसे काही केले पाहिजे. महाराणींना अनोजींचे विचार पटले.

त्यातून महाराणींच्या मदतीने हळदीकुंकू प्रकरण रचले गेले. एकदा वाड्यावर हळदी कुंकवाचा कार्यक्रम होता. गडावरच्या अनेक स्त्रिया राजवाड्यावर येत होत्या. सोयराबाई, पुतळाबाई या सर्व राजस्त्रिया मोकळेपणाने वावरत होत्या. इतक्यात एक तरुण मुलगी संभाजीराजांच्या महालातून अस्ताव्यस्त वस्त्रानिशी बाहेर पडली. सर्वच उपस्थित स्त्रियांचा समज झाला की शंभूराजांनीच त्या मुलीला महाली बोलावून तिची अब्रू लुटली. या सर्व प्रकरणात महाराणींचा सिंहाचा वाटा होता.

घडला प्रकार महाराजांच्या कानी घालण्यात आला. परंतु वाड्यात इतक्या ज्येष्ठ स्त्रिया हजर असताना संभाजीराजे असे काही करतील यावर महाराजांचा विश्वास बसला नाही. त्यांनी हेरांमार्फत चौकशी करताच या प्रकरणातील फोलपणा बाहेर आला. संभाजीराजे निर्दोष ठरले.

त्यानंतर काही दिवसांनी असाच एक संभाजीराजांच्या चारित्र्यहननाचा प्रयत्न झाला. अनाजींच्या नात्यातील गोदावरी नावाच्या एका सासुरवाशिणीला संभाजीराजांनी लिंगाणा किल्ल्यावर जबरदस्तीने ठेवल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. महाराजांनी युवराजांची भर दरबारात जाहीर चौकशी लावली. त्यासाठी त्या स्त्रीला दरबारात हजर करण्याची जबाबदारी अनोजी पंतांवरच

टाकण्यात आली. अनोजी पंत तिला आणण्यासाठी लिंगाण्यावर गेले. परंतु तत्पूर्वी त्या मुलीने आत्महत्या केली होती. त्यामुळे शंभूराजांच्या चारित्र्यहननाचा हाही प्रयत्न फसला.

असे हे दोन्ही प्रयत्न फसल्यावर काही काळ अनोजींचा पक्ष शांत होता. परंतु जानेवारी-मार्च १६७६ मध्ये महाराज पन्हाळ्यावर भयंकर आजारी पडले. सततचे राजकारण, लढाया आणि वारसा प्रश्नावरून उद्भवलेला आणि विकोपाला गेलेला कौटुंबिक वाद यामुळे ताण पडून महाराज आजारी पडले होते. महाराजांना विश्रांतीची नितांत आवश्यकता असल्याने पन्हाळ्यावर आराम करीत होते. त्याचवेळी 'महाराजांचा काळ झाला' अशी बातमी पोर्तुगिज पत्रातून अफवा पसरली होती. वास्तविक महाराज पन्हाळ्यावर विश्रांती घेत होते. त्याचवेळी स्वराज्यात अशी अफवा पसरविण्यात आली की महाराजांवर विषप्रयोग झाला असून तो प्रत्यक्ष त्याच्या पुत्राकडून संभाजीराजांकडून करण्यात आला आहे, अशी अफवा संभाजीराजांना कलंकित करण्यासाठी उठविण्यात आली असून तिचा उगम रायगडावर होता. वास्तविक संभाजीराजे महाराजांना परमेश्वराप्रमाणे मानीत होते. त्यांच्या मनात महाराजांविषयी असला विचार येणेही अशक्य होते. अर्थात महाराजांचे मनही शंभूराजांविषयी स्वच्छ असल्याने या अफवेने फारसे काही बिघडले नाही.

पन्हाळ्यावरच्या या आजारातून खडखडीत बरे होताच महाराजांनी गोवळकोंड्याचा कुतूबशहा अबुल हसन तानाशाह याची भेट घेऊन दक्षिणेकडील राज्यांची एकजूट करण्याचे ठरविले. निमित्त होते ते कर्नाटकातून रघुनाथपंतांनी आणलेले राजकारण. तानाशाह, कुतूबशहाला भेटून पुढे कर्नाटक स्वारीवर जाण्याचा महाराजांचा विचार होता. या संपूर्ण मोहिमेसाठी साधारण दोन वर्षांचा कालावधी लागणार होता. इतका मोठा काळ महाराज राजधानीबाहेर राहणार असल्याने रायगडावर पर्यायी व्यवस्था करावी लागणार होती. साधारणत: रिवाजाप्रमाणे जेव्हा राजा राजधानीबाहेर असा मोठा काळ जाणार असेल तर त्याचे मागे राज्याचा कारभार युवराजांकडे सोपविला जातो. तसा तो संभाजी राजांकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. त्यात वावगे काहीही नव्हते.

ऐनवेळी अनोजींनी त्यात घोळ घातला. सर्व अष्टप्रधानांची एकजूट करून ते महाराजांना भेटले आणि त्यांनी महाराजांना स्पष्ट सांगितले की युवराजांकडे कारभार सोपविला जाणार असेल तर आपण परत येईपर्यंत आम्ही सर्व मंत्री रजेवर जातो. महाराजांनी सर्वांना समजविण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु त्याचा

काहीही उपयोग झाला नाही. सर्व मंत्र्यांचे म्हणणे होते की अष्टप्रधानांच्या सल्ल्याप्रमाणे कारभार करतील इतके युवराज लहान राहिलेले नाहीत आणि हट्टाने त्यांनी घेतलेला निर्णय तडीस नेण्याइतके युवराज मोठेही झालेले नाहीत. त्यामुळे आम्ही वृथा अपयशाचे धनी होवू. ते आम्हास मान्य नाही.

महाराजांनी अष्टप्रधानाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि त्यांच्या निर्णयाचा आदर केला. त्यानंतर महाराजांनी युवराजांना कर्नाटक स्वारीवर जाताना सोबत घेण्याचा निर्णय घेतला. महाराज आणि युवराज दोघेही हजर नसताना अष्टप्रधानांनी राज्याचा कारभार स्वतंत्रपणे पाहावा असे ठरले. युवराजांना महाराज सोबत नेणार असल्याने त्यांनाही स्वारीचा अनुभव मिळणार होता.

महाराजांच्या या बेतात महाराणी सोयराबाईंनी खोडा घातला. संभाजीराजांना कर्नाटक स्वारीवर नेणार तर मग राजाराम राजांनाही सोबत न्यावे म्हणजे स्वारीचा अनुभव दोन्ही राजपुत्रांना सारखाच मिळेल हा सोयराबाईंचा मुद्दा होता. त्यांच्या मनात भीती होती की संभाजीराजांना सर्व प्रकारचा अनुभव मिळत गेल्यास तेच राज्याचे वारस ठरतील आणि मग आपल्या पुत्राला त्यांच्या सेवेत आयुष्य काढावे लागेल. महाराणींनी तसा हट्टच धरला. वास्तविक राजाराम राजांची प्रकृती नाजूक होती. मातोश्रींनी खूप जास्त जपल्यामुळे त्यांना रायगडाची सर्द हवाही मानवत नव्हती. तेव्हा त्यांना एवढा लांबचा प्रवास आणि स्वारीतील बदलते हवामान सोसणे शक्य नव्हते. परंतु कितीही समजावले तरी सोयराबाईंनी आपला हट्ट सोडला नाही. मग नाईलाजाने महाराजांनी संभाजीराजांनाच स्वारीवर नेण्याचे रहित केले. परंतु संभाजीराजांना रायगडावर ठेवणेही धोकादायक होते. त्यांच्याविरुद्ध अनोजींचा पक्ष बलवान होता. म्हणून महाराजांनी संभाजीराजे आणि येसूबाई यांना श्रृंगारपुरी येसूबाईंच्या माहेरी पिलाजीराव शिर्के यांच्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला. सासुरवाडीला संभाजीराजे सुरक्षित राहणार होते. तसेच त्यांच्यावर पिलाजीरावांचे लक्ष राहणार होते. महाराजांनी संभाजीराजांना प्रभावळी सुभ्याचा स्वतंत्र कारभार सांगितला. त्यांच्या कारभारात रायगडावरून अष्टप्रधानांची घालमेल होऊ नये याची दक्षता घेण्यात आली.

याच सुमारास दिलेरखानाबरोबर महंमद कुलीखान महाराष्ट्रात आला. हा महंमद कुलीखान म्हणजे प्रती शिवाजी म्हणून गौरवलेला स्वराज्याचा पूर्वीचा सेनापती नेतोजी पालकर होता. औरंगजेबाने नेतोजीस बाटवून मुसलमान केल्यावर त्याचे नाव महंमद कुलीखान ठेवले होते. महंमद कुलीखान संधी साधून महाराजांना भेटला. झाल्या प्रकाराबद्दल क्षमायाचना केली. नेतोजी हे

पुतळाबाई राणीसाहेबांचे काका होते. त्यांना मुस्लीम ठेवणे योग्य नव्हते. महाराजांनी १९ जून १६७६ रोजी प्राय:श्चित देऊन महंमद कुलीखानला परत हिंदू करून घेतले. हा महाराजांचा क्रांतीकारी निर्णय होता. त्या निर्णयाने महंमद कुलीखानाचा परत नेतोजी पालकर झाला. औरंगजेबाला ही चपराक होती.

महाराजांनी स्वराज्याची पूर्ण व्यवस्था लावली. दोन वर्षांपेक्षा अधिक काळ महाराज कर्नाटकात जाणार असल्याने विशेष काळजी घेण्यात आली. पूर्वी महाराज काही काळासाठी आग्र्याला गेले होते. तेव्हाही कारभार अष्टप्रधानांकडे सोपवून गेले होते. परंतु तेव्हा मार्गदर्शन करण्यासाठी कर्तबगार राजमाता जिजाऊ होत्या. आता सर्व जबाबदारी अष्टप्रधानांवरच होती. महाराजांनी अष्टप्रधानांना कामाच्या वाटण्या करून दिल्या. त्यांना सदैव सावध राहण्याचा सल्ला दिला आणि ५ फेब्रुवारी १६७७ रोजी महाराजांनी कर्नाटक स्वारीसाठी रायगड सोडला. सोबत संभाजीराजे आणि राजस्नुषा येसूबाई यांना घेऊन राजे प्रथम शृंगारपूरला आले. तेथे संभाजीराजांची सर्व व्यवस्था लावून दोन-चार दिवस मुक्काम करून महाराजांनी पुढील प्रवासास सुरुवात केली.

# महाराजांची कर्नाटक मोहीम

१६३६ पासून शहाजीराजे कर्नाटकात बंगळूर येथे जहागिरीवर होते. पुढे १६५९ मार्चमध्ये त्यांनी तंजावरचे राज्य आदिलशाहीसाठी जिंकले. परंतु दोन वर्षांत शहाजीराजे पुन्हा बंगळूर येथेच स्थायिक झाले. १९ फेब्रुवारी १६३० ला शिवाजी महाराजांचा शिवनेरीवर जन्म झाला तसेच १६३१ मध्ये शहाजीराजांच्या दुसऱ्या पत्नी तुकाबाई यांना एकोजीराजे नावाचा मुलगा झाला. शिवाजी महाराज मातोश्री जिजाबाई यांच्यासमवेत पुणे जहागिरीवर होते. तेथेच त्यांनी स्वराज्य स्थापन केले. २३ जाने. १६६४ रोजी हौदीगिरे येथे शहाजी राजांचा मृत्यू झाला. वडिलांच्या निधनानंतर बंगळूर जहागिरीवर शहाजी राजांचे धाकटे पुत्र एकोजीराजे राज्य करू लागले.

एकोजी राजांनी ५ मार्च १६७६ रोजी तंजावरच्या राज्यावर स्वत:ला सिंहासनारोहण करून घेतले. वास्तविक बंगळूरची जहागिर व संपत्ती शहाजी राजे यांनी कमावलेली होती. त्यात शिवाजी महाराजांचा बरोबरीचा हिस्सा होता. परंतु एकोजीराजांनी अन्यायाने जहागिरी आपल्या ताब्यात ठेवली होती. शिवाजी महाराजांनीही उदार अंत:करणाने आपला वाटा मागितला नव्हता.

शहाजीराजांच्या पदरी अनेक मुत्सद्दी होते. त्यात रघुनाथपंत हणमंते हे शहाजीराजांचे अत्यंत प्रामाणिक कारभारी व सल्लागार होते. परंतु शहाजीराजांच्या निधनानंतर एकोजी राजांचे आणि रघुनाथपंतांचे पटेनासे झाले. एकोजीराजे रघुनाथ पंतांच्या सल्ल्याप्रमाणे वागत नव्हते. एकोजीराजे भोवतालच्या स्वार्थी मुत्सद्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागू लागले. स्वाभिमानी रघुनाथराव हणमंत्यांना एकोजीराजांचे वागणे गैर वाटू लागले. त्यांनी एकोजीराजांना सोडून स्वराज्याची वाट धरली. महाराजांनी रघुनाथरावांची किर्ती ऐकली होती. त्यांनी रघुनाथपंतांचा आदर केला व त्यांना आपल्या जवळ ठेवले.

रघुनाथपंतांनी महाराजांसाठी कर्नाटक स्वारीचे राजकारण आणले होते. रघुनाथ पंत त्यांच्या वडिलांच्या वेळेपासून कर्नाटकात शहाजी राजांकडे राहिल्यामुळे त्यांना कर्नाटकाची राजकीय परिस्थितीचे आकलन झाले होते. त्यांनी महाराजांना कर्नाटक विजयाची आवश्यकता किती आहे ते पटवून दिले. आदिलशाहीत बहलोलखान पठाण सत्ता बळकावून बसला होता. त्याचप्रमाणे कर्नाटकात शेरखान लोधी हा कडवा पठाण त्रासदायक झाला होता. या दोन पठाणांच्या डोळ्यात महाराजांची मराठी सत्ता सलत हाती. त्यांचा बंदोबस्त वेळीच करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आज ना उद्या दिल्लीचे मोगल दक्षिण काबिज करण्यासाठी खाली उतरतील तेव्हा मोगलांशी प्रतिकार करण्यासाठी दक्षिणी राज्यात एकजूट असायला हवी. आदिलशाही, कुतूबशाही, निजामशाही या मुस्लीम शाह्या असल्या तरी ते दक्षिणी मुसलमान होते. त्यांनी एकत्रित येऊन मोगलांचा मुकाबला केला पाहिजे. या स्वारीत महाराजांना स्वराज्यासाठी अमाप द्रव्य मिळण्याची शक्यताही होती. या युद्धासाठी खर्चापोटी कुतूबशहाकडून मदत मिळण्याची शक्यता होती. कारण कुतूबशाहीत मादण्णा, आकण्णा हे दोन हिंदू बंधू वजीर होते. महाराजांना 'कर्नाटकाचे राजकारण' भावले. त्यांनी त्यास 'थोरली मसलत' संबोधिले.

महाराजांच्या मनात संकटकाळी आश्रय घेण्यासाठी दुसरे राज्य निर्माण करण्याची इच्छा होतीच. तसेच महाराष्ट्रात सह्याद्रीमध्ये जशी गड किल्ल्यांची शृंखला होती तिला जोडून दक्षिणेतही साखळी करण्याचा महाराजांचा विचार होता. त्यामुळे संकटकाळी महाराष्ट्रातून थेट तंजावरपर्यंत निरनिराळ्या किल्ल्यांवर मुक्काम करीत जाणे शक्य होणार होते. महाराज द्रष्टे होते. त्यांनी पूर्ण जाणले होते की लवकरच मोगलांशी जबरदस्त मुकाबला करावा लागणार आहे आणि त्यातून जे वाचेल ते खरे शाश्वत स्वराज्य असेल. त्यासाठी महाराजांची ही पूर्वतयारी चालू होती. त्यामुळे मराठी फौजेला कर्नाटक प्रदेशाची ओळख होणार होती आणि दोन वर्षे मराठी फौज बाहेर पोसली जाणार होती.

महाराजांनी कर्नाटक स्वारीची तयारी सुरू केली. दोन वर्षांपेक्षा अधिक काळ कर्नाटकात राहावे लागणार असल्याने मागे स्वराज्याची व्यवस्था लावणे गरजेचे होते. पेशवे मोरोपंत पिंगळे आणि सूरनीस अनोजी दत्तो यांना महाराजांनी स्वराज्याची व्यवस्था सांगितली. तसेच मोगलांनी आपल्यामागे स्वराज्यास हानी पोहोचवू नये यासाठी दक्षिणेचा मोगल सेनानी बहादूरखान हा पेडगावला होता, त्याच्याकडे तहाचे बोलणे लावले. त्याला भरपूर द्रव्य देऊन आपलेसे करून घेतले. जंजिऱ्याच्या सिद्दीने कोकणावर हल्ला करू नये म्हणून त्याच्यावर लक्ष

ठेवण्याची जबाबदारी अनोजी दत्तो यांच्यावर टाकली. तसेच निराजी रावजी यांचे पुत्र प्रल्हाद निराजी यांना हैदराबादला कुतूबशहाला राजी करण्याच्या कामगिरीवर पाठवले.

अशी सर्व आवश्यक तयारी पूर्ण झाल्यावर तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ, सोबत बाळाजी आवजी, नेतोजी पालकर, सर्जेराव जेधे, नागोजी जेधे, सूर्याजी मालुसरे, येसाजी केक, धनाजी जाधव, ढमढेरे, आनंदराव असे वीर आणि रघुनाथपंत व जनार्दनपंत यांसारखे मुत्सद्दी घेऊन दि. ६ ऑक्टोबर १६७६ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर दक्षिण स्वारीसाठी प्रस्थान ठेवले.

तत्पूर्वी प्रल्हाद निराजी व रघुनाथपंतांनी वजीर आकण्णा आणि मादण्णा यांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. प्रल्हाद निराजी यांनी मादण्णा आकण्णांना विनंती करून स्वारीखर्चासाठी काही द्रव्य तानाशहाकडून मिळवून देण्यास सांगितले होते. महाराज सैन्यासह येत आहेत हे पाहून कुतूबशहा घाबरला होता. त्याने लागेल तेवढे द्रव्य महाराजास द्यावे, पण त्यांनी बाहेरच्या बाहेर निघून जावे असा विचार मांडला. महाराजांना कुतूबशहाची भेट घेऊन ऐक्य साधायचे होते. परंतु बादशहा शिवाजीची भेट घेण्यास तयार नव्हता. महाराजांची अफझलखान भेट, शाहिस्तेखानावरचा छापा, आग्र्याच्या कैदेतून पलायन या सर्व घटना तानाशहासमोर स्पष्ट होत्या. त्याला आपल्याबरोबरही असाच धोका होईल असे वाटत होते. परंतु प्रल्हाद निराजी आणि रघुनाथपंत यांनी कुतूबशहाची शपथपूर्वक खात्री करून दिली की महाराजांच्या मनात केवळ बंधूभाव आहे, धोका नाही. तेव्हा कुठे बादशहा महाराजांची भेट घेण्यास तयार झाला.

महाराजांनी जसा कुतूबशाहीत प्रवेश केला तशी फौजेला ताकीद दिली की कुतूबशाही रयतेस कसलीही तोशीस लागता कामा नये. जे सामान लागेल ते रयतेस राजी करून विकत घ्यावे. अशा प्रकारे काळजी घेऊन महाराज हैदराबाद जवळ पोहोचले. कुतूबशहा तानाशहा महाराजांना सामोरा येणार होता. परंतु महाराजांनी तानाशहास कळविले की 'आपण वडीलभाऊ. मी धाकटाभाऊ आहे. आपण सामोरे न येणे.' या निरोपाने तानाशहाला खात्री झाली आणि त्याच्या मनातील भीती नष्ट झाली.

प्रचंड मिरवणुकीने महाराजांनी वाजत गाजत भागा नगरात प्रवेश केला. त्या मिरवणुकीचे कै. कृ. अ. केळुसकर यांनी फार सुरेख वर्णन केले आहे. ते म्हणतात,

'वजीर मादण्णा व आकण्णा यांनी महाराजांना वाजत गाजत नगरापाशी आणले. तेथे त्यांच्या सगळ्या सैन्याने तळ दिला. दुसरे दिवशी कुतूबशहाची

भेट घेण्याचे ठरले. या भेटीस जाण्याचे वेळी महाराजांनी आपल्या निवडक लोकांस उंची पोषाख दिले. त्यांना मोत्याचे तुरे, सोन्याची कडी, नवी चिलखते वगैरे लष्करी जामानिमा देऊन त्यास मोठ्या पिढीजात उमरावाप्रमाणे सजविले. त्यांचे हत्ती घोडेही बहुमोल अलंकारदिकांनी शृंगारले. ह्याप्रमाणे एखाद्या बादशहास शोभेशी मोठ्या थाटाची स्वारी तयार करून महाराजांनी पन्नास हजार सैन्यानिशी नगर प्रवेश केला. तिकडे कुतूबशहाने सर्व नगर शृंगारावयास लावून गुढ्या, तोरणे व पताका, जिकडे तिकडे उभारावयास व वाद्ये वाजवण्यास सांगितले.'

नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराजांस पाहण्याची उत्कंठा लागली होती. रस्त्याच्या दुतर्फा गर्दीने भरून गेले होते. भागानगरचे नागरिक महाराजांचा जोरात जयजयकार करीत होते. सुवासिनी पुढे होऊन आरत्या ओवाळीत होत्या. पुरुष मंडळी पुष्पवृष्टी करीत होते. महाराज या सत्काराने परमसंतोष पावून दुतर्फा सोन्या रुप्याची नाणी उधळीत होते. महाराजांनी नगरातील गोरगरिबांस व फकिरांस मुबलक खैरात केली.

महाराजांची मिरवणूक वाजतगाजत शहरात प्रवेश करती झाली. मराठा फौजेची राहण्याची व्यवस्था गोशा महाल भागात करण्यात आली होती, तर प्रत्यक्ष भेटीचा सोहळा दाद महालात होणार होता. गोशा महालात फौज ठेवून महाराज निवडक असामी बरोबर घेऊन दाद महालापाशी आले. महाराजांनी फक्त पाच व्यक्ती सोबत घेऊन दाद महालात प्रवेश केला. कुतूबशाही पातशहा उच्चासनावर बसले होते. महाराज आपल्या बरोबरच्या पाच लोकांस खालीच ठेवून सडेच पायऱ्या चढून सिंहासनाजवळ गेले. तानाशहाने उठून महाराजांना आलिंगन दिले. कुतूबशहाने महाराजांना आपल्याजवळ सिंहासनावर बसविले.

दोन सार्वभौम सत्ताधीश एकमेकांना भातृभावाने भेटल्यावर अनेक राजकारणे उलगडली गेली. दक्षिणेकडील एकजूट करण्याचे ठरले. कर्नाटक स्वारीच्या काळात कुतूबशहाने शिवाजी महाराजांना दरमहा साडेचार लाख होन खर्चासाठी द्यावे व पाचशे स्वारींची तुकडी मदतीस द्यावी हे तानाशहाने मान्य केले. कुतूबशहाने महाराजांना खासे विडे स्वतःच्या हातांनी दिले.

महाराजांचा भागानगरमध्ये ४ फेब्रुवारी ते १० मार्च असा जवळजवळ एक महिना मुक्काम होता. या काळात अनेकदा तानाशहाने महाराजांना मेजवान्या दिल्या. तसेच महाराजांनीही पातशहास भेटी व नजराणे दिले. मादण्णा, आकण्णा यांच्या काजी सानकी देवडी येथील वाड्यावर महाराजांना मेजवानी झाली.

कुतूबशहाने महाराजांच्या मनोरंजनासाठी मर्दानी खेळांचे आयोजन केले होते. त्यावेळी महाराजांनीही येसाजी कंक याला हत्तीशी झुंज घेण्यास सांगितले. ही झुंज पाहून पातशहा आणि इतर कुतूबशाही सरदार अवाक झाले होते. कुतूबशहाने येसाजी कंकाला अनेक बक्षिसे दिली, ती त्याने विनम्रपणे नाकारली. असे महिनाभर राहून महाराज श्री शैल मल्लिकार्जुन दर्शनास गेले.

१० मार्च १६७७ रोजी महाराज श्री शैलमल्लिकार्जुन या तीर्थक्षेत्रात पोहोचले. महाराजांनी सर्व सरदारांसमवेत दर्शन घेतले. त्या देवस्थानाचे पावित्र्य आणि सभोवतालचा निसर्ग पाहून महाराज इतके भारावले की श्री मल्लिकार्जुनच्या पायी आपले आयुष्य वाहून जीवन संपवून टाकावे असे महाराजांना वाटू लागले. महाराजांनी आत्मदान करण्याच्या विचाराने तलवारही उपसली. जवळच्या माणसांनी मोठ्या प्रयासाने महाराजांचे मन वळविले आणि त्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले. महाराजांनी त्या ठिकाणी विपूल दानधर्म केला. एक लक्ष ब्राह्मणांस भोजन दिले. त्या पवित्र ठिकाणी नील गंगा नदीस घाट आणि घाटावर धर्मशाळा बांधण्याची व्यवस्था करून महाराज पुढील स्वारीसाठी निघाले.

महाराज कर्नाटकात लहान मोठ्या सत्ताधीशांच्या ताब्यातील प्रदेश काबीज करीत चालले होते. ते मद्रासजवळ पोहोचले. रघुनाथपंत हणमंते या प्रदेशातील राजकारणाचे चांगले जाणकार असल्याने महाराज त्यांच्या सल्ल्याप्रमाणे लष्करी हालचाली करीत होते. एक एक विजय संपादित करून महाराज जिंजीजवळ आले. जिंजीच्या प्रचंड मोठ्या किल्ल्याला महाराजांच्या फौजेने वेढा दिला. किल्ला नासिर महमंद याच्या ताब्यात होता. त्याला त्याचे भवितव्य कळून चुकले. त्याने तहाचे बोलणे लावले. शेवटी पन्नास हजार उत्पन्नाची जहागिरी देण्याचे महाराजांनी कबूल करताच १३ मे १६७७ रोजी त्याने जिंजी मराठ्यांच्या ताब्यात दिला. जिंजीच्या विजयाने आजूबाजूचे राजे भयभीत झाले. महाराजांची दहशत निर्माण झाली.

त्यानंतर महाराज वेलोर येथे आले. वेलोरचा किल्ला आदिलशाहीच्या ताब्यात होता. हा किल्ला भुईकोट किल्ला होता. किल्लेदार अब्दुल्लाखान याने तो निकराने लढवला. या भुईकोट किल्ल्याशेजारील दोन टेकड्यांवर महाराजांनी साजिरा आणि गोजिरा असे दोन किल्ले बांधले. त्यावरून वेलोरच्या किल्ल्यावर मारा करता येत होता. पण या सर्व प्रक्रियेस वेळ लागणार होता. महाराजांनी वेलोर घेण्याची जबाबदारी नरहरी रुद्र या सरदारावर टाकून कडलूर येथे प्रयाण केले.

कडलूरला येताच महाराजांची शेरखान लोदीची गाठ पडली. शेरखान हा

महाराजांचा मोठा शत्रू होता. त्याचा पराभव करणे अत्यंत गरजेचे होते. मराठ्यांनी शेरखान लोदीवर जबरदस्त हल्ला केला. खानाने युद्धातून पळ काढून बानागिरी किल्ल्याचा आश्रय घेतला. पण मराठ्यांनी त्याला सोडला नाही. बानागिरी पट्टमच्या किल्ल्याला मराठ्यांनी वेढा दिला. शेरखान महाराजांस शरण आला. महाराजांनी शेरखानाशी तह करून त्याची सर्व ठाणी व वीस हजार होन घेऊन ओलिस ठेवलेल्या त्याच्या पुत्राला इब्राहिमखानाला मुक्त केले. शेरखान लोदीसारख्या जबरदस्त शत्रूचा बंदोबस्त करत असतानाच एक शुभवार्ता महाराजांस मिळाली. मागे राहिलेल्या नरहरी रुद्र यांनी २२ जुलै १६७८ रोजी वेलोरचा किल्ला अब्दुल्लाखानाकडून जिंकून घेतला. महाराजांनी कर्नाटकात जाऊन बांधलेले साजिरे-गोजिरे हे मराठी नावाचे दोन किल्ले आजही या विजयाची साक्ष देतात.

महाराजांनी कर्नाटकात जिंकलेल्या प्रदेशावर आपली विश्वासाची माणसे नेमली. काही गडकोटांची डागडुजी केली. काही नवीन बांधायला घेतले. कर्नाटकावर मराठ्यांच्या पाऊलखुणा पुढे हजारो वर्षे राहाव्या यासाठी महाराजांनी कर्नाटकात एक स्वतंत्र राज्यच निर्माण केले.

कर्नाटक स्वारीत महाराजांचा मुक्काम कावेरी तिरावर असताना त्यांनी आपले सावत्रभाऊ एकोजीराजे ऊर्फ व्यंकोजीराजे यास पत्र पाठविले. त्यात महाराजांनी लिहिले होते की, 'तेरा वर्षापूर्वी थोरले महाराजांचा कैलासनाथ झाला. त्यांची सर्व दौलत आपल्यापाशी आहे. या पितृधनात आमचाही अर्धा वाटा आहे. तरी आमचा वाटा आम्हास बिनतक्रार द्यावा म्हणजे कलहास कारण उरणार नाही. आपण दोघे एका रक्ताचे आहो. तरी प्रेमाने राहू. भेटीस यावे.'

एकोजीराजांच्या हितचिंतकांनी त्यांना सल्ला दिला की 'दौलतीचे वाटे करू नये. महाराजांशी युद्धप्रसंग करावा.' महाराजांचा मुक्काम यावेळी तिरुमलवाडीला होता. एकोजीराजे महाराजांना भेटण्यासाठी तिरुमलवाडीला आले. भेटी झाल्या. महाराजांनी एकोजीराजांना अत्यंत प्रेमाने वागविले. एकोजीराजे २० जुलै ते २७ जुलै असे आठवडाभर महाराजांच्या छावणीत राहिले. परंतु या काळात एकोजीराजे स्पष्ट काहीच बोलले नाहीत. मनातल्या मनात कुढत राहिले. त्यांना भीती वाटत होती की शिवाजी महाराज आपल्याला कैद करतील आणि पूर्ण राज्यावर कब्जा करतील. या भीतीने एकोजीराजांना अन्न गोड लागत नव्हते. शेवटी एका रात्री (२७ जुलै १६७७) एकोजीराजांनी गुपचूप पलायन केले आणि तंजावरला निघून गेले. एकोजीराजांच्या बरोबर

शहाजी राजांच्या नाटक शाळांचे पुत्र भिवजी राजे, प्रतापजी राजे आणि रायभान राजे हेही महाराजांच्या भेटीस आले होते. तेही एकोजीराजांबरोबर निघून गेले. मात्र महाराजांचे एक सापत्नबंधू संताजीराजे भोसले हे महाराजांकडेच राहिले. महाराजांनी पुढे त्यांना एक हजारी सरदारी देऊन पदरी ठेवले.

शिवाजी महाराजांच्या मनाच्या मोठेपणाने एकोजीराजे प्रकरण आटोपते घेतले. महाराजांच्या जागी अन्य कोणी असते तर एकोजीराजांचा पराभव करणे कठीण नव्हते. पण महाराजांनी मोठे भाऊपणा निभावला. महाराज तोरगळ मुक्कामी आले. तेथे येताच महाराजांना कळले की एकोजीराजे लढाईच्या इराद्याने फौज पाठवित आहेत. महाराजांनी जनार्दनपंतांना फौज देऊन एकोजीराजांशी सामना करण्यासाठी पाठविले. जनार्दनपंतांपुढे एकोजीराजांचा पराभव झाला. एकोजीराजांचे कित्येक लोक मारले गेले. एकूण एकोजींची दाणादाण उडाली. पण महाराजांच्या मनात लहान भावाविषयी माया होती. त्यांनी जनार्दनपंतांना कळविले की एकोजीराजांनी बालबुद्धी धरली तरी त्यांना बुडवू नये.

परतीच्या आधी महाराजांनी जगदेवगड, कर्नाटक गड, कोल्हार, बालापूर, शिरटे, वासकोट हा सर्व प्रदेश ताब्यात घेतला. अनेक लहान मोठ्या पाळेगारांचा कायमचा बंदोबस्त केला. अनेकांकडून खंडण्या वसूल केल्या. नंतर महाराज श्रीरंगपट्टण, गदग, लक्ष्मेश्वरपर्यंत विजय मिळवीत आले. वृद्धाचालम येथे देवदर्शन करून पोर्तोनोवा शहर लुटून महाराज परतीच्या प्रवासास लागले. त्याला कारणही तसेच होते. महाराजांना हेरांकडून बातमी आली की औरंगजेब पारिपत्यासाठी दक्षिणेत उतरण्याच्या तयारीत आहे. म्हणून घाईघाईने मे-जून १६७८ मध्ये महाराज स्वराज्यात आले.

कर्नाटकातील विजयाने स्वराज्याची हद्द दक्षिण समुद्राला मिळाली. आदिलशाही नमली. कुतूबशाहीशी सलोख्याचे संबंध निर्माण झाले. अपार द्रव्य मिळाले. कर्नाटकात दुसरे राज्य निर्माण करता आले. संकटकाळी 'स्वराज्य ते जिंजी' अशी एक साखळी तयार झाली. मराठ्यांना पराक्रमासाठी नवे क्षेत्र मिळाले. शेरखान लोदी, बहलोलखान यांसारख्या पठाणांचा बंदोबस्त करता आला. दोन वर्षे स्वराज्याची फौज परमुलूखात कुतूबशाहीच्या पैशांवर पोसली गेली. असे अनेक फायदे कर्नाटक स्वारीने स्वराज्यास मिळाले.

महाराजांची कर्नाटक स्वारी अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाली. परंतु संभाजीराजांना मात्र भरपूर मन:स्ताप सहन करावा लागला. शृंगारपूरचे पहिले काही महिने आनंदात गेले. शृंगारपूरचा निसर्ग, कवी कलशांचा काव्याविष्कार

आणि प्रेमळ येसूराणींचा सहवास यात दिवस छान जात होते. त्यात येसूबाई राणीसाहेब गर्भवती होत्या. परंतु संभाजीराजांना मन:स्ताप देणारी गोष्ट म्हणजे रायगडावरून संभाजीराजांची केली जाणारी निंदानालस्ती आणि त्यांच्या शृंगारपूरच्या कारभारात होणारी घालमेल होती. संभाजीराजे दारुच्या आहारी गेले आहेत, ते स्त्रीलंपट आहेत, बदफैली आहेत, जारण-मारण विद्येत रमत आहेत असा अपप्रचार करून संभाजीराजे राज्य चालविण्यास कसे नालायक आहेत, हे जगाला दाखवण्याचा प्रयत्न रायगडावरुन अनोजी गटाकडून होत होता. सेवकांसमोर संभाजीराजांस तुच्छ लेखले जात होते. अर्थात शृंगारपूरला तशी परिस्थिती नव्हती. उलट कवी कलश या विद्वान कवीच्या सहवासात संभाजीराजे कविता करत होते. त्यांनी याच काळात 'बुधभूषणम्, नायिका भेद, नखशिख आणि सातसतक' असे चार ग्रंथ लिहिले होते. संस्कृत व भोजपुरी भाषांचा अभ्यास केला होता.

याच काळात येसूबाई राणीसाहेब प्रसूत होऊन मुलगी झाली. तिचे नाव भवानी ठेवण्यात आले. येसूबाईंच्या मर्जीने आणि पुढाकाराने संभाजी राजांनी सुप्याचे जहागिरदार जाधवराव यांची कन्या दुर्गाबाई यांच्याबरोबर विवाह केला. राज्याला वारस मिळावा म्हणून पुत्रकामेष्टी यज्ञ केला. कलशाभिषेक करून घेतला. कौटुंबिक सुख, धार्मिक कार्ये आणि साहित्य सेवा यांनी संपन्न असा संभाजीराजांचा काळ होता.

परंतु प्रभावळी सुभ्याचाच कारभार पाहताना सुभ्याच्या संरक्षणासाठी संभाजी राजांनी दोन हजाराची फौज ठेवली तर रायगडावरून त्यांना जाब विचारण्यात आला. रायगडावरून रोज कर्नाटकात महाराजांपर्यंत डाक जात होती. डाकेतून संभाजीराजांबाबत खोटेनाटे रचून सांगितले जाई. वास्तविक महाराजांनी संभाजीराजांना प्रभावळीचा सुभा सांगितला तेव्हाच या सुभ्याच्या कारभारात रायगडावरून हस्तक्षेप होऊ नये अशी अष्टप्रधानांना आज्ञा दिली होती. परंतु घडत मात्र उलटेच होते. संभाजीराजांच्या प्रत्येक निर्णयात रायगडावरून घालमेल होत होती. त्यामुळे दिवसेंदिवस संबंध बिघडत चालले होते.

त्यात आणखी एक ठिणगी पडली. एक दिवस संभाजीराजांना त्यांच्या प्रभावळी सुभ्यातील काही शेतकरी भेटायला आले. त्यांची आदल्या वर्षीची पिके कापणीला आली असता अवकाळी पावसाने वाहून गेली होती. हातातोंडाशी आलेली पिके गेल्याने वर्षभर खाण्यासाठीही काही उरले नव्हते. त्यामुळे त्याचे शेतसारा भरणे राहून गेले होते. साऱ्याच्या वसुलीसाठी रायगडाहून अनोजींनी शेतकऱ्यावर जप्तीहुकूम काढले होते. वास्तविक लागोपाठ तीन

वर्षे शेतसारा न भरल्यासच जप्ती हुकूम निघत असत. परंतु युवराजांच्या सुभ्यात ढवळाढवळ करण्यासाठीच अनोजींनी हे जप्तीहुकूम काढले होते. बिचारे शेतकरी हवालदिल होऊन मोठ्या आशेने युवराजांना भेटण्यास आले होते. युवराजांनी चौकशी करून कवी कलशांना आज्ञा देऊन त्या शेतकऱ्यांना सारा माफ केल्याची पत्रे देण्यास सांगितले आणि या पत्रांच्या प्रती रायगडावर पाठवून दिल्या. जेणेकरून त्या शेतकऱ्यांना पुन्हा त्रास होऊ नये. परंतु काही दिवसातच रायगडावरून बारा कारकून जप्तीचे हुकूमनामे घेऊन प्रभावळीत आले. यावेळी हुकूमनाम्यावर राहुजी सोमनाथांऐवजी अनोजींची सही आणि शिक्का होता. तसेच हुकूमनाम्यात युवराजांचा अवमान करण्यात आला होता.

वास्तविक अनोजींना या प्रकरणात लक्ष घालण्याची गरजच नव्हती. मग संभाजीराजेही चिडले. त्यांनी त्या बारा कारकूनांना चार दिवस कैदेत ठेवले. त्यांच्या जवळचे जप्तीहुकूम फाडून टाकले आणि त्यांना सोडून दिले. युवराजांनी झाला प्रकार कर्नाटकात महाराजांच्या कानावर घातला. परंतु महाराजांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून युवराजांना सबुरीचा सल्ला दिला.

महाराजांच्या सबुरीच्या सल्ल्यामुळे आपल्यावर लागोपाठ अन्यायामागून अन्याय होत आहे अशी युवराजांची भावना झाली. त्यात महाराजांनी युवराजांना सज्जनगडावर समर्थांच्या सान्निध्यात जाण्याची आज्ञा केली. त्यामुळे युवराज अधिकच बेचैन झाले आणि महाराजांचा हुकूम पाळून ते सज्जनगडावर गेले. परंतु तेव्हा समर्थ रामदास स्वामी गडावर नव्हते. त्या संधीचा फायदा घेऊन युवराज संभाजीराजे दिलेरखानास मिळाले.

स्वराज्याचा पहिला युवराज असून मोगलांना मिळण्याचा विचार करणे हे संभाजी राजांचे नैतिक पतन होते हे मान्यच करावे लागेल. कदाचित प्राप्त परिस्थितीचा तो विजय असेल. कदाचित शंभूराजांवर महाराजांनी आजवर केलेल्या संस्कारांचा पराभव असेल किंवा रायगडाच्या कारकुनांनी मारलेल्या लेखणीच्या फटकाऱ्याची जीत असेल. परंतु स्वराज्य निर्मात्याच्या ज्येष्ठ पुत्राने शत्रूस मिळणे ही त्या पुत्राची चूकच ठरते. अर्थात मानसिक कमकुवतपणा आणि अपरिपक्वता यामुळे भावनेच्या भरात घडलेला तो अपराध होता असे म्हणावे लागते.

हे युवराज प्रकरण इतके सविस्तर तपशीलवार सांगण्याचे कारण या प्रकरणाने महाराज मानसिकदृष्ट्या खचले असण्याची शक्यता आहे. त्यांच्या सर्व आशा अपेक्षा युवराज संभाजी राजांभोवती एकवटल्या होत्या. महाराजांनी फार पूर्वीपासून संभाजीराजांना युवराज, स्वराज्याचा उत्तराधिकारी म्हणून पाहिले

होते. संभाजीराजांना अनुभवसंपन्न करण्यामागे महाराजांचा हाच स्पष्ट हेतू दिसतो. त्या सर्वांवर युवराजांच्या मोंगलांना मिळण्याने पाणी फिरणार होते. मोगलांना मिळालेला युवराज कोणालाच मान्य होणार नव्हता. युवराजांच्या विरोधात असलेला अनोजींचा गट प्रबळ ठरला होता.

संभाजीराजे हे सज्जनगडावरून माहुलीला तीर्थस्नानासाठी म्हणून बाहेर पडले ते सरळ दिलेरखानाच्या रहिमतपूरच्या छावणीत दाखल झाले. दिलेरखान संभाजी राजांची वाट पाहात होता. युवराज येत असल्याची त्याला खबर होती. दिलेरखानाने युवराजांचे जंगी स्वागत केले. अनेक वर्षानंतर जीवलग मित्र भेटावेत तसा तो युवराजांना भेटला. रहिमतपूरच्या छावणीत खास सजवलेल्या तंबूत युवराजांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. रोज शाही खाने दिले जात होते. दिलेरखान दक्षिणेचा सुभेदार या नात्याने रोज एका नव्या सरदारास संभाजीराजांस भेटवित होता. ओळख करून देताना 'आप है दख्खनके शेर' किंवा 'आप है दख्खनके मालिक' असा उल्लेख करीत होता. दिलेरखान संभाजीराजांचा शब्द झेलायला तयार होता. दिलेरखानाने युवराजांना सप्तहजारी मनसब बहाल केली.

दिलेरखान हे सारे स्वत:च्या स्वार्थासाठी करीत होता. दिल्ली दरबारातले त्याचे वजन कमी झाले होते. इतके दिवस दक्षिणेत राहून त्याने मराठ्यांविरुद्ध काहीच केले नव्हते. त्याच्यावर दरबारचा खर्च होत होता. पण फायदा काहीच होत नव्हता. औरंगजेबाच्या दृष्टीने दिलेरखान मक्कार होता. आता युवराज त्याच्याकडे आल्याने त्याचे दिल्ली दरबारातले वजन वाढणार होते. संभाजीराजांना तो जोवर ताब्यात ठेवू शकेल तोवर हे वजन वाढलेले राहणार होते. जर त्याने संभाजी राजांना औरंगजेबाच्या ताब्यात दिले तर तो त्याचा विनाश होता. औरंगजेबाच्या धोरणाप्रमाणे त्याने दिलेरखानाचा मिर्झाराजे केला असता. संधी साधून त्याला संपवून टाकले असते. हे दिलेरखान जाणून होता. त्यामुळे काहीही झाले तरी तो युवराजांना औरंगजेबाच्या ताब्यात देणार नव्हता. शिवाय आता स्वराज्याच्या युवराजांना पुढे करून त्याला मराठी मुलुखावर हल्ले करता येणार होते.

त्याचाच एक भाग म्हणून युवराजांना पुढे ठेवून त्याने भूपाळगडावर स्वारी करण्याचा बेत आखला. भूपाळगड ऊर्फ बाणूरगड हा सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या तालुक्याच्या सीमेवर रेवागिरी डोंगरात आहे. अफझलखानाच्या वधानंतर महाराज कोल्हापूरपर्यंत किल्ले जिंकत गेले तेव्हा त्यांनी हा बाणूरगड जिंकून घेतला व त्याचे नाव

भूपाळगड ठेवले होते. सीमेवरचा गड म्हणून त्यावर फिरंगोजी नरसाळासारखे खंदा वीर किल्लेदार नेमला होता. संभाजीराजे लहान असताना फिरंगोजीच्या अंगाखांद्यावर खेळले होते. दिलेरखानाने संभाजीराजांना समोर ठेवून भूपाळगडावर हल्ला चढविला. चाकणचा मातीचा भुईकोट संग्रामगड ५५ दिवस लढविणारे फिरंगोजी भूपाळगड सहज लढवू शकले असते. परंतु ज्याला पूर्वी अंगावर खेळवले त्या युवराजांना समोर पाहताच फिरंगोजींचे अवसानच गळाले. त्यांनी युवराजांवर तोफ न डागता गड खाली करून दिला. दिलेरखानाने गडावरच्या सातशे निरापराध लोकांचे हात पाय तोडले.

दिलेरखानाचे हे क्रौर्य पाहून संभाजीराजांना उबग आला. ते दिलेरच्या अंगावर धावून गेले. पुढे दिलेरने अथनीची बाजारपेठ लुटली तेथेही अनन्वित अत्याचार केले. ते पाहून संभाजीराजांना स्वराज्याची किंमत कळली. स्वराज्यात असले काहीही नव्हते. संभाजीराजांना आता पश्चाताप होऊ लागला. येथून निघून जाण्याचा विचार त्यांच्या मनात घोळत होता.

महाराजांचे थोरले जामात महादजी निंबाळकर हे दिलेरच्या छावणीत होते. त्यांना महाराजांनी आपली थोरली कन्या सखूबाई दिली होती. त्याचप्रमाणे महादजी हे महाराजांचे मेव्हणे बजाजी निंबाळकर यांचे पुत्र होते. रक्ताचे नाते होते. महाराजांनी महादजी मार्फत संभाजीराजांशी संधान बांधले. युवराजांनी स्वराज्यात परत यावे म्हणून स्वत: महाराज आणि शृंगारपूरहून येसूबाई प्रयत्न करीत होतेच. साऱ्यांच्याच प्रयत्नांना यश आले आणि एके रात्री संधी साधून संभाजीराजे दिलेरखानाच्या छावणीतून निसटले. आणि पन्हाळ्यावर हजर झाले. संभाजीराजे डिसेंबर १६७९ मध्ये केव्हांतरी पन्हाळ्यावर परत आले. कारण १३ जाने. १६८० रोजी संभाजीराजे आणि महाराज यांची पन्हाळ्यावर भेट झाली.

संभाजीराजे बरोबर वर्षभर मोगली छावणीत होते. १३ डिसेंबर १६७८ रोजी संभाजीराजे रहिमतपूरला दिलेरखानाच्या छावणीत गेले आणि डिसेंबर १६७९ मध्ये कधीतरी पन्हाळ्यावर हजर झाले. परंतु त्यांची महाराजांची भेट १३ जाने. १६८० रोजी म्हणजे तेरा महिन्यांनी झाली. महाराजांचे आणि संभाजी राजांचे काय बोलणे झाले असेल याबाबत इतिहास काहीच बोलत नाही. स्वराज्याच्या युवराजाने शत्रूस मिळणे ही अत्यंत खेदजनक गोष्ट राजांच्या जीवनात घडल्यामुळे ते स्वत:ला अपराधी समजत असणार आणि याच आघाताने महाराजही मानसिकदृष्ट्या खचलेले असणार. अशावेळी त्या दोघात नेमके काय संभाषण झाले असावे याबाबत इतिहासात विद्यार्थ्यांच्यात उत्सुकता जरूर आहे. परंतु

आपल्याकडे इतिहास लिहून ठेवण्याची पद्धत नसल्याने अशा जागा केवळ तर्कानेच जाणून घ्याव्या लागतात किंवा बखरींचा आधार घ्यावा लागतो.

पन्हाळ्यावर सज्जाकोठीत गुप्तपणे ही भेट झाली. त्यात महाराजांनी संभाजीराजांना काही समजाविण्याचा प्रयत्न केला असेल. संभाजीराजांनीही अपराधी भावनेतून महाराजांकडे क्षमायाचना केली असेल. असे काही नैसर्गिक घडल्यानंतर महाराजांनी संभाजीराजांपुढे राज्याच्या वाटणीचा प्रस्ताव ठेवला. त्याप्रसंगी महाराज म्हणाले 'तू ज्येष्ठ पुत्र थोर झाल्यास आणि स्वतंत्र राज्य कर्तव्य तुझ्या चित्ती आहे. तर मजला हे अगत्य आहे तरी तुजलाही एक राज्य देतो. हे सर्व राज्य आहे यास दोन विभाग करतो. एक चंदीचे राज्य. याची हद्द तुंगभद्रा. तद्वत कावेरी हे एक राज्य आहे. दुसरे राज्य तुंगभद्रा. अलीकडे गोदावरीपर्यंत आहे. ऐसी दोन राज्ये आहेत. त्यास तू वडील पुत्र. तुजला कर्नाटकाचे राज्य देधले. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्ही दोन पुत्र दोन राज्ये करणे. आपण श्रींचे स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतो.'

आपण काही हेतूने हे स्वराज्य निर्माण केले असता त्याची दोन शकले करताना महाराजांच्या मनाला प्रचंड क्लेष झालेले असणार. कदाचित महाराज संभाजीराजांवर चिडले असतील. त्यांनी संभाजी राजांची चांगली झाडाझडतीही घेतली असण्याची शक्यता आहे. पण डॉ. वि. गो. खोबरेकर म्हणतात त्याप्रमाणे महाराजांनी 'आपले मायेचे आणि विश्वासाचे प्रतीक म्हणून मोगलांविरुद्ध लढ्याची आपली खास जबाबदारी संभाजीराजांवर टाकली,' हे खरे वाटत नाही. महाराजांनी संभाजीराजास ताबडतोब मोगली साम्राज्यावरील स्वारीचे अधिपत्य देऊन गौरव केला, हे खोबरेकरांचे विधान पटत नाही. ही त्यांची विधाने बहुधा काफीखानाच्या लिखाणातून आलेली दिसतात.

संभाजीराजांनी महाराजांचे बोल ऐकून घेतले. राज्याची वाटणी करण्याची कल्पना संभाजीराजांनाही आवडली नाही. त्यांनाही केल्या कर्माचा पश्चाताप झाला होता. त्यांनी महाराजास स्पष्ट सांगितले की 'आपणास साहेबांच्या पायाची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायाचे चिंतन करून राहीन.'

त्यानंतर महाराज पन्हाळ्यावरून रायगडी परत आले. त्यांनी राजारामाच्या लग्नाचा बेत केला. पूर्वी प्रतापराव गुजराच्या निधनानंतर महाराजांनी त्यांच्या कुटुंबाला धीर देताना महाराज म्हणाले होते की 'प्रतापरावांची मुलगी पोरकी झाली नाही, तिला आम्ही मांडीवर घेतली आहे.' हे वचन महाराजांना सत्यात आणायचे होते. त्यांनी बोसरे या गावी प्रतापरावांच्या कुटुंबाशी संपर्क करून त्यांची कन्या जानकी हिचा विवाह राजारामाबरोबर निश्चित केला. ७ मार्च

१६८० रोजी राजाराम राजांची मुंज करण्यात आली. त्यानंतर १५ मार्चला राजारामराजांचा विवाह करण्यात आला. भोसले घराण्यात होणाऱ्या या दोन्ही समारंभात सर्व आप्त स्वकीय रायगडावर हजर होते. फक्त संभाजीराजे आणि त्यांचे कुटूंब येसूबाई आणि कन्या भवानीबाई लग्नास हजर नव्हते. सोयराबाई महाराणी साहेबांच्या हट्टामुळे युवराजांना समारंभाचे निमंत्रण पाठविण्यात आले नव्हते. धाकट्या भावाच्या लग्नाला मोठा भाऊ हजर नव्हता. त्याला कळविण्यात आले नाही. याच्यामागे राजकारण होते.

शंभूराजांनी मोगलांना मिळून स्वराज्याचा अपराध केला होता. त्याचा फायदा घेऊन त्यांना राज्याचा वारसा नाकारण्यासाठी सोयराबाई आणि अनोजींचे प्रयत्न चालू होते. महाराजांचे संभाजीराजांविषयीचे मत कलूषित झाले होते. त्याचा फायदा या संभाजीविरुद्ध गटाला घ्यायचा होता. संभाजीराजे दूर पन्हाळ्यावर होते. ते जर या समारंभाच्या निमित्ताने रायगडावर आले असते तर त्यांचा आणि इतर कुटुंबाचा सहवास वाढला असता. त्यातून महाराजांचे मतपरिवर्तन होण्याची शक्यता होती. संभाजीराजे यांच्याकडून तसे प्रयत्न झाले असते. हे विरोधकांना टाळायचे होते म्हणून युवराजांना निमंत्रणच देण्यात आले नाही आणि त्यांच्या गैरहजेरीत दोन्ही समारंभ उरकण्यात आले.

डॉ. खोबरेकर म्हणतात त्याप्रमाणे त्यावेळी संभाजीराजे महाराजांच्या आज्ञेने मोगलांशी लढत असतील तर किमानपक्षी महाराजांची घरातील थोरली सून येसूबाई आणि एकमेव नात भवानीबाई यांना तरी रायगडावर आणायला हवे होते. परंतु त्यांनाही आणलेले दिसत नाही. याचा अर्थ महाराजांनी युवराजांना ते पन्हाळ्यावर असून निमंत्रण दिले नव्हते हाच होतो.

राजाराम-जानकीचे लग्न खूप थाटामाटात साजरे झाले. राजघराण्यातील या लग्नाला सर्व आप्तस्वकीय जातीने हजर होते. महाराजांचे सर्व जावई-मुली व्याही सारे राजारामाच्या मुंजीपासून विवाहापर्यंत प्रत्येक समारंभात हजर होते. स्वत: सोयराबाई राणीसाहेब वरमाय म्हणून मिरवत होत्या. लग्नकार्यात कोणाला काही कमी पडू नये याची जातीने काळजी घेत होत्या. सर्व निमत्रितांचे योग्य ते मानसन्मान करण्यात आले. प्रत्यक्ष विवाह १५ मार्च रोजी पार पडला. त्यानंतर एक एक करून सर्व पाहुणे मंडळी आपापल्या घरी परतली. सर्वात शेवटी गुजरांकडची मंडळी गड सोडणार होती. गुजर मंडळी २३ मार्चला जाणार असल्याने २२ तारखेला त्यांच्यासाठी मेजवानीचा बेत होता. नवी सून जानकीसुद्धा शहाणी होईपर्यंत गुजरांकडेच माहेरी राहणार असल्याने तिचे कोडकौतुक केले जात होते. त्याच रात्री महाराज शयनगृहात गेले, तेव्हा त्यांना

ज्वराची भावना होऊन बेचैन वाटू लागले.

त्याही अवस्थेत दुसऱ्या दिवशी महाराज व्याह्यांना निरोप देण्यासाठी गडाच्या मुख्य दरवाज्यापर्यंत गेले. परंतु तेवढ्यानेही महाराजांना श्रमाचा थकवा जाणवू लागला. राजवैद्यांना पाचारण करण्यात आले. वैद्यराजांनी नाडीपरीक्षा करून अतिश्रमामुळे ज्वर आल्याचे निदान केले. ते खरेही असू शकत होते. कुटुंबातील एवढे मोठे कार्य पार पाडताना पुरेशी विश्रांती मिळत नाही. खाण्यापिण्यात अनियमितता वाढते आणि परिणामी ज्वर येऊ शकतो. राजवैद्यांनी उपचार सुरू केले. पथ्यपाणी सांगितले, विश्रांतीचा सल्ला दिला आणि लवकरच महाराजांना आराम पडेल याची ग्वाही दिली.

राजांच्या शयनगृहातील राबता बंद करण्यात आला. शयनगृहाबाहेर महाराजांचा विश्वासू महादबा दिवसरात्र पहारा देत होता. महाराणींच्या हुकूमाशिवाय कोणालाही महाराजांपर्यंत जाऊ दिले जात नसे. महाराजांना पूर्ण आराम पडावा यासाठी ही काळजी घेतली जात आहे असा आभास निर्माण केला गेला होता. महाराणी दिवसाचा अधिकतर वेळ महाराजांच्या शयनगृहात काढत होत्या. वैद्यराजांनी महाराजांना दिलेले काढे, चाटण, चूर्ण वेळच्यावेळी दिले जाण्याची पूर्ण दक्षता महाराणी घेत होत्या. चार-पाच दिवस वेळेवर औषधे घेऊन आणि विश्रांती घेऊनही महाराजांच्या प्रकृतीत फरक पडत नव्हता. या उलट दुखणे दिवसेंदिवस वाढतच होते. इतर राणीवश्याला महाराजांपासून दूर ठेवण्यात आले होते. पुतळाबाई राणीसाहेब तर पाचाडला होत्या. फक्त राजारामराजे दिवसातून एकदा महाराजांच्या मुजऱ्याला येत होते.

महाराजांचे दररोजचे वाढते दुखणे पाहून महाराजांना काहीतरी मोठा आजार असावा असे वाटले असावे. त्यांनी एक दिवस महाराणींना सांगितले की पन्हाळ्यावर स्वार पाठवून संभाजीराजांस व येसूबाईंस बोलावून घ्यावे तसेच गडाखाली पाचाडला पालखी पाठवून पुतळासही बोलावून घ्यावे.

पण, दोन दिवस झाले तरी न स्वार पन्हाळ्यावर गेला ना पालखी गडाखाली गेली. खरे तर ही माणसे महाराजांची मायेची माणसे होती. त्यांची भेट झाली असती तर महाराजांच्या प्रकृतीने थोडा आरामच पडला असता. परंतु महाराणींना युवराजांना गडावर येऊ द्यायचेच नव्हते. तर पुतळाबाईंना आणण्यासाठी पालखी गडाखाली गेली असती तर महाराजांच्या प्रकृतीबाबत बातमी सर्वत्र पसरली असती. हे महाराणींना व्हायला नको होते.

महाराजांनी महाराणींना विचारून पाहिले की पन्हाळ्यावर स्वार गेला का? आणि पुतळाबाई अजून कशा आल्या नाहीत? तर त्यावर महाराणींनी

उडवाउडवीची उत्तरे दिली. महाराज बरेच काही समजून चुकले. महाराज अधिकच बेचैन झाले. त्या रात्री महाराजांना रक्ताची उलटी झाली. वैद्यराजांना पाचारण करण्यात आले. वैद्यराजांनी महाराजांची नाडी पाहून महाराणीस शयनगृहाबाहेर जाण्यास सांगितले. थोड्या नाखुशीनेच त्या महालाबाहेर जाताच वैद्यराजांनी महाराजांना स्पष्टच विचारले की, त्यांनी काही अभक्ष भक्षण केले आहे का?

महाराज सर्व काही समजले. त्यांनी वैद्यांना या निदानाबाबत गुप्तता राखण्यास सांगितले. कारण राजकारणाच्या दृष्टीने ही बातमी बाहेर फुटणे धोक्याचे होते. महाराजांची फार इच्छा होती की युवराजांना आणि युवराज्ञींना भेटावे. पण मराठ्यांच्या छत्रपतीला ते प्राप्त परिस्थितीत शक्य नव्हते. या आजारपणामुळे त्यांचे जगणेच परस्वाधीन झाले होते. पुतळाबाईंवर महाराजांचे अधिक प्रेम होते. पुतळाबाई महाराजांच्या पत्नीपेक्षा भक्त अधिक होत्या. त्यांच्या दृष्टीने महाराज त्यांचे दैवत होते. त्यांना महाराजांच्या आजारपणाची बातमी लागली असती तर त्या धावत आल्या असत्या. परंतु त्यांनाही गडाखाली कळले नाही, इतकी रायगडाची गुप्तता पाळण्यात येत होती.

प्राप्त परिस्थितीत आपण काहीही करू शकत नाही हे एकदा कळले की आहे त्या परिस्थितीला स्वीकारण्यात शहाणपणा असतो हे महाराज जाणत होते. महाराज परिस्थितीला शरण गेले. नियतीच्या मनात असेल तेच घडेल असा दैववादी विचार मनात पक्का केला. अगदी कारकिर्दीच्या सुरुवातीपासून हे राज्य होणे ही श्रींची इच्छा आहे असे महाराज मानत आले होते. आम्ही हे राज्य निर्माण केले, हे राज्य ही आमची मालमत्ता आहे असा विचार महाराजांनी आयुष्यात कधीच केला नव्हता. हे रयतेचे राज्य आहे आणि ते निर्माण होणे ही श्रींची इच्छा आहे यावर महाराजांचा पूर्ण विश्वास होता. अगदी सुरुवातीपासून महाराजांची ही अलिप्ततेची भावना असल्याने एक चांगले झाले. स्वराज्याचे पुढे काय होणारा ही चिंता महाराजांना बिलकूल नव्हती. हे राज्य जर श्रींनी निर्माण केले आहे तर ते टिकवण्याची जबाबदारीही श्रींची आहे. श्री ते टिकविण्यास समर्थ आहेत हा विचार महाराजांच्या मनात पक्का होता. त्याचबरोबर हे राज्य रयतेचे आहे हा विचार महाराजांच्या मनाबरोबर रयतेतही रुजला होता. रयत हे आपले राज्य मानीत होती. स्वराज्य वाढावे टिकावे ही लोकांची इच्छा होती. स्वराज्याचे सर्व फायदे रयतेने अनुभवले होते. त्यामुळे रयतच पुढे येऊन हे राज्य टिकवील हा विश्वास होता. त्यामुळे महाराजांना राज्याबाबत बिलकूल चिंता नव्हती.

मराठ्यांचे राज्य बुडवायला टपलेल्या औरंगजेबाबाबत महाराजांना काळजी होती. एक ना एक दिवस औरंगजेब दक्षिणेत उतरणार हे सूर्य प्रकाशाएवढे स्वच्छ होते. ती लढाई निर्णायक लढाई असणार होती. त्यातून जे स्वराज्य वाचेल ते खरे स्वराज्य असे महाराज नेहमी म्हणत असत. औरंगजेब उत्तरेत सैन्याची जमवाजमव करीत आहे याच्या बातम्या हेरांकडून मिळाल्या होत्या. त्यासाठी आणखी पाच वर्षे आयुष्य मिळायला हवे होते, असे विचार महाराजांच्या मनांत येत होते.

रामायणातील राजा दशरथाच्या मृत्यूला जशा महाराणी कैकयी कारणीभूत ठरल्या, त्याप्रमाणे महाराजांच्या आजच्या परिस्थितीत महाराणी सोयराबाईंच कारण ठरल्या आहेत. दोघींनीही आपला मुलगा राज्यावर यावा असे वाटत होते. वास्तविक आपला पुत्र कर्तृत्ववान, बलवान, सामर्थ्यवान बनावा असे मातेला वाटण्यात गैर काहीच नाही. परंतु त्यासाठी त्यांनी स्वीकारलेला मार्ग चुकीचा आहे. राज्याभिषेक समयी सोयराबाई राणीसाहेब महाराणी झाल्या होत्या. परंतु तेवढ्यावर त्या समाधानी नव्हत्या. त्यांना राजमातेची स्वप्ने पडू लागली होती. त्या स्वप्नरंजनात इतक्या रंगल्या की त्यांना वास्तवाचे भान उरले नाही.

वास्तविक परिस्थिती स्वप्नाहून अगदी भिन्न होती. संभाजी राजेच युवराज पदाचे खरे दावेदार होते. ते महाराजांच्या थोरल्या पत्नीचे पुत्र असून थोरले होते. राजारामपेक्षा ते तेरा वर्षांनी वडील होते. ते कर्तबगार होते. त्यांना युद्धाचा, राजकारणाचा, फडावरच्या कारभाराचा अनुभव होता. शिवाय त्यांच्या नावाला रयतेचा आणि फौजेचा पाठिंबा होता. त्यांना पूर्वी युवराजपद जाहीर झाले होते. त्यांच्यापुढे राजारामाची बाजू एकदम कमकुवत होती. केवळ मातेच्या मायेपोटीच त्यांचे नाव युवराज पदासाठी पुढे आले होते. ते जेमतेम दहा वर्षांचे होते. अननुभवी होते. मातेच्या अति जपणुकीने शारीरिकदृष्ट्याही ते कमकुवत होते. त्यांच्यात निर्णयक्षमता नव्हती. केवळ मातेच्या आज्ञा पाळणे आणि प्रत्येक प्रसंगी आज्ञेसाठी मातेकडे पाहणे एवढेच त्यांना जमत होते. त्यांच्या हाती स्वराज्य सुरक्षित नव्हते.

महाराज फेब्रुवारी १६८० मध्ये पन्हाळ्यावरून रायगडावर परत आले. लगेच ७ मार्चला महाराजांनी राजाराम राजांची मुंज केली. पुढे आठच दिवसांनी त्यांनी कै. प्रतापराव गुजरांच्या जानकीशी राजारामराजांचा विवाह लावून दिला. या लग्नाचा महाराजांना शीण झाला आणि आठवडाभरात महाराज आजारी पडले. २३ मार्च ते ३ एप्रिल असे फक्त दहा दिवस महाराज आजारी होते. ३

एप्रिल १६८० रोजी रायगडावर महाराजांचे निधन झाले. महाराष्ट्रालाच नव्हे तर भारतखंडाला अभिमान वाटावा, असे छत्रपती शिवाजी महाराज आपल्यातून निघून गेले.

या दहा दिवसाच्या आजारपणात महाराज कोणालाही भेटू शकत नव्हते. अगदी जवळच महाली राहणाऱ्या इतर पत्नींशीही त्यांना भेटू दिले जात नव्हते. युवराज संभाजीराजे आणि राजस्नुषा येसूबाई पन्हाळ्यावर होते. त्यांना न महाराजांच्या आजारपणाची खबर होती ना त्यांच्या निधनाची. महाराजांच्या प्रकृतीबद्दल युवराजांना पूर्ण अंधारात ठेवण्यात आले होते. पुतळाबाई राणीसाहेब गडाखाली पाचाडला असून त्यांनाही यातील काहीही कळू दिले नव्हते. गडावर पूर्ण ताबा हा सोयराबाईंचा होता. बहुतेक मंत्री निरनिराळ्या मोहिमांवर रायगडापासून दूर होते. या अनभिषिक्त राजाच्या देहाला मंत्राग्नी मिळू शकला नाही. वडीलपुत्र कर्ता असून साबाजी भोसले शिंगणापूरकर याच्या हातून महाराजांच्या देहाला अग्नी देण्यात आला. ही सर्व व्यवस्था महाराणी सोयराबाईंच्या आज्ञेने आणि पुढाकाराने करण्यात आली. महाराजांच्या देहाला मंत्राग्नी देण्यासाठी गडाखालून किरवंत आणावे लागले असते. त्यात महाराजांच्या निधनाची वार्ता पसरली असती. म्हणून ही सर्व काळजी घेण्यात आली होती. ही सर्व तत्कालीन परिस्थिती पाहता महाराजांचा मृत्यू नैसर्गिक नसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाराजांच्या मृत्यूविषयी नक्की कारण सांगणे कठीण असले तरी बखरकारांनी नोंदविल्याप्रमाणे गुडघेरोगाने दहा दिवसात मृत्यू येणे अशक्य आहे. गुडघेरोगाने फार तर रोगी विकलांग होवून काही वर्षे जगू शकेल, परंतु इतका तडकाफडकी मृत्यू संभवत नाही. रक्ताची उलटी होऊन महाराजांचा आजार बळावला हे सत्य आहे. अर्थात रक्ताची उलटी ही हृदरोगात, विषप्रयोगात आणि पागेमध्ये घोड्यांशी अधिक संपर्क आल्यास होण्याची शक्यता असते. त्याबाबत इतिहास अबोल आहे. परंतु महाराजांच्या मृत्यूसमयीची रायगडावरची एकूण परिस्थिती आणि महाराजांच्या निधनानंतर रायगडावर घडणाऱ्या गोष्टींचा विचार करता महाराजांचा मृत्यू हा राजकारणाचा बळी असावा असे समजण्यास वाव आहे. पूर्वी जाने.-मार्च १६७६ मध्ये महाराज साताऱ्यास गेले असता पन्हाळ्यावर बरेच आजारी होते. तेव्हाही विषप्रयोगाने महाराजांचा काळ झाला अशी अफवा पोर्तुगिज पत्रातून पसरली होती. म्हणजे ही कल्पना नवीन नव्हती.

महाराजांचे निधन झाले म्हणजे हे महाराजांचे चरित्र येथेच संपवायला हवे.

त्यांच्या मृत्यूपश्चात रायगडावर आणि रायगडावरून काय काय घडले याची दखल येथे घेण्याची गरज नाही, याचे भान ठेवूनही पुढील काही घटना येथे सांगणे गरजेचे आहे. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे पुढे घडलेल्या काही घटनांमधून महाराजांचा मृत्यू कशासाठी झाला असावा याचा तर्क करता येतो आणि दुसरे कारण म्हणजे या अनभिषिक्त राजाला मंत्राग्नी देऊन त्यांच्या आत्म्याला सद्‌गती मिळवून देण्यात आली तसेच त्याच दिवशी महाराजांच्या पत्नी पुतळाबाई साहेब सती गेल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर रायगडावरील राज्यकारभाराची सर्व सूत्रे महाराणी सोयराबाई यांनी हाती घेतली. रायगडचे हवालदार कान्होजी भांडवलकर यांना महाराणींनी आपल्या बाजूला वळवून घेतले होते. त्यांना आणि सरकारकूनांना गडाची पूर्ण नाकेबंदी करण्यास सांगितले. त्यामागे महाराणींचा हेतू हा होता की लवकरात लवकर राजाराम महाराजांस राज्यपदावर बसवावे. महाराणींनी अनोजी दत्तो यांना राजाराम महाराजांच्या राज्यारोहणाची व्यवस्था करण्यास सांगितले. त्यांच्या मदतीस राहुजी सोमनाथ आणि हिरोजी फर्जद यांना देण्यात आले. महाराणींनी सर्वाधिकार स्वतःच्या हाती घेतले असल्यामुळे इतर मंत्र्यांची संमती मिळविणे त्यांना कठीण गेले नाही. त्यानंतर सोयराबाईंनी राजारामाचे दि. २१ एप्रिल १६८० रोजी राज्यारोहण केले. आता अडचण फक्त युवराज संभाजीराजांची होती. महाराजांच्या निधनाची वार्ता संभाजी राजांपासून लपवून ठेवण्यात आली असली तरी आज ना उद्या त्यांना ती बातमी कळेल आणि युवराज बखेडा उभा करतील. त्यासाठी त्यांना पन्हाळ्यावरच कैद करणे आवश्यक होते.

संभाजीराजांना पन्हाळ्यावरच कैद करण्यासाठी पन्हाळ्यावर दोन पत्रे जासूद खंडूजी याचे मार्फत पाठविण्यात आली. त्यातील एका पत्रात रायगडाची खुशाली कळविण्यात आली होती. रायगडावर सर्व काही ठीक असल्याचे खोटेच कळविण्यात आले होते. तर दुसरे पत्रात पन्हाळ्याच्या किल्लेदारास गुप्तपणे आज्ञा होती की त्यांनी बेसावध क्षणी संभाजीराजांस आणि येसूबाईस पकडून कैद करावे. अशा प्रकारे दोन वेगवेगळी पत्रे पन्हाळ्यावर पाठविण्यात आली. परंतु जासूद खंडूजीकडून संभाजीराजांस रायगडावरील सर्व प्रकार कळला. महाराजांचा मृत्यू आणि त्या पश्चात रायगडावर घडलेल्या घटना युवराजांना समजल्या. जासूदास दरडावल्यावर त्यांनी सर्व काही सांगून टाकले. युवराजांना आता स्वस्थ बसून चालणार नव्हते. जे करायचे ते भराभर करायला हवे होते. त्यांनी प्रथम पन्हाळ्याच्या किल्लेदारास कैद करून पन्हाळ्याचा ताबा

आपल्याकडे घेतला. त्याचप्रमाणे कऱ्हाडजवळ फौजेची छावणी करून असलेल्या सेनापती हंबीरराव मोहिते यांना पत्र पाठवून घडला प्रकार सांगून त्यांना आपल्या बाजूस वळविले. वास्तविक हंबीरराव मोहिते हे महाराणी सोयराबाईंचे बंधू होते. म्हणजे राजारामाचे सख्खे मामा होते. त्यामुळे हंबीरराव बहिणीला आणि भाच्याला पाठिंबा देतील असे वाटत होते. परंतु तसे घडले नाही. त्यांनी न्याय्य बाजू संभाजीराजांची आहे हे जाणून संभाजीराजांना पाठिंबा दिला. २४ फेब्रु. १६७४ रोजी पूर्वसेनापती प्रतापराव गुजर नेसरीच्या युद्धात पडताच त्यांच्या जागी शिवाजी महाराजांनी ८ एप्रिल १६७४ रोजी हंबीररावांना सरसेनापती केले. ते मेव्हणे होते म्हणून नव्हे तर त्यांच्या गुणांची पारख करून महाराजांचे आणि हंबीररावांचे मित्रत्वाचे नाते होते. बरेचदा महाराज हंबीररावांजवळ आपले मन मोकळे करीत असत. व्यथा सांगत असत.

केवळ नात्याचा आधार घेऊन महाराणींनी हंबीररावांचा पाठिंबा राजारामासच आहे असे गृहित धरले होते. परंतु हंबीरराव मोहिते हे स्वामीनिष्ठ ठरले. महाराणींनी राजारामाचे आज्ञापत्र देऊन अनोजीपंत आणि मोरोपंत यांना पन्हाळ्यावर संभाजीराजास कैद करण्यासाठी पाठवले. त्यांना हेही सांगण्यात आले होते की त्यांनी प्रथम कऱ्हाडला हंबीररावाची भेट घेऊन त्यांच्या कानावर सर्व गोष्टी घालून त्यांच्या सवे पन्हाळ्यावर जावे. सोबत अनोजींची पाच हजार फौजही होती.

ऐनवेळी सेनापती हंबीररावानी कटात सामील होण्यास नकार देऊन राज्याचे हित पाहिले. राजारामाच्या हाती स्वराज्य सुरक्षित राहू शकत नाही, हे जाणून त्यांनी अनोजीपंत आणि मोरोपंत या दोघांसच कैद करून युवराज संभाजीराजांसमोर उभे केले. रायगडावरील कटात अनोजीपंत प्रमुख पुढारी होते. त्यांच्या पायात जड बेड्या घालून त्यांना व मोरोपंतास संभाजीराजांनी कैदेत टाकले. प्रजेचा आणि फौजेचा पाठिंबा संभाजीराजास होता.

त्यानंतर वीस हजार फौज घेऊन संभाजीराजांनी रायगडावर कूच केले. सोबत पिलाजीराव शिर्के, हंबीरराव आणि दोन्ही कैदीही घेतले. १८ जून रोजी संभाजीराजांनी रायगड ताब्यात घेतला. रायगडावरचे महाराणींचे पहारे उठविण्यात आले. सर्व कटवाल्यांना कैद करण्याचे काम पिलाजीराव शिर्के यांनी केले. संभाजीराजांच्या हुकूमाने मातोश्री सोयराबाईंना नजरकैद झाली. तसेच राजाराम राजांना नजरकैदेत न ठेवता त्यांचा कोणी गैरफायदा घेऊन आणखी कटकारस्थाने करू नयेत यासाठी काळजी घेण्यात आली. सर्व बंदोबस्त केल्यावर २० जुलै रोजी संभाजीराजांनी मंचकारोहण केले. त्यानंतर २७ जून

संभाजीराजांनी वडीलपुत्र या नात्याने आबासाहेबांचे विधीयुक्त अंत्यसंस्कार केले. महाराजांच्या देहाला मंत्राग्नी देण्याचा विधी किरवंत ब्राह्मणाकडून करवून घेतला. त्यावेळी पुतळा मातोश्री सती गेल्या. त्यांना सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा संभाजी महाराजांनी खूप प्रयत्न केला. परंतु पुतळाबाई राणीसाहेबांचा निश्चय ठाम होता. पुतळाबाई राणीसाहेब या महाराजांच्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांची महाराजांवर नितांत भक्ती होती. त्या अत्यंत सालस आणि समंजस होत्या. त्यांना अपत्य नसल्याने त्या शंभूराजांनाच आपले पुत्र मानून पुत्रवत प्रेम करीत होत्या. त्याचा बहुतेक काळ हा पाचाडच्या वाड्यात गेला. कारणपरत्वेच त्यांचे गडावर येणे होत असे. संभाजीराजांना आणि येसूबाईंना पुतळाबाईंचा आधार वाटे. २७ जूनला महाराजांचे जोडे उराशी कवटाळून त्या सती गेल्या. भोसले घराण्यात सती जाणाऱ्या त्या पहिल्या स्त्री असाव्यात. यापूर्वी भोसले घराण्यात कोणी सती गेल्याची नोंद नाही. त्या समयी शंभूराजांनी विपूल दानधर्म केल्याची नोंद आहे.

■

# महाराजांचे पर्यावरण धोरण

नंतरच्या काळात जरी आपली पर्यावरणपूरक दृष्टी कमी झाली असली व त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास आपल्याकडून होत गेला आणि सृष्टीतील पर्यावरणाचा तोल ढासळला असला तरी साडे तीनशे वर्षांपूर्वी शिवराय या बाबतीत खूप जागृत होते असे दिसते. नाहक वृक्षतोड झाली तर स्वराज्यात पर्जन्यमान कमी होऊन स्वराज्यात दुष्काळ येऊ शकतो याची महाराजांना पूर्ण जाण होती असे दिसते. स्वराज्यातील जंगलात वृक्षतोड होऊ नये म्हणून वनरक्षकांच्या नेमणुका केल्या होत्या.

पन्हाळा, राजगड, रायगड, कोंढाणा यांसारख्या मोठ्या गडावर प्रत्यक्ष शेती केली जात होती. त्यासाठी या गडांवर वृक्ष लागवड केली होती. तसेच बगिचे करण्यात आले होते. पन्हाळ्यावर आजही तबकउद्यान त्याची साक्ष देते. कचरा साठवून त्यापासून खत तयार करण्याची कला तेव्हाही अवगत होती.

अनेक गडावर आजही शौचकूपांचे अवशेष आजही दिसतात. त्यांचा वापर राज कुटुंबाकडून व फौजेकडून केला जात असे. जमिनीत चर खणून त्यावर दगडी शिला रचून शौचालय बनवले जात असे. आज काळाच्या ओघात त्यांचे दरवाजे दिसत नसले तरी ही शौचालये जेथे जेथे महाराजांचे वास्तव्य होते त्या त्या ठिकाणी दिसतात.

१६५६ मध्ये महाराजांनी जेव्हा आरमार बांधणीचा विचार केला, तेव्हा प्रथम नौका बांधणीसाठी लागणाऱ्या लाकडाचा विचार केलेला दिसतो. आरमार बांधणीसाठी जितका समुद्रकिनारा आवश्यक असतो, तितकीच सागाच्या जंगलांची गरज असते. त्याकाळी ठाणे जिल्ह्यात सागाची वने होती, म्हणून महाराजांनी आरमार बांधणीसाठी कल्याण, भिवंडी, वसई ह्या खाड्यांची निवड केली होती. त्याचप्रमाणे प्रत्येक तोडलेल्या झाडाच्या जागी दुसरे त्याच जातीचे

झाड लावावे असा नियम केला. जंगलांचे संवर्धन, संगोपन आणि संरक्षण याकडे महाराजांचे खास नियम व लक्ष असे. जहाज बांधणीसाठी साग, आंबा हे वृक्ष तोडावे लागतात. त्याबाबत महाराजांचा कडक नियम होता की जीर्ण व जुनी झाडेच तोडण्यात यावी. नवी-तरुण झाडे तोडू नयेत. तसेच जंगलात आग वा वणवे लागू नयेत. त्यासाठी वनरक्षक अधिकारी नेमलेले होते. दळवटणे येथील अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात महाराजांनी उंदीर वात पळवतील व गवतास आग लागेल याची काळजी घेण्याची आज्ञा केलेली आपण पाहिली आहे. महाराज पर्यावरणाचा इतका खोलवर विचार करीत होते. महाराजांचा नियम पाहा.

'स्वराज्याच्या अरण्यामध्ये सागवानादी वृक्ष आहेत. त्याचे अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. त्यापेक्षा अधिकचे लागेल ते घरमालकाकडून योग्य मूल्य देऊन खरेदी करून मालकास राजी करून घेऊन यावे. झाडे वाढवण्यास कष्ट पडतात, काळ लागतो. म्हणून मालकास दु:खी करू नये.'

३५० वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचे पर्यावरणाविषयीचे विचार पाहिल्यावर महाराजांचे कौतुक करावे तितके कमीच वाटते.

■

# महाराजांची सावधानता

छत्रपती शिवाजी महाराजांकडे अनेक लोकोत्तर गुण होते. ते गुणही पराकोटीचे होते. त्यांच्याकडे राजकीय दूरदृष्टी होती. ते रत्नपारखी होते, स्त्रियांविषयी त्यांचा दृष्टिकोन त्याकाळी दुर्मीळ होता. सर्वधर्मसहिष्णुता त्यांच्या रक्तात होती. परंतु त्यातील सर्वात महत्त्वाचा स्वराज्य स्थापनेत उपयोगी पडलेला गुण म्हणजे त्यांची सदैव सावधानता. संपूर्ण पन्नास वर्षांच्या आपल्या आयुष्यात महाराज एक क्षणही बेसावध नव्हते.

महाराज जेव्हा एखादी मोहीम ठरवित असत तेव्हा त्यांची एक पंचसूत्री असे. कुठे मोहीम काढायची, काय साध्य करायचे याबाबत महाराजांच्या मनात कल्पना स्वच्छ असे. त्यानंतर त्या मोहिमेचे नियोजन, गुप्तता पाळली जाई. त्यानंतर ठरल्याप्रमाणे अंमलबजावणी आणि हमखास यश ही ती पंचसूत्री होती. गुप्तता इतकी पाळली जात असे की काही बाबतीत ही माहिती फक्त महाराजांना स्वत:ला आणि जिजाऊंनाच ठाऊक असे.

महाराजांनी आपल्या आयुष्यात मोगली मुलुखात, आदिलशाही मुलुखात, कर्नाटकात अशा अनेक मोहिमा काढल्या. जालना, जुन्नर, कारंजा, सुरत अशी अनेक शहरे छापा टाकून लुटली. या प्रत्येक वेळी महाराजांचे जातानाचे आणि येतानाचे मार्ग भिन्न होते. ज्या मार्गाने मोहिमेवर गेलो त्याच मार्गाने परत फिरायचे नाही, तर येताना मार्ग बदलायचा, यावर महाराजांचा कटाक्ष असे. त्यामुळे शत्रूला त्यांचा पाठलाग करणे कठीण होत असे. इतकेच कशाला, महाराजांचे घोडदौड करण्याचे घोडेही सात वेगवेगळे होते. त्या घोड्यांवर महाराजांचे नितांत माया होती. हे सात घोडे म्हणजे मोती, विश्वास, सुरंगी, गजरा, इंद्रायणी, रणबीर आणि कृष्णा होते. महाराज रोज पागेत जाऊन या घोड्यांची चौकशी करीत. यावेळी प्रत्येक घोड्याच्या पाठीवर थाप मारून

त्याचे लाड करीत असत. महाराजांच्या दृष्टीने लढायात अश्व महत्त्वाचे असत. हत्तींना किंमत नसते. ही शिकवण महाराजांना बालपणी शहाजीराजांकडून मिळाली होती.

महाराजांच्या हेरखात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक हा होता. त्याच्यावर महाराजांचा पूर्ण विश्वास होता. कोणत्याही मोहिमेची कल्पना निश्चित करण्यापूर्वी बहिर्जी पाहणी करून अहवाल महाराजांना देत असे. बहिर्जी बेमालूम वेशांतर करण्यात तरबेज होता. त्याला अनेक भाषा अस्खलित बोलता येत असत. बहिर्जीच्या हेरखात्यात एक हजार हरहुन्नरी मावळे होते. त्यांच्यात एक सांकेतिक घुंगराची भाषा असे. प्रत्येक हेराजवळ स्वरक्षणासाठी एक काठी असे. त्या काठीला ठरावीक आकाराची घुंगरे बांधलेली असत. ही काठी उभी आपटून घुंगराचे निरनिराळे आवाज काढले जात असत. ही सांकेतिक भाषा फक्त हेरांनाच समजत असे. त्याचप्रमाणे एका गडावरून दुसऱ्या गडावर बातमी देण्यासाठी निरनिराळ्या रंगाचे धूर केले जात. रात्रीच्या वेळी किल्ल्यावर गवताची गंजी पेटवून निरोप दिले जात असत. कोणती वस्तू पदार्थ जाळल्यावर कोणत्या रंगाचा धूर निघतो हे प्रत्येक गडकऱ्याला ठाऊक असे.

महाराजांनी दोन वेळा सुरत लुटली. त्यापूर्वी बहिर्जी आणि त्याची माणसे २-२ महिने सुरतेत गुप्तपणे राहिले होते. सुरतेचा किल्लेदार कोण आहे, त्याची फौज किती आहे, संरक्षण व्यवस्था कशी आहे, श्रीमंत व्यापारी कोण, त्यातील दानशूर कोण, परकियांच्या वखारी, त्यातील माल, धर्मस्थळे, प्रार्थनास्थळे अशी सविस्तर माहिती बहिर्जीने काढली होती. तो वेशांतर करून सुरतेच्या किल्ल्यातही जाऊन आला होता. त्याचप्रमाणे आग्र्याला जाताना महाराजांचा मार्ग आणि परतीचा मार्ग हा बहिर्जीने पाहणी करून निश्चित केला होता. महाराज आग्र्यात औरंगजेबाच्या कैदेत होते, तेव्हा बहिर्जीची माणसे औरंगजेबाच्या राजवाड्यात शिरून माहिती काढत होती. बाजारात फिरून माहिती काढत होती. हव्या त्या अफवा पसरवित होती, तरी औरंगजेबाच्या हेरांना त्याची कल्पना नव्हती.

महाराज आग्र्याला गेले तेव्हा मिर्झाराजांनी काही आश्वासने दिली आणि त्यांना भुलून महाराज आग्र्याला गेले, असे बिलकूल घडले नव्हते. महाराज पूर्ण सावध होते. महाराजांनी औरंगजेबावर विश्वास टाकण्याचा प्रश्न नव्हता. तो किती क्रूर आणि विश्वासघातकी आहे हे महाराज पूर्ण जाणून होते. महाराजांनी औरंगजेबाला ओळखण्यात कधीच चूक केली नाही. आग्रा भेटीत काही तरी

अघटित घडू शकते याची महाराजांना पूर्ण कल्पना होती.

महाराजांनी उत्तरेत जाताना तीनशे मावळ्यांची फौज आणि तितकेच इतर सेवक, पाणके, पखालीवाले, बाजारबुणगे बरोबर घेतले होते. हे सर्वच्या सर्व उत्तम धारकरी होते. विश्वासू होते. अगदी पाणके पखालीवालेसुद्धा उत्तम वीर होते. वेळ पडली तर हेच सेवक हातात शस्त्र घेऊन लढायला तयार होणार होते. काही प्रसंग आला तर आपल्यासारखी दिसणारी एखादी व्यक्ती असावी म्हणून महाराजांनी हिरोजी फर्जंद यास बरोबर घेतले होते. हिरोजी शहाजीराजांचा दासीपुत्र होता. त्यामुळे हिरोजीत आणि महाराजांच्यात बरेच साम्य होते. दोघेही समवयस्क होते. महाराजांची ही सावधानताच अखेर सुटकेच्या वेळी कामी आली.

१० नोव्हेंबर १६५९ रोजी महाराजांनी प्रतापगडावर अफझलखानाची भेट घेतली होती. तेव्हा महाराजांनी खानाच्या लोभी स्वभावाची दखल घेतली होती. ज्या शत्रूशी सामना घ्यायचा आहे, त्याच्या स्वभावाची माहिती असणेही फायद्याचे ठरू शकते. खानाने पूर्वी बजाजी निंबाळकरला कैद केले होते. बजाजींचा गुन्हा इतकाच होता की ते महाराजांचे मेव्हणे होते. ते सईबाई राणीसाहेबांचे बंधू होते. त्यांची सुटका करण्यासाठी खानाने साठ हजार होनांची लाच घेतली होती. लाच घेऊन खानाने बजाजीस सोडून दिले होते. यावरून खान लोभी आणि लाचखाऊ आहे हे महाराजांनी ओळखले होते. त्यानंतर त्या गोष्टीचा उपयोग करून महाराजांनी खानाशी बोलणी करताना मौल्यवान भेटींची खैरात केली. गोपीनाथपंत बोकिल यांच्याबरोबर प्रत्येक वेळी हिऱ्या मोत्याच्या भेटी पाठवून महाराजांनी खानास प्रतापगडावर येण्यास भाग पाडले होते. शत्रू एकदा कलला की कलंडायला वेळ लागत नाही, हे महाराज पूर्ण जाणून होते. महाराजांनी प्रतापगडावर भेटीसाठी जो शामियाना उभारला होता तोही याच हेतूने ऐश्वर्यसंपन्न केला होता. महाराजांचे ते वैभव पाहून खान दिपला होता. ही महाराजांची सावधानताच होती.

६ एप्रिल १६६३ हा दिवस महाराजांनी शाहिस्तखानाच्या पुण्यातील लाल महालावर छापा टाकण्यासाठी ठरविला, त्याच्या मागे महाराजांचा निश्चित असा एक विचार होता. त्यावेळी मुस्लिमांचे रोजे चालू होते. रोज्यामध्ये सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत निर्जळी उपवास केला जातो आणि रात्री पोटभर मिष्टान्न आणि मांसाहार केला जातो. त्यामुळे साहजिकच रात्री गाढ झोप लागते. ६ एप्रिल हा रोजाचा ६ वा दिवस होता. रात्री पोटभर जेवून छावणीत गाढ झोपलेली असता

छापा टाकला गेला. महाराज नेहमी म्हणायचे की शत्रूवर हल्ला करताना त्यांच्या सणाचा विचार करायला हवा. म्हणजे अपयश येत नाही. शत्रूने जर दसऱ्याच्या दिवशी मराठ्यांवर हल्ला केला तर त्यांना यश कसे मिळणार? सगळ्यांच्याच अंगात वीरश्री संचारलेली असते त्या दिवशी.

याच लाल महालातील छाप्याच्या वेळी शाहिस्तेखानाला ठार केल्यावर सिंहगडावर जाण्यासाठी मराठ्यांना पुरेसा वेळ मिळावा म्हणून बैलांच्या शिंगांना पलोते बांधून त्यांना पळविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मराठ्यांचा पाठलाग करणाऱ्या मोगली फौजेची चांगलीच दिशाभूल झाली.

अशा प्रकारे प्रत्येक मोहिमेच्या वेळी महाराज पूर्ण सावधानता बाळगीत असत. जावळीच्या मोऱ्यांकडून रायरीगड जिंकून घेतल्यावर इतका विस्तीर्ण आणि दुर्गम गड राजधानीसाठी निवडण्यात आला. त्या दृष्टीने रायगड सजविण्यात येत होता. सरकारी इमारती, अष्टप्रधानांच्या कचेऱ्या, वाडे, राजवाडा, राणीमहाल, तलाव, टांके अशी सर्व बांधकामे तयार केली जात होती. हिरोजी इंदळकर हा महाराजांचा स्थापत्यविशारद होता. त्याने ही सर्व बांधकामे आपल्या देखरेखीखाली करून घेतली. महाराज शिवभक्त होते. त्यांच्या देवदर्शनासाठी जगदिश्वराचे मंदिर रायगडावर बांधण्यात आले. हे मंदिर बांधून झाल्यावर महाराज राजी झाले. त्यांनी हिरोजीला बक्षिस काय हवे म्हणून विचारले असता त्यांनी मंदिराला त्यांच्या नावाची शीला बसवण्यासाठी परवानगी मागितली. ह्या मागे त्याचा हेतू आपले चिरकाल राहावे हा नसून महाराजांची पायधूळ आपल्या नावावर पडावी हा होता. आजही जगदिश्वराच्या मंदिराला पायरीला तो दगड आहे ज्यावर कोरले आहे

'सेवेसी तत्पर
हिरोजी इंदलकर'

या जगदिश्वराच्या मंदिराची आणखी एक गंमत आहे. हे मंदिर मुसलमानांकडून फोडले जाऊ नये म्हणून एक काळजी घेण्यात आली आहे. मंदिराचा आकार दुरून मशिदीसारखा दिसतो. मंदिराचा घमट आणि कळस जवळूनच दिसतो. त्यामुळे मुसलमानांना मशिद वाटून ते नमाजासाठी आत गेले होते. मंदिराचे प्रवेशद्वार कमी उंचीचे असल्याने वाकून प्रवेश करावा लागतो. आत गेल्यावर मुस्लिमांना कळले की काफिरांचे मंदिर आहे, ते बाहेर आले. त्यांनी मंदिरातील महादेवाची पिंडी फोडण्याची तयारी केली. परंतु प्रवेशद्वार कमी उंचीचे असल्याने हिंदू देवतेसमोर वाकून जावे लागणार होती. ते मुस्लीम धर्मात दुसऱ्या धर्माच्या देवांसमोर वाकणे हे निषिद्द मानले आहे. म्हणून मग

प्रवेशद्वार फोडून मोठे करण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर प्रवेशद्वारावर कुराणातील आयता कोरलेल्या दिसल्या, त्यावर हातोडा चालविता येत नव्हता. शेवटी मंदिराबाहेर असलेल्या नंदीचे तोंड फोडून त्यांनी समाधान मानले. मुख्य मंदिर सुरक्षित राहिले.

महाराजांची ही सावधानताच महाराजांना प्रत्येक संकटातून वाचवित होती आणि मोठे करीत होती.

# महाराजांचे धार्मिक धोरण

शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण आदर्श होते. कारण त्यांचा हिंदू धर्माकडे आणि इतर धर्मांकडे पाहण्याचा दृष्टिकोन डोळस होता. आंधळेपणाने आपल्या धर्माचा उदोउदो करून परधर्माचा द्वेष करणे हे मोगली धोरण शिवरायांचे नव्हते. त्यांना स्वधर्माचा अभिमान होता. स्वधर्मावर परधर्मीयांकडून झालेले आघात त्यांनी कधीच सहन केले नाहीत. तसेच परधर्मीयांच्या प्रार्थना स्थळांचाही नेहमीच आदर केला. शिवरायांचे राज्य हे केवळ हिंदूंचे राज्य नव्हते. स्वराज्य हे रयतेचे राज्य होते. या रयतेत जसे हिंदू होते तसे इतर धर्मीयही होते. स्वराज्य हे कल्याणकारी राज्य होते. सर्वधर्मीय रयतेचे रक्षण करण्यासाठी शिवराय उभे होते.

शिवरायांना स्वराज्यात अपेक्षित असलेला धर्म हा महाराष्ट्र धर्म होता. त्यामुळे स्वराज्य निर्मितीच्या संपूर्ण प्रक्रियेत जसा हिंदूंचा सहभाग होता. तसाच तो मुस्लिमांचाही होता. सर्वांना सोबत घेऊन 'महाराष्ट्र धर्म वाढवावा,' हे शिवरायांचे ध्येय रामदासांच्या कल्पनेवर आधारीत आहे. हा महाराष्ट्र धर्म वाढवताना जे जे आडवे आले मग ते आदिलशाही, निझामशाही, मोगल असो की, जावळीचे चंद्रराव मोरे, घोरपडे, सुर्वे, दळवी, खेमसावंत असो; त्यांचा शिवरायांनी बंदोबस्त केला.

महाराजांनी पुणे, सुपे, इंदापूरच्या छोट्या जहागिरीचे एवढ्या मोठ्या स्वराज्यात रूपांतर केले ते आदिलशाहीला कुरतडूनच केलेले दिसते. वेळोवेळी आदिलशाही मुलूख ताब्यात घेत घेत आपले राज्य वाढवले असले तरी महाराजांच्या मनात आदिलशाही, कुतूबशाही पूर्ण बुडविण्याचा विचार कधीच आला नाही. दक्षिणेच्या सत्ता अबाधित राहिल्या पाहिजेत, त्यात उत्तरेकडील मोगलांचा शिरकाव होऊ नये असे शिवरायांचे धोरण होते.

त्यासाठीच त्यांनी कर्नाटक स्वारीत कुतूबशहाशी स्नेहसंबंध प्रस्थापित केले. पुरंदरच्या तहानंतर मिर्झाराजांनी आपला मोर्चा आदिलशाहीकडे वळवला तेव्हा महाराजांनी आदिलशाहीला छुपी मदत केलेली दिसते. त्याचवेळी पन्हाळा स्वारीतील पराजयाचे खापर सेनापती नेतोजी पालकर यांस हाकलून देणे आणि तो सरळ आदिलशाहीला मिळणे या घटनेत शिवरायांचे हेच राजकारण दिसते. आदिलशाहीला बळ देण्याचा यामागे विचार असावा.

शिवरायांच्या फौजेत मुसलमान होते. आरमार प्रमुख दौलतखान होता, वकील काजी होता. अंगरक्षकात इब्राहिमखान होता. स्वत:चा जीव धोक्यात घालून आग्र्यात महाराजांचा जीव वाचविणारा मदारी मेहेतर मुस्लीमच होता. असे अनेक मुस्लीम लोक स्वराज्यात होते. कारण त्यांनाही स्वराज्य आपले वाटत होते. महाराजांचा लढा हा हिंदूंवर जिझिया कर लावणाऱ्या औरंगजेबाशी होता. काशी-मथुरा येथील हिंदूंची देवळे जमीनदोस्त करून त्याजागी मशिद उभी करणाऱ्या औरंगजेबाविरुद्ध होता. पण म्हणून औरंगजेबाच्या रागाने महाराजांनी मशिदी पाडून देवळे उभी केली नाहीत. मुस्लिमांचा द्वेष महाराजांनी कधीच केला नाही. याउलट औरंगजेबाला हिंदू द्वेषाचे अधूनमधून झटके येत होते असे दिसते.

महाराजांनी सत्ता हाती असूनही एकाही मुस्लिमाला धर्मांतर करून हिंदू धर्मात घेतले नाही. पण बजाजी नाईक निंबाळकर आणि नेतोजी पालकर यांसारख्या जबरदस्तीने मुसलमान केलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्यासाठी महाराजांनी प्रचंड कष्ट घेतलेले दिसतात. त्याकाळी हिंदू धर्माची दारे परधर्मात जाणाऱ्यांसाठी उघडी होती, पण परधर्मातून परत हिंदू धर्मात येणाऱ्यांसाठी बंद होती. महाराजांनी क्रांतीकारी पाऊल उचलून ही हिंदू धर्माची बंद दारे कायमची उघडली.

महाराजांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक लढाया केल्या. मोगली मुलुखात अनेक लुटी केल्या. परंतु त्यावेळी फौजेला महाराजांची सक्त आज्ञा असे की अशावेळी कोणी मशिदींना धक्का लावू नये, तसेच स्त्रिया किंवा कुराणाची प्रत सापडली तर त्यांचा अवमान कोणीही करू नये. त्यांना सन्मानाने शत्रूकडे पाठविले जावे. याचेच उत्तम उदाहरण महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुंदर सुनेला साडीचोळी देऊन सन्मानाने पाठवून दाखवून दिले आहे. महाराजांच्या या परधर्म सहिष्णूतेचे कौतुक मोगलांचा इतिहासकार खाफीखानानेही केली आहे.

महाराजांचे धार्मिक धोरण हे समजून घेण्याचा विषय आहे. महाराज हिंदू होते. हिंदूधर्माचे पुरस्कर्ते होते, पण इतर धर्मांकडेही ते सहिष्णुवृत्तीने पाहत असत. महाराजांकडे 'अवतारी पुरुष' म्हणून पाहण्यापेक्षा 'जाणता राजा' म्हणून पाहिले, तर महाराजांचे अनेक गुण आदर्श म्हणून आपल्यापुढे राहतील.

# मातृभक्त शिवराय

शिवाजी महाराजांच्या मातोश्री म्हणजे वीरमाता जिजाऊ. या वऱ्हाडातील सिंदखेडराजा येथील सरदार लखुजी जाधवराव यांच्या कन्या. त्यांचा जन्म आणि बालपण सिंदखेडच्या जाधवरावांच्या वाड्यात गेले. त्यांचे वडील लखुजीराव हे मोगलांची आणि नंतर निझामशाहीची आणि नंतर पुन्हा मोगलांची सरदारी करीत होते. त्यामुळे बालपणापासून सुलतानशाहीच्या अन्यायी, अत्याचारी आणि व्यभिचारी वृत्तीचे त्यांना दर्शन होत होते.

ज्या वयात लग्न म्हणजे काय, संसार म्हणजे काय हे कळत नव्हते, त्या वयात त्यांचे लग्न होऊन त्या शहाजीराजांच्या पत्नी म्हणून भोसले कुळात आल्या. त्यानंतर खंडागळे हत्ती प्रकरणात त्यांचे माहेर सुटले. भोसले आणि जाधवराव घराण्यात वैर निर्माण झाले. एक दिवस निझामाच्या दरबारातून परतताना सरदार खंडागळे यांचा हत्ती पिसाळला. त्याने जाधवरावांची माणसे जखमी केली. त्यामुळे चिडून जाऊन जिजाऊंचा भाऊ दत्ताजी खंडागळेवर धावून गेला. खंडागळेला वाचवायला शहाजीराजे आणि त्यांचे चुलत बंधू संभाजी आणि खेळोजी धावले. खंडागळे बाजूला राहिले आणि भोसले-जाधवराव या दोघात झटापट झाली. त्यात संभाजी भोसले यांच्याकडून जिजाऊंचा भाऊ दत्ताजी मारला गेला. परतीच्या वाटेवर असलेल्या लखुजीरावांना ही बातमी समजताच ते परत फिरले आणि त्यांनी सर्वप्रथम शहाजीराजांवर म्हणजे प्रत्यक्ष जावयावरच वार केला. पुढे जाऊन संभाजीस ठार करून दत्ताजीच्या मृत्यूचा बदला घेतला. या घटनेने जिजाऊंचे माहेर सुटले. जिजाऊंनी कोणासाठी रडावे? भाऊ दत्ताजीसाठी की दीर संभाजीसाठी?

शिवजन्माच्या काही महिने आधी २५ जुलै १६२९ रोजी असाच एक प्रसंग घडला. रक्षाबंधनाचा दिवस होता. जिजाऊंचे वडील लखुजीराव, भाऊ

अचलोजी आणि रघूजी आणि भाचा यशवंतराव हे चौघे दौलताबाद किल्ल्यावर सुलतानाला भेटायला गेले होते. सुलतानाची गैरमर्जी झाली. कट आधीच शिजला होता. भर दरबारात या चारही जाधवरावांचे खून पाडण्यात आले. या एका घटनेत चार जाधवराव पुरुष मारले गेले आणि सिंदखेडला त्यांच्या पत्नी सती गेल्या. जिजाऊंचे पूर्वी सुटलेले माहेर आता तुटले. पार उद्ध्वस्त झाले.

सुलतानशाहीचे असले मर्जी-गैरमर्जीचे खेळ जिजाऊंनी अनुभवले होते. त्यामुळे त्यांच्या मनात लहरी अन्यायी मुस्लीम राजवटींविषयी चीड निर्माण झाली होती. कोणीतरी हे संपवायला पाहिजे. रयतेच्या सुखासमाधानाचे, न्यायाचे, सत्याचे राज्य यायला हवे हेच विचार जिजाऊंच्या मनात सारखे घोळत होते.

त्या काळात अनेक मराठी सरदार, जहागीरदार, वतनदार घराणी महाराष्ट्रात होती. परंतु ही घराणी वतने मिळावी, मिळालेली सुरक्षित रहावी या स्वार्थी हेतूने मुस्लीम शाह्यांना शरण गेली होती. लाचार झाली होती. त्यांची अन्यायाविरुद्ध शक्तीच नष्ट झाली होती. त्यामुळेच खंडागळे हत्ती प्रकरण किंवा जाधवराव हत्या प्रकरण उद्भवत होते.

ही परिस्थिती पाहून व्यथित झालेल्या जिजाऊ शहाजीराजांना स्वतंत्र व्हायला सांगत होत्या. त्यांना शहाजीराजांचे सारखे शाह्या बदलणे मान्य नव्हते. अपमान झाला म्हणून शाही बदलणे हा त्यावर उपाय नव्हता. एकदा जिजाऊ चिडून शहाजीराजांना म्हणाल्या होत्या की 'जमिनीचा एक छोटा तुकडा तरी स्वतंत्र करून दाखवा. मला धन्यता वाटेल.' शहाजीराजेही स्वतंत्र होण्यासाठी मनापासून प्रयत्न करीत होते. पण यश येत नव्हते.

जिजाऊ गर्भवती होत्या. त्यांना धावपळ सोसत नव्हती. म्हणून शहाजीराजांनी जिजाऊंना शिवनेरी गडावर आपले व्याही विजयराव विश्वासराव यांचे आश्रयाला ठेवले. विजयराव हे जिजाऊंच्या सख्ख्या जावेचे म्हणजे शरीफजींची पत्नी दुर्गाबाईंचे बंधू होते. तेथे शिवनेरीवर शिवाई देवीला जिजाऊंनी आपल्या पोटी कर्तृत्ववान पुत्र जन्माला घालण्याची विनंती केली. देवीने जिजाऊंची इच्छा पूर्ण केली. १९ फेब्रु. १६३० रोजी शिवरायांचा जन्म झाला.

जिजाबाईंनी मनाशी पक्के ठरविले की आपली स्वराज्य, सुराज्य निर्माण करण्याची इच्छा आपल्या पुत्राकडून पूर्ण करून घ्यायची. त्यासाठी त्याच्यावर तसे संस्कार करायचे आणि त्याला तसे घडवायचे. शहाजीराजांनी १६३६ मध्ये शिवाजी सहा वर्षांचा असताना जिजाऊंना दादोजी कोंडदेवांबरोबर पुणे सुपे जहागिरीवर पाठवले. बालशिवाजीला सोबत घेऊन दादोजींच्या मदतीने जिजाऊंनी पुणे वसवले. ओसाड पडलेल्या पुण्याचे जहागिरीच्या राजाधानीत

रूपांतर केले. त्याचबरोबर बाल शिवाजीचे एका कर्तृत्ववान चारित्र्यसंपन्न राजात रूपांतर केले.

वयाच्या सहाव्या वर्षांपासून बाल शिवाजी मातोश्री जिजाऊ यांच्या आधारानेच राहत असल्याने साहजिकच त्यांना आईविषयी विशेष प्रेम आणि आत्मियता वाटत होती. जिजाऊंनी शिवबाला रामायण-महाभारतातील बोधपर कथा सांगून, प्राप्त परिस्थितीत कर्तव्याची जाण करून दिली. शिवबाने आयुष्यात काय केले पाहिजे आणि काय केले नाही पाहिजे, याचे जिजाऊंनी मार्गदर्शन केले.

वेड्या मायेपोटी अती जपणूक केल्याने मुले शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या बलवान होऊ शकत नाहीत हे जिजाऊंना माहीत होते. तसे पाहिले तर शिवबा हे जिजाबाईंचे सहावे अपत्य होते. वडीलपुत्र संभाजी हा शहाजी राजांबरोबर बंगळूरला होता. त्याच्या नंतरची चार अपत्ये तान्हेपणीच नियतीने जिजाबाईंच्या मांडीवरून नेली होती. आणि शिवबा हे सहावे अपत्य जिजाबाईंसोबत वाढत होते. जिजाऊ सामान्य मातोश्री असत्या तर त्यांनी शिवबाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले असते. त्याला कोणतेही साहस किंवा धाडस करू दिले नसते. त्यांना संकटांना सामोरे जावू दिले नसते.

जिजाबाई ह्या सामान्य आई प्रमाणे नव्हत्या. त्या एका ध्येयाने प्रेरित झाल्या होत्या. त्यांचे स्वत:चे एक स्वप्न होते, जे त्यांना शिवबाकडून पूर्ण करून घ्यायचे होते. म्हणून त्यांनी शिवबाला संकटाचा सामना करायला आणि धैर्याने सामोरे जायला शिकविले. १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफझलखानाशी मुकाबला करताना त्यात खूप जोखीम होती. शिवबा साक्षात मृत्यूला भेटण्यास निघाला होता. परंतु तेव्हाही जिजाऊंनी शिवबाला निरोप दिला, अनेक आशीर्वाद दिले.

६ एप्रिल १६६३ रोजी एक लाख फौजेच्या गराड्यात पुण्यातील लाल महालावर शिवबांनी छापा टाकून शाहिस्तेखानाची तीन बोटे कापली, तेव्हाही जोखीम होतीच. एखादी बारीकशी चूकदेखील अनर्थ घडवू शकत होती. परंतु जिजाबाईंनी तेथेही शिवबाला पणाला लावले होते.

आग्र्याला महाराज गेले तेव्हा तर महाराजांबरोबर नऊ वर्षांच्या संभाजीचाही जीव धोक्यात होता. औरंगजेब ज्याने आपल्या भावांना मारून मयुरासन प्राप्त केले होते, तो तर कर्दनकाळच होता. ज्याने आग्र्याच्या किल्ल्यात प्रत्यक्ष आपल्या बापालाच कैदेत ठेवले होते, त्या औरंगजेबाचा काय भरवसा. पण जिजाबाई ही जोखीम पत्करून मुलाला आणि नातवाला इतक्या दूर पाठविण्यास तयार झाल्या. या अशा प्रसंगातून महाराजांना मातेचे श्रेष्ठत्व जाणवत होते. महाराजांना

कळत होते की आपली आई असामान्य आई आहे. तिचं आपल्यावर नितांत प्रेम आहे. पण तिची माया डोळस आहे. तिला आपल्याला मोठे झालेले पाहायचे होते. त्यासाठी ती प्रत्येकवेळी यातना सोसते आहे. महाराज मातृभक्त होत होते ते अशा प्रसंगातून.

महाराज प्रत्येक मोहिमेच्यावेळी गुप्तता पाळत असत. कित्येकदा मोहीम कुठे आहे याचा फौजेतील अधिकाऱ्यांनाही पत्ता लागत नसे. परंतु प्रत्येक मोहिमेच्या आधी महाराज आईजवळ बसून चर्चा करीत असत. जिजाऊंचे राजकारणाबाबतचे ज्ञान चौफेर होते. त्यांच्याशी चर्चा केल्यावर महाराजांचा फायदाच होत असे. महाराजांची आईवर अढळ श्रद्धा होती. महाराजांना वडिलांचा सहवास अगदीच नगण्य मिळाला होता. त्यामुळे जिजाऊच महाराजांच्या माता, पिता आणि गुरू होत्या. महाराज मातेशी कधीच खोटे बोलत नसत. मातेला ते तुळजाभवानी इतके मानीत असत. मोहिमेवर जाताना जसे महाराज आईचे आशीर्वाद घेत असत, त्याचप्रमाणे मोहिमेवरून परतल्यावर आईजवळ बसून तिला मोहिमेबाबत सविस्तर माहिती देत असत.

२३ जाने. १६६४ रोजी कर्नाटकात हौदीगिरे येथे घोड्यावरून पडून शहाजीराजांचे अपघाती निधन झाले. महाराज सुरत लुटून परतीच्या वाटेवर होते. त्यांना वाटेत ही दु:खद बातमी समजली. महाराज ताबडतोब राजगडावर आले. जिजाबाई सती जाण्यास निघाल्या होत्या. महाराजांसाठी हा दुसरा मोठा धक्का होता. त्यांनी हरप्रकारे आईची समजून काढून तिला सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. आईच्या कुशीत शिरून महाराज ढसढसा रडले. परंतु कणखर जिजाबाई आपल्या निश्चयापासून तसूभरही ढळल्या नाहीत. आपल्या निर्णयावर त्या ठाम होत्या. महाराजांचे सर्व प्रयत्न फुकट गेले. अखेर महाराजांनी वैराग्य पत्करून स्वराज्य निर्मितीचा खटाटोप थांबविण्याचा निर्णय जाहीर केला. महाराजांनी स्पष्ट सांगितले की 'स्वराज्य पाहायला वडील राहिले नाहीत. मातोश्रीही जाणार असतील तर आम्ही राज्यवृद्धी कशासाठी करावी. आम्हास चरितार्थासाठी वडिलांची पुणे जहागीर पुरेसी आहे.'

महाराजांचा हा विचार कामी आला. आयुष्यभर हृदयाशी जपलेले स्वप्न अपुरे राहणार, या कल्पनेने जिजाबाई कळवळल्या. त्यांना ही कल्पनाही सहन झाली नाही. त्यांनी आपला निर्णय मागे घेतला. सौभाग्यलंकार उतरवून ठेवले. महाराज आईला सती जाण्यापासून परावृत्त करण्यात यशस्वी झाले.

जिजाऊंचाही शिवबामध्ये जीव होता. महाराज पन्हाळ्यावर सिद्दी जोहरच्या वेढ्यात अडकले तेव्हा पुत्राच्या सुटकेसाठी स्वत: जिजाबाई पन्हाळ्यावर

जाण्यास निघाल्या होत्या. ऐनवेळी नेतोजी पालकर आणि सिद्दी हिलाल आले म्हणून अनर्थ टळला. खरोखर पराक्रमी कर्तृत्ववान पुत्राची आई होणे सोपे नसते. पुत्राला स्वत: संकटात लोटायचे आणि नंतर त्याच्या येण्याकडे डोळे लावून बसायचे असे कठीण व्रत असते पराक्रमी पुत्राची आई होणे.

६ जून १६७४ रोजी रायगडावर थोरला समारंभ झाला. महाराजांना राज्याभिषेक होऊन महाराज छत्रपती झाले. त्याच्या आधी बरेच दिवस राजवाड्यावर काही ना काही कार्यक्रम होत होते. त्यात देवक बसवणी, महाराजांची मुंज, हयात पत्नींबरोबर महाराजांची लग्ने असे अनेक कार्यक्रम होत होते. जिजाऊ ते सारे कौतुकाने पाहात होत्या. प्रत्येक प्रसंगी शिवबाला तोंडभरून आशीर्वाद देत होत्या. ६ जूनचा शिवरायांचा राज्याभिषेक जिजाऊंनी पाहिला. पाहिला म्हणजे वार्धक्याने अधू झालेल्या डोळ्यांनी, आनंदाश्रूंनी डोळे डबडबल्यावर जेवढे दिसले असेल तेवढे त्यांनी पाहिले. पण तेवढे पाहून त्यांना धन्य वाटले. पतीच्या मागे दहा वर्षे राहिल्याचे सार्थक झाले होते. जिजाऊंची आयुष्यभर मनात जपलेली इच्छा पूर्ण झाली. त्यांचे जगण्याचे प्रयोजन संपले.

दुसऱ्या दिवसापासून जिजाऊंची तब्बेत बिघडली. राजवैद्यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी जिजाऊंची नाडीपरीक्षा केली. त्यांच्या नखात रोग नव्हता. ज्वर राज्याभिषेकाचा शीण झाल्यामुळे आला आहे असे निदान करण्यात आले. जिजाऊंना गडावरची हवा सोसत नसल्याने महाराजांनी त्यांना स्वत: पाचाडच्या वाड्यात नेले. त्यांची सर्व व्यवस्था लावली. पुतळाबाई राणीसाहेब, सकवारबाई राणीसाहेब त्यांच्यासोबत पाचाडला गेल्या. राजवैद्य त्यांच्या उशा-पायथ्याशी बसून होते. परंतु जिजाऊंच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. दिवसेंदिवस प्रकृती ढासळत होती. वैद्यांना निदान होत नव्हते. कारण जिजाऊंनीच आता पतीसेवेसाठी जाण्याचे ठरविले होते. अखेर १७ जून १६७४ रोजी जिजाऊंनी आपला बहुमोल देह ठेवला. ४४ वर्षांचे महाराज जिजाऊंच्या मृत्युने पुरते खचले. त्यांच्यावर त्यादिवशी आभाळच कोसळले होते. महाराष्ट्राचा अनभिषिक्त छत्रपती आईविना भिकारी झाला होता. रयतेचा आधार असलेला राजा आज निराधार झाला होता. त्यांचे सांत्वन करायला अधिकारी व्यक्ती जवळ नव्हती आणि शब्दही नव्हते. आयुष्यभर मातेच्या आज्ञा पाळणारा मातृभक्त छत्रपती आजही जगाला वंदनीय आहे.

# महाराजांची सर्वधर्मसहिष्णुता

एखाद्या सत्ताधिशाचे मूल्यमापन करीत असताना त्याचे एकूणच धार्मिक धोरण कसे होते हे पाहणे जरुरीचे असते. कारण राज्यसत्तेने कोणत्याही आपल्या पसंतीच्या धर्माला विशेष दर्जा किंवा वागणूक देऊ नये. राज्यसत्तेचा कोणताही धर्म असू नये असे साधारण आदर्श असतात. त्यामुळे धार्मिक आधारावर नागरिकांत भेदभाव न होता त्यांना व्यक्तिगत व सामुदायिक धर्माचरणाचे स्वातंत्र्य प्राप्त होते. प्रजा सुखी-समाधानी होते.

शिवपूर्वकाळात मध्ययुगात भारतात मुस्लीम सत्तांचा उदय झाला. दिल्लीला गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद लोदी ही पाच सुलतान घराणी आणि त्यानंतर १५२६ ला बाबरापासून मोगलांची दीर्घकाल सत्ता होती. दक्षिणेतही बहामनी राज्य आणि त्याचे पाच तुकडे होऊन झालेल्या पाच शाह्या यांचे प्राबल्य होते. या सर्व सुलतानात अकबरासारखा एखादा बादशहा सोडला तर बहुतेक सारे सत्ताधीश हे धर्मांध आणि धर्मवेडे होते. शिवकाळातील औरंगजेब बादशहा हा क्रौर्यासाठी आणि परधर्मद्वेशासाठी इतिहासात कुप्रसिद्धच आहे.

अशा पार्श्वभूमीवर शिवरायांची सर्वधर्मसहिष्णुता आदर्श ठरते. एकूणच महाराजांचे धार्मिक धोरण हे त्याकाळात अगदी वेगळे आणि अनुकरण योग्य होते. महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली ती धर्मासाठी नव्हती. आपल्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करावा हा त्यामागे हेतू कधीच नव्हता. तर महाराजांना मुस्लीम सत्तांच्या विरोधात हिंदूंची सत्ता निर्माण करायची होती. गोरगरीब रयतेचे, शेतकऱ्यांचे, मजुरांचे होणारे हाल थांबावे, त्यांच्यावर होणारे अन्याय थांबावे, यासाठी महाराजांनी स्वराज्य हे रयतेचे आणि श्रींच्या इच्छेने निर्माण केले. या स्वराज्याच्या संपूर्ण प्रक्रियेत रयतेतील सर्व जाती जमातींचा सहभाग होता, तसा अनेक मुस्लिमांचाही होता. महाराजांच्या फौजेत, आरमारात आणि प्रशासन

व्यवस्थेत अनेक मुस्लीम प्रामाणिकपणे सेवा देत होते. हे मुस्लीम महाराजांतर्फे आदिलशाही, कुतूबशाही आणि मोगलांशी लढत होते.

महाराज ज्याप्रमाणे तुकाराम महाराज, रामदास स्वामी, चिंचवडचे मोरया गोसावी यांना गुरूस्थानी मानीत होते, त्याचप्रमाणे बाबा याकुत व अन्य मुस्लिमांनाही मानीत होते. त्यांना देणग्या आणि वतने देत होते. सर्व धर्म हे समाजाच्या भल्यासाठीच असतात, यावर महाराजांचा पूर्ण विश्वास होता. अफझलखानाच्या वधानंतर त्याचे मुंडके शिवरायांनी राजगडाच्या मुख्य दरवाजात दफन करून पूजा अर्चेची व्यवस्था केली होती.

महाराजांनी स्वराज्यात कोणत्याही जातीचा, धर्माचा आणि पंथाचा द्वेष किंवा मत्सर किंवा अनादर केला नाही आणि कोणास करूही दिला नाही. फौजेस महाराजांची सक्त ताकीद असे की परधर्माच्या प्रार्थनास्थळास हानी पोहचता कामा नये. तसेच कोणत्याही धर्माचा धर्मग्रंथ सापडल्यास त्यास आदराने त्या धर्मगुरूच्या ताब्यात देण्यात यावा. महाराज रत्नपारखी असल्याने व्यक्तीच्या गुणाकडे पाहून निवड करीत असत. धर्माच्या वा जातीच्या आधारावर नव्हे.

महाराजांच्या सेवेत असणारे मुस्लीम महाराजांची जिवापाड सेवा करीत असत. आग्र्याहून सुटताना महाराजांच्या मागे आपला जीव धोक्यात घालणारा मदारी मेहतर हा धर्माने मुस्लीमच होता. महाराजांचे धार्मिक धोरण हे डोळस होते. पुरोगामी होते. त्यामुळे स्वराज्यात हिंदू धर्माचे अवडंबर माजले नाही. सर्वधर्मीय रयतेला समान हक्क मिळत होते. मोगलाईत हिंदूंना दुय्यम नागरिकत्व होते. त्यांच्यावर जिझियासारखे जाचक कर लादले जात असत. परंतु स्वराज्यात मुस्लिमांना सन्मानाने वागविले जात असे. महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्य होते. स्वराज्याविषयी महाराजांची कल्पना ही महाराष्ट्र राज्याची होती. तिचा आधार समर्थ रामदासांच्या 'महाराष्ट्र धर्म' हा होता.

त्यामुळेच महाराज फक्त मुस्लीम सत्तांशीच लढले नाहीत, तर त्यांना जावळीचे मोरे, शृंगारपूरचे सुर्वे, दळवी, सावंतवाडीचे सावंत, मुधोळचे घोरपडे आणि प्रत्यक्ष आपले सावत्र बंधू एकोजीराजे यांचेशी लढावे लागले. याउलट कर्नाटक स्वारीच्या वेळी भागानगरात महाराज तानाशहाशी बंधूप्रमाणे वागलेले दिसतात. महाराजांना त्यांचे हे आदर्श धार्मिक धोरण ठरविताना घरातून धडे मिळालेले दिसतात. कारण मालोजीराजांना दोन पुत्र शहाशरीफ या मुस्लीम साधूच्या आशीर्वादाने झाली होती आणि त्यामुळे त्यांची नावे शहाजी आणि शरीफजी अशी ठेवण्यात आली होती, अशी इतिहासात नोंद आहे. याच अर्थ राजांचे आजोबा मालोजीराजेही मुस्लीम संतांच्या दर्शनास जात होते. त्यांना

नवस करीत होते, असे दिसते. त्यामुळेच महाराजांच्या मनात परधर्मियांचे बाबतीत द्वेष भावना अजिबात नव्हती.

महाराज जसे सर्वधर्मसहिष्णू, सर्वधर्मसमभावी होते तसे तत्कालीन इतर राज्यकर्ते नव्हते. बहुतेक राज्यकर्ते हे धर्माने मुस्लीम होते आणि त्यांची प्रजा हिंदूबहूल होती. त्यामुळे हिंदूंवर जिझियासारखे जाचक कर लावले जात. जिहादच्या नावाखाली युद्धे आणि धर्मप्रसार केला जात असे. जिहाद याचा अर्थ तलवारीच्या जोरावर धर्मप्रसाद करणे किंवा धर्मयुद्ध करणे. औरंगजेबाने हिंदूंवर जिझिया कर लावला होता. मध्ययुगात एक अकबर बादशहा सोडला तर सारेच सुलतान आणि बादशहा हे जुलमी राजवटीसाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या मुलूखात हिंदूंचा छळ होत होता.

महाराजांनी हिंदू-मुस्लीम असा भेदभाव कधीच केला नाही. त्यांनी हिंदू देवळांना-मठांना सढळ हस्ते देणग्या, वतने दिली, तशीच ती मुस्लीम-मशिदी व संतांना दिली होती. अर्थात अशा देणग्या देताना योग्यता पाहूनच दिल्या जात असत. चिंचवडचे मोरया गोसावी यांनी महाराजांशी असलेल्या सलगीचा गैरफायदा घेताच महाराजांनी त्यांना साफ ठणकावले की 'आपण आमची वस्त्रे स्वीकारा, आम्ही आपली परिधान करतो,' असे कडक शब्दात सांगून मोरया गोसावींची राज्यकारभारातील ढवळाढवळ बंद केली. त्याच महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी जेथे अफजलखानचा वध झाला तेथे त्याचे थडगे बांधण्यास परवानगी दिली आणि त्याच्यावर दिवाबत्तीची सोय केली. महाराजांचा धर्म असा होता.

याचा अर्थ असा नव्हे की महाराजांचे धार्मिक धोरण हे परधर्मधार्जिणे होते. बोटचेपे होते. औरंगजेबाने जेव्हा उत्तरेत हिंदूंवर जिझिया कर लावला तेव्हा सभोवती अनेक रजपूत राजे होते, पण कोणीही विरोध केला नाही. परंतु औरंगजेबाला पत्र पाठवून खडसावण्याचे धैर्य महाराजांनीच दाखवले.

आदिलशाही सरदार आणि महाराजांचे मेव्हणे बजाजी निंबाळकर यांचे बळजबरीने धर्मांतर करून त्यांना मुस्लीम केलेले पाहताच महाराजांनी हिंदू ब्राह्मणांचा विरोध असूनही बजाजींना पुन्हा हिंदूधर्मात घेतले. पुढे १९ जून १६७६ रोजी नेताजी पालकर यांनाही महाराजांनी युद्ध करून परत आणले. महाराज आग्र्याहून निसटले याचा राग आल्याने औरंगजेबाने नेताजीस पकडून दिल्लीला नेले होते, तेथे त्यांचे जबरदस्तीने धर्मांतर करून त्यांना मुस्लीम करण्यात आले होते. नेताजींना महंमद कुलीखान केले गेले. पण कालांतराने, संधी मिळताच हे महंमद कुलीखान स्वराज्यात आले. १६७६ साली महाराजांना भेटले आणि

महाराजांनी त्या महंमद कुलीखानाचे पुन्हा नेताजी पालकर केले. त्यांच्या पंगतीला भोजन घेतले. त्याचबरोबर महाराजांनी एकाही मुस्लिमांना धर्मांतर करून हिंदू करून घेतले नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

महाराजांनी अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले होते. राज्याभिषेक समयी 'राज्याभिषेक कक्ष' सुरू केला. मराठी राज्यव्यवहार कोश लिहवून घेतला. व्यवहारातील फारशी भाषेचे उच्चाटन करणाचा प्रयत्न केला. इस्लामिक राजवटीत मुस्लिमांकडून नष्ट केल्या गेलेल्या हिंदू मंदिरांचे पुनर्निमाण करताना त्या मंदिरांच्या जागेवर मुस्लिमांनी बांधलेल्या मशिदी महाराजांनी पाडून टाकल्या आणि त्याच जागेवर मंदिरे उभी केली. परंतु महाराजांनी आपणहून एकही मशिद पाडली नाही. तुम्ही आमच्या हिंदूंच्या मंदिरांना हानी पोहोचवाल तर आम्ही त्याच जागी मंदिरांचे पुनर्निमाण करू, असे महाराजांचे धर्मधोरण होते. त्याचप्रमाणे त्यांचे वागणे होते.

दक्षिण दिग्विजयाचे वेळी महाराजांच्या लक्षात आले की तिरुवन्तमलाई येथील अरुणाचलेश्वर मंदिर पाडून त्या जागी मशीद उभी केली आहे. महाराजांनी ती मशीद पाडून त्या जागी पुन्हा अरुणाचलेश्वराचे मंदिर उभे केले. सहस्त्र गोदान केले. भूवराह स्वामींच्या मंदिरांचे, वृद्धाचलम शिवमंदिराचे आणि सुप्रसिद्ध नटराज मंदिरांचे ४८ वर्षांपूर्वी जबरदस्तीने मुस्लिमांनी बंद केलेले दर्शन पुन्हा सुरू केले. ते सर्व सुरळीत चालू होईपर्यंत महाराजांनी आपली फौज तिथे ठेवली.

इतके आदर्श धर्मधोरण असल्यामुळे आज पावणेचारशे वर्षे झाली तरी महाराष्ट्रात रयतेच्या मनात महाराजांचे स्थान अढळ आहे. घरोघर महाराजांना देवावतार मानले जाते. अगदी २१ व्या शतकातही आंध्रप्रदेशातील हैदराबादेत महाराजांचे देखणे मंदिर उभे केले जाते.

# शिवकालीन शेती व्यवस्था आणि पर्यावरण

शिवपूर्वकाळात आणि शिवकाळात राज्यांच्या उत्पन्नाचे तीन मुख्य स्रोत होते. त्यात शेतीचे उत्पन्न हे मुख्य होते. जकात वसुली आणि लूट हे गौण होते. शत्रूच्या प्रदेशात लूट करणे हे त्याकाळी राज्याच्या उत्पन्नाचे साधन होते आणि ते सर्वमान्य होते. शिवाजी महाराजांनी शेतीच्या सर्व बाबींकडे प्रामुख्याने लक्ष दिलेले दिसते. त्यामुळे शेतीव्यवसायाला उत्तेजन मिळून शेतकरी आणि स्वराज्य समृद्ध झाले.

शिवपूर्वकाळात महाराजांइतके शेती व्यवसायाकडे फारसे लक्ष इतर मुसलमान राजवटींनी दिले नव्हते. त्यातल्या त्यात मलिक अंबरची धारापद्धती न्याय्य होती, परंतु तीसुद्धा सदोष होती. मलिक अंबरने साखळीने जमीन मोजून शेतसारा ठरवून दिला होता. ही साऱ्याची रक्कम संपूर्ण गावावर बसवली जात असे. गावपाटील ती रक्कम वसूल करन सरकार भरणा करीत असे. राज्याचे उत्पन्न वाढवायचे म्हणजे शेतकऱ्यांची पिळवणूक करायची, असा मुसलमानी रिवाज होता. त्यात वारंवार होणाऱ्या युद्धांमुळे उभ्या पिकांचा नाश होत होता. दुष्काळाच्या रूपाने अस्मानी संकटही शेतकऱ्यांची कंबर मोडत होतेच.

महाराजांनी गावोगाव प्रत्यक्ष भेटी दिल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांचे हे दु:ख व अडचणी जवळून अनुभवल्या होत्या. शिवाजी महाराजांनी सर्व प्रथम शेतसारा ठरविताना केवळ जमिनीची मोजणी करून न ठरविता, जमिनीचा कस, त्यात येणारे पिक, जमिनीस मिळणारे पाणी या सर्व बाबींचा विचार केला होता. जमीन मोजण्यासाठी शिवकाळात 'शिवकाठी'चा वापर होत होता. पाच हात पाच मुठीची एक काठी होत असे. काठीची लांबी ८२ तसू ठरवण्यात आली होती. वीस काठी लांब, वीस काठी रुंद जमिनीचा एक बिघा होत असे. १२० बिघेचा एक चावर याप्रमाणे जमिनीचे मोजमाप केले जाई.

जमिनीचा कस ठरविण्यासाठी महाराजांनी स्पष्ट नियम घालून दिले होते.

जमीन पडीक आहे की लागवडीखाली आहे, एकपिकी आहे की दुपिकी आहे, जिराईत आहे की बागाईत आहे, वगैरे. बागाईत असेल तर मोट चालते की पाटाचे पाणी मिळते, जमीन डोंगरी उताराची आहे की वरकस आहे, या सर्व बाबींचा सखोल विचार करून मग त्या जमिनीत घेत असलेल्या पिकांचा आणि उत्पन्नाचा विचार केला जाई. तीन वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून त्यावर दोन पंचमांश म्हणजे ४० टक्के सरकारी कर वसूल केला जाई. ह्या कराची वसुली करताना रोख किंवा धान्य स्वरूपात भरणा करता येत असे. शेतकऱ्याला ती मुभा होती.

शिवपूर्व मुसलमानी राजवटीत गावातील सरकारी अधिकारी वतनदार होते. वतनाच्या नावावर ते गरीब रयतेची लूट करीत असत. महाराजांनी स्वराज्यात ही वतनदारी बंद करून टाकली व या सरकारी अधिकाऱ्यांस नक्त पगार ठरवून दिला. त्यांचा रयतेशी येणारा संबंध तोडून टाकला. शेतकऱ्याची होणारी ही लूट थांबली. त्यांनी महाराजांना दुवा दिला. स्वराज्य समृद्ध होत असताना त्यातील शेतकरीही सधन होत होता. या पद्धतीची आखणी करताना महाराजांना सूरनीस अण्णाजी ऊर्फ अनोजी दत्तो प्रभुणीकर यांचे मोलाचे सहाय्य झाले होते.

राज्याचे उत्पन्न वाढवायचे म्हणजे सारा किंवा जकातींचा दर वाढवायचा हा मोगली विचार महाराजांनी कधीच केला नाही. शेतीचे उत्पन्न वाढवायचे म्हणजे जास्तीतजास्त पडीक जमीन लागवडीखाली आणणे असा महाराजांचा विचार होता. त्यासाठी स्वराज्यातील पडीत जमीन नवीन शेती नसलेल्या कुणबींना कसायला द्यावी. त्यांना बियाणे, अवजारे आणि गुरे देऊन त्यांना ओसाड जमीन लागवडीखाली आणण्यास सांगितले जात असे. सुरुवातीला ३ ते ६ वर्षे त्यांच्या उत्पन्नावर कर लावला जात नसे. शेतकऱ्याने जमीन नांगरताना आणि पेरणी करताना बांधापर्यंत जमीन वापरावी. बांधाजवळ जादा जमीन सोडून चालत नसे. बांधाजवळ कडधान्यांची लागवड केली जात असे. अशा तऱ्हेने नापीक जमीन पिकाऊ करण्यासाठी महाराजांनी स्वराज्यात अनेक सवलती देऊ केल्या होत्या.

अस्मानी संकट त्याकाळीही होतेच. महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि अनावृष्टीला वारंवार शेतकऱ्याला तोंड द्यावे लागत होते. १३९६ ते १४०८ अशी बारा वर्षे महाराष्ट्रात आजवरचा सर्वात मोठा दुष्काळ होता. माणसांवर गुरेढोरे मारून खाण्याची वेळ आली होती. महाराष्ट्र ओसाड पडला होता. त्यानंतर प्रत्येक दशकात एक-दोन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळ पडत होता. अगदी शिवजन्माआधी

१६२९-३० मध्येही महाराष्ट्रात दुष्काळ होता. त्यामुळे वारंवार येणाऱ्या दुष्काळात महाराज शेतकऱ्यांना जगविण्यासाठी सढळ हाताने मदत करीत असत. त्यांना तगाई, अवजारे आणि जनावरे आणि बियाणे यांचा पुरवठा सरकारतर्फे केला जाई. शेतकऱ्यांना त्या वर्षी सारा माफी केली जाई. राजांतर्फे शेतकऱ्यांना खावटी दिली जाई. म्हणजे नवे धान्य येईपर्यंत कुटुंबासाठी खाण्यासाठी सरकारी कोठारातून धान्य दिले जाई. शेतकऱ्यांना दिलेली कर्जे किंवा तगाई पुढे सोईने वसूल केली जात असे.

शेती व्यवसायाला जलाचा स्रोत आवश्यक असतो. त्याप्रमाणे जमिनीचा दर्जा ठरविताना खरीप, कोरडवाहू, बागाईत, मोटस्थळ व पाटस्थळ, उतरणीची जागा, या पैकी कोणत्या प्रकारात जमीन मोडते त्याचा विचार होई. काही जमिनींना पाटाचे पाणी पुरविले जाई तर काही ठिकाणी वावरातील विहिरीवर मोट चालवून बागाईत केली जात असे. राई या प्रकारात आंबा, काजू, फणसाच्या बागा येत. त्या झाडांना वेगळा पाणी पुरवठा करावा लागत नसे. शिवकाळात मोठमोठी धरणे नव्हती तरी बांध घालून शेतात पाणी अडवून जिरवण्याची पद्धत होती. भूगर्भातून वारेमाप पाणी उपसा केला जात नसे. त्यामुळे भूगर्भातील जलसाठा कायम राखला जाई. पाटाच्या पाण्यावर ऊस, हळद, आले व भाजीपाला अशी पिके घेतली जात.

शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी जवळ बाजारपेठा निर्माण करण्यात येत होत्या. बाजारपेठा बसवणाऱ्यांना शेटे म्हणत. एकूणच शेती व्यवसायाकडे आणि तो करणाऱ्या रयतेकडे महाराजांनी खास लक्ष दिल्याने जशी स्वराज्याची समृद्धी आली, त्याचप्रमाणे शेतकरी म्हणजे रयतही सुखी समाधानी झाली.

स्वराज्यात पर्जन्यमान कायम आणि चांगले राहिले तरच आपला शेतीसारखा महत्त्वाचा व्यवसाय व्यवस्थित होईल हे समजून शिवाजी महाराजांनी अगदी प्रथमपासूनच स्वराज्यात पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पावणे चारशे वर्षांपूर्वी पर्यावरणाचे महत्त्व जाणणारा शिवाजी हा एकमेव राजा होता.

नंतरच्या काळात आपली पर्यावरणरक्षण आणि संवर्धनाची दृष्टी कमी झाली आणि त्याचे परिणाम आपण भोगतो आहोत. आज आपल्या चुकांमुळे पर्यावरणाचा तोल ढासळला असला तरी शिवकाळात शिवराय त्याबाबतीत पूर्णपणे जागृत होते. नाहक वृक्षतोड झाली तर स्वराज्यात पर्जन्यमान कमी होऊन दुष्काळ येऊ शकतो हे भान त्याकाळी असणे हे शिवरायांचे वैशिष्ट्य आहे. त्याकाळी इमारतीसाठी, बोटी जहाजे बांधणीसाठी आणि सरपण म्हणून जंगलातून वृक्षतोड

होत होती. अशिक्षित रयतेकडून वारेमाप वृक्षतोड होऊ नये म्हणून महाराजांनी स्वराज्यात वनरक्षकांच्या नेमणुका केल्या होत्या. पन्हाळा, राजगड, रायगड, कोंढाणा यांसारख्या मोठ्या गडांवर प्रत्यक्ष शेती व्यवसाय केला जात होता. त्यासाठी गडावर खास वृक्ष लागवड केली होती. काही गडांवर खास बगिचे केले होते. पन्हाळ्यावरील तबकउद्यान आजही त्याची साक्ष देते.

महाराजांनी बांधलेल्या गडांवर आजही शौचकूपाचे अवशेष दिसतात. त्यांचा वापर राज कुटुंबाकडून आणि फौजेकडून केला जात असे. जमिनीवर चर खणून त्यावर दगडी शिळा रचून ही शौचालये अशा रितीने बनविली जात की घाण गडाबाहेर फेकली जात असे. काळाच्या ओघात आज त्यांचे दरवाजे दिसत नसले तरी इतर अवशेष आजही रायगड, राजगडावर पाहता येतात.

१६५६ मध्ये महाराजांनी जेव्हा आरमार बांधणीचा विचार केला तेव्हा नौकाबांधणीसाठी लागणाऱ्या लाकडाचा विचार केलेला दिसतो. आरमार बांधणीसाठी जितका सागरकिनारा आवश्यक असतो, तितकीच सागाच्या जंगलांची गरज असते. त्याकाळी ठाणे जिल्ह्यात अगदी वसईपर्यंत सागाची जंगले होती. हा साग वसईच्या खाडीतून थेट कल्याणच्या खाडीपर्यंत आणता येत होता. त्यामुळे कल्याणला आरमार बांधणीसाठी निवडलेले दिसते.

गरजेपोटी वृक्षतोड करावी लागली तर तोडलेल्या प्रत्येक वृक्षासाठी त्याच जातीच्या दुसऱ्या वृक्षाची लागवड करावी असा महाराजांचा नियम होता. त्याचप्रमाणे जीर्ण आणि जुनी झाडेच तोडली जावी. नवी, तरुण झाडे तोडू नये असा नियम होता. तो कटाक्षाने पाळला जात होता. आदिवासी, वनवासी यांच्याकडून जंगलात आग लागू नये यासाठी वनरक्षक जागृत असत. या बाबतचे महाराजांचे आज्ञापत्र बोलके आहे.

'स्वराज्याच्या अरण्यामध्ये सागवानादी वृक्ष आहेत त्यांचे अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. त्यापेक्षा अधिकचे लागेल ते घरमालकाकडून योग्य मूल्य देऊन खरेदी करून मालकास राजी करुन घेऊन जाणे. झाडे वाढवण्यास कष्ट पडतात. काळ जातो. म्हणून मालकास दु:खी करू नये.'

दळवटणे येथील सेनाधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात, 'उंदीर वात पळवतील व त्यातून गवतास आग लागेल याची काळजी घ्यावी.' शिवाजी महाराजांइतका पर्यावरणदक्ष राजा आपल्या महाराष्ट्रात होऊन गेला ही आपली पुण्याई असावी. त्या राजाच्या चरणी नतमस्तक होण्याशिवाय आपण काय करू शकतो.

# शिवरायांची युद्धनीती आणि आरमार

युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असता शत्रूवर हमखास यश मिळविण्यासाठी कोणती युद्धपद्धती वापरावी याचा विचार म्हणजे युद्धनीती. युद्धनीतीचे सामान्यत: तीन प्रकार पडतात. १) समोरासमोर खेळले जाणारे युद्ध २) गनिमी कावा ३) शत्रूला संकटात पडलेले पाहून केलेले कूटयुद्ध. या तीनही प्रकारच्या युद्धात आक्रमक आणि संरक्षक असे दोन उपप्रकार येतात. शत्रूचा प्रदेश जिंकण्यासाठी आपणहून केलेले ते आक्रमक युद्ध आणि शत्रूने लादल्यामुळे करावे लागलेले ते संरक्षक युद्ध.

यातील सर्वप्रकारची युद्ध शिवरायांनी काळ, वेळ-प्रसंग पाहून केलेली असली तरी त्यांची मुख्य युद्धनीती ही आक्रमक आणि गनिमी काव्याचीच होती. शिवरायांना स्वराज्याची वाढ करण्यासाठी आक्रमक युद्धपद्धतीचा वापर करावा लागला. शिवरायांनी आदिलशाही मुलूख कुरतडूनच स्वराज्य वाढवलेले दिसते.

शिवरायांनी वापरलेला गनिमीकावा तंत्र हे त्यांनीच विकसित केले आहे. शिवाजी महाराज हे गनिमी काव्याचे जनक मानले जातात. जगात अनेक देशात ‘शिवाजीचा गनिमी कावा’ अभ्यासला जातो. युद्धात जेव्हा शत्रू आपल्यापेक्षा संख्येने, बळाने आणि युद्ध सामग्रीने वरचढ असतो तेव्हा गनिमी पद्धतीने युद्ध केले जाते. गनिमी काव्याचे तत्त्व शत्रूची जास्तीतजास्त हानी करणे आणि आपली हानी होऊ न देणे. शत्रू बेसावध असता बहुधा रात्रीच्या अंधारात घोडदळाने शत्रूवर हल्ला करणे व शत्रू युद्धाला तयार होईपर्यंत सुखरूप परत जाणे या पद्धतीत अपेक्षित असते. आपण पळून गेल्याने आनंदित झालेल्या तुकडीवर दुसऱ्या बाजूने पुन्हा हल्ला करणे व पळून जाणे. शत्रू सैन्यात विस्कळीतपणा व भीतीचे वातावरण निर्माण करावे लागते. शत्रूची जवळची छावणी सोडून दूरच्या छावणीवर अनपेक्षित हल्ला केल्याने शत्रूची अधिक

हानी होते. अशा हल्ल्यांमुळे शत्रूसैन्य बेसावध असल्याने मारले जाते व शत्रूची शस्त्रे, दारुगोळा आपल्याला मिळून आपले सामर्थ्य वाटते. गनिमी हल्ल्यात होणाऱ्या अशा चकमकीत विजयाला महत्त्व नसते. शत्रूचे जास्त नुकसान करून आपण सुखरूप पळून येणे यातच विजय असतो. शत्रूला आपल्याला पळवून लावल्याचा आनंद जरूर मिळतो, पण त्यांचे सामर्थ्य कमी होत असते.

मराठ्यांचा हा गनिमी कावा मोगलांना कधी समजलाच नाही. मराठे जेव्हा मोगल फौजांवर गनिमी काव्याचा वापर करून हल्ला करीत व पळून जात तेव्हा मोगलांना तो आपला विजय वाटत असे. शिवरायांनंतर औरंगजेबाशी लढताना छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराराणी यांनी याच गनिमी काव्याचा अवलंब करून मोगलांना जेरीस आणले होते. अर्थात मोगली सरदारांना तो त्यांचा विजय वाटून ते आनंदोत्सव करीत असत. बादशहाला अशा विजयाच्या बातम्या पुरवून बक्षिसे मिळवित होते.

गनिमी युद्धपद्धतीत आपल्या हालचाली अत्यंत गुप्तपणे करून शत्रूच्या हालचालींची बारीक माहिती मिळवणे, शत्रूला बेसावध ठेवून त्याच्यावर हल्ला करणे व होईल तेवढे शत्रूचे नुकसान करून आपण परत आपल्या गोटात येणे, आपली फौज कठीण जागी लपवून ठेवणे, शत्रूला आपला पाठलाग करायला लावून मूळ छावणीपासून दूर नेणे व अडचणीच्या जागी शत्रूचा खातमा करणे, शत्रूची रसद आपण मिळवणे. शत्रूचा पाण्याचा साठा विषारी करणे, शत्रूच्या छावणीच्या भोवतालचा प्रदेश आधीच वैराण करून ठेवणे इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव होत असतो. हा युद्धप्रकार आक्रमक युद्धाचा असल्याने शक्यतो शत्रू प्रदेशात केली जातात. त्यामुळे शत्रू प्रदेशाची हानी होते. युद्ध होते त्या ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते. अन्नधान्याची टंचाई निर्माण होते. जनावरांना चारा मिळत नाही. आपला प्रदेश मात्र सुखरूप राहतो. शत्रूला जेरीस आणून माघारी फिरायला लावणे यात अभिप्रेत असते.

शिवरायांनी स्वत: विकसित केलेली गनिमी काव्याची युद्धनीती ही त्यांच्या गरजेपोटी निर्माण झाली होती. शिवरायांचे स्वराज्य हे लहानशा जहागिरीतून निर्माण झाले होते. त्यांच्याजवळ प्रदेश, किल्ले, सत्ता, संपत्ती आणि फौज मर्यादित होती. त्या मर्यादित साधन सामुग्रीतून स्वराज्य वाढवताना त्यांना गनिमी कावाच उपयोगी पडला होता. शिवाय स्वराज्याची भौगोलिक परिस्थितीही गनिमी काव्याला पोषक होती. महाराजांनी नेहमी आक्रमक धोरणच स्वीकारलेले दिसते. त्यांना आजूबाजूच्या मुस्लीम सत्तांचा प्रदेश कुरतडून स्वराज्याची वृद्धी करावी लागली होती.

महाराजांनी रायगडापासून तीनशे कोसावर असलेल्या सुरतेवर दोन वेळा हल्ला केला. तेव्हा महाराजांनी वापरलेले तत्त्व हे गनिमी काव्याचेच होते. शत्रूच्या दूरच्या छावणीवर अनपेक्षित छापा मारणे हे गनिमी काव्याचे तंत्र असते. सुरतेच्या आजूबाजूला इतका मोगली प्रदेश असता महाराज तेथपर्यंत पोहोचून लूट करतील असे शत्रूला स्वप्नात ही वाटले नाही.

शत्रूला पाठलाग करायला लावून त्याला लुटणे हे गनिमी तंत्र महाराजांनी बहादूरखानाच्या बहादूरगडावर हल्ला करताना वापरले. शिवरायांनी ७००० फौज सोबत घेऊन बहादूरगडावर हल्ला करताना फौजेच्या २००० आणि ५००० अशा दोन तुकड्या केल्या. दोन हजाराच्या फौजेने बहादूरगडावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. शिवरायांची इतकी कमी फौज पाहून बहादूरखानाने त्या फौजेचा पाठलाग केला. या २००० च्या फौजेने माघार घेत खानाला वीस कोस दूर नेले आणि इकडे शिवरायांच्या ५००० फौजेच्या तुकडीने बहादूरगड लुटून आगी लावल्या. या लुटीत महाराजांना एक कोट रुपये खजिना आणि दोनशे अरबी घोडे मिळाले.

लढाईसाठी जसे सपाट मैदान लागते, तसेच जवळ पाण्याचा मुबलक साठा असणे आवश्यक असते. फौजेला आणि जनावरांना पिण्यासाठी मोठे पाणीसाठे असावे लागतात. गनिमी काव्याप्रमाणे शत्रूचे असे पाणीसाठे ताब्यात घेतले जातात. अशा पाण्यात विष टाकून ते पिण्यास अयोग्य केले जाते. एप्रिल १६७३ मध्ये उमराणीच्या युद्धात प्रतापराव गुजरांनी याच तंत्राचा वापर करून बहलोलखानाला जेरीस आणले होते. शेवटी पाण्याअभावी शरण येऊन बहलोलखानाने धर्मवाट मागितली आणि आपली व आपल्या फौजेची सुटका करून घेतली.

महाराज बहुतेक लढाया स्वराज्याच्या बाहेर अथवा सीमेवर करीत असत. त्यामुळे आपल्या मुलुखाची व रयतेची हानी होत नसे. आपल्या मुलुखातील पिके सुरक्षित राहत तर शत्रूच्या प्रदेशाची हानी होत असे.

शिवप्रभूंनी शिकवलेली ही गनिमी काव्याचीच पद्धत मराठ्यांनी पुढील काळातही वापरली. पेशवाईत मल्हारराव होळकर गनिमी काव्याचे तज्ज्ञ होते. त्यांनी बहुतेक लढाया गनिमी काव्याने लढून राज्यविस्तार केला. त्यांचे याबाबतचे पत्र मोठे बोलके आहे. मल्हारराव लिहितात,

'आपले सैन्य थोडे. यास्तव मनुष्य राखून जाया होऊन देता मसलतीने त्यांच्या सैन्यासभोवते हिंडोन फिरोन त्यास लांडगेतोड करावी. रयतेची मात्र वैरण राखून रानातील (शेतातील) वैरण जाळून टाकावी. रसद चालू देऊ नये. आपल्या

फौजेत मणाची धारण आणि त्यांच्या लष्करात शेराची धारण अशा तऱ्हेने करीत मराठी फौज किती आहे हा अदमास लागू देऊ नये.'

शिवकाळात युद्धे जमिनीवर आणि समुद्रात केली जात. त्यामुळे सैन्यात पायदळ व घोडदळ असे दोन प्रकार होते. आजच्याप्रमाणे वासुसेना त्याकाळी नव्हती. समुद्र आपले रक्षण करतो तेथून हल्ला होण्याची भीती नाही अशी शिवपूर्वकाळात राज्यकर्त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी आरमाराकडे लक्ष दिले नव्हते. शिवाजीराजे हे पहिले राज्यकर्ते होते, ज्यांनी समुद्रमार्गे धोका आहे हे जाणून आरमार वाढवण्याकडे लक्ष दिले. त्याकाळी नौकाचा वापर हा व्यापारासाठी, मक्केच्या यात्रेस जाण्यासाठी आणि चाचेगिरीसाठीच होत होता. त्यामुळे मुंबईचे इंग्रज आणि जंजिऱ्याचा सिद्धी यांचे सागरावर वर्चस्व प्रस्थापित झाले होते. ते शिवरायांनी मोडून काढले. शिवकाळात फौज आणि आरमार या दोन पद्धतीने लष्करी हालचाली होत होत्या.

लष्करात पायदळ आणि घोडदळ असे दोन प्रकार होते. त्यातील दोन हजार पायदळ आणि पाच हजार घोडदळ हे हुजूर फौज म्हणून ओळखले जाई. हुजूर फौज महाराजांच्या आणि राजकुटुंबाच्या संरक्षणासाठी असे. हुजूर फौजेव्यतिरिक्त पायदळात कोकणातील काटक मावळे स्वत:ची ढाल, तलवार किंवा बंदूक बाळगणारे लोक असत. त्यांची रचना करताना दहा सैनिकांवर एक दहिजा म्हणजे नाईक होता. पाच नाईकांवर एक हवालदार असे व दोन हवालदारांवर एक जुमलेदार असे. जुमलेदाराच्या हाताखाली १०० माणसे असत. अशा दहा जुमलेदारावर एक हजारी सरदार असे. त्याचप्रमाणे पंचहजारी अथवा सप्तहजारी सरदार असत. पायदळाच्या प्रमुखास सरनोबत म्हटले जाई. सैनिकाला महिन्याला एक ते तीन होन पगार मिळे. जमुलेदारास वर्षाला शंभर होन, एक हजारीला पाचशे होन तर पंच हजारीला सालीना २५०० होन पगार मिळे. सैन्यातील सर्व पगारी नोकर असत. वतने देण्याची मोगल पद्धत स्वराज्यात नव्हती.

घोडदळात बारगीर आणि शिलेदार असे दोन प्रकार होते. ज्याचे घोडे सरकारी असे तो बारगीर आणि जो स्वत:चे घोडे बाळगी तो शिलेदार अशी विभागणी होती. शिलेदाराला घोड्याच्या खर्चासाठी जादा पगार अदा केला जाई. घोडदळाच्या रचनेत पंचवीस सैनिकांवर एक हवालदार. पाच हवालदारांवर एक जुमलेदार आणि पाच जुमलेदारांवर एक सुभेदार व दहा सुभेदारांवर एक पंचहजारी असे. सरनोबत निराळा असे.

पायदळात तलवार आणि बंदुका हीच मुख्य हत्यारे होती. संरक्षणासाठी

ढाल असे. घोडदळात तलवार, भाला, बंदूक आणि पट्टा ही हत्यारे होती. त्याचप्रमाणे तोफखानाही असे. ज्यात हलक्या तोफा आणि जड तोफा असे दोन प्रकार होते.

पायदळ, घोडदळाबरोबर शिवरायांनी आरमाराकडेही लक्ष दिले. शिवरायांनी पक्के ओळखले होते की, ज्यांच्याजवळ आरमारी सामर्थ्य त्याचे राज्य सुरक्षित. १६५६ च्या सुमारास स्वराज्याची सरहद्द समुद्रापर्यंत भिडली. कोकण प्रांत महाराजांच्या ताब्यात येताच महाराजांचा संबंध इंग्रज, पोर्तुगिज, डच आणि फ्रेंच या परकीय सत्तांशी येऊ लागला. जंजिऱ्याचा सिद्दी सागरी चाचेगिरी करून बलवान झाला होता. तो स्वत:ला अरबी समुद्रावरचा राजाच समजत असे. त्याला फिरंगी वेलंदेजही घाबरत होते. महाराजांना सिद्दीप्रमाणे सागरावर सत्ता मिळवायची होती. त्यांनी अनेकदा सिद्दीला जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु यश आले नाही. महाराजांनी १६५७ साली कल्याण, भिवंडी काबीज करून खाली राजापूरपर्यंतचा सलग पट्टा स्वराज्यात सामील करून घेतला. त्यावेळेपासून महाराजांचा सिद्दीशी संबंध येऊ लागला.

शिवाजी महाराजांनी कल्याण आणि वसई येथे १६५७ मध्येच तारणे बांधण्यास सुरुवात केली. या दोन जागा निवडताना महाराजांची दूरदृष्टी दिसते. या भागात सागाची जंगले होती. त्यामुळे लाकूड मुबलक होते. शिवाय या दोन्ही खाडीतून मोठ्या बोटींचे जलावतरण करणे सोपे जाई. तसेच वसईतून पोर्तुगिज कारागीरही मिळत असत.

कल्याण, वसई येथे महाराजांनी पोर्तुगिज कारागिरांकडून बांधून घेतलेली पहिली वीस लढावू जहाजे समुद्रावर तरंगू लागताच शत्रूचे धाबे दणाणले. महाराजांचे आरमार वाढत होते. त्यांना सागरी किल्ल्याची गरज वाटू लागली. महाराजांनी सिद्दीचा जंजिरा जिंकण्याचा प्रयत्न १६६९ पर्यंत केला. परंतु सिद्दी हा आदिलशाही सोडून मोगलाईत गेल्याने त्याचे सामर्थ्य वाढले. त्याला शह देण्यासाठी महाराजांनी कुरटे बेटावर मालवणचा सिंधुदुर्ग बांधला. दापोलीजवळ हर्णे येथे सुवर्णदुर्ग बांधला आणि आपले आरमार सिद्ध केले.

आता महाराजांनी बचावात्मक धोरण सोडून आक्रमक धोरण स्वीकारले. महाराजांचे आरमारी सामर्थ्य पाहून सिद्दीची मस्ती उतरली होती. परकीय सत्ताही महाराजांना घाबरून होत्या. महाराजांना जगाला आपले बळ दाखवायचे होते. त्यांनी सागरी मार्गाने बसरूरवर छापा मारण्याचे ठरविले. ८ फेब्रुवारी १६६५ रोजी महाराज स्वत: स्वत:च्या बोटीवर चढले. स्वत:च्या आरमारातून लाटांवर स्वार होऊन छापा टाकणारा शिवाजी हा भारताच्या इतिहासात पहिला राजा

होता. महाराजांचा आपल्या आरमारावर इतका विश्वास होता. बसरूरची लूट मिळताच महाराजांनी मुंबईपासून १९ मैलावर असणाऱ्या खांदेरी-उंदेरी बेटावर किल्ले बांधायचे ठरविले.

महाराजांच्या आरमारातील बोटींची संख्या चित्रगुप्ताने दिली आहे. ती पाहता बोटींचे प्रकार आणि त्यांची संख्या पाहून शिवरायांच्या आरमाराची कल्पना येईल. या यादीत ३० गुराबा, १५० महागिऱ्या, ५० लहान गुराबा, १०० गलबते, मोठ्या होड्या १०, तर लहान होड्या १५०, तारवे ६०, मचवे ५० आणि १५ जूग इतकी संख्या दिली आहे. १५० टन वजन वाहणारी जहाजे ८५ असल्याचे संदर्भ मिळतात. महाराजांनी यापैकी १६० जहाजे मुंबईच्या बॅकबेसमोर उभी करून मुंबईच्या इंग्रजांवर दाब ठेवला होता, अशी इंग्रजांची नोंद आहे.

महाराज आपल्या आरमाराचा उपयोग लष्करी सामर्थ्य वाढवणे यासाठी जसा करीत तसाच तो इराण, बसरा, मोका बंदराशी व्यापार करण्यासाठीही करीत होते.

शिवाजी महाराजांचे मोठेपण कशात आहे हे विचारणाऱ्यास हे चोख उत्तर आहे की, आरमाराचे आणि जलदुर्गाचे महत्त्व जाणणारा शिवाजी हा पहिला राजा होता. आभाळाएवढ्या कर्तृत्वाचा राजाच हे करू शकतो.

■

# शिवाजी महाराजांची थोरवी

बरेचदा महाराजांचे चरित्र जे लिहिले किंवा वाचले जाते, त्यामागे त्यांच्या आयुष्यात घडलेल्या नाट्यमय आणि रोमांचकारी घटनांचे आकर्षण असते. महाराजांचे पूर्ण आयुष्य हे अशा घटनांनी परिपूर्ण आहे. मग ती अफझलखानाची भेट असो, पन्हाळ्यावरून पावन खिंडीतून केलेले पलायन असो, पुण्यात एक लाख सैन्याच्या गराड्यात शाहिस्तेखानावर टाकलेला छापा असो, की जगप्रसिद्ध आग्र्याहून सुटका असो. या सर्व घटना अगदी काल्पनिक वाटाव्या इतक्या नाट्यमय आहेत. वास्तविक ही चारही महाराजांवर आलेली संकटे होती. या घटना म्हणजे महाराजांच्या जिवाशी खेळ होता. यात प्रचंड धोका आणि जोखीम होती. वाचकाला महाराज यातून सुखरूप सुटले हेआधीच ठावूक असले तरी वाचनाचा आनंद त्याला भुरळ घालीत असतो.

शिवाजी महाराज हे एक असामान्य राजे होते. त्यामुळे त्यांचे चरित्र अभ्यासताना या नाट्यमय आणि रोमांचकारी घटनांत गुंतून न पडता महाराजांचे असामान्य गुण, कर्तृत्व, कर्तबगारी यांसारख्या त्यांच्या कार्यातून शिकण्यासारख्या आणि शिकवण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा अभ्यास झाला पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. आपल्या समाजाकडून एक चूक नेहमी होते. महाराजांप्रमाणे असामान्य गुणी व्यक्ती समोर आली की समाज तिला देवत्व बहाल करून टाकतो. ती व्यक्ती अवतारी पुरुष आहे, असे मानून मोकळे होतो. त्यामुळे आपला एक फायदा होतो. त्या व्यक्तीला देवत्व दिल्यामुळे त्या व्यक्तीचे गुण आपल्यात आणण्याची जबाबदारी आपल्यावर राहत नाही. ‘बोलूनचालून तो परमेश्वराचा अवतार आहे. आपण सारे सामान्य माणसे, आपली बरोबरी कशी होणार,’ असा विचार करून आपण नाट्यमय घटनांत गुंतून जातो. त्याच्याभोवती दंतकथांची जाळी विणतो. महाराजांच्या बाबतीत असेच घडले आहे. शिवजन्मोत्सवात आणि राज्याभिषेक महोत्सवात गुंतल्यामुळे महाराज समजून घेण्यास आपल्याला सवडच होत नाही.

महाराजांच्या काही ठळक असामान्य गुणांचा विचार आपण या प्रकरणात

करणार आहोत. महाराजांनी ज्या सुधारणा आपल्या स्वराज्यात विचारपूर्वक केल्या तो काळ साडेतीनशे-पावणे चारशे वर्षांपूर्वीचा होता हे लक्षात घ्यायला हवे. त्या काळचा समाज शिक्षणाच्या अभावी रुढीप्रिय होता. सामाजिक सुधारणा मान्य करण्याइतका विचारी नव्हता. अशावेळी या सुधारणा करताना वा विचार मांडताना महाराजांना किती यातना झाल्या असतील याची कल्पनाच करावी लागेल.

हिंदुस्थानात आजवर अनेक राजे महाराजे होऊन गेले. ज्यांचे नामोनिशाण राहिले नाही. याचे कारण ती राज्ये म्हणजे त्या घराण्याची मालमत्ता होती. राजाच्या मृत्यूनंतर राजकुमार वारसदार ठरत असे. असे पिढ्यान्‌पिढ्या राजगाद्या चालत असत. पण प्रजेला ही राज्ये आपली आहेत असे कधीच वाटले नाही. राजा प्रजेशी आणि प्रजा राजाशी कधीच समरस होऊ शकली नाही. महाराजांचे स्वराज्य हे श्रींच्या इच्छेने निर्माण झाले आहे अशी महाराजांची प्रथमपासून धारणा होती. त्याचप्रमाणे स्वराज्य हे भोसले घराण्याचेच फक्त राज्य नव्हते, तर ते रयतेचे आणि रयतेच्या सुखासाठीचे राज्य होते. म्हणून महाराजांना मृत्यूसमयी हे राज्य कोण चालवेल ही काळजी दिसत नव्हती. त्यांचा विश्वास होता की हे रयतेचे राज्य आहे, ते कोणी सांभाळावे हे रयत ठरवेल. त्याचप्रमाणे स्वराज्य श्रींच्या इच्छेने निर्माण झाले आहे तर श्रीच त्याची काळजी घेतील. एक राजा इतका निःस्पृह वृत्तीने विचार करू शकतो हे नवल आहे.

महाराजांनी स्वराज्यात वतनदारी पद्धत बंद केली होती. स्वराज्य हे वतनदारी पद्धत बंद करणारे १७ व्या शतकातले एकमेव राज्य होते. वतनदार, जमीनदार, देशमुख हे पिढ्यान्‌पिढ्या वतने चालवणारे वतनदार किल्ल्याप्रमाणे वाडेहुडे बांधून राहत असत. पदरी पागा आणि फौज बाळगीत. प्रसंगी शत्रूला मिळत असत. आपापसात वैर करीत. एकमेकांच्या लग्नाच्या वऱ्हाडावर हल्ला करीत. संपूर्ण वऱ्हाड कापून काढीत असत. आपापसात लढाया करीत. यामुळे राज्ये कमकुवत होत असत. आपले वतन कायम राहावे म्हणून शत्रूला फितूर होत असत. म्हणून महाराजांनी वतनदारी बंद केली. राज्याचे अष्टप्रधान, अधिकारी यांना वतन न देता वार्षिक रोख तनखा ठरवून दिलेला असे. हे स्वराज्याचे नोकर पगारी असल्याने त्यांना प्रजेला नाडता येत नव्हते.

महाराजांनी निर्णय घेऊन वतनदारी बंद केल्यावर त्याला अपवाद कधीही केले नाहीत. महाराजांचे व्याही पिलाजीराव शिर्के हे संभाजी राजांच्या प्रथम पत्नी सईबाई राणी साहेबांचे वडील आणि महाराजांची कन्या राज कुंवरबाई यांचे सासरे होते. म्हणजे पिलाजीराव दोन्हीकडून व्याही होते. त्यांचेही दाभोळचे वतन महाराजांनी जप्त केले होते. पिलाजीराव वतनासाठी आग्रही होते.

महाराजांच्या दृष्टीने हे दुखणे नाजूक होते. पण महाराजांची तत्त्वनिष्ठा अथांग होती.

महाराजांच्या ठायी अंधश्रद्धा बिलकूल नव्हती. राजाराम महाराजांचा २४ फेब्रुवारी १६७० रोजी जन्म झाला. सोयराबाई राणी साहेबांना पुत्र झाला. परंतु घरातील बायका चिंतीत होत्या. कारण राजाराम महाराज उपडे निपजले होते. महाराजांना जेव्हा ही बातमी समजली तेव्हा महाराज लगेच म्हणाले, 'हा मुलगा मोगलाई पालथी घालेल. जगदीश्वराने हा संकेत दिला आहे.' महाराजांच्या या बोलांनी घरावरची दु:खाची छाया मावळली. गडावर सर्वत्र आनंद झाला. महाराज अमावास्येलाही मोहिमेवर निघत असत. महाराज नेहमी म्हणत 'प्रतिपदेचा वाढता विजय प्राप्त करायचा असेल तर अमावास्येला मोहिमेवर निघायला हवे.' महाराजांच्या मनात अंधश्रद्धेला स्थान नव्हते.

महाराजांना गनिमी काव्याचे जनक म्हणून जगाने मान्य केले आहे. महाराजांनी ज्या प्रदेशात स्वराज्य स्थापन केले त्या प्रदेशाची भौगोलिक स्थिती गनिमी काव्याला पोषक होती. सह्याद्रीच्या आधाराने स्वराज्य जन्माला आले. डोंगराळ भागात वावरणारे मावळेही कणखर होते. गनिमी युद्धाचे तंत्र वापरताना साहसी कल्पना, योग्य नियोजन, पूर्ण गुप्तता, काटेकोर अंमलबजावणी आणि हमखास यश ही महाराजांची पंचसूत्री होती. आजही परदेशी लोक युद्धशास्त्रात महाराजांच्या गनिमी काव्याचा अभ्यास करतात.

महाराजांनी वतनदारी नष्ट करून प्रजेला सुखी केले. त्याचप्रमाणे शेतसारा निश्चित केला. मलिक अंबरने ठरवून दिलेली करप्रणाली सदोष होती. त्यातील दोष काढून महाराजांनी अनाजींच्या मदतीने तिला परिपूर्ण केले. जमीन मोजण्यासाठी एक काठी निश्चित केली. त्या काठीने शेताची मोजणी केली. जमिनीचा कस ठरविला. जमीन कोरडवाहू आहे की जिराईत आहे की बागाईत आहे हे पाहिले. जमिनीला पाटाचे पाणी मिळत असेल तर वेगळा कर लावला जाई. असा सर्वांगीण विचार करून शेतातून पिक किती येईल ते पाहून त्यातील चौथा वाटा सरकारी कर निश्चित केला. या कराची वसुली पगारी कारकून करीत असत. दुष्काळी परिस्थितीत करमाफी दिली जाई. शेतकऱ्यांना बैल, बी-बियाणे आणि खावटी सरकारातून मिळत असे. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली यावी या उद्देशाने पडीक जमीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिली जाई. या जमिनीवर पहिली ५-६ वर्षे कर आकारला जात नसे. हे सर्व नियम काटेकोरपणे पाळले जात. त्यामुळे शेतकरी सुखी झाला. त्याला स्वराज्य आपले राज्य वाटू लागले.

महाराजांची मराठा फौजेला सक्त आज्ञा असे की फौजेने भरल्या शेतातून जाऊ नये. त्यामुळे उभ्या पिकाची नासाडी होते. काढणीला आलेली पिके

गेल्यावर शेतकरी आर्थिक संकटात येतो. त्याचप्रमाणे फौजेने शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही स्पर्श करू नये. फौजेला आवश्यक वस्तू शेतकऱ्याला योग्य मोबदला देऊन त्याच्या मर्जीने खरेदी कराव्यात. तसेच फौजेने धर्मस्थळे, प्रार्थनास्थळे, साधूसंत, स्त्रिया आणि धार्मिक ग्रंथ यांना तोशिष लावू नये. मोहिमेवर असताना लुटीत धार्मिक ग्रंथाची प्रत सापडली तर तिचा अवमान न करता तिला योग्य व्यक्तीच्या हाती सुपूर्द करावी.

सर्व अष्टप्रधान, अधिकारी आणि फौज वतनधारी असल्याने त्यांना त्यांच्या अंगच्या गुणांप्रमाणे बढती आणि बदली करता येत असे. त्यामुळे व्यक्तीच्या अंगच्या गुणांना स्वराज्यात वाव होता. त्यामुळे साधी खेड्यातील माणसेही शौर्याच्या जोरावर फौजेत उच्च पदावर गेल्याची उदाहरणे आहेत. महाराज स्वतः गुणग्राहक होते.

आजूबाजूच्या मोगली आमदानीत स्त्रियांच्या अब्रूला काडीचीही किंमत नव्हती. स्त्रियांचा बाजार मांडला जात असे. कित्येक सत्ताधीश आपले जनानखाने बाळगून होते. ते त्यांच्या प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे. महाराजांच्या स्वराज्यात त्याच गुन्ह्यासाठी वयाच्या बाराव्या वर्षी महाराजांनी रांझेकर पाटलाचे हात-पाय तोडण्याची शिक्षा दिली होती. बेलवडीच्या पाटलिणीवर वाकडी नजर ठेवल्यामुळे चिडलेल्या महाराजांनी स्वतःच्या मेहुण्याचे सखोजी गायकवाडाचे डोळे काढून त्याला पन्हाळ्यावर अंधार कोठडीत ठेवले होते. इतकेच नव्हे तर युवराज संभाजीराजे यांच्यावर अनाजींनी काही आरोप केले, तर युवराजांची दरबारी चौकशी करण्यात आली. परस्त्रीला मातेसमान मानणारे महाराज आजही आदर्श ठरतात. महाराजांची सात लग्ने झाली होती. परंतु ती उपभोगासाठी नव्हती. एक लग्न झाले की दोन कुटुंबे आणि अनेक नातलग एकत्र येतात. अनेक व्यक्तीचा पाठिंबा मिळतो. अशी ही लग्ने केवळ राजकारणाची सोय म्हणून जिजाबाईंनी ठरविली होती. राजे महाराजे अशी अनेक लग्ने करीत असत. स्वराज्याच्या सुरुवातीच्या काळात महाराजांना माणसे जोडण्याची गरज होती. त्याचाच एक भाग म्हणून ही लग्ने झाली असून त्यामुळे शेकडो कुटुंबे स्वराज्याच्या उपयोगी पडली.

महाराज धार्मिक होते. त्यांना हिंदू धर्माचा अभिमान होता. परंतु इतर धर्मियांचा अनादर त्यांनी कधीच केला नाही. औरंगजेब कट्टर मुस्लीम होता. परंतु त्याचबरोबर त्याने हिंदू देवतांचा द्वेष केला. हिंदूंची देवळे पाडली आणि तेथे मशिदी बांधल्या. हिंदूंवर झिलिया कर लावला. बंधने आणली. महाराजांनाही स्वराज्यात तसे करता आले असते. परंतु महाराजांनी ते केले नाही. स्वराज्यात महाराजांनी एकही मशीद पाडली नाही. त्यांच्या पदरी अनेक

मुस्लीम सरदार होते. इब्राहिमखान, दौलतखान, सिद्दी हिलाल, नूरखान बेग, न्यायाधीश काजी असे अनेक मुस्लीम सेवक स्वराज्यात होते. महाराजांच्या अंगरक्षकातही मुस्लीम होते. हे सर्व स्वामीनिष्ठ सेवक होते. महाराजांनी धर्माच्या नावावर वा जातीच्या नावावर भेदभाव केला नाही. त्यामुळे अठरापगड जाती-धर्माचे लोक स्वराज्यात सेवा देत होते.

राज्याभिषेक प्रसंगी महाराजांनी राज्याभिषेक शक चालू केला. स्वत:ची स्वतंत्र शिवराई आणि होन ही नाणी पाडली. ही नाणी रायगडावरच्या टांकसाळीत तयार होत होती. शिवराई हे तांब्याचे आणि होन हे सोन्याचे नाणे होते. दोन्ही नाण्यावर एका बाजूला 'श्री राजा शिव' आणि दुसऱ्या बाजूस 'छत्रपती'असे छापले होते. या दोन्ही नाण्यावर देवदेवतांचे चित्र, नाण्याची दर्शनी किंमत, टांकसाळीची खूण किंवा छपाईचे वर्ष काहीही छापलेले नव्हते. त्या मागे महाराजांचा निश्चित विचार होता की ही नाणी निधर्मी राज्याची नाणी असून ती चिरकाळ टिकणार आहेत. म्हणजेच स्वराज्यही चिरकाळ टिकणार आहे. याचप्रसंगी महाराजांनी कारभारातून फारसी शब्दांचे उच्चाटन केले. त्यासाठी पर्यायी प्राकृत शब्द निर्माण करून त्याचा राज्यव्यवहार कोश तयार करण्यात आला. शिवाजी महाराज किती दूरगामी विचार करीत होते.

आज एकविसाव्या शतकाकडे जाताना पर्यावरणाचा ऱ्हास झालेला दिसतो. विकासासाठी प्रचंड वृक्षतोड झाल्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत असताना साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या महाराजांच्या आज्ञा पहा. आरमारासाठी आंबे, फणस या वृक्षांची लाकडे लागतात. परंतु ही झाडे वर्षा-दोन वर्षांत होत नाहीत. रयतेने त्यांना लेकराप्रमाणे वाढवले असते. तेव्हा 'त्यास हात लावू नये. झाड जीर्ण झाले असेल तर त्याच्या मालकाला योग्य मोबदला देऊन त्यास राजी करून न्यावे. रयतेनेही एखादे झाड तोडावे लागल्यास त्याच जातीचे दुसरे झाड लावून-जगवून मग तोडावे.' इतक्या कडक आज्ञा देण्यामागे महाराजांना पर्यावरणाचे महत्त्व पटले होते, याचे नवल वाटल्यावाचून राहत नाही.

महाराजांनी अनेक लढाया केल्या. प्रत्येक लढ्यात काही मराठी फौज कामी येत असे. घरातला कर्ता पुरुष धारातीर्थी पडल्यावर घरातील त्याच्या पत्नी व मुलांची आबाळ होऊ नये, यासाठी महाराज जागृत होते. त्याच्या कुटुंबाची आबाळ होऊ नये यासाठी रायगडावर आश्रमगृह बांधले होते. त्यात ही निराधार मुले व स्त्रिया यांची सोय लावली जात होती. ही मुले मोठी झाल्यावर त्यांच्या अंगभूत गुणांनुसार सेवेत सामावून घेतले जात असे. या आश्रमगृहाची देखभाल येसूबाईंकडे देण्यात आली होती. प्रजेचा इतका विचार करणारे महाराज श्रेष्ठ वाटतात.

महाराजांच्या राज्यात सर्व जातीधर्माचे लोक सेवेत, सैन्यात, आरमारात होते. महाराज कोणताही जातीभेद करत नसल्यामुळे सर्वांना समान संधी देत होते. महार, रामोशी, बेरड हे वाटमारी आणि लूटमार करून आपला उदरनिर्वाह करीत होते. त्यांना महाराजांनी सेवेत घेतले. रामोशींना गडाच्या सुरक्षिततेसाठी पहारे सांगितले. अनेक महार हेरखात्यात कामाला होते. हे लोक काटक, शूर आणि जिवाला जीव देणारे होते. महाराज त्यांना सन्मानाने वागवित असत. महाराजांसाठी हे अस्पृश्य कधीच नव्हते. महाराज त्यांना 'नाईक' म्हणून संबोधीत.

महाराजांपूर्वी ६०० वर्षे आरमाराचे महत्त्व जाणणारा राजा झाला नव्हता. महाराष्ट्राला साडेचारशे मैलांचा समुद्रकिनारा लाभला आहे. पंधराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात परदेशी दर्यावर्दी भारतीय समुद्रात गस्त घालत होते. त्यामुळे सागरी मार्गाने राज्यावर आक्रमण होण्याची शक्यता होती. ज्या राज्याला समुद्रकिनारा आहे, त्या राज्याला आरमाराची आवश्यकता असते. स्वराज्याच्या सीमा जशा कोकणाला भिडल्या तसे महाराजांना आरमाराचे महत्त्व जाणवू लागले. जंजिऱ्याचा सिद्दी आणि मुंबईचे इंग्रज यांच्या जोडीला आपलेही आरमार असावे असे महाराजांना वाटले. महाराजांनी कल्याण-भिवंडी घेतल्यावर कल्याणला गलबते बांधण्यास सुरुवात केली. थोड्याच काळात मराठ्यांची आठशे तारवे, गलबते, जहाजे अरबी समुद्रात फिरू लागली. १६६५ मध्ये बार्सिलोर शहरावर छापा घालण्यासाठी जाताना महाराज स्वत: आपल्या आरमाराचा उपयोग करून गेले. स्वत: समुद्रमार्गे जाऊन हल्ला करणारे महाराज हे एकमेव सत्ताधीश होते. महाराजांचा इतका आपल्या आरमारावर विश्वास होता.

१७ व्या शतकात हिंदू धर्माची दारे बाहेर जाणाऱ्यांसाठी खुली होती, परंतु एकदा बाटलेल्याला पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश नव्हता. महाराजांनी ही धार्मिक क्रांती केली. महाराजांनी बजाजी नाईक-निंबाळकर या आपल्या मेव्हण्यास हिंदू धर्मात घेतले. इतकेच करून महाराज थांबले नाहीत. बजाजी नाईकांना महाराजांनी परत हिंदू धर्मात घेतले तरी समाज ते मानायला तयार नव्हता. बजाजींचा पुत्र महादजी याचे लग्न जमत नव्हते. एकदा बाटलेल्या बजाजींच्या मुलाला कोणीही आपली मुलगी देण्यास तयार होईना, तेव्हा महाराजांनी आपली स्वत:ची मुलगी सखूबाई हिचा विवाह महादजीबरोबर लावून दिला. त्यानंतर १९ जून १६७६ रोजी महंमद कुलीखानाचे शुद्धीकरण करून नेताजी पालकर केला. महाराजांनी नेताजीबरोबर भोजन केले. किती क्रांतीकारी विचार होते महाराजांचे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातले

चरित्रकार कृ. अ.केळुसकर महाराजांचे अनेक गुण सांगताना लिहितात, 'महाराजांचा लोकसंग्रह भरपूर होता. औदार्य, शौर्य, वीर्य, पराक्रम, युक्तिमत्ता, साहस असे अनेक गुण महाराजांचे ठायी होते. गुणज्ञता आणि नि:पक्षपात बुद्धी, निष्कपटीपणा व मित्रभाव, उद्दमशीलता आणि जरब, कल्पकता, तेजस्विता आणि स्वाभिमान हे अलौकिक गुण महाराजांजवळ होते. महाराजांचे व्यावहारिक वर्तन आणि कौटुंबिक वर्तन त्याकाळी अत्यंत दुर्मीळ होते. महाराजांची धर्मनिष्ठा, स्वधर्माभिमान आणि परधर्म सहिष्णुता हे गुण महाराजांचे ठायी एकत्र होते. असे अनेक राज्यकर्त्यांच्या अंगी असणे आवश्यक असणारे गुण महाराजांच्या ठायी असल्याने कवी भूषणला त्यांची भुरळ पडली नसती तरच नवल.'

कवी भूषण महाराजांबद्दल लिहितो,

'कुंद कहा पयवृंद कहा,
अरुचंद्र कहा, सरजा जस आगे।
भूषण भान कृपाण कहा,
बखुमान प्रताप महितल पागे।।
राम कहा, द्विजराम कहा,
बलराम कहा रण मे अनुरागे।
बाज कहा, मृगराज कहा,
अति साहस मे सिबराजसे आगे।।'

अर्थ :- शिवाजीपुढे कुंदकळ्या, दूध आणि चंद्र यांची शुभ्रता आणि शीतलता काय असणार? सूर्य आणि अग्नीचे तेजही शिवाजीपुढे काहीच नाही. राम, परशुराम आणि बलराम यांचा पराक्रमही शिवाजीपुढे कमीच आहे. सिंह आणि ससाणा यांचे साहस शिवाजीच्या साहसापुढे काहीच नाही.

औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आणि त्यांच्या राज्याला नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न केले, पण सर्व विफल झाले. प्रत्येकवेळी तावडीत सापडलेले महाराज सुखरूप त्यातून सुटत होते. या अपयशाचे खापर आपल्या सुभेदारांवर फोडताना औरंगजेब काय म्हणाला ते कवी भूषण याच्या शब्दात-

'सायस्ते खाँ दक्षिणको प्रथम पाठायौ
वह बेटाके हाथ जाड कै गॅवायो है।
भूषण भनत जो जो भे ज्यौ उत
औरो तिन बेही कार बरजोर
कटक कटायौ है।।
जोई सुबेदार जात सिवाजी
सो हारी ताकों अवरंह कहै

याको किबे मन भायौ है।
मुलूख लुटायौ तो लुटायौ कहा
भयौ डील, अपनों बचाथौ
महाकाज करी आयौ है।।'

अर्थ :- शाहिस्तेखानाला दक्षिणेत पाठवले तर तो आपला मुलगा आणि हात गमावून बसला. शिवाजीवर ज्यांना ज्यांना पाठवले ते फौजेचा नाश करून आले. अशा हारून आलेल्या सुभेदारांना औरंगजेब म्हणतो, 'अरे आपला मुलूख लुटला तर लुटला, त्यात काय एवढे? तुम्ही स्वत:ला वाचवून आलात, हेच मोठे काम केलेत.'

याच कवी भूषणने राज्याभिषेकापूर्वी एक वर्ष 'शिवभूषण' नावाचा काव्यमय ग्रंथ लिहिला. त्यात महाराजांच्या पराक्रमाविषयी तो लिहितो,

'पातशाह बावनो दिल्ली के पातशहा जिती,
पातशाह हिंदूपति पातशाह सेवाने'

म्हणजे, 'बावन्न बादशाह्या ज्या औरंगजेबाने जिंकल्या त्या दिल्लीच्या बादशहाला हिंदूपती बादशाह शिवाजीने जिंकले.'

महाराजांच्या अंगच्या अनेक अलौकिक गुणांमुळे त्यांची किर्ती दाही दिशांना पसरली होती. स्वराज्य म्हणजे लोकांना आपले वाटलेले राज्य होते. त्यामुळे महाराजांच्या सर्वच स्वकीय आणि परकीय सत्तांनी त्यांचा धसका घेतला होता. साधूसंतांना महाराजांचा आधार वाटत होता. शिवाजीच्या हाती हिंदूधर्म सुरक्षित आहे ही सर्वांची भावना होती.

त्याच काळात राष्ट्रसंत रामदास स्वामी रायगडापासून ३२ कि.मी.वर असणाऱ्या शिवथर घळीत दासबोध लिहीत होते. प्रजेला बलोपासनेचे महत्त्व समजावून सांगत होते. महाराजांनी स्वामींच्या कार्याविषयी ऐकले होते. स्वामींचे हजारो रामदासी स्वराज्यात फिरत होते. स्वराज्याचा विचार रयतेत पेरत होते. तरुणांना हनुमानाप्रमाणे बलवान बनवित होते. महाराजांना स्वामींना भेटण्याची इच्छा होती. पण योग येत नव्हता.

३ एप्रिल १६७२ रोजी महाराजांना एक सुंदर पत्र पावले. शिवथर घळीतून आलेले हे पत्र समर्थ रामदास स्वामी यांनी पाठवले होते. स्वामींसारख्या अधिकारी संताला महाराजांच्या कार्याची आपणहून दखल घ्यावीशी वाटली यातच महाराजांचे थोरपण आहे. आपल्या पंधरा ओवींच्या काव्यमय पत्रात समर्थ म्हणतात,

'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू श्रीमंत योगी ।।१।।
परोपकाराचिया राशी उदंड घडती जयासी

तयांचे गुण महत्त्वासी तुळणा कैची ।।२।।
नरपति, हयपति, गजपति, गडपति,
भूषपति, जलपति
पुरंदर आणि शक्ती पृष्ठभागी ।।३।।
यशवंत, कीर्तीवंत, सामर्थ्यवान वरदवंत
पुण्यवंत नीतिवंत जाणता राजा ।।४।।
आचारशील, विचारशील, दानशीळ धर्मशीळ
सर्वज्ञपणे सुशील सकळा ठायी ।।५।।
धीर उदार नृपवर तुच्छ केले
तीर्थ क्षेत्रे मोडिली ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।।६।।
सकळ पृथ्वी आंदोळली धर्म गेला
देव, धर्म, गोब्राह्मण करावया संरक्षण ।।७।।
हृदयस्थ जाला नारायण प्रेरणा केली
उदंड पंडित पुराणिक, कवीश्वर याज्ञिक वैदिक ।।८।।
धूर्त, तार्किक सभानायक तुमच्या ठायी
या भूमंडळाचे ठायी धर्मरक्षी ऐसा नाही ।।९।।
महाराष्ट्र धर्म राहिला काही तुम्हा कारणे
आणि काहि धर्मकृत्ये चालती
आश्रित होवून कित्येक राहती ।।१०।।
धन्य धन्य तुमची किर्ती विश्वी विस्तारली
कित्येक दुष्ट संहारले कित्येक धाक सुटले ।।११।।
कित्येकांसी आश्रय जाले, शिवकल्याण राजा
तुमचे देशी वास्तव्य केले, परंतु वर्तमान नाही घेतले
ऋणानुबंधे विस्मरण जाले, काय नेणो
सर्वज्ञ मंडळ धर्ममूर्ति सांगणे काय तुम्हा प्रती?
धर्मसंस्थापनेची कीर्ती संभाळली पाहिजे
उदंड राजकारण तटले, तेणे चित्र विभागले
प्रसंग नसता लिहिले, क्षमा केली पाहिजे ।।'

महाराजांच्या ठायी असलेल्या थोरपणाविषयी रामदास स्वामींसारख्या अधिकारी राष्ट्रसंताने लिहिलेले पत्र पाहून थक्क व्हायला होते.

इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज आणि डच यांसारख्या परकीय सत्ताही शिवरायांच्या कर्तृत्वाने भारावल्या होत्या. विशेषत: इंग्रज आणि पोर्तुगीज महाराजांवर लक्ष ठेवून होते. महाराजांबद्दलच्या घडामोडी आपल्या मायदेशी आणि वरिष्ठांना पत्राद्वारे कळवित असत. नवलाची गोष्ट म्हणजे महाराजांचे चरित्र लिहिणारा

पहिला लेखक हा पोर्तुगीज होता. कॉस्मे-द-गार्डा या पोर्तुगीज गृहस्थाने १६९५ मध्ये जगातले पहिले शिवचरित्र लिहिले आहे. महाराजांच्या मृत्यूनंतर पंधरा वर्षांत लिहिलेले हे महाराजांचे चरित्र अधिक विश्वासार्ह आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आणखी एक थोरपण म्हणजे त्यांना त्यांच्या हयातीतच देवत्व बहाल केले होते. साधारणत: लोक एखाद्या संताला भजू लागले की त्याचे भक्त वाढू लागतात. नंतर त्या संताच्या मृत्यूपश्चात त्याची समाधी पुजली जाऊ लागते, तेथे मठ वा मंदिर उभे होऊन त्या संतास देवत्व प्राप्त होते. यात कधी कधी शंभर एक वर्षांचा काळही निघून जातो. छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श राजे होते. परंतु त्यांच्या हयातीतच १६७८ मध्ये त्यांचे पहिले मंदिर कर्नाटकात धारवाड जिल्ह्यातील यादवाड येथे बांधले गेले. कर्नाटक स्वारीच्या वेळेस महाराजांनी यल्लमा देसाई हिला पराभूत केले होते. परंतु तिचा पराक्रम पाहून महाराजांनी तिला तिचा मुलूख सन्मानाने परत केला होता. त्या प्रसंगी यल्लमा देसाईने महाराजांचे हे पहिले घुमटीवजा मंदिर बांधले. त्यात महाराजांना घोड्यावर बसवले असून त्यांच्या उजव्या हातात तलवार आणि डाव्या हातात ढाल आहे. ग. ह. खरे यांनी हे मंदिर प्रथम प्रकाशित केले.

महाराजांचे दुसरे मंदिर १६९८ साली छत्रपती राजाराम महाराजांनी किल्ले सिंधुदुर्गावर बांधले. हे महाराजांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर होय. या मंदिराची आजही विधीवत पूजा केली जाते.

वरील दोन मंदिराव्यतिरिक्त आधुनिक काळात काही मंदिरे वा स्मारके बांधली आहेत. महाराजांचे एक स्मारक पन्हाळ्यावर नर्सरी बागेत आणि दुसरे कोल्हापूर येथे, अशी दोन मंदिरे-स्वरूप स्मारके आहेत. त्याचप्रमाणे कवठे महाकाळ गावात एक स्मारक आहे. त्याचप्रमाणे श्री शैल मल्लिकार्जून येथे १९७४-७५ मध्ये एक स्मारक बांधले आहे.

महाराजांच्या अंगच्या गुणांचा कर्तृत्वाचा विचार करता एकच सुभाषित तोंडून बाहेर येते.

योजक: तत्र दुर्लभ:

# भोसले कुळाची वंशावळ

छत्रपती शिवरायांचे भोसले घराणे हे राजस्थानातील उदेपूरच्या सिसोदे घराण्यापैकी आहे हे राज्यभिषेकाप्रसंगी सिद्ध करण्यात आले असले तरी तसे पुरावे सापडत नाहीत.

पुराव्यांनी सिद्ध होते ते शहाजीचे खापर पणजोबा खेलोजी, पणजोबा परसोजी, आजोबा बाबाजी आणि वडील मालोजी इतकेच. परंतु राज्याभिषेक समयी जी भोसले कुळाची वंशवेल सिद्ध करण्यात आली आणि ज्यायोगे महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध केले गेले, ती वंशावळ अभ्यासूंसाठी खाली दिली आहे.

लक्ष्मणसिंह

↓

अजयसिंह

↓

सजनसिंह

↓

दिलीपसिंह

↓

शिवाजी

↓

भोसाजी

(चितोडजवळ भोसावंत गावी वास्तव्य. यावरून भोसले आडनाव पडले.)

↓

देवराजजी

↓

उग्रसेन

↓

माहूलजी

↓

खेळोजी

↓

जनकोजी

↓

संतुजी खेलोजी

↓

संभाजी - परसोजी

↓

बाबाजी (जन्म १५३३)

↓ मालोजी

↓ विठोजी (जन्म १५५३)
मुंगी गावचा पाटील. खेळोजी, म्हालोजी, संभाजी,
कक्काजी, मंबाजी, परसोजी, नागोजी, त्रिंबकजी असे आठ पुत्र

मालोजी

↓ शहाजी

↓ शरीफजी

शहाजी

↓ संभाजी
मृत्यू १६५६
कनकगिरीच्या लढाईत ठार

↓ शिवाजी
जन्म १६३०
मृत्यू १६८०

↓ एकोजी
१६७६ तंजावरचे राज्य स्थापिले.

## छत्रपती शिवाजी महाराज

धर्मवीर संभाजी महाराज
जन्म १६५७ । १६८९

↓

शाहू महाराज सातारा
जन्म १६८२ । १७४९

↓

रामराजे द.आ.
१७५० । १७७७

↓

शाहू महाराज द.आ.
१७७७ १८०८

↓

- प्रतापसिंह
  १८०८ । १८३९ राज्य
  मृत्यू १८४७
  ↓
  त्रिंबकजी उर्फ जंगली महाराज
  मृत्यू १८९२
- रामचंद्र
- शहाजीराजे
  १८३९ । १८४८ राज्य
  मृत्यू १८४८
  ↓
  व्यंकोजी द. आ.
  १८४८ - १८६४ राज्य
  ↓
  राजाराम महाराज द.आ.
  - शिवाजी राजे
    मृत्यू १९१७
  - प्रतापसिंह २ रे
    मृत्यू १९२५
    ↓
    शाहू महाराज द.आ.
    १९२५ - १९५०
    ↓
    - शिवाजीराजे
    - अभयसिंह
    - विजयसिंह
      ↓
      शिवेंद्र राजे
      विद्यमान
    - प्रतापसिंह ३ रे द.आ.
      ↓
      उदयन राजे
      विद्यमान

राजाराम महाराज (कोल्हापूर)
१६८९ - १७०० राज्य केले.

# कोल्हापूरचा वंश (कारकिर्द)

राजाराम महाराज (कोल्हापूर)
१६८९ - १७०० राज्य केले.

↓

शिवाजी महाराज - ताराबाई पुत्र
१७१० - १७१४

↓

संभाजी महाराज राजसबाई पुत्र
१७१४ - १७६०

↓

शिवाजी महाराज २ रे द.आ. खानवटकर (१७६० - १८१३)

↓ संभाजी महाराज
१८१३ - १८२१

↓ शहाजी महाराज बुवासाहेब
१८२२ - १८३८

↓

शिवाजी महाराज ३ रे
१८३८ - १८६६

↓

राजाराम महाराज
द. आ. पाटणकर
१८६६ - १८७१

↓

शिवाजी महाराज ४ थे
द. आ. सावर्डेकर
१८७१ - १८८३

↓

शाहू महाराज (कागलकर)
१८८४ - १९२२

↓

राजाराम महाराज

१९२२ - १९४०

↓

प्रतापसिंह (चावलेकर)
१९४० - १९४७

↓

शहाजी राजे (पवार देवास)
१९४७ - १ एप्रिल १९४९
भारतात संस्थान विलिन

↓

शाहू महाराज (नागपूरकर)
द. आ. १९६२

↓

संभाजी महाराज (विद्यमान)

# श्री. महेश श्री. गुप्ते यांचे
# अन्य प्रकाशित ऐतिहासिक साहित्य

१. शिक्केकट्यारी :
संपूर्ण मराठ्यांचा इतिहास थोडक्यात सांगणाऱ्या या पुस्तकाला कोकण इतिहास परिषदेचा२०१८-१९ चा उत्कृष्ट इतिहास संशोधन हा पुरस्कार लाभला आहे.

२. स्वराज्यसाक्षी :
महाराष्ट्राचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजीराजे यांच्या जीवनावर बेतलेली एक आगळीवेगळी कादंबरी.

शिवरायांचे शिलेदार मालिकेतील किशोरवयीन मुलामुलींसाठी
लिहिलेली संग्राह्य पुस्तके

३. प्रति शिवाजी नेताजी पालकर
४. धारकरी मुरारबाजी देशपांडे
५. वीररत्न बाजी पासलकर
६. सरसेनापती हंबीरराव मोहिते
७. रणवीर बाजीप्रभू देशपांडे
८. सरनौबत प्रतापराव गुजर
९. हेर कौस्तुभ बर्हिजी नाईक
१०. पेशवे मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी चिटणीस
११. हिरोजी फर्जंद - फिरंगोजी नरसाळा

महाराष्ट्राच्या वीरकन्या

१२. वीरमाता जिजामाता
१३. महाराणी येसूबाई
१४. भद्रकाली ताराराणी
१५. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

आगामी

१. पुण्यश्लोक छत्रपती शाहू महाराज
२. छत्रपती राजर्षी शाहू महाराज
३. त्रिंबकजी डेंगळे पाटील
४. राजे उमाजी नाईक

इतिहास लेखन ही एक प्रदीर्घ लेखन प्रक्रिया आहे. रोज नवनवी साधने उपलब्ध होत असतात. जुन्या संशोधनाबाबत नव्याने नवीन चिकित्सा होत असतात. एखाद्या पूर्वीच्या पुराव्याचे अर्थ बदलत असतात. त्यामुळे शिवचरित्र भविष्यातही हजारो वर्षे लिहिले जाणार आहे. शिवचरित्र हे एक चिरतरुण काव्य आहे. हा विचार मनात पक्का झाला आणि आणखी एका शिवचरित्राची भर पडणार हे नक्की झाले. या शिवचरित्रात त्यातील आश्चर्यकारक आणि चमत्कार वाटावे अशा प्रसंगाच्या वर्णनाचा मोह टाळून शिवरायांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिवप्रेमी वाचक या 'निश्चयाचा महामेरू' चे स्वागत करतील अशी खात्री आहे...

